

मेजर जनरल
शशिकांत गिरिधर पित्रे
(निवृत्त)
जयतु शिवाजी
जयतु शिवाजी

जयतु शिवाजी जयतु शिवाजी

मेजर जनरल शशिकांत गिरिधर पित्रे (निवृत्त)

राजहंस प्रकाशन

जयतु शिवाजी, जयतु शिवाजी!
मेजर जनरल शशिकांत गिरिधर पित्रे (निवृत्त)

संपादक : आनंद हर्डीकर

प्रकाशक : दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन प्रा. लि.
१०२५, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९, (०२०) २४४६५०६३
E-mail : rajhansprakashan1@gmail.com
Website : www.rajhansprakashan.com

Jayatu Shivaji, Jayatu Shivaji!
Major General
Shashikant Giridhar Pitre (Retd.)

'कल्पतरू' ७५, रक्षक सोसायटी, औंध कॅम्प, पुणे ४११ ०२७
भ्रमणध्वनी : ०९८९०२५७१११, E-mail : shahipitre@gmail.com

मुखपृष्ठ : अक्षर शेडगे

ई-बुक रूपांतरण: अविनाश दाते

आतील नकाशे : तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी : मुग्धा दांडेकर,
९८२२७०७९७१

आवृत्ती पहिली : ऑक्टोबर २०२१

राजहंस क्र. J-01-2021

ISBN 978-81-952301-7-4



उंबरठ्यावरील तारुण्याला अंमळ थांबायला सांगून
आणि स्वत:चे शिक्षण बाजूला ठेवून
आपल्या मायेविना पोरक्या भावावर
निस्सीम वात्सल्याची पाखर घालणाऱ्या
माझ्या भगिनी
सुमन जयसिंग पेंढारकर
यांच्या स्मृतीला सादर समर्पण...

मनोगत

कोल्हापुराच्या रांगड्या मातीत बालपण आणि तारुण्याचा आरंभाचा काळ व्यतीत करणाऱ्या प्रत्येक तरुणाचे हमखास एकच दैवत असते, ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. मी त्यातलाच एक. पाठ्यपुस्तकातलंच नव्हे, तर शिवाजीराजांच्यावरील सारं ललित लेखन आम्ही सर्व मित्र अक्षरश: कोळून प्यालो होतो. जणू काय आपल्या परड्यातच असल्यासारखे वाटणाऱ्या पन्हाळा आणि विशाळगडाच्या वार्षिक वारीचा दंडक नवव्या-दहाव्या वर्षाच्या वयापासून माझी सैन्यात जाण्याची वेळ येईपर्यंत आम्ही मित्रांनी चुकवला नाही. त्या आल्हादक काळात महाराज खरोखरच रोमरोमात भरले होते.

सैन्यात वर्ण वगैरे ओळखत नाही, जात-धर्माला खरोखरच तिथं काहीही महत्त्व दिलं जात नाही. मिलिटरी ॲकॅडमीमध्ये पाऊल टाकल्यावर लागलीच सीनिअर टर्मच्या 'जंटलमन कॅडेट'कडून 'फ्रंट रोल्स' खाताना एक सुखद जाणीव झाली. त्यांच्या मते महाराष्ट्रातून आलेला प्रत्येक मराठा होता आणि सर्वांची एकच जातकुळी होती, ती म्हणजे शिवाजी महाराजांचा वारसदार. त्यानंतर शिवाजी महाराजांच्या कथा वाचून सैन्यात जाण्याची बालपणी मिळालेली प्रेरणा आणखीनच दृढ झाली. सैन्याच्या प्रदीर्घ हडेलहप्पीदरम्यान तिनं कधीच अंतर दिलं नाही.

सैनिकी अभ्यासक्रमाचा प्रमुख भाग असलेल्या डावपेच आणि रणनीतीचं मनन जसजसं वाढत गेलं, तसतसं महाराजांच्या प्रतापगडाच्या लढाईच्या, लाल महालावरील हल्ल्याच्या, पन्हाळगडावरून सुटकेच्या, करतलबखानावर डोंगरात लावलेल्या सापळ्याच्या बालपणीच्या सुरस कथांना एक नवीन परिमाण प्राप्त झालं, त्यांना प्रगल्भ अर्थ लाभला. तारुण्यापासून जोपासलेल्या त्यांच्याबद्दलच्या भक्तीच्या बरोबरीनं शिवाजीराजांबद्दल पराकोटीच्या व्यावसायिक आदरानं मन:पटलावर भक्कम बैठक मारली. शिवाजी महाराजांच्या लष्करी शास्त्रातील उच्च अधिष्ठानाची जसजशी अधिकाधिक प्रचीती येऊ लागली, तसतसा ऊर अभिमानानं भरून येऊ लागला. निवृत्तीनंतर त्यांच्या या पैलूवर काहीतरी लिखाण करण्याच्या अभिलाषेनं मनात घर केलं.

शिवभक्ती हा कोल्हापूरकरांचा स्थायिभाव आहे. कोल्हापूरच्याच चित्रपटमहर्षी भालजी पेंढारकर यांची शिवतपस्या दांडगी! त्यांनी शिवाजीराजांवर काही एकमेवाद्वितीय चित्रपट काढले. माझी मोठी बहीण सुमन ही भालजींची सून. ते आयुष्याच्या संध्याकाळात काही काळ माझ्या बहिणीच्या घरात राहत होते. मी त्यावेळी सैन्यातील तरणाबांड अधिकारी होतो. सुटीवर आलो असताना काही वेळा भालजींची भेट होण्याचा आणि राजांच्या लष्करी गुणवत्तेबाबत चर्चा करण्याचा सुवर्णयोग मला लाभला. त्या अत्यल्प सत्संगादरम्यान भालजींच्या शिवभक्तीनं मी कमालीचा प्रभावित झालो. या पुस्तकामागील प्रेरणेचं श्रेय काही प्रमाणात त्या साक्षात्कारी क्षणांना जातं.

शिवाजीराजांवरील मराठी भाषेतील वाङ्मयाला मर्यादा नाही. अनेक प्रथितयश इतिहासकार, भाष्यकार, तत्त्वज्ञ, विद्वान, ललित साहित्यिक आणि कोणतीही बिरुदावली न बाळगणाऱ्या

लेखकांनी छत्रपतींवर अक्षरश: अमाप लेखन केलं आहे. त्यात आपले घोडे - तट्टू म्हणा वाटल्यास - पुढे दामटायला थोडी जागा तरी आहे का, हा प्रश्न मला नेहमीच सतावत होता. इतिहासकार म्हणवण्याचा मला तसूभरही अधिकार नाही; एवढेच नव्हे, तर इतिहासाचा पृष्ठभाग खरचटण्याइतकंही मला त्याचं ज्ञान नाही. परंतु तरीही महाराजांना विविध चौकटीत डांबणाऱ्या मराठी वाङ्मयात शिवाजी महाराजांच्या स्वयंभू आणि अलौकिक सेनापतित्वाला, अगम्य लष्करी साहसाला, अत्युच्च रणनीतीच्या आकलनाला आणि आंतरराष्ट्रीय प्रभावळीत त्यांना नेऊन बसवणाऱ्या लष्करी कूटनीतीला पुरेशी जागा मिळाली नाही, अशी माझी प्रामाणिक धारणा आहे. या पुस्तकाचा खटाटोप हा त्याचाच आविष्कार.

नवं पुस्तक लिहायला घेण्याचा विचार मनात आल्यावर कोरोना महामारीच्या प्रकोपाच्या काळात प्रकाशन-प्रक्रियेला आलेली मंदी लक्षात घेता कोणत्याही नव्या प्रकल्पाचा उच्चार करणंही स्वप्नाळू असल्याची मला पुरी कल्पना असूनही चाचरतच मी राजहंसचे सुकाणूधारी दिलीपराव माजगावकर यांच्यापुढे हा प्रस्ताव ठेवला. त्याचं स्वरूप ऐकल्यावर त्यांनी लागलीच मला संमती दिली. अर्थात हे त्यांच्या 'ट्रेडमार्क' तरतमभावाला साजेसंच होतं. पुन्हा एकदा त्यांच्या गाडीत लिफ्ट दिल्याबद्दल मी दिलीपरावांचा पुनश्च एकदा कृतज्ञ आहे.

आनंद हर्डीकर यांनी संपादित केलेलं हे माझं सहावं पुस्तक. त्यांच्या इतिहास विषयाच्या विद्वत्तेबद्दल, लष्करशास्त्राच्या व्यासंगाबद्दल, लेखकाला दिलेल्या साक्षेपी मार्गदर्शनाबद्दल, संपादनातील कौशल्याबद्दल आणि रटाळ लेखनाला सुंदर गिलावा देण्याच्या हातोटीबद्दल वारंवार लिहून माझ्याजवळची सर्व विशेषणं मी संपवली आहेत. यावेळी मी त्यांच्या एका मदतीचा विशेष उल्लेख करू इच्छितो. त्यांनी आपल्या संग्रहातून मला प्रचंड साहित्य उपलब्ध करून दिलं होतं. इतकं, की मी त्या साऱ्याचा पूर्ण उपयोगही करू शकलो नाही. मी आनंदरावांचे अनंत आभार मानू इच्छितो.

या प्रकल्पामधील इतिहासाच्या संदर्भासाठी प्रामुख्यानं गो.स. सरदेसाई, कर्नल रा. दे. पळसोकर, नरहर कुरुंदकर, विजय देशमुख आणि गजानन मेहेंदळे यांच्या शिवाजी महाराजांच्यावरील वाङ्मयाचं मला साहाय्य झालं. अर्थात इतर अनेक पुस्तकंही मी पालथी घातली. नकाशांसाठी डॉ. श्रीनिवास सामंत, विजय देशमुख आणि कर्नल रा. दे. पळसोकर यांच्या पुस्तकांची मदत मिळाली. वि. शं. ठकार यांच्या 'पर्याय-शब्दकोश'चा आवर्जून उल्लेख करू इच्छितो. या सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

तृप्ती देशपांडे यांनी नकाशांची जबाबदारी कौशल्यानं पार पडली आहे. त्यांनी आणि सारिका भामे यांनी अमूल्य साहाय्य दिलं आहे. किंबहुना राजहंसच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मला वारंवार उपकृत केलं आहे. अक्षरजुळणीचं किचकट काम मुग्धा दांडेकर यांनी नेहमीप्रमाणे चोखपणे बजावलं आहे. माझ्या आधीच्या पुस्तकांची सुंदर मुखपृष्ठं कमल शेडगे यांच्या कुंचल्यातून उतरली होती. त्यांचं नुकतंच निधन झालं. त्यांच्या स्मृतीला माझे सादर प्रणाम. त्यांचे चिरंजीव अक्षर शेडगे यांनी आता ही जबाबदारी हाती घेतली आहे. या सर्वांचे मन:पूर्वक हार्दिक आभार. माझ्या पुस्तकांच्या लिखाणादरम्यान 'स्वीय साहाय्यका'ची धुरा वाहणारी माझी धर्मपत्नी मीराला धन्यवाद. 'आता पुरे झालं' या तिच्या इशाऱ्याची मी अजूनही दखल घ्यायची

आहे.

सरते शेवटी रवीन्द्रनाथ टागोरांच्या ‘जयतु शिवाजी’ या कवितेचा उल्लेख करण्याचा मोह टळत नाही. ते म्हणतात, “हे शिवछत्रपती, हा देश स्वतंत्र करण्याचा विचार तुमच्या मनात स्फुरला, तेव्हा माझी वंगभूमी मूक राहिली. पण मातृभूमीच्या मंदिरात तुम्ही लावलेली स्वातंत्र्यज्योत अखंड तेवत राहिली. तुमच्या प्रेरणेनं ‘हरहर महादेव’च्या रणगर्जना आता पुन्हा ऐकू येत आहेत. जेव्हा तुम्ही महाराष्ट्राच्या भूमीतून साद घातलीत, तेव्हा आम्ही तुम्हांला प्रतिसाद दिला नाही. पण आता देशभूमीची आठ कोटी लेकरं तुमचा प्रत्येक शब्द झेलण्यासाठी तुमच्या सिंहासनापुढे नतमस्तक होऊन उभी आहेत. भरतभूमी स्वतंत्र करण्याचा जो मंत्र तुम्ही शतकापूर्वी दिलात, तो आता तिच्या प्रत्येक प्रांताचा श्वास बनला आहे. म्हणून सर्वांनी म्हणा, ‘जयतु शिवाजी’.”

“तब भाल उद्भासिया ए भावना तडित्प्रभावत एसेछिल नामि,
एकधर्मराज्यपाशे खंड छिन्न विक्षिप्त भारत बधे दिब आमि”

या गुरुदेवांच्या अलौकिक शब्दांनिशी ‘जयतु शिवाजी, जयतु शिवाजी!’ हे पुस्तक माझ्या चोखंदळ वाचकांसमोर ठेवणं हे मी माझं सौभाग्य समजतो.

दि. २५ मार्च २०२१ **शशिकांत गिरिधर पित्रे**

बांगला मुक्तिदिन

विजयाच्या आराधनेसाठी

छत्रपती शिवाजी महाराज हे समग्र राष्ट्रभक्तांचे श्रद्धास्थान आणि प्रेरणास्थान होते आणि आहेत. (अर्थातच काही सन्माननीय नेत्यांचा अपवाद वगळता!) राजकीय जागृतीसाठी झटणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक असोत किंवा बहुविध सामाजिक सुधारणांचे बीजारोपण करणारे क्रांतदर्शी जोतिबा फुले असोत, सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने देशाचे स्वातंत्र्य खेचून आणू पाहणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असोत किंवा दुसऱ्या महायुद्धातील ब्रिटनच्या विरोधकांशी संधान बांधून आझाद हिंद फौजेची उभारणी करणारे नेताजी सुभाषचंद्र बोस असोत, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील असंख्य नेत्यांनी शिवरायांच्या पराक्रमी जीवनातील विविध घटनांमधून प्रेरणा तर घेतलीच; पण त्यांच्या विजयसूत्रांचा कालोचित वापरही करून पाहिला.

शिवराय हे 'राजहंस'च्या स्थापनेपासून आजतागायत कायमच एखाद्या कुलदैवताप्रमाणे आम्हांला कृपाछत्र पुरवीत आले आहेत; प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते, याचा वारंवार दिलासा देत आले आहेत, निराशेच्या अंधकारातून प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आशावादी ऊर्जास्रोत ठरले आहेत. आमचे संस्थापक शिवशाहीर ब. मो. पुरंदरे यांच्या 'राजा शिवछत्रपती' या ग्रंथराजापासून सुरू झालेला आमचा प्रवास आज एका अत्यंत महत्त्वाच्या पुस्तकापर्यंत येऊन काहीसा विसावला आहे.

मेजर जनरल शशिकांत गिरिधर पित्रे (निवृत्त) या निष्णात सेनाधिकाऱ्यांनी शिवरायांच्या अद्वितीय युद्धनेतृत्वाचे लष्करी विलेषण करणारे पुस्तक लिहायची मनीषा गेल्या वर्षी व्यक्त केली. 'या सम हा' थोरल्या बाजीरावांच्या युद्धनेतृत्वाचे यशोगान करणाऱ्या त्यांच्या ताज्या पुस्तकाच्या उत्साहवर्धक यशाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी तो प्रस्ताव मांडला होता.

तसे पाहिले, तर त्यावेळी अभूतपूर्व कोरोना साथीचे सर्वत्र वातावरण होते. जनजीवन ठप्प झाले होते. असंख्य लोकांसमोर भवितव्य 'आ' वासून उभे होते. जीवनाची क्षणभंगुरता पदोपदी जाणवत होती. इतर अनेक उद्योगांप्रमाणेच प्रकाशनव्यवसायालाही मंदीने ग्रासले होते. परिस्थिती केव्हा निवळेल, ग्रंथव्यवहार पुन्हा सुरळीत केव्हा चालू होऊ शकेल, याबाबत व्यक्त होत राहिलेले प्रारंभीचे अंदाज सातत्याने फसत चालले होते... अशा परिस्थितीत शिवरायांच्या युद्धनेतृत्वाचे चिकित्सक विवेचन करणारे पुस्तक प्रसिद्ध करावे का? पुस्तक प्रकाशित झाले, तरी ते वाचकांपर्यंत पोचू शकेल का? असे काही प्रश्न मनात उद्भवले खरे. तसे होणे स्वाभाविकही होते. तथापि अल्पावधीतच दि.ग.मां.सह आम्हा सर्वांच्याच मनात असा विचार बळावला की, सध्याच्या भीषण परिस्थितीत अवघ्या महाराष्ट्रात आशावादाचा सांगावा पोचवण्याची हीच नामी संधी आहे. शिवरायांच्या रूपाने आपल्याला एक अक्षय ऊर्जास्रोत लाभला आहे आणि त्यांच्या बहुमिती व्यक्तिमत्त्वाच्या असंख्य पैलूंपैकी युद्धनेतृत्व हा पैलू तर ठायी ठायी अडीअडचणींवर मात करण्याचे व्यवहार्य मार्ग सुचवणारा आणि अंती विजयाप्रत घेऊन जाणारा, त्यांच्या विभूतिमत्त्वाला चिरंतन झळाळी प्राप्त करून देणारा असा अतिविशेष पैलू आहे.

त्यामुळे पित्रे यांच्या प्रस्तावाला अर्थातच मान्यता मिळाली. उलट त्यांनी अन्य सर्व कामे दूर सारून याच लेखन-प्रकल्पावर सारे लक्ष केंद्रित करावे, असे ठरले. यंदाच्या महाराष्ट्रदिनाचे निमित्त निश्चित झाले. त्या दिवशी प्रकाशन करता यावे, या दृष्टीने वेळापत्रकही ठरले. तथापि चार महिन्यांच्या अल्पावधीत लेखन पूर्ण होण्याव्यतिरिक्त इतर सर्व घटक पुन्हा अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले. दैनंदिन व्यवहार करण्यावरही मर्यादा घातल्या गेल्या. पुस्तकांची दुकानेच नव्हेत, तर ग्रंथालयेसुद्धा वाचकांना पारखी झाली. सांस्कृतिक विश्वासमोर जीवनमरणाची, अस्तित्वरक्षणाची समस्या उभी ठाकली. तग धरून भविष्याचा विधायक विचार करण्याइतकीही फुरसत कुणालाही लाभेनाशी झाली.

आणि तरीही राजहंस प्रकाशनाने शिवसंजीवनीचा ध्यास सोडला नाही.

संकटे उभी ठाकली म्हणून राजे डगमगत नसत. शत्रूच्या सामर्थ्याचा ते अंदाज घेत, ते ज्या काळात स्वराज्याची जोपासना करीत होते, जेव्हा त्या स्वराज्याचा घास घ्यायला वा लचके तोडायला अनेक शत्रू कारवाया करीत होते. त्या शत्रूंमध्ये असणाऱ्या परस्परवैमनस्याचा आपण कसा जास्तीत जास्त फायदा घेऊ शकू, याचा राजे शांतपणे विचार करीत; उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांचा साधकबाधक विचार करीत. मनाशी निश्चित केलेल्या चाकोरीबाहेरच्या, साहसी, विस्मयकारक योजनेबद्दल आपल्या जिवाभावाच्या सवंगड्यांना विश्वासात घेत. त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या क्षमतेनुसार त्याच्यावर कामगिरी सोपवीत. आपली मोहीम जिकिरीची असली, शत्रूचे संख्याबळ आपल्यापेक्षा जास्त असले, तरीही आपण विजयी होऊ शकतो, असा विश्वास किंवा श्रद्धा त्या सवंगड्यांमध्ये निर्माण करीत.

आणि मग चमत्कार घडे. बलाढ्य शत्रू विस्मयचकित होई, कोंडीत तरी सापडे किंवा सैरावैरा धावू तरी लागे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा कोणत्याही कसोटीच्या मोहिमेमध्ये राजे स्वत:सुद्धा आपला जीव धोक्यात घालायला मागेपुढे पाहात नसत. प्रत्यक्ष आघाडीवर राहून शत्रूशी चार हात करणारा असा सेनानी सामान्य सैनिकांपासून धुरंधर सेनाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या गळ्यातला ताईत झाला नसता तरच नवल!

म्हणूनच जेव्हा लोकमान्य टिळकांना १८५७च्या उठावातील नेत्यांचा उघडपणे गौरव करण्याची संधी मिळेना आणि देशबांधवांना राष्ट्रीय स्वातंत्र्याची गरज पटवून देण्याची गरज तर तीव्रतेने जाणवत होती, त्यावेळी त्यांना प्रेरणास्थान मिळाले, ते छत्रपती शिवरायांचेच! शिवाय ही गरज काही फक्त मराठी लोकांनाच पटवून द्यायची नव्हती. शिवराय हे महाराष्ट्रापुरते मर्यादित राहू न देता देशपातळीवर त्यांचे गुणगान सुरू व्हावे, अशीच त्यांची इच्छा होती. त्यांना प्रतिसाद मिळाला बंगालमधून. प्रसिद्ध क्रांतिकारी लेखक सखाराम गणेश देऊसकर हे लोकमान्यांचे एक चाहते होते. 'देशेर कथा' हे त्यांचे ब्रिटिश राजवटीच्या शोषणकारी धोरणांवर प्रकाशझोत टाकून सामान्यांना जागे करणारे पुस्तक गाजू लागले होते. त्यांनी पुढाकार घेऊन कलकत्त्यात 'शिवाजी-उत्सव' सुरू करण्याचा घाट घातला. भगिनी निवेदितांशी चर्चा करताना विषय निघाला, उत्सवाच्या प्रारंभी शिवाजी महाराजांचा गौरव करणारे एखादे गीत तयार करण्याचा. निवेदिता देऊसकरांसह गेल्या थेट रवींद्रनाथ टागोरांकडे. देऊसकरांकडून उत्सवामागची भूमिका ऐकून घेतल्यावर त्यांनी तसे गीत लिहून

देण्याची तयारी दर्शवली. एवढेच नव्हे, तर काही दिवसांतच 'शिवाजी-उत्सव' अशी १८ कडव्यांची, १४४ ओळींची दीर्घकविता रचलीदेखील आणि प्रत्यक्ष उत्सवारंभी ती स्वत: गाऊनही दाखवली. हीच ती 'जयतु शिवाजी, जयतु शिवाजी' या नावाने प्रसिद्ध झालेली, शिवभक्तांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरलेली कविता.

मेजर जनरल शशिकांत गिरिधर पित्रे (निवृत्त) यांनी लिहिलेल्या या पुस्तकाला ते अत्यंत उचित असे शीर्षक योजले असून मुद्दाम परिशिष्टात ती कविता भावार्थासह दिली आहे. त्यामुळे पुस्तकाचे संदर्भमूल्य आणखी वाढेल, असा विश्वास वाटतो.

शिवाजी महाराजांचा आपण अनेकदा जयजयकार करीत असतो. अधिक जाणतेपणाने हा जयजयकार केला जावा, असे आम्हांला पूर्वीपासूनच वाटत आले आहे. इतिहासाचे नामवंत प्राध्यापक डॉ. अ. रा. कुलकर्णी आणि व्यवस्थापनशास्त्रासारख्या आधुनिक ज्ञानशाखेच्या दृष्टीने राजांचे दूरदर्शित्व विशद करणारे विशेष संशोधक डॉ. अजित आपटे यांची पुस्तके 'राजहंस'ने आजपर्यंत वेळोवेळी प्रकाशित केली आहेत. त्याच मालिकेतील हे ताजे पुस्तक राजांच्या जयजयकाराचा अर्थ, भावार्थ आणि अन्वयार्थही साधार, सप्रमाण सिद्ध करण्यात यशस्वी ठरेल, अशी खातरी वाटते.

शिवाजी महाराजांचे युद्धनेतृत्व हा विजयाकडे हमखास घेऊन जाणारा एक चिरंतन प्रेरणास्रोत आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही त्याबद्दलचे दाखले मिळतात. केवळ एकाच उदाहरणाचा अगदी ओझरता उल्लेख केला म्हणजे मुद्दा स्पष्ट होईल.

उदाहरण आहे १९६५चे, तत्कालीन पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या कारकिर्दीतले. काश्मी र गिळंकृत करण्याच्या एका योजनेनुसार पाकिस्तानने जुलैअखेरपासूनच प्रशिक्षित मुजाहिद्दीन खोऱ्यात पाठवायला सुरुवात केली होती. त्यांनी ठिकठिकाणी घातपाती कारवाया करून शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात आणायची, मग सैन्याने रीतसर आक्रमण करून प्रदेश बळकावयाचा, असा बेत होता. त्यानुसार ५००० घुसखोर काश्मीतर खोऱ्यात पाठवले जात होते. स्थानिक मेंढपाळांनी त्यांची संशयास्पद हालचाल हेरली आणि भारतीय निमलष्करी दलांना खबरही दिली. त्या बातमीची दखल घेऊन आपल्या लष्कराने खोऱ्यात ठिकठिकाणी धाडी घातल्या आणि सुमारे ३७५० घुसखोरांना त्यांनी काही घातपात घडवण्याआधीच अटक केली. त्यांच्या चौकशीतून असे निष्पन्न झाले की, पाकव्याप्त काश्मीरमधील हाजीपीरखिंडीतून हे घुसखोर येत आहेत. त्या घुसखोरीवर नियंत्रण प्रस्थापित करायचे असेल, तर त्या खिंडीवर आपला ताबा हवा.

ही तातडीची गरज लक्षात घेऊन ती खिंड सर करण्याची योजना ऑगस्ट '६५मध्ये म्हणजे प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्यापूर्वीच आखली गेली आणि मेजर रणजितसिंग दयाळ यांच्या नेतृत्वाखालील तुकडीने ती अमलातही आणली. लष्करी प्रशिक्षणार्थींना मुद्दाम शिकवली जाणारी ती योजना आता इतिहासात नोंदवली गेली आहे, तिच्यावर पुस्तकेही लिहिली गेली आहेत. तथापि ज्या बाजूने आपले सैन्य हल्ला करूच शकणार नाही, असे शत्रूला वाटत असेल, त्याच बाजूने त्याच्यावर अकस्मात हल्ला चढवायचा आणि गाफील शत्रूला आश्चर्याचा जबरदस्त धक्का देऊन पराभूत करायचे, हे त्या योजनेमागचे सूत्र शिवाजी

महाराजांनी सिंहगड सर करताना मोठ्या चातुर्याने उपयोगात आणले होते, हे आपल्या सहसा ध्यानात येत नाही. त्यांच्या युद्धनेतृत्वाचा अभ्यास केला, तर अशी असंख्य सूत्रे उपयोगात आणणाऱ्या प्रात्यक्षिकांचा कोशच हाती येईल. ती आपली कायमची राष्ट्रीय गरज आहे.

वेळप्रसंगी घाबरल्याचे नाटक वठवून शत्रुपक्षाला आधी गाफील ठेवायचे आणि नंतर संधी साधून गारद करायचे; प्रतिकूल परिस्थितीत तह करावा लागला, तर करायचा; पण परिस्थिती पालटली की जे काही आधी गमावले असेल, ते परत मिळवायचे; शत्रूला वारेमाप आश्वासने अवश्यल द्यायची, पण त्याच्या भुलथापांना मात्र मुळीच फसायचे नाही; शत्रूच्या अडीअडचणींचा स्वराज्याच्या स्वार्थासाठी फायदा उठवताना बिचकायचे नाही, तसेच भूप्रदेशाच्या गुणविशेषांचा त्या त्या वेळच्या व्यूहरचना ठरवताना विसर पडू द्यायचा नाही; शत्रूच्या शिबिरापर्यंतची बित्तंबातमी तर सतत मिळवायची, पण आपण करीत असलेल्या युद्धतयारीची गोपनीयता शेवटपर्यंत कायम राखायची.... महाराजांच्या नेतृत्वाची अशी कितीतरी वैशिष्ट्ये कधीच कालबाह्य होणार नाहीत. त्यांच्या तेजोवलयावर काही काळ मळभ आले, तरी ते टिकू शकत नाही. ती इतकी स्वयंप्रकाशी आहेत की, राष्ट्रीय संरक्षणाचा विचार करताना आपला देश ती कधीच डावलू शकणार नाही.

भ्रामक नीतिमूल्यांच्या आहारी जाऊन, शत्रूच्या सदसद्विवेकबुद्धीवर विसंबून राहण्याचे दुष्परिणाम या देशाने दीर्घकाळ भोगले आहेत. ते नष्टचर्य संपवावे असे ज्यांना ज्यांना वाटते, त्या सर्वांना छत्रपती शिवाजी महाराज हे चिरंतन प्रेरणा देणारे राष्ट्रपुरुष म्हणून सतत वंदनीयच आहेत. त्यांचे ते स्थान कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही.

कोणत्याही वीर सैनिकाने रणांगणावर पराक्रम गाजवायचाच असतो. वेळप्रसंगी शत्रूशी लढताना हौतात्म्य पत्करावे लागले, तरी त्यातही धन्यता मानायचीच असते. त्याच्याकडून तशी अपेक्षा असतेच. तथापि कोणत्याही रणधुरंधर सेनानीने उद्दिष्ट ठेवायचे असते, ते विजय मिळवण्याचे. पराक्रम किंवा हौतात्म्य हे उद्दिष्ट नसते, त्यात इतिकर्तव्यता मानायची नसते. उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा योग्य पद्धतीने नियोजनपूर्वक उपयोग करून, वेळप्रसंगी लढाई न लढताच विजय मिळवणे हेच उद्दिष्ट असायला हवे... हे आपल्या राष्ट्रीय इतिहासात प्रथमच छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अभिजात युद्धनेतृत्वाने दाखवून दिले. जागतिक इतिहासात त्यांना अढळ स्थान मिळवून देणारे त्यांच्या युद्धनेतृत्वाचे हे मर्म उलगडून दाखवणारे असे हे पुस्तक वाचकांनाही 'जयतु शिवाजी, जयतु शिवाजी!' असे उच्चरवाने म्हणण्यासाठी प्रवृत्त करील, असा आम्हांला विश्वास वाटतो.

मेजर जनरल शशिकांत गिरिधर पित्रे (निवृत्त) यांनी लिहिलेले हे पुस्तक काही विलंबाने वाचकांना सादर करताना आम्हांला आनंद आणि अभिमान वाटतो आहे. आमचे संस्थापक आणि शिवछत्रपतींच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे गुणगान करण्यात उभी हयात वेचणारे बाबासाहेब पुरंदरे यांनी वयाच्या शंभरीत पदार्पण केले असताना हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे, हा एक चांगला योग आहे, असे म्हणता येईल.

आनंद हर्डीकर

शंपादक

नकाशांची सूची

१ अ) मध्ययुगीन भारत
१ ब) मध्ययुगीन भारत
२. मोगल साम्राज्य
३. बहामनी राज्य
४. निजामशाहीचे विभाजन : इ.स. १६३६
५. हिंदुस्तान इ.स. १६४०
६. नर्मदेच्या दक्षिणेचा हिंदुस्तान
७. भोसल्यांची जहागीर
८. बारा मावळ
९. फत्तेखानाची स्वारी
१०. तीन संरक्षण रेषा
११. जावळीचा परिसर इ.स. १६५५
१२. उत्तर-दक्षिण कोकण मोहीम
१३. वाईचा परिसर
१४. प्रतापगडची लढाई
१५. आदिलशाहीवर धडक
१६. पन्हाळ्याला वेढा
१७. पन्हाळ्यावरून सुटका
१८. उंब्रेची लढाई
१९. स्वराज्याची कोंडी
२०. पुरंदरचा वेढा
२१. पुरंदरचा तह
२२. सिंहगडची लढाई
२३. सुरतेवरील दुसरी स्वारी
२४. साल्हेरवरील रणकंदन
२५. कोकणची किनारपट्टी
२६. दक्षिण कोकण मोहीम
२७. बसरूरची मोहीम

२८. जंजिऱ्याची मोहीम
२९. गोवळकोंड्याकडे आगेकूच
३०. दक्षिणेतील मोहीम

अनुक्रम

□ 'प्रतापें सांडिली सिमा'
१. परवशतेचा पाश
२. स्वराज्याची स्थापना
३. सेना आणि रणनीती
४. आदिलशाहीशी संघर्ष
५. मोगलांशी लढा
६. पराजयाचे विजयश्रीत रूपांतर
७. कोकण आणि दक्षिणेवर अधिराज्य
८. जयतु शिवाजी, जयतु शिवाजी
□ संदर्भ ग्रंथसूची
□ परिशिष्ट

॥ 'प्रतापें सांडिली सिमा' ॥



महाराष्ट्राच्या नादब्रह्मात, सह्याद्रीवरील कलरवात, नद्यांच्या रुंजनात गेली साडेतीन शतवे अव्याहतपणे गुंजणाऱ्या या शिवरायांच्या वीरगाथा... पवाड्यांच्या वीररसात, भारुडांच्या गुऱ्हाळात, पुराणिकांच्या प्रवचनात वारंवार उगाळल्या जाऊन गुळगुळीत झालेली ही उपाख्याने... जुन्या बखरी-तवारीखींत, इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांत, ललित लेखनात आणि परकीय वाङ्मयात सुवर्णाक्षरांनी कोरलेल्या या चित्तरकथा... खेडेगावांतील दशावतारांत, रांगड्या लोकनाट्यांत, अजरामर नाटकांत, आधुनिक चलच्चित्रांत सातत्याने पुन:पुन्हा सांगितल्या गेलेल्या या रोमांचकारी कैफियती...

यांच्याबद्दल आणखी बोलायचे काही राहिले आहे का?

होय, आहे! त्यांच्यामागील बेडर आणि साहसी मनाचा मागोवा घेणे अजूनही बाकी आहे; आपल्या उदाहरणाने आपल्या सैन्याला 'ततो युद्धाय युज्यस्व'चा प्रखर मूलमंत्र देणाऱ्या सरसेनापतीच्या निर्भीड मनाचा ठाव घेणे बाकी आहे; आघाडीवरून आपल्या मावळ्यांचे नेतृत्व करणाऱ्या छत्रपतींनी स्वत:च्या प्राणाच्या लावलेल्या बाजीचा मर्मभेद बाकी आहे; आंतरराष्ट्रीय लष्करी इतिहासात तोड सापडणार नाही, अशा चित्तथरारक गनिमी धाडींचे लष्करी दुर्बिणीतून काटेकोर विलेषण बाकी आहे!

इतिहासाचे अगदी जुजबी ज्ञान असलेल्या प्रत्येक मराठी पोरालासुद्धा शिवाजीराजांच्या तीन कथा तोंडपाठ असतात. महाराष्ट्राच्या मनोमनात आपल्या उत्तुंग क्षात्रवृत्तीने आणि बुलंद मर्दुमकीने जागतिक लष्करी इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेलेली ही तीन सोनेरी पाने...

पहिले सोनेरी पान

१० नोव्हेंबर १६५९ ही भेटीची तारीख.

कातिल-इ-मुतमर्रीदान व काफिरान अफझलखानाचा आनंद गगनात मावत नव्हता. शिवाजी सापळ्यात आपणहून येण्यास तयार झाला होता. खानाने अद्यापपर्यंत अनेक बाज्या मारल्या होत्या. शिवाजी जेव्हा स्वागतासाठी मिठी मारेल, त्यावेळी आपल्या अजस्र बाहूंमध्ये त्याला करकचून आवळायचे, त्याचा चोळामोळा करायचा आणि झपाट्याने त्याच्या पाठीत कट्यार घुसवायची आणि त्याबरोबर कोयनातीरी असलेल्या प्रचंड सैन्याकरवी मराठा सेनेचा चेंदामेंदा करायचा... हा त्याचा सरळसोट बेत होता. फसण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

बोथट बुद्धीच्या त्या आडदांड शरीराची कपटयोजना राजांनी अचूक हेरली होती. खडताळ मावळात बालपण घालवलेल्या त्या काटक आणि तरतरीत तनूला खानाच्या मिठीतून निसटून

त्याच्याच पोटात तलवार कशी खुपसायची, या धोबीपछाड डावाची पुरेपूर माहिती होती. शामियान्यात प्रवेश केल्यापासून खानाला यमसदनास पाठवण्यापर्यंतच्या प्रत्येक हालचालीचा आराखडा त्यांनी मनोमन बनवला होता आणि त्याची वारंवार उजळणी केली होती.

दहा अंगरक्षकांसहित प्रतापगड उतरून ते बारा वाजता शामियान्याजवळ दाखल झाले. राजांनी एक अत्यंत संकटप्रवण निर्णय घेतला होता. सिंहाच्या गुहेत ते स्वत:हून शिरत होते. काम एकदा हाती घेतल्यावर फत्ते झाले नाही, तर कमालीचे घातक ठरले असते. ते दिव्य बिनचूक पार पडण्याची धमक फक्त शिवाजीराजांच्यातच होती.

आघाडीवरून नेतृत्व करण्याचे यापेक्षा ज्वलंत उदाहरण दुसरे नसावे!

शिवाजीराजे आलेले पाहून अफझलखानाने आपल्या सद्भावनेचे प्रदर्शन करण्यासाठी तलवार वकील कृष्णाजी भास्कराकडे सुपूर्द केली. आपले हात पसरून तो राजांपाशी गेला. 'आओ, शिवाजीराजे, हमारी बाहों में आओ. आपके वालीद हमारे जानी दोस्त थे. आपको मिलने के लिये हम सदियों से तरस रहे हैं', खोट्या अदबीने खान बोलला.

शिवाजीराजे पुढे येताच उजव्या हाताने कट्यार काढून ती खानाने राजांच्या डाव्या कुशीत खुपसली. परंतु पाणीदार राजांनी तो वार चापल्यपूर्णतेने चुकवला, विजेच्या वेगाने आपली तलवार उपसली आणि क्षणार्धात तिने खानाच्या कोथळ्याचा ठाव घेतला. खान एखाद्या भुशाच्या पोत्यासारखा खाली कोसळला.

विजापूरच्या भरदरबारातून हातात साखळदंड घालून अफझलखानाच्या मागे चालणाऱ्या आपल्या पूज्य पित्याचे प्रतिबिंब अचानक राजांच्या मन:चक्षूंसमोरून गुजरले. राजांनी बाहेर काढलेली तलवार म्यान केली.

दुसरे सोनेरी पान

राजांनी योजना सगळ्यांना समजावून सांगितली. रमजान येईपावेतो थांबायचे. रमजानच्या रोजांत दिवसभर उपासानंतर जेवणावर ताव मारला जातो आणि सगळीकडे गाढ झोपेचे साम्राज्य पसरते. त्यातलाच मुहूर्त पाहून दीड-दोन हजार मावळ्यांसह पुण्याच्या निकट यायचे, मग शिबंदी वीस-बावीस तुकड्यांत वाटायची आणि पुण्यात येणाऱ्या पंधरा-वीस वाटांवर वेगवेगळ्या तुकड्यांनी पोचायचे. प्रत्येक तुकडीने पहाऱ्यावरील संत्रींना 'कटकाचे लोक, पहाऱ्याहून परततोय' असे सांगायचे. थोडाही माग न लागू देता तडक जाऊन लालमहाल घेरायचा. स्वयंपाकघरात शिरायचे. हंगामी भिंतीने बंद केलेली दिंडी फोडली की, समोरचा जिना सरळ वरच्या शयनगृहात पोचतो. त्या बाजूने घुसायचे. दिसेल त्याला कापून काढायचे. इतका गोंधळ झाला पाहिजे की, आजूबाजूच्या आपल्या साऱ्या तुकड्यांना हल्ला करण्यास तोच संकेत. लाल महाल हादरला पाहिजे.

राजांनी शेवटी सगळ्यांना बजावले, 'लक्षात ठेवा, रात्र ही मूर्खांना झोपण्यासाठी असते. शहाणे त्याचा फायदा उठवतात!'

५ एप्रिल १६६३चा दिवस उगवला. सारे आपापल्या निर्धारित जागी कोणत्याही विघ्नाविना पोचले. शिवाजीराजे लालमहालाच्या पिछाडीस पोचले, तेव्हा अंधाराचे तीन साडेतीन तास उलटून गेले होते. लोकांची मध्यरात्र झाली होती. मुदपाकखान्यात काही नोकर भांडी साफ

करत होते. तेवढ्यात कल्लोळ माजला. दोन धक्के दिल्यावर भिंत कोसळली.

राजे वर पोचले. अजूनही दिवे तेवत होते. परंतु बेगमांनी ते तत्काळ विझवले. भेदरलेला शाईस्ता राजाच्या नजरेला पडला. खिडकीतून बाहेर पळण्याच्या बेतात होता. शिवाजीराजांनी जोमाने त्याच्यावर तलवारीचा प्रहार वेला. त्यांना वाटले, खान ठार झाला. मग त्यांनी लाल महालातील लोकांचा खरपूस समाचार घेतला. दोन-अडीच घटकांत सारा खेळ संपला. बाहेरून वुमक येण्याआधी लवकर बाहेर पडणे आवश्यघक होते. 'गनीम, गनीम' असे ओरडत सर्व बाहेर पडू लागले. काही क्षणांतच लाल महालात एकही मराठा उरला नाही.

शाईस्ताखानाच्या उजव्या हाताची तीन बोटे तुटली होती आणि त्याला जीवघेण्या वेदना होत होत्या. त्याचा मुलगा, जावई, बारा स्त्रिया मिळून एकूण पंचावन्न लोक मारले गेले होते. सकाळ झाल्यावर खानाने ताळेबंद घेतला आणि ताबडतोब पुणे सोडून त्याने स्वत: औरंगाबादकडे कूच करण्याचा निर्णय घेतला. सगळेच इतवे हादरून गेले होते की, १०-१२ एप्रिलपर्यंत एकही मोगल पुण्यात राहिला नाही.

गेली तीन वर्षे पुण्यात डेरे टाकून बसलेल्या एक लाखावरच्या मोगल सैन्याला तैलबुद्धी डावपेच, वैयक्तिक शौर्य आणि मृत्यूच्या दाढेत त्यांच्यासह उडी टाकणाऱ्या सवंगड्यांच्या साहाय्याने महाराजांनी एका रात्रीत पळवून लावले होते!

आणि तिसरे सोनेरी पान!

स्वत:च्या मामाच्या शयनगृहात रात्री घुसून त्याची बोटे कापणाऱ्या शिवबांची भेट घेण्यास औरंगजेब सिद्ध झाला होता. महाराजांनी औरंगजेबाला जी भुरळ घातली होती, ती पाहून तत्कालीन शहाण्यांनी तोंडात बोटे घातली. आपल्याला दिल्लीला बोलावून बादशाहीचे एकमेव आव्हान मुळापासून खुडून टाकण्याचा औरंगजेबाचा कपटी हेतू न ओळखण्याइतवे राजे मंदबुद्धी नव्हते. तो डावपेच त्याच्यावरच उलटून टाकायचा, भेटीच्या प्रसंगी कुर्निसात करण्याच्या वेळी लगटीत सिंहासनावर उडी मारून पातशहाचा निकाल लावायाचा, असा त्यांचा मनोदय असणे शक्य आहे का? ही कल्पनाच इतकी भिंगुरवाळी होती, की राजांनी ती कोणालाच सांगितली नसावी.

१२ मे १६६६चा दिवस उगवला. 'दिवानआम-इ-खास' समाप्त झाला होता. आता दरबार 'दिवान-इ-खास'मध्ये भरला

होता. रामसिंहाने शिवाजीराजे आल्याची वर्दी दिल्यानंतर बक्षी आसदखान त्यांना घेऊन औरंगजेबापुढे गेला. शिवाजीराजांनी तीन वेळा लवून मुजरा वेला आणि आपला नजराणा सादर वेला. औरंगजेबाने थंडपणे त्यांच्याकडे पहिले. एक शब्दही बोलला नाही. शिवाजीराजांना पाचहजारी मनसबदारांच्या रांगेत उभे करण्यात आले. त्यानंतर मानाची वस्त्रे वाटण्यात आली. त्यातूनही राजांना वगळण्यात आले.

संधी हुकली होती. राजे संतापाने थरथरू लागले. रामसिंहाला त्यांनी हाक मारली. तो आपली रांग सोडून पळत आला.

'हा अपमान सहन करणार नाही, नको ती तुमची मनसब', राजे कडाडले.

सारा दरबार थिजून गेला. बादशहाच्या दरबारात हे अघटित होते.

राजे सिंहासनाकडे पाठ करून बाहेर पडले. ना वुर्निसात, ना आदब. बादशहाचा असा उपमर्द करण्याचे धाडस आजतागायत कोणीही दाखवले नव्हते. रामसिंह लगबगीने त्यांना आपल्या निवासस्थानी घेऊन गेला. पुढे घडला तो आग्र्याहून सुटवेचा रोमांचकारी इतिहास.

हिंदचा हजरत सलामत, कीबालाए दिनो दुनिया, अबुल मुझफ्फर मुईउद्दिन मुहम्मद औरंगजेब बहादूर आलमगीरचे शिवाजीराजांना मागल्या रांगेत उभे करण्याचे प्रसंगावधान त्याचा जीव वाचवण्यास कारणीभूत ठरले असावे का? शिवाजीराजांना ती गरुडझेप खरोखरच ईप्सित होती का?

ती घेण्याची हिंमत, साहस आणि धडाडी त्या युगपुरुषात खचितच होती.

अद्वितीय शासनक्षमता, असामान्य बुद्धिमत्ता, अलौकिक नेतृत्वगुण, अतुलनीय रणनीतिज्ञता आणि अचाट वैयक्तिक साहस या गुणपंचकाचे शिवाजी महाराज हे अनुपमेय रसायन होते. अफझलखान, शाईस्ताखान आणि औरंगजेब यांसारख्या सामर्थ्यवान शत्रूंच्या गोटात शिरून त्यांना ललकारण्याची बुलंद जिद्द फक्त त्यांच्यातच होती. औरंगजेबाच्या डोळ्यांदेखत त्याच्या कैदेतून आपल्या आठ वर्षांच्या बालकासह सटकण्याचे अद्भुत धारिष्ट्य त्यांच्यातच होते.

याबाबतीत कोणाही चंगेजखान, नेपोलियन, सीझर वा रोमेलची त्यांच्या पासंगालाही पुरण्याची ऐपत नव्हती.

त्या दीपस्तंभाच्या रणांगणावरील दिग्विजयी वृतवृत्यांकडे आणि अजोड प्रतिभेकडे लष्करी भिंगातून दृष्टिक्षेप टाकण्याचा हा प्रामाणिक खटाटोप!

“In personal activity he (Shivaji) exceeded all generals of whom there is record. For no partizan appropriated to service of detachment alone ever traversed as much ground as he at the head of armies. He met every emergency of peril, however sudden or extreme, with instant discernment and unshaken fortitude; the ablest of his officers acquiesced in the imminent superiority of his genius, and the boast of the soldier was to have seen Shivaji charging sword in hand.”

Orme in 'Historical Fragments'
quoted in 'Great Men of India' :
Edited by L. F. Rushbrook Williams

‘ज्ञात इतिहासातील सर्व सेनानींपेक्षा शिवाजीराजांचे वैयक्तिक कर्तृत्व दशांगुळे वर राहणारे असेच होते. स्वराज्यस्थापनेच्या ध्येयाने प्रेरित होऊन, आपल्या सैन्याचे प्रत्यक्ष आघाडीवर राहून संचालन करणाऱ्या त्या नेत्याने जेवढी विस्तृत मजल मारली, तेवढी इतर कोणत्याही सेनापतीने कधीही मारली नाही. सर्वस्वाचा घास घेऊ पाहणारी कोणतीही आणीबाणी त्यांच्यासमोर उभी ठाकली - ती अचानक उद्भवलेली असो किंवा पराकोटीची कसोटी पाहणारी असो - तरी त्यांनी नेहमीच तिला विद्युल्लतेच्या चपळाईने

आणि अविचल धैर्याने तोंड दिले. त्यांच्या पदरी असलेल्या अतिकार्यक्षम सरदारांनाही त्यांची अभिजात प्रतिभा नेहमी वरचढ असल्याचे सतत जाणवत असे आणि 'शिवबांची तलवारबाजी मी स्वत: पाहिली आहे', असे त्यांचे असंख्य मावळे अभिमानाने सांगू शकत!'

भारतीय इतिहासाचे गाढे अभ्यासक व
प्रसिद्ध इतिहासकार रॉबर्ट ऑर्म यांनी
'हिस्टॉरिकल फ्रॅग्मेंट्स' या आपल्या ग्रंथात काढलेले गौरवोद्गार...
एल.एफ. रशब्रुक विल्यम्स संपादित
'ग्रेट मेन ऑफ इंडिया'मधून उद्धृत...

१.
परवशतेचा पाश



हिंदुस्तानच्या अस्मितेचा ऱ्हास

भारताची संस्कृती आणि इतिहास चैतन्यपूर्ण आहे. त्याचा उगम मानवी सभ्यतेच्या प्रारंभकाळात सिंधू नदीच्या खोऱ्यात आणि दक्षिण भारतात शेती करणाऱ्या समाजांमध्ये झाला. वेळोवेळी येत गेलेल्या स्थलांतरित जमातींच्या समावेशाने इतिहास बदलत गेला. सिंधू नदीच्या खोऱ्यात विकसित झालेली भारतीय संस्कृती, नाईल नदीवरील इजिप्तीय संस्कृती, युफ्रेटिस व टिग्रीस नद्यांच्या खोऱ्यांमधील मेसोपोटेमियाई संस्कृती आणि पीत व यांगत्झे नद्यांवरील चिनी संस्कृती या सर्व एकाच सुमारास विकसित झालेल्या समकालीन संस्कृती होत्या. ख्रिस्तपूर्व चौथ्या सहस्रकाच्या अखेरीस भारत हा इतरांच्या तुलनेने अत्यंत प्रगत असा देश होता. सिंधू खोऱ्यातील ही संस्कृती हडप्पन संस्कृती या नावाने ओळखली जाते. इ.स.पूर्व २५००दरम्यान दक्षिण आशियातील सध्याच्या पाकिस्तान आणि पश्चिम भारताच्या क्षेत्रात ती कळसाला पोचली. यथाकाल इ. स. पूर्व १५०० सालापर्यंत ती महापूर, प्रचंड भूकंप व इतर नैसर्गिक आपत्तींमुळे अस्तंगत झाली. मोहेंजेदारो आणि हडप्पा येथे उत्खनन झाल्यावर तिची प्रगल्भता जगासमोर आली.

वैदिक संस्कृती ही प्राचीन भारतातील आरंभीची सामाजिक व्यवस्था होती. ही संस्कृती सरस्वती नदीच्या काठावर सध्याच्या हरियाना आणि पंजाब प्रांतांच्या क्षेत्रात प्रगत झाली. तिचे सविस्तर वर्णन ‘वेद’ या हिंदूंच्या अग्रणी ग्रंथांत आढळते. वेदांमधील धार्मिक आणि आध्यात्मिक विचारसंपदेतून हिंदुत्वाची उत्पत्ती झाली. ख्रिस्तपूर्व सातव्या आणि सहाव्या शतकांत बौद्ध धर्माचा आरंभ झाला आणि आशियात तो वेगाने पसरला.

इसवी सनानंतरची पहिली दहा शतके भारतातील विविध भागांवर वेगवेगळ्या हिंदू राजांनी राज्य केले. महत्त्वाकांक्षी आणि पराक्रमी व्यक्तींनी आपापली साम्राज्ये स्थापन केली. काही काळाने त्यांचे विघटन होऊन नव्या घराण्यांनी त्यांची जागा घेतली. बौद्ध धर्माचा प्रसार होऊनही आणि अशोकाप्रमाणे काही राजांनी बौद्ध धर्म स्वीकारूनही हिंदू राजांच्या राज्यांतील शासकीय आणि सामाजिक परिस्थितीवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही; परंतु सातव्या-आठव्या शतकांत आलेल्या मुस्लीम आक्रमणांच्या लाटेबाबतीत मात्र तसे घडले. हिंदूंच्या देवस्थानांचा विध्वंस आणि हिंदूंचे मुस्लीम धर्मांतर या जिहादच्या दोन अमानुष आदेशांनी भारून गेलेल्या त्या तामसी आक्रमकांनी भारतवर्षाची क्रूर विटंबना केली. पूर्वेत

पाल आणि पश्चिमेत प्रतिहार सम्राटांनी त्यांना काही काळ सिंधच्या पूर्व सीमेवर तटवून धरले, परंतु आपल्यावर परकीय आक्रमण झाले, तर आपण एकवटून त्याचा सामना केला पाहिजे, अशी खंबीर संघभावना मात्र हिंदू समाजात निर्माण झाली नाही.

भारतातील राजांकडे स्वसंरक्षणासाठी सैन्यदले होती, परंतु शेजाऱ्याशी सहकार्य करून मुस्लीम आक्रमकांशी एकत्रितपणे लढण्याची सामरिक परिपक्वता त्यांनी केवळ अपवादानेच दाखवली. त्यांची लढाऊ शक्ती कनिष्ठ दर्जाची होती. त्यांच्याकडे कुशल युद्धतंत्र वा बलशाली अश्वदळ नव्हते, ना त्या वेळेपर्यंत प्रगत झालेल्या तोफखान्याच्या वापराबद्दल ते ज्ञात होते. मुस्लीम आक्रमकांप्रमाणे ते जिहादच्या सामूहिक धाग्याने एकत्र बांधले गेले नव्हते. युद्धतंत्रातील न्यूनता, शस्त्रास्त्रांचा कनिष्ठ दर्जा आणि मुस्लीम आक्रमणाविरुद्ध एकवटून लढण्यातील असमर्थता या त्रुटींमुळे ते आक्रमकांचा सबळपणे सामना करू शकले नाहीत. याचा फायदा घेऊन मुस्लीम आक्रमकांनी काही काळातच त्यांचा सर्वत्र पराभव केला. मेवाडसारखे अपवाद सोडून लवकरच हिंदुस्तान मुस्लीम आक्रमकांनी परिणामकारकरीत्या व्यापला. या अस्मितेच्या अधोगतीचा दोष प्रामुख्याने हिंदूंच्या नाकर्तेपणाला दिला पाहिजे.

हा बौद्धिक आणि नैतिक पक्षाघात झुगारून सतराव्या शतकातील महाराष्ट्रात चैतन्य ओतण्याचे आणि आपल्या पराक्रमी नेतृत्वायोगे जनतेच्या अस्मितेचा स्फुल्लिंग पुनश्च प्रज्वलित करण्याचे दिव्य कार्य शिवाजीराजांनी केले. महाराष्ट्राच्या जाज्वल्य सेनापरंपरेचे अध्वर्यू आणि भारतीय इतिहासातील एक चिरंतन दीपस्तंभ म्हणून ते ओळखले जातात. त्यांच्या अलौकिक सैन्यकौशल्याचा मागोवा घेणे हे या ग्रंथाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

त्यापूर्वी परवशतेच्या या वाटचालीचा संक्षिप्त मागोवा घेणे सयुक्तिक ठरेल.

स्वकीय साम्राज्ये

जगज्जेता अलेक्झांडरचे आक्रमण

पर्शियाचा सायरस (ख्रिस्तपूर्व ५८८-५३०) हा हिंदुस्तानावरील पहिला परदेशी आक्रमक होता. हिंदुस्तानातील सिंधू नदीच्या पश्चिमेकडील काबूल प्रदेशापर्यंत सर्व जमाती त्याला शरण गेल्या. त्याचा नातू दारियस (पहिला) याने ख्रिस्तपूर्व ५१८मध्ये सिंध आणि पंजाबचा काही प्रदेश जिंकला. पर्शियन आक्रमकांनंतर ग्रीक हे ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकात हिंदुस्तानावरील दुसरे आक्रमक ठरले. अलेक्झांडर (सिकंदर) हा मॅसीडोनियाचा राजा फिलिप (दुसरा) याचा पुत्र. पित्याच्या मृत्यूनंतर सिकंदर सिंहासनावर बसला. त्याने अफगाणिस्तानपर्यंतचा प्रदेश ख्रिस्तपूर्व ३२९मध्ये काबीज केला. त्यानंतर तो हिंदुस्तानाकडे वळला. त्याने हिंदुस्तानातील सीमेवरील राजांना सहजगत्या नमवण्याचे कारण म्हणजे त्याचे प्रगत सैन्य.

त्यावेळचे मॅसीडोनियन सैन्य सुसंघटित, सुप्रशिक्षित आणि उत्तम शस्त्रास्त्रांनी सुसज्ज होते. त्याचे दोन भाग असत. पहिला, प्रादेशिक सैन्य (फॅलँक्स) आणि दुसरा, शाही (रॉयल) सैन्य. अलेक्झांडरचे युद्धतंत्र प्रामुख्याने दोन्हींचा एकत्र वापर करण्यावर निर्भर असे.

प्रादेशिक सैन्य शत्रूला थोपवून धरत असे, तर शाही सैन्याचे घोडदळ शत्रूवर वेगाने प्रहाराकरवी त्याचा विध्वंस करून त्याला पराभूत करीत असे. मुख्य घोडदळ पथक २,००० स्वारांचे हुजरातीचे. त्याचे नाव कंपॅनियन. दुसरे २,००० स्वारांचे थेसेलियन पथक. याशिवाय बाकीची पथकेही असत. मॅसीडोनियाचे घोडेस्वार हे जगातील सर्वोत्तम अश्वारोही होते. ते चिलखत घालत असत आणि त्यांच्या हातातला झायस्टन नावाचा एक भाला हे त्यांचे प्रमुख शस्त्र असे.

पायदळाच्या विभागात पहिला चमू होता फॅलँक्सचा. हा पायदळाचा कणा असे. त्यातील सैनिकाचे मुख्य शस्त्र १४ फूट लांबीचा ‘सरिसा’ नावाचा भाला असे आणि स्वसंरक्षणासाठी त्याच्या अंगावर गुडघ्यापर्यंत चिलखत असे. या चमूच्या एकूण सहा तुकड्यांतील सैनिकांची संख्या ९,००० असे. दुसरा चमू हिपास्पीस्टचा असे. त्यातील सैनिकांजवळ आखूड भाला आणि लांब तलवार ही शस्त्रे असत आणि त्यांच्या अंगावरील कवच हलके असल्याने त्यांची चपळता अबाधित राही. या चमूच्या तीन तुकड्यांत ३,००० सैनिक असत. तिसरा चमू होपलाइटचा असे. यातील चिलखतधारी सैनिकांची संख्या १२,००० असे व त्यांच्यापाशी भाला, तलवार आणि लांबट ढाल असे. याशिवाय ६,००० भालाईत किंवा धनुर्धारी भाडोत्री सैनिक असत.१

अलेक्झांडर हा सैन्यात तोफा बाळगणारा पहिला सरसेनापती होता. शत्रूची मोर्चेबंदी मोडून काढण्यासाठी वेढ्याला लागणारे मनोरे (टॉवर्स), धुमसणी (रॅम्स) व दगड फेकणारी यंत्रे (कॅटॅपल्ट) यांसारखे समग्र साहित्य तो बरोबर नेत असे. त्याच्या सैन्याबरोबर नदी ओलांडण्यासाठी सॅपर्स, पाणी व मायनिंग अभियंते, नौदल तज्ञ, आर्किटेक्ट्स, सर्व्हेयर्स असे विविध तंत्रज्ञ जात असत. हिंदुस्तानावरील स्वारीच्या वेळी त्याच्यापाशी तीस हजारांचे पायदळ व पाच हजार स्वारांचे घोडदळ होते.

इ.स. पूर्व ३२६मध्ये अलेक्झांडरने सिंधू नदीवर अटकजवळ उंड येथे होड्यांचा पूल बांधून ती ओलांडली आणि तक्षशिला राज्याच्या परिसरात तो पोचला. तक्षशिलेचा राजा अंभी अलेक्झांडरला शरण गेला आणि त्याचे मांडलिकत्व पत्करले. भोवतालचे सर्व राजेही त्याला शरण गेले. रावळपिंडी घेतल्यानंतर त्याने पुरू (पोरस) राजाला शरण जाण्यासाठी फर्मान धाडले. परंतु पोरसने साफ नकार दिला आणि सिकंदरशी युद्धाची तयारी केली. पोरस हा स्वाभिमानी, शूर आणि पराक्रमी राजा होता. त्याचे राज्य झेलम आणि चिनाब या दोन नद्यांच्या प्रदेशात होते. त्या राज्याचे मोठ्या साम्राज्यात रूपांतर करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यानुसार राजा अभिसाराच्या साहाय्याने आपल्या राज्याची सीमा रावी नदीपार नेण्याची त्याची योजना होती. त्याचप्रमाणे झेलमच्या पश्चिम तीरापलीकडे आपली सत्ता नेण्याच्या त्याच्या प्रयत्नात तक्षशिलेचा राजा आणि त्याचा पुत्र अंभी यांच्याशी त्याचे वैमनस्य निर्माण झाले होते. जगज्जेत्याला आव्हान देण्याची हिंमत दाखवणारा एकच हिंदुस्तानी राजा म्हणजे पोरस. त्याच्या शौर्याची दखल घेणे आवश्याक आहे.

अलेक्झांडर आपल्या सैन्यासह झेलम नदीच्या किनाऱ्यावर पोचला व त्याने तीरावर तळ टाकला. त्यावेळी झेलम नदीला पूर आला असल्यामुळे त्याला काही आठवडे थांबावे लागले.

अलेक्झांडर झेलमच्या तीरावर पोचल्याचे पाहून नदीच्या पूर्व तीरावर जिथे जिथे पायउतार होते, तिथे पोरसने आपल्या तुकड्या ठेवल्या होत्या. आपण नदी कोठे पार करणार आहोत, याचा पोरसला पत्ता न लागू देण्यासाठी अलेक्झांडरच्या सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्या झेलमच्या तीरावर सदैव गस्त घालू लागल्या. त्यामुळे शत्रू नदी कोठे ओलांडणार, याबाबतीत पोरसच्या मनात संदेह निर्माण झाला. त्यात भर टाकण्यासाठी अलेक्झांडरने आपण शिशिर ऋतूमध्ये नदीचे पाणी उतरल्यावर मगच ती ओलांडणार आहोत, अशी अफवा पसरवली. त्यावर विश्वास बसावा म्हणून आसपासच्या प्रदेशातून मोठ्या प्रमाणात त्याने शिधा-सामग्री गोळा करण्यास आरंभ केला. झेलमच्या पात्रात सतरा मैल वरती एका वळणावर लहानसे बेट होते. त्यावर घनदाट झाडी होती. नदी पार करण्यासाठी अलेक्झांडरने ती जागा निवडली.

अखेरीस पोरसच्या नकळत त्याने त्या जागी नदी ओलांडली. झेलम व चिनाब नद्यांच्या दरम्यान करसी पठारावर सम्राट पुरू आणि अलेक्झांडरच्या सैन्यांमध्ये घमासान युद्ध झाले. पोरसच्या ३०,००० पायदळ, ४००० घोडदळ, ३०० रथ आणि २०० हत्ती इतक्या सैन्याचा अलेक्झांडरने आपल्या सुमारे त्याच संख्येच्या सैन्याकरवी नेहमीचे युद्धतंत्र वापरून पराभव केला. पोरसचे राजबिंडे स्वरूप आणि अतीव धैर्य पाहून सिकंदर मंत्रमुग्ध झाला आणि त्याने पोरसला विचारले, 'मी तुला कसा वागवू?' पोरसने उत्तर दिले, 'एक सम्राट दुसऱ्या सम्राटाला वागवेल तसा'. त्यानंतर पोरसलाच आपला मांडलिक म्हणून हिंदुस्तानावर राज्य करण्याचा आदेश देऊन तो जगज्जेता सिकंदर परत गेला. सरस युद्धतंत्र, कर्तृत्ववान नेतृत्व आणि आधुनिक शस्त्रसामग्री यांच्या बळावर परकीय आक्रमकाने भारतातील राजावर मिळवलेला हा पहिला विजय होता.२

अलेक्झांडरचा प्रभाव पुढील सात वर्षांतच विलयास गेला. त्याचा प्रमुख विधाता म्हणजे त्याच्याइतकाच कर्तबगार व रोमांचकारी, परंतु स्वकीय लढवय्या सम्राट चंद्रगुप्त मौर्य (ख्रिस्तपूर्व ३२१-२९७)! मगध राज्यातून हाकलून लावलेल्या या महत्त्वाकांक्षी तरुणाला साम्राज्य स्थापन करण्यात अतिमोलाचे साहाय्य लाभले ते बुद्धिमंत विष्णुगुप्त किंवा चाणक्य या त्याच्या शिल्पकाराचे. चंद्रगुप्त त्याच्या सत्तेची चोवीस वर्षे चाणक्याच्या कडक शिस्तीखाली वागला. तो स्वत: अत्यंत कार्यक्षम शासक आणि अद्वितीय लढवय्या होताच, परंतु त्याच्या यशाचे श्रेय समप्रमाणात चाणक्यालाही दिले पाहिजे. चंद्रगुप्ताच्या सरकारचे प्रत्यक्ष मार्गदर्शन या कसबी कूटनीतिज्ञाच्या हातात होते. त्याने चंद्रगुप्ताला अज्ञातवास, पराभव, धाडस, कूट कारस्थान, हत्या व विजय या सर्व संक्रमणांत अखंड साथ दिली. त्याच्यामुळे चंद्रगुप्ताचे साम्राज्य हिंदुस्तानातील परमोत्कृष्ट ठरले. कौटिल्याने आपले युद्धशास्त्र आणि मुत्सद्देगिरीवरील विचार 'अर्थशास्त्र' या ग्रंथात शब्दबद्ध केले आहेत. हा ग्रंथ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उत्तमोत्तम ग्रंथांपैकी एक मानला जातो.

चंद्रगुप्तानंतर प्रथम बिंदुसार राज्यावर आला आणि त्यानंतर त्याचा पुत्र अशोक ख्रिस्तपूर्व २७३मध्ये सिंहासनावर बसला. त्याने आपल्या साम्राज्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. अफगाणिस्तान व बलुचिस्तानपासून सर्व हिंदुस्तानावर त्याचे राज्य होते. अशोक त्याच्या आजोबाइतकाच कर्तबगार सम्राट होता, परंतु त्यापेक्षाही एक कठोर व

शिस्तप्रिय राजा होता. तुरुंगात डांबलेल्या निगरगट्ट गुन्हेगारांना अत्यंत सक्त आणि निष्ठुर वागणूक मिळे. त्यांच्यापैकी एकही गुन्हेगार तुरुंगातून जिवंत परत जाता कामा नये, असे अशोकाचे तुरुंगप्रमुखाला आदेश असत. दंतकथेनुसार एका बौद्ध संताला उकळत्या पाण्याच्या कढईत फेकले असता त्याला काहीही इजा होत नसल्याचे पाहून आश्चर्यचकित झालेल्या तुरुंगप्रमुखाने ही बातमी अशोकापर्यंत पोचवली. अशोकाने ते स्वत: येऊन पाहिल्यावर त्याचे मनपरिवर्तन झाले. राजमहालात परत आल्यावर त्याने तुरुंग जमीनदोस्त करण्याचे फर्मान सोडले. त्याचवेळी त्याच्याविरुद्ध बंड करून उठलेल्या कलिंग राज्याविरुद्ध झालेल्या युद्धात घडलेली हिंसा, अमानुष हत्या आणि रक्तपात पाहून अशोकाला अतोनात विरक्ती आली आणि त्याने बौद्ध धर्म स्वीकारला. सर्व प्रजाजनांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना आपल्या मुलांप्रमाणे वागवण्याची त्याने प्रतिज्ञा केली. त्याने भारतभर ८४,००० मठांची स्थापना केली आणि आपले बौद्ध धर्मप्रचारक श्रीलंका, सीरिया आणि ग्रीस वगैरे देशांत रवाना केले. मौर्य घराण्याने हिंदुस्तानावर ख्रिस्तपूर्व ३२२-१८५ या कालावधीत राज्य केले. अशोकाच्या मृत्यूनंतरच्या दोनशे वर्षांत बौद्ध धर्म हिंदुस्तानातच नव्हे, तर आशियाभर पसरला.

संवेदनक्षम उत्तर भारत

मौर्य साम्राज्याच्या अध:पतनानंतर हिंदुस्तानावर वेगवेगळ्या भागांत अनेक घराण्यांनी राज्य केले. (नकाशा क्र. १अ व १ब पाहा.) पहिल्या शतकापासून तिसऱ्या शतकापर्यंत सातवाहन घराण्याने तीनशे वर्षे सत्ता गाजवली. चवथ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंतचा कालखंड गुप्त साम्राज्याचे सुवर्णयुग होते. या साम्राज्याच्या काळात भारताच्या संस्कृतीचा प्रभाव इंडोचायना आणि इंडोनेशियापर्यंत पोचला. किंबहुना गुप्त काळात या प्रदेशांचे हिंदूकरण झाले आणि भारताच्या आध्यात्मिक ज्ञानसंपदेचा परिणाम चीन-जपानमधील धार्मिक, सामाजिक आणि ललित कलांच्या विचारसरणीवर झाला. चंद्रगुप्त (पहिला) (३१९-३३०) याने मगध राज्यात गुप्त घराण्याची स्थापना केली. त्याचा पुत्र समुद्रगुप्त (३३०-३८०) याने पाच दशके राज्य केले. त्याने आपली राजधानी पाटीलपुत्राहून अयोध्येला नेली. त्याच्या विजयी सैन्याने बंगाल, आसाम, नेपाळ आणि दक्षिण भारतापर्यंत मजल मारली. त्याचा पुत्र विक्रमादित्याने (३८०-४१५) पित्याच्या विजयश्रीला आणखी झळाळी आणली. त्याने शस्त्र, शास्त्र आणि कला या सर्व क्षेत्रांत आपल्या साम्राज्याचे नाव दिगंत केले. त्याची राजधानी उज्जैन ही नाटककार, कवी, तत्त्वज्ञ, कलाकार, शास्त्रज्ञ आणि विद्वानांचे आगर बनले. या दोन सम्राटांच्या काळात हिंदुस्तानची अचाट भरभराट झाली.

परंतु स्वकीय संस्कृतीचा हा सुवर्णकाळ हूणांच्या आक्रमणांनी खंडित झाला. स्कंदगुप्ताच्या (४५५-४६७) काळात वायव्येकडून आलेले हूण आक्रमक सिंधू नदीपर्यंत पोचले. ज्यावेळी ॲटिल्ला युरोपवर धाडी घालत होता, त्याच सुमारास तोरामणने माळवा जिंकले. परंतु स्कंदगुप्ताने हूणांचा हल्ला परवतून त्यांना मागे रेटले आणि गुप्त साम्राज्याचे रक्षण केले.

याबद्दल भिटारी येथील स्तंभावरील आलेखात उल्लेख सापडतो. स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर

४६७मध्ये हूण परतले आणि राजपुताना, पंजाब आणि काश्मीसरचा काही भाग त्यांनी बळकावला. ४६५ मध्ये गौरवर्णी हूण राजा तोरामण हा पंजाबमध्ये राज्यावर होता. त्याचा पुत्र मिहिरगुल याने सियालकोटमध्ये आपली राजधानी हलवली. शेवटी ५३३-५३४ मध्ये माळव्याचा महत्त्वाकांक्षी आणि बलवत्तर राजा यशोवर्मन याने भारतातून हुणांचे कायमचे उच्चाटन केले.

नकाशा क्र. १ अ

मध्ययुगीन भारत

गुप्त इ.स. ३२० - ६००




चालुक्य इ.स. ५४७ - ६८२



पल्लव इ.स. ५७० - ८९२




पांड्य इ.स. ५९० - १२३८




नकाशा क्र. १ ब

मध्ययुगीन भारत


हर्षवर्धन इ.स. ६०६ - ६४७




पाल इ.स. ७४० - १०४०



प्रतिहार इ.स. ७४० - ९१०



राष्ट्रकुट इ.स. ७४६ - ९७२



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

सहाव्या शतकात पुष्यभूती या अत्यंत शूर आणि कर्तबगार राजाने वर्धन घराण्याची स्थापना केली. परंतु एका शतकापर्यंत हिंदुस्तान पारतंत्रयात आणि कोलाहलात हरवून गेला. त्या घराण्याचा तेजोगोल हर्षवर्धन याने उत्तर हिंदुस्तान पुन्हा जिंकले, आपली राजधानी कनौज येथे नेली आणि चार दशके शांतता व सुबत्तेचे राज्य प्रस्थापित केले. विद्या, कला आणि साहित्याला पुन्हा एकदा भर आला. कनौज हे एक रमणीय आणि गर्भश्रीमंत शहर झाले. त्या एकट्या शहरात १०,००० भव्य व सुंदर देवालये बांधण्यात आली. त्याचे राज्य उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल आणि ओरिसा या राज्यांत पसरले होते. त्याबरोबर सिंध, पंजाब, काश्मीपर आणि नेपाळ या अंकित प्रदेशांचा तो राजाधिराज होता. त्याने तीस वर्षे राज्य केले. ६४७ मध्ये तो मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर काही वर्षांतच वर्धन साम्राज्याचे छोट्या छोट्या राज्यांत विभाजन झाले.

बंगालमधील पाल घराणे आठव्या शतकात नावारूपास आले. त्याचा संस्थापक गोपाल याने वेगाने आपली सत्ता बळकट केली, परंतु पाल घराण्याची खरी भरभराट गोपालचा पुत्र धर्मपाल (७६९-८१५) याच्या कारकिर्दीत झाली. त्याचे साम्राज्य बंगालच्या आखातापासून दिल्ली, जालंधर आणि विंध्य पर्वतापर्यंत पसरले होते. त्याचा पुत्र देवपाल (८१५-८५४) याने त्याचा विस्तार केला; परंतु १०४० नंतर त्या साम्राज्याचे विघटन झाले.

गुर्जर-प्रतिहार हे कनौजचे नामवंत राजपूत घराणे. नागभट (पहिला) याने ७४०च्या सुमारास स्थापन केलेले अवंतीच्या प्रतिहारांचे हे घराणे मुस्लीम आक्रमकांचा सामना करण्यात आघाडीवर होते. त्यांची राजधानी उज्जैन येथे होती. प्रतिहार आणि राष्ट्रकूट घराण्यांमध्ये उत्तर हिंदुस्तानावरील वर्चस्वासाठी संघर्ष होत राहिला. राष्ट्रकूट घराण्याचा ध्रुव याने उत्तर हिंदुस्तानावर आक्रमण करून प्रतिहार सम्राट वत्सराज (७७५-८००) आणि पाल सम्राट धर्मपाल यांचा पराभव केला. राजा भोज (८४०-८९०) हा प्रतिहार घराण्याचा सर्वश्रेष्ठ सम्राट होता. त्याने विशाल साम्राज्य उभे केले. त्याचा पुत्र महेंद्रपाल (८९०-९०८) याने पित्याच्या पावलावर पाऊल ठेवून मगध आणि बंगालपर्यंत राज्य वाढवले.

सम्राट हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर पुढील एक हजार वर्षे हिंदुस्तानावर अराजक, अंदाधुंदी आणि अव्यवस्थेचे राज्य होते. राजपुतान्यातील मेवाड, मारवाड, अंबर, बिकानेर वगैरे राज्यांची अभिमानी लष्करी परंपरा मात्र त्या काळातही जागृत होती. त्यांनी आरंभी मौर्य आणि गुप्त साम्राज्याचे मांडलिकत्व मान्य केले, परंतु जसजसे परकीय आक्रमक त्यांच्या प्रदेशात चंचुप्रवेश करू लागले, तसतसे त्यांनी आरंभी आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे निकराचे प्रयत्न केले.

विंध्यरक्षित दक्षिण भारत

विंध्य पर्वतराजीच्या दक्षिणेकडील भारत तेराव्या शतकापर्यंत कोणत्याही परकीय आक्रमणाच्या पैलथडी राहिला. भारतातील इतर हिंदू राजेशाह्यांप्रमाणे दख्खनमध्ये चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादवांची साम्राज्ये स्थापन झाल्यावर हिंदवी अस्मिता विकसित झाली. महाराष्ट्र हे नाव महाभारतात नाही. त्याकाळी ‘दंडकारण्य’ म्हणून संबोधिलेला प्रदेश पुढे

कालांतराने आजच्या महाराष्ट्रात सामील झालेला दिसतो. प्राचीन महाराष्ट्रात शक, आभीर ऊर्फ अहिर, वाकाटक, कलचुरी यांची राज्ये वऱ्हाड, खानदेश, कोकण या प्रदेशांत झाली. सातवाहनांचे राज्य पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत दक्षिणेत झाले. त्यांची दक्षिण मर्यादा म्हैसूरच्या राज्यापर्यंत व उत्तरेस नर्मदेपर्यंत पोहोचली होती. त्यांच्या अस्तानंतर राष्ट्रकूटांचा एक वंश दक्षिण महाराष्ट्रातील आजच्या माणदेशात राज्य करत होता. त्यांना जिंकून पुढे सातव्या शतकात पश्चिम चालुक्य राजे पुढे सरसावले. त्यातील फुलकेशी दुसरा या सम्राटाने उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस कावेरीपर्यंत राज्य अंमलाखाली आणले. त्याच्या राज्याच्या मर्यादाही पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्र याच होत्या. याची मुख्य राजधानी वातापी नागरी म्हणजे आजच्या विजापूर जिल्ह्यातील बादामी ही होती. बादामीच्या पूर्व-चालुक्यांनंतर राष्ट्रकूट पुन्हा अधिकारावर आले व त्यांनी नर्मदेपासून म्हैसूरपर्यंतच्या प्रदेशावर राज्य केले. या सर्व राज्यांचा हेतू त्या काळी महाराष्ट्राप्रमाणेच तेलंगण व कर्नाटक या प्रदेशांवर सत्ता गाजवण्याचा असल्यामुळे त्यांची राजधानी तीन प्रांतांच्या सीमेवर मालखेड व कल्याणी येथे झाली. दक्षिण महाराष्ट्रावर कर्नाटक संस्कृती, तर उत्तर कोकण व महाराष्ट्र यांच्यावर गुर्जर संस्कृतीचा ठसा उमटला आहे.३

सातवाहन घराणे तिसऱ्या शतकात विलयास गेल्यानंतर दख्खनमध्ये कोणतेही मोठे घराणे उरले नाही. विदर्भावर राज्य करणाऱ्या वाकाटक या ब्राह्मण घराण्याने त्यांची जागा घेतली. त्यांचा आद्य पुरुष विंध्याशक्ती याने विंध्य पर्वतराजीवरील काही प्रदेश आणि पूर्व माळव्याचा काही भाग घेतला. त्याच्यानंतर सिंहासनावर आलेला प्रवरसेन (२८०-३४०) याने आपल्या सहा दशकांच्या दीर्घ कालावधीत मध्य प्रदेशचा भाग, विदर्भ, माळवा आणि दख्खनचा काही भाग आपल्या सत्तेखाली आणला. त्यावेळी तो भारतातील सर्वांत बलवान सम्राट होता. त्या घराण्यातील शेवटचा सम्राट हरिसेन (४८०-५१५) यांच्या मृत्यूनंतर ते साम्राज्य विलयास गेले.

कावेरी आणि गोदावरी नद्यांमधील प्रदेश कर्नाटक म्हणून ओळखला जात असे. फुलकेशी (पहिला) (५४७-५६७) हा चालुक्य घराण्याचा पहिला राजा होता. फुलकेशी (दुसरा) (६०८-६४२) हा चालुक्यांचा सर्वांत महान सम्राट ठरला आणि त्याने आपल्या राज्याचा गुजरातपर्यंत विस्तार केला. चिनी प्रवासी ह्यू एन त्संग याने फुलकेशीबद्दल गौरवपूर्ण उद्‌गार काढलेले आहेत. फुलकेशीने आपल्या राज्याचे 'महाराष्ट्रक' असे नामकरण केले.४ त्याने कलिंग, चोल, पांड्य आणि पल्लव राज्यांच्या सत्ताधीशांचा पराभव केला. अशा प्रकारे दक्षिण हिंदुस्तानावरील आपले निर्विवाद सार्वभौमत्व प्रस्थापित केल्यावर राजधानी बदामीहून तो राज्य करू लागला. कीर्तिवर्मन (दुसरा) हा चालुक्यांचा शेवटचा राजा होता.

सातव्या ते दहाव्या शतकांत दक्षिणेतील सर्वांत मोठी सत्ता होती महाराष्ट्रातील मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्याची. त्यांचे स्थिर साम्राज्य कन्याकुमारीपासून गंगेच्या सखल प्रदेशापर्यंत पसरलेले होते. मालखेड ही राष्ट्रकूट घराण्याची राजधानी सध्याच्या सोलापूरपासून फारशी दूर नसावी. दक्षिणेतील कोणत्याही इतर राजसत्तेने मराठा सत्तेचे आगमन होईपर्यंत भारताच्या इतिहासात राष्ट्रकूट घराण्याइतकी परिणामकारक भूमिका बजावली नाही.५ या घराण्याचा

संस्थापक होता दांतिदुर्ग. हा अत्यंत पराक्रमी आणि कर्तबगार राजा वयाच्या ३७ व्या वर्षी ७५६साली मरण पावला. त्यानंतर आलेल्या सम्राटांनी या राज्याचा विस्तार आणि भरभराट साधली. इंद्र (तिसरा) (९१४-९२८) याने उत्तर हिंदुस्तानातील अनेक किल्ले सर केले, प्रतिहारांविरुद्ध युद्ध घोषित केले आणि पार दिल्लीपर्यंत तो चालून गेला. त्याच्या कार्यकाळात दक्षिणेतील चोल राजावर त्याने हल्ला केला, चेरा आणि पांड्य राजांवर हल्ले चढवले आणि पार रामेश्वरपर्यंतचा प्रदेश जिंकला. परमार राजा सियक याने ९७२मध्ये राजधानी मालखेडवर हल्ला चढवला. त्यानंतर राष्ट्रकूट घराणे नामशेष झाले.

कांचीचे पल्लव हे मध्ययुगीन काळातील कृष्णा आणि गोदावरी नद्यांमधील प्रदेशातील आणखी एक प्रसिद्ध घराणे. राजा सिंहविष्णू (५७०-६००) हा त्या घराण्यातील पहिला प्रकाशात आलेला राजा. त्याची राजधानी सोलापूरच्या सान्निध्यात होती. शेवटचा पल्लव राजा अपराजित (८७९-८९२) याचा चोलांनी पराभव केला आणि त्यानंतर हे साम्राज्य विलयाला गेले. पल्लवांच्या सत्ताकाळात सर्व धर्मांचा आदर केला जाई. दक्षिण हिंदुस्तानातील 'भक्ती चळवळ' पल्लवांच्या काळातच सुरू झाली.

पांड्य हे तमिळ प्रदेशातील नामांकित घराणे. सहाव्या शतकाच्या अखेरीस पल्लव, चालुक्य आणि पांड्य घराण्यांच्या यादवी युद्धात कादुंगन (५९०- ६२०) हा पांड्य राजा सर्वांत बलिष्ठ ठरला. परांतक या चोल राजाने पांड्य प्रदेशावर आक्रमण केले आणि ९१५साली वेल्लोर येथे झालेल्या लढाईत पांड्य राजा राजसिंहा याचा पराभव केला आणि त्याला श्रीलंकेत पळवून लावले. त्याचा वंशज मरवर्मन सुंदरा पांड्य (१२२६-१२३८) याने पांड्य घराण्याचे पुनरुज्जीवन केले.

तंजोरचे चोल घराणे हे दक्षिणेतील आणखी एक नामवंत घराणे. विजयलय चोल (८५०-८७१) याने पांड्यांविरुद्ध बंड केले आणि तंजोरमध्ये आपली राजधानी उभारली. त्यानंतर आलेला राजा परांतक (९०७-९५३) या पराक्रमी चोल सम्राटाने पांड्य, श्रीलंका आणि राष्ट्रकूट राजांवर मोठे विजय मिळवले. परंतु ९४९मध्ये त्याने राष्ट्रकूट प्रदेशावर केलेले आक्रमण यशस्वी झाले नाही आणि चोलांना त्यांचे दास्यत्व पत्करावे लागले. राजराजा (९८५-१०१४) या त्यांच्या वंशजाने चोल साम्राज्याला पुनश्च बळकटी आणली.

जेव्हा चोल राजा कुलोत्तुंग (दुसरा) संपूर्ण तमिळ आणि आंध्र प्रदेश आपल्या सत्तेखाली आणत होता, त्यावेळी चालुक्य राजपुत्र विक्रमादित्याने आपला भाऊ सोमेश्वर (दुसरा) याच्याविरुद्ध बंड केले आणि सत्ता बळकावली. कुलोत्तुंगाचे मांडलिकत्व नाकारून त्याने स्वत:ला कर्नाटकाचा सम्राट घोषित केले आणि १०७२मध्ये चालुक्य-विक्रम युगाचा आरंभ केला. त्याची राजधानी कल्याणी हे अत्यंत प्रगत शहर झाले.

विक्रमादित्य (सहावा) याच्या कारकीर्दीत देवगिरीचे यादव, वारंगळचे काकतीय आणि म्हैसूरचे होयसाळ या कर्नाटकमधील तीन बलिष्ठ घराण्यांचा उदय झाला. परंतु त्या सर्वांनी चालुक्यांचे स्वामित्व पत्करले. त्याचा वारस सोमेश्वर हा अत्यंत बुद्धिमान आणि कलागुणसंपन्न राजा होता. त्याच्या पश्चात त्या घराण्याला उतरती कळा लागली. शिलाहारांचा पराभव १२६२मध्ये महादेव यादवने केला, पण सर्व प्रदेश यादवांच्या ताब्यात यायला खूप काळ

लोटावा लागला.

इस्लामचे आक्रमण

हिंदुस्तानावरील मुस्लिमांचा विजय ही कदाचित जागतिक इतिहासातील सर्वांत रक्तरंजित आणि अमानुष गाथा असावी. ती मानवी मनास वैफल्यग्रस्त आणि उद्विग्न करणारी कथा आहे; कारण त्यातून निघणारे तात्पर्य विदारक आणि भयानक आहे. मानवी संस्कृती ही एक अमूर्त संकल्पना आहे. सुव्यवस्था व स्वातंत्र्य, सभ्यता व शांती यांच्यातील तिचा समतोल बाहेरून येणाऱ्या पाशवी घुसखोरांकडून अचानक बिघडवला जाऊ शकतो, हा त्याचा गर्भितार्थ. हिंदूंनी आपली शक्ती एकमेकांबरोबरील नाहक संघर्षात आणि स्वार्थी दुफळीत वाया घालवली होती. बौद्ध, जैन आणि काही प्रमाणात हिंदू धर्मांच्या शिकवणीमुळे आपल्या स्वसंरक्षणाचे कर्तव्य पार पडण्याची त्यांची धमक क्षीण झाली होती. आपल्या राष्ट्रीय दुर्बलतेचा फायदा घेऊन सीमेवर घोटाळणाऱ्या सीथियन, हूण, अफगाण आणि तुर्की आक्रमकांपासून आपल्या सीमेचे, राजधानीचे, संपत्तीचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आपल्या संरक्षण दलांचे संघटन करण्याच्या राष्ट्रीय कर्तव्याची त्यांनी उपेक्षा केली. ही गर्हणीय कर्तव्यच्युती होती. ते लज्जास्पद राष्ट्रीय पातक होते. इ.स. ६००पासून इ.स. १०००पर्यंत चारशे वर्षे त्या आक्रमणाची जणू काय ते प्रतीक्षा करत राहिले आणि शेवटी ते आले.

इस्लामचा उदय

अरब द्वीपकल्प हा पुरातन हिंदूंच्या परिचयाचा होता. प्राचीन काळापासून अरबस्तान हे हिंदुस्तान आणि पूर्व आफ्रिकेतील शहरे, क्रीट व इजिप्त यांच्या दरम्यान व्यापाराचे एक केंद्र होते.६ प्रेषित महंमद यांचा जन्म इ.स. ५७०मध्ये झाला. त्यांनी एक नव्या एकेश्वरवादी इस्लाम धर्माची स्थापना केली आणि त्याची लोकप्रियता वेगाने वाढू लागली. जिहाद हा या धर्माचा आत्मा होता. जिहादच्या शिकवणुकीने भारून गेलेल्या अरबांना त्याचा प्रचार करण्यासाठी सर्व दिशांत रवाना करण्यात आले. ६३२मध्ये महंमद पैगंबर यांचा मृत्यू झाला. त्यांचा वारसा चालवण्यासाठी ‘खलिफा’ हे धर्मगुरूचे पद निर्माण करण्यात आले. खलिफा हा धर्मगुरू इस्लामचा सर्वोच्च धार्मिक आणि राजकीय प्रमुख झाला. तलवारीच्या जोरावर धर्मप्रसार करण्याच्या - जिहादच्या - ईर्षेने प्रेरित झालेल्या अरबांची पथके सर्व दिशांत पसरू लागली.

पहिली लाट पश्चिमेकडे आफ्रिकेच्या उत्तर सागर तटाच्या मार्गे ७१०साली बाहेर पडली. अटलांटिक पार करून ७११ साली ते स्पेनमध्ये शिरले आणि आयबेरियन द्वीपकल्पावर त्यांनी ताबा केला. त्यानंतर पिरॅनीज पर्वत ओलांडून त्यांनी फ्रान्समध्ये प्रवेश केला. १०-११ ऑक्टोबर ७३२ या दिवशी चार्ल्स मोर्टेल या फ्रान्सच्या लष्करप्रमुखाने पॅरिसच्या दक्षिणेस ३२० किलोमीटर्स अंतरावर असलेल्या टूर्स या जागी ते आक्रमण अडवले आणि त्यांचा दारुण पराभव करून त्यांना माघार घेण्यास भाग पाडले. टूर्सचे युद्ध इस्लामच्या प्रसाराला पायबंद घालण्यास कारणीभूत झाले. जर त्यांना पुढे जाण्यास वाव मिळाला असता, तर त्यांनी

लंडनपर्यंत मुसंडी मारून त्याच वेळी युरोपमध्ये मुस्लीम सत्ता स्थापन केली असती. फ्रान्समधून अरबांना हाकलल्यानंतर पिरॅनीज ही इस्लामच्या प्रसाराची दीर्घ काळासाठी सीमा झाली.

दुसरी लाट उत्तरेकडे सध्याचा इस्राइल, जॉर्डन, लेबनॉन, सीरिया, तुर्की मार्गे डार्डानेल्सच्या आखातात पोचली. ७१७साली बायझेंटाइन साम्राज्याची राजधानी काँस्टँटिनोपलला सागर आणि जमिनीमार्गे त्यांनी वेढा घातला. इथे त्यांचा सामना सम्राट लिओ (तीन) बरोबर झाला. बल्गारांच्या साहाय्याने लिओने त्यांना मागे रेटले. त्यात अरबांची प्रचंड जीवहानी झाली. मुस्लीम आक्रमणाला युरोपमध्ये प्रवेश करण्याला मज्जाव करण्यात चार्ल्स मोर्टेलइतकेच लिओचेही योगदान होते.

तिसरी लाट पूर्वेच्या दिशेने हिंदुस्तान व चीनच्या सीमांवर पोचली. ते भारतात पोचल्यापासून भारताच्या इतिहासाने एक दुर्दैवी वळण घेतले. अमानुष हत्या, वंशसंहार, धर्मपरिवर्तन, लुटालूट, स्त्रियांवर अत्याचार आणि परिसराचा विध्वंस हाच त्याचा स्थायिभाव झाला.७ अरबांनी सम्राट कनिश्कावचा वंशज असलेल्या काबूलच्या राजावर वारंवार हल्ले चढवले.

बलुचिस्तान काबीज केल्यावर अरबांनी सिंधकडे मोर्चा वळवला. सिंधवर दाहिर हा ब्राह्मण राजा राज्य करत होता. त्याने इराकच्या अल्-हजाजच्या सैन्याचा पराभव करून त्यांना माघार घ्यायला लावली. परंतु अल्-हजाजने आपला जावई महंमद-बिन-कासीमला प्रचंड सैन्यासह पुन्हा सिंध घेण्यासाठी पाठवले. दुर्दैवाने काही बौद्ध भिक्षुक आणि मांडलिक राजांच्या दगाबाजीमुळे अरब सैन्य सिंधू नदी पार करू शकले. ७१२मध्ये रौरच्या लढाईत शर्थीने लढूनही दाहिरचा पराभव झाला आणि आक्रमकांनी मुलतान परगणा काबीज केला. त्यापश्चात सिंधचा दमास्कसच्या खिलाफतीमध्ये समावेश झाला. त्यानंतर जुनैद या प्रशासकाने एकामागून एक मोहिमा पाठवून मारवाड, मंदोर, भडोच, उज्जैन, माळवा, कच्छ, काठियावाड, भडोच आणि पश्चिम राजपुताना काबीज केला. हिंदुस्तानच्या पूर्वेतील पाल आणि पश्चिमेतील प्रतिहार या दोन राजसत्तांनी त्यांच्या आक्रमणाला काही काळ पायबंद घातला. प्रतिहार घराण्याचा नागभट्ट (पहिला) याचा त्यात सिंहाचा वाटा होता. पुढील दोन शतके मुस्लीम आक्रमणाची लाट सिंधच्या पूर्व सीमेवर तटवण्यात आली.

गझनी, घोरी व गुलाम घराण्यांची आक्रमणे

९६२मध्ये तुर्की मुळाच्या अल्पतेगिन या महत्त्वाकांक्षी आणि कर्तबगार गुलामाने गझनी राज्याची स्थापना केली. त्याचा नातू महंमद याने अफगाणिस्तान ते कांगडापर्यंतच्या विशाल प्रदेशावर राज्य करणाऱ्या शहीया घराण्याचा राजा जयपाल याचा पेशावरजवळ १००१ मध्ये दारुण पराभव केला. गझनीच्या महंमदाने त्यानंतर १०१४मध्ये थानेसर घेतले, अनेक हिंदू राजांचा पराभव केला, जनतेत सर्वत्र भयगंड निर्माण करण्यासाठी मोहिमा काढल्या, मथुरेतील देऊळ जाळले, १०१८मध्ये कनौज उद्ध्वस्त केले, प्रतिहार घराण्याचा शेवट केला आणि अखेरीस १०२६मध्ये त्याने काठियावाडचे सुप्रसिद्ध श्रद्धास्थान सोमनाथ मंदिर जमीनदोस्त केले. गझनीचा महंमद १०३० साली निवर्तला. त्यानंतर त्याच्या वंशजांनी तीच विध्वंस,

तोडफोड आणि धर्मांतराची प्रथा चालू ठेवली. वाराणसीचे पवित्र स्थानही उद्ध्वस्त करण्यात आले.

मुस्लीम आक्रमकांनी हिंदू जनतेच्या बळजबरीने केलेल्या धर्मांतराचे, त्याला विरोध करणाऱ्यांवर केलेल्या अत्याचाराचे, स्त्रियांवर केलेल्या बलात्काराचे आणि हिंदूंच्या सरसकट केलेल्या नरसंहाराचे अनेक दाखले इतिहासात सापडतात. इ.स. १००१मध्ये महंमद गझनीने हिंदुस्तानवर केलेल्या स्वारीत त्याला प्रचंड लूट मिळाली. त्यानंतर त्याने हिंदुस्तानावर वारंवार स्वाऱ्या केल्या. मूर्तिपूजेचे पातक धुवून काढल्याने अल्लाची आपल्यावर कृपा होते, या कल्पनेने महंमद गझनीने देवालयामागून देवालये उद्ध्वस्त केली व अगणित संपत्ती लुटली. केवळ नगरकोटच्या देवालयाचा विध्वंस करून त्याने इतकी हिरेमाणके एकत्र केली की, त्यांची नोंदसुद्धा करणे अशक्य ठरले. प्रसिद्ध सोमनाथाचे मंदिर ज्यावेळी त्याने लुटले, त्यावेळी त्याने पन्नास हजार लोकांची कत्तल केली होती.८

काही विद्वानांच्या मते हिंदू मंदिरांच्या विध्वंसाच्या मागील कारण केवळ धर्मद्वेष हेच नव्हते. अरब, तुर्क, अफगाण इत्यादी आक्रमकांच्या टोळीवजा सैन्यांनी लूट करावी आणि लुटीतल्या हिश्शायतून आपला पगार घ्यावा, असा शिरस्ता असे व त्यामुळे हिंदूंच्या मंदिरांतील प्रचंड संपत्ती लुटताना आक्रमकांकडून देवळे पाडली जात, असा त्यांचा दावा आहे.९ संपत्ती लुटणे हा त्यांचा मुख्य हेतू असे, त्याच्यामागे केवळ धर्मद्वेष नव्हता; हा या भाष्यकारांचा युक्तिवाद दुबळा वाटतो. किंबहुना मूर्तिपूजक काफरांचे धर्मांतर घडवून आणणे, मूर्ती व त्याची आलये जमीनदोस्त करणे आणि धर्मांतरास व मूर्तिभंजनास विरोध करणाऱ्यास यमसदनी पाठवणे हे जिहादचे घटक होते, यात तसूभरही संशय नाही. केवळ पैशाकरता मंदिरे लुटली जात नसत.

गंगेच्या खोऱ्यातील प्रतिहार आणि बंगालमधील पाल यांच्यासारखी बलवत्तर घराणी लवकरच मुस्लीम आक्रमणाखाली कोसळू लागली. हिंदुस्तानच्या जनतेचे आणि संस्कृतीचे रक्षण करण्याची जबाबदारी आता छोट्या संस्थानांवर आली. गुजरातचा राजा भीम (पहिला) याने सोमनाथ मंदिर पुन्हा बांधले. मध्य भारतातील चंदेल राजघराणे कलांचे भोक्ते होते. त्यांनी खजुराहोमध्ये नवी मंदिरे बांधली. गंगेयदेव आणि त्याचा पुत्र लक्ष्मीकर्ण यांनी वाराणसी आणि प्रयाग धर्मास्थानांची पुनर्बांधणी केली. गुजरात, माळवा, बुंदेलखंड आणि दख्खनमधील राजपुत्रांनी महंमद गझनी वंशजांच्या विस्ताराला पायबंद घातला.

गझनीच्या महंमदाचे वारस कर्तव्यशून्य निघाल्याने गझनीच्या साम्राज्याचे अल्प काळात विघटन झाले. हेरातमधील पर्शियन मुळाच्या घोर नावाच्या छोट्या राज्याच्या सत्ताधीशांनी त्याचा फायदा घेतला. किंबहुना घोरीचा कुतबुद्दिन महंमद आणि त्याचा भाऊ सैफ उद्दिन यांची गझनीच्या बहराम शहाने हत्या केली होती. त्याचा बदला घेण्यासाठी त्यांचा भाऊ अल्लाउद्दिन याने गझनीवर हल्ला चढवला आणि शहर बेचिराख केले. त्यानंतर घोर घराण्याची राजवट चालू झाली आणि शिहाब-उद्दिन ऊर्फ घोरचा महंमद गादीवर आला. तो महंमद घोरी या नावाने प्रसिद्ध झाला.

११७५मध्ये महंमद घोरीने हिंदुस्तानात मोहिमांचा आरंभ केला. त्याने मुलतान, पेशावर आणि सियालकोट काबीज केले. संपूर्ण हिंदुस्तान व्यापण्याच्या महत्त्वाकांक्षेने तो पेटला होता. उत्तर

हिंदुस्तानातील सर्वांत बलिष्ठ राजा अजमेरचा पृथ्वीराज चौहान याने दिल्लीपासून पश्चिमेला १५० किलोमीटर अंतरावरील तरैन येथे ११९१साली महंमद घोरीचा दारुण पराभव केला, परंतु पुढच्याच वर्षी महंमद परतला आणि त्याच मैदानावर त्याने पृथ्वीराजाचा पराभव केला. ११९२मधील ती लढाई हिंदुस्तानच्या परवशतेच्या वाटचालीतील लक्षणीय पाणलोट ठरला. या दोन लढायांचा लष्करी परामर्श पुढे घेण्यात आला आहे.

महंमद घोरीने पूर्वी त्याचा गुलाम असलेला आणि स्वत:च्या कर्तबगारीवर मांडलिक राजा झालेल्या कुत्बुद्दिन ऐबक या तुर्की अधिकाऱ्याची हिंदुस्तानच्या प्रशासकपदी नेमणूक केली. त्यानंतर कुत्बुद्दिनने हंसी, मेरठ, महोबा वगैरे ठिकाणे वेगाने सर केली. १२०६ मध्ये महंमद घोरीचा खून झाला. तो निपुत्रिक असल्याने त्याचा प्रदेश वेगवेगळ्या गुलाम प्रशासकांत वाटला गेला आणि कुत्बुद्दिन ऐबक हिंदुस्तानचा पहिला मुसलमान राजा (सुलतान) बनला. त्याचे घराणे 'गुलाम घराणे' या नावाने ओळखले जाते. कुत्बुद्दिनने हिंदुस्तानात इस्लाम धर्माचा प्रसार करण्यास आरंभ केला. दिल्ली आणि अजमेर येथे मशिदी बांधल्या.

कुत्बुद्दिन १२१०मध्ये मरण पावला. त्याच्यानंतर शमसुद्दिन इल्तुत्मिष हा तुर्की हिंदुस्तानचा सुलतान झाला. या कर्तबगार प्रशासकाने भारतावरील मुस्लिमांचे वर्चस्व दृढ केले आणि धर्माचा कसून प्रसार केला. त्याच्या शासनकाळात चंगीझखानाच्या (तेमुचीन) नेतृत्वाखाली मंगोल सैन्य १२२१ साली सिंधू नदीवर दाखल झाले. त्यांनी सिंध, गुजरात आणि पंजाबमध्ये जबरदस्त लुटालूट केली; परंतु इल्तुत्मिषच्या प्रचंड लष्कराला सामोरे जाण्याचे धाडस केले नाही आणि ते परतले.

खिलजी, तुघलक आणि लोदी घराण्यांची सत्ता

तुर्की मुळाच्या घोरी आणि गुलाम घराण्यांची सत्ता उलथून टाकून नंतर जलालुद्दिन फिरुझ या पठाण सरदाराने सत्ता बळकावली आणि हिंदुस्तानावर खिलजी घराण्याच्या सत्तेला आरंभ झाला. फिरुझचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी या महत्त्वाकांक्षी तरुणाने आपल्या काकाला (फिरुझच्या मुलीशी अल्लाउद्दिनचे लग्न झाले होते) न सांगता माळव्यात एक मोहीम काढली. त्याने दक्षिणेतील देवगिरीतील यादव साम्राज्याच्या प्रचंड संपत्तीबाबत ऐकले होते. एक हजार घोडदळ घेऊन तो १२९६मध्ये दक्षिणेस रवाना झाला.

दक्षिणेत नर्मदा ते तुंगभद्रा नद्यांमधील सध्याच्या मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकच्या प्रदेशात यादव घराणे ११८७पासून राज्य करत होते. देवगिरी (दौलताबाद) ही त्यांची राजधानी होती. अधिकृत भाषा म्हणून मराठीचा वापर करणारे हे पहिले राजघराणे होते. त्याआधी संस्कृत आणि कानडी भाषांना हे स्थान असे. संत ज्ञानेश्वरांचा हाच कालावधी. महानुभाव धार्मिक पंथाच्या भरभराटीचाही हाच काळ.

यादवांची धनदौलत पाहून त्याचे डोळे दिपून गेले आणि अल्लाउद्दिनने आपल्या सासऱ्याला ते पाहण्यासाठी बुलावा पाठवला. तो येत असताना वाटेतच त्याचा खून करण्यात आला आणि १९ जुलै १२९६रोजी छावणीतच अल्लाउद्दिनने स्वत:ला हिंदुस्तानचा सुलतान म्हणून घोषित केले. अल्लाउद्दिन खिलजीने १२९६मध्ये देवगिरीवर हल्ला चढवला आणि रामचंद्र यादवाचा पराभव

केला. त्याच्याकडून भली मोठी रक्कम उकळून आणि गलेलट्ठ वार्षिक खंडणी देण्याची हमी घेऊन अल्लाउद्दिनने त्याला राज्य परत केले. तिथून तो दिल्लीस परत गेला. दिल्लीला पोचल्यावर फिरुझच्या मुलाबाळांची हत्या घडवून आणि आपल्या मार्गातील सर्व काटे दूर करून अल्लाउद्दिन हिंदुस्तानचा सुलतान झाला.

खिलजी हा क्रूर आणि पाशवी सुलतान होता, याबद्दल कोणत्याही इतिहासकाराला संदेह नव्हता. डॉ. आंबेडकर यांनी आपल्या 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या पुस्तकात स्टॅनली लेनपूल या सुप्रसिद्ध लेखकाचे अल्लाउद्दिनसंबंधी जे उद्‌गार नमूद केले आहेत, त्यावरून त्याच्या हिंदू प्रजेचे आर्थिक जीवन त्याने कसे उद्‌ध्वस्त केले होते, त्याची कल्पना येते.

लेनपूल म्हणतो, "गरीब आणि श्रीमंत नागरिकांवर एकाच प्रमाणात कर बसवले जात. महसूल खात्यातील वसुली अधिकारी वीस हिंदूंना एकत्र बांधत असे आणि धक्के मारून त्यांच्याकडून त्यांचे देणे वसूल करत असे. कोणत्याही हिंदू घरात सोने किंवा चांदी असण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. एवढेच नव्हे, तर थोड्या विरंगुळ्याच्या आनंदासाठी सुपारी बाळगण्यालाही प्रतिबंध होता. सरकारी नोकरी करणाऱ्या हिंदूंच्या घरातील स्त्रियांना मुसलमानांकडे घरकाम करावे लागत असे. वसुली अधिकाऱ्यांना महामारीपेक्षा भयानक समजले जाई. सरकारी लेखनिकाची नोकरी करणे हे लज्जास्पद समजले जाई. कोणताही हिंदू अशा सरकारी नोकरांशी आपल्या मुलीचे लग्न करायला तयार नसे."१०

अल्लाउद्दिन खिलजीच्या वंशजांनी सर्व हिंदुस्तानभर धर्मांतर, लुटालूट आणि अत्याचाराचे सत्र जारी ठेवले. बऱ्याच उलथापालथीनंतर ५ सप्टेंबर १३२०ला खिलजी घराण्याचा अंत झाला आणि गाझी मलिक ऊर्फ घियासुद्दिन तुघलक याने दिल्लीचे तख्त बळकावले. त्याचबरोबर हिंदुस्तानावर तुघलक घराण्याची सत्ता सुरू झाली. घियासुद्दिनने वारंगळच्या राजाला बरखास्त करून शहराचे सुलतानपूर असे नामकरण केले आणि बंगाल आपल्या वर्चस्वाखाली आणला. त्याच्या अपघाती मृत्यूनंतर महंमद-बिन-तुघलक गादीवर आला. हा अत्यंत बुद्धिमंत आणि हरहुन्नरी, पण तितकाच लहरी सुलतान होता. मंगोल आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी १३२७मध्ये त्याने आपली राजधानी देवगिरीला नेण्याचे ठरवले. त्याच्यानंतर तुघलक घराण्याचे विघटन झाले.

१३९९ मध्ये तैमूरलंग या समरकंदच्या तुर्की सुलतानाने हिंदुस्तानावर हल्ला केला आणि तीन महिने प्रचंड लुटालूट, जाळपोळ, अत्याचार आणि अमानुष हिंसेच्या सत्रानंतर तो मार्चमध्ये परत गेला. त्यानंतर दौलतखान लोदी, खिझरखान आणि बहलोलखान लोदी यांनी दिल्लीवर राज्य केले. त्याचा पुत्र निझाम खान याने आग्रा शहराची स्थापना केली. त्यानंतर त्यांच्यातील भाऊबंदकीमुळे सर्वत्र एकच गोंधळ माजला. तो पाहून लाहोरचा प्रशासक दिलावरखान याने काबूलचा तिमुरीद राजा बाबर याला हिंदुस्तानवर आक्रमण करून दिल्लीची सत्ता बळकावण्याचा सल्ला दिला.

दक्षिणेतील हिंदू राज्ये

देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य

रामचंद्र यादवाने वार्षिक खंडणी वेळेवर देण्यात कुचराई केल्यानंतर १३०७मध्ये अल्लाउद्दिनने मलिक काफूर व ख्वाजा हाजी यांच्या हाताखाली प्रचंड सैन्य पाठवून पुन्हा देवगिरीवर हल्ला चढवला. यावेळी मात्र देवगिरी लढाईविनाच त्यांच्या हातात पडली. त्या दोघांनी रामचंद्राला त्यांच्याबरोबर दिल्लीला नेऊन सुलतानापुढे उभे केले. दक्षिणेतील हिंदू राजांना नामोहरम करण्यात अल्लाउद्दिनचे साहाय्य करण्याची अट मान्य केल्यावर सुलतानाने त्याला देवगिरीस परत जाऊ दिले.

देवगिरीच्या हरपालदेव या राजाच्या अमानुष हत्येची कथा हा मुस्लीम आक्रमकांच्या पाशवी वृत्तीचा भेसूर दाखला आहे. १३११मध्ये देवगिरीचा राजा रामचंद्र याचा मृत्यू झाला आणि शंकरदेव राज्यावर आला. त्याने खिलजीबरोबर झालेला तह मानण्यास नकार दिला. त्यावर अल्लाउद्दिनाच्या आदेशावरून त्याचा वारस मलिक नाईब याने १३१३मध्ये देवगिरीवर स्वारी केली. त्याने शंकरदेवाचा पराभव करून त्याला ठार मारले; परंतु तो देवगिरीचे संपूर्ण राज्य काबीज करू शकला नाही. त्याच्या दोन वर्षांच्या वास्तव्यानंतर त्याला दिल्लीला परत बोलावण्यात आले. अल्लाउद्दिनच्या राज्यात त्यावेळी सर्वत्र बंडाळी माजली होती. त्याचा फायदा घेऊन रामचंद्राचा जावई हरपालदेव याने राजधानी काबीज केली.

५ जानेवारी १३१६ला अल्लाउद्दिन मरण पावला. अल्लाउद्दिनचा तिसरा पुत्र मुबारकशहाने सत्ता बळकावली. १३१८मध्ये तो देवगिरीवर चालून गेला. इतकी मोठी फौज चालून येत असल्याचे पाहून हरपालदेव डोंगरात पळून गेला. सुलतानाने त्याला शोधून काढून त्याला उभे चिरले आणि त्याची कातडी देवगिरीच्या प्रवेशद्वारावर लटकावण्याचे आदेश दिले.११ हरपालदेवच्या हत्येनंतर देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य खालसा करून त्याचा प्रदेश खिलजी सुलतानशाहीत समाविष्ट करण्यात आला. याबरोबरच इस्लामी सत्तेचा दक्षिण हिंदुस्तानात कायमचा प्रवेश झाला.

देवगिरीचे यादव, मदुराईचे पांड्य, वारंगळचे काकतीय आणि हलबिदूचे होयसाळ या दक्षिणेतील चार राजवटी उत्तरेच्या उदाहरणांवरून धडा शिकल्या नाहीत. जर एकवटून त्यांनी अल्लाउद्दिनचा प्रतिकार केला असता, तर दक्षिण भारत काही काळ तरी वाचला असता. त्यानंतर मात्र एकामागून एक सर्व मोठ्या आणि छोट्या दक्षिणेतील सत्तांनी दिल्ली सुलतानशाहीचे मांडलिकत्व स्वीकारले.

विजयनगर साम्राज्य

चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला एका तेलुगू आश्रिताचे पाच पुत्र विद्यारण्यस्वामी ऊर्फ माधवाचार्य या विद्वान गुरूंचे शिष्य होते. या पाच जणांपैकी हरिहर आणि बुक्कराया हे अधिक कर्तबगार होते. त्यांनी इतर तीन भावांच्या मदतीने तुघलक घराण्याच्या दक्षिणेतील सुलतानाची सत्ता उलथून टाकली. विद्यारण्य स्वामींनी त्यांना तुंगभद्रा नदीच्या तीरावर अनेगुंडी किल्ल्याच्या सान्निध्यात हंपी येथे विजयनगर साम्राज्य प्रस्थापित करण्याची प्रेरणा दिली. इस्लामी आक्रमणापासून हिंदुस्तानची पुरातन संस्कृती, सामाजिक व्यवस्था आणि हिंदू धर्माचे

संरक्षण करण्याचे त्यामागील प्रमुख उद्दिष्ट होते. विद्यारण्य स्वामी हे त्या बंधूंचे विधाते, धर्मगुरू आणि संत होते. ते शृंगेरी शारदा पीठाचे १३८० ते १३८६ या कालावधीदरम्यान जगद्‌गुरू होते. विजयनगर साम्राज्याचा विस्तार आणि भरभराट वेगाने झाली.

विजयनगर राज्याचे आद्य राजे हरिहर (पहिला) आणि बुक्क (पहिला) या दोघांनी दक्षिणेतील सर्व सत्तांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी बहामनी राज्याला शह दिला आणि दिल्लीच्या मुस्लीम राज्याच्या विस्ताराला प्रतिबंध घातला. बुक्काने १३७४मध्ये आपला वकील चीनला पाठवला. त्याच्या मृत्यूनंतर १३७८ मध्ये त्याचा पुत्र हरिहर (दुसरा) याने सम्राट ही बिरुदावली धारण केली. त्यांच्या वंशजांचा बहामनी राज्याकडून दोनदा पराभव झाला, परंतु तरीही विजयनगर साम्राज्याची भरभराट होत राहिली. त्यांनी मुस्लिमांना विजयनगरच्या सैन्यात प्रवेश दिला. सागरी सुरक्षिततेसाठी त्यांनी ‘दक्षिण समुद्राचा नियंत्रक’ हे पद निर्माण केले.

विजयनगर साम्राज्य हे दक्षिण हिंदुस्तानातील व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. इटलीचा निकोलो कोंटी (१४२०), पर्शिआचा अब्दुर रझाक (१४४३) आणि इतर पोर्तुगीज प्रवाशांनी विजयनगरची संपन्नता आणि बहुविधता यांची भरभरून वर्णने केली आहेत. एद्वार्डो बार्बोसा याने लिहिले आहे की, ‘हिरे, माणके, मसाल्याचे पदार्थ आणि रेशमी वस्त्रे यांचा विजयनगरचा व्यापार मलेशिया, ब्रह्मदेश, चीन, अरबस्तान, पर्शिया, पूर्व आफ्रिका, ॲबिसीनिया आणि पोर्तुगाल या देशांशी होत होता. नागरिक कलागुणसंपन्न होते. अनेक कवी, लेखक, तत्त्वज्ञ, इतिहासकार आणि गायक-वादक यांचा दरबारी समावेश असे. विजयनगर साम्राज्यात शिल्पकलेला लाभलेल्या राजाश्रयाचे आणि प्रोत्साहनाचे प्रमाण आजही त्या क्षेत्रातील पुरातन शिल्पकृतींत आढळते.

१५०५मध्ये गादीवर आलेला कृष्णदेवराय हा विजयनगरचाच नव्हे, तर संपूर्ण हिंदुस्तानातील सुप्रसिद्ध सम्राट होता. त्याने म्हैसूरसहित सर्व राजांना नमवले, ओरिसातील भुवनेश्वरजवळील उदयगिरी किल्ला सर केला. १५२०मध्ये त्याने इस्माइल आदिलशहाच्या राज्यावर हल्ला करून विजापूरचा प्रदेश जिंकला आणि रायचूर किल्ला जमीनदोस्त केला. त्यावेळी विजयनगरचे साम्राज्य पश्चिम सागरतीरापासून पूर्व सागरतीरापर्यंत पसरले होते. हिंदुस्तानचा दक्षिणेकडील द्वीपकल्प विजयनगर राज्याचा भाग होता.

त्यानंतर मात्र विजयनगर साम्राज्याला उतरती कळा लागली. दक्षिणेतील विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा आणि बिदर या चार सुलतानांनी आपली सैन्ये एकत्र करून २३ जानेवारी १५६५ला विजयनगरवर आक्रमण केले. रामरायाचे पाच लाखांचे सैन्य आणि त्यापेक्षा संख्येत काही पटींनी अधिक असे सुलतानांचे सैन्य तालिकोटा येथे समोरासमोर आले. सुलतानांच्या सैन्याचा केवळ संख्याबळाच्या जोरावर विजय झाला. रामराया शत्रूच्या हाती पडला आणि त्याची त्याच्या सैन्याच्या देखत अमानुषपणे हत्या करण्यात आली. त्यामुळे गर्भगळित झालेल्या विजयनगरच्या सैन्याने रणांगणावरून पळ काढला. त्यातील जवळजवळ एक लाख सैनिकांना पकडून त्यांचीही निर्दयपणे हत्या करण्यात आली. त्याचे वर्णन ‘वाटेतील सर्व नद्या-नाल्यांचे पाणी रक्ताने लाल-भडक झाले होते’, असे सापडते. विजयी सैन्यांनी

त्यानंतर राजधानीवर हल्ला चढवला. त्यांनी त्या शहरातील प्रचंड मालमत्ता, मंदिरे, राजवाडे यांची नासधूस केली आणि संपत्ती लुटली. ही लुटालूट पाच महिने चालू राहिली. त्यांनी नागरिकांच्या अमानुष हत्यांचे सत्र आरंभिले. घरामागून घरे पेटवली गेली. साऱ्या शहरात आगीचा एक डोंबच उसळला. त्यांनी इतकी संपत्ती लुटली की, 'चारही शाह्यांचा प्रत्येक सैनिक त्याला जमेल तितके सोने, हिरे-माणके, जड-जवाहीर, शस्त्रास्त्रे, घोडे आणि गुलाम बरोबर घेऊन जाऊ शकला.'

परंतु विजयनगर साम्राज्य नामशेष झाले नाही. रामरायाचा भाऊ तिरूमल याने राज्य पुनश्च उभे केले. त्यानंतर सत्तेत उलथापालथ होत राहिली. राजधानी चंद्रगिरीला हलवण्यात आली. तालिकोटच्या पराजयानंतर सर्व छोट्या राज्याचे प्रमुख 'नायक' स्वतंत्र झाले. वाडियारने आपले स्वतंत्र राज्य म्हैसूरमध्ये स्थापन केले. १६व्या शतकाच्या अखेरीस विजयनगर राज्याचा कृष्णा व तुंगभद्रा नद्यांमधील प्रदेश आदिलशाहीने जिंकला. मांडलिक राजांमधील हेवेदावे आणि महत्त्वाकांक्षांमुळे १६१४मध्ये विजयनगर साम्राज्य अखेरीस लयाला गेले.


विजयनगर हे संस्कृती, विद्या आणि सर्वधर्मसमभावाचे एक उत्तम प्रतीक होते. हिंदुस्तानातील इतर मुस्लीम राज्यांमधील अमानुषत्व, अत्याचार, बलात्कार आणि सर्व जनतेचे गुलामगिरीत झालेले परिवर्तन या स्थायिभावांचा तिथे पूर्ण अभाव होता. मुस्लीम असो व ख्रिश्चन असो, त्यांना हिंदूंप्रमाणेच वागणूक मिळे. बर्बोसाने त्यावेळी लिहून ठेवले होते, ''राजा असे स्वातंत्र्य देतो की कोणीही येऊ शकते, जाऊ शकते आणि आपल्या धर्माच्या शिकवणुकीनुसार राहू शकते. कोणालाही भीती वाटत नाही आणि तू ख्रिश्चन आहेस, का मुस्लीम आहेस, का ज्यू आहेस वा हिंदू आहेस, असे कोणीही विचारत नाही.''१२

मोगल साम्राज्य

तुर्की-मंगोल आक्रमकांनी हिंदुस्तानचा ताबा तीन टप्प्यांत घेतला. पहिल्या टप्प्यात बाबराने १५२६ ते १५३० दरम्यान अफगाण आणि राजपुतांना नमवले. दुसऱ्या टप्प्यात १५३० ते १५४०मध्ये हुमायूनने माळवा, गुजरात आणि बंगाल काबीज केले, परंतु अफगाणी सरदार शेरशहा याने त्याला काही काळासाठी पदच्युत केले. त्यानंतर सत्ता पुन्हा काबीज करून १५४५ ते १५५६च्या दरम्यान हुमायूनने मोगल सत्तेची पुनश्च स्थापना केली. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात आपल्या दीर्घ सत्ताकाळात अकबराने त्याला हिंदुस्तानव्यापी मोगल साम्राज्याचे स्वरूप दिले.१३ (नकाशा क्र. २ पाहा.)

नकाशा क्र. २

मोगल साम्राज्य



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

बाबराचे आक्रमण

बाबर हा हिंदुस्तानातील मोगल साम्राज्याचा अध्वर्यू होता. वडलांकडून तैमूरचा आणि आईकडून चंगेझखानचा वंशज असलेला बाबर चघताई तुर्की होता. केवळ अकरा वर्षांचा असताना त्याला फरघाणाच्या छोट्या राज्याचा वारसा मिळाला. आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा त्याचा प्रयत्न फसला, एवढेच नव्हे, तर त्याच्या नातलगांमुळे त्याला आपल्या राज्यालाही मुकावे लागले आणि एक वर्षभर रानावनात फिरण्याची त्याच्यावर पाळी आली. अफगाण आणि उझबेक यांच्यातील बखेड्याचा फायदा घेऊन त्याने १५०४मध्ये काबूल काबीज केले. त्यानंतर तो हिंदुस्तानकडे वळला आणि १५२४मध्ये त्याने लाहोर जिंकले.

१५२५मध्ये त्याने पंजाब काबीज केला. तो दिल्लीवर आपल्या केवळ बारा हजारांच्या, परंतु उत्तम शिक्षण दिलेल्या सेनेसह दिल्लीवर चालून गेला. वाटेत त्याची गाठ इब्राहिम लोदीच्या एक लाख संख्येच्या सैन्याशी पडली. २१ एप्रिल १५२६ला झालेल्या सुप्रसिद्ध पानिपतच्या त्या पहिल्या लढाईत बाबराने दिल्लीचा सुलतान इब्राहिम लोदी याचा पराभव केला. हे बाबराच्या तडफदार घोडदळामुळे आणि त्याच्याकडील तोफांच्या संचामुळे घडू शकले. त्याने बरोबर वेगवेगळ्या दर्जाच्या तोफा आणल्या. त्यांपैकी विशेषत: दोन प्रचंड तोफा 'मुखभरण' (मझल लोडिंग) प्रकारच्या होत्या. त्यात घातले जाणारे तोफगोळे २२५ आणि ३१५ पौंड वजनाचे होते. त्याच्यात ५४० पौंडांचे दगडी गोळेसुद्धा घातले जात. या अजस्र तोफांना ओढण्यासाठी अनेक बैलांची गाडी लागत असे. बाबराने ह्या महाकाय तोफा आणि तोफगोळे खैबरखिंडीतून कशा आणल्या, हीच आश्चर्याची बाब आहे. केवळ त्यांच्यामुळेच तो इब्राहिम लोदीला हरवू शकला. उस्ताद अली कूली हा बाबराच्या तोफखान्याचा प्रमुख होता. तो स्वत: एक कसलेला आणि अनुभवी तोपची होता.

बाबराचे डावपेच हे त्याच्या विजयाचे प्रमुख गमक होते. त्याने इब्राहिमच्या सैन्यावर बाजूने जाऊन हल्ला करण्यासाठी 'तुल्घुमा' नावाच्या तुकडीचा प्रयोग केला. या स्वल्प संख्येच्या घोडदळी तुकडीने तिची गतिक्षमता, लवचीकता, प्रहारक्षमता, धक्कादायकता आणि विस्मयकारकता या पाच गुणवत्तांकरवी शत्रूच्या मंद गतीच्या आणि प्रचंड संख्येच्या पायदळाची गाळण उडवली. हा डावपेच लोदीच्या सैन्याला परिचित नव्हता. बाबराने पानिपतची लढाई जिंकण्याची प्रमुख दोन कारणे म्हणजे तुल्घुमा आणि त्याचा तोफखाना, विशेषकरून दोन अजस्र तोफा. त्यानंतर तोफखाना हा मोगल सैन्याचा कायमचा हुकमी एक्का ठरला. इब्राहिम लोदी लढाईत ठार झाला आणि बाबराने दिल्ली व आग्रा या प्रमुख शहरांचा ताबा घेतला.

त्यानंतर बाबराला एका बाजूला अफगाण सेनापती आणि दुसऱ्या बाजूला राणा संग या पराक्रमी राजपूत राजाशी सामना द्यावा लागला. परवशतेच्या वाटचालीतील हा दुसरा पाणलोट.

१७ मार्च १५२७ रोजी आग्र्याच्या पश्चिमेस कनवा येथे झालेल्या घमासान लढाईत बाबराने राणा संगाच्या सैन्याला पराभूत केले. त्यायोगे मोगल साम्राज्याचे बीज हिंदुस्तानात कायमचे

रोवले गेले. याचा लष्करी परामर्श पुढे घेण्यात आला आहे. त्यानंतर खंड पडू न देता इतर अफगाण सरदारांचा पाटणा येथे ६ मे १५२९ला त्याने पराभव केला. अशा प्रकारे पंजाबवरील एका साध्या मोहिमेचे रूपांतर बाबर हिंदुस्तानचा शहेनशहा बनण्यात झाले. त्यावेळी त्याचे साम्राज्य ओक्षस ते बंगाल आणि हिमालय ते ग्वाल्हेरपर्यंत पसरले होते. दुर्दैवाने याचा उपभोग घेणे त्याच्या नशिबात नव्हते. २६ डिसेंबर १५३० रोजी बाबराचे आग्रा येथे निधन झाले.

बाबर तसा एक 'मुकद्दर का सिकंदर' होता. आपल्या साम्राज्याचे कोणतेही व्यवस्थापन करण्यास, त्याचे वेगवेगळ्या प्रांतांत विभाजन करण्यास किंवा कायदेकानू, आर्थिक आणि राजकीय प्रशासनाचा आराखडा बनवण्यास त्याला कधीच वेळ मिळाला नाही. असाहाय्य लोकांची कत्तल आणि गावेच्या गावे उद्ध्वस्त करण्यात त्याला एक वेगळाच आनंद लाभत असे, परंतु स्वत: तो एक उत्तम कवी तसाच संगीत व कलांचा भोक्ता होता. मंगोलांची ऊर्जा, तुर्कीचे चातुर्य आणि मुस्लिमांचा कडवट एकेश्वरवाद या तिन्हींचे बाबर हे एक अजब रसायन होते.

हुमायूनची कारकीर्द

सर्व बाजूंनी आव्हानांनी घेरला गेलेला बाबराचा पुत्र हुमायून त्यानंतर काटेरी सिंहासनावरच बसला. तसा तो पित्याइतका कर्तबगारही नव्हता. त्याचे तीन भाऊ आणि इतर काहीजण सिंहासनाचे दावेदार होते. प्रत्येकाला त्याने वेगवेगळ्या परगण्याचे प्रशासक म्हणून नेमले. अफगाण सरदारांविरुद्ध त्याने छोटे-मोठे विजय मिळवले. गुजरातच्या बंडखोर बहादुरशहाविरुद्ध त्याने यशस्वी मोहीम काढली. अफगाण उमरावांनी शेरखान सूरी या कर्तृत्ववान आणि तडफदार सरदाराच्या नेतृत्वाखाली हुमायूनविरोधी फळी उभारली. जून १५३९ रोजी मोगल आणि अफगाण यांच्यामध्ये गंगा नदीच्या किनाऱ्यावर बक्सरजवळ चौंसा येथे झालेल्या लढाईत मोगलांचा पराभव झाला. पुढच्या वर्षी हुमायून पुन्हा शेरखानावर चालून गेला. १७ मे १५४०ला कनौजजवळ झालेल्या लढाईत पुन्हा त्याचा पराभव झाला. पुढील पंधरा वर्षे हुमायून लाहोरजवळ रानोवनी भटकत राहिला.

त्यापश्चात शेरखान कनौजपासून आसामपर्यंत आणि हिमालयापासून बंगालपर्यंत पसरलेल्या राज्याचा अधिपती झाला. त्याने शेरशहा सूरी असे नाव धारण केले. पंजाब, माळवा, राजपुताना, मारवाड अशा दूरवर मोहिमा काढून त्याने आपल्या राज्याचा विस्तार केला. शेरशहा एक उत्तम प्रशासक होता. राज्यव्यवस्थापनातील त्याचे कौशल्य वाखाणण्याजोगे होते. त्याच्या अवघ्या पाच वर्षांच्या सत्ताकाळात त्याने अनेक सुधारणा घडवल्या. त्याने हिंदू अधिकाऱ्यांना पद्धतशीरपणे जबाबदारीची कामे देऊन सर्वांचा सहभाग असलेले आणि सर्वांच्या आवडीचे सरकार चालवले. सुनियोजित महसूलपद्धती आखून ती अमलात आणली. त्याच्या शेतजमिनीविषयक काही सुधारणा आजतागायत प्रचलित आहेत. त्याने उत्तर हिंदुस्तानात संलग्न रस्त्रयांचे जाळे बांधण्याचे काम हाती घेतले. अजूनही अस्तित्वात असलेला कलकत्ता-वाराणसी-दिल्ली आणि लाहोर जोडणारा सुप्रसिद्ध ग्रँडट्रंक रोड ही त्याची देणगी आहे. आपल्या पाच वर्षांच्या अल्प काळात शेरशहाने जनतेला चांगले प्रशासन दिले; परंतु त्याची

सत्ता अल्पकाळच टिकली. २२ मे १५४५ला एका स्फोटात तो ठार झाला.

त्याच्या अपघाती मृत्यूनंतर निर्माण झालेल्या यादवी परिस्थितीचा हुमायूनने फायदा घेतला. त्याने एका पर्शियन स्त्रीशी लग्न केले होते. तिच्यापासून अकबर हा पुत्र २३ नोव्हेंबर १५४२ रोजी जन्मला होता. शिया पंथ स्वीकारण्याच्या अटीवर पर्शियाचा शहा तहमस्प याने हुमायूनला १४,००० सैनिकांचे लष्कर दिले. त्याच्या सहाय्याने त्याने १५४५मध्ये काबूल आणि कंदाहार घेतले. आपल्या भावांची वासलात लावून १५५५मध्ये त्याने लाहोर घेतले आणि त्याच वर्षी दिल्ली व आग्रा काबीज केले. २४ जानेवारी १५५६ रोजी आपल्या वाचनगृहात जिन्यावरून पडून त्याचा मृत्यू झाला. तेरा वर्षांच्या अकबराचा सांभाळकर्ता आणि गुरू बैराम याने कोणताही वेळ न गमावता हिंदुस्तानचा बादशहा म्हणून अकबराच्या नावाची घोषणा केली.

अकबराचे साम्राज्य

यावेळी हिंदुस्तानातील राजकीय परिस्थिती पुनश्च अस्थिर झाली होती. मोगलांचे वर्चस्व नाहीसे झाले होते. छोट्या-मोठ्या सत्ता स्वायत्त झाल्या होत्या. एका भयानक दुष्काळाने साऱ्या उत्तर भारताला घेरले होते. पोर्तुगीजांनी गोवा आणि दीवमध्ये बस्तान बसवले होते. अफगाणांनी हिंदुस्तानचा बराच प्रदेश व्यापला होता. अकबराच्या हिंदुस्तानवरील दाव्याला अनेक आव्हाने निर्माण झाली होती.

आदिलशहा सूरीचा महत्त्वाकांक्षी आणि चातुर्यवान मंत्री हिंदू राजा हिमू मोठ्या संख्येची सेना आणि १५०० हत्तींसह मोगलांवर चालून आला. त्याने दिल्ली आणि आग्र्याचा ताबा घेतला. त्याच्या सैन्याची आणि अकबराच्या लष्कराची गाठ पानिपतमध्ये पडली. तिथे ५ नोव्हेंबर १५५६ला पानिपतची दुसरी लढाई झाली. एका वेळी लढाईचे पारडे हिमूच्या बाजूला झुकू लागले होते, परंतु अचानक एक बाण हिमूच्या डोळ्यात घुसला. तो बावचळला आणि तेवढ्यात मारलाही गेला. त्याच्या सैन्यात एकच गदारोळ माजला आणि सारे सैन्य दाही दिशांना पांगले. तो निकाली बाण अकबराने मारला की बैरामाने, हे इतिहासातील एक गूढ आहे. विजयी सेनेने तातडीने दिल्ली आणि आग्र्याचा ताबा घेतला.

पानिपतची दुसरी लढाई हा हिंदुस्तानच्या इतिहासातील लक्षणीय प्रसंग ठरला. तिच्यामुळे हिंदुस्तानात मोगल सत्तेचा भक्कम पाया रोवला गेला. त्यानंतर अकबराने आपले नात्यागोत्यांचे सर्व पाश तोडले. बैरामखानला मक्केस पाठवले आणि वाटेत त्याचा खून झाला. लहानपणी अकबराला त्याची दाई महम अनगा हिचा अत्यंत लळा होता. तिचा पुत्र आदमखान याच्यावर अकबराची मर्जी होती. आदमखानाने १५६१मध्ये माळव्यात काढलेल्या मोहिमेदरम्यान अमाप अत्याचार केले. अकबराने त्याचा खून करवला आणि त्याची आई अनगा पुत्रवियोगाच्या दु;खाने लवकरच मरण पावली.

अकबराने अखंड मोहिमांकरवी शत्रूंना नामोहरम करून त्यांची राज्ये आपल्या साम्राज्यात विलीन करण्याचा सपाटा लावला. पराक्रमी राजपूत राजांशी मात्र युती करून त्यांना आपले मांडलिक बनवण्यावर त्याचा जोर होता. अनेक राजपुतांची त्याने दरबारात मोठ्या मुलकी पदांवर व सैन्याच्या अधिकारपदांवर नेमणूक करून त्यांचा विश्वास संपादला आणि त्यांच्याशी

कायमची जवळीक साधली. त्यांच्यातील एकानेच मोगलांचे मांडलिकत्व पत्करण्यास नकार दिला. १८ जून १५७६ रोजी मोगल आणि मेवाडचा राणा प्रताप यांच्यात हळदीघाटीची लढाई झाली. त्या लढाईला जरी पाणलोट म्हणता येणार नाही, तरी परवशतेविरुद्ध प्रज्वलित झालेला तो एक रोमांचकारी अंगार होता. त्या लढाईचा परामर्श पुढे घेण्यात आला आहे.

बाबर आणि हुमायूनला राज्यकारभाराची घडी नीट बसवण्यास वेळ मिळाला नाही. अकबराने मात्र आपल्या चार दशकांच्या सत्ताकाळात राज्यकारभाराची घडी नीट बसवली. त्याने मोगल साम्राज्य १५ सुभ्यांत आणि वेगवेगळ्या परगण्यांत वाटले. मनसबदारीची आणि जहागिरीची पद्धत चालू केली. जरी मुसलमानांना धर्मानुसार मालमत्तेवर वांशिक अधिकार मिळू शकत नसत, तरी हिंदूंना मात्र त्याने पारंपरिक मालमत्तेवर हक्क उपलब्ध करून दिले.

अकबराने चितोड, गुजरात, काबूल, काश्मीर, सिंध, बलुचिस्तान आणि इतर प्रदेश काबीज केले. त्यानंतर दख्खनच्या दिशेने त्याने आपला मोहरा वळवला. त्याची दोन उद्दिष्टे होती : पहिले, अहमदनगर, गोवळकोंडा, विजापूर आणि खानदेशच्या सुलतानशाह्यांना नमवून आपल्या वर्चस्वाखाली आणणे आणि दुसरे, पोर्तुगीजांच्या वाढत्या प्रभावाला अटकाव घालणे. अहमदनगरच्या पराक्रमी आणि धैर्यशील चांदबीबीने मोगलांना कसून विरोध केला. शेवटी तिचा विश्वासघाताने खून झाल्यावरच इ.स. १६००मध्ये मोगलांनी त्या शहराचा ताबा घेतला. त्यानंतर अकबर खानदेशकडे वळला. त्याची राजधानी बुऱ्हाणपूर घेतल्यावर असीरगड किल्ल्याला त्याने वेढा घातला. तो जिंकण्यासाठी त्याला सहा महिने लागले. अकबराचा हा शेवटचा विजय होता. मे १६०१ मध्ये तो आग्र्याला परतला. त्यानंतर त्याचा मुलगा सलीम याने त्याच्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला, परंतु शेवटी त्यांच्यात समेट झाला. १७ ऑक्टोबर १६०५ रोजी अकबराचा अतिसाराने मृत्यू झाला.

अकबराची आई शिया धर्माच्या व सूफी पंथाच्या एका विद्वानाची कन्या असल्यामुळे त्याच्या पूर्वजांइतका किंवा इतर सुन्नी अरब, तुर्की व मंगोलांप्रमाणे तो मूलतत्त्ववादी नव्हता. तो कला आणि साहित्याचा भोक्ता होता. त्याचे विचार उदारमतवादी होते आणि सर्व धर्मांबद्दल त्याला आदर होता. त्याचाच परिणाम म्हणून की काय, त्याने सर्व धर्मांच्या सकारात्मक सहिष्णुतावादी शिकवणुकींचे संमिश्रण साधून 'दीनेइलाही' नावाच्या एका नव्या धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. तो एक देखाव्याचा भाग होता, असे काही इतिहासकारांचे मत आहे; किंबहुना त्याला त्याच्याच धर्मीयांकडून कडवट विरोध झाला आणि अकबराबरोबरच ती संकल्पना लयास गेली.

मोगल साम्राज्याचा दक्षिणेत विस्तार

जहांगीर (१६०५-१६२७) सिंहासनावर आल्यावर त्याचा पुत्र खुस्रव याने त्याच्याविरुद्ध बंड केले. ते खुडून टाकण्यात त्याला सहज यश मिळाले. त्यानंतर खुस्रवला मदत करणाऱ्या सर्वांना जहांगीरने संपवले. त्यात शिखांचे गुरू अर्जनसिंग यांचाही समावेश होता. त्यामुळे जहांगीरने शीख धर्मीयांचे कायमचे शत्रुत्व ओढवून घेतले. त्याच्या सत्ताकाळात हिंदुस्तान आणि युरोपदरम्यान नवे संबंध प्रस्थापित झाले. जहांगीरने अनेक लढाया जिंकल्या.

बंगालमधील अफगाणांचे बंड त्याने १६१२मध्ये खुडून टाकले. प्रत्येक संघर्षानंतर प्रतिस्पर्धीयांशी त्याने सामोपचाराने वागून बऱ्याच शत्रूंचे मित्रांत रूपांतर केले.

जहांगीरनेही दख्खनविरुद्ध मोहिमेवर आपला शहजादा खुर्रम याला पाठवले. त्याचा सामना अहमदनगर राज्याचा पंतप्रधान मलिक अंबर या अत्यंत कर्तबगार आणि लोकाभिमुख प्रशासकाशी झाला. अखेरीस खुर्रमने अहमदनगर शहराचा ताबा घेतला. त्याच्यावर खूष होऊन जहांगीरने त्याला 'शहाजहान' (विश्वाचा अधिपती) असा किताब दिला. या मोहिमेमुळे मोगल साम्राज्याच्या दक्षिण सीमेमध्ये फारसा काही फरक पडला नाही. जहांगीर व शहाजहान यांच्यामध्ये कंदाहार मोहिमेत नूरजहानच्या कपटी कारवायांमुळे वितुष्ट आले आणि शहाजहानने आपल्या पित्याविरुद्ध बंड केले. त्यात महाबतखान नावाच्या सरदाराकरवी शहाजहानने जहांगीर आणि नूरजहान या दोघांनाही काही काळ तुरुंगात टाकले. जहांगीर १६ ऑक्टोबर १६२७ रोजी मरण पावला.

त्यावेळी शहाजहान दख्खनमध्ये होता. त्याचा धाकटा भाऊ शहरीयार याने नूरजहानच्या चिथावणीवरून लाहोरमध्येच स्वत:ला सम्राट घोषित केले. शहाजहान दक्षिणेतून वेगाने परत आला. आपल्या भावाच्या सैन्याचा पराभव करून त्याने त्याच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना यमसदनास पाठवले आणि फेब्रुवारी १६२८मध्ये शहाजहान तख्तावर बसला. १६२८ ते १६५८ ही तीस वर्षे त्याने हिंदुस्तानावर राज्य केले.

अफगाण वंशाचा राजपुत्र खानजहान लोदी याला अहमदनगरचा राजा आणि अनेक मराठा व राजपूत सरदारांचा पाठिंबा होता. त्याचा शहाजहानने पराभव केला आणि त्याला व त्याच्या दोन्ही मुलांना ठार मारले. बंगालमध्ये पोर्तुगीजांचा प्रभाव वाढत चालला होता. हिंदू आणि मुस्लीम मुलांना पकडून त्यांचे धर्मांतर करण्याचे सत्रच त्यांनी चालवले होते. शहाजहानने बंगालच्या प्रशासकाकडून पोर्तुगीजांच्या हुगळीमधील मालमत्तेचा विध्वंस करवला. मोगलांनी हिंदुस्तानातील हिंदू जनतेवर अमानुष अत्याचार करून त्यांचे धर्मपरिवर्तन करावे, परंतु पोर्तुगीजांनी हिंदूंबरोबर मुसलमानांचेही केलेले धर्मपरिवर्तन शहाजहानला पटू नये; हा दुटप्पीपणा तिरस्करणीय होता. त्याने आपले राजपुत्र दारा, मुराद आणि औरंगझेब यांना कंदाहार, बल्ख आणि बदकशा घेण्यासाठी वेगवेगळे पाठवले; परंतु कोणालाच यश आले नाही.

शहाजहानला दक्षिणेत मात्र अधिक यश आले. कपटनीतीचा वापर करून त्याने १६३६मध्ये खानदेश, वऱ्हाड, तेलंगण आणि दौलताबाद घेतले. त्याचा पुत्र औरंगजेबाने गोवळकोंडा आणि विजापूरवर विजय मिळवले. शहाजहान सप्टेंबर १६५७मध्ये आजारी पडला. त्याच्या शेवटच्या दिवसांत त्याचे चार पुत्र दारा शिकोह, शुजा, औरंगजेब व मुराद यांच्यातील यादवीने त्याला घेरले. औरंगजेब सर्वांच्यात बलवत्तर ठरला. त्याने आपल्या पित्याला अंधारकोठडीत डांबले आणि स्वत:ला २१ जून १६५८ रोजी बादशहा घोषित केले. मग त्याने आपल्या तिन्ही भावांची अत्यंत अमानुषपणे एकामागून एक वासलात लावली. बादशहा शहाजहानने पुढील आठ वर्षे त्याची कन्या जहाँआरा हिच्या सान्निध्यात आग्र्याच्या लाल किल्ल्यात तुरुंगवासातच घालवली आणि तो १६६६ मध्ये निवर्तला.

औरंगजेबाने स्वत:च तीन किताब धारण केले : आलमगीर (जगज्जेता), पादशहा (सम्राट)

आणि गाझी (जिहादचा नेता). औरंगजेबाचा कार्यकाल (१६५८-१७०७) प्रामुख्याने दोन कालखंडांत वाटता येतो. प्रथम १६५८ ते १६८१ दरम्यान तो प्रामुख्याने उत्तरेतच राहिला. अहोम जमातीचे लोक मंगोल वंशाचे. तेराव्या शतकानंतर त्यांनी ब्रह्मपुत्रा खोऱ्यावर ताबा मिळवला होता आणि काळानुसार त्यांचे हिंदूंमध्ये परिवर्तन झाले होते. १६५८मध्ये त्यांनी गुवाहाटी जिंकले. औरंगजेबाने आपला सेनापती मीर जुमला याला तिथे पाठवून त्यांना नमवले. परंतु १६६३मध्ये मीर जुमला मरण पावल्यानंतर अहोम राजांनी त्या प्रदेशावर पुन्हा ताबा मिळवला. आफ्रिदी, खट्टक आणि पठाण जमातीच्या म्होरक्यांनी केलेले बंड शमवण्यासाठी औरंगजेबाला स्वत: जातीने जावे लागले.

औरंगजेबाच्या कडव्या परधर्मद्वेषामुळे तो जनतेच्या, विशेषकरून मुस्लिमेतरांच्या, घृणेला पात्र ठरला. १६७९मध्ये त्याने 'काफरांवर' (अश्रद्ध) जिझिया नावाचा जाचक कर पुन्हा लावला. मुस्लीम अल्पसंख्याक असलेल्या हिंदुस्तानसारख्या विविधधर्मी देशात केवळ मुस्लिम धर्माच्या रीतीरिवाजांना प्राधान्य देऊन औरंगजेबाने घोडचूक केली. त्याच्यानंतर मोगल साम्राज्य कोसळू लागण्याचे ते एक प्रमुख कारण ठरले. त्याच्याविरुद्ध मथुरेच्या जाटांनी बंड केले आणि बुंदेलखंडात छत्रसाल राजपुत्राने स्वातंत्र्यलढा उभारला. परंतु दख्खनमध्ये छत्रपती शिवाजीराजांनी केलेला कडवा संघर्ष हे औरंगजेबाच्या ऱ्हासाचे आणि अंतिम पराभवाचे प्रमुख कारण ठरले.

परवशतेविरुद्ध रणकंदन

स्वत्व हरवलेल्या हिंदुस्तानातील इतर भागांतील नागरिकांच्या तुलनेत राजपूत आपल्या उल्लेखनीय लष्करी बाणा आणि अलौकिक धैर्यामुळे उठून दिसत. त्यांच्यातील प्रत्येक पुरुष हा अजिंक्य क्षत्रिय असेच, परंतु स्वत:ला अभिमानाने राजपूत म्हणजे 'राजाचा पुत्र' म्हणवत असे. आपला सन्मान व स्वत्व अबाधित राखण्यासाठी युद्ध हे राजपुतांसाठी जीवनाचे अंतिम ध्येय असे. तो त्यांचा धर्म, त्यांची महत्त्वाकांक्षा आणि आयुष्याचा मथितार्थ असे. विल ड्युरंट हा सुप्रसिद्ध इतिहासकार राजपुतांचा 'भारताचे समुराई' या बिरुदावलीने उल्लेख करतो. मध्ययुगीन काळात ब्रिटनमध्ये शौर्य, पराक्रम आणि आपल्या तत्त्वाच्या रक्षणासाठी प्राणार्पणाची परंपरा होती. त्यामुळे त्या काळाला 'वीरश्रीचे युग' ('एज ऑफ शिव्हल्री') असे म्हणत. ड्युरंट राजपुतान्यातील त्यावेळच्या काळाचा 'एज ऑफ शिव्हल्री' असा गौरव करतो.१४ शौर्य, स्वाभिमान, सभ्यपणा, औदार्य, निष्ठा, दया, न्यायीपणा, स्त्रीदाक्षिण्य, मुले-असाहाय्य-दुर्बल यांच्याविषयी करुणा, पुरुषार्थ आणि क्षत्रियत्व या विविध गुणांनी संपन्न अशा राजपुतांचा हा सुवर्णकाळ होता. या लष्करी तेजामुळे त्यांनी मुस्लीम आक्रमकांचा जिद्दीने विरोध केला आणि रणांगणावर आपल्या रक्ताने अमर व रोमांचकारी गाथा कोरल्या. चितोडची अमर गाथा त्यांतील परमोच्चांक.

पृथ्वीराज चौहान आणि महंमद घोरी यांच्यातील द्वंद्व

पश्चिमेकडून भारतात प्रवेश करण्यासाठी सुलेमान पर्वतराजीत वेगवेगळ्या खिंडी उपलब्ध

होत्या. त्यांतील सर्वपरिचित म्हणजे खैबर खिंड. परंतु त्यातून प्रवेश करताना खिंडीच्या परिसरात राहणाऱ्या अनेक जमातींच्या विरोधाला तोंड द्यावे लागे. त्यामुळे सर्वसाधारणपणे हिंदुस्तानात येऊ इच्छिणारे आक्रमक खुश्कीलच्या मार्गाचाच अवलंब करीत असत आणि कमी त्रासाच्या गोमल खिंडीतूनच येत असत. तिथून आल्यावर पहिला तळ डेरा इस्माईलखान व नंतर मुलतानमध्ये पडे.

घोरीने हिंदुस्तानावर क्रमाक्रमाने आक्रमण केले. पहिली स्वारी त्याने ११७६ मध्ये केली. त्यावर्षी त्याने मुलतान काबीज केले. त्यानंतर ११७९मध्ये पेशावर, ११८५मध्ये सियालकोट, ११८६ मध्ये लाहोर. त्याचे पुढचे उद्दिष्ट होते दिल्ली. पृथ्वीराज चौहान दिल्लीवर राज्य करत होता. त्याची राजधानी अजमेरला होती. सध्याच्या राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशाचा इलाखा त्याच्या राज्याचा भाग होता. पृथ्वीराजचा जन्म ११६५ झाला होता आणि वयाच्या चौदाव्या वर्षीच त्याला राजेपदाची प्राप्ती झाली होती. कनौजचा जयचंद याने आपली कन्या संयोगिता हिच्या स्वयंवराला पृथ्वीराजला आमंत्रण दिले नव्हते आणि पृथ्वीराजने स्वयंवराच्या मंडपामधून संयोगितेचे हरण केले होते, ही कथा सुपरिचित आहे. त्यामुळे जयचंद पृथ्वीराजावर सूड घेऊ इच्छीत होता. राजा घोरीने गुजरातवर जेव्हा स्वारी केली, तेव्हा गुर्जराधिपती मूळराजाच्या मदतीला तो गेला नाही. त्याचा पंतप्रधान कादंबवास याने त्याला सल्ला दिला की, घोरीने मूळराजाचा काटा काढला, तर ते राज्यासाठी उपकारक ठरेल. त्या लढाईत मूळराजाने घोरीचा पराभव केला. अशा प्रकारे पृथ्वीराजचे काही हितशत्रू होते. ते त्याच्या विरुद्ध जातील, हे स्वाभाविक होते.

११९१मध्ये घोरीने दिल्लीच्या वायव्येला १८० मैलांवर असलेला भटिंडा किल्ला जिंकला. तिथे काझी झियाउद्दिन नावाचा किल्लेदार १२०० घोडदळासह ठेवून तो परत वळला. आपल्या सीमेवर असलेला हा किल्ला परत घेण्यासाठी पृथ्वीराज दोन लक्ष घोडेस्वार व ३००० हत्ती घेऊन भटिंड्याच्या दिशेने तातडीने रवाना झाला. ते ऐकून घोरी परत वळला आणि दिल्लीच्या उत्तरेला कर्नालजवळील तरोरी येथे पोचला. सैन्याच्या प्रचंड संख्येच्या दबावाखाली युद्ध जिंकणे ही पृथ्वीराजची प्रमुख रणनीती होती. पृथ्वीराजने आपले गजदळ मध्यभागी ठेवले होते. त्याच्या दोन्ही बाजूंना घोडदळ होते आणि पाठीमागे पायदळ होते. घोरीपाशी मात्र फक्त घोडदळ होते.

दोन्ही सैन्यांत १३ नोव्हेंबर ११९१ला लढाई जुंपली. पृथ्वीराजने दोन्ही बगलांनी घोरीवर हल्ला चढवला. त्याने गजदळाचा ऐरणीसारखा उपयोग करून घोरीच्या सैन्याला अडवले आणि दोन्ही बाजूंनी घोडदळाचा हातोड्यासारखा उपयोग करून घोरीच्या सैन्यावर घणाघाती प्रहार केला. या प्रचंड बळाच्या आघाताखाली घोरीचे सैन्य चेचून गेले. तरीही घोरी लढत राहिला. परंतु अचानक तो जखमी झालेला पाहून एका सरदाराने त्याला रणांगणातून बाहेर नेले. तो रणांगण सोडून गेल्याचे पाहिल्यावर सैन्यातील काही सरदारांनी पळ काढला आणि सैन्याने गझनीकडे माघार घेतली. पृथ्वीराजच्या सैन्याचा निर्णायक विजय झाला होता. ही दोघांमधील तरोरीची पहिली लढाई होती.१५

महंमद घोरी गझनीला परत पोचल्यावर लढाईत झालेल्या जबर जखमांतून बरे होण्यास बराच

वेळ लागला. परंतु पृथ्वीराजला रणांगणावर पराभूत करण्याचा त्याने निर्धार केला. त्याची त्याने जोमाने तयारी सुरू केली. पळून गेलेल्या सर्वांना त्याने सजा दिली. एक लाख वीस हजार स्वारांच्या घोडदळावर आधारित सैन्य त्याने उभारले. लाहोरहून त्याने पृथ्वीराजला निरोप पाठवला, 'मुसलमान हो वा लढाईस तयार हो'. पृथ्वीराजने त्याला आपण युद्धास तयार असल्याचे बाणेदार उत्तर पाठवले. त्याने सर्व राजपूत राजांना एकत्र व्हायचे आवाहन केले. त्यानुसार एकूण दीडशे राजपूत राजे, तीन लक्ष घोडदळ, तीन हजार हत्ती आणि मोठे पायदळ पृथ्वीराजाच्या झेंड्याखाली एकत्र झाले. 'आमच्याकडे मोठे सैन्य आहे. शस्त्रसंधी करण्यास तयार हो', असे पत्र घोरीला धाडण्यात आले. घोरीने त्यांची दिशाभूल करण्यासाठी आपण शस्त्रसंधी करावयास तयार असल्याचे उत्तर दिले. त्याचा अपेक्षित परिणाम झाला. घोरी घाबरला आहे, अशी राजपुतांची समजूत होऊन ते हलगर्जी झाले.

घोरीने पृथ्वीराजच्या बळाचा सामना युक्तीने करायचे ठरवले. पृथ्वीराजच्या सैन्यात दिवसेंदिवस वाढ होत होती. त्यासाठी तातडीने हल्ला चढवून पृथ्वीराजवर यावेळी निर्णायक विजय मिळवणे महत्त्वाचे होते. ११९२मध्ये घोरी आणि पृथ्वीराजच्या सैन्यांमध्ये दुसरी लढाई जुंपली. घोरीने गजदळ आणि इतर जड सामान मागे ठेवले आणि केवळ घोडदळ घेऊन पृथ्वीराजाच्या सैन्यावर भल्या पहाटे अचानक स्वारी केली. बेसावध सैन्यावर हल्ला चढवल्यावर आपण त्याला कापून काढू, हा घोरीचा होरा चुकीचा ठरला. आरंभी जरी गोंधळ माजला, तरी लवकरच संघटित होऊन राजपुतांनी घोरीच्या सैन्याला माघार घेण्यास भाग पाडले.

त्यानंतर घोरीने आपली रणनीती बदलली आणि 'डावपेची माघारी'चे तंत्र अवलंबण्याचे ठरवले. त्याने घोडदळ पाच भागांत वाटले; चार भाग प्रत्येकी दहा हजार घोडेस्वारांचे आणि एक भाग राखीव बारा हजार घोडेस्वारांचा चिलखतधारी. तंत्र थोडक्यात असे होते: पहिल्या तुकडीने हल्ला चढवायचा, परंतु हातघाईची लढाई टाळायची. शत्रू पाठलाग करू लागल्यावर माघार घ्यायची. मग दुसऱ्या दोन तुकड्यांनी चालून आलेल्या शत्रूवर बगलांच्या बाजूंनी हल्ला चढवायचा. शत्रूचे सैन्य थकून परत जाऊ लागल्यावर पुन्हा हल्ला, पुन्हा डावपेची माघार व पुन्हा बगलेच्या बाजूने हल्ला. शेवटी राजपूत सैन्य दमल्यावर संध्याकाळच्या सुमारास नव्या दमाच्या राखीव चिलखती दलाने अंतिम हल्ला चढवायचा.

घोरीने हे तंत्र पुनश्च हल्ला चढवून काटेकोरपणे अमलात आणले. संध्याकाळपर्यंत थकलेल्या सैन्याची तुर्कांनी कापाकापी सुरू केली. अनेक राजपूत सेनापती मारले गेले. पृथ्वीराजही मारला गेला. त्यानंतर दिल्लीचा मार्ग मोकळा झाला आणि दिल्लीला तुर्की राजवट सुरू झाली. हिंदूंचे प्रमुख दोष म्हणजे संख्याबळावर अनावश्यझक निर्भरता, निकृष्ट युद्धनेतृत्व आणि निरुपयोगी गजदळाचे जीवघेणे लोढणे. त्याउलट लोदीच्या विजयाची प्रमुख कारणे म्हणजे बुद्धिमान नेतृत्व, घोडदळाचा आक्रमक आणि चाणाक्ष वापर, चातुर्यपूर्ण युद्धतंत्र आणि राखीव दलाचा परिणामकारक उपयोग.१६

महाराणा संगाचे अद्वितीय शौर्य

राजपूत इतिहासात महाराणा संग ही असामान्य व्यक्ती होऊन गेली. परकीय शासन उखडून टाकून त्या जागी दिल्लीला हिंदुपदपादशाही पुन्हा स्थापन करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. ज्येष्ठ बंधू पृथ्वीराज याने रागाच्या भरात केलेल्या प्रहारामुळे त्याचा एक डोळा तरुणपणीच निकामी झाला. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी १५०८मध्ये राणा संग मेवाडचा राजा झाला. मेवाडच्या राज्याभोवती मुसलमानी राज्यांचे कडे होते. दिल्लीला इब्राहिम लोदी, माळव्यात खिलजी आणि दक्षिणेस गुजरातमध्ये मुजफ्फर शहा या सुलतानांचे राज्य होते. या तिघांशीही त्याचा संघर्ष झाला. प्रथम त्याने मुझफ्फर शहाला पराभूत केले. राणा संग आपल्यावर स्वारी करण्याच्या विचारात आहे, अशी बातमी इब्राहिम लोदीला मिळाल्यावर त्याने मोठ्या फौजेनिशी राणावर स्वारी केली. खटोली येथील झालेल्या लढाईत इब्राहिमच्या सैन्याचा पराभव झाला आणि त्याला पळ काढावा लागला. परंतु त्या लढाईत संगाचा एक हात तुटला व पायाला जबर इजा होऊन तो लंगडा झाला. एका डोळ्याने अंध, एका हाताविना आणि पायाने पंगू अशा राजाला सिंहासनावर बसायचा अधिकार नाही, या विचाराने तो राजसंन्यास घ्यावयाचा विचार करीत होता; परंतु दरबारी उमराव आणि मांडलिक राजांनी या जखमा युद्धात झाल्या असल्याने त्याला सिंहासनावरून पायउतार न होण्याची गळ घातली.

खटोलीच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी इब्राहिम लोदीने राणा संगावर पुन्हा स्वारी केली. धोलपूर येथे झालेल्या संग्रामात इब्राहिम लोदीचा पुन्हा पराभव झाला. त्यानंतर संगाचा मांडलिक राजा मेदिनी रायवर महंमद खिलजीने आक्रमण केल्यावर राणा संगाने माळव्यावर स्वारी केली आणि महंमद खिलजीचा पाडाव करून त्याला कैद केले. परंतु उदार राजपुतांनी महंमदाला सन्मानाने वागवून त्याचे राज्य त्याला परत दिले. त्यानंतर गुजरातच्या मुझफ्फर शहाचा त्याने पुन्हा एकदा पराभव केला. इब्राहिम लोदीचा दोनदा पराभव करूनही त्याला दिल्लीच्या सिंहासनावरून हुसकण्याचे काम मात्र राणाला जमले नव्हते.

पानिपतच्या रणांगणावर बाबराने इब्राहिम लोदीचा मे १७२६मध्ये पराभव केला. त्यानंतर बाबर परत जाण्याऐवजी आग्र्याला आला. त्याने हिंदुस्तानात राहण्याची तयारी सुरू केल्याचे पाहून राणा संगाने बाबरावर हल्ला करण्याचे ठरवले. त्याने सर्व राजपूत राजांना एकत्र होण्याचे आवाहन केले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. राणाच्या छत्राखाली रायसेन, डुंगरपुर, मेबती, चंदेरी, बुंदी, ईडर वगैरे बरेच राजेरजवाडे आपापल्या सैन्यासह दाखल झाले होते. त्यांच्या सर्वांच्या घोडदळाची एकूण संख्या ऐशी हजारांच्या घरात पोचली होती. त्याशिवाय प्रत्येकाकडे मोठे पायदळ होतेच.

संगाने कंदारचा किल्ला घेतला आणि बिआनाच्या किल्ल्यापाशी त्याचे काही सैन्य पोचले. किल्ल्यांमधील मोगल सैन्याबरोबर झालेल्या दोन चकमकींत राजपूत सैन्याने शत्रूचा चांगलाच समाचार घेतला. त्यामुळे बाबराच्या गोटात हिंदुस्तानी सैन्याबद्दल भीती निर्माण झाली. परंतु त्याने आपल्या सर्व सरदारांना एकत्र करून आपल्या आवेशपूर्ण भाषणाकरवी त्यांचे खचलेले मनोबल उभारले आणि युद्धाची तयारी करण्याचे आवाहन केले.

बाबर आणि राणा संगाच्या सैन्यांमध्ये आग्र्यापासून पश्चिमेला ३७ मैलांवर असलेल्या कनवा येथे युद्ध झाले. बाबर त्या परिसरात १२ मार्च १५२७ला पोचला. बाबराने दरम्यानच्या काळात

पाच फूट उंच अशा बऱ्याच संरक्षक तिचाकी गाड्या बनवून घेतल्या होत्या. बाबराची व्यूहनीती त्याने लोदीविरुद्ध पानिपतमध्ये केलेल्या रचनेच्या धर्तीवर होती. त्याच्या सैन्याची मांडणी पुढीलप्रमाणे होती : एकमेकांशी साखळदंडांनी बांधलेल्या तोफगाड्या सर्वांत पुढे एका रांगेत उभ्या करण्यात आल्या होत्या. त्यांच्यामधील मोकळ्या जागा तिचाकी संरक्षक गाड्यांनी भरल्या होत्या आणि मध्ये-मध्ये खंदकही खणण्यात आले होते. अशा प्रकारे सर्वांत आघाडीवर शत्रूपुढे एक प्रतिबंधक संरक्षण फळी उभारण्यात आली होती. त्याच्यामागे एका रांगेत अली कूली खानाचा तोफखाना उभा केला होता. छोट्या तोफांचे संचालन मुस्तफाच्या हाताखाली होते. त्याच्याबरोबर अनेक बंदूकधारी सैनिक सज्ज होते. बाबर तोफा आणि बंदुका यांचे वर्णन 'या युगातील चमत्कार' असे करत असे. त्यांच्या दोन्ही बाजूंना घोडदळाचे दस्ते होते. वेगवेगळ्या फळ्या सरदारांच्या हातांखाली होत्या. कोणीही आज्ञेशिवाय हालचाल करायची नाही, असे त्यांना कडक आदेश होते.

बाबराची रणनीती साधी आणि स्पष्ट होती. पहिली चाल शत्रूला करू द्यायची, त्याला गाड्यांच्या संरक्षण फळीकरवी तटवून धरायचे, त्याच्यावर बंदुका आणि तोफगोळ्यांचा मारा करायचा आणि तो एकदा का वेढ्यात आला की, मग दोन्ही बाजूंनी घोडदळाच्या तुकड्यांनी बगलेच्या दिशेने त्याच्यावर पार पिछाडीपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी हल्ले चढवायचे. घोडदळाच्या तुकड्यांच्या वापराच्या या उझबेगी तंत्राला 'तुल्घुमा' असे नाव होते. या सर्वच रचनेशी आणि डावपेचांशी बाबराचे सैन्य सुपरिचित होते आणि प्रशिक्षणादरम्यान त्यांनी त्याची वारंवार तालीम केली होती.

१७ मार्च १५२७ ला सकाळी लढाईला आरंभ झाला. बाबराच्या अपेक्षेनुसार राणा संगाने आक्रमक पवित्रा घेऊन पहिला हल्ला चढवला. त्यानंतर लढाई तंतोतंत बाबराच्या योजनेनुसार झाली. राणा संगाने बाबराच्या उजव्या फळीवर प्रथम हल्ला चढवला. त्यांना थांबवल्यावर तुल्घुमा तंत्राने राणा संगाच्या बगलांवर आणि पिछाडीवर हल्ले चढवले गेले. त्याबरोबरच तोफा पुढे सरकू लागल्या. समोरून तोफा व बंदुका आणि दोन्ही बगला व पिछाडीकडून घोडदळाच्या तुकड्यांचा मारा या तिहेरी दबावामुळे राजपुतांच्या सैन्याची पांगापांग होऊ लागली आणि त्यांच्या पराभवाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली. राणा संगाला प्राणांतिक जखमा झाल्या. संगाचे सैन्य विखरले आणि माघारी पळू लागले. रायसेनचा शिल्हीडी बाबराला जाऊन मिळाला.१७

बाबराचा विजय प्रामुख्याने तल्लख व नावीन्यपूर्ण युद्धतंत्र, बंदुका व तोफा ही आधुनिक शस्त्रसामग्री, चाणाक्ष नेतृत्व नेतृत्वाची एकसूत्रता आणि बळापेक्षा चपळतेवर भर या घटकांमुळे झाला.

हळदीघाटीतील संग्राम

महाराणा प्रताप हा राणा संगाचा त्याच्याइतकाच पराक्रमी वंशज. १५६८ मधील चित्तोडगडच्या वेढ्यानंतर मेवाडची सुपीक जमीन मोगलांच्या हातांत आली. परंतु उरलेला जंगल आणि डोंगराळी प्रदेश राणा प्रतापकडे होता. मेवाडमार्गे गुजरातकडे जाणारा मार्ग

आपल्या हातात असणे हे मोगलांना आवश्योक वाटत होते. मेवाडच्या गादीवर महाराणा प्रताप सिंह १५७२मध्ये आरूढ झाला होता. सम्राट अकबराने राणा प्रतापला अनेक दूतांकरवी संदेश पाठवून मोगलांचे मांडलिकत्व स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला होता. राणा प्रतापने त्याला वारंवार ठाम नकार दिला. जवळजवळ सर्व राजपूत राजांनी मोगलांचे स्वामित्व पत्करले होते. काहींनी तर मोगलांशी रोटी-बेटीचे नातेही जोडले होते. मेवाडच्या घराण्याने मात्र गेली चार शतके कधीही कोणत्याच मुस्लीम आक्रमकांचे मांडलिकत्व पत्करले नव्हते. राणा प्रतापला नमवण्यासाठी मग अकबराकडे युद्धाशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता.

अकबराने राणा प्रतापला शरण आणण्याचे काम अंबरचा राजा मानसिंह (पहिला) याच्यावर सोपवले. दोन सैन्यांच्या संख्याबळाबाबत वेगवेगळे आकडे उपलब्ध आहेत. एका अंदाजानुसार अकबराच्या सैन्यात दहा हजार स्वार व बरेच हत्ती होते, तर राणाकडे तीन हजारांचे घोडदळ आणि ४०० भिल्ल धनुर्धारी होते. मेवाडी सूत्रांनुसार अकबराच्या सैन्याची संख्या ऐंशी हजार, तर राणाची संख्या वीस हजारांच्या घरात होती. या एकमेकांत तफावत असली तरी त्यांच्यातून एक निष्कर्ष निश्चित निघतो की, मोगल आणि राजपूत सैन्य ४:१ या प्रमाणात होते. मोगलांच्या सैन्यात राजा मानसिंह (पहिला), आयुषसिंह राठोर, सय्यद अहमद खान बरहा, सत्ताद हाशीम, घियासुद्दिन आसफअली खान, जगन्नाथ कच्छवाह, मुल्ला काझी खान, माधोसिंह कच्छवाह, मिहतरखान वगैरे सरदार होते. राणाकडे त्याच्याशिवाय भीमसिंह दोडिया, रामदास राठोड, रामशहा तलवार, शालिवाहनसिंह तोमर, हकीम खान सूर, भामाशहा, ताराचंद आणि राणा पुंजा हे सरदार होते.

शेवटी राजा मानसिंह आपल्या सैन्यानिशी मेवाडवर चालून गेला. दोन सैन्यांची गाठ नाथद्वाराजवळ राजसमंड जिल्ह्यात खामनोर येथे १८ जून १५७६ रोजी पडली. गोगुंडजवळ एक अरुंद खिंड आहे, तिचे नाव हळदीघाटी. या खिंडीत दोन्ही सैन्यांत घमासान युद्ध झाले. सुरुवातीला विजयाचे पारडे राणा प्रतापाकडे झुकत होते, परंतु काही वेळाने मानसिंहाच्या सरस संख्याबळामुळे ते मोगल सैन्याकडे फिरले. १६०० राजपूत सैनिक धारातीर्थी पडले आणि अनेक जखमी झाले. मोगलांची हानी त्या मानाने कमी होती. त्यांचे १५० सैनिक ठार आणि ३५० जखमी झाले. राणा प्रतापही जखमी झाला होता. उन्हे कलू लागल्यावर आपली सरशी होणे शक्य नसल्याची जाणीव जेव्हा राणा प्रतापला झाली, तेव्हा डावपेची माघार घेण्याचे त्याने ठरवले. झाला मानसिंह याने मोगलांच्या सैन्याला तटवून ठेवून बाकीचे सैन्य माघारी सुटून जाण्यास मदत केली.

हळदीघाटीच्या डोंगराळी परिसरात आपण संख्येत सरस असलेल्या मोगल सैन्याचा पराभव करू, अशी राणा प्रतापला खातरी होती. त्याचे हळदीघाटीतील डावपेच हे गनिमीकाव्यावर आधारित होते; परंतु नशिबाने त्याला साथ दिली नाही. तरीही एक रोमांचकारी संग्राम म्हणून तो लष्करी इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला गेला आहे. अकबराचा प्रमुख उद्देश राणा प्रतापला पकडण्याचा होता. तो मात्र साध्य झाला नाही. त्यानंतर १५९७पर्यंत राणा प्रतापने मेवाडवर राज्य केले.

लष्करी पराजयाची कारणमीमांसा

या चारही लढाया ही भारताच्या लष्करी इतिहासातील सोनेरी पाने आहेत. त्यांच्यातील तीन लढायांत हिंदू राजांचा पराभव झाला असला, तरी त्या राजांनी मनाने कधीच हार खाल्ली नाही. राणा प्रतापच्या लढाईत तर तो अकबराच्या पुढे गुडघे टेकलेल्या स्वकीयांशी लढत होता.

परंतु तरीही मुस्लीम आक्रमकांसमोर हिंदू राजे का टिकाव धरू शकले नाहीत, याची कारणे थोडक्यात शोधणे आवश्यक आहे. भारतातील हिंदू संस्कृती आणि आक्रमकांची जिहादवर आधारलेली इस्लामी संस्कृती यांत जमीन-अस्मानाचे अंतर होते. त्याचे विवेचन आणि परिणाम यापूर्वी चर्चिले आहेतच. हिंदुस्तानी राजांमध्ये आणि त्यांच्या सैन्यांमध्ये लढवय्येपणात कमतरता होती, असे समजणे चुकीचे आहे.

संख्याबळच युद्ध जिंकू शकते, हा हिंदू राजांचा चुकीचा समज होता. शत्रूवर मुसंडी मारण्याच्या त्यांच्या तंत्रात अधिक संख्याबळाची आवश्याकता पडे. परंतु संख्या नव्हे, तर त्या दलाच्या वेगवेगळ्या अंगांचे प्रमाण अधिक महत्त्वाचे असते. चंद्रगुप्ताच्या सैन्यात सहा लाख पायदळ, तीस हजार घोडदळ आणि नऊ हजार गजदळ होते. त्याने आपल्या काळात पायदळ आणि गजदळात वाढ केली, परंतु घोडदळात घट झाली. हर्षवर्धनाच्या सैन्यात पाच हजार गजदळ, वीस हजार घोडदळ आणि पन्नास हजार पायदळ होते. पाच वर्षांत त्याने त्याची साठ हजार गजदळ आणि एक लाख घोडदळ इतकी वाढ केली. कोणत्याही सैन्यात विजयी घटक असतो, तो म्हणजे घोडदळ. याची जाणीव हर्षवर्धनासारख्या फार थोड्या हिंदू राजांना होती. मुस्लीम आक्रमकांची सैन्यदले वजनात हलकी (म्हणजे संख्येत कमी), चपळ व आक्रमक (म्हणजे घोडदळ अधिक) आणि प्रवृत्तीने कर्मठ असत. याला इंग्रजीत 'थिन, लीन, मीन' अशी संज्ञा आहे. हा त्यांचा प्रमुख विजयमंत्र होता.

गजदळाच्या शक्तीवर हिंदू राजांचा अवाजवी विश्वास असे. बहुतांशी मुस्लीम आक्रमक हत्तीचा वाहन म्हणून वापर करीत. युद्धक्षेत्रात त्यांच्यातील गतिशीलतेच्या अभावामुळे ते लोढणे होत. पृथ्वीराजच्या बाबराविरुद्ध आणि पोरसाच्या अलेक्झांडरविरुद्ध पराजयाच्या घटकांपैकी प्रमुख घटक म्हणजे अवास्तव संख्येतील गजदळ आणि त्यावर विनाकारण भरवसा. गजदळाच्या सामर्थ्यावर त्यांचा इतका अतोनात विश्वास असे की, हत्तीशिवाय लढाई होऊ शकते, हे त्यांच्या विचारापलीकडचे होते. हेच त्यांच्या परागतीचे वारंवार कारण ठरले.

तुर्की रणतंत्र म्हणजे पूर्वीच्या सीथिअन रणतंत्राची आवृत्ती होती. मध्ययुगीन काळात युद्धशास्त्राच्या क्षेत्रात तुर्क अतिशय प्रगमनशील होते. सैन्य कसे उभारावे, एकमुखी नेतृत्वाखाली त्याने कसे लढावे, त्या दलाचा एक संघटित गट म्हणून कसा वापर करावा; याचे तंत्र त्यांनी विकसित केले होते. त्यामुळे ते विजयी ठरत असत. ते लष्करी नेतृत्व व रणतंत्राला प्राधान्य देण्याचा व विजय कशामुळे होतो, याचे गमक जाणण्याचा प्रयत्न करीत. हिंदू राजांमध्ये याचा बऱ्याच अंशी अभाव होता.

तुर्की सैन्याची संघटना बऱ्याच प्रमाणात समजीवी असे; उलट हिंदूंचे सैन्य हे वेगवेगळ्या राजे-रजवाड्यांनी पुरवलेल्या तुकड्यांच्या गाठोड्यासारखे असे. हिंदू सैन्य स्वाभिमानी आणि

मृत्यूविषयी बेफिकीर असे; परंतु सैन्याचा आपण अंगभूत भाग आहोत, हे न समजता वैयक्तिक शौर्य दाखवण्याकडे त्यांचा अधिक कल असे.

शाठ्य आणि विस्मयकारकता हे महत्त्वाचे युद्धतत्त्व आहे. मुस्लीम सेनापती याचा पदोपदी हुशारीने वापर करीत आणि शत्रूच्या डोळ्यांत धूळ फेकण्यात यशस्वी होत. त्यांच्या यशाचे हे प्रमुख रहस्य होते. हिंदू राजे आणि सेनापती मात्र याचा अपवादानेच वापर करीत.

सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे नेतृत्वाची गुणवत्ता. मुस्लीम आक्रमकांच्या हिंदू राजांशी झालेल्या संग्रामातील नेतृत्वाचे समग्र मूल्यमापन केले, तर निदान आरंभीच्या काळात हिंदू राजांचे नेतृत्व परकीय आक्रमकांच्या तुलनेने कनिष्ठ दर्जाचे होते, असे नाइलाजाने म्हणावे लागते.

बहामनी राजसत्ता

बहामनी राज्याची स्थापना

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा आरंभ १२९६मधील अल्लाउद्दिन खिलजीच्या पहिल्या मुस्लीम आक्रमणापासून होतो. मुस्लिमांचे बस्तान दक्षिणेत १३१७मध्ये यादव राज्याच्या अस्तानंतर बसले. वास्तविक खिलजी यादवांच्या अमाप संपत्तीच्या शोधात महाराष्ट्रात आला होता, परंतु दक्षिणेतील राजकीय संधी पाहून आपले साम्राज्य दख्खनमध्ये प्रस्थापित करण्याचा मोह मुस्लिमांना आवरला नाही आणि पुढील २५ वर्षांत त्यांनी दख्खन आपल्या अमलाखाली आणले. त्यांनी नेमलेल्या प्रशासकांच्या गलथान कारभारामुळे आणि प्रजेच्या पिळवणुकीमुळे लोक वारंवार बंडाचा झेंडा उभारू लागले. उत्तरेतील या मुस्लीम सत्ताधीशांची पकड काळानुसार ढिली झाली आणि अल्लाउद्दिन खिलजीच्या आगमनानंतर पाच दशकांतच दक्षिणेत मुस्लिमांचेच एक वेगळे बहामनी राज्य निर्माण झाले.

बहामनी राज्याचा संस्थापक हसन हा दिल्लीतील गंगू नावाच्या एका ब्राह्मणाचा गुलाम होता. एका आख्यायिकेनुसार गंगूने हसनला सांगितले की, ‘उज्ज्वल भवितव्य त्याची दक्षिणेत वाट पाहते आहे.’ हसन ते आजमावण्यासाठी दक्षिणेत आला आणि खरोखरच त्याला चांगले दिवस आले. त्याने हसन गंगू बहामनी हे नाव धारण केले. १३४७मध्ये गुलबर्गा येथे त्याने आपल्या बहामनी राज्याची स्थापना केली. ‘बहामनी’ हा ब्राह्मणी या शब्दाचा अपभ्रंश. त्याने आपला एके काळचा मालक आणि हितकर्ता गंगूलाही गुलबर्ग्यात आणले आणि राज्याचे अर्थखाते त्याला सुपूर्द केले. १३४७ या वर्षाचे विशेष महत्त्व म्हणजे पुढील १५० वर्षांसाठी उत्तरेच्या वरचष्म्यातून दक्षिणेची सुटका झाली.

परंतु बहामनी राज्य या दीडशेहून अधिक वर्षांच्या कालावधीत लडखडतच चालले. जर विजयनगर किंवा यादवांच्या राजांनी थोडा अधिक लष्करी बाणेदारपणा आणि मुत्सद्देगिरी दाखवली असती, तर त्यांना बहामनी राज्य आरंभीच जमीनदोस्त करता आले असते; किंबहुना त्यातील शेवटचा काही काळ सोडला, तर बहामनी राज्य त्यांच्या शक्तीमुळे नव्हे, तर दक्षिणेतील सर्वसाधारण निराशाजनक वातावरणामुळेच तग धरून राहिले. उत्तराधिकार सोपवण्याची बहामनी राज्यातील एकही प्रक्रिया रक्तपात, निष्पापांचे बळी आणि

दगाफटक्याशिवाय घडली नाही. खरोखरच ‘जर सतराव्या शतकातील शिवाजीराजांचे प्रखर आणि खंबीर नेतृत्व महाराष्ट्राला दोन शतके अगोदर मिळाले असते किंवा जर १३१७मध्ये उभा चिरला गेलेला देवगिरीचा हरपालदेव याच्या अमानुष हत्येचे प्रतिध्वनी पुऱ्या दख्खनभर गुंजून प्रजा चिडून उठली असती, तर या देशाला आणि प्रजेला एका परकीय सत्तेपासून वाचवता आले असते.’१८

हसन गंगूच्या हाताखाली कार्यरत असलेल्या महत्त्वाकांक्षी सरदारांनी आपला प्रभाव वाढवून कालानुसार मूळ बहामनी राज्याचे पाच वेगवेगळे परगणे स्वत:च्या अमलाखाली आणले. त्यांचे सुलतान एकतर धर्मांतरित हिंदू किंवा तुर्कस्तान, इराण किंवा जॉर्जिया वगैरे परदेशांतून हिंदुस्तानात कामाच्या शोधात आलेले लष्करी शिपाई होते. पहिला निजामशहा विदर्भातील धर्मांतरित कुलकर्णी नावाचा ब्राह्मण होता. तसाच इमादशाहीचा संस्थापकसुद्धा धर्मांतर केलेला ब्राह्मण होता. पहिला आदिलशहा तुर्की, पहिला बरीदशहा जॉर्जियन तर पहिला कुतुबशहा इराणी होता. (नकाशा क्र. ३ पाहा.)

नकाशा क्र. ३

बहामनी राज्य



बहामनी राज्यातील मुसलमानांत दोन प्रकार होते : परदेशी आणि दख्खनी मुसलमान. परदेशी मुसलमान म्हणजे हिंदुस्तानातील मुस्लीम राजांच्या दरबारात नोकरी करण्यास आलेले मध्य आशियामधील मुसलमान. दख्खनी मुसलमान हे स्थानिक प्रजेपैकी होते आणि त्यांच्यातील बरेच मूळचे हिंदू असलेले धर्मांतरित मुसलमान होते. परदेशी मुसलमान दक्षिणेतील मुसलमानांना कनिष्ठ समजत असत. या दोघांमध्ये टोकाचे वैर असे. बाहेरून येणाऱ्या मुसलमानांना प्रशासनात वरच्या जागा लाभत असत, त्यामुळे स्वाभाविकच दख्खनी मुसलमान परदेशी मुसलमानांचा द्वेष करीत असत; किंबहुना आपले स्वत:चे बूड स्थिर राखण्यासाठी खुद्द सुलतान जसे उमरावांमध्ये कलह निर्माण करीत असत, तसेच दख्खनी व परदेशी मुसलमानांमध्येसुद्धा भांडणे लावून देत असत.

बहामनी राजांचा नेतृत्वाचा दर्जा अत्यंत सुमार होता. बहामनी सुलतान एकतर त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे किंवा बदफैली वर्तनामुळे सदैव असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासलेले असत. त्यांच्या कर्तृत्वहीनतेमुळे ना कधी ते कालभेदी निर्णय घेऊ शकत, ना सुधारणा आणण्यासाठी सकारात्मक धोरण अवलंबू शकत. त्यांच्यापाशी परिपक्वता, दूरदृष्टी, चातुर्य आणि न्यायवृत्ती या गुणांचा सर्वथा अभाव होता. मदिरा आणि मदिराक्षी या दोन्हीच्या मोहांनी ते सर्व सदैव घेरलेले असत. त्यामुळे त्यांना अघोरी अत्याचार करण्याची प्रेरणा मिळत असे. हुमायून शहा (१४५८-६१) नावाच्या पाशवी सुलतानाला नरसंहार, बायका-मुलांना हत्तीच्या पायदळी देणे आणि गुन्हेगारांना उकळत्या तेलाच्या हंडीमध्ये टाकण्याची शिक्षा देणे अशा अमानुष खेळांमुळे आसुरी आनंद मिळत असे.१९

महंमदशहा बहामनीचा अत्यंत कर्तबगार प्रधानमंत्री महंमद गवान याने एकदा ही दख्खनी-परदेशी दरी सांधण्यासाठी सकारात्मक सुधारणा करण्याचे ठरवले. कार्यक्षम आणि कर्तृत्ववान दख्खनी आणि परदेशी प्रशासकांचे एक बळकट आणि लोकाभिमुख मध्यवर्ती सरकार बनवण्याचा त्याचा हेतू होता. जर त्याला सुलतानाकडून पाठिंबा मिळाला असता, तर दोन्ही फळ्यांमध्ये एकजूट साधून त्यानंतर काही काळाने झालेले बहामनी राज्याचे विघटन टळू शकले असते. परंतु खुद्द सुलतान महंमदशहानेच त्याला अडता घातला. कारण स्पष्ट होते. गवानची योजना जर यशस्वी झाली, तर हा मोती नाकापेक्षा जड होईल, अशी त्याला भीती वाटू लागली होती. त्यामुळे स्वत:च्या काही विश्वासू पित्त्यांकरवी सुलतानाने प्रधानमंत्री महंमद गवानचा १४८१मध्ये खून घडवून आणला.

बहामनी राज्याचे विभाजन

१३४७ ते १४५० या शंभर वर्षांत बहामनी राज्याचा विस्तार झाला. ते अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पोचले. परंतु त्याचे सरदार दिवसेंदिवस अधिकाधिक बलिष्ठ बनले आणि बहामनी सुलतानाच्या आदेशांचा अवमान करू लागले. महंमद गवानची हत्या बहामनी राज्याच्या विघटनास कारणीभूत ठरली. आपापले स्वातंत्र्य घोषित करण्याचा निर्णय मलिक अहमद, युसुफ आदिल आणि फतेउल्ला या तीन वरिष्ठ सरदारांनी आधीच घेतला होता आणि ते योग्य संधीची वाट पाहत होते.

१४८२ मध्ये महमूद शहाच्या मृत्यूनंतर अहमद निजामशहा, युसुफ आदिलशहा, फतेउल्ला इमादशहा, कुली कुतुबशाह व कासीम बरीदशहा यांनी आपापल्या स्वतंत्र सुलतानशाह्या स्थापन केल्या. अशा प्रकारे बहामनी राज्याची पाच शकले झाली : विजापूरची आदिलशाही (१४८९-१६८६),अहमदनगरची निजामशाही (१४८९-१६३३), गोवळकोंड्याची कुतुबशाही (१४८९-१६८७), वऱ्हाडची इमादशाही (१४९२-१५९२) आणि बिदरची बरीदशाही (१४८४-१५७३).

या पाच सुलतानशाह्या निर्माण झाल्यावर दख्खनमध्ये एक अराजक, अस्थिरता आणि अनागोंदीचे साम्राज्य पसरले. हे पाचही सुलतान एकमेकांशी भांडत राहिले. कधी त्यातल्या दोघांनी मिळून युती केली आणि तिसऱ्यावर हल्ले चढवले. त्याबरोबर शेजारच्या विजयनगर साम्राज्यावरही ते वारंवार आक्रमण करीत राहिले. सोळाव्या शतकाच्या अखेरीस मोगलांनी दक्षिणेवर स्वारी करून वऱ्हाड मोगल राज्यात समाविष्ट करीपर्यंत या सुलतानशाह्यांमध्ये एकमेकांत सुमारे शंभर लढाया झाल्या. इमादशाही निजामशाहीने १५७४मध्ये जिंकली, तर बरीदशाही आदिलशाहीने १६१९मध्ये जिंकली.

बहामनी सुलतानांप्रमाणे या पाच राज्यांच्या सुलतानांनीही हिंदूंविरुद्ध द्वेषाचे प्रदर्शन केले. निझामशाहीच्या संस्थापकाने कोकणातील देवळे उद्ध्वस्त केली आणि हिंदूंचे धर्मांतर केले. विजयनगर साम्राज्याकडून बऱ्याच वेळा मदत घेऊनही सर्वांनी एकत्र येऊन शेवटी विजयनगर साम्राज्य बेचिराख केले. अहमदनगरच्या हुसेन निझामशहाने विजयनगरचा सेनापती रामरायाला ठार करण्याचा आदेश दिला. १५६४-६५दरम्यान झालेला तो द्वेष आणि क्रूरतेचा हैदोस इतिहासाला फार कमी वेळा पाहावयास मिळाला असावा.

बहामनी सुलतान आपल्या हिंदू प्रजाजनांची सरकारी किंवा सैन्यातील वरच्या वा मधल्या दर्जाच्या पदांवर नेमणुका क्वचितच करीत असत. मध्यवर्ती बहामनी राज्याच्या आरंभीच्या काळात हिंदूंशिवाय ते आपला कारभार सहज चालवू शकत असत. परंतु बहामनी साम्राज्याचे पाच वेगवेगळ्या सुलतानशाह्यांमध्ये विघटन झाल्यानंतर मात्र ही परिस्थिती बदलली. प्रत्येकाला आपली स्वतंत्र सरकारी यंत्रणा उभारावी लागली आणि हिंदूंची मदत घेण्याशिवाय त्यांना गत्यंतर राहिले नाही. त्यामुळे काही काळाने हिंदू सरदार प्रधानमंत्री, सेनापती, अर्थमंत्री आणि इतर उच्च पदांपर्यंत पोचू लागले. पाचही सुलतानशाह्यांत उच्च आणि मध्यम दर्जाच्या पदांवर हिंदूंचा समावेश जसजसा अधिकाधिक होत गेला, तसतशी हिंदू-मुस्लीम तेढ आणि दुफळी कमी झाली. जरी सर्व सुलतान विजयनगर हिंदू राज्याविरुद्ध एकजूट झाले, तरी १७व्या शतकाच्या उत्तरार्धात औरंगजेबाच्या आगमनापर्यंत दक्षिणेतील सुलतानांमधील धर्मांधतेचा अतिरेक तुलनेने बराच आटोक्यात आला होता.

सुलतानशाह्यांच्या सैन्यातसुद्धा हिंदू शिपाई मोठ्या प्रमाणात भरती होऊ लागले. काही काळाने आदिलशाही लष्करात हिंदूंची संख्या इतरांपेक्षा जास्त झाली. विजापूरच्या घोडदळात बऱ्याच प्रमाणात हिंदू होते आणि ते इतरांपेक्षा सरस असल्याने निजामशाही आणि कुतुबशाहीविरुद्ध त्याने अनेक लढाया जिंकल्या. पाच बहामनी राज्यांत विजापूर आणि अहमदनगर हे अधिक बलवत्तर होते. सुलतानांचा एकमेकांविरुद्धचा हा सत्तासंघर्ष केवळ

त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी होता आणि जनतेच्या कल्याणाबद्दल त्यांना तसूभरही आस्था नव्हती.२०

स्वराज्याची पूर्वपीठिका

भोसल्यांचा उदय

शहाजी भोसले यांच्या घराण्याचा उगम चितोडमधील सूर्यवंशी सिसोदे राजपुतांपासून झाला. हे उच्चवर्णीय क्षत्रिय होते. यादव, पवार, मोरे, शिंदे, साळुंके वगैरे राजपूत घराणी उत्तर हिंदुस्तानातून दक्षिणेत स्थलांतर झाली. त्यांच्याशी पुढे भोसल्यांचे शरीरसंबंध झाले. उदेपूरच्या सिसोद्यांचे भोसले वंशज असल्याचे संदर्भ जुन्या कागदपत्रांत सापडतात, ते याच कारणाने. १३०३साली अल्लाउद्दिन खिलजीच्या चितोडवरील स्वारीत चितोडचा रावळ रत्नसिंह आणि सिसोद्याचा राणा लक्ष्मणसिंह व त्याचे सात पुत्र मारले गेले. वाचलेला एकच मुलगा अजयसिंह सिसोद्याचा राणा झाला. त्याने आपला पुतण्या हमीर याला गादीचा वारस केल्याने नाराज झालेले त्याचे दोन पुत्र सजनसिंह आणि क्षेमसिंह दक्षिणेत आले. त्यांच्यापासून घोरपडे आणि भोसले घराणी जन्मली.२१

भोसले घराण्यात बाबाजी भोसले यांचा जन्म सुमारे १५३०मध्ये झाला असावा. त्यांना दोन पराक्रमी पुत्र होते : मालोजी आणि विठोजी. मालोजींचा जन्म १५५२मध्ये झाला. सिंदखेडमधील निजामशाहीच्या पदरी असलेल्या लखुजी जाधव या सरदारांच्या पथकात मालोजींना नोकरी मिळाली. मालोजींच्या धर्मपत्नी फलटणच्या निंबाळकर घराण्यातील उम्माव्वा यांना शहाशरीफ या पीराच्या आशीर्वादाने दोन पुत्र झाले, असे सांगितले जाते, त्यामुळे त्या मुलांची नावे शहाजी आणि शरीफजी अशी ठेवण्यात आली असावीत. शहाजींचा जन्म १८ मार्च १५९४ रोजी झाला.

१५९९साली जाधवांच्या वाड्यात झालेल्या होलिकोत्सवात मालोजींचे चार-पाच वर्षाचे राजबिंडे पुत्र शहाजी आणि लखुजींच्या रूपवान कन्यका जिजाई या दोघांना एकमेकांवर रंग उडवताना पाहून मालोजी आणि लखुजी या दोघांच्यात हास्य-विनोदादरम्यान झालेल्या संवादाचा गैरसमज करून मालोजींनी शहाजींचे लग्न जिजाई यांच्याशी ठरल्याचे जाहीर केले. याला लखुजींकडून थंडा प्रतिसाद मिळाल्यामुळे खट्टू झालेल्या मालोजींनी जाधवांची नोकरी सोडली आणि ते आपल्या गावी गेले. हा निश्चय करून की, आपली इभ्रत वाढवायची आणि शहाजींचे लग्न जिजाबाईशीच करायचे. खूप झटून त्यांनी थोड्या काळातच संपत्ती आणि मानमरातब मिळवला.

आपली सांपत्तिक स्थिती आणि प्रतिष्ठा लवकरच सुधारल्यानंतर मालोजींनी लखुजींकडे आपल्या मुलासाठी जिजाबा्इंना मागणी घातली. लखुजी आणि मालोजी हे दोघेही निजामशाहीच्या नोकरीत असल्याने वझीर मलिक अंबर याने खुद्द मध्यस्थी केली आणि दोन कुटुंबांमधील वितुष्ट मिटवले. १६०५च्या डिसेंबरात शहाजी आणि जिजाई या दोघांचे लग्न थाटात पार पडले. मालोजींना निजामशाहीकडून पाच हजाराची मनसबदारी, शिवनेरी आणि चाकण हे दोन किल्ले आणि पुणे व सुपे हे दोन परगणे जहागीर म्हणून देण्यात आले.२२ पुढील

काळात शिवाजीराजांच्या स्वराज्याचा हा पाया झाला.

मलिक अंबरचे योगदान

अकबर बादशहाची सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर नर्मदेच्या दक्षिणेचा प्रदेश जिंकण्याची त्याची इच्छा प्रबळ झाली. खानदेश आणि वऱ्हाडच्या सुलतानशाह्या मोगल साम्राज्यात समाविष्ट करून त्याने आपला मोहरा निजामशाहीकडे वळवला. त्या मोहिमांवर त्याने आपले शहजादे दानियाल आणि मुराद यांना धाडले. १२ डिसेंबर १५९५ रोजी त्यांनी अहमदनगर जिंकले. त्या लढाईत चांदबीबी या राणीने केलेला कडा संघर्ष इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. तिच्याच प्रमाणे निजामशाहीसाठी प्राणपणाने लढून मोगलांचे आक्रमण काही काळासाठी तटवून धरले, ते निजामशाहीच्या वझीरपदी असलेल्या मलिक अंबर या हबशी सरदाराने. लहान असताना बगदादमधील एका व्यापाऱ्याने त्याला अहमदनगरच्या वझीर चंगेजखानास विकले होते. तो पुढे आपल्या कर्तबगारीने वझीरपदावर पोचला.

बादशहा अकबराच्या मृत्यूनंतर दख्खन जिंकण्याचे काम जहांगीरने १६०८ साली हाती घेतले; परंतु त्याच्यापाशी अकबराचा साक्षेप आणि चिकाटी नव्हती. मलिक अंबरने जहांगीरचे सर्व प्रयत्न पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीपर्यंत फोल ठरवले. त्याने राजधानी प्रथम दौलताबादला हलवून त्यानंतर खडकी येथे नवी राजधानी वसवली. त्यालाच पुढे औरंगजेबाने औरंगाबाद हे नाव दिले. निजामशाहीनंतर मोगलांची धाड आदिलशाहीवरच येऊ शकते, हे मलिक अंबरने आदिलशहाला पटवून देऊन आदिलशाहीशी सख्य जोडले. त्याचे संबंध घनिष्ठ करण्यासाठी आदिलशहाने आपल्या एका सरदाराच्या मुलीचे लग्न मलिक अंबरचा पुत्र फत्तेखान याच्याशी थाटामाटात पार पाडले.

मलिक अंबर हा एक लोकाभिमुख प्रशासक होता. त्याने रयतेला तिच्या कामाचा पूर्ण मोबदला देण्याचा शिरस्ता पाडला. त्यामुळे उत्पादनात भर पडून आणि वसुलीचा सारा वाढून खजिन्यात चांगला पैसा जमा होऊ लागला. त्यामुळे राज्याच्या लष्कराची संख्या तो वाढवू शकला. तो एक वाकबगार सेनानी होता. डोंगराळ प्रदेशात प्रथमच गनिमी काव्याच्या धर्तीवर डावपेचांचा वापर करून त्याने प्रचंड मोगल सैन्याला जेरीस आणले. त्याच्या लष्करात मराठे आणि मुसलमान या दोन्हींची समप्रमाणात भरती केली जात असे. मलिक अंबर हा पुढे शहाजीमहाराज आणि शिवरायांचा एक आदर्श ठरला.

मलिक अंबरचा पराजय करण्यासाठी जहांगीरने खानखानान या एक अत्यंत कसलेल्या सेनापतीला मोठ्या फौजेसह दक्षिणेत रवाना केले. परंतु तीन वर्षे त्याला वाटाघाटींत गुंतवून मलिकने त्याला वऱ्हाडाच्या पुढे येऊ दिले नाही. मग जहांगीरने आपला पुत्र परवेज याला आसफखान, राजा मानसिंग वगैरे वरिष्ठ सरदारांबरोबर पाठवले; परंतु मलिक अंबरने त्यांचीही डाळ शिजू दिली नाही. त्यावर रागावलेल्या जहांगीरने खानखानानचा मुलगा शहानवाझ याला दक्षिणेत पाठवून त्यापुढे मलिक अंबरशी कोणतीही चर्चा न करता सरळ युद्ध पुकारण्याचा आदेश दिला. त्यानुसार शहानवाझ जालनाच्या दिशेने चालून आला. आता मात्र दुसरा पर्याय नाही, हे ओळखून मलिक अंबरने आपले सैन्य जमा केले. इखलासखान याला प्रमुख

सेनापतीची जबाबदारी देण्यात आली. त्याच्या हाताखाली आदमखान, आतशखान, म्हालदारखान, शहाजी भोसले, लखुजी जाधव, बाबाजी काटे, उदाराम वगैरे कसलेले सेनापती देण्यात आले.

दोन्हीही सेना युद्धक्षेत्रात लगटून बरेच दिवस उभ्या होत्या. भेदनीती आणि गनिमी काव्यासारखे डावपेच यांचा उपयोग दोन्ही बाजू नेटाने करत होत्या, परंतु एकमेकांवर चालून जाण्याचे धाडस कोणीच दाखवत नव्हते. शहानवाझने मलिक अंबरच्या बाजूचे लखुजी जाधव, बाबाजी काटे, उदारम, विठोजी भोसलेचे पुत्र अशा अनेक उमद्या मराठा सरदारांना मोगलांच्या बाजूला फितवले. त्याबरोबरच आदमखान हबशी, याकूतखान वगैरे मुसलमान सरदारही मलिक अंबरची बाजू सोडून मोगलांच्या बाजूला सामील झाले. मलिक अंबरने आदिलशहाची मदत मागितली. त्याने मोठी फौज पाठवलीच, परंतु त्याबरोबर मोगल सैन्याच्या बाजूला गेलेल्या सरदारांना मलिक अंबरच्या गोटात परत आणण्याचे प्रयत्न करण्यासाठी मुल्लाबाबा महंमद या मुत्सद्दी सरदारालाही पाठवले. परंतु कशाचाच उपयोग झाला नाही.

शहानवाझ याने जास्त वेळ न गमावता मलिक अंबरच्या सैन्यावर हल्ला केला. ४ फेब्रुवारी १६१६रोजी दोन सैन्यांत जालन्याच्या पश्चिमेस रोशनगाव येथे तुंबळ लढाई झाली. त्यात मलिक अंबरचा पराभव झाला आणि त्याने दौलताबाद किल्ल्यात आश्रय घेतला. शहानवाझच्या सैन्याने खडकी आणि सभोवतालच्या क्षेत्रात तुफान लुटालूट केली आणि ते परत गेले. रोशनगावच्या लढाईनंतर जाधव आणि भोसले घराण्यांत कायमचे वैर निर्माण झाले, हे तिचे महत्त्व. पुढे जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांचा खून झाला, त्याचे मूळ याच लढाईत सापडते.

शहानवाझ परत गेल्यानंतर मलिक अंबरने पुन्हा आघाडी उघडली आणि मोगलांना माघार घ्यायला लावली. हे कळल्यावर जहांगीरने आपला पुत्र खुर्रम ऊर्फ शहाजहान याला डिसेंबर १६१६मध्ये दक्षिणेत पाठवले. नर्मदेवर त्याला खानखानान, खानजहान, महाबतखान वगैरे सरदार भेटले. ही फौज पाहून मलिक अंबर त्याला शरण गेला. परंतु शहाजहानची पाठ फिरताच मलिक अंबरने कुतुबशाही आणि आदिलशाहीकडून कुमक मिळवली आणि मोगलांनी घेतलेला प्रदेश एकामागून एक सोडवण्यास आरंभ केला. शेवटी अहमदनगर आणि बुऱ्हाणपूर ही दोन शहरे सोडून मलिक अंबरने इतर सर्व प्रदेश परत मिळवला.

जहांगीरने शहाजहानला पुन्हा एकदा दक्षिणेत पाठवले. शहाजहान एप्रिल १६२१मध्ये बुऱ्हाणपूरला पोचला. त्यामागचा त्याचा मुख्य हेतू शहाजहानला आग्र्यापासून दूर ठेवण्याचा होता. पुन्हा एकदा बुलंद सामना देऊनही मलिक अंबरचा पराभव झाला आणि तो शहाजहानला शरण गेला. पाताळयंत्री सावत्र आई नूरजहानने त्याच्या जहागिरी काढून घेतल्यामुळे शहाजहानने तिच्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. त्याने मोगलांच्या शाही फौजांशी काही काळ लढा दिला, परंतु त्यात विशेष गम्य न दिसल्याने त्याने अखेरीस पित्याची क्षमा मागितली. त्याने मलिक अंबरकडे आश्रय घेतला आणि जुन्नर येथे तो अज्ञातवासात राहू लागला.

भातवडीत शहाजींचा पराक्रम

शहाजहानचा पाठलाग करण्यासाठी सेनापती महाबतखान दक्षिणेत आला. त्याने आदिलशहा आणि मलिक अंबर या दोघांकडे मदत मागितली. मोगल पेचात असल्याने निजामशाही आणि आदिलशाही या दोघांनी एकवटून त्यांचा सामना करण्याचा प्रस्ताव मलिक अंबरने आदिलशहापुढे ठेवला. परंतु आदिलशहाला तो मान्य नव्हता. उलट मोगलांच्या मदतीसाठी सैन्य पाठवण्याचा निर्णय त्याने घेतला. शहजादा परवेझ आणि आदिलशहाचा प्रतिनिधी मुल्ला महंमद यांच्या भेटीत मुल्ला महंमद याच्या नेतृत्वाखाली मोगल आणि आदिलशाही सैन्य निजामशाहीच्या सैन्याचा पराभव करण्यासाठी पाठवण्याचे ठरले. मुल्लाच्या हाताखाली परवेझने लष्करखान, सिफादारखान, मिर्झा मिनुचहर वगैरे मोठमोठे सरदार तैनात केले. जाधव, काटे, म्हालदारखान, आदमखान आदि मोगलांना रोशनगावच्या लढाईच्या आधी मिळालेले सरदारही त्याचबरोबर होते. परवेज या मोठ्या फौजेनिशी मलिक अंबरवर चालून गेला. त्यानंतर घडली ती सुप्रसिद्ध भातवडीची लढाई.

दोन्ही बाजूंनी फौज चालून येत असल्याचे कळल्यावर मलिक अंबरने अहमदनगरच्या पूर्वेस सुमारे दहा मैलांवर भातवडी येथे बचावासाठी मोर्चेबंदी केली. हा परिसर डोंगराळी होता आणि गनिमी युद्धासाठी अत्यंत अनुरूप होता. तिथे एक विस्तीर्ण तलाव होता. एकदा का त्या क्षेत्रात दोन्ही सैन्ये घुसल्यावर त्या तलावाचा बांध फोडून त्याने मोगलांचे मार्ग पाणी आणि चिखलमय करून टाकले. त्यांच्या छावणीपासून बाहेर जाणारे सर्व मार्ग अंबरच्या सैन्याच्या छोट्या छोट्या तुकड्यांनी पूर्वनियोजित जागी रोखून धरले. पावसाचे दिवस असल्याने मोगल आणि आदिलशाही सैन्यांचा धान्यपुरवठा बंद झाला आणि त्यांची उपासमार होऊ लागली. उपासमारीने हैराण झालेले अनेक मोगल सैनिक मलिक अंबरला येऊन मिळाले. मलिक अंबरच्या काही टोळ्यांनी त्यानंतर शत्रुसैन्यावर वेळीअवेळी प्राणघाती गनिमी हल्ले चढवून त्यांना बेजार करून टाकले.

शेवटी मलिक अंबरने बेसावध आणि असाहाय्य शत्रुसेनांवर पारंपरिक हल्ला चढवण्याचे ठरवले. पावसाळा संपल्यावर १६२४च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये मलिक अंबरच्या सेनेने मोगल सैन्यावर अचानक करारी हल्ला चढवला. शत्रूचे सैन्य मोठ्या प्रमाणात कापले गेले. त्यांचा सेनापती मुल्ला महंमद मारला गेला. ते पाहून आदिलशाहीच्या सैन्याने पलायन केले. उदाराम आणि जाधव वगैरे सरदार रणांगण सोडून निघून गेले. इखलासखान आणि त्याच्याबरोबर पंचवीस आदिलशाही सरदार, त्याचप्रमाणे मोगलांचे लष्करखान, मिर्झा मनुचिहर आणि अकीदतखान हे अंबरला शरण गेले. मलिक अंबरचा हा विजय नेत्रदीपक होता.

इतक्या मोठ्या संख्येच्या आणि प्रबळ शत्रूवर मलिक अंबरच्या मोजक्या सैन्याने विजय मिळवला, याचे एकमेव कारण म्हणजे निजामशाहीच्या सैन्याचे बुद्धिमंत डावपेच. याच्यामागे प्रामुख्याने शहाजींनी मलिक अंबरला दिलेला छुप्या डावपेचांचा सल्ला होता. भातवडीच्या युद्धात शहाजींनी महत्त्वाची कामगिरी बजावली. वेगवेगळे डावपेच आखण्यात आणि ते तडीस नेण्यात शहाजी अग्रस्थानी होते. त्यांचीही सर्वत्र प्रसिद्धी झाली आणि त्यांची प्रतिष्ठा शिगेस पोचली. मलिक अंबरवर चहूकडे स्तुतिसुमने उधळली गेली. कोणताही जबाबदार निजामशहा त्यावेळी गादीवर नसूनही मलिक अंबरने एकट्याने निजामशाही वाचवली होती.२३

मलिक अंबरच्या पंचवीस वर्षांच्या कार्यकाळात मालोजी व शहाजी हे निजामशाहीचे सरदार पितापुत्र त्याच्या निकट सान्निध्यात होते आणि त्याच्या यशात त्या दोघांचा सिंहाचा वाटा होता. याचबरोबर गनिमी कावा ही नवी रणनीती म्हणून नावारूपास आली. मोगलांसारख्या बलवत्तर फौजेला कमी संख्येची, परंतु प्रेरणेने पेटलेली आणि बुद्धिमंत नेतृत्व लाभलेली सेना नाकी नऊ आणू शकते, हे सिद्ध झाले. पुढे याच्यातूनच प्रेरणा घेऊन शिवाजीराजांनी गनिमी काव्याच्या डावपेचाची रचना केली व त्याकरवी शक्तिशाली मोगल सत्तेला गुडघे टेकावयास लावले. शिवाजीराजांच्या या हुकमी डावपेचाचा उगम त्यांच्या पित्याच्या भातवडीच्या युद्धयोजनेत होता, हे विसरता कामा नये.

शहाजी प्रथम आदिलशाहीत व परत निजामशाहीत

भातवडीच्या लढाईत शहाजींच्या डावपेचांना आणि पराक्रमाला जरी मलिक अंबरने दाद दिली, तरी त्याबरोबर मलिक अंबरच्या मनात शहाजींच्या त्या युद्धातील त्याच्यापेक्षा सरस कर्तृत्वामुळे एक न्यूनगंड निर्माण झाला. हा तडफदार आणि पराक्रमी सरदार आपल्या वझीरपदालाच तर आव्हान देणार नाही ना, अशी भययुक्त शंका त्याच्या मनात वारंवार डोकावू लागली. कदाचित त्याच जाणिवेमुळे किंवा इतर कारणांमुळे मलिक अंबर शहाजींचा हेतुपुरस्सर आणि चार लोकांत अपमान करू लागला. शहाजींसारखा अभिमानी आणि कर्तबगार सरदार हे कधीच खपवू शकला नसता. त्याचमुळे वा मलिक अंबरने त्यांची पुण्याची जहागीर काढून घेतल्यामुळे (याला भक्कम पुरावा नाही.) शहाजींनी आदिलशहाशी संधान जोडले आणि आदिलशाहीत त्यांना नोकरी मिळेल का, याची चाचपणी केली. शहाजींसारखा मूल्यवान सरदार कोणाला नको असेल? त्यांना आदिलशहाने ताबडतोब होकार कळवला. १६२५मध्ये निजामशाही सोडून शहाजींनी आदिलशाहीत नोकरी पत्करली.

आदिलशहाने शहाजींची सरलष्करपदी नेमणूक केली आणि मावळातील प्रदेशाचा ताबा घेण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपवली. हे त्यांच्या पथ्यावर पडले; कारण ती कामगिरी बजावताना आपल्या पुणे-सुपे जहागिरीच्या मालकीची शहानिशा करून घेणेही त्यांना शक्य होणार होते. पुण्याजवळील मावळ प्रदेशावर आदिलशाही आणि निजामशाही दोन्हीही आपापले हक्क सांगत असत. आदिलशहाने जेव्हा त्याचा ताबा घेण्यासाठी शहाजींना पाठवले, तेव्हा मलिक अंबरने कानदखोऱ्याच्या मरळ देशमुखला शहाजींचा सामना करण्यासाठी धाडले. ४ फेब्रुवारी १६२६ला झालेल्या या लढाईत कोणाला विजय मिळाला, ते कळत नाही; परंतु शहाजी त्यावेळी काही आपली जहागीर परत घेऊ शकल्याचा उल्लेख नाही.

१६२६ ते १६२८ हा कालावधी हिंदुस्तानासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. त्या दरम्यान तीन सत्ताबदल घडून आले. १४ मे १६२६ रोजी मलिक अंबर मरण पावला आणि त्याच्या जागी त्याचा पुत्र फत्तेखान निजामशाहीचा वझीर आणि सर्वेसर्वा झाला. १२ सप्टेंबर १६२७ला इब्राहिम आदिलशहाचा मृत्यू झाला. २९ ऑक्टोबर १६२७ ला जहांगीर बादशहाचा मृत्यू झाला. आपल्याला गादीपासून दूर ठेवण्याचे नूरजहानचे कारस्थान हाणून पाडून शहाजहान तातडीने आग्र्याला पोचला आणि ४ फेब्रुवारी १६२८ला हिंदुस्तानचा बादशहा झाला.

इब्राहिम आदिलशहाच्या मृत्यूमुळे शहाजींचा प्रमुख चाहता गेला. इकडे निजामशाहीचा वझीर फत्तेखान दाभोळवरील आदिलशाहीचा हल्ला परतवू न शकल्याने सुलतान मूर्तझाने फत्तेखानाला कैदेत टाकले आणि शहाजींना निजामशाहीच्या नोकरीत परत बोलावून पुणे-सुप्याची जहागीर त्यांना सुपूर्द केली.

खानजहान लोदी हा अफगाण सरदार शहाजहानच्या वाईट दिवसांत नूरजहानच्या आदेशांवरून त्याच्या मागावर होता. शहाजहान भविष्यात बादशहा होईल, अशी त्याने कल्पनाही केली नव्हती आणि त्याच्याशी कट्टर शत्रुत्व पत्करले होते. बादशहाच्या तख्तावर आरूढ झाल्यावर पुढच्याच वर्षी १६२९च्या अखेरीस शहाजहानने दक्षिणेत मोहीम काढली. त्यामागे लोदीचा काटा काढणे आणि निजामशाहीचा प्रदेश मोगलांच्या हातांखाली आणणे ही दोन उद्दिष्टे होती. मार्च १६३० ते मार्च १६३२ ही दोन वर्षे शहाजहानने बुऱ्हाणपुरात मुक्काम ठोकला. त्या काळात दक्षिणेत पावसाच्या अभावी दुष्काळ पडला. त्यादरम्यान शहाजहानची पत्नी मुमताजमहल मरण पावली.

निजामशाहीचे शहाजी भोसले, म्हालदारखान, खानजहान, उमरखान वगैरे सरदार मुकर्रबखान या सरसेनापतीच्या हाताखाली मोगलांचा सामना करण्यासाठी नियुक्त झाले. जाधव कुटुंबाने ऐन वेळी काही खोड घालू नये म्हणून निजामशहाने त्यांना पकडून अटकेत ठेवण्याचा विचार केला. त्यासाठी २५ जुलै १६२९ रोजी त्यांना दौलताबाद किल्ल्यावर भेटीसाठी बोलावण्याचा बहाणा करण्यात आला. ते पोचल्यावर त्यांना पकडत असता बखेडा माजला आणि लखुजी, त्याचे दोन पुत्र आणि नातू मारले गेले.

शहाजींची द्विधा मनस्थिती

१६३०मध्ये शहाजहानने निजामशाहीवर हल्ला सुरू केला. १६३१मध्ये दर्याखान आणि खानजहान मारले गेले. मुरार जगदेव, रणदुल्लाखान आणि कान्होजी जेधे या आदिलशाहीच्या सरदारांनी पुणे प्रांतावर चालून जाऊन शहाजींची जहागीर उद्ध्वस्त केली. सासऱ्याच्या कुटुंबाची झालेली अवस्था पाहून शहाजी विद्ध झाले होते आणि असुरक्षिततेची भावना त्यांना अस्वस्थ करू लागली होती. त्याच सुमारास आझमखान त्यांना मोगलांना येऊन मिळण्याचे संकेत पाठवत होता. अखेरीस त्यांनी आझमखानाला आपला होकार कळवला. खानाने बादशहाकडून संमती घेऊन शहाजींना पाच हजारी मनसबदारी आणि इतर मानसन्मान देऊ केले. त्यानंतर शहाजी मोगलांच्या नोकरीत रुजू झाले.

मोगलांच्या सेना निजामशाहीचे परगणे जिंकू लागली. निजामशहा मूर्तजाने आपल्या पत्नीच्या नादाने तिचा भाऊ फत्तेखान याला तीन वर्षांच्या तुरुंगवासातून मुक्त करून त्याला वझिरी दिली. परंतु दोघांचे न पटल्यावर मूर्तजालाच फत्तेखानाने स्थानबद्ध केले. दोन महिन्यांतच मार्च १६३१मध्ये मूर्तजा निजामशहाचा खून झाला. फत्तेखानाने मूर्तजाचा अल्पवयीन मुलगा हुसेन निजामशहा याला गादीवर बसवले आणि मोगलांशी तहाची बोलणी सुरू केली. मोगलांनी त्याला खूष करण्यासाठी शहाजींची जहागीर त्याला दिली. यावर रागावून शहाजींनी मोगलांची साथ सोडायचे ठरवले आणि ते पुन्हा निजामशाहीच्या सेवेत रुजू झाले. या दरम्यान शहाजींनी दोन-

अडीच वर्षे मोगलांच्या ताबेदारीत काढली होती.

शहाजींची निजामशाही वाचवण्यासाठी धडपड

मोगलांचा सरदार आसफखान याने विजापूरवर केलेला हल्ला परतवल्यानंतर सर्वच दक्षिणी सत्ता एक झाल्या, तर आपण मोगलांना हरवू शकतो, असा एक विश्वास त्यांच्यात निर्माण झाला. फत्तेखान काही भक्कम पावले उचलण्यास असमर्थ असल्यामुळे शहाजींनी रणदुल्लाखान आणि मुरार जगदेव यांच्यामार्फत आदिलशहाशी संपर्क साधला आणि मोगलांवर चढाई सुरू केली. परंतु त्यांनी फारशी प्रगती साधली नाही. मार्च १६३३मध्ये शहाजहानचा सेनापती महाबतखान याने दौलताबादवर हल्ला केला. रणदुल्लाखान आणि शहाजींनी शिकस्त करूनही जून १६३३मध्ये महाबतखानाने तो जिंकला. त्याने त्यानंतर हुसेन निजामशहाला बादशहाकडे पाठवले.

परंतु शहाजींनी हार मानली नाही. रणदुल्लाखान आणि मुरार जगदेव यांच्या साहाय्याने मोगलांवर हल्ले चालू ठेवले. महाबतखानाने शहाजींना धडा शिकवण्यासाठी जुन्नरच्या किल्ल्यावर असलेल्या त्यांच्या पत्नी जिजाबाई आणि बालशिवाजी यांना पकडण्याची म्हालदारखानामार्फत योजना बनवली, त्याचा माग लागल्याने जिजाबाईंनी बालशिवरायांना गुप्तपणे शिवापुरास पाठवून दिले. जिजाबाईंना पकडण्यात आले, परंतु त्यांचे चुलते जगदेवराव जाधव यांनी ‘जिजाबाईंच्यात आणि शहाजींच्यात वाकडे असल्यामुळे जिजाबाईंना पकडले, तर शहाजींना त्याबद्दल उलट आनंदच होईल’, अशी खोटी बतावणी करून त्यांची सुटका करवली, असा बखरींत उल्लेख आहे. त्याला ग्रांट डफ आणि किंड या दोघांनीही दाखल्याच्या आधारे दुजोरा दिला आहे.२४

दौलताबादचा किल्ला जरी हातातून गेला, तरी शहाजी हार मानायला तयार नव्हते. त्या किल्ल्याच्या पश्चिमेकडील डोंगराळी प्रदेशात सैन्य तैनात करून अहमदनगरच्या पश्चिमेस असलेल्या पेमगडची (भीमगड) औट घटकेच्या राजधानीसाठी शहाजींनी निवड केली आणि निजामशहाच्या कुटुंबातील एका नातलगाला १६३३च्या सप्टेंबर महिन्यात गादीवर बसवून त्यांनी निजामशाही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्या शहाला अधिक सुरक्षिततेसाठी त्यांनी माहुली किल्ल्यावर हलवले. त्यांनी औसापासून गोदावारीपर्यंतचा परिसर आणि त्यातील संगमनेर, जुन्नर वगैरे किल्ले आपल्या नियंत्रणाखाली घेतले. वेगवेगळ्या सरदारांना निजामशाहीत आणण्याचा प्रयत्न सुरू केला आणि काही अंशी तो यशस्वीही होऊ लागला. मोगलांना नर्मदेच्या दक्षिणेत येऊ द्यायचे नाही, याबद्दल त्यांनी थोड्या काळासाठी का होईना, सर्वांच्यात नवीन आत्मविश्वास निर्माण केला. शहाजींचा हा पुढाकार एका नव्या पायंड्याचा अविष्कार होता. यातूनच महाराष्ट्र देशाची आणि स्वराज्याची कल्पना अवतरली, असे म्हणणे चूक होणार नाही.

महाबतखानाने शहाजींच्या वाढत्या शक्तीला अडसर घालण्यासाठी आदिलशाही आणि निजामशाहीमध्ये फूट पडण्याचे ठरवले. आधी निजामशाहीकडे आणि त्यानंतर आदिलशाहीपाशी असलेला अभेद्य परिंडा किल्ला घेतला, तर हे साधू शकेल, असे त्याला

वाटत होते. त्याने शहाजहानकडून त्यासाठी कुमक पाठवण्याची मागणी केली. बादशहाला ही कल्पना पसंत पडली आणि पुत्र शुजाच्याबरोबर त्याने प्रचंड सैन्य पाठवले. तो पोचताच महाबतखानाने बुऱ्हाणपूर ते बीडपर्यंत मोर्चेबंदी केली आणि परिंड्यापाशी तो व शुजा दाखल झाले. परंतु शहाजी आणि आदिलशाही सरदारांनी मिळून मोगल सेनेची सर्व बाजूंनी नाकेबंदी करून त्यांच्या सभोवताली घेरा टाकला. मोगल सैन्याची उपासमार झाल्यामुळे ते परिंडा काबीज करू शकले नाही आणि बुऱ्हाणपूरला परतले.

शहाजींनी केलेली मोगल सैन्याची पीछेहाट पाहून शहाजहान अस्वस्थ झाला आणि स्वत: मोहीम काढून शहाजींना अडसर घालण्याचा त्याने निर्णय घेतला. सप्टेंबर १६३५मध्ये तो आग्र्याहून औरंगजेब, जयसिंह आणि शाईस्ताखान वगैरेंसह मोठ्या सैन्यानिशी निघाला. दक्षिणेत आल्यावर जुन्नर, संगमनेर वगैरे गावे त्याने काबीज केली. मग त्याने कारभार औरंगजेबाकडे सोपवला आणि स्वत: सेना घेऊन शहाजींचा पाठलाग करू लागला. शहाजींची आदिलशाही आणि कुतुबशाहीबरोबरची नाळ तोडण्यासाठी त्याने दोघांना आपल्या बाजूला येण्याचे दरडावणीवजा फर्मान पाठवले. कुतुबशहाला हे पुरेसे होते. त्याने शहाजहानला मागितलेली खंडणी देण्याचे मान्य केले, बादशहाच्या नावाने खुत्बा पढणे चालू केले, त्याच्या नावाची सोन्याची नाणी पाडली आणि शहाजहान त्याच्या बोलावण्यावरून कुतुबशहाला ९ एप्रिल १६३६ला भेटला.

आदिलशहाला मात्र शहाजींची कदर असल्याने त्याने शहाजहानच्या फर्मानाकडे दुर्लक्ष केले. उलट रणदुल्लाखानाबरोबर फौज देऊन त्याला शहाजींच्या मदतीला पाठवले. दुर्दैवाने शहाजींपाशी पोचण्याआधीच त्याला गाठून मोगलांनी रणदुल्लाचा पराभव केला. परंतु विजापूरपर्यंत पोचण्यास मोगल असमर्थ ठरले. त्या दरम्यान शहाजी सर्वांना चुकवून निजामशाहीचा वारस आणि आपल्या कुटुंबासह माहुली किल्ल्यावर पोचले. आदिलशहा बधत नाही, हे पाहून शहाजहानने ६ मार्च १६३६ला सय्यीदखान जहानबरोबर १०,०००ची फौज देऊन त्याला सोलापूरच्या बाजूने आणि खान डौरान व खान झमानला बिदर आणि इंदापूरच्या बाजूने आगेकूच करत आदिलशाहीचा प्रदेश बेचिराख करण्याचा हुकूम दिला. हे पाहिल्यावर मात्र आदिलशहानेही शरणागती पत्करली.


मोगल-आदिलशहा यांचा तह

शहाजहानने आदिलशहाकडे एप्रिल १६३६मध्ये तहाची बोलणी करण्यासाठी आपला वकील पाठवला. जर आदिलशहाने शहाजीवर नियंत्रण ठेवले आणि त्याच्या हातात असलेले किल्ले परत मिळवले, तर निजामशाहीच्या प्रदेशाची वाटणी मोगल आणि आदिलशाही या दोघांमध्ये करण्याचा प्रस्ताव शहाजहानने आदिलशहापुढे ठेवला. आदिलशहा या तहाला राजी झाला. मे १६३६मध्ये झालेल्या त्या तहानुसार भीमेच्या पलीकडील प्रदेश, वांगी, सोलापूर आणि परिंडा किल्ले आणि कोकणातील निजामशाहीचा किल्ल्यांसहित सालाना एकूण २० लाख होन उत्पन्न असणारा प्रदेश आदिलशाहीला देण्याचे कबूल करण्यात आले. उरलेला निजामशाहीचा इलाखा मोगल साम्राज्यात समाविष्ट व्हायचा होता.२५ (नकाशा क्र. ४ पाहा.) तहावर सह्या

झाल्यानंतर शहाजहान औरंगजेबाच्या मदतीस खानजमान आणि खानडौरान यांना सोडून जुलै १६३६मध्ये दौलताबादला गेला.

नकाशा क्र. ४

निजामशाहीचे विभाजन : इ.स.१६३६



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

शहाजी पुन्हा आदिलशाहीत

करारानुसार आदिलशहाने रणदुल्लाखानाला शहाजींच्या बंदोबस्तासाठी पाठवले. त्याचा सरदार खानजमान माहुली किल्ल्यावर चालून गेला आणि त्या किल्ल्याला त्याने वेढा घातला. शहाजी आता एकटे पडले होते. तरीही बरोबरच्या तीन-चारशे लोकांच्या साहाय्याने त्यांनी किल्ला तीन महिने लढवला. 'पेमगिरी किल्ला लहान याकरता पातशाहास घेऊन माहुलीस गेले. फौजेनिसी राहिले. तेथे रणदुल्लाखान व खानजमान दुतर्फा वेढा घालून बैसले. कान्होजी नाईक जेधे रणदुल्लाखानासमागमे होते, त्यांणी अंतस्थे शहाजी महाराजाशी राजकारण राखिले होते. किल्ल्यावरी सामान नाही. लोकांस उपास पडो लागले, किल्ला जेर जाहला. तेव्हा महाराजांनी सल्ल्याची बोली घातली.'२६ त्याला आदिलशहाने संमती दिल्यानंतर रणदुल्लाची भेट घेऊन सहा किल्ले आणि निजामशहा यांना शहाजींनी खानजमानकडे सुपूर्द केले. त्याच्या बदल्यात शहाजींनी आदिलशाहीत बारा हजार स्वारांनिशी चाकरी करून वजिरी करावी, असे ठरले. शहाजहानलाही शहाजींच्याबद्दल आदर होता आणि त्यांचा पाडाव झाल्यावर त्यांना आदिलशाहीत नोकरी द्यावी, असे त्यानेच सुचवले होते. त्यानंतर शहाजींनी रणदुल्लाबरोबर

ऑक्टोबर १६३६मध्ये विजापूरला प्रयाण केले आणि आदिलशहाच्या नोकरीत ते रुजू झाले. पुणे प्रांताची जहागीर शहाजींच्याकडे ठेवण्यात आली.

शहाजी एकामागून एक मोगल, कुतुबशाही आणि त्यानंतर आदिलशाहीबरोबर एकट्याने लढत राहिले. पण शेवटी त्यांना आदिलशाहीतच आश्रय घ्यावा लागला. या संबंधात खालील उल्लेख जेधे शकावलीत आहे. 'शके १५५७ (१५५८ पाहिजे) शहाजी राजे भोसले यांसी बारा हजार फौजेची सरदारी इदलशहाकडून झाली. सरंजामास मुलुख दिल्हे त्यात पुणे देश राजांकडे दिल्हा. त्यांनी आपले तर्फे दादोजी कोंडदेऊ मलठणकर यांसी सुभा सांगून पुणियास ठाणे घातले, तेव्हा सोन्याचा नांगर पांढरीवर धरला, शांति केली. मग दादाजीपंती पुणे कसब्याची व गांवगन्नाची वसती केली. कौल पाच वर्षे दिल्हे. सहावे साली तनखा घेतला. शहाजी राजे विजापूर प्रांती गेले.'२७ 'पुणे हे मराठी राज्याचे केंद्र कसे बनले आणि युद्ध थांबताच शहाजींचे लक्ष मुलुखाच्या आबादनीकडे कसे लागले, हे यावरून दिसून येईल. शहाजींचा गेल्या पंधरा वर्षांचा संघर्ष काही काळासाठी का होईना, संपुष्टात आला होता. त्यांच्या पत्नी जिजाबाई आणि पुत्र शिवाजी यांना पुण्यास स्थायिक करून आणि त्यांच्या कारभाराची नीट व्यवस्था लावून शहाजी आपल्या पेशात गुंतण्यास आता मोकळे झाले होते.

शहाजींची आणि शहाजहानची तुलना तत्कालीन कवी जयराम पंडित खालील शब्दांत करतात,

'अरु उत्तर दच्छिन रच्छनको इत साहजि है, उत साहजहां'

(उत्तर दक्षिणेचे रक्षण करण्यासाठी इथे शहाजी आहेत, आणि तिथे शहाजहान.) यावरून शहाजींप्रती त्यावेळच्या जनतेच्या मनातील आदराची कल्पना येते.२८

१६३६अखेर महाराष्ट्राच्या नकाशात लक्षणीय बदल झाला होता. (नकाशा क्र. ५ पाहा) शहाजहानने निजामशाही नामशेष करून त्यातील प्रदेश मोगल आणि आदिलशाहीत वाटून


दिला होता. कुतुबशाही आणि आदिलशाही या दोन्ही शाह्या आता मोगलांच्या मांडलिक झाल्या होत्या. विजयनगर साम्राज्याचीही अनेक शकले झाली होती. महंमद आदिलशहा हा तरुण, चतुर आणि महत्त्वाकांक्षी होता. त्याच्या पदरी रणदुल्लाखान आणि शहाजी हे दोन कसलेले आणि कर्तबगार सरदार होते. त्यांच्याकरवी दक्षिणेतील छोट्या छोट्या संस्थानांचा प्रदेश हस्तगत करून, हिंदू धर्माचा पाडाव करून आणि संपत्ती लुटून आपल्या सुलतानशाहीचा विस्तार करण्याचा त्याचा विचार होता.

शहाजींनी १६३७ ते १६४०दरम्यान रणदुल्लाच्या साहाय्याने कर्नाटकात तीन स्वाऱ्या केल्या. दर वर्षी दसऱ्यानंतर मोहिमेसाठी बाहेर पडून पावसाळ्याच्या आधी ते परत येत असत. पहिली स्वारी मालनाड प्रांतातील इक्केरीवर झाली. तेथील पराक्रमी राजा वीरभद्राने जरी विरोध केला, तरी दोन महिन्यांत त्याचा पाडाव झाला. दुसऱ्या स्वारीदरम्यान रणदुल्लाखानाच्या हाताखाली शहाजी आणि अफझलखान हे दोघे होते. अफझलखानाला शिरे येथील भक्कम किल्ला सर करण्यासाठी पाठवण्यात आले. कस्तुरीरंग नाईकच्या त्या किल्ल्यास अफझलखानाने वेढा घातला. नाइकाने तहाची याचना केल्यावर अफझलखानाने त्याला भेटीस बोलावले. त्याला प्रतिसाद देऊन नाईक किल्ल्यावरून खाली उतरला असता अफझलखानने त्याला कपटाने ठार केले आणि संपत्ती घेऊन तो परतला. विश्वासघातकी सरदार अशी अफझलखानाची दुष्कीर्ती तेव्हापासूनच पसरली.

त्याचवेळी शहाजींना बंगलोर हस्तगत करण्यासाठी पाठवण्यात आले. तिथल्या केंपेगौडा नावाच्या प्रशासकाचा शहाजींनी पराभव केला. रणदुल्लाने शहाजींची बंगलोरचा कारभार पाहण्यासाठी नेमणूक केली. शहाजी त्यानंतर श्रीरंगपट्टणवर चालून गेले. तेथील कांतीराय वोडियार या अधिकाऱ्याला नमवून व त्याचीच पुन्हा तेथे नेमणूक करून शहाजी बंगलोरला परतले. रणदुल्लाच्या तिसऱ्या स्वारीत बसवपट्टणचा केंगनायक याचा शहाजींनी पाडाव केला. त्यांच्या या पराक्रमाबद्दल ‘शिवभारता’त वर्णन केले आहे. त्यानंतर चिक्कनायकहल्ली, बेलूर, टूमकुर, कांदळ, बाळापुर वगैरे काबीज करून आदिलशहाच्या फौजांनी प्रचंड मालमत्ता लुटली.

नकाशा क्र. ५

हिंदुस्तान इ.स.१६४०



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

या तीन स्वाऱ्यांत प्रचंड संपत्ती गोळा झाली. 'आपण दक्षिणचे सर्व राजे-महाराजे जिंकले, मोठ-मोठी मंदिरे धुळीस मिळवली, तीन वर्षांत सेतुबंध रामेश्वराची भक्ती करणाऱ्या काफरांचे निर्मूलन केले'', अशी दर्पोक्ती महंमदशहाने केल्याची नोंद विजापुराच्या इतिहासात सापडते.२९ आपल्या डोळ्यांसमोर घडणाऱ्या या हिंदुविरोधी कृत्यांबद्दल शहाजींच्या काय भावना असतील, याबद्दल मात्र कोठेच उल्लेख नाही. कदाचित शहाजींच्या आपल्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालील मोहिमेत अशा कोणत्याही प्रकारांना ते निर्धाराने पायबंद घालत असतील. परंतु एका बाजूस हिंदू मंदिरांच्या विध्वंसाबद्दल उघडपणे शेखी मिरवणाऱ्या या आदिलशाहीच्या सुलतानाचे शहाजी नोकर होते आणि दुसऱ्या बाजूला सुलतान त्यांचा मनस्वी चाहता होता व शहाजींच्या कर्तृत्वाबद्दल त्याला प्रचंड आदरही होता; हा विरोधाभास नाकारता येणार नाही. आपल्या धर्माची ही विटंबना पाहून या सुलतानशाहीची चाकरी करणारे हिंदू सैनिक सोडा, परंतु अनेक वरिष्ठ स्वाभिमानी हिंदू सरदारांच्या मनात क्षोभाचा प्रचंड डोंब उसळत असणारच. शहाजीसुद्धा त्याला अपवाद नसावेत. त्यातूनच पुढे स्वराज्याचा कोंब रुजला, यात संशय नाही.

त्यानंतर शहाजी बंगलोरला स्थायिक झाले आणि आदिलशाहीचे कर्नाटकातील प्रमुख कारभारी झाले. प्रथम बंगलोर आणि त्यानंतर बाळापूर व कोलारमध्येही ते राहिले. त्यांनी दख्खनमधून अनेक कुटुंबांना तिकडे नेले आणि त्यांना जबाबदारीची कामे सोपवली. शहाजींच्या कर्तबगारीवर विजापुरात आदिलशहा आणि लोकाभिमुख कारभारावर कर्नाटकात स्थानिक जनता प्रसन्न होती. दक्षिणेतील हिंदूंना स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यास वाव देऊन शहाजी स्वतंत्र राजाप्रमाणे राहू लागले.

मुस्लीम सत्तेत हिंदूंची दुरावस्था

हिंदुस्तानात मुस्लीम अल्पसंख्येत होते, त्यामुळे हिंदूंच्या सहकार्याशिवाय ते राज्य चालवूच शकत नव्हते. याच कारणासाठी त्यांनी हिंदूंना आपल्या मुलकी शासनात आणि सैन्यात प्रवेश देणे स्वाभाविक होते आणि ती संख्या यथावकाश मोठ्या प्रमाणात वाढत गेली. परंतु त्यामुळे मुस्लिमांचा हिंदूंच्या प्रती द्वेष आणि त्यांना दिली जाणारी हीन वागणूक यात मात्र काहीही फरक पडला नाही. कोणताही नवीन प्रदेश जिंकल्यावर हिंदूंना एकतर गुलाम म्हणून विकले जाई किंवा त्यांचे सक्तीने धर्मांतर तरी केले जाई. त्यांच्या स्त्रियांना मुस्लीम सरदारांच्या जनानखान्यांत पाठवले जाई, त्यांची धर्मस्थळे जमीनदोस्त करून त्यांचे मशिदींमध्ये रूपांतर केले जाई.

बहुसंख्य हिंदूंना शासनात भरती करूनही त्यांना कामे मात्र कमी दर्जाची दिली जात. वरिष्ठ जागांवर प्रामुख्याने मुस्लिमांची नेमणूक केली जाई. उदाहरणार्थ, अकबराच्या काळात एकूण २५२ मनसबदारांपैकी फक्त ३२ हिंदू होते.३० मुस्लीम सत्तेखालील सर्व मुस्लीमेतरांवर जिझिया नावाचा कर आकाराला जाई. तसाच निजामशाहीत सर्व हिंदूंवर 'झकात-इ-हिंदुवानी' हा कर लावला जाई. निजामशाहीत 'भुतफरोसी' हा आणखी एक कर लावला जाई. 'बुतपरवरिश' म्हणजे 'मूर्तिपूजा' या शब्दाचा हा अपभ्रंश.

हिंदूंच्या देवळांचा विध्वंस हा तर सर्व मुस्लीम सत्तांच्या धोरणाचा अविभाज्य आणि सामायिक भाग होता. 'बादशाहनामा'मधील १३ जानेवारी १६३३ची एक नोंद थोडक्यात अशी आहे, 'जहांगीर बादशाहाच्या आज्ञेनुसार बनारस आणि इतर ठिकाणी बांधली जाणारी देवळे ताबडतोब उद्ध्वस्त करण्यात यावीत आणि कोणतेही नवीन देऊळ बांधण्याची परवानगी नाकारली जावी.' या आदेशानंतर लागलीच निदान ५०० देवळे तरी जमीनदोस्त करण्यात आली असावीत.३१ आदिलशाहीतील विजापूरच्या पश्चिमेस काही अंतरावरच असलेल्या अफझलपूर या खेड्याजवळ एका कोनशिलेवर सरदार अफझलखानाची पुढील बिरुदावली कोरून ठेवली आहे : 'कातिल-इ-मुतामर्रीदन ओ काफरान' (काफरांचा कातिल) आणि 'शिकनंदा-इ-बुतान' (मूर्तिभंजक)'.३२ मूर्तिभंजनात आनंद मानणाऱ्या हिंदुद्वेष्ट्याकडून आणखी कुठली अपेक्षा करणार! कुतुबशाही आणि निजामशाहीमध्ये हीच परिस्थिती होती.

देवळे पाडून मशिदी बांधल्याची अनेक उदाहरणे सुप्रसिद्ध इतिहासकार डॉक्टर ग. ह. खरे यांनी दिली आहेत. आंध्र प्रदेशमधील नेलोर जिल्ह्यातील उदयगिरी डोंगरावर दोन मशिदी आहेत. त्यातल्या एकीवर हिजरी १०७१ या साली अब्दुल्ला कुतुबशहाच्या सत्ताकाळात हुसेनखान याने मंदिर तोडून तिथे मशीद बांधल्याची नोंद कोरली आहे.३३

सर जदुनाथ सरकार यांनी लिहिले आहे, "जे लढाईत मेले, ते तुलनेने भाग्यवान म्हणायचे! ....ज्या स्त्रिया जिवंत राहिल्या व पकडल्या गेल्या, त्यांच्या दुर्दैवाला पारावार नव्हता. त्या सामान्य नव्हत्या, राजांच्या आया व मुली होत्या! त्यांना भ्रष्ट करून जनानखान्यांत कोंबण्यात आले. तेथे एखादा दिवस धन्याची वासना तृप्त करण्याचे हृदयशून्य व प्रेमरहित साधन व्हायचे आणि बाकी सारा जन्म गृहिणीच्या वैभवाचा किंवा मातेच्या आनंदाचा अनुभव न घेता कैदखान्यातल्याप्रमाणे दु:खात कंठावयाचा!"३४

मुस्लीम सत्ताधीशांच्या अशा अनेक हृदयविदारक कथांनी इतिहासाची पानेच्या पाने भरून गेली आहेत. या हिंदू धर्मविरोधी कारवायांमुळे असाहाय्य आम हिंदू जनतेच्या मनातील अमर्याद विषाद आणि खदखदीची कल्पना येणे कठीण नाही.

एकात्म राष्ट्रीयतेचा अभाव

बाळशास्त्री हरदासांनी प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अधोगतीमागील कारणांचे मार्मिक विलेषण केले आहे : 'युद्धात कोणाला मारावे व कोणाला मारू नये, या संबंधात सूक्ष्म विवेक करणाऱ्या भारताच्या प्राचीन द्रष्ट्यांनी युद्धांनाही मानवी मूल्यांवर अधिष्ठित केले होते. सातव्या शतकापर्यंत या पद्धतीने जीवन घालवलेल्या हिंदूंवर त्यांच्या कल्पनासृष्टीतही न येणारी अशी ही इस्लामी आक्रमणाची टोळधाड इ.स. ७११मध्ये येऊन कोसळली; आणि तिच्या या अपरिचित स्वरूपामुळे भारतीय राष्ट्राला विलक्षण धक्का बसला. यावेळी वालीद नावाचा खलिफा इस्लामी जगताचे नियंत्रण करीत होता. त्याच्या आज्ञेवरून महंमद-बिन-कासीमने देवल बंदरावर स्वारी केली. त्या बंदरात एक मोठे मंदिर होते. त्या मंदिरावर एक ध्वज होता. कासीमने ज्यावेळी स्वारी केली, त्या वेळी त्या मंदिरातील मूर्तीच्या व वरील ध्वजाच्या सामर्थ्याने यवनांचा आपोआप पराभव होईल, अशा भाबड्या कल्पनेने तेथील राजा व

हिंदू स्वस्थ राहिले. शेवटी महंमदाने आपला मोर्चा प्रथम त्या देवालयावरच वळवून तेथील मूर्तीचे शतश: तुकडे केले आणि देवालय लुटलेच; परंतु त्याबरोबर लोकांची बेसुमार कत्तलही केली. असे सांगतात की, सरसकट स्त्रीपुरुषांची तो कत्तल करीत असताना त्याने आपल्यावर दया करावी म्हणून तेथील हिंदूंनी त्याची प्रार्थना केली; पण त्याने असे उत्तर दिले की, 'मला संरक्षणाची आज्ञा नसून केवळ कत्तलीची आज्ञा आहे.'३५ हिंदू समाजाच्या या मानसिक दुरवस्थेची, अस्मितेच्या ऱ्हासाची आणि प्रतिकारशक्तीच्या अभावाची कीव करावीशी वाटते.

हरदास पुढे म्हणतात, 'हिंदूंच्या या पराभवाचे मूळ पुष्कळ लोक बौद्ध व जैनांच्या आत्यंतिक अहिंसावादात शोधण्याचा प्रयत्न करीत असतात; पण हे खरे नाही. या संप्रदायाच्या आत्यंतिक अहिंसातत्त्वाचा प्रभाव त्यांच्या सर्वसामान्य अनुयायांच्या मनावरच जर पडला नाही, तर बहुजन समाजावर तो कोठून पडणार? हे मत चुकीचे आहे, हे सिद्ध करण्यास सम्राट हर्षवर्धनासारख्या दिग्विजयी बौद्ध सम्राटाचे पराक्रमच पुरेसे आहेत. हिंदूंच्या या पराभवाचे खरे कारण एकात्म राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव हे होते. संस्कृती आणि धर्म यांच्यावर केवढीही श्रद्धा असली व प्रत्येकाच्या व्यक्तिगत जीवनात धार्मिक पद्धतीने वागण्याची केवढीही आस्था दिसून येत असली, तरी आपण एका धर्माच्या, संस्कृतीच्या व जीवनदृष्टीच्या सूत्रात बद्ध असल्यामुळे एक आहोत, याची प्रखर जाणीव अंत:करणात जागृत नव्हती. समान संकटाच्या जाणिवेने तरी ती जागृत होण्याची आवश्यचकता होती. पण तसे घडले नाही.'३६

दहाव्या शतकाच्या उत्तरार्धात गझनीमध्ये तुर्की राजघराणे सत्तेवर आल्यानंतर अकराव्या शतकाच्या आरंभी गझनीचा राजा सुलतान महंमदाने हिंदू राजांचा पराभव साधून पंजाब पादाक्रांत केला आणि त्यानंतर मुस्लीम आक्रमकांनी प्रथम उत्तर आणि नंतर दक्षिण भारत व्यापून टाकला. यथावकाश मुस्लीम संस्कृती भारताशी एकजीव झाली. मुस्लीम आक्रमकांचा सरस अभिनिवेश, निग्रह, इच्छाशक्ती, बाहुबल आणि आपले वर्चस्व तलवारीच्या जोरावर प्रस्थापित करण्याच्या ईर्षेमुळे मुस्लिमांनी स्थानिक जनतेवर राजकीय व धार्मिक प्राबल्य प्रस्थापित केले. बाहेरून आलेल्या अल्पसंख्याक मुस्लिमांनी साम, दम, दंड आणि भेद हे सर्व डावपेच वापरून स्वत:चे रक्षण करण्यास असमर्थ असलेल्या हिंदू जनतेचे प्रचंड प्रमाणावर धर्मांतर केले. एवढेच नव्हे, तर धर्मांतरित मुस्लिमांचे वंशज बाहेरून आलेल्या मुस्लिमांपेक्षा अधिक कट्टरपणे धर्माचे पालन करू लागले आणि पूर्वकालातील आपल्या सहधर्मीयांचे धर्मांतर कसोशीने करू लागले. मुस्लीम धर्माच्या जिहाद शिकवणुकीचा तो एक भाग असल्यामुळे त्या सर्वांच्या मागे आध्यात्मिक अधिष्ठान होते.

धर्मांतराबरोबरच मुस्लीम आक्रमकांनी शासकीय उत्क्रांती घडवून आणली. सर्व शासकीय सूत्रे मुस्लिमांच्या हातांत एकवटल्यामुळे हिंदू जनतेला दुय्यम आणि खालच्या दर्जाची कामे करण्याशिवाय कोणताही पर्याय राहिला नाही; किंबहुना मध्यम पातळीच्या शासकीय पदांपर्यंत पोचण्यात आणि मुस्लीम नबाबांची मर्जी संपादन करण्यात ते धन्यता मानू लागले. स्वाभाविकपणे या राजकीय व सामाजिक प्रतिष्ठेच्या अवनतीमुळे आणि हिंदू धर्माच्या

विटंबनेमुळे मुस्लीम शासकांत आणि हिदू प्रजेत एक दरी निर्माण झाली. हिंदूंच्या मनात मुस्लीम प्रशासकांबद्दल घृणा निर्माण झाली.

परंतु सत्तेसाठी संघर्षामागे केवळ धार्मिक कारण होते, असे म्हणणे योग्य होणार नाही. इब्राहिमखान लोदी या मुसलमान दिल्लीपतीचा पराभव करून दुसरा मुसलमान बाबर दिल्लीपती झाला. हुमायून आणि शेरशहा हे एकमेकांचे शत्रू दोघेही इस्लाम धर्म मानणारे होते. विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंड्याच्या शाह्यांचे सुलतान मुसलमान होते. शहाजहानने निजामशाही संपवली, तर औरंगजेब आदिलशाहीबरोबर दीर्घकाळ लढला. धर्म महत्त्वाचा नव्हता, तर राज्य महत्त्वाचे होते. धर्माला महत्त्व असेल, तर दुय्यम होते. मुख्य गोष्ट राज्य होते.३७

हिंदू राजांचे लष्करी दौर्बल्य

शतकानुशतकांच्या मर्यादशीलता, सौहार्द आणि स्वागतशीलतेच्या सांस्कृतिक जोखडामुळे हिंदुस्तानातील राज्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या अणूरेणूंत एक मवाळपणा आणि अरुवारता भिनली होती. खैबरच्या वायव्येकडून आलेल्या मुस्लीम आक्रमकांची एककलमी धार्मिक कट्टरता त्यावर सहजगत्या मात करू शकली. त्यामुळे थोड्याफार विरोधानंतर मुस्लीम आक्रमकांनी हिंदुस्तानचा ताबा घेतला. हिंदू राजांची एकमेकांतील दुफळी आणि स्वार्थ यामुळे त्यांचे काम अधिकच सुलभ झाले. परंतु शिकंदरच्या आक्रमणाच्याही आधीपासून हिंदुस्तानातील सम्राट आणि राजांमधील आणखी एक त्रुटी या सपशेल पायधरणी व लोटांगणवृत्तीला कारणीभूत ठरली, ती म्हणजे त्यांचे लष्करी दौर्बल्य आणि विजिगीषू वृत्तीचा अभाव.

अभिनव युद्धतंत्र आत्मसात करण्याच्या कामात भारतीय नेतृत्व कमी पडले. 'अनुभवाने शहाणे व्हावे किंवा अलेक्झांडरच्या युद्धतंत्रापासून काही शिकावे, असे कोणाही हिंदू सेनापतीला कोणत्याही शतकात वाटले नाही. अनेक राजे-रजवाड्यांनी पुरवलेल्या पथकांनी मिळून हिंदूंचे अवाढव्य सैन्य तयार होत असे. आणि ते हत्तींच्या भ्रामक शक्तीवर अवलंबून राहत असे. याउलट पश्चिम आशियातून येणारी छोटी नि दमदार सैन्ये शस्त्रसज्ज व गतिमान अश्वदळावर भिस्त ठेवणारी असल्याने त्यांच्याकडून हिंदू सैन्याचा वारंवार पराभव झाला. अलेक्झांडर, महंमद घोरी, बाबर, अहमदशहा दुराणी व अन्य कुशल सेनापतींनी एकाच पद्धतीच्या युद्धतंत्राचा अवलंब करून फार मोठे संख्याबळ असलेल्या शूर हिंदू सैन्याचा सपशेल पराभव केला. हिंदूंची युद्धपद्धती ही जुन्या स्मृतींवर आधारित होती आणि हिंदूंच्या आपसातील संघर्षासाठी ती पुरी पडत असे. परंतु जातिसंस्थेचा अभाव असलेल्या व स्मृतिशास्त्राविषयी बेफिकीर असलेल्या पश्चिमेकडच्या राकट घोडेस्वारांच्या टोळधाडीपुढे मात्र ती कोसळून पडली. भारताचे हिंदुरक्षक शौर्य व मृत्यूविषयी बेफिकिरी या दोन गुणांत आक्रमकांपेक्षा कमी पडणारे नव्हते; परंतु युद्धतंत्रात त्यांची गुणश्रेणी कमी पडली आणि त्यामुळेच त्यांनी स्वातंत्र्य गमावले.'३८ पूर्वीच्या अनुभवाचा उपयोग करणे, नवनवीन युद्धतंत्रे आत्मसात करणे, युद्धतंत्रात परिस्थितीनुसार बदल करणे या गुणांत भारतीय राज्यकर्ते कमी पडले.

पृथ्वीराज व महंमद घोरी यांच्यातील लढाईत पृथ्वीराजाचा पराभव झाल्याने दिल्लीला तुर्की मुसलमान सुलतानांचे राज्य सुरू झाले. राणा संगा आणि बाबर यांच्यातील लढाईत राणा संगाचा पराभव झाल्याने दिल्लीमध्ये मोगल राजवटीचा पाया घातला गेला. रामराया आणि दक्षिणेतील मुसलमानी शाह्या यांच्यातील लढाईत रामरायाचा पराभव झाल्याने विजयनगरचे वैभवशाली हिंदू राज्य जमीनदोस्त झाले. या सर्व लढाया भारतीय इतिहासाला कलाटणी देणाऱ्या ठरल्या. विशेषकरून पहिल्या दोन लढाया घोडदळ आणि तोफखाना या दोन बलगुणकांचा प्रभावी वापर केल्यामुळे जिंकल्या गेल्या. प्रसिद्ध इतिहासकार आयर्विन म्हणतो, "युद्धातील विजयासाठी मोगल घोडदळावर अवलंबून राहात. अजस्र हत्ती आणि असंख्य बेशिस्त पायदळ यांनी मिळून तयार झालेले हिंदू सैन्य प्रथम तुर्की व नंतर मोगल आक्रमकांच्या अश्वदळाच्या हल्ल्यांपुढे मोडले. सैनिकांचे व्यक्तिगत शौर्य व लढाईला सरावलेले हत्ती यांचा काडीचाही उपयोग झाला नाही."३९

उत्तम संघटित अश्वदळ, आधुनिक तोफखाना, चाणाक्ष सैनिक व्यूहरचना आणि नावीन्यपूर्ण डावपेच यांच्या उत्तम संमिश्रणामुळे मुस्लीम आक्रमक श्रेष्ठ ठरले आणि त्यांनी हिंदू राजांना वारंवार पराभूत केले. या चतुश्रीच्या मुरब्बी जाणकाराची महाराष्ट्राला प्रतीक्षा होती.

स्फुल्लिंगाचा अवतार

पंधरा शतकांच्या या प्रदीर्घ सिंहावलोकनाचे येथे प्रयोजन काय, हा स्वाभाविक प्रश्न उद्भवतो. रथी-महारथी हिंदू सम्राटांनी आपापली साम्राज्ये शून्यातून उभी करूनही संपूर्ण भारतावर एकसंध आणि चिरस्थायी हिंदू राज्य निर्माण करण्याची बैठक घालण्याचे कर्तृत्व, दूरदृष्टी आणि क्षमता एकाही सम्राटात नव्हती. नेतृत्वात आणि जनतेत पराक्रम आणि शूरतेचा कोणताही अभाव नसूनही मुस्लिमांच्या लाटेला परिणामकारकतेने ते अडवू शकले नाहीत. हिंदू सम्राटांना आपल्या मातृभूमीत जे जमले नाही, ते खैबर खिंडीपार मूठभर सैन्यानिशी आलेल्या मुस्लीम राजांनी करून दाखवले आणि भारताच्या बहुव्यापी भागावर आपले अखंड साम्राज्य उभे केले. विजयनगर साम्राज्याचा दक्षिणेत एक स्वतंत्र, सर्वधर्मसमभावी आणि लोकाभिमुख हिंदू राज्याची निर्मिती करण्याचा प्रयोगही फसला. शहाजहान बादशहाच्या तोडीचे शहाजींसारखे सेनापती निर्माण होऊनही त्यांची अस्तिवासाठी एका सुलतानशाहीपासून दुसऱ्या सुलतानशाहीत ससेहोलपट होत राहिली. समधर्मीयांना दुय्यम वागणूक मिळत असताना, त्यांचे बळजबरीने धर्मांतर होताना आणि धर्मस्थानांचा विध्वंस होताना निमूटपणे पाहण्याशिवाय त्यांच्यासारख्या कर्तबगार सेनापतींना गत्यंतर नव्हते. एका लोकोत्तर आणि अलौकिक सेनानायकाच्या अवतारासाठी हा उचित संधिकाल होता.

सोळाव्या शतकाच्या अखेरीस मराठे, मग ते नागरिक असोत वा सैनिक असोत, हळूहळू आपले अस्तित्व प्रकट करू लागले होते, मग ते अगदी अल्प प्रमाणात का असेना आणि शासनकर्ते त्यांची दखल घेऊ लागले होते. अनेक मराठा सरदार प्रतिष्ठेच्या पदावर जाऊन पोचले होते. दक्षिणेच्या सुलतानशाह्यांमधील सैन्यात मराठा सैनिकांचे प्रमाण वाढले होते आणि गनिमी काव्याच्या डावपेचात ते वाकबगार झाले होते. मराठ्यांना हडेलहप्पीत आणि

मुत्सद्देगिरीत प्रदीर्घ शिक्षणाची सुवर्णसंधी लाभली होती. संत-कवींच्या शिकवणुकीमुळे मराठा समाज आपल्या आध्यात्मिक वारशाच्या जाणिवेने उत्तेजित झाला होता. यादव साम्राज्याच्या अस्तानंतर गेली आठ शतके बंदिवासात तडफणाऱ्या महाराष्ट्राच्या क्षितिजावर तांबूस तेज दृग्गोचर होऊ लागले होते.

एका युगपुरुषाच्या आगमनासाठी हा समुचित ब्राह्ममुहूर्त होता आणि महाराष्ट्राच्याच सुदैवाने नव्हे, तर साऱ्या भारताच्या सुदैवाने असा युगपुरुष अवतरला. खरोखरच जीवघेण्या संकटावर मात करण्याचे बळ त्याच्या अंगात आले कुठून? आजूबाजूचे लोक त्यांचा तोल गमावून बसले असताना डोके ताळ्यावर ठेवून आपल्या उद्दिष्टाचा मागोवा घेत राहण्याचे अवसान आले कुठून? इतरेजन संदेहाने ग्रासले असताना स्वत:वर अढळ विश्वास राखण्याची दृढता आली कुठून? स्वप्नांनी भारून जाऊनही स्वप्नांचा दास न होण्याचा वकूब गवसला कुठून? स्वत:च्या मूल्यांची इतरांनी उडवलेली धूळधाण साहण्याचे मनोबल आले कुठून? यश आणि अपयश या दोन्हींना एकाच तराजूत जोखण्याची स्थितप्रज्ञता लाभली कुठून? सगळी मिळकत एका झोकात वाऱ्यावर झुगारून देण्याचा आणि पुनश्च खेळ मांडण्याचा आवेश मिळाला कुठून?

काही प्रतिभावंतांत एक स्फुल्लिंग असतो - नेतृत्वाचा, धुरीणत्वाचा, जीवनात अग्रणी राहण्याच्या आणि बिनीचे स्थान मिळवण्याच्या दुर्दम्य आशावादाचा.४० अगदी तोच त्याच्यात होता!

तो तेज:पुंज स्फुल्लिंग भवानीमातेच्या आशीर्वादाने महाराष्ट्राला परवशतेच्या पाशातून मुक्त करण्यास आणि एक स्फूर्तिदायक इतिहास सुवर्णाक्षराने कोरण्यास जिजामातेच्या पोटी जन्म घेणार होता!

संदर्भ सूची

१. ज. द. जोगळेकर; भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा; मनोरमा प्रकाशन; पान ५५-५९.

२. माँटगोमरी, फील्डमार्शल व्हिसकौंट; अ हिस्टरी ऑफ वॉरफेअर; विल्यम मॉरो अँड कंपनी इंक; पान ४०५-४०६.

३. त्रयं. शं. शेजवलकर; संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने; मराठा मंदिर प्रकाशन; पान ६-८.

४. अलेन डॅनीएलू; अ ब्रीफ हिस्टरी ऑफ इंडिया; इनर ट्रॅडिशन्स, यू एस ए; पान १५६.

५. पुर्वोक्त; पान १६८.

६. पुर्वोक्त; पान १९४.

७. पुर्वोक्त; पान १९५.

८. बाळशास्त्री हरदास; पुण्यश्लोडक छत्रपती शिवाजी महाराज, भाग १; लाखे प्रकाशन; पान ३०.

९. गोविंद पानसरे; शिवाजी कोण होता?; लोकवाङ्मय गृह; पान ३२ वर उद्धृत.

१०. बाळशास्त्री हरदास, पुण्यलोक..,पान ३४. उद्धृत 'थॉटस् ऑन पाकिस्तान',

डॉ. आंबेडकर.

११. बी जी कुंटे; महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स, हिस्टरी, पार्ट २-मीडिएव्हल पीरियड; पान ७.

१२. अलेन डॅनीएलू; अ ब्रीफ ....; पान २२७.

१३. पुर्वोक्त; पान २२९-२४९

१४. विल ड्यूरंट; द स्टोरी ऑफ सिव्हिलायझेशन, आवर ओरिएंटल हेरीटेज २; सायमन अँड शूस्टर, न्यूयॉर्क, पान ४५४-५५.

१५. ज. द. जोगळेकर, भारतातील.............; पान ८०-८१.

१६. पुर्वोक्त; पान ८०-८१.

१७. पुर्वोक्त; पान ९८-१०१.

१८. बी जी वुंटे; महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स, हिस्टरी, पार्ट २- मीडिएव्हल पीरियड; पान १०.

१९. पुर्वोक्त; पान ११.

२०. पुर्वोक्त; पान १४.

२१. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत, खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान ३२.

२२. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत,...; पान ३६. उद्धृत शिवदिग्विजय बखर, पान ३७-४४.

२३. पुर्वोक्त; पान ५१-५३.

२४. पुर्वोक्त; पान ७०/७१.

२५. गजानन मेहेंदळे; शिवाजी हिज लाइफ अँड टाइम्स; परममित्र पब्लिकेशन्स; पान १२२.

२६. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत..........; पान ८२.

२७. पुर्वोक्त; पान ८२.

२८. पुर्वोक्त; पान ८३.

२९. पुर्वोक्त; पान ९३.

३०. गजानन मेहेंदळे; शिवाजी ....; पान ५१. उद्धृत ऐन-इ अकबरी खंड १, पान ६०४.

३१. पुर्वोक्त; पान ५२. उद्धृत बादशहानामा, खंड १, पान ४५२.

३२. पुर्वोक्त; पान ५३. उद्धृत विजापूर इन्स्क्रिप्शन्स पान ८२.

३३. पुर्वोक्त; पान ५३.

३४. बाळशास्त्री.... ; पुण्यलोक ..; भाग१; पान ४१. उद्धृत हिस्टरी ऑफ औरंगजेब २, पान २७.

३५. पुर्वोक्त; पान २९/३०.

३६. पुर्वोक्त; पान ५७.

३७. गोविंद पानसरे; शिवाजी कोण.......; पान ३१.

३८. ज. द. जोगळेकर; भारतातील..............; पान २४; उद्धृत ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया.

३९. पुर्वोक्त; पान १३-१५.

४०. शशिकांत पित्रे; भास्कर सोमण : नौसेनेचे सरखेल; राजहंस प्रकाशन; पान ६-१०.



२.
स्वराज्याची स्थापना



शिवरायांचा जन्म आणि बाळपण

शिवरायांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर शके १५५१च्या फाल्गुन वद्य तृतीयेला मध्यरात्री झाला, म्हणजे १६३०च्या फेब्रुवारी महिन्याच्या १९ तारखेला. शिशिर ऋतूमधील बोचरी थंडी, फाल्गुन महिन्यातील आल्हाददायक वातावरण आणि शिवनेरीवरील निसर्गाचा वरदहस्त यांचा तो अप्रतिम संगम. शिवबांच्या त्या मंगल जन्मदिनी महाराष्ट्राच्या क्षितिजावर एका आशादायक युगाच्या पुण्याहवाचनाचे मधुर स्वर चारी दिशांत पसरले होते.

शहाजी आणि जिजाबाईंना एकूण सहा मुले झाली, परंतु त्यांतील वाचली दोनच; थोरले संभाजी आणि धाकटे शिवाजी. वडील पुत्र संभाजींचा जन्म १६१९मध्ये दौलताबाद येथे झाला आणि सर्वांत धाकट्या शिवरायांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर. शिवनेरीवरील शिवाईच्या वृपेमुळेच या मुलाचा जन्म झाला, या भावनेने जिजाबाईंनी त्यांचे नाव शिवाजी ठेवले असावे. 'शिवनेरीला जन्म झाल्यामुळे शिवाजी, असे नाव ठेवण्यात आले,' असे 'शिवभारत'कार परमानंद यांनी म्हटले आहे :

> *'यत: शिवगिरेर्मूर्ध्नि जात: स पुरुषोत्तम: ॥*
> *तत: प्रसिद्धा लोकेऽस्य शिव इत्यभिधाऽभवत्' ॥ १*

शिवभारताच्या सहाव्या अध्यायात नवजात बालकाचे मनमोहक वर्णन केले आहे. 'शालिवाहन शके १५५१ शुक्ल नाम संवत्सरी उत्तरायणात शिशिर ऋतूमध्ये फाल्गुन वद्य तृतीयेला रात्री शुभ लग्नावर, अखिल पृथ्वीचे साम्राज्यवैभव व्यक्त करणारे पाच ग्रह अनुकूल व उच्चीचे असताना तिने अलौकिक पुत्ररत्नास जन्म दिला. त्याचे लावण्य अपार, वर्ण सुवर्णासारखा, शरीर निरोगी, मान अत्यंत सुंदर व खांदे उंच होते; त्याच्या कपाळावर सुंदर कुंतलाग्रे पडल्यामुळे ते मोहक दिसत होते. त्याचे नेत्र कमळाप्रमाणे सुंदर, नासिका ताज्या पळसाच्या पुष्पासारखी, मुख स्वभावत:च हसरे, स्वर मेघासारखा गंभीर, छाती विशाल आणि बाहू मोठे होते.'

दुर्दैवाने त्याच काळात महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. शहाजींशी वाकडे आल्याने आदिलशहाच्या हुकमावरून मुरार जगदेव या सरदाराने पुणे शहरावर घाला घालून ते उद्ध्वस्त केल्याचा आणि त्याच्यावर गाढवाचा नांगर फिरवल्याचा उल्लेख यापूर्वी आला आहेच.

बाल शिवाजी शिवनेरीवर मातेच्या संगोपनाखाली वाढत होता आणि त्याला चांगले बाळसे चढले होते. त्याचे काव्यपूर्ण वर्णन बखरींमध्ये आढळते. तो अत्यंत गोंडस दिसत असे आणि त्याची छबी कमालीची मनमोहक होती. त्याच्या अंगावर घातलेली रत्ने चमकत असत. मोत्यांत मढवलेले त्याचे सोनेरी कुंचडे त्याच्या डोक्यावर घातलेले असे. चमकदार मोत्यांच्या हाराच्या टोकास लोंबणारे सोन्याचे पिंपळपान त्याच्या कपाळावर रुळत असे. रत्नमाणकांची बाहुभूषणे अंगावर झळाळत असत. पाचूने जडित, अणकुचीदार वाघनखे पटवलेली काळी पोत बाळाच्या गळ्यात शोभिवंत दिसत असे. जीवंतिका देवीची सुवर्णप्रतिमा त्याच्या छातीवर रुळत असे. पोव आणि नीळ यांनी संमिश्रित सुवर्णमाला त्याच्या मनगटावर बांधलेल्या असत. त्याच्या कमरेला चांदीचा करगोटा असे. पायांत लखलखीत वाळे आणि चकाकणारे रत्नजडित चाळ होते. काजळाने माखलेले काळेभोर डोळे आणि मध्यभागी तीट लावलेले रुंद कपाळ त्याला शोभत असे.२

जिजाबाईंचे शिवजन्माच्या आधीचे दिवस कष्टमय परिस्थितीत गेले होते. १६२९मध्ये त्यांच्या वडलांच्या आणि भावाच्या निर्दय हत्येचे क्लेश त्यांना सहन करावे लागले होते. भोसले आणि जाधव घराण्यांतील कट्टर वैरामुळे त्यांचा माहेरचा आधार तुटला होता. १६३२-३३मध्ये मोगलांच्या हातांत पडूनही त्यांनी आपली हिकमतीने सुटका करून घेतली होती. शहाजींचा शिवजन्मानंतरचा काळ धावपळीतच गेला होता. पतीच्या अनुपस्थितीत आपल्या बालकाच्या संगोपनाचे आणि प्रशिक्षणाचे आव्हान जिजाईंनी धीराने आणि कार्यक्षमतेने पार पाडले. त्यांचा धीरगंभीर स्वभाव, धैर्य, साहस आणि परिस्थितीपुढे कधीही हार न मानण्याचा बाणा या त्या वीरपत्नीला माहेरच्या जाधव कुळाच्या देणग्या होत्या. एका युगपुरुषाच्या शिल्पकाराला लागणारे सर्व गुण आणि कसब जिजाबाईंच्यात होते. मराठा स्वराज्याच्या घडवणुकीमागील ती खरोखरीची 'लोहस्त्री' होती, अनन्य माता होती!!

पुण्याचे पुनर्वसन

१६३६मध्ये मोगलांशी तह झाल्यावर शहाजी विजापुरास गेले. १६३७च्या मार्च महिन्यात जिजाबाई शिवरायांबरोबर पुण्यास आल्या. त्यांच्याबरोबर दादोजी कोंडदेव या कारभाऱ्याला प्रथमच शहाजींनी पाठवले. जिजाबाईंनी पुणे परत वसवायचे ठरवले. राजगड बांधून होईपावेतो दहा वर्षांच्या कालावधीदरम्यान त्या सर्वांचे वास्तव्य खेड शिवापूरमध्ये होते.

जिजाबाईंना साहाय्य करण्यासाठी शहाजींनी नेमलेले दादोजी कोंडदेव हे निजामशाही कारभारात वाढलेले शहाजींचे मदतनीस होते. ते मलठणचे कुलकर्णी असल्यामुळे आणि हिंगणी, बेरडी, देऊळगाव वगैरे भोसल्यांच्या पाटीलकीची गावे मलठणजवळ असल्याने उभयतांचा ऋणानुबंध पिढीजात होता. दादोजी नुसते शहाजींचे ताबेदारच नव्हते, तर मावळ प्रांताचे आदिलशाहीचे अंमलदारही होते, हे उपलब्ध दस्तऐवजांवरून दिसते.३ चढत चढत जाऊन ते आदिलशाहीतील सुभे कोंडाण्याचे 'नामजाद' सुभेदार म्हणून नेमले गेले. पुणे कसबा आणि किल्ले कोंडाणा यांच्यात केवळ आठ कोसांचे अंतर. १६३६मध्ये कर्नाटकाच्या कामगिरीवर जाताना शहाजींनी आपल्या जहागिरीची व्यवस्था दादोजींवर सोपवली आणि

जिजाबाई व शिवरायांची देखभाल करण्याची जबाबदारी त्यांना दिली. त्यावेळी शहाजींनी त्यांच्या तैनातीस सिद्दी हिलालच्या हाताखाली एक हजाराचे घोडदळही ठेवले.

मुठा नदीच्या काठावर वसलेले पुणे दीड हजार वर्षांपेक्षाही जुने होते. तिचे इ.स. ७५८मधले नाव 'पुण्यविषय'. नंतर ती झाली पुनवडी आणि त्यानंतर पुणे. इथे यादवांच्या वेळची पुण्येश्वर, केदारेश्वर, नारायणेश्वर, मोरेश्वर गणपती यांची जुनी हेमाडपंती देवळे होती; परंतु मोगलांच्या आक्रमणादरम्यान ती उद्ध्वस्त झाली, प्रजेचे धर्मांतर झाले आणि पुण्याची वाताहत झाली. पुढे १६३० साली मुरार जगदेवच्या हाताखाली शहाजींच्या जहागिरीचा विध्वंस करण्यासाठी आलेल्या आदिलशाहीच्या फौजेने ते भुईसपाट केले आणि त्याच्यावर गाढवाचा नांगर फिरवला.४

पुणे पुनश्च वसवण्याचा विडा जिजाबाईंनी उचलला. सर्वप्रथम नदीच्या काठावर पूर्वीच्या हेमाडपंती मंदिराचे दगडी खांब वापरून मंदिर बांधले. पुण्यातील कसबा गणपती उभा राहिला. पुण्यात आणि खेडेबाऱ्यात एकेक वाडे बांधायचे आदेश जिजाबाईंनी दादोजींना दिले. कात्रजच्या पलीकडील खेड गावात नवीन गाव वसवण्यास आरंभ झाला. त्याला शिवरायांचे नाव दिले. गावात एक आमराई लावली आणि त्याला शहाजींचे नाव दिले, 'शहाबाग'. पुण्याजवळील पाषाण गावात सोमेश्वराचे देऊळ होते. गावाला पेठ आणि आणि देवाला कोट बांधण्यात आला. त्याला नाव दिले 'पेठ जिजापूर'. यथावकाश पुण्याचा मोहराच बदलू लागला.

पुण्यातील कसबा गणपतीजवळील वाडा बांधून झाला. मुहूर्त पाहून जिजाबाई आणि शिवराय वाड्यात राहावयास आले. त्याला 'लाल महाल' असे नाव देण्यात आले. त्या चौसोपी वाड्याची लांबी ८३ फूट, रुंदी ५२ फूट आणि उंची ३१ फूट होती. शिवाय १३ फूट खोल तळघर होते.५

पुणे प्रांतातील चांगल्या सुपीक जमिनीही वंजार झाल्या होत्या. तिथे काहीच धान्य उगवत नव्हते. उठून गेलेल्या गावांचे पाटील, कुलकर्णी, चौगुले, चौधरी वगैरे सर्वांना परत बोलावण्यात आले. लाल महालातल्या सदरेवर सर्वजण शिवरायांना मुजरे करून उत्सुकतेने बसले. त्यांची गाऱ्हाणी जिजाबाई आणि शिवरायांनी ऐकून घेतली. त्यांचे भय दूर करण्यासाठी दादोजी म्हणाले, 'शहाजी राजियांस पुणे मोकासा अर्जानी जाहला आहे. (मोकासा अधिकृतपणे मिळाला आहे.) कोणा पुंडे पाळेगाराचे भय आता धरू नका. बाबांनो, गाव वसवा, कूस घाला, देव मांडा. तुमची फिर्याद ऐकावयास धाकटे महाराजसाहेब जातीने येथे आहेत. महाराजसाहेबांचा लाल महाल तुमची फिर्याद ऐकावयास दिवसभर उघडा आहे'.

वाघ, चित्ते, रानडुकरे आणि कोल्हे-लांडग्यांनी धुमाकूळ घातला होता, त्यासाठी जनावरे मारणाऱ्यांना बक्षिसे लावली गेली.६ थोड्या दिवसांनी पुण्याची एका काळची उद्ध्वस्त जमीन सोन्याच्या नांगराने नांगरण्यात आली. लवकरच उपाशीतापाशी मरणारा मुलुख धान्याने भरून वाहू लागला.

शिवरायांचे शिक्षण

याच काळात शिवरायांचे शिक्षण मातेच्या देखरेखीखाली आणि दादोजी कोंडदेवांच्या

हाताखाली सुरू झाले. रामायण आणि महाभारत या दोन्ही ग्रंथांमधील सुरस आणि बोधप्रद कथा जिजाबाईंनी त्यांना वारंवार ऐकवल्या. चिंचवड, देहू, आळंदी वगैरे धार्मिक स्थानांना देवदर्शनासाठी अधूनमधून भेटी देऊन त्यांनी शिवरायांच्या मनात धर्मभावना आणि सर्वधर्मसमभाव बाणवला. तुकाराम आणि इतर सत्पुरुषांची कीर्तने ऐकवून त्यांच्या मनात धर्माभिमान उत्पन्न केला.

शिवाजी महाराज निरक्षर असावेत, असे मत ग्रांट डफ या सुप्रसिद्ध आंग्ल इतिहासकाराने व्यक्त केले आहे. त्याने लिहिले आहे, 'मराठे क्वचितच लिहीत वा वाचत. त्यांच्या मते असले सर्व शिक्षण हे कारुनांचे काम होते; मानहानिकारक नाही, पण ते त्यांना कमी दर्जाचे वाटायचे. शिवाजी आपले नाव कधीही लिहू शकले नाहीत. परंतु ते उत्तम धनुर्धारी, नेमबाज आणि दख्खनमधील कोणत्याही प्रकारच्या तलवारी, भाले आणि खंजीर लीलया हाताळण्यात अतिशय तरबेज होते.'७

या आंग्ल इतिहासकाराने हा विलक्षण जावई शोध कुठून लावला, हे कळणे कठीण आहे. परंतु नि:संशय तो पूर्णत: निराधार आहे. शहाजींनी बालशिवाजीच्या शिक्षणासाठी विशेष अध्यापक नेमले होते. 'शिवभारत'कार पित्याच्या सहवासातील शिवरायांच्या प्रारंभिक शिक्षणाबाबतीत लिहितात: 'मग तो गुणवान मुलगा सात वर्षांचा झालेला पाहून तो मुळाक्षरे शिकण्यास योग्य झाला आहे, असे राजांस वाटले. प्रधानांच्या समवयस्क पुत्रांसह बुद्धिमान आणि स्पष्टोच्चार करणाऱ्या त्या पुत्राला गुरूच्या मांडीवर बसविले. गुरुजी पहिले अक्षर लिहिण्यास सांगतात, तोच हा दुसरे अक्षरसुद्धा लिहून दाखवत असे. सकळ विद्यांचे द्वारच अशी जी मुळाक्षरे, ती सर्व गुरुजींनी त्याला उत्तम रीतीने शिकवली. तेव्हा स्वभावत:च बुद्धिमान, सुस्वभावी आणि अवर्णनीय प्रभावाच्या त्या राजबिंड्याला सर्व विद्यार्थ्यांमध्ये इतक्या लवकर मुळाक्षरे शिकलेला पाहून गुरूला मोठा अभिमान वाटला आणि हा काही विलक्षण मुलगा आहे, अशी त्याने खूणगाठ बांधली.'८

पुण्याला गेल्यावर शिवरायांनी शिक्षण पुरे केले. त्याच्याबद्दल खालील उल्लेख 'शिवभारता'त आहे. 'श्रुती, स्मृती, पुराणे, भारतीय राजनीती, सर्व शास्त्रे, रामायण, काव्य, व्यायाम, वास्तुविद्या, फलज्योतिष, तसेच सामुद्रिक ज्ञान, निरनिराळ्या भाषा, पद्य, सुभाषित, हत्ती, घोडे, रथ यावर बसणे, तसेच त्यांची लक्षणे, चढणे, उतरणे, दौड मारणे, उडी मारणे, तलवार, धनुष्य व चक्र, भला, पट्टा, युद्ध व बाहुयुद्ध, दुर्ग अभेद्य करणे, दुर्लक्ष्य निशाण वेधणे, दुर्गम ठिकाणी निसटून जाणे, इंगित जाणणे, जादूगिरी, विष उतरवणे, नाना प्रकारची रत्नपरीक्षा, अवधाने या सर्व विद्या, शास्त्रे व कला यांमध्ये प्रवीण होऊन गुरूस मोठे यश दिले.'९

'शिवभारता'प्रमाणे 'शिवदिग्विजय' या ग्रंथातही असेच उल्लेख आढळतात. ग्रांट डफने असे विधान करण्याचे प्रमुख कारण, म्हणे त्याला शिवाजीराजांच्या अक्षरांत लिहिलेला एकही दस्तऐवज सापडला नाही. १२ एप्रिल १६६३ रोजी फिलीप गिफर्ड या इंग्रजी अधिकाऱ्याने राजापूरच्या वखारीतून सुरतेला पाठवलेल्या पत्रात पुढील उल्लेख आहे, 'काल राजाने स्वहस्ताने रौगी याला लिहिलेल्या पत्रात तो ४०० निवडक मावळ्यांबरोबर शाईस्ताखानाच्या छावणीवर कसा गेला, याचे वर्णन केले आहे.'१०

शिवाजीराजांच्या हस्ताक्षरांतील ऐवज फारसे उपलब्ध नाहीत, हे खरे आहे; परंतु ते एक राजे होते. त्यांचे लिखाण आणि पत्रव्यवहार चिटणीसांमार्फत होणे स्वाभाविक असल्याने त्यांच्या हस्ताक्षरांतील पत्रे उपलब्ध नसावीत. किंबहुना 'बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा', अशा प्रकारचे त्यांचे हस्ताक्षर काही काळापूर्वी प्रसिद्ध झाले आहे.११ राजांचे वडील शहाजी आणि थोरले बंधू संस्वृत आणि इतर प्रावृत भाषांचे जाणकार होते, याचे अनेक पुरावे देता येतील. त्याचबरोबर त्यांचे चिरंजीव संभाजी यांनी 'बुधभूषण' हा संस्वृतमधील ग्रंथ लिहिला होता. तेव्हा या नामावळीत फक्त शिवाजीराजांना वगळणे चूक ठरेल. त्याबरोबरच त्यांची संस्वृतमधील राजमुद्रा, दुर्गबांधणीबाबतीत त्यांची समज, किल्ल्यांची संस्वृत नावे, त्यांच्या लष्करी रणनीती व डावपेचांतील अभिनवता आणि राजकारभारातील सुधारणा या सर्वांवरून त्यांच्या प्रतिभेची प्रगल्भता आणि ज्ञानाची खोली यांची प्रकर्षाने जाणीव होते. या अनुमानित पुराव्यांकडे दुर्लक्ष करून केवळ शिवाजीराजांच्या हस्ताक्षरातील दस्तऐवज न आढळल्याने त्यांची निरक्षरांत गणना करणे हा ग्रांट डफ या आंग्ल आणि इतर काही भारतीय इतिहासकारांचा निष्कर्ष तर्वशून्य म्हटला पाहिजे.

बंगरूळला भेट


शिवराय दहा वर्षांचे झाले, तेव्हा त्यांचे पहिले लग्न 'शीलवती, रमणीय, रूपवती व अत्यंत गुणशालिनी' अशा फलटणच्या निंबाळकर-पवार कुळातील सईबाई हिच्याशी झाले. शहाजी त्यावेळी कर्नाटकाच्या मोहिमेवर होते, त्यामुळे त्यांच्या संमतीने, परंतु अनुपस्थितीत हे लग्न १६ एप्रिल १६४० रोजी साजरे झाले. पुढच्याच वर्षापर्यंत बंगरूळला स्थायिक झालेल्या आणि सूनमुख पाहण्यासाठी आतुर असलेल्या शहाजींनी सर्वांना बंगरूळला येण्याचा निरोप पाठवला. त्यानुसार शिवबांना बारावे वर्ष लागल्यानंतर फेब्रुवारी १६४१मध्ये त्यांच्या मातेसह ते कर्नाटकास रवाना झाले. दादोजी कोंडदेवही त्यांच्या बरोबर गेले. मावळ प्रदेशातून बाहेर जाण्याची ही शिवरायांची पहिली वेळ होती. परंतु पुढील चार दशकांच्या कालावधीत त्यांचा संचार नर्मदेच्या दक्षिणेकडील भारताच्या प्रदेशात सर्वत्र होणार होता. (नकाशा क्र. ६ पाहा.)

संभाजींपेक्षा वयाने धाकटा, पण गुणांनी मोठा अशा या पुत्रावर शहाजींचे जिवापाड प्रेम होते. 'शिवभारत'कारांनी शिवाजीजन्मानंतर झालेल्या शहाजींच्या भरभराटीचे काव्यपूर्ण वर्णन केले आहे. 'जेव्हा हा पुत्र जन्मला, तेव्हापासून शहाजींचे सर्व ऐश्वर्य वृद्धिंगतच होत गेले. मंदार पर्वताप्रमाणे सुंदर कमळांच्या कांतीला ज्यांनी मागे टाकले आहे व ज्यांच्या गंडस्थळातून मदजल गळत आहे, असे पुष्कळ हत्ती त्यांच्या द्वारी उभे असत. वायूप्रमाणे वेगवान आणि युद्धामध्ये खंबीर असे हजारो सुंदर घोडे त्यांच्या पागेमध्ये होते. त्यांच्या संतोषाबरोबर त्यांचा कोशही नित्य अधिक वाढू लागला. त्यांचा प्रताप आणि दरारा हे दिवसेदिवस अतिशय वाढत चालले.'१२

आदिलशाही राजधानी विजापूरपासून बंगरूळ दूर होते. बंगरूळ शहर आणि आसपासच्या मुलखाचे शहाजी अनभिषिक्त सत्ताधीश होते. ते एका राजासारखे दिमाखाने राहात असत.

बऱ्याच दिवसांनी त्यांना आपल्या कुटुंबाबरोबर स्वस्थचित्ताने राहण्याची संधी मिळाली होती. शहाजी, जिजाबाई, संभाजी आणि शिवाजी यांनी आनंदाने काही दिवस एकत्र घालवले. त्या अल्प कालावधीत शिवरायांना आपल्या पित्याचे जवळून दर्शन घडले आणि शहाजींनी आपल्या पुण्यातील जहागिरीबद्दल त्यांच्याशी चर्चा केली. त्याच वेळी शिवबांचे दुसरे लग्न मोहित्यांची कन्या सोयराबाई हिच्याशी थाटामाटाने साजरे करण्यात आले.

नकाशा क्र. ६
नर्मदेच्या दक्षिणेचा हिंदुस्तान



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

बंगरूळ हा पूर्वीच्या संपन्न विजयनगर साम्राज्याचा भाग. आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही आणि बरीदशाहीच्या सुलतानांनी पाऊणशे वर्षांपूर्वी एकत्र आघाडी करून ते कसे धुळीला मिळवले, याचे वर्णन यापूर्वी आले आहे. त्यावेळची विजयनगरी आणि अनेगोदी ही समृद्ध शहरे बंगरूळजवळच होती. शिवरायांना ती स्वत: जाऊन पाहण्याची संधी लाभली असावी. त्या श्रीमंत साम्राज्याचे आणि संस्वृतीचे अनेक अवशेष त्यांच्या नजरेला पडले असावेत. विजयनगर साम्राज्याबद्दल आणि एके काळी सर्व धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत असणाऱ्या त्या आदर्श आणि सुसंस्वृत राज्याबद्दल अनेक कथा त्यांच्या कानी पडल्या असाव्यात. पुढे जाऊन असेच सर्वधर्मसमभावी हिंदू राज्य आपण निर्माण करावे, ही ईर्षा कदाचित त्याच वेळी त्यांच्या मनात रुजली असावी. त्रयं. शं. शेजवलकर हे सुप्रसिद्ध इतिहासकारसुद्धा अशाच मथितार्थाचे मत व्यक्त करतात: ‘मानसशास्त्रदृष्ट्या विचार करता शिवाजीराजांचे ध्येय विजयनगर-दर्शनाने ठरले’.१३

या कालादरम्यान शहाजींनी शिवरायांना विजापुराला नेले आणि सुलतानाशी त्यांची भेट करवली, असा उल्लेख सापडतो, परंतु त्याचा निश्चित संदर्भ किंवा दाखला सापडत नाही. विजापूरच्या भेटीदरम्यान शिवरायांनी भररस्त्रयात एक गाय चिरली जाताना पाहिली आणि त्याचा अत्यंत खोलवर परिणाम किशोरवयातील त्यांच्या संवेदनशील मनावर झाला, असे सांगितले जाते. कदाचित त्यातूनच ‘गोब्राह्मण प्रतिपालक’ या त्यांच्या बिरुदावालीचा उगम झाला असावा.

काही दिवसांच्या वास्तव्यानंतर जिजाबाइंचे पुण्याला परत जाण्याचे दिवस आले. दादोजींच्या मागे पुणे प्रांताचा कारभार सिद्दी अंबर याकूतखान पाहत होता. शिवाजीराजे आता मोठे झाले होते. त्यांनी आपल्या जहागिरीची दादोजींच्या साहाय्याने परंतु स्वतंत्रपणे देखभाल करावी, अशी शहाजींची इच्छा होती. त्यासाठी शिवरायांना सर्व प्रकारच्या साहाय्यासाठी शहाजींनी अनुभवी माणसे त्यांच्याबरोबर पाठवण्याचे ठरवले. शिवरायांच्या उज्ज्वल उत्कर्षासाठी त्यांना स्वतंत्र राजाच्या सत्ताकेंद्राचे सर्व घटक उपलब्ध करून देण्याची दूरदृष्टी त्यामागे सामावलेली होती. आपली संपूर्ण जहागीर त्यांनी शिवरायांच्या नावे करून दिली.

राज्यकारभाराच्या वेगवेगळ्या अंगांत पारंगत असलेले कर्तबगार अधिकारी त्यांच्याबरोबर शहाजींनी पाठवले. शामराज नीलकंठ रांझेकर पेशवापद सांभाळण्यासाठी, माणकोजी सरनोबत यांना सरनोबत म्हणून, बाळवृष्णपंत हणमंते मुजुमदाराच्या कामासाठी, रघुनाथ बल्लाळ अत्रे सबनीस म्हणून आणि सोनोपंत विश्वनाथ यांना डबीर म्हणजे मुत्सद्देगिरीसाठी, बाळाजी हरी ‘मज्यालसी’ आणि नरहर बल्लाळ ‘बक्षी’ म्हणून.

शिवरायांचा स्वतंत्र ध्वज ठरवण्यात आला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या राजमुद्रेची प्रतिवृती तयार झाली. या अष्टकोनी मुद्रेवरील घोषवाक्य संस्वृतमध्ये कोरण्यात आले होते. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे फारसी किंवा उर्दूमध्ये नाही, याची विशेष दखल घेतली पाहिजे. त्या रेखीव मुद्रेवरची अक्षरे होती :

प्रतिपश्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनो: शिवस्यैषा । मुद्रा भद्राय राजते ।

(प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी, विश्वाकडून वंदित अशी ही शहाजीपुत्र शिवाजी यांची मुद्रा कल्याणार्थ विराजत आहे)१४

हे सर्व शहाजींनी एक विशिष्ट हेतू मनात धरूनच केले होते. शिवरायांची आणि त्यांच्या कर्तबगार मातेची रवानगी आपल्या पुण्याच्या जहागिरीवर करताना पुढच्या कामासाठी उपयोगी पडतील, असे वरिष्ठ आणि अनुभवी अधिकारी शहाजींनी त्यांच्या बरोबर पाठवले. शहाजींच्या मनात एक दूरगामी योजना होती. आपली इच्छा नसूनही परतंत्र वृत्तीच्या ज्या बेड्या आपल्याभोवती पडल्या, त्यांचा स्पर्शही आपल्या या पुत्राला होऊ नये, याची त्यांनी निश्चिती केली होती. आपण जे उद्दिष्ट साधण्यासाठी धडपडत राहिलो, त्या उद्दिष्टपूर्तीच्या मार्गावर शिवरायांच्या वाटचालीचा आरंभ त्यांनी करून दिला होता. मराठा स्वराज्यातील हे शहाजींचे अमूल्य योगदान होते. याला सुजाण दाद दिली पाहिजे.

एप्रिल-मे १६४२ दरम्यान शिवराय आपल्या मातोश्रींच्या समवेत पुण्यास पोचले. 'शिवभारता'नुसार 'प्रभाव, उत्साह आणि मंत्र या तीन शक्ती, सेनासमूह आणि स्वत:ची राजलक्ष्मी यांनी युक्त असा तो शिवाजी पुणे शहरास पोचला.(चक्रवाक पक्ष्यांचे) राष्ट्राचे हित करणारा आणि तत्काळ (पृथ्वी प्रकाशित करणारा) राष्ट्रास उल्हसित करणारा अशा ह्या (सूर्यास) लोकमित्रास लोकांनी पाहिले, पण त्याला जाणले नाही'.१५ थोडक्यात राजांचे व्यक्तिमत्त्व चंद्रकोरीसारखे होते, असे 'शिवभारत'कार परमानंद यांना सुचवायचे आहे.

बंगरूळची भेट हा शिवरायांच्या आयुष्यातील एक निर्णायक टप्पा म्हणून गणला गेला पाहिजे. त्यावेळी त्यांनी नुकतेच तेराव्या वर्षात पदार्पण केले होते. त्यांच्यापाशी आता ध्वज, राजमुद्रा आणि मंत्रिमंडळ होते. गेले अनेक दिवस त्यांच्या मनात घिरट्या घालणाऱ्या स्वराज्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी योग्य समय येऊन ठेपला होता.

जहागिरीच्या कारभारावर पकड

पुणे प्रांताच्या जहागिरीवर भोसल्यांचा पिढीजात हक्क होता. (नकाशा क्र. ७ पाहा.) पिता-पुत्र मालोजी आणि शहाजी निजामशाहीत एकत्र नोकरी करत असताना त्यांना फौजेच्या खर्चासाठी मलिक अंबरने ही जहागीर दिली होती. उत्तरेस जुन्नर व चाकण, दक्षिणेस वाई, पूर्वेस सुपे, बारामती, इंदापूर व पश्चिमेस सह्याद्रीतील मावळ खोरी हा त्याचा विस्तार. त्यातील जुन्नर आणि त्रिंबक हे किल्ले पूर्वी उल्लेखल्याप्रमाणे शहाजीने विजापूरच्या तहानुसार मोगलांच्या हवाली केले होते. कोंडाणा हा या परिसराचा मध्यबिंदू होता.

सह्याद्रीच्या निकट असलेला मावळतीचा म्हणजे पश्चिमेकडील प्रदेश मावळ प्रांत या नावाने ओळखला जाई. पश्चिमेकडून पूर्वेकडे उतरत येणारे खोरे म्हणून त्याचे नाव मावळे. जुन्नरखालील बारा आणि पुण्याखालची बारा अशा चोवीस मावळांचा उल्लेख इतिहासात येत राहतो. शिवनेर, पारनेर, जामनेर (नेर म्हणजे पाण्याचा प्रवाह) ही जुन्नरखाली आणि रोहिडखोरे, वेलदंड, मुसे, मुठे, जोर, कानद, शिवथर, मुरूम, पौड, गुंजण, भोर पवन ही


पुण्याखाली येतात. प्रत्येक दोन खोऱ्यांमध्ये ओढे किंवा नदी वाहते. सह्याद्रीवर पावसाळ्यादरम्यान पडणारा प्रचंड वर्षाव या नद्या भीमा आणि वृष्णा नदीत नेऊन सोडतात.

सह्याद्रीच्या डोंगराळ कुशीत वसलेला मावळचा भाग अत्यंत दुर्गम होता. भरपूर पाऊस आणि घनदाट जंगलांमध्ये राहणारे लोक अत्यंत कष्टाळू, स्वाभिमानी आणि धार्मिक वृत्तीचे होते. रामायण-महाभारताच्या गोष्टी बालपणीच घराघरात सांगितल्या जात. पुराणातील योद्ध्यांचे अनुकरण करण्याची त्यांच्या मनात एक ईर्षा जागृत होई. ते हाडाचे हिंदू होते आणि गाईला मातेच्या जागी मानत व पूजा करत. ते नियमित देवदर्शनास जात आणि आजूबाजूच्या धर्मस्थळांना भेट देण्यासाठी आवर्जून जात. ब्राह्मणाचा ते आदर करीत आणि ब्राह्मणाने जर एकदा दिवस अशुभ आहे म्हणून सांगितले, तर आपली कामे पुढे ढकलीत. गावचा कारभार पाटलाच्या हातात असे. त्याच्या संरक्षणाची जबाबदारी देशमुखावर असे. त्याच्याजवळ आपली छोटी सेना असे.

तेथील रहिवासी काटक शरीरयष्टीचे, प्रवृतीने निरोगी आणि चपळ असत. ते तापट स्वभावाचे, परंतु सरळ साध्या मनाचे असत. मुळात अत्यंत स्वाभिमानी; तो दुखावल्यास ते चवताळून उठत. ते कुशल घोडेस्वार होते. त्यांचे घोडे गावठी, परंतु डोंगरांत लीलया पळू शकत. मुस्लीम सरदारांच्या अरबी घोड्यांच्या तुलनेत ते सखल भागात थोडेफार फिके पडेनात का! तरुण मावळे किशोर वयातच धनुष्यबाण, ढाल-तलवार आणि इतर हत्यारांच्या वापरात तरबेज होत असत. स्वसंरक्षणासाठी शस्त्रांचा वापर शिकणे अपरिहार्य असे. त्यांना लढाईचे व धाडसी कामे करण्याचे नैसर्गिक आकर्षण असे. ते पराक्रमी वृत्तीचे, स्वामिनिष्ठ स्वभावाचे आणि निधड्या छातीचे असत.

नकाशा क्र. ७

भोसल्यांची जहागीर



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

पुणे परगणा शहाजींकडे २५ फेब्रुवारी १६३७पासून होता. त्या परगण्यात एकूण २९० गावे होती. परगणा सात तरफांत विभागला होता. पहिली तरफ हवेली. तिच्यात ८२ गावे. दुसरी तरफ कडेपठार. तिच्यात ४३ गावे. तिसऱ्या सांडसखुर्दमध्ये २० गावे, चवथ्या कर्यात मावळमध्ये ३६ गावे, पाचव्या पाटसमध्ये ४३ गावे, सहाव्या सांडसबुद्रुकमध्ये २९ गावे आणि सातव्या नीरथडीमध्ये ३७ गावे होती. यातील कर्यात मावळच्या छत्तीस गावांचा मोकासा शिवराय सात वर्षांचे असतानाच शहाजींनी आपल्या पुत्राच्या नावे करून दिला होता. त्याशिवाय सुपे परगण्यात ६३ गावे होती. त्याच्या दोन तरफा हवेलीत ४०, तर बारामतीत २३. शिरवळ परगण्यात ४० गावे होती. त्याबरोबर इंदापूर परगणा आणि बारा मावळातील हिरडस मावळ, बेलवंड खोरे, मोसे खोरे, कानद खोरे अशी काही मावळे शहाजींच्या मोकासात होती. बंगरूळहून परत आल्यावर या सहाशे-सातशे गावांवर शिवाजीराजांनी आपली सत्ता स्थापन करण्यास आरंभ केला.

मावळ खोऱ्यात प्राचीन काळापासून वेगवेगळ्या देशमुख घराण्यांची सत्ता चालत आली होती. ही सर्व घरंदाज, इभ्रतदार आणि पिढीजात श्रीमंत घराणी होती. त्यांच्या मदतीला प्रभू देशपांडे आणि कुलकर्ण्यांची कुटुंबे काम करत होती. देशमुख घराण्यात एकमेकांत पिढीजात शत्रुत्व जोपासले गेले होते आणि त्याची पाळेमुळे खोलवर गेली होती. त्यामुळे सूड, खून, मारामाऱ्या, बलात्कार, जाळपोळ असे अनेक अत्याचार एकमेकांवर होत असत. 'बळी तो कान पिळी' या नात्याने प्रश्न सोडवले जात. कोणत्याही कायदा वा सुव्यवस्थेचा तिथे पूर्ण अभाव होता. या लोकांना कह्यात आणणे, एकमेकांशी सामोपचाराने राहण्यासाठी प्रवृत्त करणे आणि त्यांच्यातील संघभावना वाढवणे हे शिवरायांपुढील अग्रतम आव्हान होते.

दादोजी कोंडदेवांच्या साहाय्याने या देशमुखांमधील कोण काळे आणि कोण गोरे याचा अचूक अजमास शिवरायांनी लावला. झुंझारराव मरळ देशमुख, गुंजण मावळातले हैबतराव शिळमकर देशमुख, मोसे खोऱ्यातले बाजी पासलकर देशमुख, खेडेबाऱ्याच्या शिवगंगा खोऱ्यातले कोंडे देशमुख, मुठे खोऱ्यातले पायगुडे देशमुख, कर्यात मावळचे विठोजी शितोळे देशमुख, रोहिड खोऱ्यातले जेधे देशमुख, खोपडे वगैरे मंडळी शिवरायांच्या तेजाने प्रभावित झाली आणि त्यांचे आदेश मानू लागली. अर्थात त्यांच्यातील एकमेकांमधील हेवेदावे आटोक्यात आणण्याचे काम तात्पुरते शिवरायांनी दादोजींवर सोपवले. माणसांच्या गुणावगुणांची पारख शिवरायांना उपजत होती. 'धाकुटपणापासून देशात मिरासदार कोण, गैरमिरासदार कोण, हे तो जाणताती! आणि आमच्या शिवबाराजाची बुद्धी तर अशी तल्लख की, माणसाचे माणूस वलखताती!' अशी समर्पक नोंद याबाबतीत पेशवे दफ्तरात आहे.१६

दादोजींचा कागदोपत्री उल्लेख 'महाराज राजश्री शहाजीराजेसाहेब यांचे कारून' आणि 'मसरुल हजरती राजश्री दादोजी कोंडदेऊ सुभेदार व नामजाद किल्ले कोंडाणा व महालानिहाय' म्हणजे (सरकारनियुक्त) सुभेदार कोंडाणा किल्ल्याचा तसेच एकाहून अधिक महालांचा, अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्यावर होती. सुभेदार आणि जहागीरदार यांच्यातला फरक जाणून घेणे आवश्यअक आहे. सुभेदाराची जबाबदारी किल्ला, त्यात तैनात असलेले लष्कर, किल्ल्याची सुरक्षितता आणि सभोवतालच्या प्रदेशातील कायदा व सुव्यवस्था यापर्यंत

मर्यादित असे. जहागीरदार जमिनीचा कर शेतकऱ्यांकडून गोळा करत असे आणि त्यातील ठरावीक भाग सरकारी खजिन्यात जमा करत असे. अशा प्रकारे दादोजी कोंडदेव शहाजीराजांचे कारभारी आणि आदिलशहाचे या भागातील सुभेदारीची व्यवस्था पाहणारे सरकारी अंमलदार होते. या भागाचा बंदोबस्त सरकारतर्फे कोंडाण्यावरून होत असल्याने तो त्यांच्या ताब्यात होता. हा प्रांत विजापूरपासून दूर आणि दुर्गम होता. या सर्वांचा उपयोग स्वराज्यनिर्मितीच्या आरंभीच्या काळात दादोजी आणि शिवरायांनी उत्तमपणे करून घेतला.१७

शिवरायांनी शीघ्रतेने आपल्या जहागिरीत कायदा आणि शिस्तीचा अंमल आणला. सर्व जनतेला आपला राजा जितका मायाळू, तितकाच वज्राप्रमाणे कठोर होऊ शकतो, याची प्रचीती येऊ लागली. याबाबतीत रांझ्याच्या पाटलाची गोष्ट लोकगीतांचा आणि पोवाड्यांचा आजतागायत विषय आहे. जानेवारी १६४६मध्ये घडलेला हा प्रसंग. शिवराय तेव्हा सोळा वर्षांचे झाले होते आणि जहागिरीच्या अमलामध्ये पूर्ण रुळले होते. अधिकारसूत्रे ते आता दादोजींच्या मदतीविना स्वतंत्रपणे सांभाळत होते. खेडेबारे तरफेतील रांझे या गावाचा बाबाजी भिकाजी गुजर हा पाटील होता. त्याने आपल्या मुकादमीचा फायदा घेऊन एका परस्त्रीवर बलात्कार केला. ही तक्रार शिवरायांपाशी जेव्हा पोचली, तेव्हा ते संतापाने लालबुंद झाले. आपल्या राज्यात स्त्रियांचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्याच्यावर आपण टाकली आहे, अशा मुकादमानेच ही बदफैली हरकत करावी, याचा त्यांना अत्यंत राग आला. अशा गुन्ह्यासाठी जोपर्यंत करडी शिक्षा होत नाही, तोपर्यंत असेच गुन्हे होत राहतील, हे त्यांनी पुरेपूर जाणले. रांझे गाव पुण्यापासून नऊ कोसांवर म्हणजे अठरा मैलांवर होते. पाटलाला राजांसमोर हजार करण्याचा हुकूम सुटला. 'मी पाटील आहे. मला कुनाचं भ्या? माज्या गावात म्या काय बी करन', असे मिशी पिळून बकणाऱ्या त्या मुर्दाड पाटलाला आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना नव्हती. मुसक्या बांधून त्याला शिवरायांसमोर उभे करण्यात आले. राजांनी रीतसर चौकशी केली, परंतु तो जेव्हा घमेंडीने आपल्या गुन्ह्याची मखलाशी करू लागला, तेव्हा राजांनी त्याचे दोन्ही हात कोपरांपासून आणि दोन्ही पाय गुडघ्यापासून तोडण्याची शिक्षा फर्मावली. अद्यापपावेतो मोगलशाहीत मुकादम पाटील सर्वेसर्वा होते. 'हम करेसो कायदा' हा नियम होता. शिवरायांनी एकाच शिक्षेद्वारे तो भ्रम नाहीसा केला होता. आता न्यायाचे राज्य आले आहे, याची साऱ्या जनतेला जाणीव झाली आणि बायामाणसांना मोठा दिलासा मिळाला.

स्वराज्याला चालना

सुमारे ९० मैल लांब आणि बारा ते चोवीस मैल रुंद अशी पश्चिमी घाटाच्या किनाऱ्यापाशी सह्याद्रीच्या पायथ्याला वसलेली शिवरायांची वडिलोपार्जित जहागीर मावळतीकडून पूर्वेस उतरत जात होती. समर्थांनी त्याचे वर्णन 'दरे श्रृंग पाठार मैदान दारी, कापरे गव्या विवरे ती भुयारी' असे केलेले आहे.

द. ग. गोडसे यांनी आपल्या 'शक्तिसौष्ठव' या ग्रंथात मावळच्या कठोर भूप्रदेशाचे वास्तववादी, परंतु शब्दसुंदर वर्णन केले आहे, किंबहुना ते मावळासच नव्हे, तर स्वराज्याच्या बहुतांशी प्रदेशाला तितकेच लागू आहे. त्यावरून शिवरायांच्या विविध लष्करी

कारवायांदरम्यान काय अग्निदिव्ये पार करावी लागली, याची कल्पना येईल. गोडसे लिहितात :

'हा भूप्रदेश चंडपाषाण शिखरे, उंच बोडखे सुळके, मोकाट पसरलेली पठारे, जाळ्या, झाडीचे गर्द किर्र रान, खोल दऱ्या दरकुटे, मुर्दीव खबदाडी लावणे वाकणे, घडमोडी वेडेवाकडे घाट, निरुंद खिंडी, उभी चढणे, निसरडे उतार, नागमोडी डुंग्या, लांबच लांब पसरलेले पहाडाचे दांड, सरळसोट ताशीव कडे, अक्राळ कपारी आणि सोलीव कातळांच्या करड्या काळ्या कराल दाढांतून लपलेल्या भयाण अंधाऱ्या घळी आणि गुहा असे स्वरूप असलेल्या प्रत्येक खोऱ्याला मावळ अशी संज्ञा होती.' [१८]

दादोजींबरोबर शिवरायांनी सर्व प्रदेश पायी तुडवून परिसराची आणि लोकांची ओळख केऊन घेण्यास आरंभ केला. मावळातून, डोंगर-दऱ्यांतून, रानावनांतून ते हिंडू लागले. आपल्या राज्याच्या प्रत्येक चढ-उतारांची आणि शेत-रानांची माहिती करून घेऊ लागले, गावातील माणसांना भेटून त्यांच्या समस्या सोडवू लागले आणि त्यांना आपलेसे करून घेऊ लागले. गरीब मावळ्यांच्या पोरासारात फिरू लागले. आपला राजा आपल्यात मिसळतो आहे, याची त्यांना अपूर्वाई वाटू लागली. आपल्याबरोबर भाकर-चटणी खाण्यात त्याला काही कमीपणा वाटत नाही, हे जाणून ते धन्य झाले. दुरून मुजरा करणारी पोरे धीटपणे त्यांच्या समीप येऊ लागली.

शिवरायांनी जिवाभावाचे अनेक सवंगडी याच काळात भोवताली गोळा केले. या सर्वांनी पुढे जाऊन त्यांची जन्मभर साथ केली आणि स्वराज्यबांधणीत आपल्या प्राणांची आहुती दिली. तानाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सूर्याजी काकडे, बाजी जेधे, त्र्यंबक सोनदेव, बापुजी मुद्गल, नारोबा, चिमणाजी व बाळाजी देशपांडे, दादाजी गुप्ते अशी अनेक समवयस्क मुले त्यांच्या ओळखीची झाली आणि त्या ओळखीचे घनिष्ट मैत्रीत रूपांतर झाले. त्यांच्या वारंवार भेटी होऊ लागल्या. शिवराय त्यांना लष्करी शिक्षणाचे धडे देऊ लागले. घोडदौडीचे फेरफटके सुरू झाले. जुलमी आदिलशाही व मोगलशाहीचे जू फेकून देण्याच्या कल्पना आकार घेऊ लागल्या. तरुण मावळ्यांचा मोठा समुदायच एकजूटला. सर्व जण मिळून शिवरायांबरोबर मराठा स्वराज्याचे स्वप्न पाहू लागले.

मावळच्या जुलमी देशमुखांमध्ये दोन देशमुख मात्र अपवाद होते, एक बाजी पासलकर आणि दुसरे कान्होजी जेधे. बाजी पासलकर शूर, प्रामाणिक आणि मोठ्या दिलाचा माणूस होता. धिप्पाड अंगकाठी, कमावलेले शरीर, पिळदार मिशा आणि भारदस्त आवाज. पौडजवळच्या तव गावाचे ते रहिवासी. साऱ्या मावळात त्यांचे वजन होते आणि सर्वजण त्यांची इज्जत करत असत. कोणत्याही बखेड्यातून मार्ग काढण्यासाठी लोक त्यांच्याकडे येत असत. त्यांच्या पदरी नोकरचाकरांची कमतरता नव्हती. त्याशिवाय चौदा-पंधरा शूर राजपूत त्यांच्या नोकरीत होते. बाजी पासलकर शिवरायांच्या सेवेत रुजू झाले. दुसरे देशमुख कान्होजी जेधे. ते तर शहाजींकडे कर्नाटकात नोकरीला होते. जेध्यांचा मावळात दरारा होता आणि आदरही केला जाई.

शिवरायांची मावळ्यांची सेना वाढत चालली होती. शिवराय त्यांच्यासाठी लष्करी शिक्षणाच्या कवायतींचा कार्यक्रम आखू लागले. शरीराच्या बळकटीसाठी व्यायाम, अंगावर ओझे लादून

लांब अंतरापर्यंत धावाधाव, हत्यारांचा वापर, डोंगरावर आडमार्गाने घोडदौड, शत्रूच्या मुलखात धाड घालण्याचे डावपेच, रात्री-अपरात्री गस्त या व अशा अनेक लष्करी हालचालींचे धडे त्यांना दिले जाऊ लागले. देवदर्शनासाठी आळंदी, जेजुरी, मोरगाव अशा वेगवेगळ्या ठिकाणांवर घोड्यांवरून रपेटी चालू झाल्या. निरनिराळ्या चोरवाटा, डोंगरांतील गुहा, खिंडी, घाट, दऱ्यांच्या शोधात सफरी निघू लागल्या. दिल्ली आणि विजापूर शासनाविरुद्ध छोट्या छोट्या कारवायांच्या गुप्त योजनांबद्दल मसलती होऊ लागल्या. शिवरायांवरील भक्तीला उधाण येऊ लागले. स्वराज्याच्या कल्पनेने सर्वच पेटून निघाले होते. या जागृतीचा वणवा लवकरच साऱ्या मावळात पसरला.

येसाजी कंक, तानाजी मालुसरे, सूर्याजी काकडे वगैरे शिवरायांच्या वयाची तरुण मंडळी आणि कान्होजी जेधे, गोमाजी नाईक, बाजी पासलकर वगैरे ज्येष्ठ मंडळी सर्वच शिवरायांच्या झेंड्याखाली एकत्र झाली. मावळातील बरेच देशमुख अनुकूल झाले. परंतु बांदल देशमुख, सुपेकर मोहिते, जावळीकर मोरे वगैरे बाजूस राहिले. शिवरायांनी त्याची तमा बाळगली नाही आणि या विरोधासाठी योग्य वेळी त्यांना धडा शिकवण्याचे ठरवले. बखरकार त्यावेळची भावना मार्मिकपणे प्रकट करतात, ‘जे वडिलांनी मिळवले, ते खाऊन राहणे योग्य नाही. आपण हिंदू. सर्व दक्षिण देश यवनांनी ग्रासिला. हा रक्षणार्थ प्राणही वेचून धर्म रक्षू व आपले पराक्रमे नवीन दौलत संपादू. ते अन्न भक्षू. नवे साधावे हे या कुळात जन्मल्याचे सार्थक. दैवावर भार न घालू. पुरुषयत्न बलवत्तर होय. दैव पंगू आहे, यास्तव प्रयत्न अचळ करावे. त्यास दैव जसे अधिक साह्य होईल, तसतसे अधिक करत जावे. देव परिणामास नेणार समर्थ आहे.’१९

शिवरायांना आदिलशाहीचे मांडलिक म्हणून वागायचे नव्हते. आपले स्वत:चे हिंदू राज्य त्यांना निर्माण करायचे होते. परंतु इतर धर्मीयांचेही त्यात स्वागत होते. सर्वधर्मसमभाव हा त्याचा आध्यात्मिक पाया होता. तरीही एका बाजूला बहामनी राज्यांनी आणि दुसऱ्या बाजूला मुस्लीम आक्रमकांनी वेदकालापासून चालत आलेल्या भारतीय हिंदू संस्वृतीच्या पद्धतशीरपणे केलेल्या विटंबनेमुळे ते कमालीचे विद्ध होत असत. बंगरूळच्या भेटीत पाहिलेल्या विजयनगर साम्राज्याचे अवशेष आणि ऐकलेल्या त्याच्या गाथांमुळे आपण विजयनगरचे अर्धे राहिलेले स्वप्न पुरे करावे, अशी ईर्षा त्यांच्या मनात जागृत तर झाली नसावी ना? त्यांच्या त्यापुढील कामगिरीने अशा युक्तिवादाला निश्चितच दुजोरा मिळतो.

सुमारे एप्रिल-मे १६४५च्या कालावधीत शिवरायांनी आपल्या प्रभावाखाली आलेले हजार एक मावळे गोळा केले आणि रोहिडा किल्ल्याचा ताबा घेतला. या सर्वांना बरोबर घेऊन दादोजी कोंडदेव यांच्या उपस्थितीत त्यांनी रोहिड्यातील भवानी मंदिरात जाऊन स्वराज्याची शपथ घेतली. त्याच्याजवळच दुसरा किल्ला बांधायला घेऊन त्यांनी त्याचे ‘राजगड’ असे नामकरण केले. ही बातमी जेव्हा विजापुरास पोचली, तेव्हा रोहिड खोऱ्याचा देशपांडे, दादाजी नरसी प्रभू याला त्याच्या क्षेत्रात ही बेशिस्त का घडली, याचा जाब देण्यासाठी शिरवळच्या अधिकाऱ्यासमोर पाचारण करण्यात आले. दादाजीने शिवरायांना याबद्दल कळवले.

शिवरायांनी दादाजीला १७ एप्रिल १६४५च्या पत्रात लिहिले, ‘आम्ही आदिलशहाशी बेईमान नाही आहोत. तुमच्या रोहिडा खोऱ्यात निवास असणाऱ्या देवाने आम्हांस स्फूर्ती दिली आहे

आणि आम्ही आपल्या सर्वांची आपले स्वराज्य स्थापण्याची इच्छा तडीस नेण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपण दोघांनीही भवानी देवीसमोर आणि दादोजी कोंडदेव यांच्या उपस्थितीत स्वराज्याची शपथ घेतली आहे. त्याचे आपण कधीही उल्लंघन करू शकत नाही. ही ईश्वराची इच्छा आहे की, आपण आपली सत्ता स्थापन करावी आणि स्वतंत्र व्हावे.' २०

१६४५च्या ऑगस्टमध्ये विजापूर दरबाराने खंडोजी आणि बाजी घोरपडे या दोन सरदारांना दादोजी कोंडदेवांना धडा देण्यासाठी पाठवले, परंतु ते फारसे काही न मिळवता परत गेले.

या कालावधीदरम्यान शिवरायांच्या कर्तृत्वात झपाट्याने प्रगती झाली. त्यात त्यांचा, जिजामातेचा आणि दादोजींचा समप्रमाणात सहभाग होता. गावकऱ्यांना भेट देताना त्यांनी जहागिरीची आणि परिसराची बारकाईने पाहणी केली. या दरम्यान त्यांच्या तीक्ष्ण आणि उत्कट मनात परिसराच्या लष्करीदृष्ट्या विलेषणाची प्रक्रिया सदैव चालू होती. कोण मित्र आणि कोण शत्रू, याचेही या लोकसंग्रहाच्या हव्यासात ते गुप्तपणे परीक्षण करत होते. इथे न्यायनिवाड्याचा पूर्ण अभाव आहे, स्त्रियांवर बलात्कार, हिंदूंचे खून, मंदिरांचा विध्वंस, गोवध यामुळे मावळातील जनता बादशाही आणि सुलतानी अमलाला विटली आहे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली.

या सर्व अनुभूतींमुळे त्यांच्या स्वाभिमानी मनात स्वतंत्र राज्य स्थापण्याचा स्फुल्लिंग प्रज्वलित झाला आणि काही दिवसांतच त्याचे एका वडवानलात रूपांतर झाले. रामचंद्रपंत अमात्य लिहितात, 'शककर्ते छत्रपतिसाहेब यावनाश्रय असता त्यांपासून पुणे आदिकरून स्वल्प सत्ता स्वतंत्र मागून घेऊन पंधरा वर्षांचे असतां त्या दिवसापासून तितकेच स्वल्प मात्र सत्तेवर उद्योग केला. मनुष्यपरीक्षेने नूतनच सेवक नेमून योग्यतेनुसार भार वाढवून महत्कार्योपयोगी करून दाखवले.'२१ साक्षेप हा शिवरायांचा अग्रगण्य गुण होता. त्याचा या त्यांच्या कोवळ्या वयातलाही हा आविष्कार.

स्वराज्याच्या या आरंभकाळात शिवरायांनी माणसे कशी जोडली, याचे बखरकारांनी मार्मिक वर्णन केले आहे. 'कारून सरदार वगैरे येतील ते मसलतीत घेऊन आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावे. कारून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेच राजकारणे करावी; मातबर चहू जगाचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रे लिहावी; त्यांस आणून भेट घ्यावी, आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनुकूळ असावे असे बोलावे. असे करण्यात ज्यांनी राजांचे बोलणे परम आदराचे व पराक्रमाचे ऐकावे, त्यांस वेध लागून वाटावे की, हे परम कठोर आहेत, यांचेच संमते चालावे, हे सांगतील तसे चालावे. प्राणही गेले तरी जावोत, परंतु सेवा करून यांचे आज्ञेत चालावे, अशा सर्वांची चित्ते वेधून घेतली.'

शहाजींची राजनीती

शिवराय आणि दादोजी कोंडदेवांना पुण्यास रवाना केल्यावर शहाजी आपले वडील पुत्र संभाजींना घेऊन बंगरूळमध्ये राहिले. त्यांचा प्रमुख पुरस्कर्ता रणदुल्लाखान हा १६४३मध्ये मरण पावल्यावर दरबारातील सर्व सूत्रे मुस्तफाखानाच्या हातात आली. हा मुस्तफाखान म्हणजे शहाजींचा प्रतिस्पर्धी आणि कट्टर द्वेष्टा. एका बाजूस शहाजींच्या कर्नाटकातील

पराक्रमाची आदिलशहा काहीही दखल घेत नव्हता आणि दुसऱ्या बाजूला त्याचा हिंदूंविरुद्ध धर्मद्वेष उतू चालला होता. स्वत: पुण्याच्या जहागिरीत अडकून राहण्यापेक्षा आदिलशहास एकाच वेळी दोन शह द्यावेत, असे शहाजींनी सर्व सल्लागारांच्या संगनमताने ठरवले असावे. या विचाराने त्यांनी शिवरायांना पुण्यास पाठवले आणि स्वत: बंगरूळ येथे राहिले. उभयतांनी शक्य तितके मुसलमानशाहीवर आक्रमण करून आपली शक्ती वाढवायची, परंतु बाह्यत: हे सर्व आदिलशाहीचा अंमल सुरळीत व निर्वेध करण्यासाठी आपण करीत आहोत, असे दाखवायचे, अशी उभयतांची योजना असावी. हिंदूंचे संघटन हे मुख्य उद्दिष्ट होते.

काही दिवसांतच याची कल्पना आदिलशहास आली आणि या दोघांचा बंदोबस्त करण्यासाठी १ ऑगस्ट १६४४ रोजी कान्होजी जेध्यास फर्मान आले, 'शहाजी भोसले यास दरबारातून अप्रतिष्ठेने काढून लावण्यात आले असून त्याचा मुतालिक दादोजी कोंडदेव याने कोंडाण्याचे बाजूस धामधूम चालवली आहे, त्यास शिक्षा करून प्रदेश ताब्यात घेण्यासाठी खंडोजी व बाजी घोरपडे यांची नेमणूक करण्यात आली आहे. तरी तुम्ही जमावासह मशारनिल्हेस सामील होऊन त्यांच्या संमतीने तो दुष्ट दादोजी व त्या हरामखोराचे साथी यांना नेस्तनाबूद करावे.'२२

या फर्मानाचा परिणाम शिवरायांवर झाला नाही. त्यांची बंडखोरी वाढत चाललेली पाहून कान्होजी जेधे आणि त्याचा कुळकर्णी दादाजी नरस प्रभू यांना १३ मार्च १६४५ला आदिलशाहीचा हुकूम मिळाला, 'शिवाजी राजे याने शहाशी बेमानगी करून मावळे लोकांचा जमाव केला. रोहिडा किल्ल्यावरील ठाणे उठवून आपण किल्ल्यात शिरला. हल्ली राजगड किल्ला नाव करून बळकावला. तू त्यास सामील होऊन वसूल देतोस, ठाणे शिरवळ येथील अमीनास रुजू राहात नाहीस, मगरुरीचे जबाब देतोस, हे योग्य नाही. हुकूम पोचताच अमिनाशी रुजू होणे. नाहीतर शहा तुला विजापुरी नेऊन गर्दन मारतील.'२३

कान्होजी आणि नरस प्रभू या दोघांनाही शहाजींनीच पाठवले होते. पुत्राच्या कारवाया त्यांच्या माहितीने आणि शक्य असेल तिथे त्यांच्या संमतीने होत होत्या. किंबहुना ज्या पूर्ण स्वराज्याच्या क्षेत्रात स्वत: या न त्या कारणाने उतरण्यास कचरत राहिले, त्यात त्यांनी आता स्वत:चा प्राण व इभ्रत धोक्यात घालून आपल्या मुलाला जाणूनबुजून उतरवले. शहाजींचे स्वराज्यासाठी हे सर्वांत मोठे अप्रत्यक्ष योगदान. शिवाजीराजांनी आदिलशहाच्या या फर्मानाला किंवा खलित्यांना कधीच भीक घातली नाही. अशा प्रत्येक वेळी सहकाऱ्यांना आपल्या स्वराज्याच्या शपथेची आठवण करून दिली आणि आपल्या उद्दिष्टाचा ते सातत्याने पाठपुरावा करत राहिले.

बारा मावळे : स्वराज्याचे तळवट


स्वराज्याची मोट घट्ट बांधायची असेल, तर मोक्याच्या ठिकाणी असलेल्या किल्ल्यांचे जाळे उभारले पाहिजे, याची जाणीव तरुण शिवरायांना झाली होती. किल्ल्यांचे लष्करी महत्त्व अचूक ओळखून शिवरायांनी ते कब्जात आणण्याचे ठरवले. १६४४मध्ये दादोजींनी कोंडाणा हस्तगत केला. त्यानंतर शिवरायांनी सिंहगडाच्या किल्लेदाराला वश करून तो ताब्यात घेतला. त्यानंतर तोरण्याच्या किल्लेदाराला स्वराज्याचे महत्त्व पटवून देऊन तो सर केला आणि त्याची

डागडुजी करून त्यावर मावळ्यांची शिबंदी ठेवली. तोरण्यावर, भवानीच्या वृपेने म्हणा, शिवरायांना गुप्तधनाचा साठा सापडला. त्यांनी तोरण्याचे ‘प्रचंडगड’ असे नामकरण केले. त्यानंतर त्याच्या आग्नेयेला दीड कोसावर मोरोपंत पिंगळे यांना तोरण्यावर मिळालेले द्रव्य वापरून एक नवीन किल्ला बांधायला सांगितले आणि त्याला ‘राजगड’ हे नाव दिले. पुरंदर, तोरणा, सिंहगड आणि राजगड हे चार किल्ले मावळ प्रांताचे रखवालदार म्हणून ओळखले जात.

बारा मावळे म्हणजे जुन्नरपासून सुप्यापर्यंतचा प्रदेश. (नकाशा क्र. ८ पाहा.) या परिसरातील उत्तरेचा राजमाची किल्ला कल्याणचा अंमलदार मुल्ला अहमदकडे, लोहगडावरील हिलाल हबशीकडे अंदर, नाणे आणि पावन हे तीन मावळे, चाकणच्या किल्ल्यावरील फिरंगोजीपाशी नरसाळा घोटण, पौड व मुसे हे तीन मावळे, तोरण्यावरील किल्लेदारापाशी गुंजण हे मावळ, वेळदंड व भोर हे दोन मावळे तिथल्या देशमुखाकडे, बांदल देशमुखापाशी हिरडस मावळ, शिवथर खोरे बाबाजी कोंडदेवकडे, पुणे व सिंहगड दादोजी कोंडदेवपाशी, पुरंदर किल्ला निळो नीळकंठ नाईकवाडीच्याकडे आणि सुपे प्रांत शहाजींचा मेव्हणा संभाजी मोहिते याच्याकडे अशी बारा मावळांची वाटणी होती. हा सर्व आपल्या वडिलोपार्जित जहागिरीचा प्रदेश तिथल्या किल्लेदारांकडून वा देशमुखांकडून काढून घेऊन शिवरायांनी काळानुसार आपल्या नियंत्रणाखाली आणला. त्यामधील घाटावरील प्रदेशावर कब्जा करण्यात बाजी पासलकरने आणि घाटाखालील प्रदेश अंमलाखाली आणण्यात तानाजी मालुसरेने लक्षणीय योगदान केले. हा मराठा स्वराज्याचा गाभा म्हणा वा तळवट म्हणा! या पायावर शिवरायांनी तीस-पस्तीस वर्षांत हिंदुस्तानातील मराठ्यांचे पहिले स्वराज्य उभे केले आणि त्याचेच आगामी शतकानंतर एका मराठा साम्राज्यात रूपांतर झाले.

नकाशा क्र. ८

बारा मावळ



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

दादोजी बंगरूळहून परत आल्यावर अचानक आजारी पडले आणि त्यातच त्यांचा ७ मार्च १६४७ला अंत झाला. शिवाजीराजे आता जहागिरीचा पूर्णपणे स्वतंत्ररीत्या कारभार पाहू लागले. त्यामुळे त्याच कालावधीला स्वराज्यस्थापनेचा मुहूर्त म्हणता येईल.२४ त्यानंतर शहाजींनी आपल्या कर्तबगार पुत्रास दिलेल्या राजमुद्रेत भाकीत केल्यामुळे ही चंद्रकोर दिनानुदिन वाढत गेली.

त्यावेळी राजांच्या प्रत्यक्ष ताब्यात पुणे परगण्यातील कर्यात मावळच्या ३६ गावचा पोटमोकासा व खेडेबारे, सुपे परगण्यातील बाकरडिऱ्याची लोणी व पणदरे या गावांचा मोकासा, इंदापूर परगणा आणि रोहिडा, तोरणा, राजगड, कुवारीगड हे किल्ले होते. दादोजी आदिलशाहीचे नोकर होते, त्यामुळे त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या शिवरायांनी स्वतःच्या हातात घेतल्या. दादोजींच्या आदिलशाहीतील कामांपैकी सिंहगड किल्ल्याची देखभाल हे एक होते. तो किल्ला त्यावेळी सिद्दी अंबरच्या हातात होता. शिवरायांनी बापूजी मुद्गल देशपांडे या त्यांच्या विश्वासू कारभाऱ्याला अंबरबरोबर चर्चा करण्यासाठी पाठवले. बापूजी आपल्याबरोबर काही मावळे घेऊन गेला आणि अंबरला काय होत आहे, हे कळण्याआधीच तो किल्ला आपल्या हातात घेतला.

शहाजींच्या मोकासात मुरुंबदेवाचा किल्ला होता. त्याचे नाव शिवरायांनी राजगड ठेवले. मोरोपंत पिंगळे यांच्या देखरेखीखाली त्यांनी राजगडात सुधारणा करून त्यावर तीन माच्या आणि बालेकिल्ला बांधवला. त्या माच्यांची नावे पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी अशी ठेवली. किंबहुना शिवरायांना नवनवीन किल्ले आणि गड बांधण्यात किंवा ते काबीज करण्यात अत्यंत स्वारस्य होते. परंतु प्रत्येकामागे सबळ कारणे असत. त्यांना किल्लेशास्त्रातील तज्ज्ञ म्हणता येईल. रामदासांनी तर शिवाजीराजांना 'गडपती' अशी समर्पक उपाधीच दिली आहे.

दादोजींच्या मृत्यूनंतर आदिलशहाने शिरवळ परगणा काढून घेऊन मिया रहीम मुहम्मद याची तिथे नेमणूक केली. त्याचबरोबर कोंडाणाही ताब्यात घेण्यासाठी मिया रहीम महंमदला सांगण्यात आले; परंतु त्याआधी शिवापूरकर देशपांडे यांच्या शकावलीनुसार खेडेबारी तराफ्याचा देशपांडे बापूजी मुद्गल याने १४ मार्च १६४८च्या आधी तो ताब्यात घेतला होता.२५ मिया महंमद शिरवळला हात हलवीत परतला. काही दिवसांनी शिवरायांनी आपली काही माणसे पाठवून शिरवळ चौकीवर हल्ला चढवला व ती चौकी आणि जवळ असलेला सुभानमंगळच्या भुईकोट किल्ला ताब्यात घेतला. त्याच दरम्यान शिवरायांनी चाकणच्या ठाण्यावर कब्जा केला. तिथे फिरंगोजी नरसाळा नावाचा आदिलशाहीचा किल्लेदार होता. त्यालाच राजांनी आपल्यातर्फे किल्लेदार म्हणून नेमले. त्यानंतर त्याने बरीच वर्षे स्वराज्याची इमानेइतबारे सेवा केली.

या काळातील घडलेला एक स्वारस्यपूर्ण प्रसंग शिवरायांच्या सामंजस्याचा दाखला देतोच, परंतु त्यापुढे जाऊन त्यांची सर्वधर्मसमभाववृत्तीही दर्शवतो. त्या सुमारास विजापूरच्या नोकरीत असलेले पाचसातशे पठाण शिवाजीराजांकडे नोकरी मागण्यास आले. शिवाजीराजे त्यांना नोकरी देण्यास कचरत होते. त्यांनी गोमाजी नाईक पासबळ या एका ज्येष्ठ कारभाऱ्याला सल्ला विचारला. त्याने सांगितले, 'तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत. त्यांना विन्मुख

जाऊ देणे योग्य नाही. हिंदूंचाच संग्रह करू, इतरांची दरकार ठेवणार नाही, अशी कल्पना धरली, तर राज्य प्राप्त होणार नाही. ज्यास राज्य करणे त्याने अठरा वर्ण, चाऱ्ही जाती यास आपआपले धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावे.' हा सल्ला ऐकून राजांनी त्या पठाणांना राघो बल्लाळ कोरडे याच्याकडे पाठवून आपल्या तुकडीत त्यांना घेण्याचे आदेश दिले.२६

शहाजींविरुद्ध कपटी कारस्थान

दक्षिणेत श्रीरंगरायाने वेल्लोर पुन्हा घेतल्यामुळे आदिलशहाने ते त्याच्याकडून परत हिसकावून घेण्याचे ठरवले. त्यासाठी त्याने मुस्तफाखानाच्या हाताखाली प्रचंड फौज जमवली. त्यात रणदुल्लाचा धाकटा पुत्र रुस्तुमजमा, अफझलखान, आसदखान, शिवाप्पा नाईक, श्रीरंगपट्टणचा वोडीयार, आबाजी घाटगे झुंझारराव, केंग्नायकाचा भाऊ बाळाजी हैबतराव आणि शहाजी यांचा समावेश होता. १६४६च्या जूनमध्ये मुस्तफा कर्नाटकाकडे रवाना झाला आणि वाटेत यातील काही लोक त्याला येऊन मिळाले. ही प्रचंड फौज येत असताना पाहून श्रीरंगराय आणि जिंजी, मदुरा, तंजावर येथील अधिकारी आपल्याला उपद्रव देऊ नये, अशी आर्जवे करू लागले. श्रीरंगरायाने शहाजींच्या मध्यस्थीने मुस्तफाखानाशी संपर्व साधला. तो त्याने ठोकरला आणि वेल्लोरच्या किल्ल्याला सर्व बाजूंनी वेढा घातला. शहाजी आणि श्रीरंगरायचा सेनापती दामलवार यांच्यात निकराची लढाई होऊन त्यात दामलवार मारला गेला आणि मार्च १६४७मध्ये वेल्लोर आदिलशाही फौजेच्या हातात पडले. शहाजींच्या पराक्रमाबद्दल सुलतानाने त्यांचा 'महाराज फर्जंद शहाजी भोसले' हा किताब देऊन गौरव केला.

वेल्लोरच्या मोहिमेत झालेल्या शहाजींच्या गौरवामुळे मुस्तफाखान आणि अफझलखान या दोघांना त्यांचा हेवा वाटू लागला आणि त्यांच्यातील वैमनस्य आणखीनच बळावले. शहाजींनी केलेल्या श्रीरंगरायाच्या रदबदलीचा विपर्यास करून ते हिंदूंची पाठीराखणी करतात, असा जोरदार प्रचार मुस्तफाखानाने चालू केला. इकडे आपण हिंदूंच्या नाशास कारणीभूत तर ठरत नाही ना, ही व्यथा शहाजींना विद्ध करू लागली.

वेल्लोर हस्तगत झाल्यावर आदिलशहाने जिंजीकडे मोहरा वळवला. १६४८च्या जानेवारीत त्याने मुस्तफाखान, मीरजुमला, आसदखान, रुस्तुमजमा आणि शहाजी यांच्या हाताखाली पुन्हा फौज रवाना केली. जिंजीचा रूपनायक याने मदुरा आणि तंजावरच्या नायकांच्या साहाय्याने आदिलशाही फौजेचा सामना करण्याचे ठरवले. मीरजुमला आणि मुस्तफाखान यांच्यात बेबनाव निर्माण झाल्यामुळे जिंजीचा वेढा अडखळू लागला. त्याच दरम्यान मुस्तफाखानाच्या कलागतीला कंटाळून शहाजींनी कुतुबशहास आपल्याला नोकरीत घेण्यासाठी डिसेंबरमध्ये लेखी अर्ज पाठवला. ही गोष्ट मुस्तफाख़ानास कळली. शहाजींनी 'फौज थकली असल्याने आणि पैसे संपले असल्याने बंगरूळास जाऊन काही दिवसांनी परत येण्याची' परवानगी मागितली. ती मुस्तफाने नाकारली. शहाजी आदिलशाही सोडण्याच्या विचारात असल्याचे पाहून आदिलशहाच्या संमतीने निकटच्या भविष्यात शहाजींना वैद करण्याचे खानाने ठरवले.

शहाजींना याचा कोणताही संशय येऊ नये, यासाठी मुस्तफाखानाने शहाजींचा विश्वास संपादन करण्याचे आणि त्यांना गाफील ठेवण्याचे जाळे विणायला आरंभ केला. तो शहाजींना मोठेपणा देऊ लागला, बाकीच्यांच्या उपस्थितीत त्यांच्याप्रती आदराचे खोटे प्रदर्शन करू लागला. 'शिवभारत'कार त्याच्या कपटी वर्तणुकीचे विस्ताराने वर्णन करतात, 'शहाजीराजांची भेट होताच लगबगीने उत्थापन करून, दुरून सामोरे जाऊन, हात घट्ट धरून, आनंद दाखवून, हातात हात घालून, अर्धासन देऊन, त्यांच्याशी स्मितपूर्वक बोलून, प्रीतिपूर्वक पाहून, नानाप्रकारच्या मसलतीच्या योजना त्यांच्यापाशी प्रकट करून, सर्व कार्यांत त्यांचा पुष्कळ पुरस्कार करून, मूल्यवान नजराणे देऊन, सलगी दाखवून, स्तुती करून, खूप थट्टामस्करी करून, अध्यात्माच्या गोष्टी सांगून, हिताविषयी अभिमान जागृत करून किंवा आपला वृत्तांत सांगून तो यवन त्यांना आपला विश्वास दाखवत असे.' या सर्व कपटीपणाकरवी मुस्तफाने डाव टाकून शहाजींना बेसावध करण्यास सुरुवात केली. दुर्दैवाने शहाजी त्याला बळी पडले आणि मुस्तफाखानावर विश्वास ठेवून ते गाफील राहू लागले.२७

सरतेशेवटी मुस्तफाखानाने २४ जुलै १६४८चा श्रावणी पौर्णिमेचा दिवस निवडला. त्या रात्री शहाजींच्या छावणीत नाचगाण्याची मैफिल मध्यरात्रीपर्यंत चालत राहिली. शहाजी थकून बिछान्यावर पडल्या पडल्या झोपी गेले. वास्तविक या कटाबाबतीत शहाजींच्या गुप्त हेरांनी त्यांना अवगत केले होते; परंतु शहाजींनी त्याकडे दुर्लक्ष केले. शहाजींसारख्या खंद्या वीराला पकडायचे म्हणजे लेच्यापेच्याचा खेळ नाही, हे मुस्तफाखानाला पुरेपूर ठाऊक होते. त्यासाठी दिलावरखान, मसूदखान, सर्जायाकूतखान, अंबरखान, फरहादखान, खैरातखान, याकूतखान, आजमखान, बहलोलखान, मलिकरैहान या आदिलशाही सरदारांबरोबर राघव मंबाजी, वेदोजी भास्कर, बाळाजी हैबतराव, सिधोजी पवार, मंबाजी पवार, मंबाजी भोसले, मालोजी पवार, तुळोजी भोसले, बाजी घोरपडे, खंडोजी, अंबाजी व मानाजी हे घोरपडे बंधू आणि यशवंतराव वाडवे या मराठा सरदारांची त्याने निवड केली होती. शहाजींच्या ओळखीतल्या या मराठा सरदारांनी अशा कटात सामील व्हावे, ही अत्यंत लज्जास्पद गोष्ट होती. सुलतानाची मर्जी सांभाळण्यासाठी मराठा सरदार एकमेकांविरुद्ध किती हीन दर्जाला जाऊ शकत, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

या सरदारांनी आपापल्या सेनेसह शहाजींच्या छावणीला वेढा घातला आणि मध्यरात्र उलटून गेल्यावर सर्व बाजूंनी हल्ला चढवला. सर्वत्र एकच गोंधळ माजला. शहाजींना जाग आल्यावर त्यांनी आपल्या सर्व पहारेकऱ्यांना आणि तोपावेतो तिथे पोचलेल्या सैन्याला प्रतिकार करण्याची आज्ञा दिली आणि स्वत: तलवार सरसावून ते मारेकऱ्यांवर तुटून पडले. एवढ्यात बाजी घोरपडे त्यांच्या रोखाने घोड्यावरून दौडत येताना त्यांना दिसला. शहाजींचा स्वामिनिष्ठ सेवक खंडोजी पाटील याने बाजी घोरपड्याच्या छातीवर वार केला आणि त्याला खाली पाडून मूर्च्छित केले. परंतु काही क्षणांतच उठून त्याने खंडोजीस ठार केले. शहाजींसहित त्यांचे दसोजी गवळी, योगाजी भांडकर, मेघाजी ठाकूर वगैरे

काही सरदार प्रतिपक्षाच्या मराठा सरदारांवर तुटून पडले. एकच खडाजंगी

झाली; परंतु बाजी घोरपडेचे सैन्य अधिक असल्याने त्यांनी मात केली. रक्ताने माखलेल्या

शहाजींना बाजी घोरपडेने स्वत: वैद केले. ती तारीख २५ जुलै १६४८ होती.

शहाजींना अटक केल्याची बातमी आदिलशहाकडे पोचल्यावर त्याने आपला वझीर खानखानान व अफझलखान यांना जिंजीकडे रवाना केले. अफझलखानाने शहाजींना परत आणावे आणि वझीराने जिंजीस जाऊन काम पुरे करून यावे, असे त्यांना आदेश होते. परंतु मुस्तफाखान आजारी पडून नोव्हेंबर १६४८मध्ये तडकाफडकी मरण पावला. पुढच्याच महिन्यात खानखानानने रूपनायकाचा पराभव करून जिंजीचा किल्ला हस्तगत केला. सातशे वर्षे नायकांचे तेथे राज्य असल्याने तिथे वीस कोटी रुपयांची अपार संपत्ती आदिलशहाच्या सैन्याला मिळाली.

पुरंदर किल्ला काबीज

पुरंदर किल्ला मूळ निजामशहाचा. निजामशाही बुडाल्यावर मावळचा हा भाग आदिलशाहीत सामील झाला आणि शहाजींच्या जहागिरीत दाखल झाला. त्यामुळे एका प्रकारे तो शिवरायांच्याच मालकीचा होता. निळो नीळकंठराव नाईकवाडी हा निजामशाहीचा किल्लेदार किल्ल्याचा ताबा स्वत:जवळ ठेवून सभोवतालची खंडणी गोळा करत असे. पुरंदर किल्ला हा स्वराज्याच्या प्रदेशातील एक बळकट किल्ला होता. तो शिवरायांच्या हातात असणे महत्त्वाचे होते. नीळकंठरावाकडून तो लढून घेणे शक्य नव्हते; तो युक्तीनेच घेणे आवश्यकक होते. शहाजींचा नाईकवाडी कुटुंबाशी घरोबा होता.

शिवरायांनी निळोला पत्र पाठवले, ‘दादो कोंडदेव आम्हांजवळ वडिली ठेऊन दिल्हे होते, ते मृत्यू पावले. आता आम्ही निराश्रित झालो. तुमचे आमचे वडिलांचा बहुत घरोबा स्नेह, यास्तव किल्ल्या आश्राने खाली माचीजवळ येऊन राहू. तुम्ही सांगाल तशी वर्तणूक करीत जाऊ.’ त्यांनी उत्तर पाठवले की, किल्ला तुमचा आहे. दुसरा विचार नाही. आपण यावे. हे उत्तर आल्यावर शिवराय जिजाऊंना बरोबर घेऊन पंचवीस हजार मावळे आणि पागेसह (घोडदळ) गडाखाली येऊन राहिले. तिथे पावसाळ्यात त्यांनी मुक्काम केला.

निळोजी, पिलाजी आणि शंकराजी हे तिघे नाईकवाडी बंधू होते. थोरले निळोजी सर्व कारभार पाहत असत. त्यांनी शंकराजींना शिवरायांसोबत ठेवले. शंकराजींनी शिवरायांना विश्वासात घेऊन सांगितले, ‘आमचे बंधू आम्हांला वाटा देत नाहीत. आता आपण आम्हांला तिजाई वाटा मिळवून देण्याची वृपा करावी.’ शिवरायांनी त्यांना मदत करण्याची हमी दिली. दररोज एकत्र जेवण करीत आणि राहात असल्यामुळे दोघांच्यात मैत्री निर्माण झाली.

तेवढ्यात दिवाळीचा सण आला. निळोजींनी शंकराजीला सणासाठी गडावर येण्याचा निरोप पाठवला. शंकराजींनी त्याला कळवले की ‘आम्ही एकटे येऊ शकत नाही. आमच्याबरोबर शिवाजी आणि जिजाऊ आहेत’. त्यावर निळोजीकडून निरोप आला की, जिजाऊ, शिवाजीराजे आणि दहा-वीस मानकऱ्यांना घेऊन या. त्यामुळे शंकराजी सर्वांना घेऊन गडावर गेला. त्यांचा तीन दिवस पाहुणचार झाला. तिसऱ्या रात्री निळोजी झोपी गेल्यावर ही बातमी पिलाजी आणि शंकराजींनी राजांना कळवली. त्यांनी दोघांच्या बरोबर पंचवीस बारगीर पाठवून निळोजीच्या पायांत बेड्या टाकल्या. त्यानंतर इतर दोन भावांनाही वैद करण्यात आले. कदाचित ते केवळ

देखावा करण्यासाठी असावे.

तीन दिवस तिन्ही भाऊ वैदेत होते. किल्ल्यावर बरीच संपत्ती मिळाली. स्वराज्याच्या उभारणीसाठी ती आवश्य क होती. चवथ्या दिवशी त्यांना मोकळे करण्यात आले आणि वस्त्रे व पुरंदर गाव तिघांना इनाम देऊन त्यांना खूष करण्यात आले. 'तुम्ही आम्हांसी इमानाने वर्ताल तोपर्यंत आम्ही तुम्हांसी इमानाने वर्तू', असे वचन शिवरायांनी नाईकवाडी बंधूंना दिले. अशा प्रकारे कोणालाही न दुखावता शिवरायांनी २९ ऑक्टोबर १६४८रोजी पुरंदर किल्ल्याचा कब्जा केला. किल्ल्यावरची सर्व शिबंदी स्वखुशीने राजांच्या बाजूला आली. त्यांनी त्या तीन भावांना दिलेले वाचन पाळले आणि त्यांची चांगली देखभाल केली. अखेरपर्यंत हे चांबळीचे नाईक मराठेशाहीचे पुरस्कर्ते होते.२८

नाईकवाडी बंधूंकडून पुरंदर १६४८च्या दिवाळीच्या आसपास हातात घेतल्याचा आणि तो महिना ऑक्टोबर १६४८ असल्याचा उल्लेख सर्वत्र दिलेला सापडतो. परंतु फत्तेखानाने पुरंदरवर ८ ऑगस्ट १६४८ला हल्ला चढवल्याचे आणि तो परतवल्याचे वर्णन पुढे येईल. त्यामुळे शिवरायांच्या हातांत पुरंदर

ऑगस्टच्या आधी आला असला पाहिजे. हे साहजिकच आहे. त्यामुळे शिवरायांनी निळोबा नाईकवाडीकडून घेतल्याच्या तारखेत गल्लत वाटते. ही तारीख त्याच्या आधीची असावी.

फत्तेखानाची स्वारी


शहाजींना वैद झाल्याबरोबर आदिलशहाने त्यांच्या दोन्ही पुत्रांवर मात करण्याचे ठरवले. त्यानुसार बंगरूळ आणि कोंडाणा हस्तगत करण्यासाठी फौजा रवाना करण्यात आल्या. रुस्तुमजमा ऊर्फ फऱ्हादखान आणि तानाजी डुरे यांच्याबरोबर फौज देऊन शहाजींचे ज्येष्ठ पुत्र संभाजींचा पराभव करण्यासाठी बंगरूळला पाठवण्यात आले. संभाजींनी डिसेंबर १६४८ व जानेवारी १६४९च्या दरम्यान फऱ्हादखानाचा दारुण पराभव करून त्याला माघार घ्यायला लावली.

कोंडाणा काबीज करण्यासाठी फत्तेखान आपल्याबरोबर जंगी फौज घेऊन स्वराज्यावर चालून आला. (नकाशा क्र. ९ पाहा.) विजापूरहून भीमा नदी ओलांडून तो बारामतीमार्गे कऱ्हेच्या काठावर बेलसरजवळ पोचला आणि तेथे पुरंदरपासून दहा मैलांच्या अंतरावर त्याने तळ ठोकला. त्यावेळी शिवरायांचा मुक्काम पुरंदर किल्ल्यामध्ये होता, हे त्याला कळले. शिरवळची गढी मराठ्यांच्या ताब्यात होती. सर्वप्रथम त्याने बाळाजी हैबतरावच्या हाताखाली फौज देऊन त्याला शिरवळ आणि त्याच्याजवळील सुभानमंगळचा भुईकोट किल्ला काबीज करण्याच्या कामावर पाठवले. त्याच्याबरोबर फाजलशहा आणि आशफशहा या दोन कर्तबगार सरदारांना त्याने पाठवले. शिरवळ काबीज करून तेथे भक्कम चौकी उभारण्यास हैबतरावाला सांगण्यात आले.

फत्तेखान एवढ्या जंगी फौजेबरोबर विजापुराहून निघाला, तेव्हा शिवाजीसारख्या कच्च्या पोराला आपण सहजगत्या नमवू, असा त्याचा भक्कम विश्वास होता. पुरंदर किल्ल्यावर आदिलशहाचा किल्लेदार निळोबा नाईकवाडी किल्ला आपल्या सहज ताब्यात देईल, याची

त्याला खातरी होती. पुरंदर घेतल्यावर कोंडाण्याकडे वळण्याचा त्याचा विचार असावा. विजापूर ते रोहिडा खोऱ्यापर्यंतच्या प्रवासाने थकून गेलेल्या सैन्याला विश्रांती देण्यासाठी बेलसरला त्याने तळ ठोकला होता.

नकाशा क्र. ९
फत्तेखानाची स्वारी
जुलै-ऑगस्ट १६४८



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

फत्तेखान प्रामुख्याने कोंडाणा घेण्यासाठी आला होता. त्याच्या आधी पुरंदरवरील निळो नाईकवाडीकडून किल्ल्याचा ताबा घ्यायचा आणि मग पुढे जायचे, असा त्याचा विचार होता. हा सर्व प्रदेश आणि किल्ला आदिलशहाच्या सत्तेखाली असल्याने तो घेण्यास कोणी विरोध करील, हा विचारच त्याच्या मनाला शिवला नव्हता; किंबहुना या भागातील कोणताही हिंदू सरदार आदिलशहाविरुद्ध हत्यार उचलायला अद्यापपर्यंत धजला नव्हता. शहाजीचा पोरगा असले काही धाडस करील, अशी त्याने स्वप्नातही कल्पना केली नव्हती.

फत्तेखान हा एक मुरब्बी सेनापती होता. शिरवळपाशी मोर्चेबंदी करण्यामागे त्याचे तीन उद्देश होते. पहिला, कोणत्याही लक्ष्यावर हल्ला चढवण्यापूर्वी एका सुरक्षित तळाची (फर्म बेस) आवश्यशकता असते. जर हल्ला परतवला गेला, तर हल्ला चढवणारी फौज या सुरक्षित तळावर एकत्रित होते. पुरंदरवरील हल्ल्यासाठी शिरवळ हा योग्य तळ होता. शिरवळ आपल्या हातात पडल्यावर शत्रूला धक्का बसेल, असा त्याचा अंदाज होता. दुसरा, मराठ्यांची रोहिडखोऱ्यातून येऊ शकणारी कुमक आणि रसद तोडण्यासाठी शिरवळ हे उचित ठाणे होते. आणि तिसरा, शिरवळ जर शत्रूच्या हातात राहिले, तर विजापूरहून आपल्यासाठी येणारी कुमक शत्रू अडवू शकेल, हे त्याला माहीत होते आणि त्यासाठी पुरंदरावरील कारवाई हाती घेण्याआधी शिरवळ त्याच्या हातात असणे आवश्य क होते. त्याने बाळाजी हैबतरावाच्या हाताखाली एक मोठी तुकडी शिरवळ घेण्यासाठी रवाना केली. मराठ्यांची तिथे फारशी शिबंदी नसल्यामुळे विशेष विरोधाविना त्यांनी त्या दोन्ही जागा त्यांनी हातात घेतल्या.

फत्तेखानाने पुरंदरजवळ तळ ठोकला आहे आणि शिरवळ गढीवर ताबाही घेतला आहे, यावरून तो आता पुरंदर किल्ला ताब्यात घेण्यासाठी कारवाई करणार, याची शिवरायांना खातरी पटली. त्याला शह देण्यासाठी काही चढाईखोर पावले उचलणे फायद्याचे होणार होते. त्यासाठी शिवरायांनी दोन आक्रमक कारवाया पार पाडायचे ठरवले : एकतर सुभानमंगळ भुईकोट किल्ला परत काबीज करायचा आणि त्या हल्ल्याच्या पाठोपाठ आदिलशाही सैन्याचा समतोल बिघडवण्यासाठी शत्रूच्या बेलसर तळावर एक गनिमी धाड टाकायची. त्याकरवी फत्तेखानाच्या सैन्याचा पराभव करण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. फक्त त्याच्या छावणीत गोंधळ माजवून त्याची जमेल तेवढी नासधूस त्यांना साधायची होती.

केवळ अठरा वर्षांच्या तरुणाची लष्करी डावपेचांची ही समज खरोखरच कौतुकास्पद म्हटली पाहिजे.

सुभानमंगळवर प्रतिहल्ला

शिवराय सुज्ञ होते. हैबतराव सुभानमंगळ किल्ल्यात मोर्चेबंदी करून बसलेला असणार, याबद्दल संशय नव्हता. फत्तेखानाचा पुरंदरवर चालून येण्याचा विचार ध्यानात ठेवून शिवरायांनी जाणले की, तो किल्ला व शिरवळ शत्रूच्या हातात राहता कामा नये, कारण पुरंदरवरचा हल्ला नाकाम करायचा असला, तर जिथे तो आपली जमवाजमव करू शकेल आणि सरळ पुरंदरवर चालून येऊ शकेल, अशी सुरक्षित जागा फत्तेखानाला उपलब्ध होता कामा नये. अशी जागा होती सुभानमंगळ भुईकोट किल्ला. त्यासाठी सुभानमंगळ मराठ्यांच्या हातांत असणे

आवश्यचक होते. सुभानमंगळ तसा केवळ भुईकोट किल्ला होता. संरक्षणाच्या दृष्टीने तो लेचापेचाच होता. त्याच्या भोवतालचा तट मातीचा होता आणि तो फारसा उंच नव्हता. किल्ल्याच्या सभोवताली एक खंदक होता, पण तोही फारसा खोल नव्हता. भुईकोट किल्ल्याला बुरुज असण्याचा तर प्रश्नच उद्भवत नव्हता. दरवाजाही भक्कम नव्हता.२९

शिवरायांनी सुभानमंगळवर हल्ला चढवून बाळाजी हैबतरावाच्या फौजेला गारद करण्याची कामगिरी कावजी मल्हार खासनीस (त्याचे नाव कदाचित कावजी कोंढारकर असू शकते) याच्यावर सोपवली. त्याच्याबरोबर गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, भिकाजी व भैरोजी चोर हे दोघे भाऊ, शिवाजी इंगळे आदि म्होरक्यांच्या हाताखाली त्यांच्या त्यांच्या मावळ्यांचे चमू जाण्यास तयार झाले. ८ ऑगस्ट १६४८ची रात्र होती. पावसाळ्याचे दिवस होते. हैबतरावाची फौज किल्ल्यात आडोशाला आराम करत असणे साहजिक होते. कावजीच्या मावळ्यांना पावसाची काही तमा नव्हती. गनिमी हल्ल्याला तर हेच पाहिजे असते. प्रतिकूल हवामान हा दैवी वरच म्हणायचा. कावजीच्या तुकडीतील बारगीरांची संख्या हैबतरावाच्या फौजेच्या तुलनेत क्षुल्लक होती, एवढेच की ती सर्व पागा होती.

पुरंदरहून मावळतीच्या सुमारास निघून फारसा आवाज न करता जंगलाच्या आडोशाने दहा मैलांचे अंतर कापायला कावजीने घाई केली नाही. शत्रूला पूर्वसूचना मिळता कामा नये आणि तो अचानक हल्ल्यामुळे स्तिमित झाला पाहिजे, हे महत्त्वाचे होते. त्याचे घोडदळ मध्यरात्रीच्या सुमारास सुभानमंगळाच्या निकट पोचले. अचानक 'हर हर महादेव'चा कानठळ्या बसवणारा गजर झाला. कावजीने आपल्या मावळ्यांना कुचकामी किल्ल्याबद्दल माहिती दिली होती. एकदा का हल्लाबोल झाला की, कुठे थांबायचे नाही, किल्ल्यासमोरील खंदक आणि भिंत एका चालीत पार करायची आणि गाफील शत्रूवर तुटून पडायचे, हे त्याने वारंवार सांगून त्यांच्या मनावर बिंबवले होते.

किल्ल्यापुढील खंदक आणि तट त्वेषाने पार करून कावजीचे मावळे आत दाखल होऊ लागले. अचानक आलेली ही टोळधाड पाहून किल्ल्यातील लोक गडबडून गेले आणि जे हाती लागेल, ते कावजीच्या फौजेवर फेकू लागले. बैलगाड्यांची चाके, नांगर, गोटे, पलिते, जळती लाकडे, तापलेली तेले आणि उसळे-मुसळेही.३० परंतु मराठ्यांना त्याची परवा नव्हती, ना ही 'खेळणी' त्यांना थांबवू शकणार होती. किल्ल्याचा दरवाजा थोड्याच वेळात जमीनदोस्त करण्यात आला आणि कावजीचे सैन्य मधमाश्यांरसारखे मिळेल त्या बाजूने आत घुसले.

हातघाईची लढाई झाली. दोन्ही बाजू शर्थीने लढत होत्या, परंतु पहाट फुटू लागली, तसतशी कावजीच्या सैन्याची सरशी होऊ लागली. हैबतराव कसोशीने लढत होता आणि आपल्या हाकाऱ्यांनी आदिलशाही सैन्याचा जोम वाढवण्याचा प्रयत्न करीत होता. तेवढ्यात कावजी आणि हैबतराव समोरासमोर आले. कावजीने या शत्रुसैन्याच्या सेनापतीवर नेमून भाला फेकला. घाव वर्मी लागून हैबतराव खाली पडला आणि जागीच ठार झाला. मग मात्र आदिलशाहीच्या सैनिकांचा धीर सुटला आणि ते चारी दिशांना पळू लागले. काही मराठ्यांना शरण गेले. थोड्याच वेळात सर्व काही संपले. कावजीच्या सैन्याला शत्रूचे बरेच सामान सापडले. त्या सर्वांची जुळवाजुळव करून कावजीने काही मावळे किल्ल्याच्या मोर्चेबंदीसाठी

मागे ठेवले आणि उरलेल्यांसह पुरंदरच्या दिशेने प्रयाण केले.

फत्तेखानाच्या तळावर धाड

राजांनी फत्तेखानाला धक्का देण्यासाठी हाती घेतलेली दुसरी कारवाई म्हणजे त्याच्या छावणीवरील धाड. हा हल्ला गनिमी डावपेचाने करावयाचा होता. त्यासाठी निवडलेल्या तुकडीने बेलसरच्या शत्रूच्या तळावर अत्यंत चोरपावलांनी जायचे, असे की अगदी जवळ पोचेपावेतो कोणालाही पत्ता लागता कामा नये; तुकडी शत्रूच्या छावणीजवळ आली की, छोट्या छोट्या गटांत तिची वाटणी करायची आणि त्यांनी छावणीला वेढा घालायचा; संकेताचा बार उडाला की, मग प्रत्येक गटाने शत्रूच्या छावणीत शिरून सरळ रेषेत घुसत जितके गनीम मारता येतील, तितके मारायचे; दुसऱ्या बाजूने बाहेर पडून आधी ठरलेल्या जागी एकत्र व्हायचे आणि परत पुरंदरावर यायचे, ही योजना होती. कोणत्याही प्रकारची हातघाईची लढाई करण्याचा यामागे हेतू नव्हता. किंबहुना शत्रूच्या मोठ्या तुकडीला टाळून छोट्या छोट्या सावजांवर हल्ला करायचा, मर्यादित वेळात अधिकाधिक नासधूस करायचा आणि होईल तितका गोंधळ माजवून व शत्रूच्या छातीत धडकी भरवून, परंतु आपली कोणतीही जीवहानी टाळून पुरंदरची मुख्य लढाई लढण्यासाठी गडावर परतायचे, अशा सर्वांना सूचना होत्या. गनिमी काव्याची ही मूलतत्त्वे होती आणि शिवरायांचा हा पहिला गनिमी हल्ला ठरणार होता.

तुकडीबरोबर एक निशाण टोळीही पाठवण्यात आली होती. हा त्या तुकडीचा आत्मा. निशाण टोळीत पन्नास-साठ मावळे होते. ती वाटचालीदरम्यान सगळ्यांत आघाडीवर राहील; धाड चालू झाली की, ती एका आधी ठरवलेल्या निर्धारित स्थळी स्थिर राहील आणि कारवाई संपल्यानंतर सर्व मावळे निशाण टोळीजवळ एकत्रित होतील, या सूचना देण्यात आल्या होत्या. कोणत्याही परिस्थितीत निशाण शत्रूच्या हाती पडू द्यायचे नाही, असे त्यांना आदेश देण्यात आले होते.

या तुकडीचे नेतृत्व कोणाकडे दिले होते, याबद्दल पक्की नोंद नाही, परंतु बाजी पासलकरांना हे काम दिले असावे, असे काहींचे मत आहे. त्यांच्याबरोबर बाजी जेधे, कावजी मल्हार, बाजी बांदल वगैरे गटप्रमुख होते. ठरल्यानुसार संध्याकाळी ही तुकडी पुरंदरावरून उतरली आणि कोणतीही चाहूल लागू न देता बेलसर छावणीवर पोचली. ठरल्याप्रमाणे आपापल्या जागांवर पोचल्यावर पासलकरांनी निर्धारित संकेतानुसार हवेत एक-दोन गोळ्या उडवल्या आणि सर्व घोडेस्वारांनी आपापल्या घोड्यांना टाच मारली आणि ते छावणीत घुसले. सर्वत्र एकच गोंधळ माजला. गाढ झोपी गेलेल्या आदिलशाही सैनिकांना काय झाले, हे कळलेसुद्धा नाही. जाग्या झालेल्या शत्रूने वेळाने का होईना प्रतिकार केला, परंतु तोपर्यंत मराठ्यांचे घोडे अर्धेअधिक अंतर कापून सुसाट विजेच्या वेगाने पुढे जात राहिले. मराठ्यांच्या मावळ्यांना फारशी इजा झाली नाही. मोजके मावळे कामी आले असावेत. झोपलेल्या शत्रूवर अशा अनपेक्षित आणि त्याला अचानक स्तिमित करणाऱ्या हल्ल्याची हीच तर खुबी आहे. गनिमी काव्याचा तो आत्मा आहे.

आपले काम संपवून सगळे आधी दिलेल्या निशाण टोळीच्या भोज्ज्यावर एकत्र होऊ लागलेच

होते, परंतु दरम्यान एक रोमांचकारी घटना घडली. निशाण हाती असलेल्या घोडेस्वारावरच शत्रूच्या काही सैनिकांनी हल्ला चढवला आणि ते हिसकावून घेण्यासाठी त्याच्याभोवती दाटी केली. 'जेधे करिना' नामक हस्तलिखितात या प्रसंगाचे रोमांचक वर्णन केले आहे: 'फत्तेखानाची फौज विजापुरीहून पुणे देशात आली. तेव्हा राजश्री शिवाजीराजे यांनी कान्होजी नाईकास व मावळचा जमाव घेऊन पुरंधरास आले. ते समई लोकांची निवड करून बरोबर स्वार आणि निशाण देऊन फत्तेखानावरी रवाना केले. युद्ध झाले तेव्हा स्वारांचा जमाव फुटला. मावळचे लोक झुंजत झुंजत बेलसरपावेतो आले. युद्धाची शर्थ करोन बेलसरी खस्त झाले. स्वार जागा जागा फुटोन पळोन गेले. निशाणाबरोबर चाळीस-पन्नास राहिले. ते समई कान्होजी नाईक याचे पुत्र बाजी नाईक जेधे बापास न पुसता घोडियावर बैसोन स्वाराबरोबर गेले होते. तेव्हा गनिमाने निशाणावर बहुत दाटी केली, तेव्हा बाजी नाईक यांनी गनिमासी युद्ध केले. गनिमाचे पाच-सात स्वार ठार केले. गनिमाची फौज थोपून निघाले, तो ज्या फर्जंदावर निशाण होते, तो घोड्याखाली आला. त्यास आपल्या घोड्यावर बैसवून निशाणाचा भाला आपल्याजवळ घेऊन पुरंधरास आले. हे वर्तमान राजश्री स्वामींस सांगितले, तेव्हा बाजी नाईक जेधे यांजवरी संतोषी जाले. निशाण सांभाळून आणिले म्हणून सर्जाराईचा किताब दिल्हा. वस्त्रे दिल्ही. तेजी तुर्की दोनी घोडे पागेचे बारगीर देऊन आपणाजवळ हुजूर ठेविले.'३१

ही कहाणी रोमांचकारक आहे. यातील 'स्वार जागा जागा फुटोन पळून गेले', याचा अर्थ या तुकडीचा पराभव झाला, असा काही इतिहासलेखकांनी केला आहे. यात काहीतरी गल्लत झाली आहे, असे वाटते. ही गनिमी धाड असल्याने एवढ्या मोजक्या लोकांनी फत्तेखानाच्या प्रचंड सैन्याचा पराभव करावा, असे या कारवाईमागील उद्दिष्ट सुतराम नव्हते. त्यांना शिवरायांनी दिलेली उद्दिष्टे काय असावीत, याचा वर उल्लेख केलाच आहे.

'निशाण टोळी' ही संकल्पनाही इथे समजावून घेणे आवश्यक आहे. मध्ययुगीन - अगदी एकोणिसाव्या शतकातील - युद्धातही प्रत्येक सैन्यप्रमुख, पार तुकडीप्रमुखापर्यंत, आपले स्वत:चे निशाण वागवणारी एक टोळी आपल्याबरोबर नेत असे. या निशाणाची जागा म्हणजे तुकडीच्या प्रमुखाचे हलते मुख्यालय. त्यामुळे सर्वांना आदेश या जागेहून मिळत. निशाण हा एक लष्करी सन्मान मानला जाई. त्यामुळे त्याचे रक्षण करणे हे एक पवित्र कार्य समजले जाई. आजतागायत भारतीय सैन्याच्या प्रत्येक लढाऊ रेजिमेंटपाशी असे निशाण, ज्याला 'कलर्स' किंवा 'गिडिऑन' म्हणतात, अस्तित्वात आहे. त्याला त्या रेजिमेंटच्या विशेष समारंभानिमित्त कवायतीत (सेरिमोनिअल परेडमध्ये) मानाचे स्थान दिले जाते. तरण्याबांड बाजी नाईक जेधेने हे काम अत्यंत भक्तीने बजावले.

शिवरायांनी पार पाडलेल्या या दोन कारवायांना विशेष महत्त्व आहे. सुभानमंगळवरील हल्ला हा स्वराज्यसाधनेतील पहिला हल्ला होता आणि फत्तेखानाच्या बेलसर छावणीवरील धाड ही शिवरायांची पहिली गनिमी कारवाई होती. त्यांचे लष्करी विलेषण या प्रकरणाच्या शेवटी करू.

पुरंदरवरील हल्ल्याचा धुव्वा

सुभानमंगळचा लज्जास्पद पराभव आणि मराठ्यांनी बेलसर छावणीवर चढवलेली करारी धाड

या दोन्हींमुळे फत्तेखान क्रोधाने जळफळत होता. आपल्यासारख्या कसलेल्या सेनापतीला आणि आपल्या प्रचंड सैन्याला अजून मिसरूडसुद्धा न फुटलेल्या शहाजीच्या या बच्च्याने हरवावे आणि आपल्या तोंडाला काळे फासावे, याच्यामुळे त्याला तोंड दाखवायलाही जागा राहिली नव्हती. आपण आता परत गेल्यावर आदिलशहासमोर कसे जाणार, हे त्याला कळेनासे झाले होते. त्याचबरोबर आदिलशाहीच्या बाकीच्या सरदारांत आपली कशी छीथू होईल, ही कल्पना त्याला बेचैन करत होती. या सगळ्या कारवायांचे आयोजन शिवाजी पुरंदरावरून करतो आहे, हे त्याला एव्हाना कळून चुकले होते. पुरंदर किल्ल्याचा ताबा आपण सहजरीत्या घेऊ, हा त्याचा भ्रमही आता दूर झाला होता. परंतु तरीही आपण आल्याचे ऐकताच निळोबा दरवाजे खुले करून आपले स्वागत करील, ही त्याची आशा अजूनही जीवित होती.

पुरंदरावर चढाई करून शिवाजीच्या सैन्याला नामोहरम करण्याचा इरादा त्याने आता पक्का केला. यापुढे थोडाही वेळ दवडणे जोखमीचे होते. त्याने मूसेखान, अश्रफशहा, मिनाद शेख, हसन शेख आदि सर्व सरदारांना बोलावून किल्ला काबीज करण्याची योजना समजावून सांगितली. जास्तीत जास्त सेना घेऊन पुरंदरासमीप पोचलो की, आपली फौज पाहूनच आणि हत्ती, घोडे यांची मांदियाळी पाहून शिवाजी गर्भगळित होईल आणि आपल्याला शरण येईल, अशी त्याची अपेक्षा होती. बेलसरपासून पुरंदरचे अंतर दहा मैलांचे होते. फत्तेखानाने अर्धीअधिक फौज बरोबर घेतली आणि उरलेली बेलसर छावणीतच ठेवली.

८ ऑगस्ट १६४८ला मावळ्यांनी सुभानमंगळ घेऊन त्यानंतर बेलसर छावणीवर धाड घातली होती. त्यानंतरचा हा दिवस होता म्हणजे ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यातील असावा. सर्व जय्यत तयारी करून दोन दिवसांनी आरंभीच्या तुकड्यांनी भल्या पहाटे बेलसर सोडले. शेवटची तुकडी बाहेर पडेपर्यंत दोन तास उलटून गेले होते. आघाडीला अर्थातच हत्तींचा चमू होता. किल्ल्यावर हल्ला चढवण्यासाठी वास्तविक हत्ती उपयोगी नव्हते, परंतु वजनदार सामान आणि दारूगोळा वाहून नेण्यासाठी त्यांची गरज होती. आघाडीच्या तुकड्यांना पुरंदरच्या पायथ्याशी पोचायला मध्यान्ह उलटली. दुरून हलत डुलत येणाऱ्या या सेनेची बातमी लवकरच शिवरायांना लागली आणि त्यांनी आपल्या सेनेला सज्ज राहण्याचा इशारा दिला; परंतु आदेश मिळेपर्यंत कोणतीही हालचाल करायची नाही, असे सर्वांना बजावले. टेहळेकरी मावळ्यांच्यात भर घातली गेली आणि शत्रूच्या आगेकूचीची प्रगती डोळ्यांत तेल घालून पाहत राहण्याची त्यांना सूचना देण्यात आली. सारा पुरंदर फत्तेखानाचे ‘स्वागत’ करण्यासाठी सज्ज झाला होता.

चढण्यासाठी तो एक अवघड गड होता. त्याची चढण अत्यंत सरळसोट आणि खडतर होती. विशेषत: डोंगरावर चढण्यात सराईत नसलेल्या आदिलशहाच्या बहुसंख्य सरदारांना ते आणखीनच कठीण पडणार होते. पुरंदरावरील प्रत्येक मावळा मोक्याच्या जागा शोधून आपली हत्यारे रोखून तयारीत बसला होता. जागोजागी त्यांनी वेगवेगळ्या आकारांच्या दगड आणि धोंड्यांचे ढीग लावले होते. अनेकांजवळ गोफणी होत्या आणि त्यातून एकामागून एक दगडांचा वेगाने मारा करण्याच्या तंत्रात ते सराईत होते. प्रत्येकाजवळ धनुष्यबाण आणि भाले होतेच. काहींच्याकडे बंदुकाही होत्या. गडावरील तोफा शत्रूचा वेध घेण्यासाठी त्यांच्या निर्धारित

जागी लावल्या होत्या आणि दारूगोळ्यासह तोपची तयार होते.

मराठे वास्तविक गडांवर स्वारी रात्रीच्या वेळी चढवत असत, फत्तेखान मात्र भरदिवसा हल्ला चढवत होता. ज्यादा आत्मविश्वास कित्येकदा आत्मघातक ठरतो. आघाडीचे दस्ते पायथ्यापाशी पोचल्यावर गड चढू लागले, तेव्हा सूर्य माथ्यावर आला होता. पावसाळ्यामुळे सर्वत्र कमालीचे घसरडे झाले होते. कोकणातील मराठे सोडून आदिलशाहीच्या सैन्यातील इतरांना गड चढायची सवय नव्हती, त्याशिवाय पुरंदरची चढण तर जागोजागी उभ्या कड्यांची होती. प्रत्येक जण धापा टाकत होता. आघाडीला मुसेखानाची तुकडी होती, त्याच्या डाव्या बगलेस बजाजी नाईक निंबाळकर, उजव्या बगलेस माताजी घाटगे आणि पिछाडीस खासा फत्तेखान; सर्वजण आपापल्या लवाजम्यानिशी चढू लागले. त्यांची प्रगती मुंगीसमान होती.

गडाच्या मध्याला आघाडीचे दस्ते पोचेपर्यंत दुपारचे तीन वाजायला आले होते. कारवाई करण्यासाठी शिवरायांना त्यापुढे फार वेळ थांबून चालले नसते. प्रकाश असेपावेतोच शत्रूला पळवून लावणे आवश्याक होते. शिवरायांनी निर्धारित संकेत दिला आणि एकदम सर्वत्र गोंधळ माजला. एकाएकी दगडधोंडे कड्यांवरून गडगडू लागले आणि वाटेत सापडणाऱ्या आदिलशाही फौजेचा खात्मा करू लागले. त्याचबरोबर मचाण आणि खाचा-खळग्यांत बसलेले मावळे आपल्या गोफणींनी अचूक नेम साधू लागले आणि बाणांचा वर्षाव सुरू झाला. तोफाही समोर आग ओकू लागल्या. आदिलशाही सैन्याला आपल्यावर एकाएकी कोणती वीज कोसळली आहे, हे कळेनासे झाले. प्रतिकार करण्याची त्यांना संधीच मिळेना.

आपल्या फौजेचा असा चेंदामेंदा होत असलेला पाहून मूसेखान चीत्कारला, 'यह गजब है, सिर्फ पत्थरों की बौछार नहीं । इन पत्थरों से हमारे कितने बहादूर मारे गये हैं । यह कोहस्तानी लडका शिवाजी हम जैसे सूरमा बहाद्दुरों को हराता है । हम बहादूर हैं । हमारी शमसीर की ताकद दुनिया को मालूम है । लानत है कि हम भाग कर लौट जाये । कीलेपर नजर रखो । वे जरूर कामयाब होंगे, जो डटकर खडे रहेंगे।'३२ मूसेखान, शेख मिनाद, रतन, बजाजी नाईक आणि माताजी घाटगे आपापल्या परीने सैनिकांना जोश देत होते, परंतु सगळ्यांचीच हबेलहंडी उडाली होती.

शिवरायांनी ओळखले की, हीच वेळ आता प्रतिहल्ला चढवण्यासाठी साजेशी होती. त्यांनी किल्ल्याचे दरवाजे उघडण्याचे आदेश दिले आणि त्यामागे तयार असलेली मावळ्यांची तुकडी 'हर हर महादेव'चा उद्‌घोष करीत उतारावर वेगाने लीलया आगेकूच करू लागली. थोड्याच वेळात ती फत्तेखानाच्या आघाडीच्या दस्त्रयांपाशी पोचल्यावर त्यांनी तलवारी, भाले आणि दांडपट्टे गरगर फिरवायला सुरुवात केली. गोदाजी जगताप आणि मूसेखानाची जुंपली. दोघेही निधड्या छातीचे शूरवीर. मूसेखानाच्या छातीत भाला लागूनही तोच काढून त्याने गोदाजीवर वार केला. तेवढ्यात गोदाजीने आपल्या तलवारीने सर्व बळ एकवटून मूसेखानावर प्रहार केला. तो मात्र मूसेखान चुकवू शकला नाही आणि खाली कोसळला.

आपला सरदार पडल्याचे पाहून आघाडीच्या जवानांचे तोंडचे पाणी पळाले. प्रथम एक, नंतर दुसरा, त्यानंतर तिसरा मागे फिरला आणि मग सारेच उलट्या दिशेला पळू लागले. उतारामुळे काही अडखळले, घसरून पडले, परंतु त्यांच्या पलायनाचा वेग अधिकाधिक वाढत गेला.

भिमाजी वाघ, कावजी, बाळाजी वगैरे अनेक आदिलशाही म्होरके आपापल्या तुकड्यांना घेऊन उलटे पळू लागले. मग फत्तेखानही मागे फिरला. माघार घेण्याचा तो साऱ्या सैन्याला इशारा होता. खानाच्या सैन्याचा दारुण पराभव झाला होता. जगले वाचलेले सर्व जीव मुठीत धरून कसेबसे बेलसर छावणीत पोचले. तिथे मागे राहिलेल्या सगळ्यांना पुरंदरवर काय घडले, याची उडत उडत बातमी मिळाली होती. छावणी तात्काळ उठली. हत्ती, घोडे, इतर जनावरे, खाण्याचे पदार्थ, हत्यारे वगैरे मागेच राहिले. फत्तेखान लगबगीने विजापूरच्या दिशेने चालता झाला.

बाजी पासलकर आणि कावजी कोंढाणकर यांनी आपल्या तुकड्यांसह त्यांचा सासवडपर्यंत पाठलाग केला. फत्तेखानाकडे अजूनही सैन्य बाकी असल्याने हे दोन मराठा सरदार फार जोराने प्रहार करू शकले नाहीत. तरीही ते त्यांच्यावर तुटून पडले. दुर्दैवाने त्यातल्याच एका झटापटीत बाजी पासलकर कामी आले. साठी उलटून गेलेला तो प्रचंड देह धारातीर्थी पडला. शिवरायांच्या दुप्पट वयाचा तो सवंगडी त्यांची साथ कायमची सोडून गेला. आपला निकटचा साथी गमावण्याची राजांची ही पहिली वेळ होती. पुरंदरच्या विजयाच्या आनंदाला लागलेले हे खग्रास ग्रहण होते.

शहाजींची सुटका

जिंजी किल्ल्यावर मिळालेली वीस कोटींची संपत्ती ८९ हत्तींवर लादून आणि शहाजींना बरोबर घेऊन अफझलखान पाचसहाशे मैलांचे अंतर पार करून तीन महिन्यांच्या भ्रमंतीनंतर मार्च १६४९मध्ये उन्हाळ्यात नवरोजचा सण सुरू असताना विजापूरला पोचला. शहाजींच्या हातांत बेड्या घालून त्याने मिरवणुकीने विजापुरात प्रवेश केला. आपल्या या कर्तबगार प्रतिस्पर्ध्याची बेड्या घालून विजापूरच्या रस्त्रयातून धिंड काढताना आसुरी आनंदाच्या त्याला उकळ्या फुटत होत्या. सुलतानाने कल्याण महालात अफझलखानाचे समारंभपूर्वक स्वागत केले आणि त्याचा मोठा सत्कार करण्यात आला. शहाजींना 'झिंदाने इब्रत'मध्ये डांबण्यात आले.

अफझलखानाच्या या प्रदीर्घ प्रवासाच्या कालावधीदरम्यान आदिलशहाला दोन धक्के बसले होते. शिवाजीवर रवाना करण्यात आलेला फत्तेखान सुभानमंगळ व पुरंदरच्या लढायातील लज्जास्पद पराभवानंतर विजापुरात परतला होता. त्याबरोबर शहाजींचे ज्येष्ठ पुत्र संभाजी यांच्या बंदोबस्तासाठी पाठवलेला फऱ्हादखानही हात हलवत परतला होता. यामुळे खजील झालेला आदिलशहा शहाजींचा काटा लागलीच काढेल, अशी त्यांचा हेवा करणाऱ्या सर्व सरदारांची अपेक्षा होती; परंतु शहाजींसारखा हुकमी एक्का यावेळी गमावण्याइतका आदिलशहा मख्ख नव्हता. त्यांना मृत्युदंड देण्याच्या गंभीर परिणामांचीही त्याला पुरेपूर जाणीव होती. किंबहुना 'झिंदाने इब्रत'मध्ये वैद्याला पाठवण्याचा अर्थच मुळी त्या कैद्याला मृत्युदंडाची शिक्षा मिळणार नाही, असा होता.

बाजी घोरपडे आणि अफझलखान या दोघांना त्यांच्या बदकर्मांची योग्य वेळी सजा देण्याचा निर्धार शिवरायांनी मनाशी केला. आपल्या पित्याला मुक्त करण्याची आदिलशहाला विनंती केल्याने विशेष काही साध्य होणार नाही, हे त्यांना पुरेपूर माहीत होते. एव्हाना राजनीतीबद्दल राजांना बरीच जाण आली होती. पित्याची सुटका केवळ चतुर मुत्सद्देगिरीद्वाराच होऊ शकते,

हे त्यांच्या लक्षात आले होते. नाक दाबले की, तोंड उघडते, हा सर्वपरिचित नियम आहे. आदिलशहावर दबाव आणण्यासाठी दिल्लीचा बादशहा हे हुकमी साधन होते. पुरंदरावरील हल्ला परतवल्यावर लागलीच शिवरायांनी दिल्लीचा बादशहा शहाजहान याचा दक्षिणेतील सुभेदार असलेला मुरादबक्ष या शहाजाद्याबरोबर संपर्व प्रस्थापित केला.

शहाजींची सुटका करण्याच्या संबंधात शिवरायांनी मुरादबक्षास लिहिलेल्या पत्रास १४ मार्च १६४९ रोजी उत्तर आले. शिवरायांनी आपला इतबारी वकील बोलणे करण्यास पाठवावा, अशी त्याने मागणी केली होती. त्याला शिवरायांचे काही उत्तर न गेल्याने १४ ऑगस्ट १६४९ला त्याने दुसरे पत्र पाठवले. त्यात त्याने लिहिले होते की, 'शिवाजी भोसले याणी बादशाही वृपेस आपला सत्कार जाणून समजावे की, तुमच्या वडिलांच्या गोष्टी मनात न आणिता तुम्हा सर्वांवर संतोष आहे. अशा समयात तुम्ही हुजूर यावे म्हणजे पाचहजारी मनसब व पाच हजार स्वार व बहुत इनाम तुम्हास दिले जाईल व तुमचे भावांपैकी जे समागमे येतील त्यासही नोकरी करता येईल. यास्तव खातरजमेने यावे आणि पंजाचे निशाण जाहले आहे यास आपली बाहादारी जाणोन निश्चय ठेवून बादशाही वृपा पूर्ण समजावी.'३३ ३ नोव्हेंबर १६४९ला शहाजाद्याचे एक पत्र शहाजींनाही गेले, ' तुमची मोकळीक करण्याविषयी शिवाजीने लिहिले आहे. हुजूर पावल्यावर तुमचेविषयी अर्ज करून बंदोबस्त करून देऊ.'३४

पिता-पुत्रांना मुरादबक्षकडून पाठवल्या गेलेल्या पत्रांबद्दल आदिलशहाला समज दिली गेली होती, त्याबरोबर संभाजी आणि इतर हिंदू राजे कर्नाटकात एकत्र होऊन शहाजीने मिळवलेला प्रदेश परत घेतील, याचीही आदिलशहाला भीती होती. कित्येक सल्लागारांनी कुराणाचा आधार देऊन त्याला सांगितले की मुलाच्या अपराधाबद्दल बापास शिक्षा करणे हे कुराणाविरुद्ध आहे. या साऱ्याचा विचार करून प्रकरण यापुढे ताणून धरण्यात अर्थ नाही, हे आदिलशहाला पटले. त्याने शहाजींना सरलष्कर खान अहंमद याच्या घरी सन्मानाने ठेवण्याचे आदेश दिले. कोंडाणा, बंगरूळ आणि कंदापिली ही ठिकाणे शहाच्या कब्जात दिली, तर शहाजींना सोडण्यात येईल, हे अहंमदकरवी त्यांना कळवण्यात आले. विचारांती शहाजींनी ही अट मान्य केली.

आदिलशहाने त्यानंतर शहाजींची भेट घेऊन त्यांनी राजनिष्ठ राहण्यात दोघांचेही भले असल्याचे गोड शब्दांत सुचवले. १६ मे १६४९रोजी पाच लक्ष होनांची जहागीर देऊन त्यांची सन्मानपूर्वक सुटका करण्यात आली आणि त्यांना कर्नाटकात कामगिरीवर जाण्याचे आदेश दिले गेले. कान्होजी जेधे आणि त्याचा कारभारी दादाजी वृष्णा लोहकरे या दोघांनाही त्याचवेळी सोडले. शहाजींनी दोघांनाही वस्त्रे, अलंकार आणि पत्रे देऊन शिवरायांकडे रवाना केले.

शिवाजीराजे सिंहगड आदिलशहाच्या हवाली करण्याच्या वडलांच्या आज्ञेमुळे अत्यंत कष्टी झाले, परंतु त्यांनी तिचे पालन केले. तरीही आपल्या पित्याच्या सुज्ञतेबाबत मात्र त्यांच्या मनात संदेह निर्माण झाला आणि तो त्यांनी त्यांचे मुत्सद्दी सल्लागार सोनोपंत डबीरांसमोर व्यक्त केला. शिवाजी आणि सोनोपंत यांच्यामधील त्यावेळचा संवाद कवींद्र परमानंद यांच्या 'शिवभारत' या ग्रंथात शब्दबद्ध केला आहे. कितीही कपोलकल्पित असला, तरी त्याला वास्तववादाची झालर आहे. परंतु त्यापेक्षा राजनीती आणि लष्करी नीती या दोन्ही विषयांतील तत्त्वज्ञानाचे ते एक अद्वितीय उदाहरण ठरेल.

शिवराय सोनोपंतांसमोर त्यावेळी अत्यंत उद्वेगाने उद्‌गारले, ‘ज्या धन्य पुरुषाला लोक शहाण्या पुरुषांमध्ये अत्यंत श्रेष्ठ समजतात, तो थोर मनाचा महाराजा शहाजी मला खरोखरच ओळखत नाही. अडाण्याने सज्जनांच्या अंगातील गुण जाणले नाहीत, तर तो न जाणो बापडा; परंतु जाणत्यानेही जाणले नाहीत, तर ती गोष्ट मात्र सज्जनांच्या मनाला दु:ख देते. जर तो मला ओळखत असता, तर त्याने सिंहगड दिलाच नसता; नाहीतर माझ्या हातचा हा गड बलाने कोण जिंकू शकला असता बरे! शहाणासुरता असूनसुद्धा ज्याने शत्रू आदिलशहास सिंहगड माझ्याकडून देववला, त्या करारी पुरुषास मी काय म्हणू? खरोखर विश्वाचा नियंता असून, शत्रूवर विश्वासून आपल्या घरी सुखाने निजला म्हणून तो शत्रूकडून पकडला गेला! शत्रू क्षुद्र असला, तरी शहाण्याने त्याची उपेक्षा करू नये, कारण जळणारा दिवासुद्धा पतंगाकडून विझवला जातो. दिव्याचा नाश करताक्षणीच जरी पतंग नाश पावतो, तरी एखाद्या जन्मांधाप्रमाणे कोण डोळस मनुष्य दोघांनाही सारखे मानील? वस्तुत: एखादी मुंगीसुद्धा हत्तीच्या सोंडेत शिरून त्याचा अंत करते. म्हणून शत्रूस केव्हाही क्षुद्र मानू नये. अहो, हा महाबाहू मोठा राजनीतिज्ञ असूनही शत्रूची मुळीच पर्वा करत नाही, हा त्याचा मोठा दोष होय. शत्रूने बंदीत टाकून माझ्या पित्याचे कारागृहात जे पुष्कळ दिवस हाल केले, त्याचा सूड घेण्यास मी अगदी सिद्ध झालो आहे, आणि आजपासून या यवनांच्या नाशामुळेच माझी कीर्ति होवो. जो शत्रूस अतिशय भितो, त्यासही शत्रू भीत असतो; मग जो मुळीच भीत नाही, त्याला शत्रू भितो, हे सांगावयास नकोच. खरोखरच मी या यवननायकांचा फडशा उडवणारच (आणि त्याकरता) भात्याच्या जोडीतले हे माझे बाण पाजळलेले आहेत आणि तलवारीला धार चढवलेली आहे. विजापूर नगर घेण्याविषयी सांप्रत माझे मन उत्सुक झाले आहे. म्हणून माझे तुम्हांस सांगणे आहे, की लगेच घोडेस्वारांस सिद्ध करा.’

अवघ्या १९ वर्षांच्या शिवरायांचे ही परिपक्वता पाहून सोनोपंत स्तंभित झाले, परंतु सिंहगड परत द्यावा लागला म्हणून ते अत्यंत क्षुब्ध झाले आहेत आणि त्याभरात ते पित्याला कमी लेखत आहेत, हेही त्यांनी ओळखले. शिवरायांनी प्रामुख्याने तीन मुद्दे मांडले होते. पहिला, वडलांना माझे मोल अद्यापपर्यंत समजले नाही, त्यामुळे त्यांनी सिंहगड द्यायला लावून आपली सुटका करून घेतली. पण मी पराक्रमाच्या जोरावर महमूदशहास वडलांची सुटका करण्यास भाग पाडले असते. दुसरा, मुस्तफा आपला वैरी आहे, हे माहीत असून गाफीलपणाने ते वैद झाले. तिसरा, वडलांना बंदिवासात पुष्कळ त्रास झाला, त्याचा सूड घेण्यासाठी मी विजापूरकरांशी युद्ध करणार.

सोनोपंतांना त्या तरुण मनाची व्यथा समजली, परंतु स्पष्ट दिसत होते की, शिवराय भावनेच्या आहारी जाऊन प्रमादपूर्ण निष्कर्ष काढत होते. पित्याची सुटका करण्यासाठी त्यावेळी विजापूरवर चालून जाणे धोक्याचे होते. त्यात शहाजींनाच इजा झाली असती. मुस्तफा हा शहाजींपेक्षा बलवान होता. विजापुराविरुद्ध युद्ध घोषित करणे ही घोडचूक ठरली असती. सूड हा युक्तीने उगवायचा असतो. भावनेच्या आहारी गेलात, तर सर्वनाश होऊ शकतो. हे सर्व आणि बरेच काही राजांना समजावून सांगणे हे सोनोपंतांचे कर्तव्य होते. कोणतीही भीड न ठेवता सडेतोडपणे सांगणे आवश्यक होते.

सोनोपंत डबीर शिवरायांना म्हणाले, 'हे राजा, बलवंताशी वैर, पापाचा संचय, पूज्यांची आणि पित्याची निंदा यांचा परिणाम वाईट होतो. बलवंताशी वैर घेत असताना तुझा पिता भलताच आग्रह करून सावध राहिला नाही. त्यामुळे पकडला गेला, हे स्वाभाविकच होय. जर दुर्बल माणसाने प्रबळ माणसाशी वैर केले, तर त्याचा पराभव करण्यास सबळ सर्वथा समर्थ असतो. आपल्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान शत्रूंस खंडणी द्यावी; बरोबरीच्या शत्रूशी सलोखा करावा; कमी सामर्थ्यवान शत्रूंचे दंडन करावे; आणि भेद (फूट पडणे) हा मात्र सर्वसामान्य उपाय होय. नाना व्यसनांत राजाचा भ्रम वृद्धिंगत होतो आणि तो वाढल्यावर त्यास योग्यायोग्य कळेनासे होते. हे राजा, स्त्रिया शक्तिहरण करतात, मदिरा मतिभ्रम उत्पन्न करते, द्यूत धन नाहीसे करते, वृपणपणाने कार्याची हानी होते, कठोर भाषण हे अभद्र ठरते आणि तसेच मृगयेपासून पाप लागते. कडक शासन हे अत्यंत अपकीर्तिकारक आहे. ही व्यसने टाकावीत. आपल्या कामामध्ये आळशी व व्यसनांमध्ये मग्न अशा माणसांस लक्ष्मी सोडून जाते. चित्त व्यसनासक्त होऊन कपट आणि बळ न जाणता कोणी आपल्या अहंकारानेच आपल्याला समर्थ मानेल तो पराभूत होतो.'

'राजा, गडांची किंमत काही मोठी नाही. पित्याची थोरवीच मोठी आहे. तुम्ही पराक्रमी म्हणून सिंहगड दिलात. ज्याने सिंहगड आणि बंगरूळ ही आपल्या पित्याच्या तोडीची मानली, यातच पित्याचे मोठेपण आले. राजा हे मस्तक, मंत्री हे मुख, धन व सैन्य या भुजा, बाकीचे राष्ट्र हे शरीर, मित्र हे सांधे आणि दुर्ग ही त्यातील दृढ हाडे आहेत. या साप्रांगात्मक राज्याचा आत्मा धर्म होय. मसलत हा प्राण, नीति हे बळ आणि अनीती हे दौर्बल्य आहे. यथोचित दंड हे शौर्य, शत्रू बेफाम होऊ देणे हा अधर्म, परस्परांतील फूट हा मद आणि द्दढैक्य हे दीर्घायुष्य, लोकरंजन हा उत्कर्ष, दूरदर्शित्व ही दृष्टी, प्रताप हे उज्ज्वल रूप, आयुध ही विमलबुद्धी, तर बलवानाशी वैर हे विघ्न होय; असावधपणा ही निद्रा आणि सावधानता हा जागेपणा होय. फत्तेखानाच्या पराभवामुळे आणि मुसेखानाच्या वधामुळे हे राजा, तो महमूदशहा तुमचा रात्रंदिवस द्वेष करत आहे. तुमच्या देशास लागूनच असलेले आदिलशहा व दिल्लीचा बादशहा हे बलाढ्य मुसलमान तुमचा रात्रंदिवस द्रोह करीत आहेत. हे दोघे शत्रू दोन्हीकडून तुमच्यावर क्रूद्ध झालेले असल्यामुळे तुमचे येथे राहणेच अत्यंत अनुचित आहे. म्हणून तुम्ही आता दुर्गम ठिकाणी राहून जग जिंकण्याचा प्रयत्न करा. सहकाराने वैलासाचा, इंद्राने मेरूचा आणि विष्णूने सागराचा आश्रय केला. योग्य रीतीने पावले टाकली, तर तुम्हांला अजिंक्य असे काय आहे? दुर्गाला केवळ दुर्ग म्हणून लोक दुर्गम मानत नाहीत, तर त्याचा स्वामी दुर्गम असणे हीच त्याची दुर्गमता आहे. प्रभूमुळे दुर्ग दुर्गम होतो आणि दुर्गामुळे प्रभू दुर्गम होतो. दोघांच्याही अभावी शत्रू दुर्गम होतो! तुमचे जे दुर्ग ते सर्व ज्यायोगे सर्वस्वी अत्यंत दुर्गम होतील, असे तत्काळ करा.'३५

सोनोपंतांच्या या प्रदीर्घ कथनात राज्यकारणाचा मथितार्थ खच्चून भरला होता. शिवरायांना अत्यंत आदरपूर्वक, परंतु सडेतोडपणे त्यांनी सुज्ञ, धोरणी आणि दूरवर्ती कुशाग्र सल्ला दिला. किंबहुना याच कारणासाठी शहाजींनी सोनोपंतांना धाडले होते. नेत्याला तोंडावर खडसावणारे मुरब्बी लोक त्याच्या निकट असले पाहिजेत. 'होयबांचा' उपयोग नसतो. सोनोपंतांच्या

चातुर्यपूर्ण मुत्सद्दीपणाबद्दल शहाजी पुरेपूर आश्वस्त होते आणि स्वराज्याची उभारणी करण्यात शिवरायांना ती अमूल्य मदत ठरेल याची त्यांना खातरी होती. पित्याच्या सन्मानाच्या तुलनेत सिंहगडासारखी अमूल्य राजकीय संपत्तीसुद्धा दुय्यम आहे. 'सुविक्रांतस्य नृपते: सर्वमेव महीतलम्', म्हणजे 'राजाच्या अंगी पराक्रम असेल, तर सर्व पृथ्वी त्याला मोकळी आहे', या युक्तिवादाने शिवरायांचा उद्वेग निश्चितच नाहीसा झाला असणार. त्यानंतर शिवरायांना दोनदा सिंहगड गमवावा आणि परत घ्यावा लागला, यातच सोनोपंतांच्या दूरदृष्टीचे सार आहे. शिवरायांपाशी वरिष्ठांचा सल्ला मानण्याची परिपक्वता होती, हा त्यांचा मोठेपणा.

राजांनी लवकरच रायगडाची त्या केवळ दुर्गमतेच्या निकषावर राजधानीसाठी निवड केली, यात सर्व काही आले.

'शतं विहाय मूर्खाणामेकं कोणासि पण्डितं ।' 'शंभर होयबांचा परित्याग करून एका शहाण्या व दूरदर्शी पुरुषाची जोड करून घ्यायचा तुझा प्रघात आहे ना', हा प्रश्न चतुर नारदमुनींनी युधिष्ठिराला विचारला, तो याच कारणासाठी. खरोखरच शिवरायांनी होयबांना कधीही थारा दिला नाही.

सुज्ञ प्रशासकाची घडण

वर्षानुवर्षांच्या परवशतेत रुळलेल्या आणि धर्मांध मुस्लीम सुलतानशाहीचा अन्याय मुकाटपणे सहन करणाऱ्या दगड-धोंड्यांच्या महाराष्ट्रदेशासाठी शिवरायांचे पदार्पण महन्मंगल आणि शुभंकर होते. क्षात्रवृत्ती, पुरुषार्थ, शौर्य आणि मर्दुमकी हा त्या प्रदेशाचा स्थायिभाव होता; परंतु बेसुमार अपमान सहन करून आणि वेळोवेळी लाजिरवाण्या धर्मांतराचा पर्याय स्वीकारून सुलतानांनी टाकलेल्या तुकड्यांवर आनंद मानणाऱ्या जनतेत तो आसन्न मरणावस्थेत होता. त्याच्यात पुनश्च स्फुल्लिंग जागृत करणाऱ्या आणि त्याच्या अस्मितेला हाक देणाऱ्या विजिगीषू नेतृत्वाच्या तो प्रतीक्षेत होता. असे नेतृत्व अजोड राजनीतीचे आणि अलौकिक रणनीतीचे अनुपमेय रसायन असणे आवश्यक होते. शिवरायांच्या रूपात ते महाराष्ट्रात अवतरले.

त्यांच्या जन्माच्या वेळी जिजाबा ंइंची अगणित ससेहोलपट झाली, परंतु तरीही बालशिवाजींचे पिता शहाजींनी त्यांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था होईल, याची खातरनिशा केली आणि वयाच्या बाराव्या वर्षीच त्यांना दादोजी कोंडदेवांसारख्या स्वामिनिष्ठ आणि कर्तबगार कारभाऱ्यासह बारा मावळांतील आपल्या जहागिरीवर पाठवले. शिवबांनी त्या खडतर प्रदेशातील एक न एक शिखरे, सुळके, पठारे, राने, दऱ्या, खबदाडी, घाट, खिंडी, चढण-उतार, पहाडांचे दांडे व कडे, कपारी, घळी आणि गुहा पायांखाली घालण्याचे अग्निदिव्य हाती घेतले. आपल्या प्रजेशी स्वत: संपर्व साधला, त्यांची दु:खे जाणून घेतली, त्यांच्या अडचणींवर उपाय शोधून काढले, शिस्त रुजवली आणि गुन्हेगारांना कडक शिक्षा दिली. रांझ्याचा बाबाजी गुजर याने परस्त्रीशी केलेल्या बेमुर्वतखोर हरकतीसाठी त्याला अत्यंत कठोर शासन करून हे न्यायाचे राज्य असेल, याची सर्वांची खातरी करून दिली. अत्यंत अल्प अवधीत लोकसंग्रहाच्या या अचाट प्रदर्शनाने आपणच या मुलखाचे राजे आहोत, याची जनतेला पुरेपूर शहानिशा करून दिली आणि त्यांचा मावळच्या जनतेने सहर्ष आणि स्वखुशीने स्वीकार

केला. 'वडिलांनी दिले ते खाऊन समाधानाने राहणार नाही', या स्वाभिमानी वृत्तीचा त्यांनी लवकरच परिचय करून दिला.

आपल्या सर्व अनुयायांना एकत्र करून त्यांनी रोहिड्यात स्वराज्याची शपथ दिली. आदिलशाहीच्या पाठीमागे या कारवाया करण्यास खरोखरच धाडसाची आवश्यदकता होती. 'आम्ही तुमचेच काम करतो आहोत, असे एका बाजूला सांगायचे आणि त्यांचा प्रदेश मुंगीच्या पावलाने बळकावयाचा', ही चतुर कूटनीती ते अवलंबीत असत. त्यांचे बरेच अनुयायी आदिलशाहीच्या नोकरीत असल्याने त्यांना अधूनमधून विजापूर वा शिरवळहून तंबी मिळे, तेव्हा शिवराय त्यांना धीर देत असत. दुसऱ्यांची चाकरी करण्याचा आपल्या पित्याचा शिरस्ता मोडून कोणाचेही मांडलिक न होता आपले स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनी बालपणापासूनच उराशी बाळगली. मुस्लीम सत्ताधीशांकडून चाललेली हिंदू धर्माची विटंबना त्यांच्या तरुण मनाला जिव्हारी लागत असे. त्यासाठी विजयनगर साम्राज्याच्या धर्तीवर हिंदू राज्याची उभारणी करण्याचा त्यांचा निश्चय होता, परंतु विजयनगरसारखाच सर्वधर्मसमभाव हे त्याचे आत्मरंग असावे, याकडे त्यांचा कल होता. 'हिंदूंचाच संग्रह करू, या कल्पनेने राज्य प्राप्त होणार नाही, चार वर्ण आणि चार जातींना त्यात समाविष्ट केले पाहिजे', हा गोमाजी नाईक पासबळने तरुणपणीच दिलेला सल्ला त्यांनी मनोमन पाळला. हा झाला त्यांच्या अद्वितीय राजकीय कर्तृत्वगुणांचा आविष्कार.

लष्करी विलेषण

परंतु याहीपेक्षा अधिक त्यांनी अत्यंत अल्प वेळात सर्वांवर छाप पाडली, ती त्यांच्या लष्करी प्रतिभेने. महाराष्ट्रात हिंदुत्वाधिष्ठित स्वतंत्र राज्य निर्माण करावयाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एका निष्णात राज्यकर्त्याची आवश्यंकता होतीच, परंतु स्वराज्याचा आसमंत आदिलशाही आणि मोगलशाहीकडून काबीज करण्यासाठी एका अलौकिक लष्करी सेनानायकाची अधिक जास्त निकड होती आणि हे काम राज्यप्रशासनापेक्षा तुलनेने अधिक कठीण होते. शिवराय प्रथम एक अलौकिक रणधुरंधर होते आणि त्यानंतर एक अव्वल प्रशासक होते, असे म्हणणे चूक ठरणार नाही.

त्यांनी येसाजी कंक, तानाजी मालुसरे, सूर्याजी काकडे वगैरे अनेक समवयस्क तरुणांवर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडून आणि त्यांना प्रेरित करून लष्करी शिक्षणाचे पद्धतशीरपणे धडे दिले. अनेक मावळ्यांचे गट निर्माण केले. त्याचबरोबर कान्होजी जेधे, गोमाजी नाईक, बाजी पासलकर वगैरे वरिष्ठ त्यांच्या छत्राखाली आले. या सर्वांच्यातून शिवाजीराजांनी समविचारी पराक्रमी स्वामिनिष्ठ सरदार निर्माण केले. या व अनेक सरदारांनी पुढे जाऊन त्यांचे स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. त्या सर्वाचा पाया शिवरायांनी १६४२ ते १६४८ या पाच-सहा वर्षांत घातला. अजून मिसरूडसुद्धा न फुटलेल्या या तरुणाची लष्करी प्रतिभा खरोखरच अगाध होती. बारा मावळे आरंभीच काबीज करून त्याच्यावर स्वराज्याचा इमला त्यांनी उभा केला.

बलवत्तर मोगल आणि आदिलशाही फौजांचा सामना करायचा झाला, तर महाराष्ट्रासारख्या

डोंगराळ प्रदेशात उभारल्या जाणाऱ्या स्वराज्याची रचना मोक्याच्या जागांवरील किल्ल्यांवर आधारित असली पाहिजे, याची जाणीव त्यांना या आरंभीच्या काळात झाली. शिवरायांच्या रणनीतीचा हा प्रमुख कणा होता आणि ती याच काळात त्यांनी स्वत: आखली. या दिशेने १६४३-४४ पासूनच त्यांनी अत्यंत पद्धतशीरपणे किल्ल्यांचे जाळे पसरण्यासाठी पावले टाकावयास सुरुवात केली. रोहिडा, कोंडाणा, तोरणा (प्रचंडगड), सिंहगड, पुरंदर, कुवारीगड, भुईमंगळ हे किल्ले त्यांनी या आरंभीच्या काळातच घेतले. मुरुंबदेव किल्ल्याची पुनर्रचना करण्याचे काम त्यांनी मोरोपंत पिंगळे यांच्यावर सोपवले, त्याला 'राजगड' असे नाव दिले आणि ते तिथे स्वत: राहायला गेले. आरंभीच्या काळात शक्तीचा वापर करून किल्ले काबीज करण्यासाठी आपल्याकडे पुरेसे सैन्य नाही, याची त्यांना जाणीव झाली, त्यामुळे पुरंदरसारखा बळकट किल्ला त्यांनी युक्तीने हस्तगत केला, मग त्यासाठी निळोबा नाईकवाडींच्या सौजन्याचा गैरफायदा घेतानाही त्यांनी पुढेमागे पहिले नाही.

फत्तेखानाच्या बलवत्तर फौजेचा पराभव करण्यासाठी त्यांनी आखलेली रणनीती एकाद्या कसलेल्या सेनापतीलाही लाजवेल, अशी होती. लढाईची योजना स्वतंत्रपणे आखण्याची आणि ती अमलात आणण्याची ती शिवरायांची पहिली वेळ होती, हे लक्षात घेतले, तर त्यांच्या लष्करी प्रतिभेची महत्ता आणखीनच उजळून निघते. पुरंदर किल्ल्यावर संरक्षण फळी उभारून त्याच्यावर आलेला हल्ला परतवून लावायचा, हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यानुसार त्यांनी किल्ल्याची परिणामकारक मोर्चेबंदी केली होती. परंतु त्यासाठी ते किल्ल्यातच बसून राहिले नाहीत. आक्रमकता हा कोणत्याही संरक्षणात्मक कारवाईचा आत्मा असला पाहिजे, हे आधुनिक संरक्षणशास्त्रातील, काहीसे विरोधाभासी वाटेल असे, एक मूलतत्त्व आहे. त्याला 'आक्रमक संरक्षण' (ऑफेन्सिव्ह डिफेन्स) अशी संज्ञा आहे. फत्तेखानाने बेलसरच्या छावणीत आपल्या सैन्याला विश्रामासाठी फुरसत दिली असताना त्या वेळाचा उपयोग करून शिवरायांनी दोन आक्रमक कारवाया हाती घेतल्या.

प्रथम त्यांनी कावजी कोंढारकरच्या हाताखाली एक निवडक पागा देऊन भुईमंगळ या भुईकोट हल्ल्यावर पहाट फुटायच्या आधी करारी हल्ला चढवला. त्यांच्या छोटेखानी तुकडीने तिथे मोर्चेबंदी केलेल्या बाळाजी हैबतरावाच्या शिबंदीचा अक्षरश: बोजवारा उडवला आणि त्यांना पळवून लावले. त्यानंतर मराठ्यांनी तो हातांत घेऊन त्या किल्ल्याची मोर्चेबंदी केली. शिरवळ आणि सुभानमंगळ हाती आल्याने पुरंदरची दक्षिणेची बगल सुरक्षित झाली. शिवरायांच्या मावळ्यांच्या सेनेने स्वराज्यासाठी हाती घेतलेली ही पहिली लढाई होती, हे या कारवाईचे वैशिष्ट्य. त्यामुळे त्याला पहिलटकरणीची झालर होती. भुईमंगळ किल्ला सर करण्याची ती लढाई यशस्वी झाली, हे खरोखरच शब्दश: शुभमंगल ठरले.

या अचानक पराभवाने गडबडून गेलेल्या फत्तेखानाच्या बेलसरमधील छावणीवरच पुढील दोन-तीन दिवसांत शिवरायांनी गनिमी धाड टाकली. त्यामागे कोणताही विजय मिळवण्याचा वा बेलसर काबीज करण्याचा उद्देश नव्हता. मोजक्या संख्येच्या तुकडीकरवी गाफील शत्रूवर विजेच्या वेगाने धडक मारायची, होईल तितकी नासधूस साधून आपला जीव वाचवून परत यायचे आणि फत्तेखानाची इच्छाशक्ती खच्ची करायची, हा यामागील प्रमुख हेतू होता. तो

पूर्णतया साध्य झाला. निर्बल पक्षाने बलवत्तर प्रतिस्पर्ध्याचे नीतिधैर्य खच्ची करण्यासाठी वापरण्याचा गनिमी कावा हा नामी डावपेच होता. त्याचा वापर करण्याचा शिवरायांचा प्रथम प्रसंग होता. त्यानंतर त्याचा वारंवार उपयोग करून त्यांनी अनेक बाजी मारल्या. परंतु इतक्या कोवळ्या वयातही त्यांचा बेलसर छावणीवरील हा पहिला गनिमी हल्ला स्वराज्याच्या इतिहासात मानाच्या मुजऱ्याचा मानकरी ठरला पाहिजे.

पुरंदरवरील हल्ल्याचा प्रतिकार आणि फत्तेखानावर चढवलेला प्रतिहल्ला हीसुद्धा वरील दोन्हींप्रमाणे शिवाजीराजांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालील पहिली लढाई होती. फत्तेखानाच्या सैन्याच्या कमुवत जागा अचूक ओळखून त्यांच्यावर वार करावयाचा, ही त्यांची रणनीती तीन टप्प्यांत अमलात आणायची होती. पहिल्या टप्प्यात भर दिवसाच्या प्रकाशात फत्तेखानाच्या सैन्याला गडाच्या मध्यास येईपर्यंत त्यांच्या पुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पनाही येऊ द्यायची नाही, त्यादरम्यान होणाऱ्या त्यांच्या दमछाकीला उधाण आणायचे आणि पावसाळ्यामुळे झालेल्या निसरड्याचा जास्तीत जास्त फायदा करून घ्यायचा. मग दुसऱ्या टप्प्यात अचानक शत्रूवर दगडांचा तुफान मारा सुरू करायचा. उतारावरून अधिकाधिक वाढत्या वेगाने येणाऱ्या दगडधोंड्यांच्या प्रहाराखाली व गोफणींच्या नेम घेऊन मारलेल्या दगडांनी त्यांना चेचून काढायचे आणि या माऱ्याकरवी विद्ध करायचे. शेवटी तिसऱ्या टप्प्यात दमल्या-भागलेल्या व दगडमाऱ्याने जखमी झालेल्या शत्रूवर किल्ल्याच्या उतारावरून जोराने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे मावळ्यांच्या तुकड्यांनी अंतिम प्रहार करायचा. ही तीन टप्प्यांची कल्पक रणनीती राजांनी अत्यंत चोखपणे अमलात आणली.

शिवरायांच्या या पहिल्यावहिल्या युद्धनेतृत्वाचे विलेषण युद्धतत्त्वांच्या निकषावर केले, तर ते त्यावर तंतोतंत खरे उतरतात. शहाजी महाराजांच्या हातात जिंजीत मुस्तफाखानाने बेड्या टाकल्याची वार्ता शिवरायांपर्यंत पोचण्यास वेळ लागला. त्याच्या पाठोपाठ फत्तेखान आपल्या दिशेने येत असल्याची वार्ता त्यांना मिळाली. आता कोणत्याही परिस्थितीत फत्तेखानाला पराभूत करायचे आणि नंतर पित्याच्या मुक्ततेसाठी आदिलशहावर दबाव आणायचा, हे उद्दिष्ट त्यांनी समोर ठेवले आणि त्याचा कसून पाठपुरावा केला. तळाची सुरक्षितता हे दुसरे तत्त्व. भुईमंगळ आणि बेलसरवर हल्ले चढवताना त्यांनी पुरंदर किल्ल्यावरील तळाच्या सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होऊ दिला नाही. गतिक्षमता आणि आक्रमक चाल ही त्यापुढील दोन युद्धतत्त्वे. राजांचा भुईमंगळवरील हल्ला आणि बेलसर छावणीवरील धाड या दोन्ही तत्त्वांचा आविष्कार होता. बळाचा मितव्यय हे आणखी एक युद्धतत्त्व. राजांपाशी अत्यंत तोकडे बळ असूनही माफक संख्या वापरून भुईमंगळ आणि बेलसरवरील धाडी त्यांनी यशस्वी करून दाखवल्या.

विस्मयकारकता हे तर एक युद्धविजयी तत्त्व आहे. शत्रूला यत्किंचितही कल्पना नसताना त्याच्यावर अचानक केलेल्या प्रहारामुळे तो गर्भगळित होऊन जातो आणि त्याच्या शक्तीचा वापरच करू शकत नाही. विस्मय हा गनिमी काव्याच्या डावपेचांचा आत्मा. भुईमंगळ कोटावरील हल्ला घ्या किंवा बेलसर छावणीवरील धाड घ्या, शत्रूला आपल्यावर कोणती वीज कोसळली आहे, हेच कळले नाही; पण त्याचबरोबर पुरंदरवरील प्रतिकारादरम्यान

शिवाजीराजे दगडधोंड्यांचा असा परिणामकारक मारा करतील, याची शत्रूला तसूभरसुद्धा कल्पना नव्हती. आणखी एक महत्त्वाचे युद्धतत्त्व आहे सेनेचे मनोधैर्य (मोराल). शिवाजीराजांची मावळ सेना ही राष्ट्रप्रेमाने आणि स्फूर्तीने पेटली होती. फत्तेखानाच्या भाडोत्री सैन्याचे मनोधैर्य त्यांच्या पासंगालाही पुरले नसते. हा घटक शिवरायांच्या यशाचा मुख्य पाईक होता.

१६३० ते १६४८ या कालावधीत महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतात एका नवयुगाची मुहूर्तमेढ झाली. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, या लोकोक्तीनुसार राजांनी फत्तेखानाच्या प्रचंड फौजेचा ज्या प्रकारे पराभव केला, त्यावरून एका रणधुरंधराचे महाराष्ट्राच्या क्षितिजावर आगमन झाले असल्याची ग्वाही सर्वत्र पोचली.

संदर्भ सूची

१. बाळशास्त्री हरदास; पुण्यलोक छत्रपती शिवाजी महाराज, भाग १; लाखे प्रकाशन; पान १६९. उद्धृत शिवभारत, अध्याय ६.

२. निनाद बेडेकर; छत्रपती शिवाजी; कर्नाटक प्रकाशन संस्था; पान ८. उद्धृत शिवभारत, अध्याय ६.

३. गो.स. सरदेसाई; मराठी रियासत, खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान १३९.

४. ब. मो. पुरंदरे; राजा शिवछत्रपती, पूर्वार्ध; पुरंदरे प्रकाशन; पान ११७. उद्धृत पेशवे दफ्तर ३१, लेख १२६.

५. पुर्वोक्त; पान १२२. उद्धृत पेशवे दफ्तर २२/३११.

६. पुर्वोक्त; पान १२७.

७. जेम्स ग्रांट डफ; हिस्टरी ऑफ द मराठाज, व्हॉल्यूम १; करण पब्लिकेशन्स; पान ३४.

८. बाळशास्त्री हरदास; पुण्यलोक ....; पान ४३. उद्धृत शिवभारत, अध्याय ९.

९. पुर्वोक्त; पान ४४. उद्धृत शिवभारत, अध्याय १०.

१०. विजय देशमुख; शककर्ते शिवराय, खंड १; छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन; पान १६३. उद्धृत एफ आर सूर, खंड १, १०३.

११. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत........; पान १३८. उद्धृत शिवशाहीचा लेखनालंकार.

१२. बाळशास्त्री हरदास; पुण्यलोक ....; पान १९५. उद्धृत शिवभारत, अ. ९. लोक २५ ते ३०.

१३. विजय देशमुख; शककर्ते ....; पान १६८. उद्धृत विजयस्मारक ग्रंथ पान ७१.

१४. गो.स. सरदेसाई, मराठी रियासत, पान १५९.

१५. बाळशास्त्री हरदास; पुण्यलोक .... पान १९७. उद्धृत शिवभारत, अध्याय १०, लोक २५ ते ३०.

१६. ब. मो. पुरंदरे; राजा ...., पान १४६. उद्धृत पेशवे दफ्तर ३१/४१.

१७. विजय देशमुख; शककर्ते ......, पान २०८.

१८. पुर्वोक्त; पान १९१.

१९. गो.स. सरदेसाई; मराठी ....; १५६.

२०. पळसोकर आर. डी.; शिवाजी, द ग्रेट गुरीला; कर्नल पळसोकर; पान ५२.

२१. गो.स. सरदेसाई; मराठी रियासत........; पान १५६. अमात्यांची राजनीती, पान ३.

२२. पुर्वोक्त; पान १४९. उद्धृत जदुनाथ सरकार, इंडिया हिस्टरी क्वार्टर खंड ३, पान ३६२-६४.

२३. पुर्वोक्त; पान १५०. उद्धृत खंड १५- ३६४.

२४. पुर्वोक्त; १५८.

२५. निनाद बेडेकर; छत्रपती.........; पान १६.

२६. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत; ....१६२.

२७. विजय देशमुख; शककर्ते ....; पान २१८. उद्धृत शिवभारत, ११/ २४-२८.

२८. गो.स. सरदेसाई; मराठी रियासत; पान १६१.

२९. ब. मो. पुरंदरे; राजा ......; पान १९५. उद्धृत शिवभारत, १३/ ७८ व ७९.

३०. पुर्वोक्त; पान १९५. शिवभारत, १३/ ८८ व ८९.

३१. निनाद बेडेकर; छत्रपती........; पान २१.

३२. ब. मो. पुरंदरे; राजा ....; पान २०२.

३३. विजय देशमुख; शककर्ते........; पान २३५. उद्धृत इ. सं. १ पान ४८.

३४. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत......; पान १०३.

३५. बाळशास्त्री हरदास; पुण्यलोक ....; पान १७२-१७६. शिवभारत, अध्याय १६.



३.
सेना आणि रणनीती



पहिली मराठी सेना

स्वराज्याची सेना

सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत म्हणावी अशी स्वतंत्र मराठा सेना अस्तित्वात नव्हती. गावोगावचे देशमुख आपल्या वतनाच्या आणि मालमत्तेच्या संरक्षणासाठी आपापल्या सेनेच्या तुकड्या बाळगत असत. त्यांच्यातील अधिक महत्त्वाकांक्षी आणि कर्तृत्वशाली सरदार त्यांची वाढ खड्या सेनेत करून आदिलशाहीची वा मोगलशाहीची चाकरी पत्करत असत आणि छोट्यामोठ्या जहागिरींचे मालक बनत. पराक्रमाची आणि शौर्याची मुळापासून आवड असलेले रांगडे मराठा शेतकरी तरुण वेगवेगळ्या सरदारांच्या शिबंदींमध्ये नोकरी मिळवत. त्यांतले काही कुटुंबातील इतरांवर शेतीची जबाबदारी टाकून मग कायमचा सैनिकी पेशा पत्करीत असत. आपापल्या वतनाच्या हद्दीत देशमुख स्वत:ला राजे म्हणवत, परंतु त्यापुढे त्यांची मजल जात नसे.

शिवाजी महाराज जसे एक स्वयंभू सम्राट होते, छत्रपती राजे होते; तसेच एक स्वयंभू सेनानायक होते. महाराष्ट्रात मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचे स्वप्न शिवाजीराजांनीच प्रथम पाहिले आणि ते केवळ साडेतीन-चार दशकांच्या अवधीत स्वबळावर साकार करून दाखवले. अशा राज्यनिर्मितीसाठी सर्वप्रथम आवश्यीकता असते, ती एका शिस्तबद्ध, विशिष्ट ध्येयाने प्रेरित आणि कर्तृत्ववान नेतृत्व लाभलेल्या सेनेच्या संघटनेची. खमके सैनिक म्हणून मराठ्यांचा सातव्या शतकापासून बोलबाला होता; परंतु शिवाजीराजांच्या पदार्पणापर्यंत म्हणावे असे मराठा सैन्य अस्तित्वात नव्हते. ज्या वेगवेगळ्या शिबंद्या होत्या, त्यांच्यात एकमेकांत दुफळी होती, कोता स्वार्थ होता आणि कोणत्याही संघटितपणाचा पूर्ण अभाव होता. शिवाजीराजांचा पुढील जीवनपट उलगडण्याच्या आधी त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याच्या सेनेची रचना आणि राजांच्या रणनीतीचा परामर्श घेणे सयुक्तिक ठरेल.

यापूर्वी आलेल्या उल्लेखानुसार मराठे प्रथम चालुक्य आणि नंतर र्राकूट राजांच्या झेंड्याखाली लढले. ते उत्तम योद्धे होते, यात वाद नाही. ह्यू-एन-त्संग या चिनी प्रवाशाने त्यांच्या लढवय्या वृत्तीबद्दल गौरवात्मक उद्गार काढले आहेत. महाराष्ट्रातील लोकांबद्दल त्याने लिहून ठेवले आहे, ‘तेथील रहिवासी अत्यंत स्वाभिमानी आणि लढवय्ये होते. त्यांच्यावर

केलेल्या उपकाराबद्दल वृतज्ञ राहणारे आणि अन्यायाचा सूड घेणारे, संकटात असलेल्या याचकांसाठी त्याग करणारे आणि त्यांचा अपमान करणाऱ्याशी निष्ठुरपणे वागणारे होते.'१ चालुक्य आणि र्राकूटांच्या नंतर यादव आणि सिल्हार घराणी आली. ही दोन्ही निश्चितपणे मराठा मुळाची होती. सिल्हारांनी कोकण आणि कऱ्हाड प्रांतावर राज्य केले. यादवांचा शेवटचा राजा रामचंद्र देव हा दिल्लीतील तुर्की बादशाहीचा मांडलिक झाला. त्याच्या जावयाने मुस्लिम पाशातून स्वतंत्र होण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यानंतर बहामनी राज्याच्या आरंभापर्यंत मराठा योद्ध्यांचा फारसा संदर्भ सापडत नाही.

महाराष्ट्रातील भूप्रदेशाच्या डोंगराळी स्वरूपामुळे तेथील रहिवाशांना परकीय वा स्थानिक आक्रमकांपासून नैसर्गिक संरक्षण उपलब्ध होते. विखुरलेली खेडी दूरवर पसरलेली असत आणि त्यांच्या भोवताली संरक्षक तट बांधलेले असत. त्यामुळे परकीय आक्रमकांना या दुर्गम डोंगरावरील आपल्या वतनापासून दूर ठेवणे तिथल्या मुखिया देशमुखांना सहज शक्य होत असे. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेने तिथे मूळ धरले नसल्याने रहिवाशांना आपल्या राष्ट्रीयत्वाबद्दल फाजील अभिमान नव्हता. सर्वसामान्य माणसाला जोपर्यंत त्याच्या वडिलोपार्जित जमिनीवर हक्क दिले जातील आणि सुखाने जीवनक्रमण करण्यात बाधा येणार नाही, तोपर्यंत मुस्लीम सुलतानांचे वर्चस्व मानण्यात त्याचा फारसा विरोध नसे. त्यामुळे आपमतलबी देशमुख आणि तत्सम अंमलदार आपला अधिकार अखंडपणे गाजवत राहू शकत असत. त्यांचा पराक्रम प्रामुख्याने प्रतिस्पर्धी देशमुखांच्या पिढीजात भांडणातील खून, अपहरण आणि दंगेधोपे यापर्यंतच मर्यादित राहात असे.

शिवाजीराजांच्या आगमनाने मराठ्यांच्या लष्करी इतिहासाचा उपोद्घात झाला. त्यांना लष्करी संघटना कशी असावी, याबद्दल स्पष्ट उमज होती. त्याची रचना कशी असावी, याबद्दल त्यांनी सखोल विचारमंथन केले होते, त्यानुसार स्वराज्याच्या सेनेची आखणी केली होती आणि ती प्रत्यक्षात आणली होती. त्यामुळे त्यावेळच्या इतर सैन्यदलांच्या संघटनेच्या आराखड्याच्या तुलनेत स्वराज्याचे सैन्य अधिक सुसंघटित होते. रणनीती व डावपेच याबद्दल राजांच्या संकल्पना आधुनिक, परिपक्व व उपयुक्ततावादी होत्या. त्यांचे लष्करी शास्त्राचे ज्ञान स्वनिर्मित आणि अलौकिक होते. ते व्यवहारवादी होते आणि त्यांची मते स्वत:च्या अनुभवांवर आधारित होती. अधिकाराच्या एकवटीकरणाचे ते पुरस्कर्ते होते; परंतु मुलकी प्रशासनात लष्कराचा हस्तक्षेप त्यांना मान्य नसे. योग्य जागेसाठी योग्य लोकांची निवड झाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे, परंतु माणसांच्यात वारशाने कर्तृत्व येते, यावर त्यांचा विश्वास नव्हता.

शिवाजीराजांनी केलेली सैन्याची रचना ही त्यापूर्वी कधीच अस्तित्वात नव्हती, असे नव्हे. प्राचीन काळात ग्रीक, रोमन आणि काही भारतीय सैन्यदलांची रचना या धर्तीवर आधारित होती. परंतु मध्ययुगीन काळात सरंजामशाहीच्या दरम्यान ती रचना विसकळीत झाली होती. युरोपमध्ये गोंझालो फेर्नांडेझ डे कॉर्डोबा (१४५३-१५१५) याच्या सल्ल्यावरून स्पेनच्या फर्डिनंड राजाने सोळाव्या शतकाच्या आरंभी ही पद्धत पुन्हा सुरू केली होती आणि सर्व युरोपीय देशांनी ती अमलात आणली होती. परंतु भारतात साहजिकच ती पोचलेली नव्हती.

भारतातील सैन्यदले कोणत्याही बांधेसूद मापदंडावर आधारित नसत.

शिवाजीराजांच्या स्वत:च्या नावीन्यपूर्ण रचनेवर आधारित, त्यांनी भरती केलेले, सरकारतर्फे शस्त्रसज्ज केलेले आणि सरकारकडून पगार दिले जाणारे असे अभिनव सैन्य त्या काळातील पहिलीच फौज होती. सर्वांत कनिष्ठ तुकडीपासून शेवटपर्यंत चढत्या क्रमाने वाढत जाणाऱ्या त्याच्या रचनेत प्रत्येक टप्प्याला अधिकारी होता आणि तो वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अमलाखाली होता. अशा प्रकारे सध्याच्या आधुनिक सैन्याच्या रचनेचे मूलतत्त्व असलेली 'अधिकाराची साखळी' (चेन ऑफ कमांड) त्यात अंतर्भूत होती.२ अशी रचना त्या जमान्यात एक खरोखरच लष्करी क्षेत्रातील क्रांती होती, असे म्हणणे चूक ठरणार नाही. त्याचे श्रेय राजांच्या कल्पकतेला आणि लष्करी प्रतिभेला दिले पाहिजे.

सैन्याची रचना

घोडदळ आणि पायदळ हे मराठा लष्कराचे दोन प्रमुख भाग होते. घोडदळातील सैनिकांचे दोन प्रकार असत : शिलेदार व बारगीर. पागा म्हणजे सरकारी घोडदळ. यात खेड्यापाड्यांतून येणाऱ्या तरुणांना घोडदौडीचे आणि हत्यारे चालवण्याचे शिक्षण देऊन अश्वारोही बनवले जाई. त्यांना बारगीर म्हणत. या बारगीरांना घोडे, हत्यारे आणि साहित्य सरकारकडून पुरवले जाई. दुसरा, शिलेदार. हे कसलेले घोडेस्वार असत, लष्करी कामाची त्यांना आवड असे, ते आपापली शिबंदी उभारत आणि आपापले घोडे व हत्यारे घेऊन येत असत. त्या घोड्यांची देखभाल करणे हे त्यांचे काम असे. त्यांची सरकारातून नेमणुक होत असे. काही शिलेदारांच्या हाताखाली हजार-पाचशेपर्यंत स्वार असत. शिलेदार डोईजड होऊ नयेत म्हणून त्यांच्या टोळ्यांत कित्येक बारगीर मिसळून ठेवले जात. शिलेदार पागेच्या अधिकाऱ्याखाली काम करीत असत.

सुरुवातीला जरी सैन्यात शिलेदारांचे प्रमाण अधिक होते, तरी पागेची संख्या वाढवण्यावर शिवाजीराजांचा अधिक जोर होता. त्याची दोन कारणे होती. पहिले, बारगीरांना आपल्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली प्रशिक्षण देऊन त्यांचे उत्तम सैनिकांत परिवर्तन केले जाई, त्याशिवाय त्यांना सैन्यात भरती केल्यामुळे सरकारची त्यांच्यावर मालकी राही. दुसरे कारण म्हणजे शिलेदार कधी कधी बेशिस्त आणि 'हम करेसो कायदा' या भावनेच्या आहारी जात. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे कठीण जाई.

प्रारंभी स्वत:चे घोडदळ उभे करीपर्यंत शिवरायांच्या ३,०००च्या घोडदळात २,००० शिलेदार होते; परंतु जेव्हा १६५९च्या सुमारास घोडदळाची संख्या १०,००० झाली, तेव्हा त्यातील बारगीरांची संख्या ७,०००पर्यंत पोचली. थोडक्यात, बारगीरांचे प्रमाण दहा वर्षांत ३३% पासून ६६% पर्यंत नेण्यात आले होते. याबाबतीत मुस्लीम इतिहासकार खाफी खान याने पुढील उल्लेख केला आहे: 'युद्धावर जाणाऱ्या आपल्या सैन्यात जास्तीत जास्त बारगीर असावेत, यासाठी शिवाजींनी दहा ते बारा हजार कच्छी आणि अरब घोड्यांची खरेदी केली होती.'३ अर्थातच बारगीरांचे प्रमाण भाडोत्री शिलेदारांपेक्षा अधिक झाल्यावर घोडदळाची गुणवत्ता वाढली, यात वाद नाही. शिवाजीराजे एक उपजत लष्करी नेते असल्याने आपल्या

सैन्यात अधिकारपदाचे एकवटीकरण करणे आणि ते कर्तबगार नेतृत्वाच्या हातात देणे आवश्याक आहे, हे जाणून त्यांनी घोडदळ आणि पायदळ या दोन्हीत कायमच्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती.

पायदळातील दहा शिपायांच्या तुकडीचा ‘नाईक’ हा प्रमुख असे. अशा पाच तुकड्यांचा एक ‘हवालदार’च्या हाताखाली हवाला बने. दोन किंवा तीन हवाल्यांचा मिळून एक जुमला तयार होई. त्याचा प्रमुख ‘जुमलेदार’ असे. पायदळाच्या प्रत्येक पलटणीत दहा जुमले असत आणि त्याचा प्रमुख ‘हजारी’ असे. पाच हजार संख्येच्या फौजेच्या प्रमुखाला ‘पंचहजारी’ हे नाव होते. पायदळातील प्रत्येक जुमलेदार आणि हजारीला हिशेब ठेवण्याच्या मदतीसाठी सबनीसाची नेमणूक केली जाई.

पायदळातील शिपाई मावळे आणि हेटकरी या दोन प्रकारचे असत. ते सर्वसाधारणपणे मावळ आणि कोकणातील असत. त्यामुळे त्यांना मावळे हे नाव पडले. मावळे घाटमाथ्यावरचे आणि हेटकरी कोकणातील. त्यांना आपली हत्यारे स्वखर्चाने घ्यावी लागत. दारूगोळा मात्र सरकारातून मिळत असे. पायदळाच्या प्रमुखाचा हुद्दा ‘सरनोबत’ हा होता. सर्व पलटणी सरनोबताच्या हाताखाली काम करत असत. आरंभी स्वराज्याच्या सैन्यात मावळ्यांच्या सात पलटणी होत्या आणि येसाजी कंक हा सरनोबत होता.

घोडदळातील सर्वांत कनिष्ठ अधिकाऱ्याचा हुद्दा ‘हवालदार’ असे. त्याच्या तुकडीला हवाला हे नाव होते. प्रत्येक हवाल्यात २५ बारगीर असत. त्याबरोबर त्यात एक नालबंद (घोड्यांना नाल मारण्यासाठी) आणि एक भिस्ती (पाणक्या) असे. पाच हवाल्यांचा मिळून एक ‘जुमला’ बने आणि त्याच्या प्रमुखाचा हुद्दा ‘जुमलेदार’ होता. त्यावरील सुभेदाराच्या हाताखाली १० जुमले असत. दहा सुभ्यांवर ‘पंचहजारी’ हा अधिकारी असे. घोडदळाच्या प्रमुखाचाही ‘सरनोबत’ हाच हुद्दा होता. घोडदळाचा सरनोबत हा पायदळातील सरनोबतापेक्षा वरच्या दर्जाचा असे; किंबहुना तो अष्टप्रधानमंडळाचा सदस्य असे. पायदळाच्या सरनोबताला मात्र तो सन्मान उपलब्ध नसे.

लष्करी अधिकाऱ्यांबरोबर काही मुलकी अधिकारीही असत. प्रत्येक जुमल्यात जुमलेदाराच्या मदतीसाठी मुजुमदार असे. मुजुमदार हिशेब राखत असे. हजारीच्या कार्यालयात मदतीसाठी मुजुमदार, कारभारी आणि जमेनीस हे अधिकारी असत. असेच, पण थोडा अधिक पगार मिळवणारे, अधिकारी पंचहजारीच्या कार्यालयातही मदतीसाठी असत. याशिवाय कायमचे वार्ताहर, निरोप्ये आणि गुप्तहेर स्वतंत्रपणे वावरत. जुमलेदार या पदापासून वरील सर्व अधिकाऱ्यांच्या कार्यालयांत बातमी आणणारे हेर असत. शिवाजीराजांनी सैन्यात एक अत्यंत सक्षम आणि परिणामकारक हेरसंस्था निर्माण केली होती. वाकनवीस हा गुप्तहेर खात्याचा प्रमुख असे. राजांच्या विश्वासातला कर्तबगार सरदार बहिर्जी नाईक हा पहिला वाकनवीस होता. शिवाजीराजांच्या पीलखान्यात तीन-साडेतीनशे हत्ती व हजार-दीड हजार उंट होते. त्यांची व्यवस्था चांगली ठेवली जाई.

शिवाजीराजांच्या एकूण कारकिर्दीत घोडदळाचे पाच सरनोबत झाले. पहिला तुकोजी, दुसरा माणकोजी दहातोंडे, त्याच्या मृत्यूनंतर नेतोजी पालकर त्याच्या उल्लेखनीय कर्तबगारीवर

सरनोबत झाला. पन्हाळा सर करण्यातील त्याच्या हलगर्जीमुळे त्याला काढून टाकण्यात आले आणि कडतोजी गुर्जर हा करारी अश्वारोही सरनोबत झाला. त्याच्या मृत्यूनंतर हसाजी मोहितेला त्या पदावर नेमले गेले.

शिवाजीराजांच्या पायदळ आणि घोडदळाच्या संख्येचे आकडे निश्चितपणे सांगता येत नाहीत, कारण वेगवेगळ्या मोहिमात वेगवेगळे आकडे सापडतात. वृष्णाजी अनंत सभासदांच्या नोंदीनुसार राजांच्या सैन्यात ४५,००० घोडदळ आणि १०,००० मावळ्यांचे पायदळ होते.४ पण हे वादास्पद वाटते. राजांच्या मोहिमा मुख्यत्वेकरून डोंगराळी प्रदेशात होत्या. तिथे घोड्यांचा फारसा उपयोग नसे. त्याचप्रमाणे घोड्यांवरील खर्च पायदळापेक्षा तुलनेने बराच अधिक असे. बारगीरासाठी जातिवंत घोडा, चांगली हत्यारे आणि अधिक पगाराची आवश्यअकता पडे. त्यामुळे शिवाजीराजांच्या सैन्यात मावळ्यांची संख्या बारगीर व शिलेदारांपेक्षा अधिक असावी, हे ओघानेच आले. स्वराज्याच्या सैन्याची कोणतीही विशिष्ट मोहीम घेतली, तर त्यात बारगीरांच्या संख्येपेक्षा मावळ्यांची संख्या अधिक होती, असे खालील उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते.

१२ नोव्हेंबर १६६८ला इंग्रजांच्या कारवार वखारीने सुरतमधील इंग्रजी अधिकाऱ्याला कळवले होते की, शिवाजीराजांनी हल्ल्यासाठी २००० घोडदळ आणि ८ ते १०,००० पायदळ गोळा केले आहे.५ १६७३ साली हुबळीवरील स्वारीत २००० घोडदळ आणि ४००० पायदळ होते. त्याचप्रमाणे १६७५मध्ये शिवाजीराजांनी फोंड्याच्या किल्ल्याला वेढा घातला होता, त्यावेळी त्यांच्यापाशी २००० घोडदळ आणि ७००० पायदळ होते.६ आणखी एक नोंद म्हणजे १९ नोव्हेंबर १६७८ला राजापूरच्या गुमास्त्र्याने मुंबईला लिहून पाठवले होते की, मराठ्यांकडे १५,००० घोडदळ आणि २०,००० पायदळ असल्यामुळे पन्हाळ्यावर विजापूरच्या सेनापतीला शिवाजीराजांवर हल्ला करणे असंभव झाले होते.७ परदेशी वखारींच्या तटस्थ गुमास्त्र्यांनी केलेल्या या नोंदी विश्वसनीय मानल्या पाहिजेत. शिवाजीराजांच्या सैन्यात घोडदळापेक्षा पायदळाची संख्या अधिक होती, यात संशय नाही.

मराठा सैनिकांजवळ चापाच्या (मस्केट) आणि तोड्याच्या (मॅचलॉक) बंदुका, ढाल-तलवारी, भाले, बर्ची, खंजीर, धनुष्यबाण व दांडपट्टा ही हत्यारे असत. त्यांचे प्रमुख हत्यार म्हणजे ढाल-तलवार. तलवारी अत्यंत तीक्ष्ण आणि धारदार असत. त्या टोकाला वक्राकार असत; एकदा का शत्रूच्या अंगात घुसली की, कोथळाच बाहेर निघावा. तलवार चालवण्यात मराठा सैनिक अत्यंत तरबेज असत आणि समोरासमोर तलवारीच्या द्वंद्वात त्यांची कोणीच बरोबरी करू शकत नसे. ढाल इतकी गुळगुळीत असे की, दूर अंतरावरून मारलेली बंदुकीची गोळीसुद्धा ती परतवू शके. बंदुकांचे प्रमाण अत्यंत कमी असे आणि बारगीर तर बंदुकीपेक्षा तलवार नेणेच पसंत करत असे. दांडपट्टा फिरवत वेगाने येणारा निष्णात अश्वारोही शत्रूच्या अनेक घोडेस्वारांना जमिनीवर लोळवू शके आणि मागून येणाऱ्या सवंगड्याच्या घोड्याच्या टापांखाली ते तुडवले जात. मराठे गोफणीचाही प्रभावीपणे वापर करीत. मराठ्यांची ही शस्त्रे जरी गावंढळ वाटली, तरी ती चालवण्यातील त्यांचे कसब त्यांना लढाया जिंकून देत असे.

पुढे पेशव्यांच्या काळात मराठा सैन्याबरोबर पेंढारी लोकांचा जथा जाई. त्यांचा सैन्याशी काही संबंध नसे. शत्रूच्या प्रदेशात लुटालूट आणि नासधूस करणे हे त्यांचे प्रमुख काम; परंतु शिवाजीराजांच्या काळात पेंढाऱ्यांचा वावर नव्हता आणि त्यांनी त्यांचा उपयोग केला नाही. त्यांच्याविरुद्ध मोगल सैन्यात मात्र याच कामासाठी बिदारी लोकांचा वापर केला जाई. इटालियन प्रवासी मनुचीने याबद्दल नोंद करून ठेवली आहे. तो लिहितो, 'सैन्याबरोबर अधिवृत मान्यता असलेल्या चोर-डावूंचा एक ताफा जात असे. त्यांना बिदारी असे नाव होते. ते शत्रूच्या प्रदेशात प्रथम शिरून लुटालूट करत, त्यानंतर सैन्य येई. बिदारींच्या लुटीतला हिस्सा सेनापतीला दिला जाई. जेव्हा शहजादा शाह आलम गोव्याजवळ स्वराज्याच्या प्रदेशात आला, तेव्हा त्याच्या सैन्याबरोबर सात हजार बिदारी होते. त्यांना बारदेश लुटण्याचे आदेश दिले गेले होते.'८

सभासद बखरीनुसार शिवाजीराजांच्या वैयक्तिक रक्षणासाठी त्यांनी मावळ्यांमधून २००० तडफदार, चुणचुणीत आणि तलवारबहाद्दर तरुणांची निवड करून त्यांना चार तुकड्यांत वाटले होते. खासखैल नावाच्या या राजांच्या अंगरक्षक तुकड्या समारंभ असो वा लढाई असो, राजांच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज असत. त्यांना विशेष रुबाबदार गणवेश सरकारातून मिळत. कशिदाकाम केलेले पागोटे, रुंद कपड्याचे अंगरखे, तलवारीच्या म्यानाला चांदीच्या कडा, भाले आणि बंदुकींनाही चांदीचे वलय आणि कानात चांदीची भिकबाळी असा त्यांचा थाट असे. फक्त देखाव्यासाठीच ते नसत. वेळ आली, तर शत्रूवर तुटून पडण्यात ते वाकबगार होते. १६६३मध्ये जेव्हा राजांना सिंहगडावर फितुरी झाल्याचे कळले, तेव्हा ती शमवण्यासाठी त्यांनी मोरो त्रिमल आणि निळो सोनदेव यांना घोडदळ आणि खासखैल तुकडी घेऊन धाडले होते.९

सैन्यातील पगार

शिवाजीराजे सर्व अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना नेमून दिलेला पगार वेळेत देण्याबद्दल अत्यंत दक्ष असत. कोणत्याही कारणासाठी पगारात कपात होणार नाही आणि सैनिकाला त्याची कधीही याचना करावी लागणार नाही, याची काळजी घेत असत. या बाबतीत मराठा सैन्यातील परिस्थिती मोगल सैन्यापेक्षा चांगली होती. फौजेस पगार वेळच्या वेळी देण्यासंबंधी राजांनी सक्त नियम लागू केले होते. लोकांकडे येणे राहिलेली बाकी वसूल करून फौजेने आपला पगार परभारे भागवावा, असा प्रकार ते कधीही होऊ देत नसत. सैनिक आणि त्यांचे अधिकारी यांना वेळेवर पगार मिळावा, याबाबत शिवाजीराजांनी कडक नियम घालून दिले होते. त्यातला काही पगार धान्य, कपडे वा इतर सुविधांच्या स्वरूपातही दिला जाई.

लष्करी अधिकाऱ्यांना समान दर्जाच्या मुलकी अधिकाऱ्यांपेक्षा तुलनेने अधिक पगार मिळत असे. घोडदळाच्या जुमलेदाराला दर वर्षाला पाचशे होन (एक होन = चार ते पाच रुपये) पगार मिळत असे, त्याशिवाय तो पालखीमधून ये-जा करू शके. हजारीला दर वर्षाला १००० होन मिळत. पंचहजारीला वर्षाला २००० होन मिळत असत. सरनोबत म्हणजे सरसेनापतीला मिळणाऱ्या पगाराची रक्कम सभासद बखरीमध्ये दिलेली नाही, परंतु त्याला पेशव्यासारखीच

वस्त्रे आणि सन्मान मिळत असल्याचा उल्लेख आहे.१० त्याशिवाय पालखी, अबदागीर वगैरे अर्थातच मिळत. शिलेदारांचा पगार दरमहा सहा होनांपासून बारा होनांपर्यंत आणि बारगीरांचा दोन ते पाच होन असे.

पायदळाच्या अधिकाऱ्यांना मात्र घोडदळापेक्षा कमी पगार मिळत असे. जुमलेदाराला वर्षाला १०० होन, हजारीला ५०० होन आणि पंचहजारीला २००० होन पगार असे. पंचहजाऱ्यासाठी सरकारातून पालखी, अबदागीर नेमले जात.

जुमल्यातील मुजुमदाराला १०० ते १२५ होन मिळत. पंचहजारीच्या कार्यालयात काम करणाऱ्या मुजुमदार आणि इतर मुलकी अधिकाऱ्यांना त्याच हुद्दयाच्या हजारी कार्यालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपेक्षा अधिक पगार असे. जुमल्याच्या कार्यालयातील सबनीसाला ४० होन मिळत, तर हजारी कार्यालयात काम करणाऱ्या सबनीसला १०० ते १२५ होन मिळत असत.

वृष्णाजी अनंत सभासद यांच्या सभासद बखरीतून हे आकडे घेतलेले आहेत. त्यावेळच्या रुपयाची खरेदी शक्ती प्रचंड असे. त्यावेळी चौलच्या पोर्तुगीज कप्तानाचा वर्षाचा पगार ४००,००० रैस म्हणजे १००० रुपये होता. याची तुलना जर मराठा सेनेच्या घोडदळातील पाचहजारी अधिकाऱ्याशी केली, तर त्याला वर्षाला ८००० ते १०००० रुपये पगार मिळे.११ शिवाजीराजे आपल्या लष्करातील अधिकाऱ्यांना इतर सैन्यांच्या तुलनेत कसा बक्कळ पगार देत असत, हे यावरून लक्षात येईल.

सैन्याची शिस्त

मराठा सैन्याची शिस्त त्या काळच्या इतर सैन्यांपेक्षा वैक पटींनी उत्तम होती. किंबहुना मोगल किंवा सुलतानशाहीच्या सैन्यात शिस्तीचा पूर्णत: अभावच होता, असे म्हणणे चूक ठरणार नाही. शत्रूच्या मुलखात मोहिमा व लूट करण्यासंबंधाने राजांनी सक्त नियम घालून दिले होते. दसऱ्याच्या दिवशी मोठा दरबार भरवून फौजेची आणि सामानसुमानाची झडती घेतली जात असे. लुटीचा झाडून सर्व ऐवज सरकारात भरावा लागे. तो ऐवज लपवल्यास कडक शिक्षा होत्या. मोहिमांत केलेल्या पराक्रमाची दखल घेऊन वस्त्रे, किताब व देणग्या दिल्या जात असत. जे लढाईत कामी आले, त्यांच्या भावामुलास नोकरीत घेतले जाई. वाटेत मिळणारी लूट ही स्वराज्याची मालमत्ता समजली जाई आणि परतल्यावर सरकारी खजिन्यात किंवा भांडारात जमा केली जाई.

चांगल्या कामाची राजे हमखास दखल घेत असत आणि उल्लेखनीय कर्तबगारीसाठी सरदारांना मोठमोठे किताब देत असत. कडतोजी गुजर किंवा हसाजी मोहितेला त्यांनी असे किताब दिले होते. त्याशिवाय ‘अफ्तबगीर’ बरोबर नेण्याचा किंवा पालखीमधून समारंभपूर्ण जाण्याचा त्यांना सन्मान मिळत असे. लढाईतील पराक्रमासाठी सोने-चांदीचे दागिने वा नगद रकमेची बक्षिसे दिली

जात. जखमी सैनिकांना त्यांच्या जखमांच्या स्वरूपानुसार भत्ते दिले जात.

लढायांत शहीद झालेल्या सैनिकांच्या विधवांना निवृत्तिवेतन दिले जाई. अशा सैनिकांच्या मुलांनाही वेतन दिले जाई आणि वयात आल्यावर त्यांना सैन्यात नोकरी मिळे.१२

सरकारातील सर्व मंत्रयांना युद्धात भाग घ्यावा लागत असे आणि त्यांनी लष्करी तुकड्यांचे नेतृत्व करावे, अशी त्यांच्याकडून अपेक्षा असे. पेशवा मोरोपंत त्रिंबक पिंगळे आणि सचिव अण्णाजी दत्तो यांनीही लढायांत भाग घेतला होता. याउलट सरनोबताने मात्र मुलकी कारभारात कोणताही हस्तक्षेप वा लुडबूड करणे राजांना आवडत नसे.

जर कोणताही अधिकारी वा शिपाई सरकारी जमिनीचा वापर करीत असेल, तर त्याचे भाडे त्याच्या पगारातून कापले जाई. शिवाजीराजांनी देशमुख आणि देशपांड्यांचे काही अघोरी परंपरागत हक्क आणि सोयी त्यांच्यापासून हिरावून घेऊन सरंजामशाहीला आळा घातला होता. देशमुखांचे काही प्रचंड किल्लेवजा वाडे जमीनदोस्त करण्याचे त्यांनी आदेश दिले होते. प्रजेवर अन्याय करणारे कोणतेही नवे सरंजामशहा किंवा लष्करी ताकदवान पुंड निर्माण होऊ नयेत, यासाठी ते वेळीच पावले उचलत असत. लष्करातलेसुद्धा कोणतेही पद आनुवांशिक नसे. कोणत्याही पातळीच्या अधिकाऱ्यांना बडतर्फी, बदली किंवा चौकशीला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागे.

स्त्रिया, ब्राह्मण आणि गायींच्या प्रती अत्यंत सद्भावाने वर्तन करण्याचे आदेश असत. स्त्रियांची कोणत्याही प्रकारची विटंबना वा अनादर झाल्यास कडक शासन केले जाई. लष्करात बटीक, बायको, कलाल वगैरे नेण्यास सक्त मनाई असे. नर्तिका किंवा दासी छावणीत आणणे हा मृत्युदंडपात्र गुन्हा होता. कर्नाटक मोहिमेत दुर्वर्तन करणाऱ्या काही सैनिकांना त्यांनी अत्यंत कडक शिक्षा ठोठावली होती.१३ स्वराज्य सेनेत असे प्रसंग घडत नसत, असे ठामपणे सांगणे कठीण आहे; परंतु त्यावेळच्या आदिलशाही किंवा मोगल सैन्याच्या तुलनेत स्वराज्याच्या सैन्याची शिस्त आणि नैतिक आचार कित्येक पटींनी वरच्या दर्जाचा होता. त्याचे संपूर्ण श्रेय केवळ शिवाजीराजांच्या उच्च नीतितत्त्वांना आणि कडक शिस्तप्रियतेला दिले पाहिजे. जेव्हा मोगल सेनापतीच्या छावणीत ४०० नर्तिकांचा वावर असे, त्या काळात हे शिवाजीराजांनी साधले.१४ कर्ज काढण्यास मनाई असे. लग्न वगैरे कार्यात सैनिकांना सरकारातून मदत देण्याची व्यवस्था होती.

शिवाजीराजांची सर्वथा निर्भर्त्सना करणाऱ्या खाफीखान या इतिहासकारानेसुद्धा त्यांच्याबद्दल पुढील स्तुतिपूर्ण उल्लेख केला आहे, ‘जेव्हा त्यांचे अनुयायी शहरांमधून कर वा खंडणी गोळा करीत फिरत असत, तेव्हा कोणत्याही मस्जिदीला, धर्मग्रंथाला किंवा परस्त्रीला इजा पोचता कामा नये; जर का कुराणाची प्रत कोणाच्या हातात पडली, तर तिचा आदर करून मुस्लीम धर्माच्या कोणत्याही व्यक्तीच्या हवाली करावी; जेव्हा मुस्लीम वा हिंदू स्त्रिया बंदिस्त बनवल्या जातील आणि त्यांच्याबरोबर कोणी पुरुष नसेल, तर त्यांना घेऊन जाण्यासाठी जबाबदार व्यक्ती येईपर्यंत त्यांचे संरक्षण करावे, असे कडक आदेश शिवाजीराजांनी सैन्याला दिले होते.’१५

सैन्याचे व्यवस्थापन

शिवाजीराजांची राज्यव्यवस्थापनाची उमज वाखाणण्याजोगी होती. कोणतेही प्रशिक्षण मिळाले नसताना त्यांनी घालून दिलेले व्यवस्थापनाचे शिरस्ते आजही अनुकरणीय आहेत.

किंबहुना त्यांना 'आधुनिक मॅनेजमेंट गुरू' म्हणून संबोधण्यात येते आणि त्यावर पुस्तकेही लिहिली गेली आहेत. परदेशांतील विख्यात विद्यापीठांत ते शिरस्ते शिकवले जातात. सतराव्या शतकात इतर सैन्यांमध्ये अनागोंदीचा कारभार असताना मराठा सैन्यात मात्र सुसूत्रता होती आणि त्याचे पूर्ण श्रेय खुद्द राजांना जायला पाहिजे. 'सैन्य पोटावर चालते', अशी प्रसिद्ध उक्ती आहे. सैन्याचे व्यवस्थापन हे तर दहा युद्धतत्त्वांपैकी शेवटचे, पण महत्त्वाचे तत्त्व आहे. पगाराच्या अत्यंत योजनाबद्ध आणि आखीव प्रणालीचे वर्णन याआधी आलेच आहे.

आदिलशाहीतील अधिकाऱ्यांना पगाराऐवजी जहागिरी मिळत असत आणि ती त्यांच्या कुटुंबाची वारशाची मालमत्ता होई. मोगल सैन्यात अधिकाऱ्यांना मनसब मिळे. मनसब आनुवंशिक नसे, परंतु मनसबदारापाशी जहागीर असे. मनसबदार म्हणजे अंमलदार, ज्याच्यापाशी लष्करी अधिकार व घोडदळ आहे असा. जहागिरीमधील रहिवाशांकडून करवसुली करून त्यातून त्याने स्वत:चा व आपल्या शिबंदीचा खर्च भागवावा, अशी अपेक्षा असे.१६ मोगल सैन्यातल्या शिपायाला अत्यंत तुटपुंजा पगार मिळत असे.

शिवाजीराजांनी आपल्या सैन्यात कडक शिस्त लागू केली. परंपरागत चालत आलेल्या अनेक अनुचित चालीरीती आणि वाईट सवयींना त्यांनी लगाम घातला. महाराज जहागीर पद्धतीविरुद्ध होते, त्याचप्रमाणे आनुवांशिकरीत्या सरकारी व लष्करी पदे देण्यासही त्यांचा विरोध होता. जहागीर पद्धतीची रद्दबातली ही शिवाजीराजांनी केलेली लक्षणीय सुधारणा होती.

शिवाजीराजांचे सैन्य वर्षातून आठ महिने मुलुखगिरीवर असे. ते फक्त पावसाळ्याचे चार महिनेच माघारी येई. राजांनी गोदामात कोणकोणते धान्य, औषधे आणि जनावरांसाठी चारा यांचा साठा करून ठेवायचा, याबद्दल लिखित सूचना दिल्या होत्या. मोहिमेवर असताना सैन्य वाटेत मिळणाऱ्या धान्यावर गुजारा करत असे. मराठा सैन्य अत्यंत तुटपुंजे आणि वजनाने हलके सामान बरोबर घेऊन आगेकूच करीत असे. त्याविरुद्ध लढणाऱ्या मोगल आणि आदिलशाही सैन्याबरोबर छावण्यांचे तंबू, बिछाने, स्वयंपाकगृहे, आरामगृहे, कपडेलत्ते आणि भरपूर प्रमाणात खाद्यपदार्थ अशा खुशाली आणि सुखचैनीच्या वस्तूंची चंगळ असे. परंतु स्वराज्य सेनेला अशा ऐशआरामाची आणि सुखोपभोगाची गरज पडत नसे. त्यांच्या पाठीवरील पोटलीत ते आपला शिधा घालून नेत असत. त्याच्यावर काही काळ गुजारा करणे त्यांना सहज शक्य असे.

सैनिकांजवळ ढाल, तलवार, भाले ही साधी आणि बाळबोध हत्यारे असत. त्यांच्याकडे तोफांची पूर्णत: वानवा असल्याने त्यांच्या गतिमानशीलतेत अडथळा येत नसे. सैनिक पागोटे, साधा सदरा आणि घट्ट बसणारी तुमान घालत. त्यांचे अधिकारी डोक्यावर शिरस्त्राण, चिलखत किंवा जाड कोट घालत असत. शिवाजीराजांच्या सुरतेवरील दुसऱ्या मोहिमेदरम्यान त्यांच्याजवळ कोणताही तंबू नसल्याचे आणि ते खुल्या मैदानात बसल्याचे एका डच गुप्तहेराने पाहिले,१७ तर कर्नाटकाच्या दीर्घ मोहिमेदरम्यान मराठा सैन्याजवळ फक्त दोन तंबू होते, एक राजांसाठी आणि दुसरा त्यांच्या मंत्र्यांसाठी, अशी फ्रान्सिस मार्टिन या पाँडेचरीच्या गव्हर्नरने नोंद केली आहे.१८ त्यामुळे मराठा घोडदळ एका दिवसात ४५ ते ५० मैलांची आगेकूच करू शके. किंबहुना त्यांच्या मुस्लीम शत्रूंविरुद्ध हा त्यांचा सर्वांत जमेचा घटक होता. तसे पाहिले,

तर शरीरयष्टी, घोडा आणि हत्यारांच्या गुणवत्तेच्या मानाने मराठा सैनिक मुस्लीम सैनिकाच्या तोलामोलाचा नसे. म्हणूनच मराठे त्यांच्या शत्रूबरोबर हातघाईची लढाई शक्यतो टाळत असत. मराठा सैन्याची सरस शिस्त, उल्लेखनीय काटकपणा आणि अधिक जलद वेग यामुळे त्यांचे इतर अभाव झाकून जात असत.

पावसाळ्याच्या दिवसांत घोड्यांना विश्रांती देण्यात येत असे आणि किल्ल्याच्या सान्निध्यात असलेल्या निर्धारित जागांमध्ये ते एकत्र ठेवले जात. त्यांच्या जवळपास मोठी कुरणे वाढवण्यासाठी काही लोकांची नेमणूक करून त्यांना जमिनी दिल्या जात असत. मागच्या मोसमाचे चारा-गवत तिथे जमा करून ठेवले जाई आणि त्यावर जनावरांचा पावसाळ्याच्या दिवसांत गुजारा होई. पावसाळा संपल्यावर आपापले घोडे स्वार घेऊन जात.

याबाबतीत त्यावेळच्या दोन पाश्चात्य व्यक्तींनी स्वत: लिहून ठेवलेले अनुभव खूप बोलके आहेत. दोन सैन्यांमध्ये असलेल्या जमीन-आस्मानाच्या अंतराचे वर्णन त्यांनी समर्पक शब्दांत केले आहे. जॉन फ्रायर हा एक वैद्यकीय डॉक्टर लिहितो, 'शिवाजीचे सैनिक कोणत्याही लढाईसाठी अधिक तंदुरुस्त, खडतर जीवनाची सवय असलेले, जलद आगेकूच करणारे आणि सुखासाठी न आसुसलेले असत. उलट मुस्लीम सैन्य आपले रात्रीचे भरपोट जेवणसुद्धा कधीही न चुकवणारे, हल्ला करताना मोठा देखावा करणारे, त्यांची शस्त्रास्त्रे त्यांच्या आधी कोणीतरी पोचवण्याची अपेक्षा करणारे आणि बायका फार मागे न राहू देण्याची सदैव खबरदारी घेणारे, आनंद आणि मौजेची संधी कधीही वाया न घालवणारे आणि शत्रूचा पाठलाग करण्याऐवजी शत्रू आपल्यावर चालून येण्यासाठी वाट पाहणारे असे होते. शिवाजीचे सैनिक हातघाईच्या लढाईपासून दूर राहात आणि शत्रूला स्तिमित करण्यात व तो गाफील असताना अचानक हल्ला चढवण्यात वाकबगार होते. मात्र दोन्हींच्यापाशी लढण्याच्या ईर्षेची वानवा नव्हती.'१९

फ्रान्सिस गेमेली करेरी या इटालियन कायदेतज्ज्ञाने भारताला १६९५मध्ये भेट दिली होती. तो लिहितो : 'शिवाजीराजे इतके शक्तिशाली होते की, ते मोगल आणि पोर्तुगीज या दोघांबरोबर एकाच वेळी युद्ध करू शकत. ते एकाचवेळी ५०,०००चे घोडदळ आणि त्याहीपेक्षा अधिक पायदळ रणांगणात उतरवू शकत. त्यांची सेना मोगलांपेक्षा सरस होती, कारण ते कोरड्या भाकरीच्या एका तुकड्यावर गुजारा करू शकत. उलट मोगल त्यांच्याबरोबर बक्कळ धनधान्य, तंबू आणि झनाना घेऊन आरामात हालचाल करत. त्यांचे सैन्य म्हणजे जणू काय एखादे चालणारे शहरच वाटे.'२०

शिवाजीराजे मोगल, आदिलशाही, कुतुबशाही आणि पोर्तुगीज या चार सत्तांबरोबर लढले. वृष्णाजी अनंत सभासद यांच्यानुसार शिवाजीराजांच्या सैन्याची संख्या एक लाखाच्या घरात होती. सरस शिस्त, उत्वृष्ट नेतृत्व आणि त्यांच्या सैनिकांचा अमाप आत्मविश्वास ही त्यांच्या सैन्याच्या विजयाची प्रमुख कारणे. स्वार्थी आणि वतनप्रेमी मराठे देशमुख आपली पिढीजात भांडणे आणि मालमत्तेची हाव विसरून शिवाजीराजांच्या मागे कसे गेले? त्याचे एकमेव कारण म्हणजे शिवाजीराजांचे भारावणारे नेतृत्व. त्या काळात राष्ट्रप्रेमाची कल्पना अस्तित्वात नव्हती. परंतु वंश आणि धर्म या दोन भावना रांगड्या शेतकरी मराठी मनातील अत्यंत

संवेदनशील तार हेलावू शकत असत. शिवाजीराजांनी या दोन भावनांना हात घातला.

त्यांनी संवेदनशील मराठी मनांसमोर दोन उद्दिष्टे ठेवली हिंदवी स्वराज्य आणि महाराष्ट्र पादशाही. हिंदवी स्वराज्य ही शब्दरचना शिवाजीराजांनी दादाजी नरसा प्रभू याला लिहिलेल्या पत्रात वापरली होती.२१ 'महाराष्ट्र राज्य' या कल्पनेचा उल्लेख जेधे यांच्या 'शिव चरित्र प्रदीप'मध्ये सापडतो. पण त्याहीपेक्षा त्यांनी 'धर्मराज्य' म्हणजे 'सदाचरणी राज्य' स्थापण्याची घोषणा केली. स्वराज्याचे त्यांच्या पूर्वजांनी सांगितलेले हे ध्येय जेव्हा त्यांनी मावळ्यांपुढे ठेवले, तेव्हा आपण ज्याची वाट पाहत होतो, तो आपला रक्षणकर्ता पुन्हा अवतरला आहे, याची त्यांना खातरी पटली आणि ते त्यांच्या भोवताली स्वखुशीने गोळा झाले.

'गोब्राह्मण प्रतिपालक' ही बिरुदावली शिवाजीराजांनी कधीच वापरली नव्हती, असा आक्षेप कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यासारख्या काही भाष्यकारांनी घेतला आहे. याचा इतिहासात कोठेही संदर्भ सापडत नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला आहे आणि असे विशेषण केवळ भूषणाने वापरले, असे त्यांचे म्हणणे आहे.२२ 'गोब्राह्मण प्रतिपालक' अशी बिरुदावली त्यांनी स्वखुशीने ग्रहण केली होती, असा उल्लेख सुरेंद्रनाथ सेन आणि इतर प्रथितयश इतिहासकारांनी वारंवार केला आहे. शिवाजीराजांनी राजा छत्रसालाला आपल्या स्वगृही परतून स्वतंत्र राज्य प्रस्थापित करण्याचा सल्ला देताना सांगितले होते, 'तुमची श्रद्धा गायींचे व ब्राह्मणांचे रक्षण, वेदांचे संरक्षण आणि लढाईत पराक्रम याची शिकवण देत नाही काय?'२३ हे ध्यानात घेणे सयुक्तिक होईल. यावरून हिंदवी स्वराज्य आणि महाराष्ट्र पादशाही या दोन्हींबरोबरच 'गोब्राह्मणप्रतिपालनाचे' उद्दिष्ट राजांनी स्वत:समोर ठेवले असावे, असे समजणे चुकीचे ठरणार नाही.

शिवाजीराजांनी सैन्यातून कोणत्याही जातीला व वर्णाला वगळले नाही. ब्राह्मण आणि महार एकत्र लढत असत. भारतात धार्मिक असहिष्णुता विरळच होती. शिवाजीराजांच्या 'हिंदू राष्ट्रा'चा कोणत्याही धर्माच्या छळ व गांजवणुकीशी संबंध नव्हता. शिवाजीराजांची मुस्लीम संत शेख मुहम्मद यांच्यावर तितकीच श्रद्धा होती, जितकी हिंदू संत तुकाराम आणि रामदास यांच्यावर होती. त्यांनी दर्ग्यांना आणि मशिदींना 'इनाम जमिनी' आणि त्यांच्या प्रतिपाळासाठी भत्ते देण्याचा रिवाज सुरू केला.

जाधव घराणे स्वत:ला महाभारताचे अनुवंशी समजत असे, तर भोसले स्वत:ला रामाचे अनुवंशी मानत असत. शिवाजीराजांना त्यांची जनता विष्णूचे अवतार मानीत असे.२४ परंतु तरीही सगळेच जमीनदार त्यांचे प्रभुत्व मानायला तयार नव्हते. जावळीचे मोरे, मुधोळचे घोरपडे, म्हसवडचे माने आणि वाडीचे सावंत आरंभी त्यांच्याविरुद्ध होते. एवढेच नव्हे, तर त्यांचे नातलग निंबाळकरसुद्धा थोडेसे नाराज होते. त्यामुळे काही मोजके मोठमोठे जमीनदार जरी शिवाजीराजांना शह देण्याचा प्रयत्न करत होते, तरी आमआदमी - शेतकरी, सुतार, लोहार, लाकूडतोडे आणि पाणके वगैरे झाडून सर्व - त्यांच्या झेंड्याखाली गोळा झाले. आपल्या हिंदू धर्माच्या चाललेल्या विटंबनेमुळे विद्ध झालेले महाराष्ट्राचे रहिवासी त्यांची भक्तिभावाने आणि आदराने पूजा करू लागले. ॲबे कॅरे या फ्रेंच लेखकाने त्यांना द्वितीय ज्युलिअस सीझर किंवा गुस्टाव्हस अडोल्फसची उपमा दिली आहे.२५ (ज्युलिअस सीझर या प्रसिद्ध सेनानीने

रोमन साम्राज्याच्या उदयात महत्त्वाचे योगदान दिले, तर गुस्ताव्हस अडोल्फस हा स्वीडनचा राजा आणि त्याचा भाग्यविधाता होता.)

किल्ल्यांचे महत्त्व

शिवाजीराजांची स्वराज्य प्रदेशाची संरक्षण संकल्पना किल्ल्यांवर आधारित होती. त्यांच्या रणनीतीबाबत नंतर चर्चा होईलच. किल्ल्यांच्या किंवा गडांच्या तीन-चार समांतर रांगा होत्या; एक पश्चिमेस समुद्रकाठावर, दुसरी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, तिसरी पूर्व-पश्चिम दिशेत सह्याद्रीला ओलांडणारे आणि चवथे, सपाट प्रदेशातील. बेटांवर किंवा भूशिरावर बांधलेले दुर्ग किंवा जंजिरा किल्लेही होते. त्याशिवाय जागोजागी अनेक भुईकोट म्हणजे सखल पातळीचे, जमीन खोदून बांधलेले आणि सभोवताली मामुली तटबंदी असलेले. किल्ला दुर्गम डोंगरावर असे आणि अवघड किल्ल्यांवर जाण्यासाठी एखाद-दुसरीच वाट असे. ती बंद केल्यावर शत्रूला किल्ला चढून त्यावर हल्ला चढवणे आणखीनच कठीण होऊन जाई. किल्ल्यावरील मोजकी शिबंदी किल्ला आणि सभोवतालीच्या टापूवर परिणामकारकपणे नियंत्रण ठेवू शके. किल्ल्यावर अन्नधान्य, दारूगोळा, मीठ-मिरची, तंबाखू, शस्त्रास्त्रे आणि इतर सामान वगैरेचा पुरेसा साठा ठेवला, तर तो किल्ला वर्ष-दोन वर्षे शत्रूच्या वेढ्याविरुद्ध तटवून धरता येत असे.

तटाच्या खाली प्रत्येक माचीला रखवालदार ठेवलेले असत. त्यांनी आसपास शत्रूवर नजर ठेवावी आणि सभोवतालचे रान राखावे, हे त्यांचे काम. किल्ल्याच्या पायथ्याशी नाक्यांवर रामोशी, मांग, बेरड वगैरे चौक्या उभारत असत. पंचक्रोशीत कोठेही शत्रूची चाहूल लागली, तर ती गडकऱ्यांच्या कानावर घालणे हे त्यांचे काम असे. किल्ल्यावर ठिकठिकाणी तोफा डागलेल्या असत आणि त्या चालवण्यासाठी लष्करातील तोपची तैनात असत. खालून किल्ल्यावर येण्याचे कित्येक सोपे चढाव तासून वा सुरूंग लावून बेलाग करण्यात आले होते.२६

किल्ल्यांच्या बाबतीत राजांच्या साक्षेपाचे रायगड हे समर्पक उदाहरण. जेव्हा शिवाजीराजांनी रायगडाची राजधानीसाठी निवड करण्याचे ठरवले, त्यावेळी त्याच्या संरक्षणक्षमतेचा त्यांनी सखोल अभ्यास केला. रायगडावर चढण्यासाठी फक्त एक चिंचोळा, उभा आणि कठीण मार्ग उपलब्ध होता. खाफीखान या इतिहासकाराने याबाबतीत एका आख्यायिकेची नोंद केली आहे. गडावर गुप्त हल्ला चढवण्यासाठी मुख्य मार्ग सोडून आणखी कोणते मार्ग असू शकतील, याची शहानिशा करण्यासाठी शिवाजीराजांनी एक स्पर्धा जाहीर केली. किल्ल्याभोवती पहारेकऱ्यांच्या संख्येत वाढ केली आणि जो कोणी दुसऱ्या मार्गाने गड चढून वर येईल, त्याला त्यांनी शंभर होन व एक सोन्याचे कडे बक्षीस देण्याचे जाहीर केले. बऱ्याच जणांनी प्रयत्न केला; परंतु दुसरा कोणताही मार्ग सापडला नाही. फक्त एकच माणूस दुसऱ्या एका मार्गाने गडावर पोचला. राजांनी त्याला बक्षीस दिले, परंतु त्याचे पाय तोडण्याचे आदेश दिले आणि ती वाट अडथळे घालून बंद केली.२७ या आख्यायिकेत काहीशी अतिशयोक्ती असू शकते; परंतु शिवाजीराजांच्या जागरूक मनोधारणेची त्यावरून कल्पना येते.

ग्रोज या परदेशी प्रवाशाने नोंद केली आहे की, ‘रायगड हा जगातील सर्वांत कठीण आणि दुर्गम किल्ला आहे, त्याच्या सभोवताली अनुल्लंघनीय तटबंदी आहे, त्याच्यावर धान्याचा प्रचंड साठा करण्याची व्यवस्था आहे. किल्ल्यात राहणाऱ्या माणसांना पुरेसे होईल इतके धान्य पिकवण्यासाठी जागा आहे. कोणत्याही बलवान शत्रूच्या हल्ल्याविरुद्ध किल्ल्याचे संरक्षण कण्यासाठी मोजके लोक पुरे पडतात.’२८ याच कारणामुळे औरंगजेबाला तो किल्ला घेण्यासाठी पुढे खूप वेळ आणि मोठ्या सैन्याची आवश्याकता पडली.

शिवाजीराजांच्या बहुतांश किल्ल्यांच्या सभोवताली भक्कम तटबंदी बांधलेली होती. डोंगराच्या सर्व बाजूंनी झाडी असे आणि चढणे अवघड करण्यासाठी अपेक्षित मार्गांवर निवडुंग किंवा काटेरी झाडे लावलेली होती. किल्ल्यावर अधिकारी आणि मावळ्यांसाठी राहण्याची व्यवस्था असे. त्यावर दारूगोळा ठेवण्यासाठी दारूखाना, धान्यासाठी अंबरखाना आणि तेल-तूप-मसाले ठेवण्यासाठी खोल्या बांधलेल्या होत्या. प्रत्येक किल्ल्यावर पाणी साठवण्यासाठी छोट्या-मोठ्या टाक्या बांधल्या होत्या. पन्हाळ्याच्या प्रचंड अंबरखान्याच्या तीन भागांना गंगा, यमुना आणि सरस्वती ही नावे होती आणि त्यांच्यात एकावेळी एकूण २५,००० खंडी धान्य राहू शके. किल्ल्यात देऊळ आणि मशीद बांधलेली असे.

किल्ले किंवा तत्सम उंचवट्यांवरील बांधकाम अंतस्थ शत्रूंकडून आपल्याविरुद्ध वापरले जाऊ शकते, याची शिवाजीराजांना पूर्ण कल्पना होती. त्यासाठी त्यांनी अशा प्रकारची मोठी तटबंदी असणारे बांधकाम करण्यास बंदी घातली होती आणि उंचावर तटबंदी असलेले इमले वा हवेल्या जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले होते. आपलीच युक्ती आपल्यावर उलटवून, आपले किल्ले लाच देऊन वा किल्लेदाराला वश करून सर केले जाऊ शकतात, याची त्यांना पूर्ण जाणीव होती आणि त्यासाठी ते सर्व प्रकारची दक्षता घेत असत.

याच कारणासाठी शिवाजीराजे किल्ल्यांवर देखरेख करण्यासाठी ठेवलेल्या माणसांची अत्यंत कडक छाननी करत असत. त्याशिवाय प्रत्येक माणसाला नेमणूक होण्याआधी एखादा विश्वासू माणूस जामीन म्हणून द्यावा लागे. जरी शिवाजीराजे कोणत्याही सैन्याच्या तुकडीत निर्णयाचे अधिकार एकाच प्रमुखाकडे असावेत, अशा मताचे होते, तरी किल्ल्याच्या बाबतीत मात्र सर्व अधिकार ते एकाच माणसाच्या हातात कधीही राहू देत नसत. त्यामुळे कोणालाही एकट्याने किल्ला शत्रूच्या हवाली करणे शक्य होत नसे. प्रत्येक किल्ल्यावर समान दर्जाचे तीन अधिकारी असत; हवालदार किंवा गडकरी, कारखानीस आणि सबनीस. हवालदार किल्लाप्रमुख असे. त्याच्याकडे गडाच्या किल्ल्या असत. हिशेब, जमाखर्च आणि नगद रकमेची जबाबदारी सबनीसावर असे, तर कारखानीस धान्य व इतर सामानाच्या पुरवठ्याचा कारभार पाहत असे.

किल्ल्याचे दरवाजे रात्री बंद करणे आणि सकाळी उघडणे हे हवालदाराचे काम असे. दरवाजा रात्री कोणत्याही परिस्थितीत उघडता कामा नये, असे शिवाजीराजांचे कडक आदेश होते. किल्ला उघडायचा झाला, तर हवालदार, सबनीस आणि कारखानीस हे तिघेही हजर असले पाहिजेत, असा नियम होता. त्याचा भंग झाल्यास कठोर शिक्षा मिळे. त्याचे तंतोतंत पालन होत आहे की नाही, याची स्वत: शहानिशा करण्यासाठी राजे वेळी-अवेळी किल्ल्यांना

भेट देत असत. बाहेर स्वत: राजे आलेले पाहून एखाद्या किल्लेदाराने जर का रात्री-अपरात्री दरवाजा उघडला, तर त्याची धडगत नसे.

याबाबतीत ‘चिटणीस बखरी’मध्ये एका सत्यघटनेचे सुरस वर्णन केले आहे. एकदा शिवाजीराजे रात्री पन्हाळगडावर पोचले आणि त्यांनी दरवाजा उघडण्यासाठी फर्मावले. किल्लेदाराने राजे आलेले पाहूनही रात्री दरवाजे उघडण्यास साफ नकार दिला. राजांच्या बरोबरील सरदाराने त्याला तंबी भरली, राजांमागे मुसलमान शत्रू लागले आहेत, अशी बतावणी केली. परंतु काही केले, तरी किल्लेदार बधला नाही. त्याने साफ सांगितले की, राजांना धोका निर्माण झाला, तर मी त्यांच्या रक्षणाची व्यवस्था करीन, परंतु रात्री दरवाजा उघडणार नाही. अंतत: राजांना रात्र बाहेर उघड्यावरच काढावी लागली. पहाट फुटताच किल्लेदाराने लगबगीने दरवाजा उघडला आणि बाहेर असलेल्या राजांच्या पायांवर लोळण घेऊन क्षमायाचना केली, ‘महाराज मला कोणतीही शिक्षा करा, मी आपला अपराधी आहे, परंतु नियमाचा भंग करण्याचा माझा धर्म नाही.’ राजांनी त्याला उराशी धरले आणि शिक्षा तर राहू द्याच, परंतु कर्तव्यनिष्ठेबद्दल त्याला तिथल्या तिथे बढती दिली.२८

शिवाजीराजे किल्ल्यांची सुरक्षितता तपासण्यासाठी वेळोवेळी स्वत: अचानक भेटी देत असत, याची नोंद करणारे दस्तऐवज उपलब्ध आहेत. ३

ऑक्टोबर १६५७ ला राजे किल्ले तपासणीसाठी कल्याणच्या बाजूला गेले, ३० मे १६६४ रोजी सिंहगडाला त्यांनी अचानक भेट दिली, शिवाजीराजे लोहगड, रोहिडा आणि पांडवगडला भेट देणार आहेत, अशा आशयाचे मोरो त्रिमळचे पत्र वगैरे संदर्भ शिवापूर क्रॉनिकलमध्ये सापडतात.२९

किल्ले अत्यंत एकाकी स्थानी असत. फक्त त्यांच्या सुरक्षिततेकडेच लक्ष ठेवणे पुरेसे नव्हते, तर सर्व व्यवहार प्रामाणिकपणे आणि पारदर्शक रीतीने होतील, याची शहानिशा करणे तितकेच आवश्यहक असे. या दृष्टीने हवालदार, सबनीस आणि कारखानीस यांच्या कामावर नजर ठेवण्यासाठी शिवाजीराजांनी एक तल्लख पण सुलभ पद्धत अमलात आणली होती. त्यासाठी बाहेरून कोणालाही पाठवण्याची गरज पडत नसे. सबनीसाने केलेल्या सर्व खर्चांच्या चलनांवर कारखानिसाचा शिक्का लागे, त्याबरोबर हवालदाराची त्यांच्यावर सही असल्याशिवाय खरेदी होऊ शकत नसे. दररोज सबनीसाने कामावर लावलेल्या मजुरांच्या हजेरी पत्रकावर कारखानीस त्याची खातरी करून सही करी. जेव्हा सबनीसाने बनवलेला हिशेबाचा तक्ता वरिष्ठ अधिकारी तपासत असेल, तेव्हा कारखानिसाने तिथे हजर राहणे आवश्याक असे. त्यामुळे कोणत्याही लाचलुचपतीला व गलथान कारभाराला जागाच राहात नसे.

सर्वसाधारणपणे हवालदार मराठा, सबनीस ब्राह्मण आणि कारखानीस प्रभू असे. त्याचा अर्थ या कामांची अदलाबदली होऊ शकत नसे, असे नव्हे; परंतु प्रत्येकाच्या विशिष्ट कलानुसार त्याला काम मिळावे आणि सर्व जातींमध्ये काम वाटून दिले जावे, हा यामागील हेतू होता.३० तशा यातील काही पद्धती आदिलशाहीच्या जमान्यापासून चालत आल्या होत्या, परंतु शिवाजीराजांनी त्यातच काही बदल करून आणि बारकावे साधून ते अमलात आणले होते.

इतके खोलवर जाऊन या पद्धती तयार करण्यात शिवाजीराजांच्या अजोड व्यवस्थापनकौशल्याचा दाखला मिळतो.

किल्ल्यावर पायदळ आणि घोडदळाच्या तुकड्या आवश्यतकतेनुसार ठेवलेल्या असत. परंतु त्याशिवाय प्रत्येक किल्ल्यावर आणि त्याच्या पायथ्याशी सरकारने नेमणूक केलेले किंवा त्याच्या परवानगीने वेगवेगळे लोक राहात असत. त्यात ब्राह्मण, मराठा, रामोशी, महार आणि मांग या सर्व जातींचा समावेश होता. त्यांना गडकरी म्हणत. त्यांना राहण्यासाठी जागा दिल्या जात आणि त्यांचे वंशजही पिढ्यानपिढ्या तिथे राहात. रामोशी, महार, मांग यांना परिसरावर नजर ठेवण्याचे, सर्व माहिती किल्लेदारापर्यंत पोचवण्याचे, कोणीही किल्ल्याबद्दल चौकशी करू लागल्यास त्याची दिशाभूल करण्याचे आणि शत्रूच्या भटकणाऱ्या लोकांना पळवून लावण्याचे काम दिलेले असे. हे सर्व लोक किल्ल्याला आपल्या मातेसमान मानत. किल्ल्याच्या संरक्षणाबरोबरच लोकांचा उदरनिर्वाह साधण्याची ही अत्यंत कल्पक योजना होती. जखमी आणि निवृत्त झालेल्या सैनिकांचे पुनर्वसन करण्याचेही ते माध्यम होते.३१

या अधिकाऱ्यांपैकी कोणीही एकाच जागी फार वेळ राहिला, तर तो त्याचा फायदा घेऊ शकतो, हे राजांना पुरेपूर माहीत होते. त्यासाठी त्यांची काही काळानंतर बदली केली जात असे. तसेच हे काम वडलांकडून मुलाकडे आपोआप जात नसे. कोणत्याही आनुवंशिक हक्कांना राजांचा विरोध होता. आदिलशाहीत या आनुवंशिक हक्कांना नाईकवाडी म्हणत. ही प्रथा शिवाजीराजांनी बंद केली. इतके करूनही रायगडावरील केसो नारायण सबनीसाने हवालदाराच्या अनुपस्थितीत पैशाची अफरातफर केली, त्याचप्रमाणे १६६३मध्ये शिवाजीराजांना कोकणची मोहीम पुढे ढकलून सिंहगडावरील बंड खुडून टाकण्यासाठी मोरो त्रिंबक पेशव्यांना पाठवावे लागले. परंतु असे प्रसंग तुरळक होते.

हवालदार, सबनीस व कारखानीस या तीन अधिकाऱ्यांशिवाय प्रत्येक किल्ल्यावर त्याच्या आकारानुसार एक किंवा अधिक 'तट सरनोबत' असत. त्यांचे काम तटबंदीचे रक्षण करणे हे असे. मोठ्या किल्ल्यांची तटबंदी विविध भागांत वाटली जाई. त्यांच्या हातांखाली किल्ल्याच्या आकारानुसार प्रत्येकी नऊ मावळ्यांची एक अशा अनेक तुकड्या असत. तुकडी प्रमुख 'नाईक' हुद्द्याचा असे. सर्वसाधारणपणे किल्ल्यावरील लोकांची संख्या ५००च्या घरात असे. आवश्याक असेल, तेव्हा किल्ल्यावर अधिक कुमक पाठवली जाई. तिथल्या शिपायांजवळ तलवार, भाले, धनुष्य-बाण आणि बंदुका असत. काही किल्ल्यांवर तोफा असत. जर शत्रू एखाद्या किल्ल्यावर हल्ला करण्याची तयारी करतो आहे, अशी माहिती मिळाली, तर तुकड्यांच्या कुमकीबरोबर तोफाही पाठवल्या जात. मराठे अग्निबाण आणि बाँबचाही उपयोग करत. त्याबरोबर ठिकठिकाणी लहान- मोठ्या दगडांचे ढीग रचलेले असत. चढून येणाऱ्या शत्रूवर ते गडगडवले जात. गोफणींचाही वापर केला जाई.

किल्ला काबीज करण्याचे दोन प्रकार होते; एक तर स्फोटके वापरून किल्ल्याची तटबंदी उद्ध्वस्त करायची, किंवा दुसरा म्हणजे दोरांच्या शिड्या वापरून अंधारात शत्रूच्या नकळत त्याचे कडे चढून जायचे. १६७५मध्ये फोंडा किल्ल्याची तटबंदी स्फोटकांनी उडवून तो किल्ला हस्तगत करण्यात आला होता.३२ तानाजीने सिंहगड दोर वापरून काबीज केल्याची

सुरस गाथा सर्वपरिचित आहे. पहिला दोर वर घेऊन जाणारा मावळा कड्यावर कोणत्याही साहाय्याविना चढण्यात तरबेज असे. त्याचबरोबर त्यासाठी मराठे घोरपडीचाही चतुर उपयोग करीत असत. मोठ्या घोरपडींना पाळून कडा चढून जाण्याचे शिक्षण देले जाई. रात्री अशा तीन-चार घोरपडी त्याच्या अंगाला दोर बांधून वर सोडल्या जात. ती कड्यावर जाऊन कोठेतरी खबदाडात शिरे आणि आपल्या तीक्ष्ण नखांनी ती घट्ट धरून बसे. मग चढण्यात तरबेज असलेला एक मावळा, सर्वसाधारणपणे घोरपडीचा मालकच, दोराला धरून वर जाई, तिथे एक लोखंडाची भक्कम मेख मारे आणि त्याला घोरपडीवरील गाठ सोडून दोर बांधे. त्यानंतर हळूहळू अधिक माणसे चढून जात आणि वर पोचल्यानंतर दोराच्या शिड्या खाली सोडत. यथावकाश सर्व तुकडी चढून जाई. हे काम अत्यंत जोखमीचे आणि वेळखाऊ असे. या सर्व कालावधीत तटबंदीवरील कोणत्याही पहारेकऱ्याला सुगावा लागू न देणे हे महत्त्वाचे असे.

किल्ल्यावर समोरून हल्ला करणे जवळजवळ अशक्यच असे. शत्रूला पत्ता लागू न देता तो सर करणे हे तितकेच दुष्कर होते. त्यामुळे किल्ल्याला प्रदीर्घ वेढा घालून आतल्या शिबंदीची उपासमार करणे आणि शरण येण्यास भाग पाडणे हा सर्वसाधारण पर्याय होता. शिवाजीराजांनी आपल्या सर्व किल्ल्यांवर पुरेशा धनधान्याच्या आणि दारूगोळ्याच्या साठ्याची व्यवस्था केली होती, परंतु सिद्दी जोहरच्या पन्हाळा वेढ्याच्या वेळी त्यांचा सर्व पुरवठा संपल्यामुळे त्यांना शरण जाणे भाग पडले, हा त्याला एकमेव अपवाद होता.

त्यानंतर अशा कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी वापरण्यासाठी त्यांनी एक लाख पंचवीस हजार होन म्हणजे सुमारे पाच लाख रुपयांची एक राखीव गंगाजळी तयार केली. त्याचबरोबर त्यांनी किल्ल्यांच्या मजबुतीसाठी आणि डागडुजीसाठी आणखी एक लाख पंचाहत्तर होनांची दुसरी गंगाजळी उभी केली. किल्ल्यावरील हवालदाराला वर्षाला १२५ होन म्हणजे सुमारे ५०० रुपये मिळत. बाकीच्यांचे पगार यापेक्षा बरेच कमी असत. किल्ल्याच्या भोवताली पहारा देण्यास रामोशी, भिल आणि इतर आदिवासी ठेवले होते. जंगलाची माहिती आणि उपजत स्वरक्षणाची कला यामुळे ते या कामासाठी अगदी अनुरूप होते; किंबहुना रामोशांना नोकरी देणारे शिवाजीराजे पहिले सत्ताधीश होते आणि त्या लोकांनी ही जबाबदारी सदैव मन लावून आणि स्वामिनिष्ठेने पार पाडली.३३ शिवाजीराजांच्या मृत्युसमयी मराठा स्वराज्यात एकूण २४० किल्ले होते.

किल्ले हे शिवकालीन रोमांचकारी इतिहासाचे व्यासपीठ होते, असे म्हणणे चूक होणार नाही. शिवाजीराजांची अचाट वृत्ये या किल्ल्यांच्या योगाने तडीस गेली. सुरत आणि खानदेशमधील लूट आणताना वाटेत बागलाणमधील नासिक परगण्यातील किल्ल्यात ती प्रथम ठेवली गेली. सिंधुदुर्ग बांधणीवर त्यांनी प्रचंड पैसा ओतला. कर्नाटक प्रांत जिंकल्यावर जिंजी किल्ला ताब्यात ठेवण्यासाठी त्यांना प्रचंड परिश्रम घ्यावे लागले. तो किल्लाच राजाराम महाराजांच्या कालावधीत स्वराज्य अबाधित ठेवण्यास साहाय्यभूत झाला. तानाजीच्या सिंहगडावरील पराक्रम गाथांनी अजूनही महाराष्ट्र थरकतो. प्रतापगड अफझलखानाच्या दगाबाजीचे पवाडे ताजे ठेवतो. बागलाणातील साल्हेर आणि पट्टा या दोन किल्ल्यांत मिळालेल्या संपत्तीने

स्वराज्याला प्रचंड हातभार लावला. खेळण्यावर 'आता मी सुखाने मरतो' असे म्हणून प्राण सोडणारा स्वामिभक्त बाजीप्रभू आणि पुरंदरवर दिलेरखानास 'दे माय धरणी ठाय' करण्यास लावणारा मुरारबाजी हे दोघेही त्या त्या किल्ल्यांमुळेच अजरामर झाले.

शिवाजीराजांना किल्ल्यांचे महत्त्व इतके वाटत असे की, 'किल्ले बहुत झाले, विनाकारण पैसा खर्च होतो,' असा जवळच्या मंडळींनी अर्ज केला असता ते म्हणाले, 'जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखतो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करतात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल. आपणांस धर्मस्थापना व राज्यसंपादन करणे. सर्वांस अन्न लावून, शत्रुप्रवेश न होय, ते किल्ल्यांमुळे होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लीन्द्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला, तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत.'३४

प्रसिद्ध आंग्ल इतिहासकार जेम्स ग्रांट डफ लिहितो, 'किल्ल्यातून आत-बाहेर कोणी केव्हा जाणे, गस्त घालणे, पहारे, चौक्या सांभाळणे व त्याजवर देखरेख ठेवणे, पाणी, धान्यसामुग्री, युद्धसामुग्री इत्यादी तयार ठेवणे, या गोष्टींविषयी अगदी सक्तीचे व सूक्ष्म नियम शिवाजींनी केलेले असून, प्रत्येक शाखेवरील मुख्य अधिकाऱ्याची बारीक कामेसुद्धा ठरवलेली होती आणि ते नियम मोडण्यास तिळभर जागा नव्हती. इतके असूनही हे सर्व काटकसरीने केले जाई.'३५

सुरुवातीस शिवरायांची राजधानी पुणे ही होती, पण ती सोडून त्यांनी प्रथम राजगड आणि नंतर रायगड ही राजधानी बनवली आणि मुलकी व लष्करी कारभार तिथूनच करण्यास आरंभ केला. शत्रू पाठीवर असताना मैदानात राज्यकारभाराचे ठाणे ठेवायचे नाही, हे त्यांचे सुज्ञ धोरण होते.

रामचंद्र अमात्य हा नीलकंठ (निळो) सोनदेव यांचा धाकटा पुत्र. निळोपंत राजांचे १६६२ ते ७२ या काळात अमात्य होते. त्यांच्यानंतर राजांनी अमात्यपद रामचंद्र यांना त्यांच्या कर्तृत्वावर सुपूर्द केले. त्यांनी छत्रपती शिवाजी, संभाजी आणि राजाराम यांच्या कारकिर्दीमध्ये अमात्यपण केले. रामचंद्रपंतांनी 'आज्ञापत्र' नामक पुस्तिका लिहिली. 'कौटिल्यानंतर युद्धशास्त्रात आपणास थांबा सापडतो, तो आज्ञापत्राचाच', असे मत प्रसिद्ध तज्ज्ञ दि. वि. गोखले यांनी व्यक्त केले आहे. दुर्गांचे अनन्यसाधारण महत्त्व वर्णन करताना रामचंद्रपंत म्हणतात, 'हे राज्य तर तीर्थरूप थोरले वैलासवासी स्वामींनी (शिवाजीराजांनी) गडांवरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश होय, त्या त्या देशी स्थलविशेष पाहून गड बांधले, तसेच जलदुर्ग बांधले. त्यावरून आक्रमण करीत करीत सालेरीपासून कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिले. औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर, भागनगर यासारखी महासंस्थाने आक्रमिली, संपूर्ण तीसबत्तीस वर्षे या राज्याशी अतिक्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होते? परंतु राज्यात किल्ले होते म्हणून अविशिष्ट तरी राज्य राहिले. पुढे पूर्ववत करण्याचा अवकाश राहिला.'

'ज्यांस राज्य पाहिजे, त्यांनी गडकोट हेच राज्य, गड म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली

वसतिस्थळे, गडकोट म्हणजे मुखनिद्राकार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणरक्षण असे चित्तांत आणून त्यांचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा. किल्ल्याचा जीव तो किल्ल्याचा हवालदार. तसाच सरनोबत म्हणजे निस्पृह, ते कोणाचे आर्जवामुळे ठेवावे असे नाही. जे कुलवंत मराठे आणि शिपाई, जे शस्त्र धरतील, काबिलेदार, विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रिस्त, हे स्थळ म्हणजे धान्याने ही परमप्रिय ठेवी दिली आहे, आपले प्राणान्न यास दगा देऊ नये, असे पूर्ण चित्तास आणून धन्यांनी लावून दिली मर्यादा पाळतील असे ठेवावेत. त्यातही तीन वर्षांनी हवालदार काढावा, चार वर्षांनी सरनोबत काढावा.'३६ रामचंद्रपंत अमात्यांनी लिहिलेल्या या काही ओळींत शिवाजीराजांच्या किल्ल्यांच्याबाबतीतल्या धोरणाचे सार आले.

किल्ले हे राजांचे जीव की प्राण होते. स्वराज्यातील किल्ले हिरीरीने राखले, तरच स्वराज्य जगेल, यावर राजांचा गाढ विश्वास होता. त्यांनी त्यांच्या संरक्षणासाठी आणि व्यवस्थापनासाठी प्रचंड परिश्रम घेतले होते. एक किल्ला एक वर्ष लढवला तर स्वराज्य काबीज करायला औरंगजेबाला तीनशे साठ वर्षे लागतील, या त्यांच्या उक्तीत गहन अर्थ भरला होता. आपल्या साम्राज्याचा दिल्लीत उपभोग घेण्याऐवजी तो शहेनशाह त्याच्या आयुष्याची शेवटची पंचवीस वर्षे महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत भटकत राहिला आणि आपले उद्दिष्ट मिळवल्याविनाच त्याला जीवनप्रवास संपवावा लागला, यातच शिवाजीराजांच्या किल्ल्यांवरील श्रद्धेचा मथितार्थ भरला आहे.

तोफखान्याचा अभाव

तोफखाना हा मराठा सैन्याचा जमेचा भाग कधीच नव्हता. त्याचा अभाव ही त्यांची मुस्लीम सैन्यांच्या तुलनेत एक सदैव प्रमुख उणीव होती. इतर तोफांसह आपल्या बरोबर आणलेल्या दोन अजस्र तोफांच्या प्रमुख साहाय्याने बाबराने राजपूत आणि पठाण प्रतिस्पर्ध्यांचा पराजय केला होता. पोर्तुगीजांनीसुद्धा त्यांच्या लांब पल्ल्याच्या तोफांमुळे दक्षिण भारतातील शक्तिशाली शत्रूंना नमवले होते. परंतु, शिवाजीराजे वगळता मराठ्यांनी याच्यापासून बोध घेतला नाही. मराठा सैन्याचा तोफखाना इतका लेचापेचा असण्याची दोन प्रमुख कारणे होती; पहिले, गतिमानशीलता हा मराठ्यांच्या रणनीतीचा आत्मा होता. अचानक हालचालींकरवी शत्रूला स्तिमित करून गारद करायचे, ही त्याच्यामागील मध्यवर्ती कल्पना. अवजड तोफखान्यामुळे त्याच्यात बाधा येई आणि ते एक लोढणे वाटे. दुसरे, आधुनिक - वा कालबाह्यसुद्धा - तोफा बनवण्याची ना त्यांच्यात क्षमता होती, ना युरोपीयांकडून वाजवी प्रमाणात घेण्याची त्यांची ऐपत होती. किंबहुना आधुनिक दृष्टिकोनाचा मराठ्यांच्यात अभाव होता, असे म्हणणे चूक होणार नाही.

शिवाजीराजांच्या सैन्यात 'तोफखाना' हे वेगळे खाते असावे. शिवाजीकालीन बखरींमध्ये 'दारूखाना' याचा उल्लेख आहे. पोर्तुगीज 'कासा द पल्वोरा'चा तो फारसी प्रतिशब्द आहे. याचे कारण म्हणजे त्या वेळी पोर्तुगीज हे तोफखान्याचे तज्ज्ञ म्हणून ओळखले जात. त्यांचेच अनुकरण करण्याचा शिवाजीराजांचा मनोदय असावा. ते तोफांच्या पुरवठ्यासाठी पोर्तुगीज

आणि इंग्रजांवर पूर्णत: अवलंबून होते. त्यांनी मराठा फौजेचा म्हणावा असा ओतकामाचा कारखाना (फौंड्री) घातला नाही. अर्थात स्वराज्याच्या उभारणीच्या काळात त्यांच्याकडून ती अपेक्षा करणे योग्यही नाही.

तोफा आणि त्यांच्या दारूगोळ्याचा युरोपीय व्यापारी मंडळ धंदा करीत असे. इतरांप्रमाणे शिवाजीराजांचासुद्धा त्यांच्याकडून हे महत्त्वाचे शस्रास्त्र मिळवण्याचा मानस होता. यासाठीच त्यांनी राजापूरमध्ये फ्रेंच उद्योजकांना कारखाने उभे करण्याची परवानगी दिली असावी. त्याचप्रमाणे इंग्रजांकडून त्यांची हीच अपेक्षा होती. फ्रेंचांकडून त्यांनी १६७३मध्ये २००० मण शिसे आणि ८८ लोखंडाच्या तोफा विकत घेतल्या. त्यांनी इंग्रजांकडून तोफा विकत घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या लबाडांनी राजांना कायम टोलवतच ठेवले. ५ सप्टेंबर १६७० ला मुंबईच्या गुमास्त्र्यांनी सुरतेला लिहिलेल्या पुढील पत्रावरून त्यांचे कारस्थान स्पष्ट कळून येते: ‘आम्हांला ठाऊक आहे की, शिवाजी राजापूरच्या फ्रेंच गुमास्त्र्यांकडून शिसे किंवा तोफा विकत घेईल, परंतु आम्ही स्वत:ला कोणत्याही अडचणीत आणणार नाही.’३७ दिल्ली सरकारला आम्ही नाखूष करू इच्छीत नाही, ही सबब इंग्रज नेहमी देत. ही बाब दिल्लीपासून गुप्त ठेवण्यास शिवाजीराजांनी तयारी दाखवूनही इंग्रजांनी जोखीम पत्करली नाही.

१६७१च्या सप्टेंबरमध्ये शिवाजीराजांनी एक उखळी तोफ आणि दोन पितळेच्या तोफा देण्याची इंग्रजांकडे मागणी केली. १६७१च्या नोव्हेंबरमध्ये

तीन-चार तोफा पोर्तुगीजांनी स्वत:च्या वापरासाठी खरेदी कराव्यात आणि नंतर मराठ्यांना सुपूर्द कराव्यात, असा शिवाजीराजांनी प्रस्ताव दिला. १६७४मध्ये वकिलामार्फत त्यांनी ६० मोठ्या लोखंडाच्या तोफा आणि दोन पितळेच्या तोफा विकत देण्याचे गोव्याच्या राजाध्यक्षांना विनंतीचे पत्र पाठवले. १६७६च्या डिसेंबर महिन्यात सुरत गुमास्ता मंडळाने मुंबईला पत्र पाठवून मराठ्यांना पोर्तुगीजांनी दोन पितळी तोफा देण्यास मनाई केली. या सर्व प्रकरणात अखेरीस शिवाजीराजांनी १६७१मध्ये दोन पितळी तोफा फ्रेंचांकडून मिळवल्या.३८ या सर्व वर्णनावरून शिवाजी महाराज कोणत्याही स्थितीत मराठा सैन्यात सुसज्ज तोफखाना जोडण्यासाठी किती उत्सुक होते, हे कळून येईल. ही तत्परता पुढील वंशजांनी मात्र दाखवली नाही. शाहू महाराज आणि पहिल्या बाजीरावांनी त्याच्यात फारसे लक्षच घातले नाही.

युरोपीय बनावटीच्या या तोफांशिवाय मराठा सैन्यात काही भारतीय बनावटीच्या जेजाला आणि झांबूरक किंवा शुतर्नाल या कमी वजनाच्या तोफा होत्या. त्यांच्यात दगडाचे वा लोखंडाचे तोफगोळे वापरले जात. अविरत प्रयत्न करूनही शिवाजीराजांच्या सैन्यात पुरेशा तोफा नव्हत्या. जेव्हा पन्हाळ्याची मोर्चेबंदी वाढवण्याची गरज पडली, तेव्हा त्याच वर्षी त्यांनी ४० नव्या तोफा फ्रेंचांकडून विकत घेतल्या असूनही त्यांना तोफा कोकणातून आणाव्या लागल्या. पोर्तुगीज त्यांना तोफा पुरवण्यास तयार असत. फक्त लबाड इंग्रज मात्र सदैव लपंडाव खेळले.

गुप्तहेर खाते

शिवाजीराजांच्या गुप्तहेर खात्याबद्दल फार त्रोटक माहिती आहे; किंबहुना हेच त्या खात्याच्या यशाचे गमक होते, असे म्हटले पाहिजे. त्याबाबत बऱ्याच रोमांचक कथा लिहिल्या गेल्या

आहेत. त्यांतील काही कल्पनांच्या भराऱ्या असेनात का, तरीही शिवाजीराजांनी शून्यापासून आरंभ करून निर्माण केलेल्या कार्युशल हेरखात्याचा तो दाखला आहे. आधुनिक सैन्यामधील अशा खात्याला इंटेलिजन्स खाते असे नाव आहे. शत्रूबद्दलची आणि आगामी कारवाईसाठी आवश्याक ती माहिती गोळा करणे आणि आपल्या सैन्याची माहिती शत्रूला मिळण्यास प्रतिबंध घालणे ही त्या खात्याची दोन प्रमुख कामे. असे स्वतंत्र खाते निर्माण करण्याची कल्पना त्या काळात खरोखरच अभिनव होती. बहिर्जी जाधव नाईक नावाचा सरदार या खात्याचा प्रमुख होता. 'सभासद बखरी'त बहिर्जीने आणलेल्या माहितीचा लढाईच्या यशात किती मोठा वाटा होता, याचे अनेक किस्से आहेत. त्याच्या हालचालींबाबत आणि त्याला दिलेल्या कामांबद्दल - मोठे सरदार आणि सरनोबत धरून - फार कमी लोकांना कल्पना असे. राजे स्वत: त्याला कामे देत.

कोणत्याही मोहिमेच्या आधी बहिर्जीला विविध मार्गांची आणि लक्ष्याची माहिती काढण्याचे काम दिले जाई. अचूक बातम्या मिळवण्यासाठी बहिर्जी नाईकाने खबऱ्यांचे आणि गुप्त हेरांचे महाराष्ट्रभर एक जाळे निर्माण केले होते आणि त्यावर शिवाजीराजे अमाप खर्च करीत असत. धनप्राप्तीसाठी कोठे धाड घालायची असेल, तर कोणाकडे किती धन आहे आणि त्याची अचूक जागा कोणती, याबद्दल माहिती बहिर्जी मिळवत असे. शाईस्ताखानावर लाल महालातील हल्ल्यादरम्यान कोण कोठे झोपतो, याची अचूक माहिती गोळा करण्यात आली होती. अर्थात राजे लाल महालात राहिले असल्यामुळे त्याचा कप्पा न् कप्पा त्यांनाही माहिती होता. त्याचप्रमाणे सुरतेवरील हल्ल्याच्या आधी बहिर्जीने सुरतेला स्वत: जाऊन तिथली सर्व माहिती काढली होती.

अचूक माहिती मिळाली, तर त्यामुळे अनेक जीव वाचू शकतात आणि कामगिरी फत्ते होऊ शकते; त्यामुळे त्यावर कितीही पैसा ओतला, तरी तो कामीच लागतो, यावर राजांचा पुरेपूर विश्वास होता. कारवाई आरंभ करण्याआधी आणि कारवाईदरम्यान शत्रूचा हेतू, स्थान, संख्या, शस्त्रास्त्रे याबद्दल राजांना आणि त्यांच्या सरदारांना अखंड माहिती मिळत राही. जमिनीची आणि शत्रूची अचूक माहिती हा तर गनिमी काव्याच्या यशाचा एक बिनीचा घटक असतो. शिवाजीराजांची एकही कारवाई अचूक माहितीच्या अभावी अयशस्वी झाली नाही, याचे श्रेय बहिर्जी नाईकाला जाते.

१६७३ साली चौलला येऊन गेलेला ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी शिवाजीराजांबद्दल लिहितो, 'त्याने सरसेनापतीच्या कामांबद्दल अत्यंत सखोल अभ्यास केला आहे. भूपृष्ठ शास्त्राबद्दल त्याचे ज्ञान एका कसलेल्या भूगोलतज्ज्ञापेक्षा आणि मोर्चेबंदीच्या तंत्राचे ज्ञान एखाद्या सुशिक्षित अभियंत्यापेक्षा सरस आहे... जरी शिवाजी अत्यंत शूर असला आणि आपण आपल्या स्नायुबलाच्या जोरावर काहीही जिंकू शकतो, असा त्याला विश्वास असला, तरी तो अत्यंत हुशार आहे. तो माहिती मिळवण्यासाठी प्रचंड पैसे खर्च करतो आणि ती इतक्या तत्परतेने मिळवतो की, शत्रूच्या मंत्रिमंडळात कशाची चर्चा झाली आहे, ते त्याला हल्ल्याच्या आधीच कळते...' माहिती (इंटेलिजन्स) ही सद्यकालीन किंवा सांप्रत अवस्थेबद्दल मिळणे आवश्यकक असते. याला 'रिअल टाइम इंटेलिजन्स' म्हणतात. राजांना याची पुरेपूर जाण होती.३९

कॅरे पुढे लिहितो, 'मला मेलिआपुरचा शासक भेटला. तो पर्शियन होता. त्याने सांगितले की, शिवाजी आदिलशहापेक्षा कर्तबगार आहे. तो माहिती मिळवण्यासाठी प्रचंड रक्कम खर्च करतो आणि त्याच्यासाठी काम करणाऱ्या हेरांना त्याचा फार आदर वाटतो. तो जातीचा राजा आहे आणि अशा माणसांसाठी काम करणे हेच जणू काय त्या कामाचे पारितोषिक असते.'४०

स्वराज्य सेनेतील सर्व धर्म समावेश

शिवाजीराजांच्या सैन्यात अनेक मुस्लीम अधिकारपदांवर होते आणि त्याबरोबरच मुस्लिमांना शिपाई म्हणून भरती होण्यास प्रतिबंध नव्हता. अर्थात सैन्यातील प्रत्येक शिपायाच्या भरतीदरम्यान सैन्यातीलच त्याला ओळखणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीला जामीन राहावे लागे. तो नियम सर्वांसाठीच होता, तसा मुस्लीम शिपायांनाही लागू होता. यामुळे हिंदू राज्य प्रस्थापित करण्याच्या राजांच्या उद्दिष्टात कोणतीही बाधा येत नसे, कारण मुस्लिमांचा द्वेष त्यामागे तसूभरही नव्हता. शिवकालीन इतिहासात काही तुरळक घटना वगळता कोणत्याही मुस्लीम अधिकाऱ्याने वा शिपायाने विशेष फितुरी केल्याचे उदाहरण सापडत नाही. ते सर्व शिवाजीराजांशी पूर्णपणे स्वामिनिष्ठ असत.

शिवाजीराजांच्या कर्तबगार आणि विश्वासू मुस्लीम सरदार आणि शिपायांची अनेक उदाहरणे देता येतील. पायदळाचा पहिला सरनौबत नूर बेग हा मुस्लीम अधिकारी होता. शमा खान आणि फोंडा वेढ्याच्या वेळी पराक्रम गाजवणारा इब्राहिम खान हे दोन अधिकारी मुस्लीम होते. अफझलखानाच्या वधाच्या वेळी राजांबरोबर असलेल्या अंगरक्षकांच्यामधील एक सिद्दी इब्राहिम होता. तसेच आग्र्याहून सुटकेच्या वेळी मदारी मेहतर या अत्यंत विश्वासू नोकराने त्यांना अमूल्य साहाय्य केले. सिद्दी हिलाल हा मराठा सैन्याचा प्रसिद्ध अधिकारी होता. मराठा नौदलात तर अनेक अधिकारी आणि खलाशी मुस्लीम होते. नौदलाचे पहिले दोन प्रमुख दर्यासारंग आणि दौलत खान, हे मुस्लीम होते. शिवाजीराजांनी गोमाजी नाईक पानसंबळ याच्या सल्ल्यावरून ५०० पठाणांना सैन्यात नोकरी दिल्याच्या प्रसंगाचा उल्लेख यापूर्वी आला आहे.

किंबहुना स्वराज्य सेना ही सामान्य मराठमोळे लोकांची होती, आम रयतेची होती. आपण मेलो तरी चालेल, पण शिवाजीराजे जिंकले पाहिजेत, असे रयतेला वाटावे, ही किमया राजे करू शकले. रयतेच्या स्वराज्यकार्यातील सहभागाचे ऐतिहासिक सत्य वा. भा. पाठक या प्रतिभावान कवीने सोप्या आणि मनापर्यंत पोचणाऱ्या कवितेत शब्दबद्ध केले आहे. त्याच्या मागे एक मनमोहक कथानक आहे.

'धामधुमीचा काळ आहे. सैनिक सोडाच, पण शेतात नांगरणारा शेतकरीसुद्धा सावध आहे. बांधावरून चार घोडेस्वारांना जाताना अडवून शेतकऱ्याचा सावळ्या नावाचा दहा-बारा वर्षांचा धीट पोरगा दरडावतो, 'खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या, उडवीन राई राईएवढ्या.' जेव्हा त्याला स्वार दाटतो, 'थोर मारसी अशा बढाया पराक्रमाच्या जरी, कुठे तव भाला बरची तरी? हे खड्गाचे बघ पाते किती चमकते, यापुढे तुझी वद हिंमत का राहते?' त्यावर तो चिमुरडा पोरगा उत्तर देतो, 'तडफ आमुच्या शिवबाजीची तुम्हा माहिती न का? दाविता फुशारकी का फुका? तुम्हासारखे असतील किती लोळवले नरमणी, अमुच्या शिवबाने

भर रणी.’ त्या घोडेस्वारांपैकी एक स्वत: शिवाजीराजेच असतात. ते खूष होऊन त्याला सांगतात, ‘आहेस इमानी माझा चेला खरा, चल इमान घे हा माझा शेला तुला.’ ’४१

प्रतिस्पर्धी सैन्य

मोगल आणि आदिलशाही शासन

मोगल हे मूलत: लष्करी सत्ताधीश होते. त्यांचे सैन्य मुख्यत्वेकरून घोडदळावर आधारित होते. मोगल साम्राज्यातल्या अधिकाऱ्यांना मनसबदार म्हणत. अरबी शब्द मनसब म्हणजे हुद्दा. मनसबदार आपापल्या शिबंद्या उभारत असत. त्यात शिपायांची आणि लोहार, नालबंदी, भिस्ती वगैरे कारागिरांची भरती करणे, हत्ती, घोडे, उंट वगैरे जनावरांची खरेदी आणि सांभाळ करणे, शिपायांना लष्करी शिक्षण देणे वगैरे सर्व जबाबदाऱ्या मनसबदाराच्या असत. प्रत्येक मनसबदार बादशहाचा सेवक असे.[४२] मोगल सैन्यात प्लाटून, पलटण, बटॅलियन वगैरे वेगवेगळ्या तुकड्या नसत. मनसबदारांना त्यांच्या सैन्याच्या खर्चासाठी एकतर नगद रक्कम मिळत असे किंवा त्यांना जहागिरी दिल्या जात असत. त्यातून मनसबदार कर गोळा करून आपला आणि सैन्याचा खर्च भागवू शकत असत. मोगल साम्राज्याचा जो भाग जहागिरीच्या स्वरूपात दिला नसेल, त्याला खालीसा किंवा खालीसा-इ-शरीफा म्हणत.

मनसबदारांचे वेगवेगळे हुद्दे दोन अंकांकरवी दर्शवले जात असत; पहिला ‘धत’ म्हणजे व्यक्तीची श्रेष्ठता आणि दुसरा ‘स्वार’ म्हणजे घोडेस्वारांची संख्या. ‘धत’ अंक त्या मनसबदाराची वरिष्ठता दर्शवण्यासाठी होता. धतचे २८ हुद्दे होते. अंक जितका अधिक, तितका तो मनसबदार जास्त वरिष्ठ. १०००पेक्षा वरचा धत अंकधारकांना ‘अमीर’ म्हणत. राजघराण्याचे रक्त अंगात असल्याशिवाय ७०००च्या वर धत दिला जात नसे. दुसरा अंक मनसबदाराच्या तुकडीतल्या घोडेस्वारांची संख्या दर्शवत असे. त्या संख्येच्या □ ते □ पर्यंत घोडेस्वार तो मनसबदार ठेवू शकत असे. धत वा स्वारांची संख्या बादशहाच्या किंवा प्रांत सुभेदाराच्या आज्ञेवरून वरखाली होत असे, तसेच त्याच्या जहागिरीची अदलाबदल होणे, त्याला मोठी जहागीर दिली जाणे किंवा त्याची जहागीर हिरावली जाणे हे सर्व सरकारच्या हुकमावर अवलंबून असे.

मोगल शासनातील सर्वोच्च अधिकारी बादशहाच्या दरबाराचे सदस्य असत. दिवाण किंवा वझीर हा अर्थविषयक कारभार पाही. खान-इ-समान किंवा मीर-इ समान मालमत्तेच्या व्यवहारासाठी जबाबदार असे. मीर बक्षी मनसबदारांच्या नेमणुका आणि संलग्न कारभार पाही. मीर अतिश किंवा दरोगा-इ-तोपखाना हा नावानुसार तोफखान्याचा प्रमुख होता. त्याशिवाय दरोगा-इ-डाकचौकी, काझी-अल् कुझत (मुख्य न्यायाधीश) आणि मुहतसीब (धार्मिक नियमांचे पालन करवून घेणारा) वगैरे इतर उमराव दरबारात असत.

मोगल साम्राज्य वेगवेगळ्या सुभ्यांत वाटले गेले होते. शहाजहानच्या वीस वर्षांच्या कारकिर्दीनंतर एकूण २२ सुभे अस्तित्वात होते. त्यातील वऱ्हाड (विदर्भ किंवा बेरार), अहमदाबाद, माळवा, खानदेश, तेलंगण (नांदेड राजधानी) हे दक्षिणेतील सुभे होते. सुभेदार वा साहिब-इ-सुबा हा सुभ्याचा प्रमुख असे. तो मुलकी आणि लष्करी कारभार पाही. दर दोन-तीन

वर्षांनंतर त्याची बदली होत असे. प्रत्येक सुभ्याचे अनेक 'सरकारां'मध्ये विभाजन केलेले असे. सरकार वेगवेगळ्या परगण्यांत वाटला जाई. प्रत्येक परगण्याच्या खाली अनेक खेडी असत. 'सरकार'च्या प्रमुखाला फौजदार, परगण्याच्या प्रमुखाला ठाणेदार आणि शहरप्रमुखाला कोतवाल ही नावे होती.

मोगलांप्रमाणे आदिलशाहीसुद्धा एक लष्करी राज्य होते. आदिलशाही सैन्यात लहान-मोठ्या तुकड्या होत्या. त्यांच्या प्रमुखाला वझीर हे नाव होते आणि ते आपापल्या तुकड्यांची भरती आणि प्रतिपाळ करीत. त्याच्यासाठी प्रत्येकाला जहागीर किंवा मोकासा देण्यात येत असे. परंतु मनसबदाराप्रमाणे वझिराचे वेगवेगळे हुद्दे नव्हते. वझीर एक तर वारशाने वा कर्तबगारीने किंवा इतर राज्यांचे सरदार आदिलशाहीत आल्यानंतर बनत असत. आदिलशाहीचा प्रदेश वेगवेगळे परगणे किंवा मुअमलमध्ये वाटण्यात आला होता. वझीराला दिलेल्या मोकासाच्या आकाराला मर्यादा नव्हती. वझीर आपल्या मोकासाच्या व्यवस्थापनासाठी सरहवालदार, हवालदार, मुजुमदार वगैरे कारभाऱ्यांची नेमणूक करत असे.

महाराष्ट्रातील वसाहतींचे तीन प्रकार होते: मौजा (खेडे), कसबा (मोठे गाव), शहर. खेड्यापासून किंचित दूर परंतु त्याचाच भाग असलेल्या वस्तीला माझरा म्हणत. खेड्यातील शेतकऱ्यांना कुळ, कुळवाडी, कुणबी, पराज किंवा मुजेरी ही नावे होती. सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी आणि इतर कारागिरांना 'बलुते' असे संबोधले जाई. आपला धंदा करण्याच्या हक्काला मिरासदारी म्हणत. खेड्याच्या वारसदारी प्रमुखाला पाटील किंवा मुकादम असे नाव होते. त्याच्यावर खेड्यातील कर गोळा करण्याची जबाबदारी असे. शेतीतील ३३ ते ५० टक्के उत्पन्न कर म्हणून द्यावे लागायचे. पाटलाचे हिशेब राखण्याचे काम कुलकर्णी करत असे. चौगुला कर प्रत्यक्ष गोळा करत असे. महार खेड्याच्या पहारेकऱ्याचे काम करे. पाटील, चौगुला, महार यांना कामाचा मोबदला म्हणून करमुक्त जमीन दिली जात असे. बलुत्यांना मोबदला म्हणून शेतकरी धान्य देत असे.

परगण्याच्या पातळीवर पाटील आणि कुलकर्ण्याचे काम देशमुख आणि देशकुलकर्णी करत असत. अधिकाधिक जमीन शेतीखाली आणून कराचे प्रमाण वाढवणे ही देशमुखाची जबाबदारी असे. जरी कर गोळा करणे हे देशमुखाचे काम असले, तरी लष्करी मोहिमांत भाग घेणे हीसुद्धा त्याच्याकडून अपेक्षा असे. त्यासाठी तो सशस्त्र शिपाई बाळगत असे. या कामासाठी सर्व रहिवासी त्याला धान्याचा मोबदला देत. पाटील, चौगुला, महार यांना खेड्याचे वतनदार आणि देशमुख, देशकुलकर्णी यांना परगण्याचे वतनदार म्हणत. वतनदार म्हणजे अधिकारी. सर्वसाधारणपणे देशमुख, पाटील व चौगुला मराठा जातीचे असत, कुलकर्णी ब्राह्मण किंवा प्रभू जातीचे असत. प्रत्येक परगण्यात पोलिसाच्या कामासाठी नायकवडीची नेमणूक असे. त्याच्याजवळ सशस्त्र शिपायांची चमू असे, तिला जथा असे म्हणत. परगण्याच्या पातळीला एक फौजदार न्यायाधीश असे. तो मुस्लीम कायद्यानुसार निवाडे करत असे. मालमत्तेच्या भांडणावर न्याय देण्यासाठी 'गोट' गोळा केला जाई. त्यात वेगवेगळे वतनदार आणि नागरिकांना सामील केले जाई.४३

शत्रुसैन्याची रचना

पूर्वी उल्लेख केल्यानुसार प्रत्येक मनसबदाराला त्याच्या हुद्दयानुसार सैन्य बाळगावे लागे. उदाहरणार्थ, ७००० धत/ ७००० स्वार हुद्दयाच्या मनसबदाराला ४६६७ स्वार ठेवावे लागत. घोडदळातील स्वारापाशी तलवार, ढाल, भाला आणि धनुष्य असे. त्याचा घोडा तुर्की, ताझी किंवा याबू जातीचा असे. नगद रकमेवर काम करणाऱ्या मनसबदारांना नियमानुसार प्रत्येक स्वाराच्या मागे एक, दोन किंवा तीन घोडे ठेवावे लागत. मनसबदारांच्या तुकड्यांतील घोड्यांशिवाय मोगल सैन्यात घोडेस्वारांचा आणखी एक प्रकार होता. त्याला 'आहाडी' म्हणत. आहाडी म्हणजे एकटा. ते बादशहाच्या नोकरीत असत आणि त्यांना सरकारी खजिन्यातून पगार मिळे. सोयीनुसार त्यांची वेगळी तुकडी बनवली जाई किंवा त्यांना मनसबदाराच्या तुकडीमध्ये समाविष्ट केले जाई. प्रत्येक आहाडीपाशी एक ते चार घोडे असत. आहाडीकडे धनुष्य किंवा चापाची बंदूक असे, त्यानुसार त्याला आहाडी-इ-तिरंदाज किंवा आहाडी-इ-बरकंदाझ म्हणत.

मोगल सैन्यात पायदळ असा वेगळा विभाग नव्हता. पायदळाचे सैनिक प्रामुख्याने तोफखान्याबरोबर जोडलेले असत. त्यांच्या तुकड्या किल्ले, लष्करी छावण्या आणि सरकारी कार्यालय वा बादशहाच्या रक्षणासाठी तैनात असत. पायदळाचे अधिकारी मिर्दा, सादीवाल आणि हजारी हुद्दयावर असत. सादीवालाच्या हाताखाली शंभर आणि हजारीच्या हाताखाली हजार शिपाई असत. त्यांच्याकडे चापाच्या बंदुका असत. याशिवाय 'सिहबंदी' नावाचे एक वेगळे दल होते. कदाचित ते अर्ध-सैनिक बल असावे. मोगल सैन्यात सेनापती आणि तुकडीप्रमुखांच्या वाहनासाठी, अवजड तोफा ओढण्यासाठी किंवा हलक्या तोफा पाठीवर वाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात हत्तींचा वापर होई.

बादशहानाम्यात शहाजहानच्या कार्यकाळात १६४६-४७मध्ये मोगल सैन्यात दोन लाखांचे घोडदळ; त्यात ८००० मनसबदार, ७००० आहाडी, आणि १,८५,००० स्वार असल्याची नोंद आहे. त्याचबरोबर ४०,००० तोफखान्याचे व पायदळाचे शिपाई होते.४४ आदिलशाही आणि कुतुबशाहीतील घोडदळ याच धर्तीवर आधारित होते. परंतु या दोन्ही शाह्यांमध्ये 'खासखेल' नावाची एक मध्यवर्ती तुकडी असे आणि ती शहाच्या हाताखाली काम करी.

तोफखाना हे मोगल सैन्याचे ब्रह्मास्त्र. लढाईत त्यांची सारी मदार तोफखान्यावर असे. मोगल सैन्यापाशी अगडबंब आणि अवजड तोफा होत्या. 'फथ लष्कर' व 'लैली' नावाच्या औरंगजेबाने कंदाहारच्या वेढ्यादरम्यान वापरलेल्या तोफांना चालवण्यासाठी ७० ते ८० बैलांची गाडी लागे. त्यापेक्षाही लहान वेगवेगळ्या आकारांच्या तोफा मोगल सैन्यात होत्या. त्या पितळेच्या किंवा लोखंडाच्या असत. या 'मुखभरण' तोफांत स्फोटकाची भुकटी (गन पावडर) पुढून नळीमध्ये ठासून भरली जाई आणि नंतर लोखंडाचा तोफगोळा घातला जाई. मग वातीला आग लावल्यावर तो गोळा उडे, प्रक्षेपित स्थानाजवळ जाऊन तो फुटे आणि त्याच्या जळत्या ठिकऱ्या ठिकऱ्या शत्रुसैन्यावर पडत. तोफांचे आणि स्फोटकांचे शास्त्र सतराव्या शतकात क्रमाक्रमाने प्रगत होत गेले. त्यानंतर उखळी तोफांचाही वापर सुरू झाला.

तोफखान्यात तोफांच्या वजनानुसार तीन प्रकार प्रचलित होते. पहिला, अतिवजनाचा तोफखाना; या तोफा किल्ल्यांमध्ये तैनात असत. एक ते १०० किलोग्राम वजनाचे तोफगोळे

त्यातून उडवले जात. अर्थातच त्यांच्या वजनामुळे त्या एका जागेवरून दुसऱ्या जागी हलवल्या जाऊ शकत नसत. दुसरा प्रकार, वेढा तोफखाना. या तोफा मुख्यत्वेकरून किल्ल्याला वेढा घालण्यासाठी वापरल्या जात. त्यातून सुमारे ५० किलोग्राम वजनाचे गोळे उडवले जात. या तोफा जरी हलवल्या जाऊ शकत असल्या, तरी त्यासाठी प्रचंड मनुष्य/जनावर बळाची आवश्यजकता पडे. त्यामुळे एकदा का मुक्कामाला पोचल्या की, त्या एका जागेवरच तैनात केल्या जात. तिसरा प्रकार, गतिमान तोफखाना. या रणांगणावर नेल्या जात. त्यातही तीन उपप्रकार होते: पहिला, जनावरांनी ओढलेल्या वाहनांवर ठेवलेल्या तोफा, यांच्यातून ३ ते ४ किलोग्राम वजनाचे गोळे धावत्या युद्धात उडवले जात; दुसरा, हत्तीच्या पाठीवर (हथणाल किंवा गजणाल) किंवा उंटांच्या पाठीवर (शुतर्णाल) वाहून नेलेल्या तोफा; तिसरे, अग्निबाण (रॉकेट).

तोफखान्यात लढणाऱ्या सैनिकांना त्यांच्या कामानुसार वेगवेगळी नावे होती: गोलंदाझ (तोफेत गोळा घालणारा), बांदार (अग्निबाण उडवणारा), बारूदसाझ (नळीत स्फोटक ठासणारा), आहांगार (लोहार), तोपसाज-इ-आहांगार (तोफा बनवण्यात तरबेज लोहार), नज्जर (सुतार), बेलदार (खड्डा खोदणारा) वगैरे.

सतराव्या शतकातील मोगल किंवा सुलतानशाह्यांच्या सैन्यदलात अधिकारी आणि सैनिकांच्या प्रशिक्षणाची प्रथा नव्हती. त्यामुळे आणि इतर विविध कारणांमुळे त्यांची शिस्त गचाळ असे. प्रतिकूल परिस्थितीत सैन्य आवाक्यात राहात नसे. त्यांना ठरलेला असा गणवेशही नसे. मोहिमेवर जाण्यासाठी एकत्र झालेल्या सैन्यात मनसबदारांच्या तुकड्या असत. त्याबरोबर तोफखान्याच्या तुकड्या असत. सैनिकांना लागणारे वेगवेगळे सामान घेऊन व्यापारी सैन्याबरोबर जात. एक चालता-फिरता बाजारच त्यांच्याबरोबर असे. सैन्याचे नेतृत्व सर्वांत वरिष्ठ मनसबदाराला दिले जाई. आदिलशाही आणि कुतुबशाही सैन्यांतही सर्वसाधारणपणे हेच रिवाज प्रचलित होते.

आगेकूच करताना किंवा शत्रूस सामोरे जाताना घोडदळाची 'करावूल' नावाची तुकडी शत्रूची माहिती मिळवण्यासाठी सर्वांत पुढे असे. त्यानंतर हत्ती किंवा बैलांच्या गाड्यांनी ओढलेल्या मोठ्या तोफा एका रांगेत जात असत. त्यांना एकमेकांशी साखळीने बांधून एक फळी निर्माण केली जाई. त्यांच्यामागे हथणाल आणि शुतर्णाल या तुलनेने हलक्या वजनाच्या तोफा वाहणारे हत्ती आणि उंट चालत. त्यांच्यामागे घोडदळाच्या वेगवेगळ्या तुकड्या मध्यभागी, दोन्ही बगलांना, त्यांच्या मागे-पुढे चालत. त्यांच्या स्थानांप्रमाणे त्यांना कोल, बरांघर, जहांगर, इल्तमिष, हरवाल, चांदावूल अशी नावे असत. कोल ही मध्यभागी असलेली तुकडी. त्याच्यात सैन्याचा प्रमुख असे.

बादशहाला माहिती कळण्यासाठी वकाई-नवी आणि खुफियानवी हे गुप्तहेर सर्वत्र वावरत असत. त्याबरोबर वेगवेगळ्या दरबारांत वकील पाठवले जात. सर्व माहिती गोळा करून पाठवणे हे त्यांचेही काम असे. शत्रूबद्दल माहिती गोळा करण्यासाठी वेगळाच 'हरकारा' किंवा 'जासूस' नावाचा गट कार्यरत असे.

मराठा सैन्य आणि मोगल किंवा सुलतानशाह्यांच्या सैन्यातील कमालीचा फरक वरील

प्रत्येकाच्या वर्णनांवरून डोळ्यात भरल्याशिवाय राहात नाही. मराठा सैन्य संख्येने आणि शस्त्रास्त्रांनी व तोफांनी कमी असले तरी त्यांचा साधेपणा, परिश्रम करण्याची तयारी, बडेजावाचा अभाव, शिस्त आणि स्वराज्याच्या प्रेरणेने निर्माण झालेली देशभक्तीची भावना यामुळे इतरांपेक्षा कित्येक पटींनी सरस होते आणि तेच त्यांच्या यशाचे गमक होते.

रणनीती व डावपेच

युद्धनीतीची दहा मूलतत्त्वे

युद्धाची योजना आखताना आणि त्याचे संचालन करताना सर्व पातळ्यांवरील लष्करी अधिकाऱ्यांनी काही मूलमंत्र ध्यानात ठेवणे आवश्य क असते. भूतकाळात घडलेल्या लढायांतील यशापयशाच्या विलेषणावर ते आधारित आहेत. ख्रिस्तपूर्व ५००मध्ये सुन्त्झू या तत्त्वज्ञाने सर्वप्रथम युद्धाच्या मूलतत्त्वांवर भाष्य केले. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात मौर्य साम्राज्याचा संस्थापक चाणक्य ऊर्फ कौटिल्य यानेही युद्धतत्त्वांवर प्रगाढ टीका लिहिली. इ स १८००मध्ये नेपोलिअन बोनापार्ट याने त्यावर चर्चा केली. अन्तोइन हेन्री जोमिनी याने १८३८मध्ये आपल्या 'आर्ट ऑफ

वॉर' या पुस्तकात काही मूलतत्त्वांचा ऊहापोह केला.

आधुनिक युद्धशास्त्रातील मूलतत्त्वांचा समग्र अभ्यास करून ब्रिटिश जनरल

जे. एफ. सी. फुलर याने पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस दहा युद्धतत्त्वांवर लिहिलेला

शोधनिबंध ब्रिटिश आणि सर्व आधुनिक पाश्चात्य सैन्यदलांनी अधिवृतरीत्या स्वीकारला. त्यानंतर जनरल फुलर याने ग्रथित केलेली तत्त्वे युद्धनीतीची दहा मूलतत्त्वे (प्रिन्सिपल्स ऑफ वॉर) म्हणून ओळखली जाऊ लागली आणि आधुनिक युद्धशास्त्राच्या अभ्यासात सर्वत्र उद्धृत केली जाऊ लागली. भूतकाळात घडलेल्या युद्धांमधील यशस्वी लढायांचे तर्वनिष्ठ विलेषण केले, तर या चिरंतन मूलतत्त्वांचे पालन यशास कारणीभूत झाल्याची प्रचीती येते. शिवाजीराजांच्या पुढे येणाऱ्या विविध लढाया या मूलतत्त्वांच्या निकषावर पडताळून पाहणे स्वारस्यपूर्णच नव्हे, तर उपयुक्तही ठरेल. शिवाजीराजांच्या जमान्यात हे ज्ञान जरी प्रचलित नव्हते, तरी ही चर्चा करताना त्यांची या संबंधातील प्रतिभा मंत्रमुग्ध करून जाते.

ही दहा युद्धतत्त्वे आहेत :

१. उद्दिष्टाची निवड आणि त्याचा पाठपुरावा (सिलेक्शन अँड मेंटेनन्स

ऑफ एम).

२. सुरक्षितता (सिक्युरिटी).

३. गतिक्षमता (मोबिलिटी).

४. आक्रमक चाल (ऑफेन्सिव ॲक्शन).

५. बळाचा मितव्यय (इकॉनॉमी ऑफ फोर्स).

६. बळाचे वेंद्रीकरण (काँसेंट्रेशन ऑफ फोर्स).

७. विस्मयकारकता व शाठ्य (सरप्राइज अँड डिसेप्शन).

८. मनोधैर्य (मोराल).

९. सहकार्य (कोऑपरेशन).

१०. युद्धव्यवस्थापन (लॉजिस्टिक्स).

उद्दिष्टाची निसंदिग्ध व अचूक निवड आणि त्याचा सातत्याने पाठपुरावा हे पहिले युद्धतत्त्व. उद्दिष्ट हा कोणत्याही योजनेचा आत्मा असतो. आपण निवडलेले उद्दिष्ट आपल्यापाशी उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या करवी साध्य करणे शक्य असले पाहिजे. जर सेनापतीला आपले उद्दिष्टच काय, हे माहिती नसेल, तर अंधारात काठी फिरवणाऱ्या माणसासारखी त्याची अवस्था होईल. आपले उद्दिष्ट तो कधीच साध्य करू शकणार नाही आणि उगाचच इकडे तिकडे भरकटत राहील. एकदा का अचूक उद्दिष्ट निवडले की, वाटेत येणाऱ्या कोणत्याही अडचणींना न जुमानता आणि अनावश्यदक लक्ष्यांनी विचलित न होता ते साध्य होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे आवश्यशक आहे. शिवाजीराजे आपल्या तुकडीप्रमुखांना कोणत्याही कारवाईच्या आधी सुस्पष्ट आदेश देत असत आणि त्यापासून ते उद्दिष्ट साध्य होईपर्यंत शक्यतो विचलित होत नसत.

दुसरे युद्धतत्त्व म्हणजे सेना, तिचा तळ, शस्त्रास्त्रे आणि संसाधनांची सुरक्षितता. आपल्या सेनेच्या सुरक्षिततेची खातरजमा करणे हे प्रत्येक सेनापतीचे आणि इतर कनिष्ठ अधिकाऱ्यांचे आद्य दायित्व असते. सेनेचा तळ पडलेला असो वा ती आगेकूच करत असो, शत्रूकडून तिच्या सुरक्षिततेला कोणता धोका आहे व तिच्यावर कोठून हल्ला येऊ शकतो, याबद्दल सेनापती सदैव जागरूक असला पाहिजे. तळावर हा करण्याची शत्रूला तसूभरही संधी कशी द्यायची नाही आणि असा हल्ला मुळातच खुडून कसा टाकायचा, याबद्दल चाणाक्ष सेनापतीने आपल्या सैन्याला २४ ७ दक्ष ठेवले पाहिजे. शिवाजीराजांच्या किल्ल्यांच्या सुरक्षिततेसाठी दिलेल्या सखोल आदेशांबाबत याआधी सविस्तर उेख आलेला आहे. आपल्या गाफील शत्रूच्या हलगर्जीपणाच्या मराठा सेनेने वारंवार घेतलेल्या फायद्याची उदाहरणे पुढे येतीलच.

तिसरे युद्धतत्त्व म्हणजे गतिक्षमता. दोन प्रतिस्पर्धी सैन्यदले एकमेकांविरुद्ध हालचालप्रधान कारवाई करत असतील, मग ती आगेकूच असो वा हल्ला असो, तर त्यातील गतिक्षमतेत सरस असलेली बाजू आपल्या प्रतिपक्षावर मात करील, याची अधिक शक्यता जास्त आहे. शिवाजीराजांच्या सैन्याची न्यूनतम संख्या, कोणत्याही अवजड सामानाचा अभाव, घोडदळ आणि पायदळ यांच्या चालीची तेज गती, काटकसरी आणि मितव्ययी राहणी, अन्नधान्याच्या रेलचेलीचा अभाव, कपडेलत्त्यांच्या लालसेची गैरहजेरी, हत्ती-घोडे-पालख्यांसारख्या वाहनांची वानवा, बायका-बटीक यांच्यासारख्या हौसे-मौजेला फाटा आणि तोफांच्या लोढण्याची अनुपस्थिती या वा इतर तत्सम कारणांमुळे सैन्याच्या गतीला अवरोध घालणारे घटक उपलब्धच नव्हते. अवजड मोगल सैन्याविरुद्ध गतिक्षमता हा शिवाजीराजांच्या सैन्याचा हुकमी एक्का होता. डोंगराळी प्रदेशात आडवाटेने कोठेही जलद पोचू शकणारे त्यांच्या काटक मावळ्यांचे पायदळ आणि वाऱ्याच्या वेगाने दौडणारे त्यांचे घोडदळ संख्येत अनेक पटींनी प्रबळ असलेल्या मोगल व आदिलशाही सैन्याचे कर्दनकाळ होते. मराठ्यांचा शिधा आणि शस्त्रे

पाठीवरच असल्याने आणि वाटेत मिळेल त्यावर गुजारा करण्याची त्यांना सवय असल्याने कोणत्याही पुरवठा व्यवस्थेची त्यांना आवश्यमकता भासत नसे. त्याउलट आदिलशाही वा मोगलांचे राजेशाही सैन्य मुंगीच्या वेगाने जात असे. मराठा सैन्य त्याचा नेहमीच फायदा करून घेत असे. २६ जून १६६४च्या एका पत्रात पृच्छा करण्यात आली होती, 'शिवाजीला पंख आहेत का, कारण तो येत असल्याची अफवा पोचण्याआधीच तो खुद्द तिथे पोचतो.'

आक्रमक चाल हे चवथे युद्धतत्त्व. संरक्षणात्मक पवित्र घेणाऱ्या शत्रूला नामोहरम करण्यात आक्रमक चाल हमखास परिणामकारक ठरते. आक्रमण हा शिवाजीराजांच्या रणनीतीचा स्थायिभाव होता. किल्ल्यांचे संरक्षण वगळले, तर त्यांनी बचावात्मक भूमिका घेण्याचे प्रसंग बोटांवर मोजण्याइतकेच. किल्ल्याच्या संरक्षणाच्या बरोबरीने शत्रूवर त्याची इच्छाशक्ती खच्ची करण्यासाठी ते अचानक हल्ले चढवत असत. पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाच्या वेळी त्यांनी फत्तेखानाच्या छावणीवर घातलेली धाड हे त्याचे उदाहरण यापूर्वी आलेच आहे. किंबहुना शिवाजीराजांचा प्रमुख डावपेच गनिमी कावा हा आक्रमणावर आधारित असे. आक्रमक चालीसाठी धडाडी, धारिष्ट्य आणि हिंमत लागते. 'ते येरा गबाळ्याचे काम नव्हे'. राजांच्या आक्रमक चालींमागे तल्लख आणि अभिनव कल्पना असत, त्या शत्रूच्या स्वप्नातही येत नसत. त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक असलेला हिय्या आणि जिद्द त्यांच्यापाशी मुबलक प्रमाणात होती. अफझलखानाचा पर्दाफाश किंवा शाईस्ताखानच्या शयनगृहावर घाला ही आक्रमक चालींची लष्करी इतिहासातील सोनेरी पाने आहेत.

बळाचा मितव्यय हे पाचवे तत्त्व. अमाप बलाचा अनिर्बंध प्रयोग करून प्रतिस्पर्ध्यावर काय, कोणीही मात करील. कमीत कमी बळ वापरून शत्रूला लोळवणे ही सेनापतीच्या युद्धकौशल्याची खरी कसोटी. शिवाजीराजांकडे मोगलांसारखे किंवा आदिलशाहीइतके संख्याबळ नव्हते. तोफखाना वा हत्ती-उंटांची चंगळ तर त्यांना केव्हाच परवडण्यासारखी नव्हती. परंतु या अभावाचेच त्यांनी आपल्या बलस्थानात रूपांतर केले होते. त्यासाठी त्यांचे गमक म्हणजे बुद्धिमंत डावपेच. किंबहुना बळाचा मितव्यय ही तर गनिमी काव्याची मध्यकल्पना. ते दुर्बलाचे सबलाविरुद्ध अवजार. समोरासमोर हल्ला करणे ही कल्पना शिवाजीराजांच्या शब्दकोशातच नव्हती. त्यामुळे अनिर्बंध बळाचा उपयोग करण्याची ना त्यांना गरज होती, ना शक्य असता तरी तो मार्ग त्यांनी कधी अवलंबला असता. याउलट मोगल वा आदिलशाहीकडे सैन्याची ददात नसल्यामुळे हल्ला असो वा बचाव असो, सामोऱ्या येणाऱ्या त्यांच्या सैन्याची संख्या प्रचंड असे. हा अपव्यय म्हणजे 'बळाचा मितव्यय' या तत्त्वाचा सरासर भंग असे आणि याचा फायदा नेहमीच 'सडपातळ' मराठा सैन्याला होत असे.

बळाचे केंद्रीकरण हे सहावे युद्धतत्त्व. शत्रूच्या एकाच हल्ल्याचे आपले अधिकाधिक सैन्य लक्ष्य होऊ नये म्हणून ते होऊ शकेल तितके विखरून ठेवले जाते, परंतु जेव्हा आवश्य कता पडेल त्यावेळी इतरत्र विखुरलेले आपले सैन्य एकत्र करून ते शत्रूवर आपल्या निवडीच्या जागी घणाघात करण्यासाठी उपलब्ध ठेवण्याचीही तेवढीच आवश्याकता असते. या दोन्ही गोष्टी साधणे ही सेनापतीची कला आहे. अधिकाधिक सैन्य एकत्र आणणे याला बळाचे

केंद्रीकरण ही संज्ञा आहे. त्याबरोबरच ती कारवाई संपल्यानंतर त्याच सैन्याचे जलद विकेंद्रीकरण करणे तितकेच आवश्यआक असते. किंबहुना ज्या बाजूकडे सैन्याची अधिक ददात असेल, त्याला याची गरज अधिक पडते. त्यासाठी सेनापतीला दूरदृष्टी आणि आगामी हालचालींचा अचूक अंदाज असणे आवश्यअक असते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सैन्य हलवण्याच्या क्षमतेची यात गरज असते. यासाठी सैन्याच्या गतिमानतेचा उपयोग होतो. पन्हाळ्यावरील हल्ल्याचा प्रतिकार घ्या किंवा साल्हेरची लढाई घ्या, अत्यंत वेगाने आवश्यहक असलेल्या सैन्याचे केंद्रीकरण करण्याची किमया राजांनी साधलेली दिसेल. मोगलांकडे संख्येची भरताड असल्याने त्यांना मात्र याची कधीच गरज भासली नाही.

सातवे युद्धतत्त्व आहे विस्मयकारकता आणि शाठ्याचा वापर. नवनवीन आणि धूर्त डावपेचांकरवी शत्रूची मती कुंठित करून त्याला आश्चर्यचकित करणे आणि त्याची फसवणूक करणे ही यामागील कल्पना. या तत्त्वाच्या वापरात वाकबगार असलेल्या सेनापतीला अपेक्षेबाहेर लाभ होऊ शकतात आणि तो याकरवी लढाईचा रंगच बदलू शकतो. बळाचा मितव्यय या तत्त्वाला हे पूरक आहे. विस्मय आणि शाठ्य हा गनिमी काव्याचा आत्मा. त्यांच्याशिवाय गनिमी कावा जगूच शकत नाही, परंतु त्यांचा उपयोग करण्यासाठी बुद्धिमत्ता, चलाखी आणि शिताफीची गरज असते. जर का तो फसला, तर त्याचे जीवघेणे परिणाम होऊ शकतात. विस्मय आणि शाठ्याचा अमोघ आणि प्रभावी वापर करण्यात शिवाजीराजांचा हातखंडा होता. आपल्या तल्लख योजनेने आणि अनपेक्षित चालीने ते शत्रूला अक्षरश: हतबुद्ध करून टाकत असत. खरोखरच त्यांची यात कोणीच बरोबरी करू शकले नाही. ‘पहाड का चूहा’ ही औरंगजेबाने दिलेली बिरुदावली याचाच दाखला होता.

या तत्त्वाच्या राजांच्या वापराची अनेक उदाहरणे देता येतील. जावळीच्या चंद्रराव मोरेची नजर रेडतोंडी खिंडीकडे वळवून त्याच्या फौजेवर पिछाडीने केलेला घातक हल्ला, १६५९मध्ये अफझलखानाचा कपटी डाव त्याच्यावरच उलटवून त्याच्या सैन्याचा उडवलेला धुव्वा, १६६४मध्ये बाजी घोरपड्यावर उगवलेला सूड आणि पन्हाळ्याच्या वेढ्यातून पलायन हे सर्व या तत्त्वाच्या वापरातील राजांच्या अद्वितीय कौशल्याचे दाखले आहेत. किंबहुना हे तत्त्व त्यांनी न वापरल्याची अगदी मोजकीच उदाहरणे सापडतील. यातील उच्च बिंदू म्हणजे लाल महालामधील शाईस्ताखानावरील हल्ला. हा जागतिक सैनिकी इतिहासातील ‘कमांडो रेड’चा सुवर्णाक्षरांत कोरलेला एक अलौकिक अध्याय आहे.

आठवे युद्धतत्त्व आहे सैन्याचे मनोधैर्य. मनोधैर्य मोराल म्हणजे सैन्याची लढण्याची अहमहमिका, लढाऊ मनस्थिती. हे कदाचित सर्वांत अग्रगण्य युद्धतत्त्व म्हणावे लागेल, कारण त्याचा अभाव हे युद्धातील खचित अपयशाचे कारण होऊ शकते. सैन्याच्या लढाऊ मनस्थितीच्या संबंधात दोन चित्तवृत्तींचा महत्त्वाचा सहभाग असतो. पहिली प्रेरणा आणि दुसरे मनोधैर्य. प्रेरणा ही व्यक्तीची चित्तवृत्ती, तर मोराल किंवा मनोधैर्य ही समुदायाची मनोभावना आहे.

कोणतेही काम स्वखुशीने करण्याची मनोवृत्ती म्हणजे प्रेरणा. त्याची दोन रूपे: बाह्यप्रेरणा आणि अंत:प्रेरणा. बाह्यप्रेरणा आर्थिक आणि ऐहिक लाभांशावर अवलंबून असते, त्याच

बरोबर पदोन्नती, मानमरातब यामुळेही ती गुणावते. अंत:प्रेरणा ही बाह्यप्रेरणेपेक्षा नि:संशय श्रेष्ठ आणि शाश्वत असते. निस्सीम ध्येयवाद, अचल देशप्रेम आणि व्यक्तीची परिपक्वता यावर ती अवलंबून असते.शत्रू समोर असता भीतीमुळे किंवा निरर्थकतेच्या भावनेने ग्रासल्यामुळे सैनिकाची व्यक्तिगत प्रेरणा रणांगणावर खच्ची होऊ शकते. ‘ततो युद्धाय युज्यस्व’ (श्री मद्भगवद्गीता), अध्याय २, लोक ६८) हा श्रीवृष्णाने अर्जुनाला दिलेला संदेश त्याची व्यक्तिगत युद्धप्रेरणा जागृत करण्यासाठी होता. किंबहुना ‘गाण्डीवं संस्रते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते, न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मन: । ‘माझ्या हातांतून गांडीव धनुष्य गळून पडते आहे, माझ्या अंगाची आग होत आहे. मन चक्रावते आहे. जणू काही माझ्यात उभे राहण्याचे त्राणही शिल्लक उरलेले नाही,’ असे म्हणणाऱ्या गलितगात्र अर्जुनाला युद्धासाठी प्रेरित करण्यासाठी संपूर्ण गीता सांगितली गेली. अर्जुनाच्या खचलेल्या प्रेरणेचे हे समर्पक वर्णन आहे.

मोराल हे मात्र सैन्याच्या विशिष्ट तुकडीपासून संपूर्ण सैन्याच्या लढण्याच्या जिद्दीशी संबंधित आहे. मनोबल किवा मनोधैर्य (मोराल) हा सांघिक सैन्यशक्तीचा सर्वांत मोठा गुण आहे. युद्धकाळात प्रत्येक सैनिकाच्या प्रेरणा आणि संघटित मनोबल हे विशिष्ट पातळीवर राखणे हे नेतृत्वाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. व्यक्तिगत धैर्य, चिकाटी, सांघिक भावना, सैन्याच्या ‘इज्जती’ची चाड, शारीरिक आरोग्य, मानसिक खंबीरता वगैरे घटक मनोबलाची जोपासना करतात. त्याशिवाय खडतर प्रशिक्षण, करडी शिस्त, वेळेवर मिळणारा वाजवी पगार आणि नेतृत्वावरील अतूट विश्वास हे सांघिक मनोबलाचे गुणक आहेत. मराठा सैन्याच्या उच्च मनोबलाचा अग्रगण्य घटक म्हणजे नेतृत्व. राजांवरील स्वामिनिष्ठा हा त्याचा परिणाम. शिवाजीराजांचे राजबिंडे आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व त्यांच्या सैनिकांवर प्रभाव पाडत असे, त्यांना अक्षरश: मंत्रमुग्ध करत असे. त्याउलट आपला सरदार रणांगणातून माघार घेतो आहे किंवा मारला गेला आहे, हे सैन्याच्या मनोधैर्याच्या तत्काळ नाशाचे कारण असते.

शिवाजीराजांचे आपल्या सैन्यावर जिवापाड प्रेम होते. स्वराज्य सेनेत सामील झालेले बहुतांश सैनिक स्वखुशीने आलेले, जुलमी राजवटीला उबगलेले, राजांच्या ध्येयवादी व्यक्तिमत्वाने प्रभावित आणि हिंदूंची विटंबना थांबवण्याच्या सत्कार्यात राजाना साथ देण्याच्या उद्दिष्टाने आलेले होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिगत प्रेरणेची पातळी अत्यंत उच्च होती. याविरुद्ध मोगल वा आदिलशाहीतील शिपाई भाडोत्री होते. केवळ पोटाची खळगी भरणे हे त्यांचे एकमेव उद्दिष्ट होते. त्यामुळे स्वराज्याचे सैन्य पुरेशी शस्त्रास्त्रे व तोफखान्यासारखा बलदंड नसूनही लढाईची बाजी हमखास मारत असे.

नववे युद्धतत्त्व आहे सहकार्य. सैन्याच्या वेगवेगळ्या भागांनी आणि तुकड्यांनी सुसूत्रपणे काम करण्याच्या आवश्य कतेचा याच्याशी संबंध आहे. शिवाजीराजांनी प्रत्येक गोष्टीबाबत इतकी सविस्तर आणि पद्धतशीर नियमावली करून ठेवली होती की, कोणी काय करायचे, यात संदेह राहत नसे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे किल्ल्यांवरील गडकरी, सबनीस आणि कारखानीस यांच्या जबाबदारीची सविस्तर जंत्री केलेली होती, परंतु त्याचबरोबर सुरक्षिततेबाबत दोघांनी काही कामे एकत्र पार पाडायची होती. राजांच्या सर्व सरदारांत एकवाक्यता होती, एकजूट

होती आणि त्यांतला कोणीही एक दुसऱ्याचे पाय मागे ओढण्याचा प्रयत्न करीत नसे, हाच त्यांच्या सहकार्याचा पुरेसा पुरावा आहे.

शेवटचे तत्त्व म्हणजे युद्धाचे व्यवस्थापन. शिवाजीराजांच्या असामान्य व्यवस्थापनक्षमतेची चर्चा यापूर्वीच झाली आहे. 'सैन्य पोटावर चालते', अशी एक अर्थपूर्ण उक्ती आहे. त्याची देखभाल, अन्नधान्याचा साठा आणि वेळी पुरवठा, दारूगोळ्याचे भांडार आणि सैनिकांपर्यंत ते पोचवण्याची व्यवस्था हे व तत्सम अनेक उपाय सैन्याच्या कार्यक्षमतेचे आणि कर्तृत्वाचे चालक आहेत. त्यासाठी अनेक सक्षम कारभाऱ्यांची आवश्यरकता असते. प्रत्येक किल्ल्यावर धान्य आणि इतर जिन्नसांचा पुरेसा साठा करणे निकडीचे होते. जर तो किल्ला शत्रूच्या वेढ्याविरुद्ध प्रदीर्घ काळासाठी लढवायचा असेल, तर या बंदोबस्ताची आवश्यिक असे. याबाबतीतही राजांनी सविस्तर नियमावली केली होती. किल्ल्यावरील कारखानीस हा अधिकारी पुरवठ्याच्या बाबतीची देखभाल करत असे. त्यांच्या कारकिर्दीत पन्हाळ्यावरील सिद्दीजोहारचा वेढा ही एकच वेळ अशी होती की, जेव्हा अन्नाच्या ददातीमुळे त्यांना गड शत्रूच्या हाती द्यावा लागला. हालचालीच्या कारवायादरम्यान बारगीर आणि मावळे आपापला शिधा आणि कपडे पाठीवर घेऊन अनेक दिवस मुलूखगिरी करू शकत, त्यामुळे अनावश्यवक पुरवठ्याच्या व्यवस्थापनाचे शेपूट कापून टाकले गेले होते.

शिवाजीराजांच्या कार्यकाळानंतर अडीच-पावणेतीनशे वर्षांचा कालावधी उलटून गेल्यावर ब्रिटिश जनरल फुलर याने ग्रथित केलेल्या युद्धतत्त्वांची सांगड राजांच्या रणनीतीशी घालणारे हे आढावापत्रक, हा ताळेबंद स्वारस्यपूर्ण आहे. आधुनिक लष्करशास्त्राच्या दुर्बिणीतून पाहिल्यावर त्यांच्या प्रगल्भ विचारसरणीचा आणि सखोल तर्कनिष्ठतेचा प्रत्यय येतो. महाराज खरोखरच वैक वर्षांनी आपल्या काळाच्या पुढे होते, यात संशय नाही आणि त्याच्यातच त्यांच्या यशाचे गमक दडलेले आहे.

सुन्त्झू आणि सर बेसिल लिडेल हार्ट यांचे निरूपण

सुन्त्झू आणि लिडेल हार्ट हे दोन तत्त्वज्ञ युद्धाच्या योजना केवळ संख्येवर किवा बळावर नाही, तर चातुर्य आणि अक्कलहुशारीवर आखण्याच्या बुद्धिप्रामाण्यवादाचे पुरस्कर्ते होते. त्यातील एकाने पंचवीस शतकांपूर्वी, तर दुसऱ्याने एका शतकापूर्वी केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर युद्ध जिंकण्याबाबतची आपापली भाष्ये लिहिली. परंतु ते दोघे होते केवळ औपपत्तिक मीमांसा करणारे विद्वान अभ्यासक. अनेक सुप्रसिद्ध रणधुरंधरांनी त्यांची भाष्ये रणांगणावर आचरणात आणून आपल्या बलवत्तर शत्रूंना नामोहरम केले. शिवाजीराजे त्यांतील अग्रगण्य म्हणून गणले जाणे आवश्याक आहे. याची प्रचीती पुढील चर्चेवरून आणि नंतर प्रत्येक लढाईच्या विलेषणादरम्यान येईल.

'द आर्ट ऑफ वॉर' (सुन्झी बिंग फा) हे सुन्त्झू या चिनी तत्त्वज्ञाने अडीच हजार वर्षांपूर्वी लिहिलेले युद्धनीतीवरील विद्वत्ताप्रचुर आणि अद्वितीय निरूपण. त्याच्या तत्त्वज्ञानात आणि शिवाजीराजांच्या युद्धकृतींत कमालीचे साम्य आढळते. अशा काही समबिंदूंचा येथे उल्लेख करणे उपयुक्त ठरेल.

'न लढताच (लढाई) जिंकणे हे सर्वांत उत्तम'.४५ हे विरोधाभासी विधान सुन्त्झूच्या लष्करी प्रतिभेचा उच्च बिंदू आहे. शत्रूला लढल्याविना हरवणे हा खरा अभिजात युद्धकौशल्याचा कळस आहे. ढकलेली लढाई टाळण्याचे राजांचे धोरण याचाच आविष्कार. एक लाखापेक्षा अधिक संख्येच्या प्रचंड सैन्यासह पुण्यात तीन वर्षे तळ ठोकणाऱ्या शाईस्ताखानाला न लढताच हरवण्याची राजांची किमया सुन्त्झूच्या या तत्त्वज्ञानानुसार आहे.

'जे उत्कृष्ट रणधुरंधर असतात, ते कधीच संतापत नाहीत. जे प्रतिस्पर्ध्यावर मात करतात, ते (परिस्थितीत) कधीच अडकून राहत नाहीत.' ४६ असे सुन्त्झू सांगतो. शिवाजीराजांची धीरगंभीर चित्तप्रवृत्ती सुपरिचित होती. फक्त पन्हाळ्यावर

वेळीच न पोचू शकल्याने नेतोजी पालकराला कडक शिक्षा केल्यामुळे तो शत्रूला जाऊन मिळाल्याच्या प्रसंगाचा अपवाद सोडला, तर राजे कधीही आपल्या सरनोबतावर किंवा जुमलेदारावर संतापल्याचा उल्लेख नाही. औरंगजेबाच्या दरबारात त्यांनी केलेले क्रोधप्रदर्शन खरे होते की तो एक देखावा होता, याची चर्चा पुढे येईलच.

केव्हा आक्रमण करावे आणि केव्हा करू नये, याबाबतीत सुन्त्झूने मार्मिक भाष्य केले आहे. 'तुम्ही स्वत:ला अजेय बनवा आणि शत्रू जेव्हा असुरक्षित असेल, तेव्हाच त्याच्यावर हल्ला करा. ज्या जागेवर ते हरणार नाहीत, अशाच ठिकाणी मुरब्बी लढवय्ये मोर्चेबंदी करतात आणि शत्रूच्या पराभवाला कारणीभूत होऊ शकतील, अशा घटकांचा ते जास्तीत जास्त फायदा घेतात.' ४७ शिवाजीराजांना कोणतीही कारवाई हाती घेण्याच्या वेळी त्याच्यासाठी ठिकाण आणि वेळ यांच्या योग्यतेबाबत बिनतोड अनुमान होते. याची अनेक उदाहरणे पुढे प्रत्येक लढाईच्या विलेषणादरम्यान दाखवली आहेत.

सुन्त्झूच्या मते, 'संवेग हा विजयाचा मुख्य घटक असतो. सातत्याने बदलत राहणारे डावपेच, विस्मय-संपादनासाठी केलेल्या चाली आणि शत्रूच्या मनोवैज्ञानिक अवस्थेचा फायदा घेऊन आपल्याला हव्या असलेल्या व शत्रूसाठी असुरक्षित अशा जागी त्याला यायला भाग पाडण्याची हातोटी ही धूर्त सेनापतीची वैशिष्ट्ये आहेत. असे रणधुरंधर लढाईत सैनिकांकरवी नव्हे, तर संवेगाच्या जोरावर शत्रूला रंजीस आणतात. ते इतरांना आपल्याकडे येण्यास भाग पाडतात, आपण इतरांकडे जात नाहीत.' ४८ संवेग म्हणजे मोमेंटम, तो पदार्थाच्या वजन आणि गतीवर अवलंबून असतो. संवेग = वजन गती. कोणत्याही सैन्याच्या तुकडीबाबतही हा पदार्थ-विज्ञानाचा नियम तेवढाच लागू आहे. जितकी त्या तुकडीची संख्या अधिक आणि जितका तिच्या कारवाईचा वेग अधिक, तितका तिचा संवेग जास्त. गनिमी काव्यासाठी शिवाजीराजे तुकडीची संख्या किमान ठेवत, परंतु कारवाईचा वेग वाढवून ते संवेगाची भरपाई करत.

जमिनीचा आपल्या फायद्यासाठी अधिकतम उपयोग करू शकण्याची सेनापतीची क्षमता हा त्याच्या विजयाचा प्रधान घटक आहे. याबाबतीत सुन्त्झूने चोखंदळ टिप्पणी केली आहे. 'ज्या सेनापतींना जमिनीचा वापर आपल्या फायद्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांनी करण्याची हातोटी साध्य झालेली असते, त्यांना सैन्याचा उपयोग करण्याचे खरे ज्ञान असते. जर सेनापतीला भूभागाशी यशस्वीरीत्या समरस कसे व्हायचे, हे कळत नसेल, तर त्याला केवळ एखाद्या क्षेत्राचा सखोल परिचय असूनही त्याचा काहीही फायदा होत नाही.' ४९ शिवाजीराजांची

आपल्या फायद्यासाठी जमिनीचा वापर करण्याची हातोटी अलौकिक होती. याची अनेक उदाहरणे पुढे विलेषणादरम्यान दिसून येतील.

शिवाजीराजे शत्रूवर कधीही त्याला अपेक्षित असलेल्या मार्गाने हल्ला चढवत नसत. अगदी हाच सर बेसिल लिडेल हार्ट (१८९५-१९७०) या सुप्रसिद्ध आंग्ल संरक्षणविषयक तज्ज्ञाच्या 'स्ट्रॅटेजी ऑफ इनडायरेक्ट ॲप्रोच'चा प्रच्छन्न प्रहारनीतीचा गाभा आहे. या विषयावरील लिडेल हार्ट याचे साक्षेपी लिखाण आधुनिक लष्करी तज्ज्ञांनी नावाजले आहे आणि विविध देशांच्या लष्करी प्रशालांतील सैनिकी अधिकाऱ्यांच्या अभ्यासक्रमात त्याचा समावेश करण्यात आला आहे. लिडेल हार्टच्या मते सरळ व धोपट मार्गाने आपल्या लक्ष्यावर केलेला हल्ला शत्रूला अपेक्षित असल्याने तो अपयशी ठरण्याची बहुतांशी शक्यता असते. अपेक्षित दिशेने जाण्यामुळे शत्रूचा समतोल बिघडण्याची वेळ येत नाही. त्याला त्याची पूर्वकल्पना मिळाल्यामुळे त्याची प्रतिकारशक्ती वाढते.

हार्टच्या रणनीतीतील सिद्धांतांचे थोडक्यात सार असे आहे :

तुमचे उद्दिष्ट तुमच्यापाशी उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या चौकटीत बसणारे असले पाहिजे. त्यासाठी उद्दिष्टाचे तर्वनिष्ठ विलेषण करणे आणि आपल्या क्षमतेची आणि मर्यादांची पुरेपूर जाणीव असणे आवश्य क आहे. आपल्या आवाक्याबाहेर असलेल्या उद्दिष्टामागे धावणे चुकीचे आहे.

आपले लक्ष्य कायम ध्यानात ठेवले पाहिजे. बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी लवचीकता आवश्याक आहे.

शत्रूला अनपेक्षित असलेल्या बाजूने वार करणे महत्त्वाचे ठरते. त्याकरवी आश्चर्यचकित झाल्यामुळे त्याच्या प्रतिकारशक्तीवर परिणाम होतो. गुप्तता, कारवाईमधील नावीन्य, हालचाल व स्थान दिसू न देण्याची प्रक्रिया

(कॅमाफ्लाज अँड कन्सीलमेंट), फसवेगिरी, बेदरकारी, शीघ्रता या सर्वांमुळे शत्रूला चकित करण्यास मदत मिळते.

शत्रूची प्रतिकारशक्ती ज्या बाजूस किमान असेल, त्याचीच निवड हल्ल्याच्या जागेसाठी केली पाहिजे. पूर्ण विचार न करता घाईघाईने निर्णय घेणे टाळले पाहिजे.

हल्ला करण्याचा मार्ग शोधताना त्यात ऐनवेळी अडचण आली, तर त्याला पर्याय उपलब्ध असण्याची खातरजमा केली पाहिजे. ज्या मार्गावर हल्ला केला, तर एकापेक्षा अधिक लक्षितांना धोका पोचेल, असा मार्ग निवडणे लाभदायक असते. त्यामुळे शत्रूच्या मनात गोंधळ निर्माण होतो.

ऐनवेळी बदल करण्याची मुभा योजनेत असणे आवश्यनक आहे. बदलत्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी कोणत्याही योजनेत बदल करणे बऱ्याचदा अपरिहार्य ठरते.

शत्रू ज्या ठिकाणी सावध आहे, तेथे आपल्या हल्ल्याचे संपूर्ण वजन कधीही टाकता कामा नये.

ज्या दिशेने प्रथम हल्ला केला आहे, त्याच बाजूने दुसरा हल्ला करणे चूक ठरते. त्याचबरोबर ज्याजागी पराभव होत आहे, तेथे विचार न करता केवळ आपल्या दुखावलेल्या अहंकाराचा

बदला घेण्यासाठी कुमक पाठवणे फायद्याचे ठरत नाही. ५०

'शिवाजीराजांच्या गनिमी कावा' डावपेचांच्या संकल्पनेशी लिडेल हार्टची प्रच्छन्न प्रहारनीतीची सूत्रे तंतोतंत जुळतात. विंबहुना लिडेल हार्टने हे शब्दांकित करण्याच्या पावणेतीनशे वर्षे आधी या नीतीचे प्रत्येक सूत्र राजांनी अमलात आणले होते. जेव्हा यापुढे राजांच्या लढायांचे विलेषण केले जाईल, तेव्हा पदोपदी याची प्रचीती येत जाईल.

शिवाजीराजांची रणनीती

युद्ध ही फक्त सैनिकांचीच जबाबदारी नव्हे, भार वा निगूत नव्हे. प्राचीन काळापासून मानवाचे आयुष्य युद्धांमुळे प्रभावित होत आले आहे. सर्व युद्धांचे उच्च पातळीवरील संचालन हे सदासर्वदा राजाचे, प्रशासकांचे विंवा राजकारण्यांचे राखीव क्षेत्र राहिले आहे. लष्करी इतिहास हा जगाच्या इतिहासाचे एक अविभाज्य अंग आहे. त्यामुळे युद्धाचा इतिहास हा विषय जितका लष्करी पेशाचा, तितकाच इतरांचाही जिव्हाळ्याचा विषय आहे. युद्धाचा निवाडा हा ऐतिहासिक बदलातील एक महत्त्वाचा घटक आणि प्रणेता असतो. युद्धे का होतात? जेव्हा दोन पक्षांत मतभेद होतात, तेव्हा त्यांच्यात एकवाक्यता साधण्याचे ते शेवटचे साधन आहे. ती एकवाक्यता काही अपवाद सोडून बहुधा बळावर आधारित असते. त्या बळामागील सूत्रधार म्हणजे सरसेनापतीची रणनीती.

रणनीती म्हणजे आपल्या लष्करी संसाधनांचे आपल्या उद्दिष्टांच्या संपादनासाठी परिणामकारक वाटप आणि वापर करण्याची कला, तर डावपेच म्हणजे प्रत्यक्ष लढण्याची कला. युद्धनेतृत्व हे शास्त्र आहे की कला, हा प्रश्न कित्येकदा चर्चिला जातो. त्याचे एक उत्तर म्हणजे ती कलाही आहे आणि शास्त्रही आहे. काही का असेना, तो युद्धातील विजयाचा सर्वात बिनीचा घटक आहे. युद्धनेतृत्वासाठी दोन अव्वल स्वभाववैशिष्ट्ये म्हणजे योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि तो तडीस नेण्याचे नीतिधैर्य व निग्रह.

शत्रूचा पूर्ण संहार करणे विंवा त्याची युद्धशक्ती क्षीण करणे, या दोन्हींपैकी एक युद्धाचे उद्दिष्ट असते. शिवाजीराजांपाशी संसाधनांची ददात असल्याने ते नेहमीच ढकलेली म्हणजे घनघोर लढाई टाळत असत. त्याऐवजी ते शत्रूची शक्ती क्रमाक्रमाने नष्ट करून त्याला गलितगात्र करीत असत. त्यासाठी प्रबळ प्रतिकारशक्ती ही संरक्षणात्मक क्षमता आणि सरस गतिमानशीलता ही आक्रमक क्षमता यांचा ते आलटूनपालटून वापर करीत असत. प्रथम शत्रूचे सैन्य पोचण्याआधी जमतील तितक्या किल्ल्यांवर हे चढवून ते काबीज करीत असत आणि त्यानंतर त्या किल्ल्यांच्या छत्राखाली शत्रूवर हे चढवीत असत. किल्ल्यांवर आणि शत्रूच्या सैन्यावर अनपेक्षितपणे हे चढवून त्यांना चकित करणे, किल्ल्यांभोवती गराडा टाकणे आणि शत्रूचे लक्ष विचलित करण्यासाठी त्याच्या मुलखात खोलवर धाडी टाकणे ही त्यांची मुख्यत्वेकरून रणनीती असे.५१ त्यायोगे स्वराज्याच्या व्यवस्थापनासाठी आवश्यटक असे द्रव्य ते गोळा करीत असत.

स्वराज्याच्या प्रदेशातील शिवाजीराजांच्या चौफेर मुलूखगिरीदरम्यान घातलेल्या धाडींच्या मागे दोन उद्दिष्टे असत : पहिले रणनीतीसंबंधी आणि दुसरे अर्थनीतीसंबंधी. प्रथम शत्रूला

त्याचे बळ विभाजित करण्यास भाग पाडणे किंवा संरक्षणात्मक पवित्रा घ्यायला लावणे हे त्यातील रणनीतीसंबंधी

उद्दिष्ट; त्याकरवी सैन्याच्या खर्चासाठी आवश्यषक असलेले पैशाचे पाठबळ संपादन करणे, त्याचबरोबर शत्रूचे आर्थिक बळ कमजोर करणे हे अर्थनीतीसंबंधातील उद्दिष्ट.५२

आपली हुकमत कोकण प्रदेशात प्रस्थापित करायची, हे राजांचे स्वराज्य-स्थापनेमागील आरंभीचे उद्दिष्ट होते. आपल्या मर्यादित संसाधनांची त्यांना स्पष्ट जाणीव होती. या वास्तवाचा त्यांना कधीही विसर पडला नाही. कोकणचा प्रदेश संरक्षणात्मक पवित्रा घेण्यास विशेषकरून अनुकूल होता. किल्ल्यांमध्ये सुरक्षित तळ स्थापन करून त्या ठिकाणी आपल्या सेनेची त्यांनी जुळवाजुळव केली. छोट्या मोठ्या हल्ल्यांसाठी वेगवेगळ्या किल्ल्यांमधून तुकड्या बाहेर पडत आणि काम संपल्यावर तळांवर परत येत. त्यामुळे बस्तान बसेपर्यंत देशाच्या सखल प्रदेशात त्यांनी कधीच मोहिमा काढल्या नाहीत. अफझलखानाच्या वधानंतर वास्तविक सखल प्रदेशात दूरवर धाडी घालण्याइतपत बळ त्यांच्यापाशी जमा झाले होते. परंतु १६७४पर्यंत त्यांनी अशा तुरळकच कारवाया केल्या. त्यानंतरच त्यांनी कर्नाटक मोहीम हाती घेतली आणि तिला भरपूर यश लाभले. दुर्दैवाने त्यानंतर काही वर्षांतच त्यांची जीवनयात्रा संपली. त्यांना आणखी आयुष्य लाभले असते, तर त्यांनी स्वराज्याचा विस्तार उत्तरेच्या दिशेनेही साधला असता.

कोणत्याही प्रदेशाचे संरक्षण करायचे असले, तर त्या भागातील जमिनीच्या लष्करी विलेषणानंतर सेनापती त्यातील सर्वांत महत्त्वाच्या अशा घटकाची निवड करतो की, जो त्याच्या हातातून जाता कामा नये. त्याला ‘व्हायटल ग्राउंड’ किंवा ‘ग्राउंड ऑफ टॅक्टिकल इंपॉर्टन्स’ अशी संज्ञा आहे. किंबहुना जर शत्रू ते व्हायटल ग्राउंड काबीज करण्यात यशस्वी ठरला, तर तो प्रदेश हातात ठेवणे अशक्य होऊन बसते. शिवाजीराजांची स्वराज्याच्या संरक्षणाची संकल्पना किल्ल्यांवर आधारित होती. त्यांच्या मते महाराष्ट्रातील ठिकठिकाणचे किल्ले हे त्या त्या भागातील ‘व्हायटल ग्राउंड’ किंवा ‘ग्राउंड ऑफ टॅक्टिकल इंपॉर्टन्स’ होते. हा शिवाजीराजांच्या संरक्षण संकल्पनेचा केंद्रबिंदू होता. महाराष्ट्राच्या डोंगराळ प्रदेशाच्या वेगवेगळ्या टापूंच्या संरक्षणासाठी त्या त्या जागेतील किल्ले हे नाभिस्थान आहेत, यावर त्यांचा भक्कम विश्वास होता.

शिवाजीराजांनी किल्ल्यांचे एक जाळेच महाराष्ट्रभर निर्माण केले. त्यांनी एकही खिंड विनासंरक्षित सोडली नव्हती, एकही किल्ला मोर्चेबंदीबिना ठेवला नव्हता. प्रत्येक तालुक्यातील एक किल्ला त्यांच्या हातात होता, तो त्या तालुक्याच्या संरक्षणाचा मध्यबिंदू असे आणि निकटच्या किल्ल्याशी संलग्न असे. किल्ल्याची दुर्गमता आणि प्रदीर्घ वेढ्याविरुद्ध किल्ला तटवून ठेवण्याची क्षमता या दोन तत्त्वांवर किल्ल्याच्या संरक्षणाची योजना आधारित असे. महाराष्ट्रातील किल्ल्यांशी शिवाजीराजांचे घनिष्ठ नाते होते. मग ते किल्ले त्यांनी साम, दाम, दंड, भेद या नीती वापरून हस्तगत केले. काही किल्लेदारांना लाच देऊन, काही धूर्त युक्तीकरवी तर काही करारी हल्ले चढवून त्यांनी मिळवले. त्याशिवाय काही मोक्याचे किल्ले त्यांनी स्वत: बांधून घेतले. शिवरायांनी मिळवलेला बराच पैसा या किल्ल्यांची बांधणी आणि

सांभाळ करण्यात खर्च झाला.

शिवाजीराजांनी स्वराज्याच्या संरक्षणातील किल्ल्यांचे सामरिक महत्त्व ओळखून काही किल्ल्यांना अधिक बळकट केले आणि काही नव्याने बांधले. किल्ल्यांच्या उभारलेल्या जाळ्याच्या प्रामुख्याने तीन फंक्ती किंवा साखळ्या होत्या. त्या त्यांच्या संरक्षण फळ्या होत्या. त्यांच्याकरवी ते स्वराज्याच्या प्रदेशाचे मोगल, सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्यासारख्या बलवत्तर शत्रूंपासून संरक्षण करू शकले.

यांतील पहिली संरक्षण फळी आग्नेय दिशेतील अशेरी किल्ल्यापासून विशाळगडापर्यंत होती. (नकाशा क्र. १० पाहा.) ती पुरंदर किल्ल्यामार्गे जात होती. या किल्ल्यांची साखळी स्वराज्याच्या संरक्षणाच्या केंद्रस्थानी होती. या फळीला अधिक भक्कम करण्यासाठी त्या मांडणीच्या मार्गात शिवाजीराजांनी अनेक नवीन किल्ले बांधले.

त्यांची दुसरी संरक्षण फळी नव्याने बांधलेले सिंधुदुर्ग व कानसासारखे किल्ले आणि विजयदुर्ग व सुवर्णदुर्गसारखे जुने, परंतु डागडुजी करून अधिक भक्कम केलेले किल्ले यांना जोडत होती. या फळीकरवी प्रामुख्याने दोन उद्दिष्टे साधण्याचा त्यांचा हेतू होता. तिच्यामुळे स्वराज्याचे सिद्दी, पोर्तुगीज आणि ब्रिटिश या सागरिक शक्तींपासून संरक्षण होत होते आणि दुसरे, जमिनीवरील शत्रूंचा धोका हाताबाहेर गेला, तर समुद्राच्या बाजूला सुटून जाण्याचा मार्ग उपलब्ध होऊ

शकला असता. यांचा उपयोग पुढे शिवाजीराजांना झालाच, परंतु अठराव्या शतकात जेव्हा मोगलांनी स्वराज्याची नाकेबंदी केली, तेव्हा राजाराम महाराजांना मोगलांशी लढणाऱ्या आपल्या मराठा सरदारांबरोबर समुद्रमार्गे संपर्क साधण्यासाठी झाला.

राज्याभिषेकानंतर शिवाजीराजांनी विशाळगडापासून कर्नाटकातील जिंजी किल्ल्यापर्यंत पोचणारी तिसरी संरक्षणफळी उभारण्याचे काम हाती घेतले. कर्नाटक मोहिमेत जिंकलेल्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी जिंजी, तंजावर आणि वेल्लोरसारखे किल्ले अधिक बळकट केले आणि काही नव्यानेही बांधले. या तिसऱ्या संरक्षण फळीमागे रायगड ते जिंजीपर्यंत सुसूत्र आणि वेगाची लष्करी मोहीम हाती घेण्याचा उद्देश होता. तो साध्य झालाच, पण त्या फळीच्या साहाय्याने त्यांचे पुत्र राजाराम महाराज विशाळगडाहून जिंजीपर्यंत सुरक्षितपणे जाऊ शकले आणि तिथून मोगलांविरुद्ध स्वराज्यरक्षणाची सूत्रे हलवू शकले.[५३]


शिवाजीराजांचे डावपेच

डावपेच म्हणजे आपल्या सैन्याची युद्धक्षेत्रात चातुर्यपूर्ण मांडणी, त्याची डोकेबाज हालचाल आणि लढाईत त्याचे परिणामकारक नियोजन. शिवाजीराजे शत्रूच्या सैन्यावर शक्य होईल तोपर्यंत हल्ला चढवत नसत, त्याऐवजी शत्रूला अनपेक्षितपणे आणि मोजक्या संख्येकरवी वारंवार टोचत राहून त्याला जेरीस आणणे हा त्यांच्या डावपेचांमागील हेतू असे. त्यांचे सैन्य किल्ल्याच्या तळावर सदैव सज्ज असे आणि योग्य संधी दृष्टिपथात येताच निवडक तुकड्या ते विशिष्ट कामासाठी पाठवत आणि विजेच्या वेगाने ते काम पुरे करून ती तुकडी शत्रूला प्रतिकार करण्यासाठी वा पाठलागासाठी पुरेसा वेळ न देता आणि कोणत्याही मोठ्या

झटापटीत न सापडता तितक्याच वेगाने ती आपल्या सुरक्षा वलयात परत येत असे. शत्रूच्या हालचाल करणाऱ्या मोठ्या तुकड्यांच्या पकडीबाहेर राहून, त्यांच्या मार्गावर सापळा लावून त्यांच्यावर अनपेक्षितपणे झडप मारणे, त्यांची रसद तोडणे, आपल्या तुकडीतील काही भागाने माघार घेण्याची बतावणी करून पाठलाग करणाऱ्या गाफील शत्रूवर उरलेल्या तुकडीने प्रतिहल्ला चढवणे, अंधाराचा फायदा घेऊन शत्रूच्या प्रमुख सरदारांवर प्राणघाती हल्ला करणे या व अशा नवनव्या क्लृप्त्या शोधून काढून ते शत्रूचे नीतिधैर्य खच्ची करत असत. शिवाजीराजांची ही रणनीती गनिमी कावा म्हणून प्रसिद्धीस आली.[५४]

नकाशा क्र. १०

तीन संरक्षण रेषा



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

परंतु गनिमी कावा या डावपेचाचे जनक शिवाजीराजे होते, असे म्हणणे चुकीचे ठरेल. आर्य चाणक्य लिखित 'कौटिलीय अर्थशास्त्रा'चा १३१वा अध्याय 'युद्धाचे किंवा गनिमी युद्धाचे प्रकार' या विषयावर आहे. त्यात गनिमी युद्धाच्या काही सूत्रांचे विवरण केले आहे. 'आपले सैन्य शत्रुसैन्याहून संख्येत व गुणांनी वरिष्ठ असेल, आपण कारस्थान करून शत्रुसैन्यात फितुरी केली असेल, युद्धाला योग्य काल असेल व युद्धाला अनुकूल असे क्षेत्र असेल, तर शत्रूला उघड उघड सामना द्यावा. उलट परिस्थितीत गनिमी काव्याने लढावे.'५५ गनिमी कावा हा निर्बलाने बलवान शत्रूविरुद्ध लढा देण्याचा एकमेव मार्ग आहे, हे चाणक्याला अधोरेखित करावयाचे आहे, हे यावरून स्पष्ट होते. मोगल किंवा दक्षिणेतील सुलतानशाही या बलिष्ठ शक्तींविरुद्ध संघर्ष करण्यासाठी शिवाजीराजांनी हा डावपेच निवडणे स्वाभाविक होते.

'शत्रूचे सैन्य संकटात असेल किंवा नदीचा उतार ओलांडत असेल, त्यावेळी त्यावर हल्ला करावा. अथवा आपल्याला अनुकूल असे युद्धक्षेत्र पाहून तेथून प्रतिकूल क्षेत्रात असलेल्या शत्रूवर मारा करावा. हल्ला करणाऱ्याने आपला पराजय झाला, असे भासवून शत्रू पाठलाग करून येऊ लागला म्हणजे मुख्य सैन्यापासून वेगळ्या झालेल्या त्याच्या सैन्यावर आपल्या संघटित सैन्याने परत वळून मारा करावा. शत्रूने पळ काढला किंवा तोंड फिरवले म्हणजे घोडेस्वारांनी पिछाडीवर मारा करावा...' अशी अनेक सूत्रे चाणक्याने शब्दबद्ध केली आहेत. शिवाजी महाराज सुरतेहून परत येत असताना अगदी हीच चाल त्यांचा पाठलाग करणाऱ्या शत्रूविरुद्ध त्यांनी केली होती. चाणक्याचे भाष्य वाचताना त्याच्या आणि राजांच्या संकल्पनांमध्ये किती साम्य आहे, याची प्रकर्षाने प्रचीती येते.

'शिवदिग्विजय' नावाच्या शिवोत्तरकालीन बखरीत यातील एका व्यूहरचनेचा ऊहापोह करण्यात आला आहे. 'कृव्' (लांडगा) नावाच्या या तंत्रात सैन्याला चार किंवा पाच छोट्या तुकड्यांत वाटण्यात येते. त्या एकमेकांच्या संपर्कात राहून शत्रूला त्यांचा मागमूस न लागू देता त्याच्या बरोबरीने वाटचाल करत राहतात. जर शत्रूला त्यापैकी एकाची चाहूल लागली आणि त्याने त्या तुकडीवर हल्ला केला, तर घाबरून आपण पलायन करीत आहोत, असे ती भासवते. जेव्हा शत्रूच्या काही तुकड्या तिचा पाठलाग सुरू करतात, तेव्हा सरस गतिक्षमतेमुळे ती शत्रूच्या तावडीतून सुटेल, याची खातरी असते. शत्रूच्या हल्ला करणाऱ्या तुकड्या थोड्या पुढे गेल्या की, मराठा सैन्याचा उर्वरित भाग शत्रूच्या मागे राहिलेल्या सैन्यावर अचानक हल्ला चढवतो आणि अशा प्रकारे मोठ्या शत्रुसेनेचा त्यांच्या संख्येच्या तुलनेत मोजक्या मराठा तुकडीकडून पराभव होतो.५६

शिवाजीराजांनी सैनिकी डावपेचांत क्रांती घडवून आणली, असे विधान करणे चूक ठरणार नाही. गनिमी कावा ही त्यांची लष्करी शास्त्राला अप्रतिम देणगी आहे. परंतु त्यांच्या गनिमी काव्याला 'गुरीला वॉरफेअर' म्हणणे योग्य नाही. गुरीलांना ना संघटित राज्याचा आधार असतो, ना प्रजेच्या कल्याणासाठी ते कार्यरत असतात, ना त्यांच्यामागे मुलकी व्यवस्थेचा पाठिंबा असतो, ना जमीनमहसूल वा करभार गोळा करण्याचे आणि त्याचा राज्यप्रशासनासाठी विनियोग करण्याचे त्यांचे राजकीय आणि सामाजिक उद्दिष्ट असते. शिवाजीराजे स्वायत्त राज्याचे नरेश आणि संघटित सरकारचे प्रमुख होते. त्या राज्याची संयमित राज्यपद्धती होती,

जनतेकडून कर गोळा केले जात आणि प्रजेच्या कल्याणासाठी ते खर्च केले जात. राज्याचे शिस्तबद्ध लष्कर अस्तित्वात होते. भूमिगत गोरिलांच्या मागे अशी संघटित शक्ती नसते. त्यामुळे केवळ गनिमी काव्याने त्यांनी शत्रूशी संघर्ष केला म्हणून त्यांना गुरीला आणि त्यांच्या युद्धपद्धतीला गुरीला वॉरफेअर म्हणणे चूक आहे.

शिवाजीराजे एकही पारंपरिक लढाई लढले नाहीत किंबहुना लढाई टाळून शत्रूचा पराभव साधणे हा त्यांच्या सेनापतित्वाचा सर्वांत देदीप्यमान पैलू होता. या बाबतीत सुप्रसिद्ध चिनी तत्त्वज्ञ सुन्त्झूचे ते कट्टर अनुयायी म्हटले पाहिजेत. मोठ्या लढाया न लढताही त्यांची गणना जगातील अव्वल रणधुरंधरांमध्ये होते. भारतातील त्यावेळच्या पोर्तुगीज व्हाइसरॉयने पोर्तुगालच्या राजाला २० सप्टेंबर १६६७ रोजी पाठवलेल्या पत्रात लिहिले होते, ‘कावेबाजी, शौर्य, चापल्य आणि लष्करी चाणाक्षपणा यामध्ये शिवाजीची तुलना सीझर आणि अलेक्झांडर यांच्याशी करणे योग्य ठरेल.’५७

गनिमी कावा हा डावपेच कौटिल्यापासून चालत आला असेना का, परंतु त्याचा अत्यंत परिणामकारक वापर शिवाजीराजांनी केला. आक्रमक चाल, संसाधनांचा मितव्यय, विस्मय व शाठ्य, सरस गतिमानशीलता आणि मनोधैर्याचा उच्चांक या पाच युद्धतत्त्वांवर त्यांचे गनिमी डावपेच आधारित असत. स्वत:चा जीव पुन:पुन्हा संकटात घालून अत्यंत जोखीमपूर्ण कारवायांचे नेतृत्व त्यांनी केले. गनिमी काव्याला ‘न भूतो न भविष्यति’ अशी झळाळी त्यांनी प्राप्त करून दिली. त्यासाठी त्यांचे लष्करी इतिहासातील स्थान अजरामर आहे.

संदर्भसूची

१. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी सिस्टिम ऑफ द मराठाज; के. पी. बागची कंपनी, पान १; उद्धृत थॉमस वॉल्टर्स; ऑन युआन च्वांग, खंड २; पान २३९.

२. ग. भा. मेहेंदळे; शिवाजी हिज लाइफ अँड टाइम्स; परममित्र प्रकाशन; पान ३८६.

३. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी ....; पान ८; उद्धृत इलीअट अँड डॉसन, हिस्टरी ऑफ इंडिया, खंड २, पान २८७.

४. पुर्वोक्त; पान ६३; उद्धृत सेन, सिव छत्रपती, पान १३६.

५. पुर्वोक्त, पान ६४, उद्धृत फॅक्टरी रेकॉर्डस, सुरत; खंड १०५, पान ७२.

६. पुर्वोक्त, पान ६४; उद्धृत फॅक्टरी रेकॉर्डस, सुरत; खंड ८८, पान ३२.

७. पुर्वोक्त, पान ६४; उद्धृत फॅक्टरी रेकॉर्डस, सुरत; खंड १०७, पान १७७.

८. पुर्वोक्त, पान ७४; उद्धृत मनूची, स्टोरिया दो मोगोर, खंड २, पान ४५९.

९. मेहेंदळे; शिवाजी.......; पान ३८७; उद्धृत सेन, सिव छत्रपती, पान ७६-७८.

१०. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी ....; पान १०.

११. पुर्वोक्त; पान १०; उद्धृत जे गार्सन डा कुन्हा; नोट्स ऑन हिस्टरी अँड अँटिक्विटीज ऑफ चौल अँड बसीन, पान ६९.

१२. पुर्वोक्त; पान १३; उद्धृत सभासद बखर पान २५.
१३. पुर्वोक्त; पान १३.
१४. पुर्वोक्त; पान १५; उद्धृत स्कॉट, हिस्टरी ऑफ डेक्कन, पान २८.
१५. पुर्वोक्त; पान १८, उद्धृत इलीअट अँड डॉसन, हिस्टरी ऑफ इंडिया, खंड ४, पान २५४.
१६. पुर्वोक्त: पान १०.
१७. पुर्वोक्त; पान १५; उद्धृत डच रेकॉर्ड, सुरत खंड २७.
१८. पुर्वोक्त; पान १५.
१९. पुर्वोक्त; पान १६, उद्धृत जे फ्रायर, अ न्यू अकौंट ऑफ ईस्ट इंडिया अँड पर्शिया, पान १७५.
२०. पुर्वोक्त; पान १६; उद्धृत डॉ जॉन करेरी, अ व्हॉयेज राउंड द वर्ल्ड, खंड ४, पान २१२.
२१. पुर्वोक्त; पान १७; उद्धृत राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १५, पान २७२.
२२. गोविंद पानसरे; शिवाजी कोण होता? - लोकवाङ्मय गृह; पान २४.
२३. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी.........; पान२३.
२४. पुर्वोक्त; पान १९; उद्धृत सभासद बखर; पान ६६.
२५. पुर्वोक्त; पान २०; उद्धृत ऑर्म, हिस्टॉरिकल फ्रॅग्मेंट, पान १७४; कलकत्ता रिव्ह्यू फेब्रुवारी, १९२८.
२६. गो.स. सरदेसाई; मराठी रियासत, खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान ३७०.
२७. पुर्वोक्त; पान ३७३; उद्धृत ग्रोज. व्हॉयेज टु द ईस्ट इंडीज, पान १३७.
२८. सुरेंद्रनाथ सेन, द मिलिटरी ....; पान ८०; ग्रोज, अ व्हॉयेज टु द ईस्ट इंडीज, पान १३७.
२९. ग. भा. मेहेंदळे; शिवाजी हिज ....; पान ३९५; उद्धृत शिवापूर क्रॉनिकल, पान ५१.
३०. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी.........; पान ८३; उद्धृत मावजी पारसनीस, सनद लेटर्स, पान १३०- १३२.
३१. जेम्स ग्रांट डफ; हिस्टरी ऑफ द मराठाज १; करण पब्लिशर्स; पान १६९.
३२. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी.......पान ८६; उद्धृत फॅक्टरी रेकॉर्ड्स, सुरत; खंड ८८, पान ४८.
३३. पुर्वोक्त; पान ९०; उद्धृत माकिंटोश, अकौंट ऑफ द कंडिशन ऑफ रामोशीज; पान ९६.
३४. गो स सरदेसाई; मराठी.........; पान ३७१.

३५. पुर्वोक्त; पान ३७२; उद्धृत जेम्स ग्रांट डफ, हिस्टरी......; पान १६९.

३६. दि वि गोखले; युद्धमीमांसा, मॅजेस्टिक प्रकाशन; पान ५१४.

३७. सुरेंद्रनाथ सेन, द मिलिटरी........; पान ९७ उद्धृत फॅक्टरी रेकॉड्‌र्स, सुरत; खंड १०५, पान २०-२१.

३८. पुर्वोक्त; पान ९६-९७.

३९. ग.भा. मेहेंदळे; शिवाजी ....; पान ३९७. उद्धृत एफ बी एस २५८.

४०. पुर्वोक्त; पान ३९७; उद्धृत, सभासद बखर, पान ९२.

४१. गोविंद पानसरे; शिवाजी .....; पान ५.

४२. ग. भा मेहेंदळे; शिवाजी ....; पान १५.

४३. पुर्वोक्त; पान २९-३९.

४४. पुर्वोक्त; पान ६१.

४५. थॉमस क्लीरी; सुन्त्झूच्या आर्ट ऑफ वॉरचे भाषांतर; शाम्भाला, पान VII.

४६. उपरोक्त; पान ५/६.

४७. उपरोक्त; पान २१.

४८. उपरोक्त; पान २२.

४९. उपरोक्त; पान १२६.

५०. शशिकांत पित्रे; या सम हा; राजहंस प्रकाशन; पान ३११. उद्धृत सर बेसिल लिडेल हार्ट; स्ट्रॅटेजी ऑफ इंडायरेक्ट ॲप्रोच; फेबर अँड फेबर; पान ३४८-४९.

५१. ग. भा, मेहेंदळे; शिवाजी हिज ....; पान ६२७.

५२. पुर्वोक्त; पान ६२७.

५३. पी. एन. देशपांडे; शिवाजी अँड फॅसेटस् ऑफ मराठा कल्चर, संपादक सरयू जोशी; मार्ग पब्लिकेशन्स; पान ३९.

५४. ग. भा. मेहेंदळे; शिवाजी हिज ....; पान ६३२.

५५. ब. रा. हिवरगावकर, कौटिलीय अर्थशास्त्र; वरदा बुक्स; पान ४२८.

५६. ग. भा. मेहेंदळे; शिवाजी...........; पान ६३३; उद्धृत शिवदिग्विजय; पान १७९.

५७. उपरोक्त; पान ६३४.



४.
आदिलशाहीशी संघर्ष



जावळीची दूरगामी लढाई

मावळ खोऱ्यावर नियंत्रण

शिवरायांनी मावळ खोरे आपल्या नियंत्रणाखाली आणण्यास आरंभ केल्यानंतर बहुसंख्य सरदार स्वखुशीने त्यांच्या बाजूला आले. राजांच्या जहागिरीतील हिरडस मावळाच्या लगोलग रोहिड खोरे होते. त्यातील कारी तरफेचे देशमुख होते जेधे आणि उत्रवळी तरफेचे देशमुख खोपडे होते. उत्रवळी तरफ राजांच्या जहागिरीत पडत नसली, तरी त्या खोऱ्यातला रोहिडा किल्ला मात्र स्वराज्यासाठी महत्त्वाचा होता. या किल्ल्याचा किल्लेदार आदिलशाहीकडून नेमला जाई. उत्रवळीच्या देशमुखीबाबत केदारजी आणि खंडोजी यांच्यामध्ये भांडण होते. खंडोजी केदारजीच्या आईला मारून हिरडस मावळात पळून आला होता. किल्ल्याचे महत्त्व लक्षात घेता त्याच्याकडे दुर्लक्ष करून शिवरायांनी खंडोजीची बाजू घेतली. मे १६५४मध्ये पुरंदर किल्ल्याचा किल्लेदार महादजी नीळकंठराव मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र निळो नीलकंठ आणि त्याच्या तीन भावांकडून तो किल्ला हाती घेतल्याच्या प्रसंगाचे वर्णन यापूर्वी आले आहेच. थोडक्यात महत्त्वाचे म्हणजे किल्ले हाती घेण्याचा आराखडा बनवून राजांनी त्याची अंमलबजावणी चालू केली होती.

त्यांच्या विरोधकांपैकी दोन प्रमुख सरदार म्हणजे जावळीचे मोरे आणि सुप्याचे मोहिते. त्या दोघांच्या कारस्थानांना न जुमानता दोघांचे लवकरात लवकर पारिपत्य केले नाही, तर ते कायमचे दुखणे होऊन बसेल, हे राजांना तत्काळ समजले.

सुप्याचा संभाजी मोहिते हा वास्तविक त्यांच्या सावत्र आईचा भाऊ म्हणजे सावत्र मामा. सुपे शहाजीराजांच्या मोकासात पडत होते. त्यांनी आपल्या दुसऱ्या पत्नी तुकाबाई यांचा भाऊ संभाजी मोहिते याची सरहवालदार म्हणून तिथे नेमणूक केली होती, परंतु ती जणू काय स्वत:चीच जहागीर असल्याची संभाजीची चुकीची धारणा झाली होती. त्याच्याजवळ तीनशेची पागा होती. शिवाजीराजांनी सत्ता हातात घेतल्यावर त्यांना अदब अदा करण्यासाठी एकदाही येण्याचे संभाजीने सौजन्य दाखवले नव्हते. आपल्या सावत्र भाच्याबद्दल त्याच्या मनातला विनाकारण डूख स्पष्ट कळत होता. शिवाजीराजांनी त्याला स्वराज्यात सामील होण्याबद्दल बोलणी चालू केली, पण बऱ्या बोलाने तो बधेना. आपला हा सावत्र भाचा आपली काडीसुद्धा वाकडी करू शकणार नाही, असा त्याचा तर्व होता. अखेरीस शस्त्रप्रहार करण्याविना

कोणताच पर्याय उरला नाही.

शिवरायांनी स्वत:बरोबर मावळ्यांची तुकडी घेऊन २४ सप्टेंबर १६५६च्या मध्यरात्री सुप्यावर छापा घातला. संभाजीमामाला वैद करण्यात आले. इतक्या वेगाने झालेल्या या कारवाईचा संभाजीला मागमूसही लागला नव्हता. त्याच्या सर्व लोकांनाही वैद करून संभाजीच्या पागेचा त्यांनी ताबा घेतला, त्याचा मुलूख राजांनी आपल्या मालकीखाली आणला आणि खजिन्यात सापडलेले द्रव्य व जडजवाहीर जप्त केले. त्यानंतर संभाजीची रवानगी त्यांनी शहाजींकडे कर्नाटकात केली.


प्रथम आपल्या जहागिरीचे एकवटीकरण करून नंतरच बाहेरच्या मुलखाकडे वळायचे, असा विचार शिवरायांनी केला होता. मित्र असो वा शत्रू असो, ऋणानुबंधी असो वा सगासोयरा असो; साम, दाम, दंड वा भेद वापरून सर्वांना स्वराज्याच्या झेंड्याखाली आणायचे, हा त्यांचा निर्धार होता. संभाजी मोहिते त्या प्रक्रियेतील पहिले सावज ठरला, किंबहुना तो प्रसंग त्याने स्वत:वर ओढवून घेतला होता. पहिलाच वार फत्ते झाल्यावर राजे त्यानंतर अधिक कणखर लक्ष्याकडे वळले, ते होते जावळीच्या चंद्रराव मोरेचे.

चंद्रराव मोरेचा बीमोड

मावळच्या प्रांतामधील जावळी ऊर्फ जोर खोरे मोऱ्यांच्या वचकाखाली होते. (नकाशा क्र. ११ पाहा.) दुर्गम स्थानी असल्याने त्यावरील आदिलशाहीचा अंमल काहीसा ढिला होता. मोऱ्यांची विस्तृत जहागीर जुन्या काळापासून चालत आली होती. मोरे घराणे मोठे वजनदार होते. शिवाजीराजे मावळात आपला प्रभाव वाढवण्याच्या प्रयत्नात असल्याने भांड्यास भांडे वाजणे स्वाभाविक होते. वास्तविक 'चंद्रराव' हा त्या घराण्याचा किताब होता. तेथील देशमुख दौलतराव मोरे १६४८मध्ये निपुत्रिक मरण पावला. त्याच्या बायकोने शिवथरकर मोऱ्यांच्या घराण्यातला येसाजी याला दत्तक घेऊन त्याचे यशवंतराव असे नामकरण केले. दत्तक घेण्यात आणि कारभार चालवण्यात तिने शिवाजीराजांची मदत घेतली. पुढच्याच वर्षी आदिलशहाने आपला सरदार अफझलखान याची वाईवर नेमणूक केल्यावर त्याचे जावळीकडे लक्ष गेले. यशवंतरावाने अफझलखानाशी संधान बांधले.

नकाशा क्र. ११

जावळीचा परिसर इ.स.१६५५



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

मोऱ्यांचे नातलग सिलीमकर देशमुख हैबतराव, त्याचा पुत्र बाजी आणि बाळाजी नाईक हे राजांना मिळाले. सिलीमकर आणि कान्होजी जेधे वगैरे देशमुखांना राजांपासून फोडण्याचा प्रयत्न चंद्रराव मोरे करू लागला. रायगडचा किल्ला मोऱ्यांच्या ताब्यात होता आणि तो स्वराज्यात सामील करण्याची राजांची इच्छा होती. वास्तविक येसाजीचे 'चंद्ररावा'त रूपांतर करण्यास शिवाजीराजे कारणीभूत होते, परंतु जायदाद हातात आल्यावर यशवंतराव उलटला. मग राजांनी जावळी आणि रायरी किल्ला काबीज करण्याचा निर्धार केला.

राजांनी जावळी आणि रायरी कसे घेतले, याची दोन बखरींत वेगवेगळी विवरणे आहेत. पहिले, शिवाजीराजांनी चंद्ररावाशी केलेल्या विश्वासघातावर आधारित आहे. उलट, दुसरे राजांनी चंद्ररावावर विजय मिळवल्यावर त्याने केलेल्या विश्वासघातावर आधारित आहे. थोडी पुनरावृत्ती स्वीकारून दोन्ही विवरणे जाणून घेणे उपयुक्त होईल.

पहिल्या विवरणानुसार चंद्रराव सामोपचाराने बधत नाही, हे पाहून १६५५मध्ये राजांनी गुंजण मावळचे सिलीमकर, हिरडस मावळचे बाजी बांदल आणि कारीचे कान्होजी जेधे यांच्यासह संभाजी कावजीला जावळीवर हल्ला करण्यासाठी पाठवले; परंतु मोऱ्याने तो हल्ला परतवला. त्यानंतर रघुनाथ बल्लाळ कोरडे याच्या हाताखाली पाठवलेल्या सैन्याने २७ जानेवारी १६५६ला जावळी काबीज केली. राजे स्वत: जावळीस गेले आणि तिथे त्यांनी दोन महिने मुक्काम केला.

त्यापश्चात यशवंतराव रायरीवर पळून गेला. आता तो घेणे अपरिहार्य झाले. राजांनी रायरीवर फौज रवाना केली. चंद्ररावाने तीन महिने किल्ला लढवला, परंतु त्याच्यापुढे इतर कोणताच पर्याय न उरल्याने त्याचा भाचा सिलीमकर हैबतराव याच्या मध्यस्थीने राजांशी बोलणे करण्यासाठी चंद्रराव राजी झाला. यशवंतराव आणि त्याचे दोन पुत्र वृष्णाजी आणि बाजी हे गडाखाली आल्यावर चंद्ररावाला ठार करण्यात आले आणि दोन पुत्रांना पुण्यास वैदेत ठेवण्यात आले. त्यांच्या बायकामुलांसाठी नीट व्यवस्था लावून देण्यात आली. पुढे वैदेत असताना बाजी आणि वृष्णाजी यांनी आदिलशाहीबरोबर फितुरीचे प्रयत्न केल्यामुळे त्यांनाही संपवण्यात आले. अशा प्रकारे मोरे निर्वंश झाले. स्वराज्याशी प्रतारणा करण्याची ती शिक्षा होती.१ सर यदुनाथ सरकार यांनी दिलेल्या या विवरणानुसार शिवाजीराजांनी चंद्ररावाला चर्चेसाठी बोलावून त्याला बेसावध असताना ठार केले.

दुसरे विवरण 'मोरे बखरी'मध्ये आहे. त्यात या प्रसंगाची सविस्तर, परंतु बरीचशी वेगळी नोंद सापडते. राजे आणि चंद्ररावादरम्यान झालेला स्वारस्यपूर्ण पत्रव्यवहार 'मोऱ्यांच्या बखरीत' नमूद केला आहे.

चंद्ररावास बऱ्या बोलाने स्वराज्यात सामील होऊन आपली जहागीर चालवत राहण्याबद्दल शिवाजीराजांनी मध्यस्थामार्फत निरोप पाठवले, परंतु चंद्रराव आपल्याला आदिलशाहीमधील राजा समजत होता आणि कोणाचे मांडलिकत्व पत्करण्याचा त्याचा तसूभरही विचार नव्हता.

या सामोपचाराचा उपयोग न झाल्यावर राजांनी चंद्ररावास स्पष्ट शब्दांत सुनावले, 'तुम्ही मुस्तफद (कायम) राजे म्हणवता. राजे आम्ही. आम्हा श्रीशंभूने राज्य दिले आहे. तर तुम्ही राजे न म्हणावे. आमचे नौकर होऊन आपला मुलुख खाऊन, हमराहा चाकरी करावी. नाहीतर

बदफैल करून फंद कराल, तर जावळी मारून तुम्हांस वैद करून ठेवू.'

त्यावर चंद्ररावाचे उर्मट उत्तर आले, 'तुम्ही काल राजे जाहला. तुम्हास राज्य कोणें दिधले? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावर कोण मानितो? येतां जावळी, जातां गोवली. पुढे एक मनुष्य जिवंत राहणार नाही. तुम्हांमध्ये पुरुषार्थ असला, तर उदईक याल तर आजच यावे. आम्हीं कोकणचे राजे असून आमचा राजा महाबळेश्वर, त्याचे वृपेने राज्य करतो. आम्हां श्रीचे वृपेने पादशहाने राजे किताब, मोरचेल, सिंहासन मेहेरबान होऊन दिधले. आम्ही दाईमदारी दरपिढी राज्य जावळीचे करितो. तुम्ही आम्हासी खटखट कराल तर अपाय होईल. यश न घेता अपयशास पात्र होऊन जाल.'

चंद्ररावाने सीमा ओलांडली होती. शिवाजीराजे संतप्त झाले. त्यांनी उत्तर पाठवले, 'जावळी खाली करून, राजे न म्हणोन, मोरचेल दूर करून, हात रुमाले बांधून, भेटीस येऊन, हुजूरची काही चाकरी करणे. इतकियावर बदफैली केलीय, मारले जाल.'

चंद्रराव मागे हटत नव्हता. त्याने उत्तर धाडले, ' दारूगोळी महझूद आहे. काही बेजबाबास खुटे घालून लिहिले, ते कासियास ल्याहाविले? थोर समर्थ असो.'२ (माझ्याकडेही दारूगोळा आहे. बेजबाबदारीने लिहून असा दोष का दिलात?)

चंद्ररावाने राजांना 'पुरुषार्थ असेल, तर उद्या का, आजच येण्याचे आव्हान' दिले होते. जावळीत सैन्यासह याल आणि एकटे परत जाल, अशी धमकीही दिली होती. त्याला धडा शिकवणे आवश्याक होते. 'मोरे बखरी'तील पुढे घडलेली घटना साध्या शब्दांत अशी :

'चंद्ररायांचा आणि शिवाजीराजांचा थोर आकस पडला. मग राजांनी सुरराव काकडे दोन हजार मावळ्यांच्या बरोबर जावळीवर रवाना केले. तिथे महिनाभर झुंज झाली. महिन्यानंतर चंद्रराव मोरे आपली शिबंदी घेऊन रायगडावर गेले आणि तिथे मोर्चेबंदी केली. मग शिवाजीराजे चढाई करून गेले. चंद्ररावांनी रायरी तीन महिने लढवला.

मग दोघांच्यात तडजोड झाली. शिवाजीराजांनी जावळीत ठाणे बसवले. रायगडही राजांनी सर केला. चंद्रराव मोऱ्याचा राजांनी सन्मान केला. त्यांना घोडा आणि मानाची वस्त्रे दिली. शिवाजीराजांचा मनोदय होता की, पुढे त्यांना जावळी परत देऊन आपले मांडलिक बनवावे. परंतु मोरे याने व्यंकोजी राजे घोरपडे यांच्याशी संपर्व साधून राजांचा पाडाव करण्याची खटपट चालवली असल्याचे कागदपत्र त्यांना मिळाले. मग त्यांनी चाकण येथे त्याला ठार मारले.'३

राजांनी चंद्ररावास गडाच्या पायथ्याला तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी बोलावून त्याला ठार केले, हे पहिल्या विवरणातील विधान मात्र अविश्वसनीय वाटते.

राजांनी जावळी काबीज करण्यासाठी अत्यंत साजेशी व सुरक्षित वेळ निवडली होती. शहाजी आणि अफझलखान कर्नाटकाकडे गेले होते. आदिलशहा गंभीर आजारी होता, त्यामुळे चंद्ररावाला विजापूरहून कोणतीही मदत मिळू शकणार नव्हती. हे लक्षात घेऊन चंद्ररावाची फौज जरी राजांच्या फोजेपेक्षा मोठी होती, तरी तिच्यावर अकस्मात हल्ला करून तिला लोळवायचे राजांनी ठरवले. त्यांनी रघुनाथ बल्लाळ सबनीस, संभाजी कावजी कोंढाळकर, सूर्यराव काकडे, कान्होजी नाईक जेधे, बांदल देशमुख, शिळीमकर देशमुख यांना स्वत:बरोबर न्यायचे ठरवले. जावळीची वाट अवघड होती. त्यात कळकीच्या दाट जाळ्या होत्या.

महाबळेश्वरचा निसरणीचा घाट उतरून त्यांनी जावळीस वेढा घातला.

चंद्ररावाच्या सैन्याने जावळीच्या जोहोरबेट, चतुर्बेट, शिवथर खोरे आणि खुद्द जावळी या चार ठिकाणी मोर्चेबंदी केली होती. राजांनी चारही ठिकाणी एकाच वेळी हल्ले चढवण्याचे ठरवले. त्यानुसार संभाजी कावजीने चतुर्बेटावर, सबनीसांनी जोहोर खोऱ्यावर आणि बाकीच्यांनी जावळीवर हल्ला चढवला.४ खासा चंद्रराव आणि मुरारबाजी देशपांडे यांनी जावळी महिनाभर लढवली. राजांनी जावळी १५ जानेवारी १६५६ रोजी सर केली. त्यानंतर चंद्रराव बायकामुलांसह रायरी किल्ल्यावर गेला. राजे जावळीत पुढील अडीच महिने, ३० मार्च १६५६पर्यंत राहिले.

त्यानंतर ६ एप्रिलला ते किल्ल्याच्या पायथ्यापाशी पोचले. रायरी किल्ला काबीज करायला अवघड होता. त्यामुळे राजांनी त्याला वेढा घातला. त्यानंतर चंद्ररावाने तो महिनाभर १४ मे पर्यंत लढवला. परंतु यापुढे आपल्याला किल्ला लढवता येणार नाही, याची त्याला जाणीव होऊ लागली. त्याने तडजोडीसाठी संपर्व जोडण्यास सुरुवात केली. चंद्ररावाचा भाचा हैबतराव व बालाजी नाईक शिळीमकर यांनी मध्यस्थी केली आणि किल्ला राजांच्या हवाली करायला चंद्रराव तयार झाला.५

चंद्ररावाचा राजांनी सन्मान केला, त्याला वस्त्रे प्रदान केली. त्याचा सरदार मुरारबाजी देशपांडे याचे शौर्य राजांच्या डोळ्यांत भरले. त्यांनी मुरारबाजी, त्याचे बंधू त्रिंबकजी, शंकराजी व महादजी यांची चंद्ररावाकडे मागणी केली.६ अर्थात ती पुरी करण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हते. राजांचा विचार चंद्ररावापाशी थोडी शिबंदी ठेवून जावळीवर देशमुखी त्याला करू द्यावी, असा होता. त्याच्याशी बोलणी करायला ते त्याला चाकणला घेऊन गेले.

चंद्ररावाने वरवर संमती दाखवली, परंतु चाकणला पोचल्यानंतर त्याने राजांविरुद्ध मदतीच्या याचनेसाठी मुधोळकर घोरपड्यांना चोरून पत्रे लिहिली. ती राजांच्या हेरांच्या हातात पडली. त्याचवेळी २७ ऑगस्ट १६५६ला चंद्रराव कदाचित वैदेतून निसटला. परंतु त्याला लवकरच पकडण्यात आले. त्याला राजांपुढे उभा केल्यावर राजे संतप्तपणे त्याला म्हणाले, ‘तुमच्या आमच्या भेटी जाहल्या, तेव्हा इमानप्रमाणे तुम्ही आम्हास दिधलेत जे तुम्हास अत:पर दुराख होणार नाही. ऐसे असता फितुराचे कागद वेंकाजी घोरपड्यास पाठविले तर तुम्ही मोरे बेईमान आहा.’ चंद्रराव स्वराज्यास कायमच धोका होऊन बसणार, हे एव्हाना राजांना कळले होते. त्याला माफ करण्यात अर्थ नव्हता. बेइमानी केल्याबद्दल चंद्ररावाचा शिरच्छेद करण्यात आला.७ त्यानंतर मोऱ्यांची जावळीवरील आठ पिढ्यांची सत्ता संपुष्टात आली.

मोऱ्यांचे घोडदळ मोठे होते. जावळी आणि सभोवतालीचा प्रदेश समृद्ध होता. त्यामुळे तेथील उत्पन्न शिवाजीराजांना मिळाले. आसपासचे लोक चांगले लढवय्ये होते. ते सर्व स्वराज्याच्या सेनेत सामील झाले, त्यामुळे सेनेच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. यशवंतराव मोऱ्याचा नक्षा उतरवल्यामुळे साऱ्या मावळात शिवरायांचा दबदबा वाढला, आजूबाजूचे सरदार राजांकडे आकर्षित झाले आणि त्यांच्या स्वराज्यसंवर्धनाच्या कामाकडे अनेक तरुण आकर्षित झाले. त्याबरोबर वासोटा किल्ला पण शिवाजीराजांच्या हातांत आला.

लष्करी विलेषण

जावळी हे रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत मोक्याचे ठिकाण होते. एका बाजूस सातारा-वाई ही देश प्रदेशातील दोन महत्त्वाची गावे आणि दुसऱ्या बाजूला कोकण पट्टीतील समुद्रतटावरील दाभोळ-सुवर्णदुर्ग यांना जोडणारे सह्याद्री डोंगरसरीवरील जावळी हे कोयना नदीच्या खोऱ्याच्या माथ्यावर होते. ते हातांत आल्यावर सातारा-वाई टापूवर परिणामकारक नियंत्रण प्राप्त होणार होते.

जावळीवरील विजय ही स्वराज्यासाठी अत्यंत लाभदायक घटना होती. त्या विजयामुळे राजांची सत्ता उत्तर कोकणच्या भागात आणि सातारा जिल्ह्यातील डोंगराळ भागात पसरली. कोकणात जाणारे मार्ग आणि इतर महत्त्वाच्या वाटांवरील व्यापारी, लष्करी व प्रवासी वाहतूक आणि रहदारीवर, तसेच समुद्राकडून देशाकडे होणाऱ्या हालचालींवर नजर ठेवणे मराठ्यांना शक्य झाले.

सर्वांत महत्तम अर्जित म्हणजे रायरी किल्ला मे १६५६मध्ये राजांच्या ताब्यात आला. संपूर्ण कोकण किनारपट्टीवर प्रभुत्व गाजवणारा असा हा बळकट किल्ला होता. त्याचे सह्याद्री पर्वताराजीवरील मध्यवर्ती स्थान, पश्चिमेकडील संपूर्ण कोकण प्रदेशावर त्याचे प्रभुत्व, संरक्षणदृष्ट्या त्याची भक्कम ठेवण, दुर्गमता वगैरे अनेक घटकांचा विचार करून राजांनी आपली राजधानी रायरीला हलवली. तो हातात आल्यावर त्यानंतर जर जंजिरा समुद्रदुर्गावर कबजा करता आला असता, तर सह्याद्रीची रांग आणि अरबी महासागर यांच्यामधील प्रदेशावर प्रभुत्व लाभणार होते. जावळी आणि रायरी या दोन लक्ष्यांचा स्वराज्याच्या आरंभकाळात ताबा घेण्याचा राजांचा खटाटोप त्यांच्या तरुण मनाच्या चिंतनशीलतेची गहनता दर्शवतो.

किल्ले हा राजांच्या संरक्षण संकल्पनेचा आत्मा होता. रायरी या अभेद्य किल्ल्याच्या संरक्षणक्षमतेची चर्चा यापूर्वी आली आहे. त्यांच्या कार्यकाळात तो त्यांच्यापासून कोणीही हिरावू शकला नाही. संभाजीराजांच्या मृत्यूनंतरच औरंगजेब तो काबीज करू शकला, तोसुद्धा भेदाने. या मोहिमेचे तितकेच महत्त्वाचे अर्जित म्हणजे प्रतापगडाची बांधणी.

पारघाटाच्या तोंडावर व रडतोंडी घाटाच्या नाकासमोर असलेल्या भोरप्या डोंगराला 'रान आडवा गौड' असे म्हणत. तो राजांच्या दृष्टीस पडल्यावर त्याचे लष्करी महत्त्व राजांनी तत्काळ हेरले. त्यांच्या या साक्षेपाला दाद दिली पाहिजे. त्या डोंगराची रचना आणि सभोवतालच्या प्रदेशावरील त्याचे प्रभुत्व पाहून त्यांनी तिथे एक नवा गड बांधण्याचे ठरवले. जावळीच्या दुर्गम भागाला अधिक बळकटी आणण्यासाठी नवीन किल्ला बांधण्यासाठी त्यांनी मोरोपंत पिंगळे यांना आदेश दिला. ती प्रतापगडाची नांदी होती. मोरोपंतांनी तत्परतेने काम चालू करून तिथे प्रतापगडाची बांधणी १६५६मध्ये पुरी केली. प्रतापगडाला स्वराज्यातील किल्ल्यांच्या प्रभावळीत महत्त्वाचे स्थान लाभले.

रायरी आणि प्रतापगडाबरोबर चंद्रगड, मकरंदगड, सोनगड, चांभारगड, कांगोरी हे किल्ले राजांच्या हातांत आले. ४ सप्टेंबर १६५६ रोजी राजांनी काही गडांची नावे बदलून नवी नावे दिली. त्यात रायरीला रायगड, तोरण्याला प्रचंडगड, रोहिड्याला विचित्रगड आणि

चाकणच्या किल्ल्याला संग्रामदुर्ग ही नवी नावे देण्यात आली.८

जावळी हे एक अवघड लक्ष्य होते. चंद्ररावाचे लष्करी बळ भक्कम होते; त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते. जरी तो इलाखा दुर्गम असला, तरी त्याला कोणताही धोका उपजला, तर आदिलशाहीकडून त्याचा कडवा प्रतिकार होणार होता. त्यामुळे आदिलशहाचे प्रमुख सरदार मोहिमेवर गेले असता आणि स्वत: आदिलशहाही आपल्या शेवटच्या घटका मोजत असताना राजांनी मोहिमेची निवडलेली वेळ हा यशाचा प्रमुख घटक ठरला. जावळीच्या विजयामुळे त्यांना आर्थिक लाभ तर झालाच, त्याशिवाय जावळीच्या परिसरातील तरुण स्वराज्यसेनेकडे आकर्षित होऊ लागल्याने तिच्या मनुष्य संसाधनात मोलाची आणि चिरंतन भर पडली. आजही भारतीय सैन्याच्या पायदळातील उत्तमोत्तम सैनिक रायगड, महाड, जावळी भागातून येतात, हा त्याचा पुरावा. शूर मुरारबाजीच्या मराठा सैन्यातील आगमनाकरवी नियतीने पुरंदर किल्ल्यावरील अमर गाथेची मुहूर्तमेढ रोवली!

स्वराज्याचा विस्तार

आदिलशाहीत सत्ताबदल

विजापूरचा पादशहा, मुहम्मद आदिलशहा अर्धांगवायूच्या आजाराने बरेच दिवस आजारी होता. त्यामुळे राज्याचा कारभार स्वत: चालवणे त्याला अशक्य होऊन बसले होते. या दुर्गतीच्या काळात सर्व सूत्रे त्याची पट्टराणी बडी बेगम हिच्या हातात एकवटली होती आणि ती समर्थपणे ही जबाबदारी हाताळत होती. 'बडी साहिबा' या टोपणनावाने ती ओळखली जाई. तिचे नाव होते ताज-उल्-मुखद्दिरत. ती कुतुबशाहीच्या सुलतानाची बहीण होती. दोन राजघराण्यांत वाढल्यामुळे तिला सत्तेचे छक्के-पंजे चांगले माहीत होते. बडी बेगमने अत्यंत प्रेमाने वाढवलेल्या अली मुहम्मद नावाच्या मुलाला आपला वारस म्हणून मुहम्मद आदिलशहाने नियुक्त केले होते. वास्तविक तो त्याच्या जनानखान्यातील एका स्त्रीपासून त्याला झालेला अनौरस वारस होता. तो जरी कायदेशीर वारस होऊ शकत नसला, तरी बडी साहिबाच्या लळ्याचा भक्कम आधार त्याच्यामागे होता.

आपल्या पतीच्या मृत्यूनंतर एक-दोन कारस्थानी दरबारी एकत्र येऊन सत्ता उलथून टाकू शकतात आणि आपल्याला अंधारकोठडीत टाकून स्वत:चा एखादा पित्ता तख्तावर बसवू शकतात, याची बडी बेगमला पुरेपूर जाणीव होती. तिच्या नवऱ्याने १६२६मध्ये त्याचा पिता निधन पावल्यावर सत्ता काबीज केली होती, आपल्या मोठ्या भावाचे डोळे काढून टाकले होते आणि दोन धाकट्या भावांची बोटे कापून टाकली होती. बहामनी राज्यांच्या सुलतानशाहीमध्ये वा दिल्लीच्या तख्ताबाबत कायदेशीर वारसांवर असे अत्याचार होणे वा त्यांचे खून पडणे हे रोजमर्राचे काम होते. आदिलशाहीत काय चालले आहे, याबद्दल शिवाजीराजांना हेरांतर्फे बातम्या मिळत होत्या.

मुहम्मद आदिलशहा ४ नोव्हेंबर १६५६ रोजी मरण पावला. बडी साहिबाने कोणताही वेळ न गमावता आपल्या मानसपुत्राला गादीवर बसवले. त्यावेळी इख्लास खान हा राज्याचा वझीर

होता. त्याचे मूळचे नाव सिद्दी रेहमान आणि त्याला खान-इ-खानान खान मोहम्मद हा किताब मिळाला होता. सर्व त्याला खान मोहम्मद याच नावाने ओळखत. बडी साहिबाला खान मोहम्मद तिच्याशी स्वामिनिष्ठ राहील, याची खातरी होती. या संधिकाळात तिला बाहेरच्या दोन शक्तींचा धोका वाटत होता; पहिले मोगल आणि दुसरे शिवाजीराजे.

मोगलांचा हल्ला

दोन्हीमध्ये मोगलांचा धोका अधिक होता. काही वेळातच औरंगजेब पहिले पाऊल उचलण्याची तयारी करू लागला. अली हा कायदेशीर वारस नाही आणि मोगल बादशहाची परवानगी त्याच्या राज्याभिषेकाच्या आधी घेण्यात आली नाही, ही दोन कारणे दाखवून आदिलशाहीवर चालून जाण्याचा औरंगजेबाचा मनोदय होता. त्याने आपले सैन्य जमा करायला आरंभ केला आणि आपला पिता शहाजहानची विजापूरवर कारवाई करण्यासाठी परवानगी मागितली. त्याबरोबर विजापूर दरबाराचे काही सरदार फितवायलाही त्याने सुरुवात केली. शहाजहानने औरंगजेबाला विजापूरवर आक्रमण करण्याची परवानगी दिली. त्याने औरंगजेबाला कळवले की, शक्यतो आदिलशाहीचा सर्व प्रदेश मोगल साम्राज्याला जोडण्याचा प्रयत्न त्याने करावा; परंतु ते जमले नाही, तर निदान १६३६मधील तहानुसार निजामशाहीचा आदिलशाहीत सामील झालेला प्रदेश मोगल साम्राज्यात समाविष्ट करावा; सालाना खंडणी देण्याचे अलीने कबूल केले, तर त्याला विजापूरवर राज्य करू द्यावे आणि त्यानंतर गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीवर चालून जाऊन ती गिळंवृत करावी.

२८ फेब्रुवारी १६५७ला आदिलशाहीतील बिदरच्या किल्ल्याला मोगलांचा वेढा पडला. दक्षिणेकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने बिदरचा किल्ला महत्त्वाचा होता. काही दिवसांनी स्वत: औरंगजेब तिथे दाखल झाला आणि किल्ल्याचे बुरुज उडवून व भुयारांमार्गे किल्ल्यात प्रवेश करून त्याने २९ मार्च १६५७ रोजी तो किल्ला सर केला. त्यात मोगलांना बारा लाख रुपये, मोठ्या किमतीचे सामान आणि २३० तोफा मिळाल्या. त्यानंतर औरंगजेबाने ४ मे १६५७ला कल्याणी किल्ल्याला वेढा घातला. तिथला किल्लेदार दिलावर हबशी याने मोगलांना कडवी लढत दिली; परंतु तीन महिन्यांनंतर त्याचा विरोध संपुष्टात आला. १ ऑगस्ट १६५७ला तो किल्लाही मोगलांच्या हातांत आला.

शिवाजीराजांच्या कारवाया

आदिलशाहीतील संधिकालाचा फायदा घेणे आवश्य७क होते. औरंगजेबाच्या आक्रमणामुळे आदिलशाहीचे लक्ष त्यांच्याकडे वेधले होते. अशा वेळी राजांनी कोकणाच्या बाजूस स्वराज्याचा विस्तार करण्याचे ठरवले. कोकण प्रदेश दूर आणि दुर्गम असल्याने आदिलशाही वा मोगलांचे सध्यातरी त्याबाजूस लक्ष जाणे असंभव होते. नुकताच जावळी आणि रायगडचा टापू राजांनी काबीज केला होता. त्याचा समुद्रतीराच्या बाजूस विस्तार करण्याने त्याची सुरक्षितता बळकट होणार होतीच; परंतु सागरतीरावर भक्कम पाय रोवण्याची संधी मिळणार होती. हा विचार करून राजांनी कारवाईसाठी दाभोळ बंदराची निवड केली. मग त्यांचा विश्वासू सरदार राघो

बल्लाळ अत्रे याला कोकण किनाऱ्यावरील दाभोळ बंदर आणि त्याच्या सभोवतालीचा प्रदेश काबीज करण्यासाठी फौजेसह रवाना केले.

दाभोळ हातांत आल्याची बातमी कळल्यावर शिवाजीराजांनी एक चाणाक्ष चाल केली. तिचे लक्ष्य होते शहजादा औरंगजेब. तो त्यावेळी बिदरला होता. त्यांनी आपले वकील सोनापंत डबीर यांना औरंगजेबाकडे धाडले. त्यांच्या हाती शहजाद्याला विनंतीवजा पत्र पाठवले की, 'आमची विजापूर सल्तनतेतील जहागीर आमच्याकडे ठेवायची परवानगी द्यावी आणि त्याचबरोबर दाभोळ व सभोवतालचा प्रदेशही ठेवण्याची आम्हांला सवलत द्यावी. या आपल्या वृपेची परतफेड करण्यासाठी आम्ही तुमच्याशी सहकार्य करू.'

कोकणचा हा प्रदेश आदिलशाहीत पडत होता आणि तो आदिलशहाने मुल्ला अहमद याला जहागीर म्हणून दिला होता. मोगलांनी त्या प्रदेशावर आधीच दावा लावला होता आणि आदिलशहाकडून तो जिंकून घेण्याचा त्यांचा विचार होता. हे काम परभारेच साधले जात असल्याचे पाहून औरंगजेबाने 'विशाल मनाने' तो शिवाजीराजांना ठेवण्याची संमती दिली. २३ एप्रिल १६५७ला सोनोपंत डबीरांना दिलेल्या पत्रात औरंगजेबाने लिहिले होते, 'आम्ही सध्यातरी आदिलशाहीतील तुमची जहागीर आणि तुम्ही विनंती केल्यानुसार दाभोळ व लगतचा प्रदेश तुमच्यापाशी राखण्याची परवानगी देतो. ही वेळ तुम्ही आम्हाला मदत करण्याची आहे, हे तुम्ही जाणता आणि ती मदत आम्हांला आवश्यहक असेल त्यावेळी तुम्ही द्याल, याबद्दल आम्हांला खातरी आहे.'

सोनोपंत डबीर परत येण्याची राजे वाट पाहत होते. त्यावेळी औरंगजेब कल्याणी किल्ला काबीज करण्यात गुंतला होता आणि त्याला तिथे कडवा विरोध होत होता. ही वेळ मोगलांच्या प्रदेशातील काही भाग घेण्यास अत्यंत योग्य होती, त्याची दोन कारणे : पहिले, औरंगजेब कल्याणीत अडकला असल्याने मोगल प्रदेशात कोणत्याही कारवाईचा प्रतिकार करणे त्याला अशक्य होणार होते. दुसरे, कल्याणीत जर मोगल व आदिलशाही या दोघांत काही तह झाला आणि दिलजमाई झाली, तर त्या दोघांचे पुढील लक्ष्य मराठा स्वराज्यच असणार होते. असा कोणताही हल्ला येण्याआधी काही संवेदनशील मोगल प्रदेश जिंकला, तर त्याचा नंतर फायदाच होणार होता. त्यानुसार राजांनी जुन्नरचा किल्ला आणि अहमदनगर या दोन लक्ष्यांची निवड केली. हा निर्णय अत्यंत जोखीमपूर्ण आहे आणि त्याचे परिणाम गंभीर असतील, याची त्यांना जाणीव होती. परंतु तो निर्णय तर्वशुद्ध होता. केवळ शिवाजीराजांसारखा मुत्सद्दीच तो घेऊ शकला असता.

जुन्नरचा किल्ला १६३६च्या तहाच्या आधी शहाजींकडे होता, परंतु त्यानंतर त्यांना तो मोगलांना द्यावा लागला होता. पुण्याच्या ५० मैल उत्तरेला असलेले जुन्नर हे त्या काळातील प्रसिद्ध दळणवळण केंद्र होते. पश्चिम किनाऱ्यावरील व्यापाऱ्यांचा उत्तर, दक्षिण आणि पूर्वेस जाणारा माल जुन्नरमार्गे जात असे. त्याच्या ५० मैल पूर्वेस असलेल्या अहमदनगर शहरात मोगलांची छावणी होती. मोगलांच्या आक्रमणापासून त्याच्या रक्षणासाठी चांद बीबी आणि मलिक अंबर यांनी दुर्दम्य लढा दिला होता. आगामी झंझावाती हल्ल्यांसाठी जुन्नर आणि अहमदनगर या दोन मोगल छावणींची राजांनी निवड केली होती.

३० एप्रिलला पहाटे मराठ्यांच्या तुकडीने जुन्नरवर हल्ला केला. त्यांचे मावळे किल्ल्याच्या भिंती दोरांच्या साहाय्याने चढून गेले, तिथल्या संत्रींना ठार मारून त्यांनी जुन्नर लुटले. त्यांना २०० घोडे, तीन लक्ष होनांची संपत्ती, जड-जवाहीर आणि कापड-चोपड मिळाले.९ त्यानंतर ते चाकणच्या पडावास परतले.

सामान-पैका तिथे उतरवून राजांचे सरदार मीनाजी भोसले व काशिपंत मोगलांच्या श्री गोंदे भागात घुसले. मीनाजी भोसले पार अहमदनगरच्या निकट जाऊन धडकला. तिथे मुस्तफाखान नावाचा कर्तबगार सुभेदार होता. त्याने आपली सर्व संपत्ती किल्ल्यात हलवली आणि नंतर त्याने मराठ्यांच्या तुकडीला कडवा लढा दिला. मीनाजीला माघार घ्यावी लागली. मराठ्यांच्या हातात फारशी संपत्ती पडली नाही.

हे कळल्यावर औरंगजेब संतापला. त्याने नासिरीखान, इराजखान वगैरे सरदारांना ३००० घोडेस्वारांसह मराठ्यांवर चालून जाण्याचे आदेश दिले. दोघांत ४ जून १६५७ला लढाई झाली. त्यात मोगलांची सरशी झाली. बरेच मावळे मारले गेले आणि काही जखमी झाले. तरीही मराठ्यांना ७०० घोडे, चार हत्ती आणि काही रोकड मिळालीच.१० एकात विजय, तर दुसऱ्यात पराजय झाला, तरी मोगलांच्या मनात धडकी भरवण्याचे राजांचे उद्दिष्ट साध्य झाले होते.

औरंगजेब चक्रावूनच गेला होता. हा मराठा राजा फक्त आठवड्यापूर्वीच आपल्याकडे त्याचा वकील आवर्जून पाठवतो काय, आपल्याकडून अभयदान घेतो काय, आपल्याला मदतीचा हात पुढे करतो काय; त्यानंतर आठवड्यात आपल्या दोन आगरांवर हल्ले चढवतो काय आणि मिळेल ते घेऊन नाहीसा होतो काय; त्याला कशाचाच ताळमेळ लागेना. परंतु शिवाजीराजांच्या कर्तृत्वाची झलक त्याला पाहावयास मिळाली होती. त्याने कर्तलबखान सरदाराला जुन्नरचा बालेकिल्ला मजबूत करण्यासाठी पाठवले.

त्याबरोबरच नासिरीखान, होशदारखान वगैरे मनसबदार मराठ्यांच्या पुणे आणि सुपे परगण्यांत शिबंदीसह पाठवून सारा मुलूख भस्मसात करण्याचे औरंगजेबाने फरमान धाडले. त्यात त्याने लिहिले होते : 'आक्रमणकारी शत्रूस शाही राज्याबाहेर हाकलून लावा. सिवाच्या प्रदेशात चारही बाजूंस घुसून त्याची गावे बेचिराख करा. त्याच्या लोकांची निर्दयपणे हत्या करा. त्यांचे सर्व धन लुटून आणा. त्याची चाकण व पुणे ही ठिकाणे जमीनदोस्त करा. लोकांना मारण्यात वा वैद करण्यात तिळमात्रही कसूर करू नका. आपल्या मुलखातील जे कोणी पाटील, कुलकर्णी त्याला आतून सामील असतील, त्यांचीही भीड न बाळगता व त्यांचेवर दया न दाखवता त्यांची कत्तल करा.'११ परंतु पावसाळा जवळ येऊन ठेपला होता. मोगल सरदार फारसा धुमाकूळ घालू शकले नाहीत.

१४ मे ला महाराणी सईबाई प्रसूत होऊन त्यांना पुत्र झाला. शिवाजीराजांचे मृत वडीलबंधू संभाजी यांचेच नाव नवजात राजपुत्राला देण्यात आले. त्यांचा पायगुण म्हणून काय, शिवाजीराजांवरील मळभ दूर होण्यास दोन घटना कारणीभूत ठरल्या.

बडीसाहिबांनी शहाजहानकडे एक वकील पाठवला. त्याने बादशाहाला कल्याणीवरील वेढा उठवून औरंगजेबाची मोहीम समाप्त करवण्याची आदिलशाहीतर्फे विनंती केली. त्याच्या

बदल्यात वकिलांनी सालाना दीड करोड रुपयांची खंडणी देण्याचे आणि परिंडा, बिदर, कल्याणीचे किल्ले व शिवाजीराजांची पुणे-सुपे परगण्याची जहागीर मोगलांना सुपूर्द करण्याचे कबूल केले. शहाजहानची या प्रस्तावाला संमती मिळवण्यात बादशहाचा ज्येष्ठ पुत्र दारा शिकोहने मदत केली. अर्थात धाकटा भाऊ औरंगजेब याचा नक्षा उतरवण्याचा त्यामागील हेतू होता. त्यानुसार मोहीम संपवून सैन्य माळव्याला रवाना करण्याचा आदेश दाराने औरंगजेबाला पाठवला. परंतु औरंगजेबही खमक्या होता. त्याने कल्याणी किल्ला २ ऑगस्टला जिंकल्यानंतरच सैन्याचा बहुतांश भाग माळव्याकडे रवाना केला.

औरंगजेब संतापाने जळत होता. आता त्याच्याकडे काहीच सैन्य उरले नव्हते. तरीही उर्वरित सैन्याच्या छोट्या छोट्या तुकड्यांकरवी त्याने आदिलशाहीवर हल्ले करण्यास आरंभ केला. शिवाजीराजांच्या पुणे आणि सुपे परगण्यांना हात लावण्याइतकी शिबंदी त्याच्याकडे उरली नव्हती. शिवाजीराजांनी हे तत्काळ हेरले. त्याचा फायदा घेऊन १३ ऑगस्टला त्यांनी सिंहगड काबीज केला आणि दुसऱ्याच दिवशी राघो बल्लाळ अत्रेला कोकणात पाठवून दंडा राजपुरीनिकटच्या किनाऱ्यावर तळे-घोसाळे वगैरे मुलखावर कब्जा केला. सिद्दयाने त्यांच्याशी तह केला. शिवरायांचे बाहुबळ दिवसेंदिवस वाढत चालले होते.

औरंगजेबाचे आदिलशाही मुलखावरील हल्ले थांबवण्यासाठी बडी साहिबाने आपला वझीर खान मुहम्मदबरोबर एक बलवत्तर सेना पाठवली. त्याच्याबरोबर अफझलखान आणि इतर वरिष्ठ सरदारही धाडण्यात आले. त्यांच्या झटापटीत एकदा अफझलखान औरंगजेबाभोवती वेढा टाकण्यात यशस्वी झाला. त्याला तो पकडण्याच्याच बेतात होता, परंतु सुदैवाने औरंगजेब त्याच्या कचाट्यातून निसटला. अफझलखानाने जेव्हा याबद्दल हाताखालच्या मनसबदाराला फटकारले, तेव्हा त्याने सांगितले की, औरंगजेबाने खान मुहम्मदला स्वत: आर्जव केल्यामुळे सोडण्यात आले. अफझलखान हे ऐकून खवळला आणि त्याने बडी साहिबाचे कान भरले. बडी साहिबाने खान मुहम्मद आपल्या पालखीतून विजापुरात प्रवेश करत असता त्याचा ११ नोव्हेंबर १६५७ला हमरस्त्रयावर खून करवला. त्यानंतर बडी बेगमची अफझलखानावर मर्जी बसली आणि आदिलशाहीत त्याचे प्रस्थ आणखीनच वाढले.


उत्तर आणि दक्षिण कोकणावर नियंत्रण

औरंगजेबाच्या बहुसंख्य सेनेने उत्तरेकडे प्रयाण केले आहे आणि शिबंदीच्या तुटवड्याने औरंगजेबाचे हात बांधले गेले आहेत, याची दखल शिवाजीराजे न घेतील तर काय! जास्तीत जास्त किल्ले आणि मुलूख काबीज करण्यासाठी ही पर्वणी आहे, हे यांनी हेरले आणि थोडाही वेळ न गमावता ते वेगाने कामाला लागले. त्यांनी त्या संधिकालादरम्यान स्वराज्याच्या प्रदेशातील चाळीस किल्ले काबीज करण्याची योजना तयार केली आणि त्यानुसार कामाची वाटणी केली. त्याचबरोबर आपण स्वत: कोकणात जाऊन तिथल्या कारभाराची घडी लावण्याचे त्यांनी ठरवले.१२ १६३६च्या तहात निजामशाहीकडून आदिलशाहीला मिळालेला प्रदेश आणि किल्ले काबीज करण्यावर त्यांचा मुख्य जोर राहणार होता. (नकाशा क्र. १२ पाहा.)

नकाशा क्र. १२

उत्तर-दक्षिण कोकण मोहीम

ऑक्टोबर १६५७ - जानेवारी १६५८



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

या कामाची सुरुवात करण्यासाठी राजांनी उत्तर कोकणात मोहीम हाती घेतली. निजामशाहीची विभागणी झाली, तेव्हा उत्तर कोकणातील भिवंडीपासून नागोठण्यापर्यंतचा कल्याण प्रांताचा प्रदेश आदिलशाहीच्या वाट्यास आला होता. तो मुल्ला महंमद नटिया याला जहागीर म्हणून देण्यात आला होता. मुल्ला महंमद कल्याणला स्थायिक होता. आदिलशहा आजारी पडल्यावर त्यांनी मुल्ला महंमद याला कल्याणहून खजिना घेऊन विजापूरला बोलावले. कोकणचा बंदोबस्त ढिला पडला आहे, हे पाहून राजांनी गुप्त वेषाने फिरून सर्व प्रांत पाहिला. कल्याणहून एक खजिना विजापूरला जात आहे, अशी बातमी लागल्यावर त्याच्यावर छापा घालून तो राजगडास नेण्यात आला. त्यानंतर राजांनी लागलीच दादाजी बापुजी यास कल्याणवर आणि सखो वृष्ण लोहकरे यास भिवंडीवर रवाना केले. त्या दोघांनी २४ ऑक्टोबर १६५७ रोजी ती दोन्ही ठाणे काबीज केली.

त्यानंतर राजांनी कल्याणला भेट देऊन त्या खाडीमध्ये दुर्गाडी हा किल्ला बांधायचे आदेश दिले. 'कल्याणजवळ बंदरी कोट बांधला. तेथे पुष्कळ द्रव्य व मालमत्ता मिळाली. त्यानंतर ते ईशान्येकडील माहुली किल्ल्यावर गेले. १६३६मध्ये निजामशाही वाचवण्यासाठी झगडत असताना याच किल्ल्यावर शहाजींनी मोगलांना कडवा लढा दिला होता. राजांनी ८ जानेवारी १६५८ला तो किल्ला जिंकून घेतला. चौल, प्रधानगड, तळे, घोसाळे इत्यादी हस्तगत झाले. घाटावरचे कांगोरी, तिकोना, लोहगड, राजमाची हेसुद्धा सहज ताब्यात आले.' जवळजवळ सारा कल्याण प्रांत राजांच्या हातात आला होता. अशा रीतीने सर्व कल्याण प्रांत ताब्यात घेऊन त्यावर त्यांनी आबाजी सोनदेव याला सुभेदार नेमले. घाटावरील बारा मावळांवर वृष्णाजी भास्कर नावाचा आणखी एक स्वतंत्र अधिकारी नेमला.१३

त्याच भेटीदरम्यान मराठा स्वराज्यासाठी एक अत्यंत दूरगामी महत्त्वाची घटना घडली. शिवाजीराजांनी मराठा नौदलाची स्थापना केली आणि दर्यासारंग या टोपणनावाने प्रसिद्ध असलेला वेंतागी सारंगी याची नव्याने उभारल्या जाणाऱ्या नौदलाचा प्रमुख म्हणून नेमणूक केली. कल्याण, भिवंडी, पनवेल बंदरांजवळ सागाची घनदाट जंगले होती. त्याचा उपयोग करून राजांनी व्यापारी तारवे बनवण्यास आरंभ करण्याचे आदेश दिले.१४ त्यामागे पोर्तुगीज व सिद्दी यांना बेसावध ठेवण्याचा हेतू होता. त्यासाठी त्यांनी पोर्तुगीजांशी मैत्री केली. त्यांच्या संमतीने समुद्रात मराठ्यांचे तारवे फिरू लागले. काही काळाने व्यापारी रक्षणासाठी तारव्यांवर तोफा चढवल्या. अशी २० लढाऊ गलबते बांधण्याचे काम त्यांनी दोन पोर्तुगीज तंत्रज्ञांच्या करवी पार पाडले.१५ त्यावेळी त्या दलात एकूण १६० जहाजे होती, अशी ईस्ट इंडिया कंपनीच्या फॅक्टरी रेकॉर्डमध्ये नोंद आहे.

कल्याणाचा खजिना हाती पडला, तेव्हा कल्याणच्या सुभेदाराची सून आबाजीने पकडून शिवाजीराजांकडे पाठवली. 'आमच्या मातुश्री इतक्या सुंदर असत्या, तर आम्हीही असेच सुंदर झालो असतो', असे तिच्या लावण्याबद्दल स्तुतिपर उद्गार काढून त्या सौदर्यवतीला सन्मानाने राजांनी कल्याणला परत पाठवले, अशी अनेक लोकगीतांत शब्दबद्ध झालेली आख्यायिका खरी असेल, तर तो प्रसंग याच वेळी घडला असावा. प्रधानगड सर करण्याच्या वेळी घडलेली अशीच एक आख्यायिका आहे, परंतु ती फारशी प्रचलित नाही. त्यावेळी किल्ल्याचा अधिकारी

केशरीसिंग याने जोहार केला, त्यातून त्याची मातुश्री आणि दोन मुले वाचली. ते तिघे किल्ल्यावर झाडीत लपून बसले. किल्ला मराठ्यांनी जिंकला. चढताना वाटेत बोरीची कांटी पालखीस लागली. राजांनी तिथे खणण्यास सांगितले, तेव्हा बावीस 'घागरी व चार कढया मोहोरा, होन, सोन्याच्या कांबीने भरलेल्या' सापडल्या. नंतर केशरीसिंगाची आई सापडली. शिवरायांनी तिच्या पायांवर डोके ठेवून तिला पालखीत बसवले आणि पुत्रांसह देऊळगावास वतनावर रवाना केले.१६

या सर्वच आख्यायिका भाकडकथा असू शकत नाहीत. काही का असेना, त्यातून एक नि:संदिग्ध संकेत मिळतो, तो राजांच्या नितळ चारित्र्याचा आणि असामान्य स्त्रीदाक्षिण्याचा. प्रत्येक हल्ल्यानंतर सापडलेल्या स्त्रियांना बाटवून आपल्या जनानखान्यात रवाना करणाऱ्या त्या काळातील लंपट मोगल आणि बहामनी राजांशी या स्त्रीदाक्षिण्याची तुलना केली, तर ते अधिकाधिक डोळ्यांत भरते. याच आदर्शामुळे शिवाजीराजांना आपल्या अनुयायांची अप्रतिहत स्वामिनिष्ठा प्राप्त झाली.

उत्तर कोकण प्रांत हातात आल्यावर राजांनी दक्षिण कोकणाकडे मोर्चा वळवला. चिपळूण ते वेंगुर्ल्याचा प्रदेश ही रणदुल्लाखानाचा मुलगा रुस्तुम-इ-जमान याची जहागीर होती. वाडीचा लखीम सावंत राजांशी नीट वागत नव्हता. त्याला समज दिल्यावर त्याने ५ मार्च १६५९ला तह केला. या करारानुसार शिवाजीराजांना प्रदेशाची अर्धी वसुली देण्याचे आणि आवश्यमक असेल, तेव्हा ३०००चे पायदळ त्यांच्या मदतीला पाठवण्याचे सावंताने कबूल केले. तुर्कीची नोकरी न करण्याचे वचनही त्याने दिले आणि शिवाजीराजांचे मांडलिकत्व पत्करले.

कोकणात राजांचा दबदबा होता. जंजिऱ्याचा फत्तेखान सिद्दी याच्या काही सरदारांनी राजांना कोकणावर स्वारी करण्याची गळ घातली आणि तळे व घोसाळे किल्ले घेऊन देतो, असे वचन दिले. त्यावरूनच शिवाजी राजांनी ते दोन किल्ले घेतले, बिरवाडीस किल्ला बांधला आणि हरिहरेश्वराचे दर्शन घेऊन ते पुढे जात असताना त्यांना गोवेलकर सावंत भेटले. त्यांनाही आपल्याकडे नोकरीस ठेवले. त्यांच्याकडील युरोपात बनलेली नामांकित तलवार राजांनी तीनशे होन देऊन घेतली. तीच सुप्रसिद्ध भवानी तलवार!१७

कोकणच्या मोहिमेत शिवाजीराजांना बरीच मालमत्ता मिळाली. ते राजगडला १४ जानेवारी १६५८ला परतले. याच सुमारास राजांच्या माणकोजी दहातोंडे या सरनोबताचा देहांत झाला. त्याच्या जागी नेतोजी पालकर याची सरनोबत म्हणून नेमणूक करण्यात आली.

उत्तर आणि दक्षिण कोकणातील अचानक हाती घेतलेल्या या यशस्वी मोहिमेमुळे औरंगजेब आणि बडी बेगम हे दोघेही कमालीचे खवळणार आहेत, याचे राजांना भान होते. कदाचित दोघे एकत्र होऊन आपल्याला नेस्तनाबूत करण्याची मोहीम हाती घेण्याचीही शक्यता असल्याची जाणीव त्यांना होती. तसे काही झाले नाही. आदिलशाहीच्या मालकीचा कोकणचा इलाखा बडी बेगम साहिबाने मोगलांना देण्याचा वायदा केला होता. त्यामुळे कोणताही प्रतिसाद देण्याची जबाबदारी तिने मोगलांवर सोडली होती. दुसऱ्या बाजूला औरंगजेब अत्यंत क्रुद्ध झाला असूनही आणि मराठ्यांना समूळ उपटून टाकण्याचा त्याने निर्धार केला असूनही त्याच्यापाशी सैन्याची ददात असल्याने तोसुद्धा कोणतेही पाऊल उचलण्यास कचरत होता. शिवाजीराजांनी

दोघांच्या अगदी याच संभ्रमाचा अचूक अंदाज लावला असला असावा. त्यांच्या या आक्रमक चालींच्या मागे ही तर्कशुद्धता दडली होती.

नियती शूरास साथ देते, अशी प्रसिद्ध उक्ती आहे. अगदी हेच शिवाजीराजांच्या बाबतीत घडले. बादशहा शहाजहान गंभीरपणे आजारी आहे आणि शेवटच्या घटका मोजत आहे, अशा बातम्या दक्षिणेत धडकू लागल्या. अशा वेळी दिल्लीपासून दूर राहणे औरंगजेबास हितकारी नव्हते. दोन मोठे बंधू दिल्लीच्या तख्ताचे त्याच्यापेक्षा अधिक वारसदार असले, तरी कोणत्याही परिस्थितीत ते बळकावण्याची त्याचा निर्धार होता आणि त्याच्यात ती जिद्दही होती. दारा शिकोह कोणतेही निर्णायक पाऊल उचलण्याआधी औरंगजेबाला आग्र्यात पोचणे अपरिहार्य होते. तो तातडीने उत्तरेकडे रवाना झाला.

औरंगजेबाच्या प्रयाणानंतर शिवाजीराजांवरील मोगलांची सर्व बंधने नाहीशी झाली. आदिलशाही हंगामी अर्धांगवाताच्या व्याधीतून गुजरत होती. या पोकळीचा जास्तीत जास्त फायदा उठवणे शक्य होते. मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन पश्चिम किनाऱ्यावर शक्य होईल, तेवढा मराठ्यांचा अंमल बसवण्याचे मर्यादित उद्दिष्ट त्यांनी आपल्यासमोर ठेवले. सागरतीरावरील चौलचे दोन भाग होते; वरचे चौल आणि खालचे चौल. वरचे चौल आदिलशाहीच्या आणि खालचे चौल त्याला रेवदंडा असेही म्हणत पोर्तुगीजांच्या नियंत्रणाखाली होते. पोर्तुगीजांनी तिथे १५३१मध्ये किल्ला बांधला होता आणि तिथून ते हिंदुस्तानाशी व्यापार-उदीम करत असत. दोन्ही चौलांच्या मध्ये एक खाडी होती आणि त्यामुळे त्या दोन्हींना वेगवेगळे अस्तित्व होते. चौल त्यावेळचे एक प्रसिद्ध व्यापारकेंद्र होते आणि इथले कारागीर टफेटी नावाची जगप्रसिद्ध मलमलीचे कापड बनवीत असत.१८

शिवाजीराजांनी आबाजी सोनदेवच्या हाताखाली चौलवर हल्ला करून तो मराठी अमलाखाली आणण्यासाठी एक तुकडी पाठवली. रघुनाथ बल्लाळ सबनीस याच्या हाताखाली आणखी एका तुकडीने चौलच्या ५० मैल दक्षिणेस असलेल्या दंडा राजपुरीवर हल्ला चढवला आणि जंजिरा किल्ल्याच्या सान्निध्यात असलेले तळे, घोसाळे आणि सुवर्णदुर्ग हे किल्ले जिंकून घेतले. त्यानंतर ते रत्नागिरीच्या दक्षिणेला विजयदुर्गपर्यंत पोचले.

उत्तरेस असलेल्या कल्याणसारखेच राजापूर हे दक्षिणेतील धनाढ्य शहर होते. १६४८मध्ये तिथे इंग्रजांनी पहिली वखार घातली. शिवाजीराजांनी सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, खारेपाटण, विजयदुर्ग वगैरे स्थळे आपल्या अंमलाखाली आणली. १६५३ साली त्यांनी अडीच लाख रुपये खर्च करून एक किल्ला बांधला. ते १५७५ शके विजयनाम संवत्सर होते, म्हणून त्याचे नाव विजयदुर्ग असे ठेवले.

शिवाजीराजांच्या कोकणातील कारवाया आणि तिथला कारभार हाती घेण्याचा पुढाकार पोतुगीजांना हानिकारक होता, परंतु जोपर्यंत त्यांना त्यांच्या व्यापार-उदीमाला पूर्ण वाव मिळत राहील आणि करांमध्ये त्यांना सूट मिळेल, तोपर्यंत तिथे मराठ्यांचा कारभार आला की आदिलशाहीचा, याच्याशी तसे त्यांचे फारसे देणे-घेणे नव्हते. जसजसा शिवाजीराजांनी आपली जहाजे खुल्या समुद्रात पाठवण्यास आणि किनाऱ्यावरील हालचालींवर नियंत्रण घालण्यास आरंभ केला, ते मात्र अर्थातच पोर्तुगीजांच्या पथ्यावर पडणार नव्हते. हे त्यांच्या

सागरतटावरील सार्वभौमत्वाला सरळसरळ आव्हान होते. जंजिऱ्याच्या सिद्दीलाही हे सहन होणे शक्य नव्हते. त्याच्या मालकीतील किल्ल्याकडे जाणाऱ्या समुद्रमार्गांवर असलेले त्याचे प्रभुत्व गमवायला तो राजी नव्हता. या तक्रारी बडी साहिबांपर्यंत पोचल्या. आदिलशाहीचा कोकणातील प्रदेश शिवाजीराजे राजरोस काबीज करत असल्याचे पाहून त्याही अस्वस्थ होत्या.

मग त्यांनी रुस्तम-इ-जमान या सरदाराला दक्षिण कोकणात रवाना केले. हा रणदौलाखानाचा द्वितीय पुत्र. रणदौलाखान शहाजींचा घनिष्ठ मित्र. दोघांनी कर्नाटक मोहीम एकत्रपणे काढली होती. १६४९मध्ये त्याचा मृत्यू झाला होता. कोल्हापूर, रायबाग, राजापूर आणि कारवारची जहागीर जमानला देण्यात आली होती. रुस्तम-इ-जमानची गाठ लखीम सावंताशी पडली. रुस्तुमने रांगणा किल्ला त्याच्याकडून जिंकून घेतला, परंतु त्यात त्याच्या सैन्याची जबर हानी झाली.

औरंगजेबाबरोबरील मुत्सद्देगिरी

सप्टेंबर १६५७मध्ये मोगलांचा आणि विजापूरकरांचा तह झाला. आता आपण एकटे दोघांविरुद्ध लढा देऊ शकणार नाही, त्याऐवजी मुत्सद्देगिरीने दोघांचीही काही काळ दिशाभूल करावी, या विचाराने शिवाजी राजांनी आपला वकील रघुनाथपंत याला नासिरीखानाकडे आणि दुसरा वकील वृष्णाजी भास्कर याला औरंगजेबाकडे पत्रे देऊन पाठवले. दोन्हीत आगळिकीबद्दल माफी मागितली होती. वकील औरंगजेबाकडे पोचला, तेव्हा तो दिल्लीस जाण्याच्या गडबडीत होता. शिवाजीराजांना याचाच फायदा घ्यायचा होता. अपेक्षेनुसार औरंगजेबाने सामोपचाराचे पत्र लिहिले. अर्थात औरंगजेबाचाही दुटप्पीपणा त्यामागे होता.

औरंगजेबाने उत्तरादाखल पत्रात लिहिले होते, ‘तुमची अर्जदास्त पाहून मजकूर ध्यानात आला. यद्यपि तुमच्या पेशजीच्या गोष्टी विसरावयाजोग्या नाहीत, तथापि तुम्ही आपले वृतकर्माचा पश्चात्ताप केला, हे जाणून तुमचे पूर्व वृत्य मनात आणीत नाही. येविषयीचा संतोष मानून इकडील दौलतीविषयी कोशीस करीत जावी. ‘आपले वतनी महाल किल्ले व कोकण देशसुद्धा, निजामशाहीखेरीज, विजापूर आदिलखानाचे इलाख्यात जे आहेत ते, त्यांजकडून मुलूख हस्तगत झाल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयी वचन असावे, म्हणजे सोनोपंत ह्यास हुजूर पाठवतो आणि इकडील लक्षात वागून सरकारी मुलखाची सरहद्द रक्षण करून कामदाराशी परीख होतो, की ज्यायोगे बंड बखेडे वगैरे न व्हावे, म्हणोन तुम्ही लिहिले; त्यास, तुम्ही लिहिल्या अन्वये वर्तून हा फरमान पाहताच आपले मजकुराची अर्जी लिहून सोनोपंताबरोबर पाठवून देणे, म्हणजे त्याप्रमाणे केले जाईल. जाणून लक्षात वागवून, आमचे लोभाची पूर्णता समजावी.’१९

थोडक्यात, शिवाजीराजांनी औरंगजेबाला कोकणातील निजामाचा प्रदेश सोडून आदिलशाहीचा प्रदेश, किल्ले आपल्याकडे राहू देण्याची परवानगी मागितली होती. त्याबदल्यात एका सरदाराखाली ५०० स्वार औरंगजेबाच्या सेवेत ठेवण्याचा प्रस्ताव राजांनी ठेवला होता. त्या प्रस्तावाला औरंगजेबाने संमती दिली होती.

त्याच्या प्रवृत्तीनुसार त्याबरोबरच औरंगजेबाने आदिलशहाच्या खंडणीतील ३० लाख रुपये माफ केले आणि त्यालाही पत्र लिहिले : 'देशाचे संरक्षण करा. शिवाजी किल्ले बळकावून बसला आहे, त्यास हुसकावून द्या. त्याच्या नोकरीची गरज असेलच, तर त्याला नवीन जहागीर कर्नाटकात द्या; पण या डोंगरी मुलुखात त्याला ठेवू नका... तुम्ही दहा हजार स्वार एकदम पाठवून द्या... तुमच्या राज्यावर कोणी हल्ला केला, तर मी स्वत: तुमचे संरक्षण करीन.'२० यावरून औरंगजेबाच्या दुटप्पीपणाची कल्पना येते. मराठ्यांत आणि आदिलशाहीत भांडणे लावून देऊन त्यांना एकमेकांविरुद्ध लढवण्याचे आणि दोघांचीही शक्ती खच्ची करण्याची ही कपटनीती होती.

औरंगजेबाने २५ जानेवारी १६५८ रोजी उत्तरेकडे प्रयाण केले. दिल्लीस जाताना आपला ज्येष्ठ पुत्र मुअझ्झम याला त्याने दख्खनमध्ये कारभार पाहण्यासाठी मागे ठेवले. औरंगजेबाचा पहिला मुक्काम १० जून १६५८ आग्रा येथे झाला. त्यानंतर तो ५ जुलैला दिल्लीस पोचला.२१ जुलै १६५८मध्ये त्याने दिल्लीचे सिंहासन बळकावले. राजांनी ३० ऑगस्ट १६५८ला सोनोपंत डबीर यांना आपला वकील म्हणून दिल्ली दरबारात पाठवले. आपल्या तिन्ही भावांची एकामागून एक वासलात लावून १६५९च्या मे महिन्यात औरंगजेबाने राज्यारोहण केले. राज्यारूढ झाल्यावर त्याने आपला मामा शाईस्ताखान याची नेमणूक दख्खनवर केली. १६६६मध्ये शहाजहान मरण पावला. त्यानंतर औरंगजेब आग्र्याला गेला आणि २७ मार्च रोजी त्याचा राज्यारोहण समारंभ थाटाने पार पडला.

दक्षिण व उत्तर कोकणाची मोहीम संपल्यावर राजे स्वस्थ बसले नाहीत. १६५८चा दसरा झाल्यानंतर राजांनी कर्नाटकात मोहीम काढली. त्याचे उद्दिष्ट बहुधा मिळेल तितकी लूट मिळवणे, हे असावे. परंतु या मोहिमेबाबत विशेष तपशील उपलब्ध नाही. परंतु कदाचित तेरदाळ परगण्यावर त्यांनी हल्ला केला असावा. तेथील वृष्ण गौडा देसाई याने राजांना प्रभावीरीत्या तोंड दिल्याने राजांना परतावे लागले असावे, असा उपलब्ध दस्तऐवजात उल्लेख सापडतो.२१

कारवायांचे लष्करी विलेषण

१६५५ ते १६५८ या चार वर्षांत शिवाजीराजांनी एका बाजूस सुलतान आदिलशहाच्या मृत्यूमुळे आदिलशाहीत निर्माण झालेली पोकळी व अस्थैर्य आणि दुसऱ्या बाजूस औरंगजेबाकडे पुरेशा सैन्याचा अभाव व त्याचबरोबर सत्तापालटाच्या संबंधातील त्याची व्यग्रता या दोन्हीमुळे महाराष्ट्रात निर्माण झालेल्या संधिकालाचा उत्तम उपयोग करून स्वराज्याच्या विस्ताराचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पार पाडला.

त्यांनी या कालावधीत साधलेल्या स्वराज्याच्या विस्ताराचे प्रामुख्याने चार पैलू होते. पहिला, पुणे विभागातील शहाजींच्या मोकासाचा वडलांचे प्रतिनिधी म्हणून ते नियंत्रित करीत असलेल्या प्रदेशावरील ताबा आदिलशाहीच्या धोरणामुळे विवादास्पद झाला होता. औरंगजेबाकडून तो प्रदेश त्यांच्याकडेच राहील, याची हमी मिळवून तो मामला त्यांनी मिटवला होता. दुसरा, चंद्रराव मोरेकडून त्यांनी काबीज केलेला जावळीचा प्रदेश. तिसरा, सिद्दीकडून दंडा-राजपुरीच्या इलाख्याचा ताबा आणि चवथा, आदिलशाहीच्या उत्तर आणि दक्षिण कोकण

किनाऱ्यावरील प्रदेशावर कब्जा.२२

केवळ चार वर्षांच्या कालावधीत साध्य केलेल्या या अर्जिताचे परिमाण लक्षणीय होते. अत्यंत मर्यादित संसाधनांच्या साहाय्याने दोन शक्तिमान प्रतिस्पर्ध्यांशी एकाच वेळी सामना करून आपली उद्दिष्टे प्राप्त करण्यास अत्युच्च क्षमतेची आवश्यकता आहे. उत्तर कोकणातील भिवंडी, कल्याण आणि माहुली या रणनीतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या तीन स्थानांवर त्यांनी कब्जा केला. तुंग, तिकोना, प्रधानगड, लोहगड, विसापूर, कांगोरी, राजमाची हे कल्याण प्रांतातील किल्ले त्यांनी हस्तगत केले. त्याबरोबर कल्याणच्या खाडीत दुर्गाडी किल्ला बांधला. दक्षिण कोकणातील चौल, रेवदंडा, दंडा राजपुरी ही स्थाने आणि तळे, घोसाळे, सुवर्ण दुर्ग हे किल्ले त्यांनी काबीज केले.

चंद्रराव मोरेच्या जहागिरीचे महत्त्व यापूर्वी अधोरेखित केले आहेच. राजांची चंद्ररावाविरुद्धची मोहीम म्हणजे प्रत्यक्ष आदिलशाहीच्या सत्तेला सरळसरळ आव्हान होते . परंतु त्यांनी त्यासाठी अत्यंत उपयुक्त अशी वेळ शोधून काढली. त्यावेळी आदिलशाहीचे लक्ष मोगलांच्या आक्रमणाकडे वेधले होते. जावळीकडे पाहायला कोणालाही वेळ नाही, हे त्यांनी पुरेपूर जाणले होते. त्याचबरोबर जावळीच्या दुर्गमतेचा त्यांनी जास्तीत जास्त फायदा घेतला होता. सिद्दीच्या बाबतीत हीच परिस्थिती होती. सिद्दीसुद्धा आदिलशाहीचे फारसे ऐकत नव्हता, त्यामुळे त्याचा काटा परभारे निघतो आहे, याच्यात त्यांनाही खुशी होती.

थोडक्यात शिवाजीराजांनी अशा प्रदेशांची निवड केली होती, ज्यांच्या मालकीबाबत एक तर सर्वसाधारणपणे संभ्रम होता, वा ते मोगलांच्या किंवा आदिलशाहीच्या मुख्यस्रोतापासून दूर वावरत होते वा त्यांच्यावर आपली शक्ती खर्च करण्यावर मोगल किंवा आदिलशाही उत्सुक नव्हते. त्यामुळे या दोन्हीही सत्ता आपली इतर महत्त्वाची कामे सोडून राजांच्या मागे लागतील, याची शक्यता नव्हती. उपयुक्त राजकीय परिस्थिती, प्रतिस्पर्ध्यांच्या उणीवांचा पुरेपूर उपयोग, समुचित वेळ आणि समोर आलेल्या संधींचा जास्तीत जास्त फायदा करून घेण्याची क्षमता या चार घटकांद्वारा अत्यंत अल्प कालावधीत राजांनी साध्य केलेले यश स्पृहणीय होते.

प्रसिद्ध संरक्षणतत्त्वज्ञ सर बेसिल लिडेल हार्ट याच्या भाष्यानुसार 'तुमचे उद्दिष्ट तुमच्यापाशी उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या चौकटीत बसणारे असले पाहिजे. त्यासाठी उद्दिष्टाचे तर्वनिष्ठ विलेषण करणे आणि आपल्या क्षमतेची आणि मर्यादांची पुरेपूर जाणीव असणे आवश्येक आहे. आपल्या आवाक्याबाहेर असलेल्या उद्दिष्टामागे धावणे चुकीचे आहे.' शिवाजीराजांनी उत्तर आणि दक्षिण कोकणामध्ये या कारवायांचा आराखडा बनवताना आपल्या उद्दिष्टांची कसून तपासणी केली होती आणि ती आपल्यापाशी असलेल्या शिबंदीच्या करवी साध्य होतील, याची शहानिशा केली होती.

हार्ट पुढे म्हणतो, 'शत्रूची प्रतिकारशक्ती ज्या बाजूस किमान असेल, तिचीच निवड हल्ल्यासाठी केली पाहिजे. पूर्ण विचार न करता घाईघाईने निर्णय घेणे टाळले पाहिजे.' अगदी हेच औरंगजेबाच्या बाबतीत घडले होते. शहाजहानने त्याला बहुतांश सैन्य मावळाकडे रवाना करण्यास सांगितल्यानंतर त्याच्याकडे मोजकेच सैन्य उरले होते. हट्टाला पेटून त्या तोकड्या सैन्यानिशी तो कल्याणी किल्ल्यावर चालून गेला होता. शिवाजीराजांनी ही सुवर्णसंधी अचूक

हेरली आणि ते मोगलांच्या व आदिलशाहीच्या वेगवेगळ्या ठिकाणांवर चालून गेले आणि ती त्यांनी सहजगत्या काबीज केली. सैन्याचा मितव्यय, गतिमानता आणि आक्रमक चाल या तीन युद्धतत्त्वांचा त्यांनी चातुर्यपूर्ण उपयोग केला.

केव्हा आक्रमण करावे आणि केव्हा करू नये, याबाबतीत सुन्त्झूने मार्मिक भाष्य केले आहे. 'तुम्ही स्वत:ला अजेय बनवा आणि शत्रू जेव्हा असुरक्षित असेल, तेव्हाच त्याच्यावर हल्ला करा. ज्या जागेवर ते हरणार नाहीत, अशाच ठिकाणी मुरब्बी लढवय्ये मोर्चेबंदी करतात आणि शत्रूच्या पराभवाला कारणीभूत होऊ शकतील, अशा घटकांचा ते जास्तीजास्त फायदा घेतात.' शिवाजीराजांच्या कोकण मोहिमेत सुन्त्झूच्या या तत्त्वाच्या अंमलबजावणीची प्रकर्षाने जाणीव होते. राजांनी मोहीम हाती घेतली, ती औरंगजेब आणि बडी बेगम आपापल्या विवंचनेत गुंतलेले आहेत, हे पाहूनच.

औरंगजेबाने अभयदान दिल्यावरही जुन्नर आणि अहमदनगरवर हल्ला करण्याचा राजांचा निर्णय जोखीमपूर्ण होताच, परंतु कोणालाही संभ्रमात टाकणारा होता. औरंगजेबाचे डोळे दिल्लीकडे लागले आहेत, हे राजांनी हेरले होते. जुन्नर हे मोठे व्यापारी केंद्र होते. तिथे बराच आर्थिक लाभ होऊ शकेल, ही राजांची अटकळ होती. जुन्नरवरील हल्ला हा कोकणासारखा प्रदेशाचा ताबा घेण्यासाठी नव्हता. त्याच्यामागे केवळ अर्थनीती दडलेली होती. औरंगजेब एकदा का दिल्लीला पोचला आणि सत्ता काबीज करण्याकडे त्याचे लक्ष गुंतले की, आपण आपल्या वृत्याबद्दल साधा खेद व्यक्त केला आणि माफी व्यक्त केली की, तो हा प्रसंग विसरून जाईल, याची राजांना खातरी होती आणि नेमके तसेच घडले.

मोगल, आदिलशहा वा कुतुबशहा यांच्यापैकी कोणाकडेही सार्वभौम आरमार नव्हते. सिद्दी हा आदिलशाहीतर्फे सागरतटावर सत्ता गाजवत होता. मराठ्यांना कोकण किनारपट्टीवर परिणामकारकरीत्या नियंत्रण करायचे असेल, तर त्यांच्याकडे आरमारी शक्ती असली पाहिजे, हे जाणण्याचे दूरदर्शित्व फक्त राजांपाशी होते. वयाच्या २८व्या वर्षी सागरी सार्वभौमत्वाचे स्वप्न पाहणारा हा तरुण राजा आपल्या काळाच्या कित्येक दशकांनी पुढे होता. त्याचा आरंभ त्यांनी अत्यंत चातुर्याने आणि कोणालाही फारसा संशय येऊ न देता कसा केला, याचा उल्लेख पूर्वीच आला आहे. प्रथम त्यांनी व्यापारी तारवे बनवण्यास आरंभ केला आणि त्याच्यावर व्यापारी मालाची ये-जा सर्वांच्या नित्य व्यवहाराची झाल्यावर त्या व्यापारी तारव्यांच्या रक्षणासाठी त्यावर तोफा लादणे चालू केले. मराठ्यांच्या आरमाराची ही नांदी होती.

वसई ते राजापूर यांना जोडणारी सागरकिनाऱ्यावरील रेषा हा पाया आणि इंदापूर हा शिरोबिंदू असलेल्या त्रिकोणातील कोकणाचा प्रदेश राजांनी तीन-चार वर्षांत आपल्या नियंत्रणाखाली आणला होता. (नकाशा क्र. १२ पाहा.) 'त्याने वसई व चौलकडील पोर्तुगीज प्रदेश काबीज करून भिवंडी, कल्याण, पनवेल या बंदरांत लढाऊ गलबते बांधिली. चौलपासून बांद्यापर्यंत सर्व मुलूख त्याच्या ताब्यात आहे. त्यातील शहरे व समुद्राकाठची बंदरे त्याने काबीज करून संपत्ती पैदा केली आहे.' असे त्यावेळचे लेख सापडतात.२३ कोकणचा प्रदेश संरक्षणात्मक पवित्रा घेण्यास विशेषकरून अनुकूल होता. आपली हुकमत कोकण प्रदेशात प्रस्थापित करायची, हे राजांचे स्वराज्यस्थापनेमागील आरंभीचे उद्दिष्ट होते. परंतु आपल्या मर्यादित

संसाधनांची त्यांना स्पष्ट जाणीव होती. या वास्तवाचा त्यांना कधीही विसर पडला नाही. स्वराज्याच्या विस्ताराचा हा पहिला टप्पा राजांच्या त्या संकल्पनेचा भाग होता.

प्रतापगडची लढाई

अफझलखानाची निवड

१६५७ आणि ५८ या दोन वर्षांचा काळ विजापूरच्या सुलतानाला आव्हानात्मक ठरला. अली आदिलशहा आणि बडी साहिबा हे दोघेही त्यांच्याबद्दल विजापूरच्या सरदारांमध्ये विश्वास निर्माण करण्यात असमर्थ ठरले. वझीर खान अहंमद, बहलोलखान, रुस्तुम-इ-जमान हे वरिष्ठ सरदार फिके पडू लागले. तुर्की सरदार आणि दख्खनी सरदार एकमेकांचा द्वेष करीत आणि हे दोन्ही मुसलमान सरदार हिंदूंचा द्वेष करीत. या दुहीचा औरंगजेबाने पूर्ण फायदा करून घेतला आणि विजापूरवर आक्रमण केले. त्यात आपला पुत्र सामील आहे का, असे शहाजींना विचारल्यावर 'पुत्र माझ्या आज्ञेत वागत नाही, आपण त्याचे पाहिजे तसे पारिपत्य करावे', असे त्यांनी कळवले. हे आदिलशाहीला पटले, असे पुढील आदिलशाहीच्या फरमानावरून दिसते : 'तुमचा पुत्र शिवाजी याने जी बंडखोरी चालवली आहे, तीत तुमचा काही संबंध नाही, अशी आमची खातरी झाल्याने तुमचे सर्व मानमरातब तुम्हाकडे बहाल करण्यात येत आहेत.'२४

शहाजहानची तब्येत अधिकाधिक ढासळू लागल्याच्या बातम्या मिळाल्यावर औरंगजेब तातडीने दिल्लीस रवाना झाला. त्यानंतर शिवाजीराजांचे स्नायुबळ दिवसेंदिवस वाढत जाऊ लागले. त्यांना प्रतिरोध करणे हे आदिलशाहीसाठी महत्त्वाचे झाले. त्यांची आगेकूच थांबवली नाही, तर काही हिंदू सरदार त्यांची साथ देतील, अशी भीती बडीसाहिबांना वाटू लागली. जावळी, सिंहगड, पुरंदर ही मोक्याची ठिकाणे त्यांनी काबीज केली होती. त्यांच्याशी लढून किंवा कपटाने त्यांचा पाडाव करणे आता अत्यंत अपरिहार्य झाले होते.

शिवाजीराजे कर्नाटकातील मोहिमेवरून राजगडला १६५९च्या सुरुवातीला परत आले. त्यांनी कोकणपट्टीवर आपले शासन स्थापित केले होते. पोर्तुगीजांना स्वाभाविकच त्यांची भीती वाटू लागली. त्यामुळे आदिलशाहीबरोबर मराठ्यांनाही कर देणे त्यांना भाग पडू लागले. याबद्दल त्यांनी आदिलशाहीकडे तक्रार केली. आता आदिलशहाला शिवाजीचे निर्मूलन करण्यासाठी एका शक्तिशाली सरदाराची आवश्यकता होती. त्यासाठी अफझलखानच सर्वांत योग्य होता. वाईच्या महसुलाचे हक्क त्याच्याकडे होते. अफझलखान हा आदिलशाहीतील एक यशस्वी सरदार होता. त्याने कर्नाटकातील श्रीरंगपट्टण, कुर्नुल, बेदनुर, कांचीपुरम, मदुराई लढाया जिंकल्या होत्या. बडी साहिबा आणि अली आदिलशहाचा त्याच्यावर गहन विश्वास होता.

उंच व धिप्पाड शरीरयष्टीचा हा सरदार स्वत:ला 'काफिरांचा आणि बंडखोरांचा विनाशकारी आणि मूर्तिभंजक' असे अभिमानाने म्हणवत असे. अफझलखानाचे खरे नाव होते अब्दुल्ला. तो इब्राहिम आदिलशहाला शाही भटारखान्यातील एका स्वयंपाकिणीकडून झालेला अनौरस पुत्र होता. त्याचे शत्रू त्याच बिरुदाने त्याला हिणवत असत. याबद्दल त्याला चीड येत असे. त्यामुळे आपण सर्वांइतकेच नव्हे, तर त्यांच्यापेक्षा तसूभर अधिक श्रेष्ठ आहोत, हे सिद्ध

करण्याचा त्याचा सदैव आटापिटा असे.

त्याला बडी साहिबाने १६५८च्या नोव्हेंबरमध्ये वाटाघाटींसाठी पाचारण केले. अफझलखानाने ती कामगिरी आनंदाने स्वीकारली आणि प्रतिज्ञा केली की, 'या डोंगरातील उंदरास जिवंत अगर मेलेला पकडून मी येथे आणून रुजू करितो.'२५ अखेर एप्रिल किंवा मे १६५९मध्ये निर्णय घेण्यात आला. सर्व देशमुखांना अफझलखान वाईला पोचल्यावर त्याच्या झेंड्याखाली गोळा होण्याचे फरमान सुटले. हे आदेश १६ जून १६५९ला कान्होजी जेध्यांपाशी पोचले. त्यांनी राजगडावर जाऊन राजांना दाखवले. राजांनी त्याबद्दल फारशी पर्वा केली नाही. अपेक्षेनुसार एखादा विरळा देशमुख सोडून बाकी सर्वांनी शिवाजीराजांनाच साथ द्यायचे ठरवले.

१६५९च्या सप्टेंबर महिन्यात अफझलखानाने बारा हजारांचे निवडक सैन्य गोळा केले आणि राजगडाच्या दिशेने आगेकूच करण्यास तो तयार झाला.

शिवाजीराजे ११ जुलै १६५९ला जावळीला पोचले आणि ते तिथे पावसाळ्यामुळे ऑगस्ट महिन्याच्या अखेरीपर्यंत राहिले. सईबाई राजगडावर गंभीर आजारी होत्या. ५ सप्टेंबरला त्यांचे निधन झाले. शिवाजीराजांनी राजगडला त्यांचे दिवस केले आणि १८ सप्टेंबरला ते प्रतापगडला पोचले.

परस्पर सैन्यसंख्या

दोन्ही सैन्यांनी पावसाळ्याचे चार महिने एक-दुसऱ्याची माहिती गोळा करण्यात घालवले. शिवाजीराजांनीही आपल्या देशमुखांना लढाईसाठी गोळा होण्याचे बुलावे पाठवले. त्यानुसार कान्होजी जेधे, मरळ, शिळमकर, पासलकर, मारणे, ढमाले, बांदल, दोहर, बाबाजी भोसले वगैरे आपल्या शिबंद्यांसह हजर झाले. यातील बहुसंख्यांना अफझलखानाचे फरमानही मिळाले होते, परंतु त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. राजांचे सरदार तानाजी व सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक आणि मोरोपंत पिंगळे त्यांच्याबरोबर होतेच. शिवाजीराजांना बाकी किल्ल्यांवरही लोक ठेवणे आवश्य क होते. त्यामुळे त्यांच्याकडे किती सैन्य जमा झाले असेल, हे सांगणे कठीण आहे. नेतोजी पालकर १६५८मध्येच सरनोबत झाला होता. त्यालाही बोलावण्यात आले.

एप्रिल १६६०मध्ये वेंगुर्ल्यामधील डच प्रतिनिधीने गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, शिवाजीराजांनी अफझलखानावर ६००० पायदळ आणि २००० घोडदळानिशी हल्ला केला.२६ अफझलखानाकडे ३५,०००चे सैन्य होते, त्यात १२,००० घोडदळ, ८० ते ९० मोठ्या तोफा, ३०० ते ४०० छोट्या तोफा होत्या; यांसारखी अतिशयोक्तीपूर्ण विधाने अनेक ठिकाणी सापडतात. शिवाजीराजांचा विजय अधिक उठून दिसावा, हा यामागील हेतू असणे शक्य आहे. हेन्री रेविंग्टनने राजापूरहून सुरतेला लिहिलेल्या पत्रात लिहिले आहे की, बडी साहिबाने १०,०००चे घोडदळ पाठवले होते. हे अधिक विश्वसनीय वाटते. खानाकडे ३५,००० इतके अमाप सैन्य नसू शकण्याची दोन कारणे; पहिले, शिवाजीला मैत्रीचे आमिष दाखवून पकडण्याचा बडी साहिबाचा व खानाचा डाव होता आणि दुसरे इतके प्रचंड सैन्य शिवाजीराजांविरुद्ध पाठवण्यात राजांच्या सामर्थ्याला विनाकारण बढावा मिळाला असता आणि

आदिलशाहीची नाचक्की झाली असती. त्यामुळे वर लिहिल्यानुसार खानाबरोबर सुमारे बारा हजारांचे सैन्य असावे, हे अनुमान रास्त वाटते.

अफझलखानाचे वाईमध्ये घर होते. त्याने आपल्या बायका, मोठा मुलगा फाझल खान, दोन लहान मुले आणि अनेक मुस्लीम व हिंदू सरदार बरोबर नेले. वृष्णाजी भास्कर कुलकर्णी नावाचा त्याचा वकील होता. अफझलखान वाईला कारभारी असल्याने वृष्णाजी आणि त्याचे संबंध चांगले होते.

अफझलखानाचा पहिला मुक्काम विजापूरच्या चार मैल उत्तरेला होता. त्यानंतर तो पंढरपूरला पोचला. तिथे त्याने देवालयातील मूर्ती फोडल्या. नंतर तो ईशान्य दिशेत उलट्या बाजूस ४८ मैल जाऊन तुळजापूरला पोचला आणि तिथेही त्याने मूर्ती तोडल्या, असा दावा केला जातो, परंतु ते काम त्याने या मोहिमेत केले नसावे. पंढरपूरहून तो म्हसवड, दहीवड, माळवाडी, रहिमपूर, सातारामार्गे वाईला पोचला. मालवाडीला त्याने सईबाइंचा भाऊ बाळाजी निंबाळकर याला पकडले. बाळाजीला त्याआधी आदिलशहाच्या आदेशावरून मुसलमान करण्यात आले होते. परंतु परतल्यावर तो पुन्हा हिंदू झाला होता. अफझलखानाने त्याला पकडले आणि एकतर धर्मांतर किंवा मृत्यू या दोन पर्यायांतून एक निवडण्यास सांगितले. शेवटी दोन लाखांची लाच दिल्यावर हे प्रकरण सुटले आणि त्याला सोडण्यात आले.

वाईला पोचल्यावर खानाने आपला वकील वृष्णाजी याला शिवाजीराजांना भेटून त्यांना वाईला येण्याची गळ घालण्यास पाठवले. राजांची भेट झाल्यानंतर त्यांनी आपला वकील पंताजी गोपीनाथ बोकील याला अफझलखानाकडे रवाना केले. राजांच्या विश्वासराव नानाजी मुसेकर या सरदाराने फकिराच्या वेषात अफझलखानाच्या छावणीला भेट देऊन तेथील खडान्खडा बातमी राजांना दिली होती. शिवरायांनी खानाकडे निरोप पाठवला, ‘एवढ्या मोठ्या सैन्याशी सामना करण्याची ताकद माझ्यात नाही. झालेले अपराध पोटात घालून खान जीवदान देतील, तर मी आपल्या ताब्यातील सर्व मुलुख सोडून देण्यास तयार आहे.’

शिवाजीराजांनी वृष्णाजी भास्कराशी दुसऱ्या बैठकीत खाजगीत गाठ घेऊन त्याला स्वराज्याच्या अभियानास हातभार लावण्याचे आवाहन केले. उभयतांनी खानास किल्ल्याखाली भेटीस बोलवावे, असे ठरवले. मग दोन्ही वकिलांनी खानाकडे जाऊन प्रतापगडाखाली शिवाजीराजांच्या भेटीस येण्याबद्दल त्याचे मन वळवले. खानास आपल्या शक्तीची आणि शहाणपणाची घमेंड होती. ‘शिवाजी दुर्बळ आहे. एकदा विश्वास पटल्यावर तो कोठेही येईल’, अशी वकिलांची शिफारस ऐकल्यावर आपणच भेटीस जाण्याचे त्याने ठरवले.२७

वाईचा परिसर

वाईचे भौगालिक स्थान सभोवतालीच्या प्रदेशात मध्यवर्ती होतेच, पण सामरिक दृष्ट्यासुद्धा महत्त्वाचे होते. त्या परिसरातील सर्व रस्ते वाईमार्गे जात असत. वाई अफझलखानाची जहागीर होती. राजांनी जावळी घेतली, तेव्हा चंद्रराव मोरेचा नातलग प्रतापराव मोरे तिथून पळून गेला होता आणि तेव्हापासून विजापुरात राहात होता. त्याने अफझलखानाला सल्ला दिला होता की, शिवाजीराजांना पकडायचे असेल, तर त्याला जावळीला जाणे आवश्यिक आहे. शिवाजीराजे जावळीच्या सान्निध्यातील प्रतापगडावर राहतात, हे सर्वपरिचित होते.

अफझलखानाने प्रतापराव मोरेला आपल्याबरोबर नेले होते, कारण तो जावळीचा असल्यामुळे तो सर्व परिसर त्याच्या उत्तम परिचयाचा होता.

वाई आणि जावळीच्या खोऱ्यामधोमध सह्याद्रीची सरळसोट डोंगरसरी आणि महाबळेश्वरचे पठार होते. वाई जावळीच्या खोऱ्याच्या २०मैल पूर्वेला होते. (नकाशा क्र. १३ पाहा.) सह्याद्रीची रांग उत्तर दक्षिण दिशेत आहे. जावळीची उंची २५०० फूट आहे. महाबळेश्वर पठाराच्या उत्तरेला एक रांग पूर्व-पश्चिम दिशेत जाते. या रांगेच्या उत्तरेला वृष्णा नदी पश्चिमेकडून पूर्वेस वाहते. वाळकी नदीबरोबर संगम झाल्यानंतर ती आग्नेयेकडे वळते आणि मेणवलीमार्गे वाईला पोचते. तिच्या दक्षिणेला कोयना नदी जावळी खोऱ्यात सर्वसाधारणपणे वायव्येकडून आग्नेयेकडे वाहते, परंतु सह्याद्रीच्या शाखांच्या दिशेनुसार ती आपला प्रवाह बदलते. वृष्णा आणि कोयनेचा कराडला संगम होतो. सह्याद्री डोंगरसरीच्या शिखरांच्या भागात सरळसोट उभे आणि चढायला अवघड असे कडे होते. या कड्यांच्या माथ्यावर पोचले की, तिथून आजूबाजूच्या भागाचे उत्तम विहंगमावलोकन होऊ शकते.

वाईपासून जावळीला जाण्याचे त्या काळात दोन मार्ग होते. पहिला, वाईपासून बावधन, गुरेघर, केचपेंडामार्गे जावळीपर्यंत होता. त्यानंतर तो प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या पार या अत्यंत तुरळक वस्तीच्या खेड्यापर्यंत पोचे. ही वाट जरी उतार-चढाची असली, तरी अधिक वापरली जाई. दुसरा रस्ता वाईपासून पसर्णी, कासेगाव, चिखली, गुरेघरमार्गे महाबळेश्वरचे पठार ओलांडे आणि नंतर कोयना नदीच्या खोऱ्यातून प्रतापगडाच्या पायथ्याशी पोचे.

चंद्रराव मोरेच्या जावळी पराभवानंतर भारोप्याच्या डोंगरावर प्रतापगडचा किल्ला राजांच्या आदेशावरून मोरोपंत पिंगळ्यांनी बांधून घेतला होता, याचा पूर्वी उल्लेख आला आहे. शिवाजीराजांना त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशावरील प्रभुत्वाची लागलीच कल्पना आली होती आणि त्याचे सामरिक महत्त्व त्यांनी अचूक हेरले होते. प्रतापगड किल्ल्याची उंची ३५५६ फूट आहे. भोवतालच्या प्रदेशातील खोऱ्यात होणाऱ्या कोणत्याही मोठ्या प्रमाणातील हालचाली तिथून स्पष्ट दिसत. किल्ला एका छोट्या पठारावर बांधला होता आणि त्याचा पृष्ठभाग साधारणपणे वायव्य-आग्नेय दिशेत होता. त्याची उत्तर-दक्षिण लांबी ४५० गज आणि वायव्येकडून आग्नेयेकडील लांबी ८०० गज होती.


या संपूर्ण परिसरात दाट जंगल होते. त्याच्यातून मार्ग काढण्यासाठी वाटाड्यांची आवश्यपकता पडे. एकदा महाबळेश्वराचे पठार पार केले की, त्या परिसराशी परिचित नसलेल्याला जागोजागी रस्ता चुकणे संभवनीय होते

कोयनेच्या खोऱ्यात वाहणाऱ्या अनेक लहान-मोठ्या ओढ्यांमुळे खोऱ्यातून मार्गक्रमण त्रासाचे आणि अवघड होऊन जाते. पाठीवर वजन आणि शस्त्रे वाहून चालणाऱ्या सैनिकांना तर ते अधिकच क्लेशदायी होते आणि त्यांचा वेग मंदावतो. डोंगराळी प्रदेश पायदळाच्या कारवायांसाठी अधिक उपयुक्त असतो. घोडदळाला मुक्तपणे हालचाल करणे कठीण पडत असल्याने त्याला उपलब्ध वाटांमार्गेच जावे लागते; त्यामुळे त्याचा आक्रमक लष्करी कारवायांसाठी मर्यादित वापर होतो. दोन्ही बाजूंच्या उंच जागांवर बसलेले पायदळाचे सैनिक त्याच्या हालचालींना परिणामकारकपणे बाधा आणू शकतात. त्यामुळे जावळीच्या या खोऱ्यातील

लढाईवर प्रामुख्याने पायदळाचेच वर्चस्व असणे साहजिक होते. त्याचप्रमाणे डोंगराळी प्रदेशात तोफखान्याची परिणामकारकताही घटते आणि त्याचाही वापर मर्यादित प्रमाणातच केला जाऊ शकतो.

नकाशा क्र. १३

वाईचा परिसर



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

प्रतापगडाच्या पायथ्याला असलेल्या कोयनेच्या खोऱ्यात ही लढाई झाली. (नकाशा क्र. १४ पाहा.) तिथे पोचण्यास दोन वाटा होत्या. पहिली, वायव्येकडून रानकडेसरमार्गे अंबेनळी घाटातून कुंबरोशी होत प्रतापगडाच्या पायथ्याशी येऊन पोचे. दुसरी महाबळेश्वर घाटावरून येणाऱ्या वेगवेगळ्या पायवाटांवरून कोयना ओलांडून पारपार खेड्यापर्यंत पोचे. पूर्वेकडून येणाऱ्या वाटेवर एका पुलावरून कोयना ओलांडता येई. पुलाची समुद्रसपाटीपासून उंची २२८४ फूट होती. तिथून पारपारला पोचता येई. तो रस्ता सोनपारहून काही अंतर पश्चिमेच्या दिशेला जाऊन मग उत्तरेस वळे आणि पार नावाच्या खिंडीपर्यंत जाऊन पोचे. या दोन्हींपैकी शिवाजीराजांनी कुंबरोशीकडून येणारी वाट मोठमोठाली झाडे पाडून बंद करून टाकली होती. त्यामुळे अफझलखानाच्या सैन्याला फक्त कोयना नदीच्या काठाने येणाऱ्या मार्गानेच येण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

लढाईचा आराखडा


अफझलखानाला शिवाजीराजांचा पराभव करण्यासाठी पाठवण्याचा निर्णय विजापूरचा सुलतान अली आदिलशहाने १६५९च्या मे महिन्यात घेतला. 'शिवाजीला जिवंत किंवा मृत आणेन', या निर्धाराने अफझलखान जंगी सैन्यासह ऑक्टोबरच्या अखेरीस वाईला पोचला होता. 'शिवाजीराजे, तुम्ही पावलोपावली उद्धटपणा करीत आहात, तो आदिलशहाला बोचतो आहे. माझ्या आज्ञेप्रमाणे संधी करा आणि मुकाट्याने सर्व किल्ले आणि मुलूख माझ्या हवाली करा', असा अहंमन्य आणि उद्दाम निरोप त्याने लगेच वाईहून पाठवला. शिवाजीराजे निर्धास्त आणि निर्विकार होते. त्यांनी विनाविलंब उत्तर धाडले, 'आपण इथले वनवैभव पाहावयास नि:शंक मनाने यावे. आलात की, किल्ले आणि जावळी आपल्याला देतो.'

दोन्ही बाजूंच्या वकिलांची चर्चा झाली. प्रतापगडाच्या मेटावर उभारलेल्या शामियान्यात उभयतांची भेट व्हावी, दोघेही सशस्त्र असावेत, अफझलखानाने दोन-तीन सेवकांसहच यावे, दोघांनी बरोबर दहा-दहा सैनिक रक्षणासाठी आणावेत, शिवाजीराजांनी आदरसत्कार करावा आणि मग बोलणी व्हावीत; यावर संमती झाली. पंताजी गोपीनाथ अफझलखानाला भेटून आल्यावर खानाने आपले निमंत्रण स्वीकारल्याचे राजांना समजले. खान भेटीसाठी येणार असल्याचे ऐकून राजांनी त्याचा डाव लागलीच ओळखला. तो आपल्याला कपटाने ठार करण्याच्या हेतूनेच येत आहे, याची त्यांना तत्काळ जाणीव झाली. त्यांनी खानाशी दोन खडे हात करून त्याचाच डाव त्याच्यावर उलटवण्याचे ठरवले. त्यासाठी खान आपल्याबरोबर दहा रक्षकच आणू शकतो, अशी अट त्यांनी घातली. खानाच्या गळाभेटीदरम्यान त्याचा जर आपल्याला मारण्याचा विचार आहे, असे दिसले, तर त्याचा डाव उलटवण्याचा प्रयत्न करण्याचा त्यांनी निर्धार केला.

नकाशा क्र. १४

प्रतापगडची लढाई

१० नोव्हेंबर १६५९



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

खिरस्तपूर्व २२०साली सुप्रसिद्ध संरक्षणतज्ञ पॉलीबस याने एक मार्मिक भाष्य केले होते : ‘ज्याप्रमाणे तुम्ही जहाजाच्या सुकाणूधारकाला नाहीसे केले, तर ते जहाज शत्रूच्या हातात पडते, त्याचप्रमाणे जर तुम्ही कोणत्याही सेनेच्या सेनापतीला ठार करण्यात यशस्वी झालात, तर लवकरच ते सारे सैन्य निकामी आणि चीतपट होईल.’ अगदी हीच राजांच्या रणनीतीची मध्यवर्ती कल्पना होती. या कारवाईचे उद्दिष्ट अफझलखानाच्या सैन्याचा जास्तीत जास्त नाश साधून त्यानंतर ही लढाई पार शत्रूच्या गोटापर्यंत म्हणजे विजापूरपर्यंत नेणे हे होते.

खानाच्या बऱ्यापैकी मोठ्या संख्येच्या सैन्याचा आपल्या त्रोटक सैन्याकरवी पराभव करायचा असेल, तर गनिमी काव्याशिवाय दुसरा सुवर्णमार्ग नाही, हे शिवरायांनी पुरेपूर जाणले होते. खानाने स्वत:हून भेटीची मागणी केली होती. त्याचाच डाव त्याच्यावर उलटवून पहिल्यानेच आपण त्याला जबर जखमी केले, तर मग सुकाणूविना जहाजासारखी परिस्थिती झालेल्या त्याच्या सैन्यालाही गनिमी हल्ल्याने पळवून लावता येईल, याची त्यांना खातरी होती.

आपला खात्मा केल्यावर आपल्या अल्प शिबंदीवर तुटून पडण्याचा खानाचा विचार असेल, यात राजांना तसूभर संदेह नव्हता. त्यासाठी खानाची फौज जावळीच्या खोऱ्यात सज्ज असणार होती. ती तिथे पोचण्याआधीच आपली शिबंदी जावळीच्या जंगलात मोक्याच्या जागांवर विखरून जंगलात लपवून ठेवण्याचे त्यांनी आदेश दिले होते. त्याचबरोबर अंबेनळी खिंडीमार्गे येणारा मार्ग बंद करून खानाला फक्त जावळी खोऱ्यातून येण्याचा मार्गच खुला ठेवून त्याचे सर्व सैन्य त्या अरुंद खोऱ्यात कोंडायचे त्यांनी ठरवले. एकदा का आपण खानाला ठार केल्याचा संकेत आपल्या सैन्याला मिळाला की, कोयनेच्या खोऱ्यातील मार्गाची दोन्ही बाजूंनी कोंडी करून खानाच्या फौजेची होईल तितकी कत्तल करण्याचे त्यांनी योजले होते. खानाचे सैन्य असे उधळून लावले की, मिळेल त्या वाटेने ते विजापूरच्या दिशेने पलायन करण्याचा प्रयत्न करील. बिथरून माघारी पळणाऱ्या शत्रूच्या सैन्याचा पाठलाग करून त्याची जास्तीत जास्त हानी साधण्यासाठी ही सुवर्णघटिका असते. या कारवाईला लष्करी शास्त्रात ‘एक्सप्लॉयटेशन’ (यशसंवर्धन) अशी संज्ञा आहे. या कामासाठी नेतोजी पालकराचे घोडदळ आधीपासूनच महाबळेश्वर पठारावर सज्ज ठेवण्याचे त्यांनी ठरवले होते.

वरील रणनीतीवर राजांचा आराखडा आधारित होता. हे कार्य तीन टप्प्यांत उरकायची राजांची योजना होती. पहिल्या टप्प्यात अफझलखानाचा डाव त्याच्यावर उलटवून त्याला जबर जखमी करायचे. या बिनीच्या आणि असीम जोखमीच्या कामाचा संपूर्ण भार आपण स्वत: उचलण्याचे राजांनी ठरवले होते. खान जखमी झाल्यावर त्याला राजांनी ठार करायचे आणि नंतर राजांच्या अंगरक्षकांनी खानाबरोबर आलेल्या दहा-बारा लोकांना गारद करायचे होते. त्यानंतर प्रतापगडावरून तोफेचे तीन बार उडवून सर्वांनी खानाच्या सैन्यावर तुटून पडण्याचा संकेत दिला जाणार होता. दुसऱ्या टप्प्याच्या आरंभासाठी तो संकेत असणार होता. तो ऐकल्यावर आजूबाजूच्या झाडीत आधीपासूनच लपून बसलेल्या मावळ्यांनी खानाच्या सैन्यावर करारी हल्ला चढवून त्यांचा जास्तीत जास्त विध्वंस साधायचा होता. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात नेतोजी पालकर आणि ते स्वत: आपल्या घोडदळाच्या साहाय्याने पार विजापूर, कोल्हापूर, गोकाकपर्यंत मजल मारून आदिलशाहीच्या मुलखात खोलपर्यंत धाडी घालणार होते.

विस्मयकारकता आणि शाठ्य हे तत्त्व प्रत्येक टप्प्याला वापरण्यात येणार होते. पहिल्या टप्प्यात आपण अफझलखानावर वार करू शकतो, याची पुसट कल्पनाही त्याला येता कामा नये, याची राजे खबरदारी घेणार होते. त्यासाठी दोघांनीही वैयक्तिक शस्त्रासहित यावे, बरोबर प्रत्येकी फक्त दहा अंगरक्षक आणावेत, त्यांच्यापैकी फक्त दोघांनी शामियान्याच्या आत यावे, बाकीच्यांनी एकमेकांपासून बाणाच्या टप्प्याच्या अंतरावर राहावे, अफझलखानाने शामियान्यात प्रथम दुपारी बारा वाजता पोचावे आणि त्यानंतरच राजांनी गड उतरावा, ते खाली येताना अफझलखान त्यांना पाहू शकेल म्हणजे काही काळेबेरे वाटल्यास अफझलखान राजे यावयाच्या आधीच परत जाऊ शकेल; अशा वेगवेगळ्या प्रयोजनांकरवी खानाला गाफील ठेवण्याचा राजांचा बेत होता.

कुंबरोशीकडून येणारा मार्ग बंद करून अफझलखानाच्या सैन्याला जावळीच्या खोऱ्यात येण्यासाठी एकच मार्ग ठेवण्यात आला होता. मोरोपंतांचे पायदळाचे दोन दस्ते मोर्चेबंदी करून घनदाट झाडीत लपून बसणार होते: पहिला, कुंबरोशीच्या उत्तरेला आणि दुसरा, पार खिंडीपासून सोनपाराच्या पूर्वेस. हे दोन्ही दस्ते खानाचे सैन्य खोऱ्यात येऊ लागण्याच्या आधीच आपापले मोर्चे सावरून जय्यत तयारीत राहणार होते. त्यांना अशा जागी ठेवण्यात आले होते की, वायव्य दिशेने कुंबरोशीकडून आणि पश्चिम दिशेने पार खिंडीकडून उतारावर येऊन ते सोनपारपासून कोयना पुलापर्यंत पसरलेल्या आणि त्याच्या उत्तरेस कोयनेच्या अरुंद खोऱ्यात दाटीवाटीने बसलेल्या खानाच्या सैन्याला वैचीत पकडून प्रहार करू शकतील.

खानाला १५०० सैनिकांची तुकडी त्याच्याबरोबर आणण्यास परवानगी देण्यात आली होती, परंतु त्यांना गडापासून सात-आठशे गजांच्या अंतरावर असलेल्या एका पठारावर थांबण्यास सांगण्यात आले होते. ते तिथे साधारणपणे दहा-साडेदहाच्या सुमारास पोचण्याआधी कान्होजी जेधे आणि बांदल या दोघांच्या तुकड्या तिथे पोचणार होत्या आणि तिथल्या घनदाट झाडीत कोणतीही हालचाल न करता लपून बसणार होत्या. या सर्व तयारीमुळे दुसरा टप्पा आरंभ होईपर्यंत खानाच्या सैन्याला आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याचा त्याला थोडाही माग लागणार नव्हता.

दिवस आणि वेळ ठरवण्यासाठी दोन्ही वकिलांची पुन्हा एकदा भेट झाली. गुरुवार दिनांक १० नोव्हेंबर १६५९ रोजी दुपारी बारा वाजता प्रतापगडाच्या माथ्यापासून ४०० गजांच्या अंतरावर उतारावरील एका सपाट भागावर उभारलेल्या शामियान्यात भेटण्याचे ठरले. खानाचे सैन्य वाईहून दोन-तीन दिवस आधी निघून पसर्णी, कासेगाव, गुरेघर मार्गे पार गावाच्या परिसरात येऊन पोचले. वाई ते जावळीपर्यंत आणि त्यापुढे कोयनेच्या खोऱ्यातून उतरताना त्यांना अपार कष्ट पडले. तिथे पोचता पोचता ते पार थकून गेले आणि दहा-बारा हजारांहून अधिक संख्येने आलेले हे सैन्य त्या अरुंद जागेत मिळेल त्या ठिकाणी कसेबसे पसरले. खान सर्व बाजूंनी कोंडला गेला होता.२८

बुधवारी संध्याकाळी सर्व सरदारांना शिवाजीराजांनी एकत्र करून योजना पुन्हा समजावून सांगितली. कोयनेच्या पूर्वेस असलेल्या बोचेघोळीच्या घाटात बाळाजी नाईक शिळमकर याला खानाच्या लष्करास घाट चढू न देणाचे काम होते. गडाच्या नैर्ऋत्येस असलेल्या पारघाटात

मोरोपंत पिंगळे, शामराजपंत रांझेकर व त्रयंबक भास्कर यांचे पायदळ होते. दुसरी तुकडी कुंबरोशी घाटात होती. कान्होजी जेधे आणि बांदल देशमुख यांनीही अफझलखानाच्या १५०० सैनिकांच्या ताफ्यावर हल्ला चढवायचा होता. नेतोजी पालकरबरोबर पाचशे स्वार महाबळेश्वर पठारावर सज्ज राहणार होते. तो एकतर जावळीमध्ये चाललेल्या लढाईत कुमक लागल्यास खाली उतरून येणार होता किंवा जावळीतील लढाई संपण्याची चिन्हे दिसू लागली की, वाईच्या दिशेने आगेकूच करणार होता. तिथे तो राजे येण्याची वाट पाहणार होता. दोरोजीला राजापूरला जाऊन अफझलखानाची तीन जहाजे हस्तगत करण्याचे काम दिले होते.

बारा वाजल्यानंतर काही क्षणांतच गडावरून तीन तोफांच्या बाराचा आवाज ऐकला की, सगळ्यांनी खानाच्या फौजेवर तुटून पडायचे होते. राजांबरोबर जाण्यासाठी काताजी इंगळे, येसाजी वंक, कोंडाजी वंक, जिवा महाला, संभाजी करवर, वृष्णाजी गायकवाड, सूरजी काटे, विसाजी मुरुंबक, संभाजी कावजी (कोंढाळकर) आणि सिद्दी इब्राहिमखान या दहा अंगरक्षकांची निवड करण्यात आली होती. सर्वांना आपापल्या कामाची पूर्ण समज आली आहे, याची खातरी झाल्यावर राजांनी सर्व सरदारांना आपापल्या जागी परतण्याची आज्ञा दिली.

राजांनी मग गोमाजी नाईक पानसंबळ, वृष्णाजी नाईक, सुभानजी नाईक, निलोपंत, अण्णाजीपंत, सोनोपंत, गंगाजी मंगजी, माणकोजी दहातोंडे, वृष्णाजी बंककर इत्यादी खासे मुत्सद्दयांशी अफझलखानाच्या गळाभेटीबद्दल सविस्तर चर्चा केली. राजांनी अंगात चिलखत, डोक्यावर मंदिलाच्या खाली शिरस्त्राण, अस्तनीत बिचवा, पंजात वाघनखे आणि तलवार या शस्त्रांसहित जावे, असे ठरले. भेटीच्या वेळी खान कसा वागेल आणि आपला काय प्रतिसाद असेल, या संपूर्ण प्रक्रियेच्या क्षणाक्षणाची चिरफाड करून त्यांनी आपला स्वत:च्या कारवाईचा आराखडा बनवला असावा आणि त्याची एक रंगीत तालीम सर्वांच्या साहाय्याने केली असावी. इतक्या जोखमीच्या कामगिरीचा सखोल विचार न करता त्यांनी तिला हात घातला नसावा. राजांच्या नम्र आणि परिपक्व व्यक्तिमत्त्वाचा हा स्पृहणीय पैलू होता. आपल्या साथीदारांशी आणि वरिष्ठ सल्लागारांशी सल्लामसलत करण्यात त्यांना कधीही कमीपणा वाटत नसे.

लढाईचा पहिला टप्पा

सात फुटांपेक्षा उंच धिप्पाड शरीराचा अब्दुल्ला ऊर्फ अफझलखान इब्राहीम आदिलशहाचा अनौरस पुत्र. 'स्वयंपाकिणीचा मुलगा' म्हणून सदैव हिणवला गेलेला आणि म्हणूनच सदैव आपल्या अस्मितेच्या शोधात वणवण भटकणारा अफझलखान अत्यंत शूर सरदार होता. भरीव लष्करी कामगिरी पदरी असलेला. 'कातिल-इ-मुतमर्रीदान काफिरान' म्हणजे 'बंडखोर आणि काफिरांची कत्तल करणारा' अशा ख्यातीचा. 'तो अजिंक्य महावीर चालू लागला म्हणजे सातही कुलपर्वत डळमळू लागतात, सात समुद्र प्रक्षुब्ध होतात आणि सातही द्वीप खचतात,' असे त्याचे 'शिवभारता'त केलेले वर्णन. शहाजींना त्यांचा कट्टर द्वेष्टा मुस्तफाखान याने जिंजीत कपटाने वैद केल्यावर त्यांना बेड्या घालून विजापुरातून त्यांची धिंड काढण्याचा पाशवी आनंद भोगणारा हा सरनोबत.

१० नोव्हेंबर १६५९ हा भेटीचा दिवस उजाडला होता. कोयनेच्या तीरावर अफझलखानाची छावणी सुस्तपणे आडवी झाली होती. खानाचा आनंद गगनात मावत नव्हता. शिवाजी सापळ्यात आपणहून येण्यास तयार झाला होता. आपल्या कपटाने खानाने अद्यापपर्यंत अनेक बाज्या मारल्या होत्या. शिऱ्याचा राजा कस्तुरीरंगन तह करण्यासाठी भेटायला आला असताना त्याला दगाबाजीने खानाने ठार केले होते. अगदी त्याच डावपेचाचा वापर करून शिवाजी जेव्हा स्वागतासाठी मिठी मारेल, त्यावेळी आपल्या अजस्र बाहूंमध्ये त्याला करकचून आवळायचे, त्याचा चोळामोळा करायचा आणि झपाट्याने त्याच्या पाठीत कट्यार घुसवायची, जिवंत कशाला, मृत शिवाजीची मुंडीच विजापूरला न्यायची आणि त्याबरोबर कोयनातीरी असलेल्या सैन्याकरवी मराठा सेनेचा चेंदामेंदा करायचा; हा सरळसोट बेत होता. फसण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

बोथट बुद्धीच्या त्या आडदांड शरीराची कपट-योजना राजांनी अचूक हेरली होती. खडताळ मावळात बालपण घालवलेल्या त्या काटक आणि तरतरीत तनूला खानाच्या मिठीतून निसटून त्याच्याच पोटात तलवार कशी खुपसायची, या धोबीपछाडीची पुरेपूर माहिती होती. शामियान्यात प्रवेश केल्यापासून खानाला यमसदनास पाठवण्यापर्यंतच्या प्रत्येक हालचालीचा आराखडा त्यांनी मनोमन बनवला होता आणि त्याची वारंवार उजळणी केली होती. आपल्या बरोबरचे दहा सोबती त्यांनी काळजीपूर्वक निवडले होते आणि त्यांना सविस्तर आदेश दिले होते. काताजी इंगळे, येसाजी वंक, जिवा महाला, सिद्दी इब्राहिम यांच्यासारख्या तडफदार, शूर वीरांचा त्यांच्यात समावेश होता. कोयनेच्या खोऱ्यात मोरोपंत पिंगळे, जेधे, बांदल यांच्या तुकड्यांनी खानाच्या सैन्याला मागमूस लागू न देता वेढा घालून माघारीच्या सर्व वाटा गोठवून टाकल्या होत्या. खानाचा खातमा झाल्याचा संकेत देणारे तोफेचे तीन बार उडाले की, कोयनेच्या पात्रात अडकलेल्या गाफील आदिलशाही सेनेवर तुटून पडायचे आणि तिचा फन्ना कसा उडवायचा, हे प्रत्येकाला माहीत होते.

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीचा दिवस. शिवाजीराजांनी शंकराची पूजा केली. तुळजाभवानीची प्रार्थना केली. झग्याखाली चिलखत घातले. पोलादाचे शिरस्त्राण घालून त्यावर तुऱ्याचा शुभ्र जरीटोप परिधान केला. कमरबंदात खंजीर घालून तो शेल्याखाली लपवला. तलवार म्यान केली आणि दहा अंगरक्षकांसहित प्रतापगड उतरून ते बारा वाजता शामियान्याजवळ दाखल झाले. राजांनी एक अत्यंत संकटप्रवण निर्णय घेतला होता. सिंहाच्या गुहेत ते स्वत:हून शिरत होते. खानाच्या सैन्याला पराभूत करण्यासाठी त्यांच्या मते एकमेव उपाय होता. तो म्हणजे खुद्द खानाचा वध. अफझलखानाने स्वत: त्यांच्या भेटीची मागणी केली होती आणि त्याला जवळून हाताळण्याची ती अपूर्व संधी चालून आली होती. काम एकदा हाती घेतल्यावर फत्ते झाले नाही, तर कमालीचे घातक ठरले असते. ते दिव्य बिनचूक पार पडण्याची धमक फक्त राजांच्यातच होती. आघाडीवरून नेतृत्व करण्याचे यापेक्षा अधिक ज्वलंत उदाहरण दुसरे नसावे.

पंताजी बोकील खानाला आणण्यासाठी गेले. खानाने भरजरी झगा पेहेनला होता. ‘या शहाजीच्या बच्च्याला भेटण्यासाठी चिलखत कशाला घालेन मी? काय डरतो का काय

त्याला?' या विचाराने त्याने चिलखत घातले नाही. आपल्या अस्तनीत त्याने कट्यार लपवली. कमरेस तलवार लटकावली. पालखीत बसून तो निघाला. त्याच्यामागे दीड हजार शस्त्रधारी हशम चालू लागले. पंताजींनी त्याला आक्षेप घेतला. 'इतका जमाव घेऊन गेलीयाने राजा धाशत खाईल. माघारी गडावर जाईल. भेटी होणार नाहीत. शिवाजी म्हणजे काय? त्यास इतका सामान काय करावा?'२९ पंताजींनी तर खानाच्या अस्मितेची तार अलगद छेडली होती. खान केवळ त्याचा वकील वृष्णाजी भास्कर आणि सय्यद बंडा, अब्दुल सय्यद, पहिलवानखान, रहिमखान, पिलाजी मोहिते, शंकराजी मोहिते वगैरे दहा अंगरक्षक घेऊन गड चढू लागला.

भेटीचा शामियाना पाहून खानाची तबियत खुश झाली. सदरेवर खान, दोन्ही बाजूंचे वकील आणि सय्यद बंडा एवढेच होते. पंतांनी राजांकडे निरोप धाडला. राजांना सर्व बाजूच्या जय्यत तयारीचे निरोप मिळाले होते. त्यांनी जमलेल्या वरिष्ठांना सांगितले, 'जर अफझलखान मारून जय मिळाला, तर माझा मीच आहे. इकडे समयी युद्धी प्राणनाश जाहला, तरी संभाजी राजे आहेत. त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेत तुम्ही राहणे.'३०

जासूद पोचला, तेव्हा राजे गड उतरू लागले होते. शामियान्यात कोण आहेत, हे वाटेत विचारता जासुदाने सय्यद बंडाचे नाव घेतले. राजांनी पंताजींना बोलावून सांगितले, 'जैसे महाराज (शहाजी राजे), तैसे खान. आपण खानाचा भतीजा होय. ते वडील. सैद बंडा खानाजवळ आहे त्याकरिता शंका वाटते. हा सैद बंडा इतका त्यातून दूर पाठवणे.'३१ पंताजींनी खानाला हा निरोप सांगितला आणि सय्यद बंडाला बाहेर पाठवण्याची परवानगी त्याच्याकडून घेतली. बंडा दूर जाऊन इतर दहा अंगरक्षकांच्यात जाऊन मिळाला.

शिवाजीराजे आलेले पाहून अफझलखानाने आपल्या सद्भावनेचे प्रदर्शन करण्यासाठी तलवार वकील वृष्णाजी भास्कराकडे सुपूर्द केली. आपले हात पसरून तो राजांपाशी गेला. 'आओ, शिवाजीराजे, हमारी बाहों में आओ. आपके वालीद हमारे जानी दोस्त थे. आपको मिलने के लिये हम सदियों से तरस रहे हैं', मोठ्या अदबीने खान बोलला. शिवाजीराजे पुढे येताच उजव्या हाताने कट्यार काढून ती खानाने राजांच्या डाव्या कुशीत खुपसली. परंतु सावध राजांनी तो वार चापल्यपूर्णतेने चुकवला, विजेच्या वेगाने आपली तलवार उपसली आणि क्षणार्धात तिने खानाच्या कोथळ्याचा ठाव घेतला. खान एखाद्या भुशाच्या पोत्यासारखा खाली कोसळला. हातांत साखळदंडाने वेढलेल्या व शरमेने मान खाली घालून विजापूरच्या भररस्त्रयातून चालणाऱ्या आपल्या पूज्य पित्याचे प्रतिबिंब अचानक राजांच्या मन:चक्षूंसमोरून गुजरले. राजांनी बाहेर काढलेली तलवार म्यान केली.

खानाची तलवार त्याचा वकील कृष्णाजी भास्कराच्या हातात होती. ती उपसून तो राजांवर चालून गेला; परंतु पट्ट्याचा वार करून राजांनी त्याला क्षणात ठार केले.३२ खानाची किंकाळी ऐकून सय्यद बंडा धावत आला, परंतु राजांवर वार करण्याआधी जिवा महालाने त्याचा हात खांद्यापासून वेगळा केला. भोयांनी पालखी खानाजवळ आणली. परंतु संभाजी कावजीने त्वरेने त्यांचे पाय तोडले आणि खानाचे शीर धडापासून वेगळे केले. महाराज, जिवा महाला आणि संभाजी कावजी गडाकडे रवाना झाले. खानाचे सर्व अंगरक्षक आणि वकील यांना

यमसदनी पाठवण्यात आले. दुपारचे दोन वाजले होते. शामियान्यातील एकाने तुतारी फुंकली. लागलीच तोफेच्या एकामागून एक तीन बारांचा आवाज साऱ्या जावळी खोऱ्यात दुमदुमला.

लढाईचा दुसरा टप्पा

तुतारीचा आवाज ऐकल्यावरच बांदल देशमुख आणि कान्होजी जेध्यांच्या झाडाझाडांमध्ये लपून बसलेल्या मावळ्यांनी खाली उड्या टाकल्या आणि खानाच्या दीड हजार हशमांवर त्यांनी करारी हल्ला चढवला. तिकडे पार खिंडीमधील मोरोपंतांची तुकडी सोनपारला वेगाने उतरली आणि तळावरील तिथून पुलापर्यंत पसरलेल्या खानाच्या गाफील सेनेवर त्यांनी हल्लाबोल केला. दुसऱ्या बाजूस अंबेनळी घाटामधील त्यांची शिबंदी जावळीला पोचली. खानाचे जड सामान, हत्ती, घोडे, तोफा तिथे होत्या. प्रतापगडाच्या पायथ्याशी काय चालले आहे, याची त्यांना तसूभरही कल्पना नव्हती. त्यांच्यावर मावळ्यांची वावटळ अचानक कोसळली आणि घनघोर लढाई जुंपली.

दुपारी दोन वाजता खान मारला गेला होता. सर्वत्र लढाईला वेग येईपावेतो दुपारचे चार-साडेचार होऊन गेले होते. खानाचे लोक ज्या बाजूला जातील, तिथे त्यांना वाट पूर्णत: बंद झालेली सापडली. संध्याकाळी सहा वाजता सूर्यास्ताची वेळ होती. साडेपाच वाजतात तोपर्यंत खोऱ्यात अंधार पसरला होता. मिळेल त्या दिशेला खानाची सेना पांगली. अंधार पडल्यावर खानाच्या उरल्यासुरल्या लोकांनी तर आशाच सोडली.

संध्याकाळच्या सहा-साडेसहापर्यंत लढाई संपली होती. आदिलशाही सेनेचा अक्षरश: धुव्वा उडाला होता. मराठ्यांचे १७३४ मावळे मारले गेले होते व ४२७ जखमी झाले होते. खानाच्या सैन्यातील ३०००हून अधिक लोक मारले गेले. मंबाजी भोसले, शामराव पद्मनाभी वगैरे राजांचे सरदार कामी आले; तर झुंझारराव घाटगे, रणदुल्लाखान, अंबरखान व अफझलखानाचे दोन पुत्र वैद झाले. खानाच्या सैन्यातील काही सरदारांनी मराठा सैन्यात सामील व्हायचे ठरवले आणि ते शिवाजीराजांना येऊन मिळाले. झुंझारराव घाटगे हे प्रतिष्ठित सरदार शहाजींचे स्नेही होते. ते मराठा सैन्यात राहण्यास तयार नव्हते. त्यांना राजांनी सन्मानाने परत पाठवले. द्रव्याच्या लालचीने खंडूजी खोपडे या सरदाराने अफझलखानाचा मोठा मुलगा फाझलखान आणि बायकामाणसांना सुरक्षित स्थानी नेऊन पोचवले. हे नंतर कळल्यावर राजांनी त्याचा शिरच्छेद करवला. एकूण ९५ हत्ती, ४००० घोडे, १२०० उंट, ७० तोफा, तीन लक्षांचे जडजवाहीर, दोन हजार कापडाची ठाणे, सात लक्ष नगद मोहरा व सोन्याचे होन मराठ्यांच्या हातात पडले.३३

लढाईचा तिसरा टप्पा

लढाई मराठ्यांच्या बाजूला झुकते आहे, हे दिसल्यानंतर नेतोजीने आपल्या ५०० स्वारांनिशी वाईच्या दिशेने कूच केले. परंतु नेतोजी वाईला पोचायच्या आधीच खानाचा सरदार फाझलखान खंडूजी खोपड्याचे हात ओले करून वाईपर्यंत पोचू शकला होता आणि तेथील लोकांना गोळा करून विजापूरच्या दिशेने रवाना झाला होता. नेतोजीने त्यांचा पाठलाग केला;


परंतु त्यांना तो गाठू शकला नाही आणि वाईला पहाटे परतला. शिवाजीराजांनी खानाच्या सैन्यातील हाती पडलेले घोडे आपल्या पूर्वनिर्धारित बारगीरांना देऊन तुकडीची संख्या वाढवली आणि ते नेतोजीच्या तुकडीबरोबर जाऊन मिळण्यासाठी निघाले. राजे आपल्याबरोबर ५००० घोड्यांचा दस्ता घेऊन पहाटे वाईला पोचले. (नकाशा क्र. १५ पाहा.)

राजांनी चंदनगड आणि वंदनगड हे दोन किल्ले काबीज करण्यासाठी तुकड्या पाठवल्या. त्याचबरोबर ठरल्यानुसार अफझलखानाची कोकण समुद्रावरील दोन जहाजे हस्तगत करण्यासाठी दोरोजी रवाना झाला.

नेतोजीने सरळ हुक्केरीच्या दिशेने कूच केले. गोकाक, गदग, धारवाडच्या आग्नेयेस लक्ष्मेश्वरपर्यंत त्याने धडक मारली आणि कोल्हापूरला पोचला. या सर्व ठिकाणांवर धाडी टाकून त्याने खंडणी गोळा केली. त्यानंतर तो विजापूरच्या दिशेला १५० मैल आदिलशाहीच्या प्रदेशात गेला. त्याचे मुख्य उद्दिष्ट दहशत पसरवून आदिलशहाला धडा शिकवण्याचे होते.

शिवाजीराजे स्वत:बरोबर ५००० स्वारांचे घोडदळ घेऊन दक्षिणेकडे निघाले. त्यांनी दोन अक्षांवर आगेकूच केली : पहिला, वाई-कराड-कोल्हापूर आणि दुसरा वाई-खटाव-विसापूर-कोल्हापूर.३४ त्यांनी २५ नोव्हेंबरला कोल्हापुरात प्रवेश केला. नेतोजी त्यांना त्याच दिवशी येऊन मिळाला. रुस्तुम-इ-जमान हा सरदार विजापूरच्या वतीने कोल्हापूर प्रांताचा सुभेदार होता. पन्हाळगड, पावनगड, विशाळगड ऊर्फ खेळणा आणि रांगणा हे मजबूत किल्ले त्या प्रांतात होते आणि ते काबीज करण्याचा मनोदय राजांच्या मनात कित्येक दिवस घर करून होता. हे स्वप्न साकार करण्याचा मुहूर्त आता निकट येऊन ठेपला होता.

नकाशा क्र. १५
आदिलशाहीवर धडक
१६५९-६०



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

राजांनी वाईहून निघून वाटेतील खटाव, मायणी, रामपूर, कलेढोण, वाळवे, हलजयंतिका, अष्टी, अष्टे, वडगाव, वेळापूर, औदुंबर, मसूर, कराड, सुपे, तांबे, पाळी, नेरले, कामेरी, सावे, उरण, कोळे आणि कोल्हापूर या गावांवर कब्जा केला.३५

पन्हाळ्याच्या हिंदू किल्लेदाराशी संधान बांधून अनाजी दत्तोकरवी राजांनी २८ नोव्हेंबरच्या १६५९च्या रात्री पन्हाळा युक्तीने काबीज केला. 'शिवभारत'कारांच्या मते त्यासाठी त्यांना लढावे लागले. परंतु सभासद आणि इतर संदर्भांनुसार त्यांनी तो भेदनीती वापरून मिळवला. ते अधिक विश्वसनीय वाटते. केवळ घोडदळाच्या साहाय्याने पन्हाळ्यासारखा अभेद्य किल्ला काबीज करणे कठीण होते. त्यांनी वसंतगडही घेतला. त्यानंतर रांगणा आणि खेळणा हे दोन किल्ले त्यांना लढून घ्यावे लागले. खेळण्यास त्यांनी विशाळगड असे नाव दिले.

प्रतापगडाच्या लढाईच्या तिसऱ्या टप्प्याची ही अखेर होती. त्याचबरोबर आदिलशाहीने आपणहून आरंभ केलेले प्रतापगडाचे युद्ध समाप्त झाले होते.

युद्धानंतर राजांनी त्यातील प्रत्येकाच्या योगदानाची दखल दिली. जे जखमी झाले, त्यांना प्रत्येकी पन्नास-शंभर होन दिले. धारकऱ्यांना हत्ती, घोडे, कंठमाला, पदके दिली. पंताजी, जिवा महाला, कान्होजी जेधे, कावजी कोंढाळकर वगैरे निष्ठावंत सहकाऱ्यांचा यथोचित गौरव केला.

पंताजींबद्दल राजांच्या मनात अपार आदर होता. त्याबाबतीतील एक किस्सा राजांच्या विशाल मनाची झळाळी दाखवतो. पंताजी अंबोडा गावी गेलेले असताना रायाजी देशमुख नावाचा एक तरुण त्यांच्या अंगावर चालून गेला. राजांना हे जेव्हा कळले, तेव्हा ते अत्यंत संतापले आणि त्यांनी तिथल्या कारभाऱ्याला पत्र लिहिले, 'पंडित माइळे बहुत थोर मनुष्य आहेत. साहेबाचे मेहेरबानीत ते बहुत काही आहेत. असे असता तुम्ही लहान लोकी त्यासी बेअदबी केली. तरी साहेबांची रावेशी तुम्हास ठावकीच आहे. याउपरी कुळ लोक तुम्ही पंडित माइळेपासी जाऊनु आपला गुन्हा त्यापासुनु माफ करुनु घेणे. जरी सदरहू लिहिलेप्रमाणे अंमल न करा आणि ती तालिक रुजू राहे त्याचा बयेदा वारिला नाही म्हणिजे साहेब तमाम रजपुतांचे पायी बेडिया घालून किले राजगडावर ठेऊन धोंडे वाहवतील यैसे रीती समजोनु पंडीत माइळे साहेबाचे जागी समजोनु आदब वरखुद राखत जाणे.'३६ (या पत्राचा सारांश असा की, 'पंताजी हे थोर गृहस्थ आहेत. त्यांचा असा अनादर तुम्ही करायला नको होता. सर्वांनी जाऊन त्यांची माफी मागावी.') पंताजी गोपीनाथांनी अफझलखानाच्या भेटीवेळी केलेल्या कामगिरीबद्दल राजांच्या मनात किती वृतज्ञता होती आणि ती चुकती करण्यासाठी ते कधीही कसे कचरले नाहीत, हे यावरून समजेल.

लष्करी विलेषण

प्रतापगडची लढाई ही लष्करी इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरलेली लढाई आहे. तिची तुलना जगातील उत्तमोत्तम लढायांशी करता येईल. किंबहुना आक्रमक संरक्षण नीतीचे याच्यापेक्षा समर्पक उदाहरण सापडणे कठीण होईल. दहा-बारा हजारांच्या सैन्यानिशी आलेल्या एका मुरब्बी सेनापतीचा तिशी न ओलांडलेल्या एका तरुण राजाने अडीच-तीन हजारांच्या तोकड्या

सैन्याकरवी केवळ आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि वैयक्तिक शौर्याच्या जोरावर केलेल्या या दारुण पराभवासाठी कोणतीही प्रशंसा आणि गुणसंकीर्तन अपुरे पडेल. शिवाजीराजांच्या साडेतीन दशकांच्या लष्करी कारकिर्दीतील हा सर्वांत देदीप्यमान विजय होता, असे म्हणणे चूक ठरणार नाही.

प्रतापगडाच्या विजयाच्या श्रेयाचे पाईक अनेक होते, परंतु त्यातला सिंहाचा वाटा सेनापतीलाच जायला पाहिजे. 'लडे सिपाही, नाम सरदार का' अशी एक सुपरिचित उक्ती आहे. परंतु प्रतापगडाच्या बाबतीत मात्र नाव प्रामुख्याने सेनापतीचेच व्हायला पाहिजे. राजांच्या रणनीतीचे आणि प्रत्यक्ष लढाईचे विलेषण करण्याच्या आधी राजांच्या वैयक्तिक शौर्याला पुरी दाद मिळणे आवश्यकक आहे.

अफझलखानाला बडी साहिबांनी गळाभेटी दरम्यानच शत्रूला गारद करण्याच्या सूचना दिल्या असल्याची बातमी जेव्हा गुप्तहेरांनी आणली, तेव्हा अफझलखान आपल्याला भेटीदरम्यान मारण्याचा प्रयत्न करील, याची राजांना निश्चित जाणीव झाली. इतर कोणत्याही राजाने ही भेट होऊ न देण्याचा आटोकाट प्रयत्न केला असता. परंतु राजांचा प्रतिसाद अगदी उलट होता. या आव्हानाचे संधीत रूपांतर करण्याचे त्यांनी त्या क्षणीच मनाशी पक्के ठरवले. त्याला जिवंत जाऊ न द्यायचा शिवाजीराजांनी निर्धार केला. हे बोलणे सोपे आहे. अफझलखानासारख्या आडदांड आणि धिप्पाड वज्रदेहाला शारीरिक द्वंद्वात लोळवणे हे भागीरथी काम होते, परंतु राजांनी ते आपणहून निवडले.

त्यासाठी त्यांनी क्षणोक्षणीच्या प्रक्रियेचा आराखडा बनवला, आपल्या सल्लागारांशी आणि सवंगड्यांशी त्याची सविस्तर चर्चा केली. त्याची कदाचित त्यांनी इतरांच्या साहाय्याने किंवा आपल्याआपण उजळणी केली असावी. प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. थोडीशी चूक झाली, तरी प्राण गमवावे लागले असते. प्रारंभी उल्लेख केलेल्या पॉलिबसच्या उक्तीनुसार संपूर्ण लढाईच्या विजयाचा तो गाभा होता. हे सर्व तडीस नेण्यासाठी आवश्यपक होते निर्भय मन आणि बुलंद हिंमत. शेंडी तुटो की पारंबी तुटो, तो मनोनिर्धार तसूभरही विचल न होता तडीस नेण्याची अलौकिक जिद्द. राजांच्या या वैयक्तिक पराक्रमाला इतिहासात तोड सापडणार नाही. रोमेल असो, चंगेझखान असो वा नेपोलियन असो; असे भयदायक द्वंद करण्यास कोणीही धजले नाही. याच, आणि केवळ याच कारणासाठी प्रतापगडाच्या विजयाचा सिंहाचा वाटा राजांना दिला पाहिजे.

सुन्त्झूने आक्रमक संरक्षणनीतीच्या बाबतीत लिहिले आहे : 'तुम्ही स्वत:ला अजेय बनवा आणि शत्रू जेव्हा असुरक्षित असेल, तेव्हाच त्याच्यावर हल्ला करा. ज्या जागेवर ते हरणार नाहीत, अशाच ठिकाणी मुरब्बी लढवय्ये मोर्चेबंदी करतात आणि शत्रूच्या पराभवाला कारणीभूत होऊ शकतील अशा घटकांचा ते जास्तीजास्त फायदा घेतात.'

प्रतापगडाच्या लढाईचा अभ्यास करताना सुन्त्झूच्या या मौक्तिकाच्या शब्दन्शब्दाची प्रचीती येते. अफझलखान शिवाजीराजांना वाईमध्ये त्याच्या छावणीत भेटू इच्छीत होता. इतक्या सहजतेने शत्रूच्या गोटात जाऊन सापळ्यात सापडण्याइतके ना त्याच्या भेटीसाठी महाराज अधीर होते, ना तितके भोळेभाबडे होते. सर्व बाबींचा सारासार विचार करून प्रतापगडावर

भेटण्याचा पर्याय राजांनी सुचवला. शिवाजीराजांशी समोरासमोर वैयक्तिक भेट घडणे हे अफझलखानासाठी अत्यंत बिनीचे होते. त्याला राजांशी केवळ लढाई जिंकायची नव्हती, परंतु त्यांना जिवंत वा मृत घेऊन जायचे होते. त्याकरता तो कोठेही येईल आणि कोणत्याही अटी मान्य करील, याची राजांना खातरी होती. राजांची अटकळ अचूक ठरली. कोणतेही आढेवेढे न घेता अफझलखानाने प्रतापगडावर येण्याचे मान्य केले. 'स्वत:ला अजेय बनवण्याकडे' पहिले पाऊल राजांनी उचलले होते.

अफझलखान भेटीस येताना स्वत: बरोबर आपले बऱ्यापैकी सैन्य घेऊन येणार, हे गृहीत होते. त्याच्या भोवतीचे संरक्षणकवच वेगवेगळ्या भागांत विभाजित करून मग प्रत्येकाशी अलगअलग सामना द्यायचा, असे त्यांनी ठरवले. याचे त्यांनी तीन भाग केले. पहिला, खानाच्या सोबत येणाऱ्या अंगरक्षक सैन्याचा. भेटीच्या वेळी शामियान्यात फक्त राजे आणि अफझलखान हे दोघेच असावेत, दोघांनाही शस्त्र बाळगण्याची मुभा असावी आणि बरोबर जास्तीत जास्त दहा अंगरक्षक आणावेत; परंतु त्यांनी शामियान्याच्या बाहेर एकमेकांपासून बाणाच्या अंतरावर राहावे, या अटी घालून भेटीच्या वेळी खानाच्या निकट त्याचे अधिक बळ असणार नाही, याची त्यांनी शाश्वती केली. दुसरा, त्याच्याबरोबर येणारा १५०० हशमांचा चमू शामियान्यापासून सुरक्षित अंतरावर, सुमारे ८०० गजांच्या अंतरावर राहील, अशी व्यवस्था केली. त्यांच्याशी लढण्यास कान्होजी जेधे आणि बांदल देशमुखच्या तुकड्या शत्रूच्या नकळत त्यांनी आधीच आसपास पेरून ठेवल्या.

तिसरा भाग, खानाच्या उर्वरित सैन्याचा. ते ठेवण्यासाठी अफझलखानाला फक्त कोयनाकाठचे जावळीचे अरुंद खोरेच उपलब्ध असेल, याची त्यांनी खातरजमा केली. त्याच्या दोन्ही बाजूंच्या वाटा बंद करून ते ऐनवेळी कोंडले जाईल आणि लढण्यासाठी वा सुटून जाण्यासाठी त्यांना पुरेशी रिकामी जागा मिळू शकणार नाही, अशी योजना केली. त्याचबरोबर त्या डोंगराळी परिसरात त्याचा तोफखाना निकामी होईल, हे त्यांना ठाऊक होते. एकदा का त्याचे सैन्य कोंडीत सापडले की, त्याच्यावर चोहोबाजूंनी हल्ला करण्यासाठी मोरोपंतांच्या तुकड्या त्यांनी पूर्वनियोजित जागी सज्ज ठेवल्या. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शत्रूला अपरिचित जागी अचानक लढा द्यावा लागावा, परंतु आपले सैन्य मात्र तो येण्याआधीच सुसूत्रपणे तेथे पोचून मोर्चेबंदी करू शकेल, अशी परिस्थिती त्यांनी निर्माण केली.

अशा प्रकारे शत्रू ज्यावेळी असुरक्षित असेल, तेव्हाच त्याच्यावर हल्ला; ज्याजागी आपण हरणार नाही, अशाच जागी मोर्चेबंदी आणि शत्रूच्या पराभवाला कारणीभूत होऊ शकणाऱ्या घटकांचा जास्तीजास्त फायदा; या सुन्त्झूच्या तिन्ही सूचना शिवाजीराजांनी चातुर्याने अमलात आणल्या.

सुन्त्झूनुसार, 'सातत्याने बदलत राहणारे डावपेच, विस्मय संपादनासाठी केलेल्या चाली आणि शत्रूच्या मनोवैज्ञानिक अवस्थेचा फायदा घेऊन आपल्याला हव्या असलेल्या व शत्रूसाठी असुरक्षित अशा जागी त्याला यायला भाग पाडण्याची हातोटी' ही धूर्त सेनापतीची वैशिष्ट्ये आहेत. 'असे सेनापती इतरांना आपल्याकडे येण्यास भाग पडतात, इतरांच्याकडे जात नाहीत.' प्रतापगडच्या लढाईतील शिवाजीराजांची योजना हा सुन्त्झूच्या या उक्तीचा समर्पक दाखला

आहे.

सर बेसिल लिडेल हार्ट हा आंग्ल संरक्षणतत्त्वज्ञ आपल्या 'अप्रत्यक्ष रणनीतीचा मार्ग' या निबंधात लिहितो, 'शत्रूला अनपेक्षित असलेल्या बाजूने वार करणे महत्त्वाचे ठरते. त्याकरवी आश्चर्यचकित झाल्यामुळे त्याच्या प्रतिकारशक्तीवर परिणाम होतो. गुप्तता, कारवाईमधील नावीन्य, हालचाल व स्थान दिसू न देण्याची प्रक्रिया (कॅमाफ्लाज अँड कन्सीलमेंट), फसवेगिरी, बेदरकारी, शीघ्रता या सर्वांमुळे शत्रूला चकित करण्यास मदत मिळते.' किंबहुना 'विस्मयकारकता आणि शाठ्य' या युद्धतत्त्वाचा गर्भितार्थ हाच आहे. प्रतापगडच्या युद्धाच्या यशाची ही प्रमुख प्रेरणा आहे. शिवाजीराजांचा गनिमी काव्याचा डावपेच प्रामुख्याने शत्रूला अनपेक्षित फसवणुकीकरवी हतबुद्ध करण्यावर आधारित असे. प्रतापगडच्या युद्धात त्यांनी या तत्त्वाचा पुरेपूर वापर केला.

सर लिडेल हार्ट याने उद्दिष्ट आणि संसाधन यांची सांगड घालण्याच्या आवश्यकतेबद्दल एक मार्मिक विधान केले आहे. तो म्हणतो, 'तुमचे उद्दिष्ट तुमच्यापाशी उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या चौकटीत बसणारे असले पाहिजे. त्यासाठी उद्दिष्टाचे तर्वनिष्ठ विलेषण करणे आणि आपल्या क्षमतेची आणि मर्यादांची पुरेपूर जाणीव असणे आवश्यीक आहे. आपल्या आवाक्याबाहेर असलेल्या उद्दिष्टामागे धावणे चुकीचे आहे.' शिवाजीराजांची प्रतापगडमधील संसाधने अफझलखानाच्या तुलनेत अत्यंत मर्यादित होती. 'अफझलखानाचा खात्मा करणे आणि त्याच्या सेनाबलाचा विध्वंस करणे', हे त्याचे उद्दिष्ट होते. दोन्हींमध्ये जमीनअस्मानाचे अंतर होते. वास्तविक ते उद्दिष्ट अशी संसाधने असणाऱ्या इतर कोणत्याही सेनापतीच्या आवाक्याबाहेर ठरले असते. परंतु त्याच तोकड्या संसाधनांकरवी राजांनी हे उद्दिष्ट साध्य केले. त्याला कारणीभूत होती राजांची बुद्धिमत्ता, आपल्या सरदारांच्या आणि मावळ्यांच्या असाधारण क्षमतेचे अचूक आकलन आणि शत्रूच्या वैगुण्यांची नि:संदिग्ध ओळख वगैरे. अशा गुणवैशिष्ट्यांना 'बलगुणक' किंवा 'फोर्स मल्टीप्लायर्स' अशी संज्ञा आहे. म्हणजे ती सैन्यसंख्या वा शस्त्रास्त्रे नव्हेत, परंतु चतुराईने वापरली, तर त्यांच्यामुळे उपलब्ध सैन्यबळ काही पटींनी अधिक परिणामकारक होते. ती बलसंवर्धक ठरतात. प्रतापगडच्या लढाईत हेच घडले. या बलगुणकांचा राजांनी फलदायी वापर केला.

प्रतापगड लढाईच्या संबंधात दोन्ही बाजूंकडून युद्धनीतीच्या दहा तत्त्वांचे अवलंबन किंवा भंग याची चर्चा केल्याशिवाय हे विलेषण पूर्ण होणार नाही. शिवाजीराजांचे उद्दिष्ट अफझलखानाचा खात्मा आणि त्याच्या सैन्याचा विध्वंस हे होते. योजनेपासून तिसऱ्या टप्प्याच्या अखेरीपर्यंत त्यांनी त्याचा कसून मागोवा घेतला, उलट खानाचे उद्दिष्टच स्पष्ट नव्हते आणि ते साध्य करण्यासाठी त्याने सखोल विचार केला नव्हता. आपण शिवाजीला सहज नामोहरम करू, या फाजील आत्मविश्वासामुळे त्याला गंभीर योजना बनवण्याची आवश्यरकताच वाटली नाही.

आपल्या तळाची सुरक्षितता हे दुसरे तत्त्व. अफझलखान यात पार अपुरा पडला. जावळीच्या खोऱ्यात आपले प्रचंड सैन्य 'अक्षरश: ठासून भरण्यातील' जोखीम त्याच्यासारख्या मुरब्बी सेनापतीला कळू नये, याचे आश्चर्य वाटते. त्याउलट शिवाजीराजांना पहिल्यापासूनच जाणीव होती आणि त्यांनी असे युद्धक्षेत्र निवडले, जिथे त्यांचा तळ पूर्णत: सुरक्षित होता.

गतिक्षमता हे तिसरे तत्त्व. या लढाईच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील युद्ध हे अत्यंत मर्यादित क्षेत्रात झाल्यामुळे गतिशीलतेचा त्याच्यावर फारसा परिणाम होणार नव्हता. तरीही मोरोपंतांच्या शिबंदीने कुंबरोशी आणि अंबेनळी खिंडींतून अत्यंत वेगाने आगेकूच करून खानाच्या गाफील सैन्यावर हल्ला चढवला. तिसऱ्या टप्प्यात मात्र आपल्या गतिशीलतेचा विजापुरापर्यंत धडक मारून पुरेपूर उपयोग केला. आक्रमक चाल हे चवथे तत्त्व. शिवाजीराजांच्या योजनेचा आक्रमक चाल हा तर गाभा होता आणि त्यामुळेच त्यांनी हे युद्ध जिंकले. उलट अफझलखानाच्या अत्यंत ढगळ चालीमुळे आणि हलगर्जीपणामुळे त्याचा दारुण पराभव झाला.

बळाचा मितव्यय हे पाचवे तत्त्व, प्रतापगडची लढाई ही शिवाजीराजांच्या या तत्त्वाच्या असामान्य अवलंबाचे एक लक्षणीय उदाहरण आहे. त्याविरुद्ध बळाची पराकोटी नाशाचे कसे कारण होऊ शकते, हेही अफझलखानाने दाखवून दिले. बळाचे केंद्रीकरण हे सहावे तत्त्व. ते एक दुधारी शस्त्र आहे. खानाने आपल्या बळाचे अत्यंत तोकड्या जागेत केंद्रीकरण केले, त्याच्यामागे ना कोणतेही विलेषण होते, ना तर्वनिष्ठता होती. केवळ यामुळेच त्याच्या सैन्याची अमर्याद जीवहानी झाली. मराठ्यांच्या काही प्रमाणात लक्षणीय जीवहानीचे कारण त्यांची आक्रमकता. इतक्या मोठ्या प्रमाणाच्या सैन्यावर अशा तोकड्या जागेत हल्ला करावयाचा झाला, तर इतकी हानी होणे स्वाभाविकच आहे.

शिवाजीराजांच्या विस्मयकारकता आणि शाठ्य या तत्त्वाच्या बुद्धिमंत वापराबद्दल सविस्तर चर्चा झाली आहे. परंतु खानाच्या या तत्त्वाच्या संपूर्ण अज्ञानाबद्दल मात्र कीव येते. अर्थात त्याला त्याची जबर किंमत मोजावी लागली. मनोधैर्य हे आठवे तत्त्व. स्वराज्य आणि आदिलशाही सेनांमध्ये याबाबतीत अक्षरश: जमीनअस्मानाचे अंतर होते. मनोधैर्याचे घटक आणि त्यांचे संपादन याबाबतीत तिसऱ्या प्रकरणात सविस्तर चर्चा केली आहे. एवढेच नमूद करणे पुरेसे व्हावे की, अफझलखानाच्या भाडोत्री सैन्याची शिवाजीराजांच्या नेतृत्वाने आणि देशप्रेमाने भारलेल्या स्वराज्य सेनेशी तुलना करणे म्हणजे माणिक आणि कोळसा यांची तुलना करण्याजोगे होईल.

सहकार्य हे नववे युद्धतत्त्व. शिवाजीराजांच्या वेगवेगळ्या तुकड्यांतील सहकार्य हे स्पृहणीय होते. युद्धव्यवस्थापन हे शेवटचे तत्त्व. आपल्या तळावर असल्याने मराठा सैन्यासाठी त्याची फारशी आवश्यनकता नव्हती, परंतु अफझलखानाने प्रचंड सैन्य बरोबर आणल्याने त्याच्या अडचणी अतोनातपणे वाढल्या होत्या आणि त्याचा परिणाम त्याच्या पराजयात झाला.

रुस्तुम-इ-जमानचा पराभव

शिवाजीराजे कोल्हापूर प्रांतावर चालून आल्याचे ऐकून आदिलशहाने रुस्तुम-इ-जमान आणि फाझलखान यांना राजांवर चालून जाण्यास पाठवले. रायबाग, कोल्हापूर, राजापूर या भागाची जहागीर रुस्तुम-इ-जमानकडे होती. त्याच्या जहागिरीवर शिवाजीराजांनी धडक मारली होती. तसा शहाजींचा मित्र रणदुल्लाखानचा हा पुत्र. त्यामुळे राजे आणि रुस्तुम या दोघांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम होते. परंतु आदिलशहाच्या हुकमावरून त्याला येणे भाग पडले. शिवाय राजे राजापुराकडे मोर्चा वळवतील, अशी त्याला भीती होती. राजापूरही त्याच्या जहागिरीचा भाग

होता. तसे राजांनाही राजापूरला जाण्याचे कारण होते. अफझलखानाची दाभोळला असलेली तीन जहाजे हस्तगत करण्यासाठी त्यांनी दोरोजीला आधीच धाडले होते. दोरोजीने दाभोळ जिंकले; परंतु दाभोळचा सुभेदार महमूद शरीफ ती तीन जहाजे घेऊन राजापूरला पळाला होता.

रुस्तुम-इ-जमान आणि शिवाजीराजांच्या एकमेकांबद्दलच्या मैत्रीची आदिलशहाला कल्पना होती. त्यामुळे त्याच्याबरोबर अफझलखानचा पुत्र फाझलखान, मलिक इतबार, सादतखान, फतहखान, मुल्ला हय वगैरे सरदार शहाने पाठवले होते. त्याने डिसेंबरच्या मध्याला १०,००० स्वारांच्या घोडदळासह विजापूर सोडले. त्यांच्याबरोबर काही हत्ती, उंट आणि तोफाही होत्या. वास्तविक शिवाजीराजांनी याच्यापेक्षा बऱ्याच मोठ्या संख्येने आलेल्या अफझलखानाच्या सैन्याला नुकतेच हरवले होते. परंतु हा परिसर खुला असल्याने आदिलशाहीचे घोडदळ अधिक परिणामकारकपणे शत्रूवर हल्ला करू शकेल, असा शहाचा कयास होता.

दोन्ही सैन्ये कोल्हापूरजवळ निकट आली. शिवाजीराजांना रुस्तुम-इ-जमान येत असल्याची बातमी मिळाल्यावर त्यांनी त्याच्या सैन्यावर हल्ला करावयाचे ठरवले. वास्तविक आपणहून शत्रूवर हल्ला करण्याकडे राजांचा कल नसे. शत्रूला आपल्यावर हल्ला करू द्यायचा आणि मग त्याच्या चुकांचा फायदा घेऊन त्याला चीतपट करायचे, हा त्यांचा रिवाज होता. परंतु आदिलशाही सैन्याची लढा देण्याची अहमहमिका प्रतापगड लढाईनंतर रसातळाला गेली असणार, हे राजांनी पुरेपूर जाणले होते.

हल्ला होण्याच्या शक्यतेची कल्पना आल्यावर रुस्तुम-इ-जमानने आपल्या सैन्याची रचना केली. त्याने डाव्या आघाडीला फाझलखान, उजव्या आघाडीला मलिक इतबार व सादतखान, स्वत: मध्यभागी, फतहखान व मुल्ला हय पिछाडीला आणि संताजी घोरपडे व सर्जेराव घाटगे चोहोबाजूंनी रक्षणासाठी ठेवले. राजांना हेरांकडून याची ढोबळ कल्पना लाभली. मग त्यांनी नेतोजी पालकरला फाझलखानावर, भिमाजी वाघाला मुल्ला हयवर, इंगळेला मलिक इतबारवर, महाडिकला फतेहखानावर, सिधोजी पवारला सादतखानावर, गोदाजी जगतापला घाटगेवर, खराटे आणि पांढरे यांना उजव्या आघाडीवर, सिद्दी जलाल व जाधवराव यांना डाव्या आघाडीवर चालून जाण्याचे आदेश दिले. ते स्वत: रुस्तुम-इ-जमानवर चालून गेले.३७

२८ डिसेंबर १६५९ला दोन्ही सैन्ये एकमेकांसमोर आली. प्रतापगडावरील मिळालेला विजय अजूनही मराठा सैन्याच्या मनात ताजा होता, मनोधैर्य शिगेला पोचलेले होते. रुस्तुम-इ-जमानच्या सैन्याची स्थिती बरोबर उलट होती. मराठा सैन्य त्वेषाने जमानच्या सेनेवर तुटून पडले. फाझलखान शत्रूला पाहताच गर्भगळित झाला. रुस्तुम जमानच्यातसुद्धा लढण्याची फारशी ईर्षा नव्हती. त्याने फारसा विरोध केलाच नाही. शिवाजीराजे जमानला पकडू शकले असते, परंतु कदाचित त्यांनी त्याला जाऊ दिलेही असेल. आदिलशाही सैन्य इतस्तत: पांगले आणि सरदार वृष्णा नदीपार विजापूरच्या दिशेने पळून गेले. रुस्तुम-इ-जमान हुकेरीच्या दिशेला नाहीसा झाला. या लढाईत मराठा सैन्याला २००० घोडी आणि १२ हत्ती मिळाले.३८

दोन महिन्यांच्या कालावधीत अली आदिलशहा शिवाजीराजांशी दोन लढाया हरला होता. त्या दोन्हींतील पहिले पाऊल त्याने टाकले होते. त्यात त्याच्या दोन मातब्बर सरदारांचे कसब त्याने

पणाला लावले होते. त्या दोन्हींपैकी एक मारला गेला होता. त्यामुळे त्याच्या आत्मविश्वासाला जबर धक्का बसला होता, त्याचा अभिनिवेश नाहीसा होत चालला होता. आपण मराठ्यांविरुद्ध वेळीच मोगलांच्या साहाय्याने आघाडी उघडली नाही, तर त्याचे आपल्या गादीवरच गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती त्याच्या मनात ठाण मांडू लागली होती. दुसऱ्या बाजूला रुस्तुम-इ-जमानच्या सैन्याचा पराभव केल्यानंतर आपण खुल्या मैदानात मोगलांनाही हरवू शकू, असा आत्मविश्वास राजे आणि नेतोजी या दोघांच्यातही निर्माण झाला होता.

राजांनी ही यशश्रीची मालिका पुढे चालू ठेवायचे ठरवले. १६ जानेवारी १६६०रोजी नेतोजीची सेना पन्हाळ्याहून निघाली आणि तिने कवठे, बोरगाव, मालगाव, कुंडल, घोगाव, सत्तीकीरी, आड ही स्थाने काबीज केली.३९ त्यानंतर मिरजेच्या भुईकोट किल्ल्याला त्याने वेढा घातला. परंतु आदिलशाही किल्लेदाराने कडवट प्रतिकार केला. राजांना हे कळल्यावर ते स्वत: शिबंदी घेऊन पोचले. किल्ल्यावरील कारवाई आपल्या हातात घेऊन त्यांनी नेतोजीला मोकळा केला आणि आपली घोडदौड पुढे चालू ठेवण्यास त्याला सांगितले. त्याने गोकाक, दोदवाड, मुरवाड, धारवाड, क्षुद्रवंद्यपूर, सांगाव, मायील, पारगाव, सांगली, काणद, कुरुंदवाड, कागल, हेबाळ, हनुवल्ली, हूणवाड, रायबाग, हुकेरी, कडगाव, हळदी, घुणिका, किणी, अरग, तेलसंग, केरूर, अंबुप, कमळापूर, अथणी, तिकोटे ही सर्व ठाणी सर केली.

या दरम्यान अफझलखानाची जहाजे हस्तगत करायला गेलेला दोरोजी राजांना मिरजेला येऊन भेटला. ती जहाजे तिथे न दिसल्यावर त्याने तिथल्या फॅक्टरीचा कारभारी हेन्री रेविंग्टनकडे चौकशी केली. त्याने आपल्याला काहीही माहिती नसल्याचा खोटा देखावा केला. दोरोजी एक तडफदार सरदार होता. त्याने सरळ फॅक्टरीच जप्त केली आणि त्यातील एक इंग्रजी इसम, फिलीप गिफर्ड याला बरोबर घेऊन गेला. त्यावर रेविंग्टनने शिवाजीराजांना सिद्दीकडून जंजिरा काबीज करण्यास मदत देण्याचा वायदा केला. जंजिरा हे राजांचे आणखी एक स्वप्न होते. त्यांनी गिफर्डला सोडण्याचे आदेश दिले.

खंडणी वसूल करत राजांच्या सेना थेट विजापूरपर्यंत चालून गेल्या होत्या. आदिलशहाच्या राजधानीत प्रवेश करण्याचा त्यांचा कोणताही विचार नव्हता. खानाच्या या घमेंडी वृत्याबद्दल त्यांना आदिलशहाला धडा शिकवायचा होता आणि त्यांना मराठा स्वराज्याची चुणूक दाखवायची होती. हे उद्दिष्ट साध्य झाले होते.

मिरजेचा भुईकोट किल्ला विजापूरच्या पश्चिमेला फक्त ७५ मैलांवर होता. तो घेतल्यावर शिवाजीराजे आसपासचा परिसर ताब्यात घेऊन विजापूरकडे येऊ लागले, तर राजधानीला धोका निर्माण होईल, या भीतीने अली आदिलशहा आणि बडी साहिबाला ग्रासले. अली आदिलशहा हा कायदेशीर वारस नसल्यामुळे शिवाजीराजे विजापूरच्या गादीवर दुसऱ्या कोणा तरी इच्छुकाला गादीवर बसवणार आहेत, अशी वदंताही त्यावेळी सर्वत्र पसरली होती. राजांच्या सामर्थ्याबाबत बडी साहिबाच्या मनात किती जरब बसली होती, याचा हा समर्पक दाखला! शिवाजीराजांनी नेतोजीसह पार विजापूरच्या उंबरठ्यापर्यंत मारलेली धडक ही कोणत्याही आक्रमक लष्करी चालीच्या शिरोबिंदूचे ज्याला लष्करी शास्त्रात 'एक्सप्लॉयटेशन' म्हणतात त्याचे उत्तम उदाहरण आहे. शत्रू पराभूत झाल्यानंतर त्याचे

मनोधैर्य पार खच्ची झालेले आणि अस्तास गेलेले असते. त्यावेळी त्या परिस्थितीचा अधिकाधिक फायदा करून घेणे हे या तिसऱ्या टप्प्यातील चालीचे उद्दिष्ट असते. शिवाजीराजांनी ते पुरेपूर साध्य केले. त्यादरम्यान त्यांनी कोल्हापूर प्रांतातील पन्हाळा हस्तगत केला, त्याबरोबरच इतर गडही काबीज केले. आदिलशहाने प्रतापगडाच्या पराभवानंतर लागलीच रुस्तुम-इ-जमानच्या हाताखाली पाठवलेल्या सैन्याचा दारुण पराभव झाला. दोन महिन्यांत आदिलशाहीला पुन्हा अपयशाला सामोरे जावे लागले. मराठा सैन्याला दोन्ही लढतींत झालेल्या सात-आठ हजार घोड्यांच्या लाभामुळे राजांच्या घोडदळाचे बळ आणखीन वाढले.

प्रतापगडच्या लढाईचे अर्जित

शिवाजीराजांनी त्यांच्यावर आदिलशाहीने लादलेल्या प्रतापगड लढाईत बलाढ्य अफझलखानाला यमसदनी पाठवून त्याच्या सरस संख्येच्या सैन्याचा पराभव केला, रुस्तुम-इ-जमानला पळवून लावले, अभेद्य पन्हाळा व इतर गड जिंकले आणि पार विजापूरच्या देवडीपर्यंत मजल मारून आदिलशाहीच्या उरात धडकी भरवली. मराठा स्वराज्याच्या खऱ्या स्थापनेचा हा आरंभ होता, असे म्हणणे चूक ठरणार नाही. 'आता विजापूरचे राज्य संपून शिवाजीचे चालू होणार, शहाजी सतरा हजार फौज घेऊन कर्नाटकातून त्याच्या मदतीस येत आहेत,' अशा बातम्या पाश्चात्य व्यापाऱ्यांनी आपापल्या वरिष्ठांना कळवल्या.४० त्या ऐकून अली आदिलशहा आणि बडीसाहेबा यांची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना करणे कठीण नाही.

मराठा अस्मितेचे पुनर्निर्माण हे प्रतापगडच्या लढाईचे खरेखुरे अर्जित! परंतु प्रतापगडच्या या यशस्वी मोहिमेनंतर स्वराज्याला दोन्ही बाजूंनी ग्रहण लागण्याची चिन्हे दिसू लागली.

विजयाच्या चढत्या कमानीला शह

सिद्दी जोहरचा पन्हाळ्याला वेढा

आदिलशहाने औरंगजेब बादशहाला मराठ्यांविरुद्ध संयुक्त अभियान हाती घेण्याचा प्रस्ताव पाठवला. मोगलांनी पुण्यावर हल्ला करण्यासाठी एक जंगी फौज पाठवावी आणि निजामशाहीचा प्रदेश ताब्यात घ्यावा, असे आदिलशहाने औरंगजेबाला आवाहन केले. औरंगजेब एव्हाना दिल्लीत स्थिरस्थावर झाला होता आणि दक्षिणेत पुन्हा गंभीरपणे लक्ष घालण्याचा विचार त्याच्या मनात घोळतच होता. शिवाजीराजांचे बाहुबळ दिवसेंदिवस वाढत चालले आहे आणि त्याच्यावर वेळीच काबू केला नाही, तर प्रकरण हाताबाहेर जाईल, याची त्याला जाणीव होती. त्याचा मामा शाईस्ताखान औरंगाबादमधील मोगल सुभेदार होता. बादशहाने खानाला आपल्या सैन्यासह पुण्यावर कब्जा करण्याचे फर्मान पाठवले. त्यानुसार २८ जानेवारी १५६०ला शाईस्ताखान प्रचंड सैन्यासह पुण्याच्या दिशेने रवाना झाला.

आदिलशहाने त्याचवेळी शिवाजीला पराभूत करण्यासाठी मोठे सैन्य गोळा करण्यास आरंभ केला. या कामासाठी त्याने निवड केली, ती कुर्नूल प्रांतावर कारभाराच्यी जबाबदारी असलेल्या सिद्दी जोहर याची. तो आधी मलिक रयहान नावाच्या सरदाराचा नोकर होता. त्याच्या मालकाचा मृत्यू झाल्यावर सिद्दी जोहरने रयहानच्या मुलांना कपटाने बाजूस सारून

कारभार बळकावला होता. जोहर हा एक शूर आणि अनुभवी सेनापती होता. काही कारणांमुळे तो आदिलशहाच्या मर्जीतून उतरला होता. 'आपल्याला काहीतरी काम द्यावे म्हणजे मी माझी कर्तबगारी सिद्ध करून दाखवीन,' असे खलिते तो आदिशहाला वारंवार पाठवत होता. अली आदिलशहाने या कामावर त्याची नेमणूक करण्याचा विचार केला आणि त्याला ताबडतोब वाटाघाटींसाठी विजापूरला पाचारण केले.

'शिवाजीवर चालून जाऊन त्याची खोड मोडाल, तर तुमच्यावरची आमची इतराजी नाहीशी होईल', असे त्याला सांगण्यात आले.४१ सिद्दी जोहरने त्याला तत्काळ होकार भरला. सिद्दीला 'सलाबतखान' असा किताब देण्यात आला. त्याच्याबरोबर दहा हजारांचे घोडदळ आणि चौदा हजारांचे पायदळ देण्यात आले. किल्ल्याच्या वेढ्यादरम्यान किल्ल्याच्या तटबंदीवर मारा करण्यासाठी त्याच्याबरोबर तोफा देण्यात आल्या. त्याच्या बरोबर रुस्तुम-इ-जमान, बाजी घोरपडे आणि अफझलखानाचा मुलगा फाझलखान यांना आपापल्या तुकड्या घेऊन सामील होण्यास सांगण्यात आले. फाझलखानाच्या मनात बापाच्या वधाचा सूड घेण्याची ईर्षा त्याला राजांनी रणांगणातून दोनदा पळवून लावूनही अजून धगधगत होतीच. त्याचबरोबर वाडीचे सावंत आणि जंजिऱ्याचा सिद्दी आपापल्या शत्रुत्वाच्या कारणामुळे सामील झाले.

शिवाजीराजांना या दोन महाकाय फौजा आपल्याविरुद्ध चालून येत असल्याची बातमी मिळाली. परिस्थिती निश्चितच आव्हानात्मक होती. दोन्ही संकटांचे एकाच वेळी निराकरण करणे शक्य नव्हते. शाईस्ताखानाचा रोख पुण्याकडे होता. त्याच्या प्रचंड सैन्याला इतक्यात सामोरे जाणे हा आत्मघात ठरला असता. त्याला गनिमी काव्याने बेजार करून मगच काय तो अंतिम उपचार करावा, असे राजांनी ठरवले.

सिद्दी जोहरकडेही संख्येचे प्रमाण लक्षणीय होते. त्याच्याशी लढणे शहाणपणाचे नव्हते. त्यालाही थकवून जेरीस आणणे सुज्ञपणाचे होते. त्यामुळे राजांनी मिरजेचा वेढा उठवून काही काळासाठी पन्हाळगडावर आश्रय घेण्याचे ठरवले. पन्हाळगड हा एक अभेद्य किल्ला होता. तो हल्ला करून जिंकणे हे अत्यंत कठीण होते. राजांनी नुकतीच विजापूरच्या प्रांतांमध्ये धाडी घालून बरीच संपत्ती गोळा केली होती. त्यामुळे सध्यातरी त्यांना इतर कारवाया हाती घेण्याचे कारण नव्हते. पन्हाळ्यात आश्रय घेण्याचे ठरल्यावर तेथील किल्लेदार आणि कारखानिसाला किल्ल्यावरील अन्नधान्य, पाणी आणि दारूगोळ्याच्या साठ्यात जितकी वाढ करता येईल, तितकी करण्यासाठी त्यांनी तातडीने निर्देश दिले.

आपल्याबरोबर संरक्षणासाठी फाजील संख्येत शिबंदी घेऊन किल्ल्यात अडकून राहणे चुकीचे ठरले असते. एकतर स्वराज्याच्या प्रदेशाची देखभाल करण्यास जागोजागी सैन्य पेरणे आवश्य क होते. दुसरे म्हणजे किल्ल्यात जितकी अधिक संख्या राहील, तितक्यांना अन्न-पाण्याचा पुरवठा करणे अधिक कठीण झाले असते. राजांनी राघो बल्लाळ याला सिद्दीवर पाळत ठेवण्यासाठी नेमले. बाजी पासलकर याला वाडीच्या सावंतावर नजर ठेवण्यास सांगितले. मोरोपंत पिंगळे यांना पुरंदर, प्रतापगड, सिंहगड या टापूचा बंदोबस्त पाहण्यास सांगितले. आबाजी सोनदेव कल्याण प्रांताचा कारभार पाहत होते. नेतोजी पालकर आपल्या घोडदळाबरोबर विजापूरच्या मुलखात थैमान घालत होताच. ही सर्व तजवीज पुरी झाल्यावर २

मार्च १६६० रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर राजे सुमारे ५०० मावळे आणि ५०-६० बारगीर घेऊन पन्हाळ्यावर दाखल झाले.

दोन महाकाय शत्रू दोन्ही बाजूंना मुक्काम करून बसल्यावर त्यांच्याविरुद्ध सातत्याने कारवाया करीत राहण्याची जबाबदारी आता वेगवेगळ्या सरदारांच्या खांद्यांवर होती. गनिमी कावा हा प्रमुख डावपेच असणार होता. राजांचे मावळे हल्ला करायच्या वेळी एकत्र जमण्यात, लागलीच छोट्या छोट्या तुकड्यांत पांगण्यात आणि पुन्हा दुसऱ्या ठिकाणी एकत्र होऊन हल्ला चढवण्यात तरबेज होते. जर मुस्लीम सैन्याने त्यांचा डोंगराळी भागात पाठलाग केला, तर वाटेत सापळे लावून ते शत्रूवर हल्ला चढवत असत. जर अगदीच जवळ येण्याची चिन्हे दिसू लागली, तर आपली हत्यारे लपवून शेतात काम करणाऱ्या कामगारांच्यात ते मिसळून जाऊ शकत आणि त्यांची पाठ दिसल्यावर पुन्हा आपली शस्त्रे उचलून शत्रूवर हल्ला करू शकत.४२ आपण पन्हाळ्यात बंदिस्त असताना आपले मावळे गनिमी काव्याच्या या डावपेचांचा पुरेपूर उपयोग करून शत्रूला बेजार करतील, याची राजांना खातरी होती.

पन्हाळा किल्ला सुमारे पंधराव्या शतकात बांधण्यात आला होता. आदिलशहाच्या सत्तेखाली तो १४८९मध्ये गेला. त्याची समुद्रसपाटीपासून उंची २७७२ फूट आहे. त्याचा परीघ सुमारे पाच मैल आहे. त्यातील जवळजवळ अर्ध्या अधिक भागावर ३० ते ५० फूट उंच सरळसोट कडा आहे. उरलेल्या परिघावर १५ ते ३० फूट रुंद तटबंदी बांधली आहे. त्याच्यावर बेगवेगळ्या जागी तोफा ठेवण्यासाठी बुरुज बांधण्यात आले आहेत. किल्ल्यावर पाण्याचे अनेक झरे आहेत. खडकाळ असूनही किल्ल्यावरची जमीन सुपीक आहे. त्यावेळी सर्व पृष्ठभाग दाट झुडपांनी भरलेला होता.४३


सिद्दी पन्हाळ्याला पोचला आणि वैशाख महिन्याच्या अखेरीपर्यंत त्याने गडाला सर्व बाजूंनी वेढा घातला. (नकाशा क्र. १६ पाहा.) सिद्दी, फाझलखान व रुस्तुम-इ-जमान, बडेखान यांच्या सेनांनी गडाच्या पूर्वेस मोर्चेबंदी केली होती, तर सादातखान, मसूदखान, बाजी घोरपडे, भाईखान, पीडनाईक यांच्या शिबंद्या पश्चिमेच्या बाजूने मोर्चेबंद होत्या.४४ इतर सैन्याने किल्ल्याचा उत्तर आणि दक्षिणेचा भाग व्यापला होता. एकाद्या चिटपाखरालाही वेढा ओलांडून जाणे अशक्य झाले.

शिवाजीराजे सहजगत्या वाकणार नाहीत आणि आपल्या सैन्याला त्या ठिकाणी पावसाळ्यात राहावे लागेल, याची सिद्दीला जाणीव होती. त्याकरता त्याने चारी बाजूंना राहण्यासाठी हंगामी व्यवस्था केली. पन्हाळ्याबरोबर त्याने त्याच्या वायव्येस असलेल्या विशाळगडालाही वेढा घातला.

नकाशा क्र. १६

पन्हाळ्याला वेढा

(१५ मार्च - १५ जुलै १६६०)



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

त्याच्याकडे तोफा असूनही त्यांच्यापेक्षा मोठे गोळे मारण्यासाठी राजापूरच्या इंग्रजी वखारीचा प्रमुख हेन्री रेविंग्टन याच्याकडे माणूस पाठवून एक लांब टप्प्याची मोठी तोफ उसनी देण्याची सिद्दीने मागणी केली. रेविंग्टन हा हाडाचा व्यापारी होता. त्याने पन्नास तोफगोळे आणि एक तोफ सिद्दीला विकत देण्याची तयारी दाखवली. एवढेच नव्हे, तर सिद्दीने खरेदीची तयारी दाखवल्यानंतर तो स्वत: ती तोफ आणि ५० गोळे घेऊन मिंघम, गिफर्ड व वेलजी या सहकाऱ्यांबरोबर राजापुराहून अणूस्कुरा घाटाने २ एप्रिलला निघाला आणि कोल्हापूरला पोचला. त्याने ती तोफ सोयीच्या जागी लावली, त्याच्या जवळ इंग्लंडचा झेंडा उभारला आणि एक तोफगोळा किल्ल्यावर मारला. रुस्तुम-इ-जमान सिद्दीचे हुकूम मानण्यात नाखूष असे. तो हुकेरीलाच राहात होता. त्याला रेविंग्टनच्या या आगाऊपणाची बातमी लागली, तेव्हा त्याने परत जाताना आपल्याला हुकेरीस भेटून जाण्याचा निरोप रेविंग्टनला पाठवला. राजापूरची इंग्रजांची वखार जमानच्या जहागिरीत पडत असे. रुस्तुम-इ-जमानच्या शिवाजीराजांबद्दलच्या जिव्हाळ्याचा हा आणखी एक दाखला.

मे आणि जूनमध्ये नेतोजी पालकरने विजापूरच्या निकटच्या गावांवर हल्ले तीव्र केले. शहापूर या धनाढ्य शहरावर त्याने धाड घातली आणि ते लुटले. त्यावर आदिलशहाने सेनापती मुल्ला महंमदबरोबर बाबुलखान व आजपा नायक हे सरदार फौज घेऊन नेतोजीवर हल्ला चढवण्यास पाठवले, परंतु नेतोजीने त्यांचा पराभव केला. मराठा सैन्याने २००० स्वारांना पकडले.४५ मग नेतोजी विजापुरावरच चालून गेला. त्यावर आदिलशहाने वझीर खवासखानाला ५०००चे सैन्य घेऊन पालकरवर पाठवले. तेव्हा मात्र नेतोजीला माघार घ्यावी लागली. सिद्दीची पन्हाळ्याभोवती लावलेली काही शिबंदी तिकडे पाठवली जाईल आणि पन्हाळगडावरील वेढ्यात काहीशी शिथिलता येईल, हा नेतोजीचा या सगळ्यामागचा हेतू. परंतु सिद्दीला पन्हाळ्याच्या वेढ्यातून सैन्य उचलून विजापूरकडे पाठवण्याचा आदिलशहाचा विचार नव्हता.

दिवस जाऊ लागले, तसतसा किल्ल्यातील जिन्नसांचा साठा संपू लागला. तंबाखू आणि मिठासारखे पदार्थ मिळणे कठीण होऊ लागले. पण तरीही अन्न-धान्याचे साठे पुरेसे होते, फक्त त्यांच्या वापराच्या प्रमाणावर काही निर्बंध घालण्यात आले. सिद्दीच्या सर्व बाजूंना ठेवलेल्या शिबंदीवर हल्ला चढवण्याइतके सैन्य नेतोजीपाशी नव्हते. तो राजगडला जिजाबाईंना जाऊन भेटला, तेव्हा त्यांनी आणखी एकदा प्रयत्न करण्याचा आदेश दिला. त्यानुसार तो पुन्हा पन्हाळ्याला आला आणि त्याने ठिकठिकाणी हल्ले चढवण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु तो वेढा तोडू शकला नाही. अर्थात किल्ल्यामधील सैन्य काही स्वस्थ बसले नव्हते. आतून कडतोजी ऊर्फ प्रतापराव गुर्जरची माणसे रात्री-अपरात्री पहारेकरी मोर्चांवर गनिमी हल्ले चढवून सिद्दीला बेजार करत होते; परंतु त्याचा खूप काही परिणाम होत नव्हता.

वेढ्यातून सुटका

गडाभोवतीचा वेढा उठण्याची वा तोडू शकण्याची काहीच चिन्हे दिसत नव्हती. जुलै महिना उजाडत होता. शाईस्ताखानाने पुण्यात पोचून लाल महालात तळ ठोकला होता. त्याची प्रचंड

सेना साऱ्या आसमंतात पसरली होती आणि जुलूम-अत्याचार करत होती. नेतोजी पालकरपाशी असलेले बळ त्याला थोडीसुद्धा इजा पोचवण्यात असमर्थ होते. जिजाबाई राजगडावर होत्या. त्यांनी किल्ल्याच्या तळाशी शिवपट्टण गावात नेतोजी वगैरे सर्वांशी सल्लामसलत केली. राजांना युक्तीने वेढ्याबाहेर काढणे अत्यंत तातडीचे आहे, असे सर्वांचे मत पडले. इकडे शिवाजीराजांनीही तोच निर्णय घेतला होता. पावसाने जोर धरला होता. सुटून जाण्यास साजेशी स्थिती होती. त्यांनी किल्ल्यावरून गुप्तपणे निसटून जाण्याची योजना बनवली. उपासमारी होऊ लागल्यामुळे किंवा किल्ल्यावर इतर काही अडचणी निर्माण झाल्यामुळे पन्हाळ्यावरून जाण्याचा निर्णय राजांना घ्यावा लागला, हा समज चुकीचा आहे.


राजांनी सिद्दी जोहरच्या डोळ्यांत धूळ फेकून निसटायचे ठरवले. पन्हाळ्यापासून ३८ मैलांच्या अंतरावर आग्नेय दिशेला असलेला विशाळगड किंवा रांगणा किल्ला त्यांच्या ताब्यात होता. तो संरक्षणदृष्ट्या बळकट होता. तिथे पोचल्यावर त्यानंतर योग्य वेळ पाहून रायगडला जाणे शक्य होते. सिद्दीने पन्हाळ्याबरोबर त्याच्याही भोवती वेढा टाकला होता, परंतु तो वेढा तसा लेचापेचा होता. एकदा का पन्हाळ्यावरून विशाळगडाला पोचलो की, तो वेढा तोडून गडमाथ्याला पोचणे अवघड नव्हते.

पन्हाळ्यापासून आंबा घाटाकडे जाणाऱ्या हमरस्त्रयावर मलकापूरवरून घोडखिंडीमार्गे विशाळगडाला वाट जात असे. (नकाशा क्र. १७ पाहा.) आपण निसटून गेल्याचे कळताच आपला पाठलाग होईल, याची राजांना खातरी होती. त्यामुळे हमरस्त्रयावरून जाण्याऐवजी आडरस्त्रयाने जाणे आवश्यटक होते. त्यासाठी राजांनी ताबडतोब बाहेर निरोप धाडून अशी सुरक्षित वाट शोधण्यास कळवले. एकदोन दिवसांतच हेरांनी म्हसाई पठार, खोतवाडी, पाटेवाडीमार्गे घोडखिंडीला जाणारी वाट शोधून काढली आणि दोन-तीन वाटाडे ती नीट बघून आले. त्याबरोबर त्या इलाख्यातले काही लोकही वाटाडे म्हणून तयार करण्यात आले. राजांबरोबर कोण कोण जाईल, हे ठरवण्यात आले.

नकाशा क्र. १७

पन्हाळ्यावरून सुटका

११-१२ जुलै १६६०



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

राजांनी १३ जुलैची पौर्णिमेची रात्र सटकून जाण्यासाठी निवडली. आपण आता असाहाय्य झालो आहोत आणि तहासाठी याचना करण्याच्या विचारात आहोत, असे संकेत त्याआधी त्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी सिद्दीकडे पाठवण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे सिद्दीला जोम आला आणि त्याने वेढा अधिक सतर्व करण्याचे आदेश दिले. १३ जुलैला सकाळी राजांनी आपले वकील गंगाधरपंत यांच्याबरोबर एक पत्र पाठवले. त्यात आदिलशहाला अमाप त्रास दिल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणारा, आपल्याला पश्चात्ताप झाला असल्याचा आणि आपल्याला रायगडला जाऊ दिल्यास पन्हाळाच नव्हे, तर इतर किल्लेही परत देण्याचे वचन देण्यास तयार असल्याचा मजकूर नमूद केला होता.४६ याची चर्चा करण्यासाठी १४ जुलैच्या दिवशी सकाळी आपल्याला सिद्दीशी भेट घेण्याची संधी द्यावी, अशी गंगाधरफंतांतर्फे त्यांनी विनंती केली.

पत्र वाचून आणि शिवाजीराजे आपल्याला स्वत: भेटू इच्छितात, हे ऐकून सिद्दी हरखून गेला. अफझलखानाचा किस्सा ताजा होता. अशी काही कारवाई ते लागलीच पुन्हा करण्याची त्याला शक्यता वाटली नाही आणि त्यासाठी आपण सर्व खबरदारी घेऊ, याबद्दल तो निश्चिंत होता. हे जितक्या लवकर साधेल, तितके त्याला पाहिजे होते. दिरंगाई केली आणि शिवाजीराजांचे मन बदलले, तर ही सुसंधी हातातून जाणार होती. त्याने गंगाधरपंतांना ताबडतोब होकार भरला. आपल्या सर्व सरदारांना बोलावून त्याने ही आनंदाची बातमी सांगितली आणि दुसऱ्या दिवशी भेटीच्या तयारीसाठी आदेश दिले.

शिवाजीराजे दुसऱ्या दिवशी गडाखाली येणार, ही बातमी गडाभोवतालच्या सर्व छावण्यांत वाऱ्याच्या वेगाने पसरली. चार महिने दिवसरात्र पहारा देऊन सगळे कंटाळले होते. कमालीच्या मानसिक ताणाखाली वावरत होते. अचानक हा ताण नाहीसा झाला. राजांना पाहण्यासही त्यांतले बरेच उत्सुक होते. त्या दिवशी रात्री साऱ्या छावणीत जल्लोष होता. बख्खळ दारू ढोसून आणि बोकडांवर ताव मारून सर्वांनी ताणून दिली. सुदैवाने सकाळपासून पावसाने जोर धरला होता. संध्याकाळनंतर त्याची मात्रा आणखीनच वाढत गेली. गेले चार महिने राजे एकदाही गड उतरले नव्हते. त्यामुळे पळून जायचा हा डाव असावा, ही कल्पनाही कोणाच्या मनाला शिवली नाही. सर्वजण दुसऱ्या दिवसाच्या सकाळची आतुरतेने वाट पाहत झोपी गेले.

रात्री दहा वाजता राजे पालखीत बसले आणि हजार मावळे बरोबर घेऊन निघाले. पण पालख्या दोन होत्या. दुसऱ्या पालखीत राजांसारखा चेहरामोहरा असलेला आणि त्यांच्यासारखेच कपडे परिधान केलेला शिवा काशिदास होता. गडावर जागोजागी वाटाडे पेरून ठेवले होते. शत्रूच्या चौक्यापहारे चुकवत त्यांनी विशाळगडाचा रस्ता धरला.४७ मुसळधार पाऊस पडत होता. कोणत्यातरी संत्रीला हा मोठा जमाव चोराच्या पावलाने जाताना दिसला. त्याने आपल्या म्होरक्याला त्याची बातमी दिली. थोड्याच वेळात ती सिद्दी जोहरपर्यंत पोचली.

सिद्दीच्या डोक्यात प्रकाश पडला. पिंजऱ्यातून सावज पळाले होते. त्याने आपला जावई सिद्दी मसूदला एका तुकडीबरोबर राजांच्या मागे पिटाळले. परंतु तयार होऊन निघण्यात त्यांना समय

लागणार होता. सिद्दी मसूद मलकापूरच्या हमरस्त्रयाला लागेपावेतो बराच वेळ निघून गेला होता. पन्हाळा किल्ल्यातून बाहेर पडल्यावर शिवा काशिदासबरोबरच्या चारशे मावळ्यांचा लवाजमा हमरस्त्रयावरून चालू लागला होता. काही वेळाने सिद्दी मसूदबरोबरील स्वारांना पुढे लवाजमा जाताना दिसला. ते लगबगीने त्याच्यापाशी पोचले. पालखीत शिवाजीराजे असल्याचे पाहून त्याचा जीव भांड्यात पडला. ते त्यांना सिद्दीच्या छावणीत घेऊन आले. सिद्दी जोहर खूष झाला. आपले नाक अली आदिलशहासमोर कटणार नाही, या कल्पनेनेच त्याला दिलासा मिळाला. परंतु काही वेळातच शिवा काशिदासचे पितळ उघडे पडले. सिद्दी जोहरने आपल्या जावयाला शिव्यांची लाखोली वाहिली आणि पुन्हा राजांच्या पाठलागावर जाण्याचे आदेश दिले.

सिद्दी मसूदने आता आपल्याबरोबर जाण्यासाठी दोन हजार स्वार आणि एक हजार सैनिकांची नवी तुकडी तयार केली आणि सकाळी तो विशाळगडाच्या दिशेने निघाला. तोपर्यंत उन्हे वर आली होती. घोडेस्वार वेगाने अंतर कापू लागले. राजांचा चमू पायी चालला होता. मसूद मलकापूरनंतर पश्चिमेकडे वळला. दुपारी एक वाजेतोपर्यंत राजांना आपला पाठलाग होत आहे, याची कल्पना आली. त्यावेळी ते घोडखिंडीपाशी पोचले होते. विशाळगड अजून सात मैल दूर होता. गेले पंधरा तास ते चालत होते. पाठलाग करणाऱ्या शत्रूला थांबवणे जरुरीचे होते.

राजांनी काही मिनिटे घोडखिंडीची जलद पाहणी केली. वाट वळणे घेत खिंडीपर्यंत पोचत होती. खिंडीच्या दोन्ही बाजूंना सरळसोट उभे कडे होते आणि डोंगरसरी होती. खिड ओलांडून जाण्याचा मार्ग केवळ त्यातून जाणाऱ्या वाटेकरवी होता. बाजूने डोंगर चढून दुसऱ्या बाजूला जाणे शक्य नव्हते. त्यांनी पुढील कारवाईचा आराखडा बनवला. त्यांच्याजवळ ६०० मावळ्यांची संख्या होती. त्यांपैकी ३०० मावळे त्यांनी बाजीप्रभू देशपांडेच्या हाताखाली दिले. बाजीप्रभू शत्रूला खिंडीत अडवू शकेल, याचा राजांना पूर्ण विश्वास होता.

राजांच्या तुकडीला गडाच्या माथ्यावर पोचण्यास अजून पाच-सहा तास लागणार होते. वाटेत त्यांना विशाळगडाभोवती घातलेल्या सिद्दीच्या वेढ्याला तोडायचे होते. बाजीप्रभूला राजांनी आपण गडाच्या माथ्यावर पोचेपर्यंत शत्रूला या खिंडीत अडवून धरण्याचे काम दिले. आपण तोफेचे तीन गोळे उडवून गडावर पोचल्याचा संकेत देऊ, तोपर्यंत शत्रूला थोपवून धरण्याचे काम त्यांनी बाजीप्रभूला दिले. ते शक्य होते, याची राजांना जाणीव होती. ही संधी दिल्याबद्दल ईश्वराचे आभार मानत बाजीप्रभूने राजांना दंडवत घातला. 'निश्चिंत राहा, राजे. तुम्ही पोचेपावेतो ही घोडखिंड पडणार नाही.' त्याने राजांना आश्वस्त केले. राजांची तुकडी पुढे मार्गस्थ झाली. दुपारचा दीड वाजला होता.

बाजीप्रभू पायदळाचा एक कसलेला सरदार होता. त्याने मग जमिनीची पाहणी करून आपल्या मावळ्यांची मोर्चेबंदी केली. चढ जिथे चालू होत होता, तिथून पार खिंडीपर्यंत टप्प्याटप्प्याने शत्रूला कसे अडवायचे, याचा माणसांची जागोजागी पेरणी करतानाच आराखडा बनवला. डोंगराच्या ठेवणीनुसार केलेली त्याची मांडणी कसबी आणि सरस डावपेचांचे उत्तम उदाहरण होते. कोठून गोळीबार येतो आहे, हे कळणे शत्रूला कठीण होणार होते. तासाभरात शत्रूला तोंड देण्यासाठी तो जय्यत सज्ज होता. आपली सरदारकी आणि वैयक्तिक शौर्य तो आज पणाला लावणार होता.

राजे गेले सोळा तास वारा-पावसातून, खाचा-खळग्यांतून मार्गक्रमण करीत होते. अजून दोन तासांनंतर त्यांना शत्रूच्या वेढ्याला ओलांडून जायचे होते. काही वेळातच ते तिथे पोचले. वेढा तितका बळकट नव्हता. जिवाच्या कराराने राजांनी शत्रूवर हल्ला केला आणि त्यांना पळवून लावले. त्यानंतर त्यांनी आपली आगेकूच चालू ठेवली.

काही वेळातच मसूदचे घोडेस्वार खिंडीखाली पोचले. त्याच्यावर बाणांचा अचूक वर्षाव होऊ लागला. त्यांना घोडे सोडून पुढे जाताच येईना. बाजीप्रभूच्या सैन्याने त्यांना परत फिरवले. त्यानंतर दीड-दोन तासांत मागून पायी येणारे फाझलखानाबरोबर पायदळाचे शिपाई पोचले. त्यांनी बाजीप्रभूचे मोर्चे एकामागून एक गारद करावयास चालू केले.

बाजीप्रभूच्या तीनशे मावळ्यांविरुद्ध सिद्दीचे दोन हजार सैनिक लढत होते. मुकाबला विषम होता. पण तरीही बाजीप्रभूची तुकडी मागे फिरत नव्हती. राजे गेल्यापासून पाच-साडेपाच तास उलटून गेले होते. हातघाईची लढाई शिगेस पोचली होती. शत्रूची आघाडीची तुकडी खिंडीच्या तोंडापर्यंत पोचली होती. तेवढ्यात तोफेच्या एकामागून एक गोळ्यांचा आवाज खोऱ्यात दुमदुमला. थोड्या क्षणांतच योगायोगाने बाजीप्रभू धारातीर्थी पडला. राजांना दिलेले वाचन त्याने पाळले होते. त्याचे नेतृत्व, वैयक्तिक शौर्य आणि स्वामीनिष्ठा महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली आहे. आजही त्याची गाथा महाराष्ट्राच्या प्रत्येक तरुणाला आणि विशेषत: सैन्यदलात दाखल झालेल्या प्रत्येक महाराष्ट्रीयाला चिरंतन प्रेरणा देते.

सिद्दी मसूदचे सैन्य खिंड पार करून विशाळगडाच्या पायथ्याला पोचले. मसूदचे उरलेसुरले सैन्य दिवसभराच्या श्रमाने कमालीचे थकले होते. दुसऱ्या दिवशी त्या थकलेल्या सैन्यानिशी का होईना, मसूदने विशाळगडाभोवतीचा वेढा अधिक बळकट बनवला. शिवाजीराजांना हेच नको होते. गडावर ताजेतवाने सैन्य होते. महाराज आपल्या गडावर आले, हे पाहून त्यांचे मनोधैर्य आणखीनच उंचावले होते. त्यांनी त्वेषाने सिद्दीच्या माणसांवर १५ जुलैच्या पहाटे अचानक करारी हल्ला चढवला आणि सिद्दीच्या सैन्याला पळवून लावले. अपयशी सिद्दी मसूद आपल्या सासऱ्यापाशी पन्हाळ्याला परतला. काही दिवसांनी राजांनी राजगडास प्रयाण केले.

सिद्दी जोहरची नाचक्की झाली होती. त्याने पन्हाळ्याचा वेढा चालू ठेवला. अली आदिलशहाचा त्याच्यावरचा विश्वास पूर्णत: उडून गेला होता. आता त्याने स्वत: जाऊन पन्हाळा काबीज करायचे ठरवले. तो १७ ऑगस्टला मोठ्या सैन्यानिशी विजापूरहून निघाला. आणि सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात मिरजेला पोचला. शिवाजीराजांना हे जेव्हा कळले, तेव्हा त्यांनी पन्हाळा गड सिद्दी जोहरच्या हवाली करण्याचा निर्णय घेतला. तसा त्यांनी किल्लेदाराला निरोप धाडला. २२ सप्टेंबरला सिद्दीच्या हाती किल्ला सोपवला गेला.

अली आदिलशहाने शिवाजीराजांना पकडण्यात आलेल्या अपयशाबद्दल सिद्दी जोहरचा जाहीर पाणउतारा केला. तो खालच्या मानेने कुर्नूलला परतला. लवकरच त्याला शहाच्या हुकमानुसार विषप्रयोग करून ठार मारण्यात आले. या कारवाईत काही कारण नसताना आपले हात बरबटून घेणाऱ्या इंग्रजांची हबेलहंडी उडाली. या साऱ्या प्रकरणात ताठ मानेने परतले, ते फक्त शिवाजीराजेच!

लष्करी विलेषण

लढाईत विजय प्राप्त झाल्यावर हुरळून जाऊन जल्लोष करत आणि आनंद साजरा करत वेळ वाया घालवण्याऐवजी अपयशातून उद्भवणाऱ्या शत्रूच्या दुर्बलतेचा अधिकतम फायदा घेत आक्रमक कारवाई पुढे चालू ठेवून ते यश वृद्धिंगत करणे या डावपेचाला लष्करी शास्त्रात 'एक्सप्लॉयटेशन' (यशसंवर्धन) अशी संज्ञा आहे. शिवाजीराजांनी प्रतापगडाची लढाई संपल्यानंतर लागलीच नेतोजी पालकरला विजापूरच्या दिशेने घोडदौड आरंभ करण्यास आधीच आदेश देऊन ठेवले होते. लढाईच्या रात्रीच शत्रूकडून काबीज केलेले घोडे आपल्या बारगीरांना देऊन राजांनी स्वत: ५००० स्वारांसह त्याच दिशेने प्रयाण केले. त्यानंतर दोघांनी मिळून संपूर्ण कोल्हापूर प्रांत स्वराज्यात आणला आणि प्रचंड पैसा गोळा केला. किंबहुना प्रतापगड लढाईतील यशापेक्षाही हे अर्जित अधिक निष्पत्तिपूर्ण होते. शिवाजीराजांची ही चाल 'यशसंवर्धना'चे समर्पक उदाहरण आहे.

यशसंवर्धनाची ही कामगिरी चालू असतानाच आदिलशाही आणि मोगल या दोन्ही बलवत्तर सत्ता एकत्र होऊन आपल्यावर हल्ला चढवण्याची तयारी करीत आहेत, ही बातमी लागल्यावर राजांनी आपला आक्रमक पवित्रा बदलून संरक्षणात्मक भूमिका घेण्याचा तत्काळ निर्णय घेतला. यात त्यांनी थोडाही वेळ दवडला नाही. शिवाजीराजांना पराभवाला कधीही सामोरे जावे लागले नाही, याचे कारण त्यांची ही साक्षेपी प्रवृत्ती आणि शीघ्र निर्णयशक्ती!

या ठिकाणी सर बेसिल लिडेल हार्टचा निर्वाळा पुन्हा अधोरेखित करणे समर्पक होईल. हार्टने लिहिले आहे, 'तुमचे उद्दिष्ट तुमच्यापाशी उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या चौकटीत बसणारे असले पाहिजे. त्यासाठी उद्दिष्टाचे तर्वनिष्ठ विलेषण करणे आणि आपल्या क्षमतेची आणि मर्यादांची पुरेपूर जाणीव असणे आवश्यीक आहे. आपल्या आवाक्याबाहेर असलेल्या उद्दिष्टामागे धावणे चुकीचे आहे.' राजांच्या सेनापतित्वाचे हे असामान्य अंग होते. त्यांनी आपल्या तर्कनिष्ठ निर्णय घेण्याच्या वाटेत घमेंड, प्रौढी वा उन्माद अशा कोत्या भावना कधीच येऊ दिल्या नाहीत. आपण काय करू शकतो आणि काय करू शकत नाही, याची त्यांना अचूक जाणीव होती. उच्च दर्जाच्या लष्करी नेतृत्वाला स्वत:च्या क्षमतेची नि:संदिग्ध जाणीव असणे आवश्य क आहे; नाहीतर ते आपल्या सैनिकांच्या विनाकारण जीवहानीला कारणीभूत होऊ शकते.

पन्हाळगडाच्या मोहिमेचे दोन प्रमुख लक्षणीय लष्करी पैलू आहेत; पहिला, किल्ल्यांच्या संरक्षणशक्तीवर आधारित रणनीतीची सक्षमता आणि दुसरा, गनिमी काव्याच्या डावपेचात विस्मयकारकता व शाठ्य या तत्त्वाचा सिंहाचा वाटा.

मागच्या प्रकरणात विवरण केल्यानुसार राजांच्या संरक्षणात्मक रणनीतीचा आत्मा होता, त्यांनी निर्माण केलेले किल्ल्यांचे जाळे. त्यांच्यावर राजांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे मिरजेच्या किल्ल्याचा वेढा उठवून ते ताबडतोब पन्हाळ्याला रवाना झाले. पावसाळा तोंडावर आला असल्यामुळे सिद्दी जोहरच्या प्रचंड सैन्याचा वेढा दीर्घ काळासाठी तटवून धरण्याची क्षमता पन्हाळा किल्ल्यात आहे, याची त्यांना खातरी होती. मिरजेचा भुईकोट किल्ला फार दिवस तटवून ठेवता येणार नाही, याची त्यांना जाणीव होती. त्याचप्रमाणे पन्हाळ्यावरून निसटून गेल्यावर त्यांनी विशाळगडसारख्या आणखी एका अभेद्य किल्ल्यात आश्रय घेण्याचे

ठरवले. त्यांना हे दोन्हीही किल्ले मिरजेच्या किल्ल्याच्या सान्निध्यात उपलब्ध झाले, ही काही केवळ योगायोगाची गोष्ट नव्हती. किल्ल्यांवर आधारित प्रदेशाची संरक्षण नीती अवलंबिता यावी म्हणून महाराष्ट्रात ठिकठिकाणी जुने किल्ले बळकट करून आणि नवनवीन किल्ले बांधून त्यांचे जाळे त्यांनी आधीपासूनच निर्माण केले होते. त्यामागे असलेल्या सखोल तर्वनिष्ठतेचे श्रेय राजांना देणे आवश्यपक आहे.

कोणताही लष्करी नेता आपली स्वत:ची विशिष्ट रणनीती आखतो, तेव्हा ती रणनीती तडीस नेण्यासाठी आवश्यपक असलेल्या संसाधनांची तजवीज करणे हे त्याचे कर्तव्य असते. शिवाजीराजांनी किल्ल्यांच्या संरक्षणाची, तो शत्रूला हल्ला करून जिंकणे अशक्य करण्याची आणि त्याच्या वेढ्याला तो रंजीस येईपर्यंत तटवून धरण्याची किती परिणामकारक व्यवस्था केली होती, ते पन्हाळ्याच्या उदाहरणावरून सिद्ध होते. पन्हाळ्यावर आश्रय घेण्याचे ठरवल्यानंतर त्याच्यात अन्न-धान्याच्या पुरवठ्याची व्यवस्था करण्याइतका वेळ निश्चितच उपलब्ध नव्हता. सिद्दीने वेढा टाकीपावेतो जो काही थोडा वेळ मिळाला, त्याचा त्यांनी उपयोग केला, परंतु जवळजवळ चार महिने आतील १००० ते १५०० लोक बाहेरून कोणतीही कुमक न मिळता तिथे राहू शकले, यावरून किल्ला-व्यवस्थापनाच्या क्षमतेची कल्पना येऊ शकेल. चार महिने सिद्दीला तटवून धरल्यानंतर राजे किल्ल्यावरचा खाद्यपुरवठा संपत आला म्हणून बाहेर पडले, असे समजणे चुकीचे आहे. पुण्याच्या परिसरातील शाईस्ताखानाचा धुमाकूळ हाताबाहेर जाऊ लागल्याने त्याच्यावर उपाय करण्यासाठी त्यांनी पन्हाळा सोडण्याचा निर्णय घेतला. जर ती आवश्यउकता नसती, तर महाराज सिद्दी कंटाळून वेढा उठवेपर्यंत तेथेच राहिले असते.

विस्मयकारकता आणि शाठ्य या तत्त्वाच्या राजांद्वारा अप्रतिम वापराचा पन्हाळा हा आणखी एक मंत्रमुग्ध करणारा प्रसंग आहे. नुकतेच अफझलखानाला याच डावाने चीतपट केले असल्याने सिद्दी जोहर किंचितही शंका न येता बळी पडेल, अशी युक्ती शोधून ती अमलात आणणे हे भगीरथी काम होते. शिवाजीराजांच्या कारस्थानाचे अनेक पैलू होते. गेले चार महिने त्यांनी वेढा तोडण्याचे कोणतेही प्रयत्न न केल्यामुळे सिद्दी आणि त्याचे लोक बेसावध आणि हलगर्जी झाले होते. इतके दिवस वेढ्याखाली राहिल्यामुळे त्यांच्याकडील अन्नधान्य संपत आले असण्याची शक्यता होती. त्यामुळे राजांनी वकिलामार्फत पाठवलेल्या माफीनाम्यावर सिद्दीचा विश्वास बसला. दुसऱ्याच दिवशी स्वत: भेटीस येण्यासाठी दाखवलेली तयारी सिद्दीला खरी वाटणे शक्य होते. सिद्दीने ती स्वीकारली व त्याच्या तयारीसाठी सर्वांना आदेश दिले जातील, तर ती बातमी वेगाने पसरेल, ही राजांची अटकळ खरी ठरली.

त्या बातमीमुळे त्यांच्यावरील ताण नाहीसा होऊन सर्वत्र निर्धास्ततेचे साम्राज्य पसरेल आणि त्याचा फायदा घेऊन आपण सटकून जाऊ शकू, हा त्यांचा होरा या युक्तीची मध्यकल्पना होती. तो होरा फळाला गेला, हे राजांचे भाग्यच म्हटले पाहिजे. तरीही त्याच्यामागील आशावादाचे श्रेय त्यांचे होते. सर बेसिल हार्टनुसार ‘गुप्तता, कारवाईमधील नावीन्य, आपले स्थान आणि हालचाल शत्रूला दिसू न देण्याची प्रक्रिया (कॅमाफ्लाज व कन्सीलमेंट), फसवेगिरी, बेदरकारी आणि शीघ्रता हे शाठ्याच्या योजनेचे घटक आहेत.’ राजांच्या योजनेत

या सर्वांचा समावेश होता.

प्रतिकूल हवामान हा गनिमी डावपेचाचा हुकमी एक्का असतो. जुलैच्या अखेरीस या भागात पावसाची धार शिगेला पोचत असे. मुसळधार पावसात पहारेकऱ्यांना आपले मोर्चे सांभाळता येणार नाहीत आणि पावसामुळे दृग्गोचरतेची (व्हिजिबिलिटीची) पातळी कमालीची खालावल्यामुळे आपल्या हालचालींची दखल घेणे अवघड होऊन जाईल, हा त्यांचा अजमास रास्त ठरला. तरीही आपल्या हालचालींचा सुगावा लागण्याच्या शक्यतेकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. त्यासाठी त्यांनी पर्यायी योजना आखली. आपल्यासारख्याच दिसणाऱ्या माणसाकरवी मागोवा घेणाऱ्या तुकडीची दिशाभूल करण्याची योजना त्यांनी अमलात आणली. ती अपेक्षेबाहेर फायदेशीर ठरली. किंबहुना ते सुटून पळाले, याचा सिद्दीला माग लागल्यावरही या क्लृप्तीमुळे त्यांना काही अमूल्य अवसराचा उपहार लाभला आणि ते आपल्या लक्ष्याला वेळेत पोचू शकले. परंतु त्यात बाजीप्रभू देशपांडे यांनी आपल्या प्राणांची दिलेली आहुती अविस्मरणीय आहे. त्यांच्यासारखे स्वामिनिष्ठ सरदार हे राजांनी स्वत:च्या उदात्त उदाहरणाने निर्माण केले होते.

गनिमी काव्याचे पाच प्रमुख पैलू असतात; ते म्हणजे आक्रमक चाल, बळाचा मितव्यय, विस्मय व शाठ्य, गतिशीलता आणि उच्च मनोधैर्य. या पाचही पैलूंचा राजांच्या योजनेत समावेश होता. पन्हाळ्याहून सुटका ही राजांच्या काही काळाने झालेल्या आग्र्याहून सुटकेइतकीच अविश्वसनीय आणि रोमांचकारी होती. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात शत्रूच्या तावडीतून सुटलेल्या अनेक युद्धबंद्यांच्या गाथा अजरामर झाल्या आहेत. त्यांच्यातील काही मोजक्याच वैफियती शिवाजीराजांच्या पन्हाळ्याहून सुटकेच्या तोडीच्या ठरतील.

संदर्भसूची

१. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान १६५.

२. विजय देशमुख; शककर्ते शिवराय; छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन; पान २५०; उद्धृत चंद्रराव मोरे बखर; पान २६-२७.

३. गो. स. सरदेसाई; मराठी...............; पान १६६-६७.

४. देशमुख; शककर्ते ....; पान २५०; उद्धृत मोरे बखर पान २७.

५. पुर्वोक्त; पान २५१; उद्धृत जेधे शकावली.

६. पुर्वोक्त; पान २५१; उद्धृत गो. स. सरदेसाई; शककर्ता शिवाजी; तिसरी आवृत्ती, पान १०४.

७. पुर्वोक्त; पान २५६; उद्धृत चंद्रराव मोरे बखर, पान २९.

८. पुर्वोक्त; पान २५६,

९. पुर्वोक्त; पान २७०; उद्धृत सभासद बखर, पान २७.

१०. पुर्वोक्त; पान २७०; उद्धृत जेधे शकावली.

११. पुर्वोक्त; पान २७१; उद्धृत जदुनाथ सरकार; शिवाजी, पान ५१.

१२. आर. डी. पळसोकर, कर्नल; शिवाजी द ग्रेट गुरीला; कर्नल आर. डी. पळसोकर; पान ७२.

१३. सरदेसाई; मराठी ....; पान १७३; उद्धृत शिवचरित्र प्रदीप, पान ४२.

१४. देशमुख; शककर्ते.......; पान २८४; उद्धृत त्र्यं. श. शेजवलकर; शिवछत्रपती, पान १११.

१५. पुर्वोक्त, पान २८४; उद्धृत सेतुमाधव पगडी; छत्रपती शिवाजी; पान ८९.

१६. सरदेसाई; मराठी ...., पान १७४; उद्धृत शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर, कलम ३०.

१७. पुर्वोक्त, पान १७५.

१८. पळसोकर; शिवाजी द ग्रेट ....; पान ७४.

१९. सरदेसाई; मराठी ....; पान १८०/१८१; उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस
ऑफ शिवाजी; तिसरी आवृत्ती; पान १२२/१२३.

२०. पुर्वोक्त; पान १८२.

२१. देशमुख; शककर्ते ..... पान २८५; शिवकालीन पत्रसार संग्रह, भा. इ. सं. मं.; पान ७५३/८०.

२२. ग. भा. मेहेंदळे; शिवाजी हिज लाइफ अँड टाइम्स; परम मित्र पब्लिकेशन्स;
पान १९६.

२३. सरदेसाई; मराठी रियासत..........; पान १७६.

२४. पुर्वोक्त; पान १८९.

२५. पुर्वोक्त; पान १९०.

२६. पळसोकर, शिवाजी द ग्रेट.......; पान ८३.

२७. सरदेसाई; मराठी ....; पान १९२; उद्धृत शिवप्रभूचे चरित्र, सभासद बखर, पान १५.

२८. देशमुख; शककर्ते ....पान ३३०; उद्धृत शिवदिग्विजय पान १६३.

२९. पुर्वोक्त; पान ३३१; सभासद बखर पान १८.

३०. पुर्वोक्त; पान ३३२; उद्धृत सभासद बखर पान १४.

३१. पुर्वोक्त; पान ३३२; उद्धृत सभासद बखर पान १९.

३२. पुर्वोक्त; पान ३३३; उद्धृत श्व्चारित्र साहित्य खंड ६ पान ६७.

३३. पुर्वोक्त; पान ३३४; उद्धृत सभासद बखर पान २१.

३४. पळसोकर; शिवाजी द ग्रेट ....; पान ९६.

३५. देशमुख; शककर्ते ....; पान ३४८; उद्धृत शिवभारत खंड २३, पान ५८-६१.

३६. पुर्वोक्त; पान ३४४-३४४; उद्धृत ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १; लेख ११९.

३७. पुर्वोक्त; पान ३५०; उद्धृत शिवभारत खंड २४, पान ४८-५२.

३८. पुर्वोक्त; पान ३५०; उद्धृत शिवचरित्र पान ५७.

३९. पुर्वोक्त; पान ३५१; उद्धृत शिवभारत खंड २५; पान ४.

४०. सरदेसाई; मराठी ....; पान १९८.

४१. पुर्वोक्त; पान १९९.

४२. पळसोकर; शिवाजी द ग्रेट ......; पान १०६.

४३. पुर्वोक्त; पान १०९.

४४. देशमुख; शककर्ते.......; उद्धृत शिवभारत खंड २५; पान १९-२४.

४५. पुर्वोक्त; उद्धृत शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड १. पत्र ८३९.

४६. सरदेसाई; मराठी ....; पान २००, उद्धृत शिवकालीन पत्रसार संग्रह, पत्र ८३१, पान १९४.

४७. पुर्वोक्त; उद्धृत शिवभारत अध्याय २७, लोक १-१३.

५.

मोगलांशी लढा



शाईस्ताखानाचे सावट

शाईस्ताखानाची नेमणूक

१६५८मध्ये दिल्लीस जाताना औरंगजेबाने आपला पुत्र मुअझ्झम याला दक्षिणेचा कारभार पाहण्यासाठी मागे ठेवले होते. १६५९मध्ये राज्यारोहण केल्यावर त्याने मुअझ्झमला परत बोलावले आणि त्याच्या जागी आपला मामा शाईस्ताखान याची नेमणूक केली. शाईस्ताखान दिल्लीहून निघून वर्षाअखेरी औरंगाबादेस पोचला. २८ जानेवारी १६६०ला तो औरंगाबादहून निघाला आणि ११ फेब्रुवारीला अहमदनगरला पोचला. तेथून २५ फेब्रुवारीला तो निघाला. म्हणजे मिरजेचा वेढा उठवून राजे पन्हाळगडावर आश्रयार्थ गेले, त्याच सुमारास शाईस्ताखान भीमा ओलांडून स्वराज्यात दाखल झाला.

शाईस्ताखानाने आपल्याबरोबर प्रचंड फौज आणली होती. तिची संख्या एक लाखाच्या घरात असावी. त्याच्याबरोबर अनेक वरिष्ठ आणि कर्तबगार सरदार पाठवण्यात आले होते. शमसखान पठाण, नामदारखान, गयासुद्दीखान, हसन मुनीम, सुलतान मिर्झा, खोजा सुलतान, सिद्दी फतेह, फतेजंग, करतलबखान, भावसिंह, किशोरीसिंह, राजसिंह गौड, द्वारकाजी, जिवाजी, परसोजी, बालाजी, त्र्यंबक शरीफजी भोसले, अनंत व दत्ताजी खंडागळे, दत्ताजी व रुस्तुमराव जाधवराव, माहुरची रायबाघन, तिचे वृष्णराज, प्रचंडराज वगैरे भाऊ, सर्जेराव घाटगे इत्यादी पठाण, उझबेगी, सिद्दी, राजपूत, मराठे जातींचे अनेक सरदार आपापल्या शिबंदीसह शाईस्ताखानाबरोबर होते.१

स्वराज्याच्या मुलखात खानाच्या सेनेने जाळपोळ, लुटालूट, कत्तली, धर्मस्थानांचा विध्वंस, धर्मांतर अशा कारवाया सुरू केल्या. त्याच्याबरोबर असलेले हिंदू आणि विशेषकरून मराठा सरदार याच्यात सहभागी व्हावेत, ही शरमेची गोष्ट होती, याबद्दल शंका नाही. गावेच्या गावे उजाड होऊ लागली. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, त्यांना जनतेने विरोध केला नाही. शिवाजीराजांनी आपले सरदार जागोजागी पांगलेले ठेवून त्यांना गनिमी काव्याकरवी शाईस्ताच्या फौजांना हैराण करण्याचे आदेश दिले होते आणि ते जिद्दीने व जिवाच्या कराराने अमलात आणले जात होते.२

खान सुप्याला पोचल्यावर तिथून मराठ्यांचा मोर्चा उठला. खानाने जाधवरावाला तिथे नेमले. मोगल लष्करास धन्य व साहित्य पुरवण्याची जबाबदारी खानाने त्याच्यावर टाकली. ५ एप्रिलला खान बारामतीला पोचला. तिथे शिबंदी ठेवून वाटेत इंदापूर आणि होळ येथे मुक्काम

करत तो १६ एप्रिलला शिरवळला पोचला. तिथे त्याने सुभानमंगळ किल्ला काबीज केला आणि तिथे मोर्चा उभारला. शिरवळच्या पश्चिमेस २० मैलांवर राजगडजवळ मराठ्यांची फौजेची मोर्चेबंदी होती. खानाने शमसुद्दिन, राव भावसिंग व मीर अब्दुल यांना त्याच्यावर चालून जाण्यास सांगितले. मोगल फौजेबरोबर चकमक होण्याची शक्यता दिसताच मराठ्यांच्या तुकडीने डावपेची माघार घेतली. खान शिरवळवरून परत फिरला.

७ मे रोजी तो पुण्यास पोचला आणि मुठेच्या किनाऱ्यावर खानाची छावणी पडली. राजांच्या लाल महालात खानाने मुक्काम ठोकला. आजूबाजूचा मुलूख लुटला जाऊ लागला. सारा मुलूख उजाड पडण्यास आरंभ झाला.

संग्रामगडावरील झुंज

पावसाळा तोंडाला आला होता. दळणवळण बंद झाल्यावर उपासमार होण्याची भीती खानाला भेडसावू लगली. त्यामुळे चाकणचा संग्रामदुर्ग नावाचा भुईकोट किल्ला काबीज करून तिथे पावसाळा घालवण्याचे खानाने ठरवले. मातीच्या ढिगाऱ्यावर बांधलेल्या चाकणच्या चौकोनी किल्ल्याला सहा बुरुज होते. सभोवताली खंदक होता. तटबंदी १२ फूट रुंद आणि ४५ फूट उंच होती. किल्ल्यात ५००-६०० मावळे होते. फिरंगोजी नरसाळा किल्लेदार होता. तो अनुभवी सरदार होता. २१ जून १६६०ला खान वीस हजारांची सेना घेऊन चाकणपाशी पोचला. स्वराज्याच्या सीमेत प्रवेश केल्यानंतर खानाला कोठेही विरोध झाला नव्हता, त्याचप्रमाणे आपण पोचल्यावर मराठे तिथून निघून जातील, असा त्याचा अजमास होता. परंतु तसे घडले नाही. किल्ल्यातून कडवा प्रतिकार करण्याच्या मराठ्यांच्या निर्धाराची जाणीव खानाला लागलीच झाली.

खानाने चाकण किल्ल्याला चारी बाजूंनी वेढा टाकला. दिवसामागून दिवस लोटू लागले, परंतु मराठे शरण येण्याची काही चिन्हे दिसत नव्हती. किल्ल्यात दारू-गोळ्याचा पुरेसा साठा होता. आतून बाणांचा आणि बंदुकीच्या गोळ्यांचा अचूक मारा होत होता. त्याशिवाय मराठ्यांच्या छोट्या छोट्या तुकड्या वेळी-अवेळी मोगल सैन्यावर धाडी घालून किल्ल्याच्या आत नाहीशा होत असत. पावसाळ्याला तोंड लागल्यावर उघड्यावरील खानाच्या छावणीतील सैन्याची आणखीनच दैना होऊ लागली. पावसामुळे बाहेर पडणे मुश्कील होऊ लागले.३ मराठ्यांचे गनिमी हल्ले मात्र थांबत नव्हते. किल्ल्यावर गोळाफेक करण्यासाठी खानाने मोठ्या तोफा मागवल्या आणि किल्ल्याभोवतीचा फास आणखीनच आवळला.

काहीच चालेना, हे पाहून खानाने ईशान्येकडून मराठ्यांच्या नकळत एक भुयार खोदले आणि ते पार बुरजापर्यंत नेले. भुयारात स्फोटके ठासून भरण्यात आली. वेढा टाकून ५५ दिवस झाले होते. १४ ऑगस्ट १६६०चा दिवस निवडण्यात आला आणि दुपारी तीन वाजता सुरुंगास बत्ती देण्यात आली. मोठा धमाका झाला. बुरुजावरचे मराठे हवेत उडाले;४ परंतु तरीही मराठे घाबरले नाहीत. त्यांनी आपला लढा चालू ठेवला. त्या रात्री त्यांनी मोगलांना आत येऊ दिले नाही. दुसऱ्या दिवशी मात्र एवढ्या मोठ्या संख्येविरुद्ध मराठ्यांना किल्ला तटवून धरता येईना. १५ ऑगस्टला किल्ला खानाच्या हातांत पडला. शाईस्ताखान मराठ्यांच्या पराक्रमाने

अचंबित झाला होता.

फिरंगोजी जेव्हा खानाच्या हातांत सापडला, तेव्हा त्याला खानाने सन्मानाने वागवले. त्याला वेगवेगळी आमिषे दाखवून आपल्या सैन्यात येण्यासाठी त्याची विनवणी केली. परंतु जेव्हा तो बधला नाही, तेव्हा खानाने त्याला इतमामाने शिवाजीकडे रवाना केले. तो परत आल्यानंतर राजांनी त्याला भूपाळगडची हवालदारी दिली.५

शाईस्ताखानाचा किल्ला घेण्याचा चाकण हा पहिला अनुभव होता. चाकणसारख्या भुईकोट किल्ल्यात मराठ्यांची तुटपुंजी शिबंदी असूनही त्याचा ताबा घेण्यात त्याचे नऊशे-हजार लोक मारले गेले होते. खान काही बेजबाबदार आणि कचखाऊ सरदार नव्हता. तो अनुभवी, कसलेला आणि औरंगजेबाशी एकनिष्ठ होता. परंतु चाकणच्या अनुभवातून तो नवा धडा शिकला होता. बादशहाने हा डोंगरी मुलूख जिंकण्याचा नाद सोडून शिवाजीशी सामोपचाराने बोलणी करावीत, असा सल्ला त्याने आपल्या भाच्याला दिला. खानाने दिलेल्या संकेतावरून राजांनी आपले वकील सोनोपंत डबीर यांना शाईस्ताखानाकडे बोलणी करण्यास पाठवले. परंतु त्या शिष्टाईतून काही निष्पन्न झाले नसावे. याचे प्रमुख कारण म्हणजे औरंगजेब. त्याने हा प्रस्ताव नाकारला असावा. त्याऐवजी औरंगजेबाने शिवाजीराजांशी लढण्यास मदतीसाठी गुजरातेतून राजपूत राजा यशवंत सिंग याला पाठवले.६

शाईस्ताखान ऑक्टोबर १६६०मध्ये चाकणहून पुण्यास परतला. औरंगजेबाने त्याची कुमक म्हणून माळव्याचा सुभेदार जाफरखान याला सैन्यासह पुण्याकडे रवाना केले. औरंगजेब मराठा स्वराज्य चिरडून टाकण्यासाठी किती शर्थ करीत होता, हे यावरून स्पष्ट होत होते. त्याबरोबरच वृष्णाजी काळभोर, बाबाजीराम होनप, संभाजी कावजी यांच्यासारखे काही स्वार्थी आणि लाळघोटे मराठे सरदार खानापुढे गुडघे टेकून नोकरी मागू लागले.

शाईस्ताखानाला औरंगजेबाने मराठ्यांबरोबर आदिलशाहीचा प्रदेश काबीज करण्याचेही काम दिले होते. त्यानुसार नोव्हेंबरमध्ये आदिलशाहीचा परिंडा किल्ला जिंकायला त्याने करतलबखानाला रवाना केले. परिंडा हा वास्तविक अभेद्य किल्ला होता आणि शहाजीराजांनी तो शहाजहानविरुद्ध लढवला होता. करतलबखानाने किल्ल्याला वेढा घातला. किल्लेदार गालीब हा लेचापेचा निघाला. घाबरून त्याने किल्ला खानाच्या हवाली करून टाकला.

शिवाजीराजे पन्हाळ्यावरून सुटल्यानंतर काही दिवस विशाळगडावर होते. ऑगस्ट १६६०मध्ये ते राजगडला परतले. त्यांनी बांदल देशमुख, कान्होजी जेधे वगैरे पराक्रमी आणि कार्यनिष्ठ सहकाऱ्यांचा सन्मान केला आणि खंडूजी खोपडेसारख्या विश्वासघातक्यांना जबर शिक्षा केली. आदिलशाहीच्या सापळ्यातून राजांची सुटका झाली होती. आता त्यांना मोगलांसारख्या बलवत्तर शत्रूशी लढा द्यायचा होता.

उंब्रेची लढाई

करतलबखानाची कोकणात रवानगी

औरंगजेबाने शाईस्ताखानावर मराठा स्वराज्य आणि आदिलशाहीचा जास्तीत जास्त प्रदेश

काबीज करण्याची कामगिरी सोपवली होती. मोगलांचे राज्य वसई-नाशिक-बुऱ्हाणपूर या रेषेच्या उत्तरेला होते. कोकण मराठ्यांच्या नियंत्रणाखाली होते. शाईस्ताखानाचा त्याच्यावर डोळा होता. ते आपण घेतले, तर ती मोगल साम्राज्यात एक लक्षणीय भर ठरेल, या विचाराने शाईस्ता भारून गेला होता. कोकण जर आपण काबीज केले, तर मराठ्यांचे किल्ले दोन्ही बाजूंनी घेरता येतील, याबद्दल त्याला विश्वास होता. त्यामुळे त्याने आपला मोर्चा कोकणाकडे वळवण्याचे ठरवले.

नुकताच परिंडा किल्ला करतलबखानाने शिताफीने काबीज केला होता. त्यामुळे त्याच्यापाशी असलेल्या अनेक सरदारांमधून या कामासाठी शाईस्ताने त्याचीच निवड केली. त्यासाठी करतलबखानाला त्याने २०,०००चे घोडदळ आणि पायदळ उपलब्ध करून दिले. त्याच्याबरोबर त्याने अनेक कर्तबगार आणि अनुभवी राजपूत, मराठा आणि मुसलमान सरदार आपापल्या शिबंद्यांसमवेत दिले. त्यात कोकणाची माहिती असलेले काही मराठा सरदारही होते. उदारामाची शूर स्त्री रायबाघन त्यात आपली तुकडी घेऊन सामील होती. तिचे या मोहिमेतील काम विशेष उल्लेखनीय ठरले. तिची कहाणी स्वारस्यपूर्ण आहे.

वाशीमचा राजा उद्धव रामजी ऊर्फ उदाराम हा सावरगावचा कुलकर्णी. त्याच्या फारसी भाषेतील प्राविण्यामुळे तो अकबराच्या नजरेस पडला आणि त्याने उदारामला १५९२मध्ये वाशीम आणि माहूरच्या दरम्यान ५२ महालांची देशमुखी दिली. त्याच्यामार्फत शिवाजी राजांचे आजोबा लखूजी जाधवराव जहांगीर बादशहाला जाऊन मिळाले. त्यामुळे त्याचे मलिक अंबरशी वाकडे आले. १६२४च्या भातवडीच्या लढाईत तो मलिक अंबरविरुद्ध लढला. उदारामाची स्त्री पराक्रमी होती. नवरा १६३२मध्ये मरण पावल्यानंतर तिने पराक्रम गाजवला. आपला अल्पवयीन मुलगा जगजीवनराव याच्या नावाने राज्य करून तिने घराण्याचा लौकिक वाढवला. जगजीवन औरंगजेबाबरोबर १६५८साली दिल्लीला गेला असता लढाईत कामी आला. त्याच्या आईने औरंगजेबाचे दक्षिणेत विशेष साहाय्य केल्याने त्याने तिला राजव्याघ्री (रायबाघन) असा किताब दिला.७ त्यानंतर ती आपली जहागीर नातवामार्फत चालवीत राहिली.

उंब्रे परिसराची ठेवण

पुण्यापासून कुरवंडा घाटमार्गे कोकणात जाणारा रस्ता चिंचवड-वडगाव-मळवलीमार्गे कुरवंडा घाटात पोचतो. तिथून तो रस्ता कुरवंडा खिंडीमार्गे कोकणात उतरतो. खिंडीनंतर सखल भागातले पहिले खेडे येते, ते उंब्रे. खिंडीपासून ते पाच मैलांच्या अंतरावर आहे. या दोन्हींच्या दरम्यानचा रस्ता वेड्यावाकड्या वळणांचा आणि अरुंद होता.८ (नकाशा क्र. १८ पाहा.) सैन्याला ते पाच मैलांचे अंतर ओलांडण्यात बराच वेळ लागणे स्वाभाविक होते. मोगलांकडे तर मोठी संख्या, बरोबर घोडे, खेचरे, नोकरचाकर. राहण्यासाठी वेगवेगळ्या आकारांचे तंबू, भरपूर अन्नधान्य आणि इतर जामानिमा असायचा. असा लांबलचक काफिला त्या रस्त्र्यावर अक्षरश: मुंगीच्या पावलांनी गुजरू शकणार होता.


कुरवंडा खिंडीची समुद्रसपाटीपासून उंची २१०० फूट होती. खिंड ओलांडल्यावर दीड मैलांवर असलेल्या चावणी नावाच्या खेड्यापर्यंत रस्त्र्याचा उतार तीक्ष्ण होता. रस्त्र्याच्या या

भागात दोन्ही बाजूंना घनदाट झाडी होती. त्या परिसरात अंबा नदी वाहत होती. चावणीनंतर रस्ता अंबा नदीच्या उत्तर किनाऱ्याला लागून प्रथम नैर्ऋत्य दिशेत थोड्या अंतरासाठी आणि नंतर वायव्य दिशेत काही अंतरासाठी सखूची ठाकूरवाडी नावाच्या खेड्यापर्यंत जात होता. त्यानंतर अंबा नदी पुन्हा नैर्ऋत्य दिशेला वळत होती, परंतु रस्ता मात्र वायव्य दिशेतच उंब्रे गावापर्यंत पुढे जात होता. चावणी ते सखूची ठाकूरवाडी यांच्यामधील (V) व्ही या इंग्रजी आद्याक्षराच्या आकारातील रस्त्र्याचा भाग दोन्ही बाजूंनी बंद केला, तर त्याच्यामध्ये अडकलेले सैन्य बाहेर पडू शकले नसते. उंब्रेच्या आग्नेयेला एक छोटी टेकडी होती. त्यावर जर एखादी लष्करी तुकडी मोर्चेबंदी करून बसली, तर रस्यावर जाणारी वाहतूक त्यांना पूर्णपणे दिसू शकली असती. दोन्ही बाजूंना बसलेल्या तुकड्या रस्त्र्यावर अडकलेल्या शत्रूच्या सैन्याची अक्षरश: कत्तल करू शकल्या असत्या. शत्रूच्या सैन्यासाठी सापळा (अंबुश) लावण्यासाठी ही जागा अनुकूल होती.

नकाशा क्र. १८

उंब्रेची लढाई

(२ फेब्रुवारी १६६१)



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

'अंबुश' हा एक युक्तिपूर्ण लष्करी डावपेच असतो. जेव्हा शत्रूची तुकडी एक तर गस्तीवर (पेट्रोल) जात असेल किंवा त्याचा मोठा काफिला एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जात असेल, तर त्याच्या वाटेवर, दोन्ही बाजूंनी किंवा एका बाजूला, गुप्तपणे दबा धरून बसलेली तुकडी गाफील शत्रूवर अचानक गोळीबार करून आणि नंतर त्याच्यावर हल्ला करून त्याची अमाप जीवहानी करू शकते. असा डावपेच यशस्वी होण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे शत्रूच्या सैनिकांच्या किंवा वाहनांच्या जास्तीत जास्त तांड्याला सर्व बाजूंनी पकडून त्यांचा विध्वंस करण्यासाठी उपयुक्त अशी जागा. अंबुश हा विशेषत: डोंगराळी भागात छोट्या संख्येच्या तुकडीने मोठ्या संख्येच्या तुकडीवर हल्ला करण्यासाठी सर्वांत चपखल डावपेच आहे. (डोंगराळी जमातीतील बंडखोरांसाठी पोलीस किंवा लष्कराविरुद्ध वापरण्यासाठी हा नामी डावपेच आहे. अंबुश लावण्याच्या तंत्रात तरबेज असलेले नागा, कुकी वा मणिपुरी बंडखोर सुरक्षा दलांवर हल्ले चढवण्यासाठी याचा परिणामकारकपणे उपयोग करतात.)

अंबुशचा आराखडा

शाईस्ताखानाने करतलबखानाला कोकणात दिलेल्या कामगिरीबाबत शिवाजीराजांना गुप्तहेरांकडून सविस्तर बातमी मिळाली. कोणत्याही स्थितीत मोगल सैन्याला कोकणात प्रवेश करू न देण्याचा त्यांनी निर्धार केला. राजांना चावणी ते उंब्रे या रस्त्र्याची चांगली माहिती होती. या रस्त्र्यावर मोगल सेनेवर सापळा लावला, तर आपण त्यांची धूळधाण उडवू, याबद्दल त्यांना पुरेपूर विश्वास होता. राजांनी तातडीने हुकूम सोडले. मराठा सैन्य चावणीपासून उंब्रेपर्यंत रस्त्र्याच्या दोन्ही बाजूंना घनदाट झाडीत तुकड्या-तुकड्यांनी दबा धरून बसणार होते. कुरवंडा खिंडीत पहिले टेहळणी पथक लावण्यात येणार होते.

करतलबखानाची फौज पुण्याहून येताना दुरून दिसताच टेहळणी पथक मराठा फौजेला सज्ज राहण्याचा इशारा पाठवणार होते. त्यानंतर सर्व तुकड्यांनी कोणतीही हालचाल न करता शत्रूची वाट पाहावयाची होती. करतलबखानाच्या फौजेचा मुख्य भागाचे तोंड जोपर्यंत सखूची ठाकूरवाडीला पोचत नाही, तोपर्यंत कोणीही शस्त्रवापर करायचा नव्हता. एकदा का मुख्य घोडदळ, पायदळ दस्ते चावणी ओलांडून पुढे गेले आणि तोफाही पुढे गेल्या की, दोन्ही बाजूंनी गोळीबार आणि बाणांचा मारा करण्यासाठी संकेत दिला जाणार होता. ठाकूरवाडी आणि उंब्रेदरम्यानच्या रस्त्र्यावर मोठी झाडे पाडून पुढे जाण्याचा मार्ग बंद केला जाणार होता. यामुळे शत्रूचे सैन्य पूर्णपणे कोंडले जाणार होते. त्यानंतर सर्व बाजूंनी मराठे या कोंडल्या गेलेल्या सैन्यावर हल्ला चढवणार होते.

खानाच्या सैन्याचा अंबुश

करतलबखान पुण्याहून आपल्या सैन्याबरोबर कोकणाकडे प्रयाण करणार असल्याची बातमी राजांपाशी पोचली. त्यानुसार राजांनी सरनोबत नेतोजी पालकरला आपले सैन्य वरील योजनेनुसार कुरवंडा घाटात लावण्यास सांगितले. करतलबखान पुण्याहून १६६१च्या जानेवारीअखेरीस निघाला. त्याने सैन्यासह तुंगारण्य ओलांडले. सह्याद्रीची चढण तो चढला;

आता घाटामार्गे सह्याद्रीची उतरण सुरू झाली. सह्याद्रीच्या तळाशी कोकणात उंबरखिंडीचे विस्तीर्ण अरण्य होते. त्याने कुरवंडा पठारावर मुक्काम केला आणि २ फेब्रुवारीच्या पहाटे त्याने खिंड ओलांडली.

सह्याद्री उतरून खान उंबरखिंडीच्या जंगलात शिरला. 'थकवून टाकणारे चढउतार, वळणावळणाचे रस्ते, सूर्याची किरणे तळापर्यंत पोहोचणार नाहीत, एवढी किर्र झाडी असे या जंगलाचे स्वरूप होते, तिथे ना वारा होता, ना पाणी!'९ करतलबखानाची अंधारयात्रा त्या अरण्यात सुरू झाली.

नेतोजी पालकर सैन्यासह जय्यत तयार होता. त्याचे सैन्य विशेषत: डोंगराळी भागात अरण्याशी विशेषत: डोंगराळी भागात इतके एकरूप झाले होते की, खानाच्या सैन्याला त्याचा थोडाही मागमूस लागला नाही. टेहळणी पथकाला आघाडीचे दस्ते दूरवरून येताना दिसल्यावर पूर्वनिर्धारित संकेतांनुसार सर्वांना बातमी देण्यात आली. खासे राजेही आपल्या अंगरक्षकांबरोबर त्या आधीच उंब्रेच्या दक्षिणेला असलेल्या टेकडीवर पोचले होते. तिथून ते सर्व परिसर दूरवर न्याहाळू शकत होते. रस्त्रयावरील वर्दळ मात्र झाडीमुळे तिथून दिसत नव्हती. करतलबखानाचे सैन्य रेंगाळत घाटातून पुढे जात होते.

दुपारी अडीच-तीन वाजता आघाडीचे दस्ते ठाकूरवाडी ओलांडू लागले. राजांनी नेतोजीस इशारा केला. रणभेरीचा आवाज खोऱ्यात निनादला आणि मोगल सैन्यावर जोराचा गोळीबार व बाणांचा वर्षाव होऊ लागला. या अचानक माऱ्याने खानाचे सैन्य घाबरून गेले. सगळीकडे एकच गदारोळ आणि कोलाहल माजला. वाचण्यासाठी मिळेल त्या दिशेने सारे पळू लागले. तुकडीप्रमुखांचे आपल्या शिबंदीवरचे नियंत्रण पार नाहीसे झाले. शत्रूने आपल्याला घेरल्याचे करतलबखानाच्या ध्यानात आले.

आता राजांनी सरनौबत नेतोजीस शत्रूवर हल्ला चढवण्याचे आदेश दिले. पुन्हा रणभेरी वाजल्या आणि मराठा सैन्य शत्रूवर दोन्ही बाजूंनी तुटून पडले. सैरभैर पळत सुटलेल्या आपल्या सेनेस मित्रसेन 'घाबरू नका, स्थिर राहा', असा धीर देत होता. परंतु कोणालाच ते ऐकण्याइतका धीर नव्हता. राजेही शत्रूच्या सैन्यावर बाणांचा वर्षाव करीत होते. मध्यान्ह केव्हाच उलटून गेली होती. खानाच्या सैन्याचा प्रतिकार संपला. ते आता जणू काय एखाद्या चित्रातल्या माणसांसारखे स्तब्ध उभे होते!१०

करतलबखान दिङ्मूढ झाला होता. काय करावे, हेच त्याला सुचेना. बिघडलेली परिस्थिती पाहून रायबाघन त्याच्याकडे गेली आणि तिने राजांशी शरणागतीचे बोलणे करण्याचा त्याला सल्ला दिला. राजे स्वत: जातीने लढ्याचे संचालन करत असल्याचे तिने खानाला सांगितले. खानाला तिचा सल्ला पटला आणि राजांकडे जीवदानाची याचना करण्याचे त्याने ठरवले. त्वरित राजांकडे आपला दूत पाठवून आपणास जिवंत जाऊ द्यावे आणि त्यासाठी आपण कितीही खंडणी देण्यासाठी तयार आहोत, असा निरोप त्याने पाठवला.

शिवाजी राजांनी मोगलांच्या जवळील सर्व शस्त्रास्त्रे, दारुगोळा, युद्धसाहित्य आणि पैसा-अडका तिथेच सोडून जाण्याची अट घातली. दूताने परत जाऊन त्यासाठी खानाची संमती मिळवली आणि तो परतला. त्यानंतर राजांनी दयेचा अर्ज मंजूर केला आणि लढाई थांबवण्याचे

फरमान जारी केले. कबूल केल्यानुसार मराठा सैन्याला खानाच्या फौजेने आपल्याजवळ असलेली सर्व शस्त्रास्त्रे, साहित्य, घोडे, खेचरे, पैसा-अडका हवाली करण्याची कारवाई चालू केली. ती संपल्यानंतर करतलबखानाच्या सैन्याला पुण्याच्या दिशेने कूच करण्याची परवानगी देण्यात आली.

हताश झालेला करतलबखान पुण्यास शाईस्ताखानाच्या छावणीत परतला. घोर निराशेशिवाय त्याच्या पदरात काहीच पडले नव्हते. शाईस्ताखानालाही कडवा धडा मिळाला होता. त्यानंतर जोपर्यंत मराठे हल्ला करीत नाहीत, तोपर्यंत पुण्याच्या छावणीतून फारसे बाहेर न पडण्याचा निर्णय त्याने तातडीने घेतला.

लष्करी विलेषण

'न लढताच (लढाई) जिंकणे हे सर्वांत उत्तम', हा विरोधाभासयुक्त परंतु गहन अर्थपूर्ण सिद्धांत सुन्त्झूच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचा उच्च बिंदू आहे. बाह्यत: हे विधान हास्यास्पद व अशक्य वाटते. कोणालाही साहजिकच वाटेल की, हे कसे शक्य होईल? परंतु उंब्रेमधील करतलबखानाचा पराभव पाहिला, तर त्याच्या गहनतेची प्रचीती येते. सुन्त्झूच्या मते जो सेनापती आपली संसाधने न वापरता शत्रूला केवळ आपल्या सरस डावपेचाने नामोहरम करतो, तो सर्वश्रेष्ठ सेनानी. हेच शिवाजीराजांनी दाखवून दिले.

लष्करी सापळा (अंबुश) कसा लावावा, याचे उंब्रेमध्ये शिवाजीराजांनी करतलबखानाच्या सैन्यासाठी लावलेला सापळा हे आदर्श उदाहरण आहे. अंबुश हा गनिमी काव्याचा डावपेच आहे. आपल्यापेक्षा काही पटींनी बलवत्तर असलेल्या शत्रूला बुद्धिमत्तेच्या साहाय्याने आणि जमिनीचा कल्पकतेने वापर करून नामोहरम करणे हे त्यामागचे उद्दिष्ट असते. त्यामधील सर्वांत मोठा घटक म्हणजे यथायोग्य जमिनीची निवड. उचित स्थान हा यशस्वी अंबुशचा गाभा आहे. संख्याबळ कमी असले, तरी अनुकूल स्थान हा बिनीचा बलगुणक (फोर्स मल्टीप्लायर) ठरतो.

'ज्या सेनापतींना जमिनीचा वापर आपल्या फायद्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांनी करण्याची हातोटी असते, त्यांना सैन्याचा उपयोग करण्याचे खरे ज्ञान असते. सेनापतीला भूभागाशी यशस्वीरीत्या कसे समरस व्हायचे, हे कळले पाहिजे. ज्या जागेवर ते हरणार नाहीत, अशाच ठिकाणी मुरब्बी लढवय्ये मोर्चेबंदी करतात आणि शत्रूच्या पराभवाला कारणीभूत होतील, अशा घटकांचा ते जास्तीत जास्त फायदा घेतात.' शिवाजीराजांना करतलबखान कोकणात मोहीम काढणार आहे, याची कल्पना होती; परंतु कोणत्या मार्गाने तो जाणार आहे, हे खानाने गुप्त ठेवले होते. तरीही राजांनी दोन-तीन पर्यायी आराखडे बनवले असावेत. जानेवारी १६६१च्या अखेरीस खानाचे सैन्य मळवलीच्या दिशेने वळल्यावर कुरवंडी घाटात त्याला कोंडण्याची आपली योजना नेतोजीला समजावून सांगून मोजक्या सैन्यासह त्याला रवाना केले. मागोमाग तेही पोचले. त्यांच्या या असामान्य सर्जनशीलतेच्या आधारावर त्यांनी शाईस्ताखानाच्या योजनेला सुरुंग लावला आणि करतलबखानाची नाचक्की करून त्याला हात चोळत परत जावयास लावले. हा सापळा लावलाच नसता, तर खानाने कोकणात पोचून धुमाकूळ घातला

असता आणि मग त्याला थांबवणे अशक्य झाले असते.

दोन्ही बाजूंनी अडकल्यावर त्या सापळ्यामधून कसे सुटावे, हे करतलबखान आणि बाकी तुकड्यांचे प्रमुख यांना कळेनासे झाले अन् ते हतबुद्ध झाले. शरण जाण्याशिवाय त्यांच्यापुढे कोणताच पर्याय राहला नाही. सर बेसिल हार्ट या डावपेचाचे मार्मिकतेने विवेचन करतो : 'शत्रूवर अनपेक्षित दिशेने वार करणे महत्त्वाचे ठरते. त्याकरवी आश्चर्यचकित झाल्यामुळे त्याच्या प्रतिकारशक्तीवर परिणाम होतो. गुप्तता, कारवाईमधील नावीन्य, आपली हालचाल व स्थान शत्रूपासून लपवण्याची प्रक्रिया (कॅमाफ्लाज अँड कन्सीलमेंट), फसवेगिरी, बेदरकारी, शीघ्रता या सर्वांमुळे शत्रूला आश्चर्यचकित करण्यास मदत मिळते.' यातील प्रत्येक पैलू किती बेमालूमपणे रंगवण्यात आला, हे वरील वर्णनावरून प्रतीत होते. त्या नागमोडी रस्त्र्याच्या दोन्ही बाजूंना झाडीत मराठ्यांचे मोजके सैन्य लपून बसले होते. रणभेरीची गर्जना होईपावेतो खानाच्या एकाही शिपायाला त्याची चाहूल लागली नाही. शत्रूच्या इतक्या निकट सान्निध्यात लपून बसणे ही बेदरकारी आणि फसवेगिरी नाही तर आणखीन काय?

बळाचा मितव्यय, बळाचे केंद्रीकरण, विस्मयकारकता व शाठ्य आणि मनोधैर्य ही चार युद्धतत्त्वे या कारवाईत राजांनी प्रकर्षाने अवलंबिल्याचे दिसून येते. गुप्तता पाळण्यासाठी कमीत कमी सैन्य बरोबर नेणे आवश्य क होते. ते रस्त्र्याच्या दोन्ही बाजूंना छोट्या तुकड्यांत लपून बसले होते. परंतु जर हातघाईच्या लढाईची वेळ आलीच असती, तर ते वेगाने एकत्र झाले असते. विस्मयकारकता या कारवाईचे प्रमुख सूत्रच होते. परंतु सगळ्यांत महत्त्वाचे होते ते मनोधैर्य. किंबहुना अंबुश या डावपेचासाठी अमाप जिद्द, निर्भयता आणि बेदरकारपणाची आवश्योकता असते. ती स्वराज्याच्या मावळ्यांमध्ये जोपासण्यासाठी शिवाजीराजांनी अपार कष्ट घेतले होते, याचे हे समर्पक आविष्करण आहे.

शिवाजीराजांवरील अगणित ग्रंथांत प्रतापगड, पुरंदर, सिंहगड, लाल महाल किंवा आग्रा घटनांचे सविस्तर विवेचन हमखास सापडते, परंतु करतलबखानावरील या हल्ल्याचा धावता उल्लेखच सापडतो. दुर्दैवाने शिवाजीराजांच्या या सर्जनशील, चातुर्यपूर्ण आणि धाडसी कारवाईच्या लष्करी असामान्यतेची दखल घेतली गेल्याचे दिसत नाही. करतलबखानाच्या सैन्यावर कुरवंडा घाटात लावलेला हा सापळा आधुनिक लष्करशास्त्रातील शिकवणुकीनुसार होता. लष्करी इतिहासात एक अद्वितीय अंबुश म्हणून त्याची गणना झाली, तर शिवाजीराजांच्या अलौकिक प्रतिभेला ती योग्य दाद ठरेल.

शाईस्ताखानाचा पाडाव

शाईस्ताखानाचा ठिय्या

१६६०च्या मार्च महिन्यापासून शाईस्ताखानाच्या अवाढव्य फौजेचा तळ पुणे आणि आसपासच्या परिसरात पडला होता. सुमारे एक लाख मोगल सैनिक आणि पंचाहत्तर हजार घोडे व इतर जनावरे त्या परिसराच्या खुल्या कुरणात अखंड चरत होते. पंचक्रोशी अक्षरश: उजाड झाली होती. ते आसपासच्या खेड्यापाड्यांतून अन्नधान्य आणि जनावरांचा चारा

बळजबरीने हिरावून घेत. धान्य कमी पडू लागल्यावर त्यांच्या घोड्यांच्या टापा आदिलशाहीच्या आवाराकडे वळू लागत. शेतात धान्य पेरणे व उगवणे कष्टप्रद होऊन गेले होते. मोगलांच्या लाटा आपल्या खेड्याकडे येत आहेत, असे कळल्यावर बिचारे गावकरी आसपासच्या सह्याद्रीच्या कुशीत आसरा शोधत. याला कंटाळून अनेकांनी कोकणाच्या दिशेने कायमचे स्थलांतर केले होते. सुदैवाने मोगल कर्दनकाळ तिथे पोचला नव्हता.

१६६१ साली शिवाजीराजांनी काही दिवस कोकणाकडे मोर्चा वळवला. परंतु परतले, तरी शाईस्ताखानाचा मुक्काम कायम होता. शाईस्ता बादशहा औरंगजेबाचा मामा. इथले काम संपले, तर आपला द्वाड भाचा उत्तरेतील कुठल्यातरी खडतर प्रदेशात आपली रवानगी करील, अशी त्याला भीती होती. पुण्याची हवा मस्त होती. शिवाजीराजांच्या प्रशस्त लालमहालात तो आरामात राहात होता. त्याच्या अनेक बायका, पोरे आणि नातलगांचे लटांबर तिथे मौज-मजा करीत होते. आपली मुलगी परी बेगम हिचे लग्न त्याने आपला मेहुणा जाफरखान वझीर याचा मुलगा कामगारखानाशी मोठ्या थाटामाटाने साजरे केले. सुखाची त्याला चटक लागली होती. शिवाजीराजांना हुडकत जाण्याची त्याला काहीही घाई नव्हती.

१६६२मध्ये खानाने विशेष हालचाल केली नाही. दक्षिण कोकणातून आणि पुणे व सातारा प्रांतातून शिवाजीचा अंमल संपवण्यासाठी तो प्रयत्न करत राहिला, परंतु त्याला विशेष अशी धार नव्हती. त्याने दोन मोठ्या फौजा तैनात केल्या; एक कोकणात चौलमध्ये आणि दुसरी रहिमतपूरजवळ. १६६२ सालही उलटून गेले. आता मात्र शिवाजीराजे अस्वस्थ झाले. शाईस्ताखानाचे हे बांडगूळ महाराष्ट्रातून लवकरात लवकर उचकटून टाकणे दिवसेंदिवस अधिकाधिक आवश्यहक होऊ लागले होते. परंतु एवढ्या मोठ्या सैन्याचा पराभव करणे स्वराज्य सेनेच्या कुवतीबाहेर होते.

१६६३च्या सुरवातीलाच दोन बातम्यांनी राजांना अधिकच अस्वस्थ केले. पहिली होती सरनोबत नेतोजीच्या पराभवाची आणि दुसरी सिंहगडावर फितुरी घडण्याच्या शक्यतेची. नेतोजी मोगल मुलखात गोंधळ माजवण्यासाठी आणि अर्थार्जन करण्यासाठी गेला असता मोगलांनी त्याचा पाठलाग केला आणि त्याला कैचीत पकडले. त्याला जवळजवळ तीनशे घोडे गमवावे लागले आणि त्याला स्वत:लाही जबर जखमा झाल्या. हा पराभव १८ ते ३० मार्च १६६३दरम्यान झाला. त्याचा पाठलाग करीत मोगल विजापूरपासून पंधरा मैलांवर पोचले. सुदैवाने रुस्तुम-इ-जमानने मोगलांबरोबर तह केला आणि नेतोजीही त्याच्या तावडीतून सुटला.११ दुसरी बातमी शाईस्ताखान सिंहगड फितुरीने काबीज करण्याच्या प्रयत्नात असल्याबद्दल होती. त्यासाठी राजांनी मोरोपंत पेशवे आणि निळोपंत मुजुमदार यांना पाठवून ती फितुरी वेळीच मुळापासून खुडून टाकली.

लाल महालावरील धाडीची योजना

काहीतरी मोठा डाव खेळणे आवश्यनक होते. प्रसंग निकराचा होता. परंतु अशाच परिस्थितीत महामानवांचे कसब पणाला लागते. याआधी चंद्रराव मोरे, अफझलखान, सिद्दी जोहर, करतलबखान या आव्हानांना तोंड देताना प्रत्येक वेळी शिवाजीराजांनी

अनन्यसाधारण नवनिर्मितिक्षमता आणि कल्पकतेचे प्रदर्शन घडवले होते. शाईस्ताखानाचे सैन्य त्या साऱ्यांपेक्षा कैक पटींनी अवाढव्य होते. जितके आव्हान मोठे, तितकाच त्याला तोंड देण्यासाठी त्यांच्या सृजनशीलतेचा आवाका मोठा! त्याच्याशी लढून त्याचा पाडाव करणे कुवतीबाहेरचे काम होते. यासाठी गनिमी काव्याची काहीतरी क्लृप्ती लढवणे प्राप्त होते. खेळी अफलातून आणि अतर्क्य असणे आवश्यसक होते. आणि अगदी तीच राजांनी साध्य करून दाखवली.

एकच पर्याय उपलब्ध होता, शाईस्ताखानाच्या गोटावरच हल्ला. पुण्याच्या परिसरात शाईस्ताखानाच्या सैन्यातील अनेक धर्म-जाती जमातींचे लोक पसरले होते आणि ते वेगवेगळ्या मालकांच्या हाताखाली नोकरी करीत होते. त्यात

ॲबिसीनीय, अफगाण, पर्शियन, मोगल आणि उत्तर व मध्य हिंदुस्तानातील धर्मांतरित मुसलमान होते. त्याबरोबर राजस्थानातील राजपूत, माळव्यातील हिंदू, महाराष्ट्रातील मराठे असे तिथे गोळा झाले होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता. कॉस्म द गार्द्र या इतिहासकारानुसार 'मुसलमानांच्या छावण्या मोठ्या शहराप्रमाणे असत. कुणालाही न विचारता कुठल्याही वेळी अनेक लोक या छावण्यांत येत-जात राहत.'१२ त्यांच्यात जर राजांचे लोक गाजावाजा न करता घुसले आणि लाल महालापर्यंत पोचले, तर कोणालाही कळणार नव्हते. याचाच फायदा घेण्याचे राजांनी ठरवले.

लालमहालाचा चप्पा न् चप्पा राजांच्या आणि त्यांच्या बालपणीपासून साथ देणाऱ्या सरदारांच्या परिचयाचा होता. ते सर्व सवंगडी महालात खेळले होते, तिथे शिकले-सवरले होते. जर असा हल्ला करायचा, तर त्याचे एकच लक्ष्य असले पाहिजे होते. शाईस्ताखान आणि फक्त शाईस्ताखान. धाड इतकी भयोत्पादक आणि रौद्र की, जिवंत राहिला, तरी शाईस्ताखानाच्या छातीत धडकी भरेल आणि तो 'दे माय धरणी ठाय'चा गजर करीत पुण्यातून आपल्या सैन्यासह पोबारा करील. आणि हे काम फक्त राजे स्वत: करू शकत होते!

राजे सिंहगडावर येऊन राहिले. मराठ्यांनी काही अचानक धाड टाकू नये म्हणून खानाने शहराची नाकेबंदी केली होती. कोणाही हत्यारबंद मराठ्यास परवानगीशिवाय शहरात येण्याची मनाई होती. त्यांनी बहिर्जीला लाल महालाची साद्यंत माहिती गोळा करण्यास धाडले. ती मिळाल्यावर सरनोबत नेतोजी पालकर, तानाजी मालुसरे, कोयाजी बांदल, चिमणाजी बापुजी, मुदगल देशपांडे, बाजी सर्जाराव जेधे, चांदजी जेधे या साऱ्यांना बोलावणी गेली. खलबते चालू झाली. राजांनी आपली योजना समजावून सांगितली.

रमजान येईपावेतो थांबायचे. रमजानच्या रोजांत दिवसभर उपासानंतर सूर्य मावळल्यानंतर जेवणावर ताव मारला जातो आणि सगळीकडे गाढ झोपेचे साम्राज्य पसरते. त्यातलाच मुहूर्त पाहून सरळ लाल महालावर धडक मारून शाईस्ताखानाला कापून काढायचे.

सिंहगडाच्या मार्गावरच जसवंतसिंह या मोगल सरदाराचा दहा हजार घोडदळाचा तळ होता. त्याला चुकवण्यासाठी आडमार्गाने जाणे आवश्य क होते. दीड-दोन हजार मावळ्यांसह पुण्याच्या निकट जायचे, मग शिबंदी वीस-बावीस तुकड्यांत वाटायची आणि पुण्यात येणाऱ्या पंधरा-वीस वाटांवर वेगवेगळ्या तुकड्यांनी पोचायचे. बरोबरचे घोडे पुण्याच्या हद्दीबाहेर सोडायचे, एका

ठिकाणी पंचाहत्तर-शंभर माणसांपेक्षा जास्त असता कामा नयेत. प्रत्येक तुकडीने पहाऱ्यावरील संत्रयांना 'कटकाचे लोक, पहाऱ्याहून परततोय', असे सांगायचे, एखाद्या तुकडीला शहरात शिरायला जमले नाही, तरी हरकत नाही; परंतु संशय येता कामा नये.

थोडाही माग न लागू देता लालमहाल घेरायचा. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी हे खेडचे दोन हुशार सरदार होते. त्यांचे बालपण पुण्यात गेले होते. प्रत्येकाबरोबर दोनशे माणसे देऊन ते दोघे लाल महालावर वेगवेगळ्या बाजूंनी हल्ला करतील; चिमणाजी मागून भटारखान्याच्या बाजूने आणि बाबाजी पुढच्या दिंडी दरवाजाच्या बाजूने. नेतोजी पालकर आणि मोरोपंत पिंगळे राखीव तुकड्या घेऊन लाल महालापासून सुरक्षित अंतरावर थांबणार होते. जर काही आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली, तर त्या दोघांनी मदतीला येऊन लाल महालात अडकलेल्या आपल्या लोकांची सुटका करावयाची होती. चिमणाजी बापूजी आपल्याबरोबर दोनशे लोकांची टोळी घेऊन भांबुर्ड्याच्या बाजूने येणार होता. त्याच टोळीत मिसळून राजे लाल महालापर्यंत पोचणार होते.

राजांकडून परवलीचा शब्द मिळाल्यावर स्वयंपाकघरात शिरायचे होते. तिथे पूर्वी एक दिंडी होती, ती सर्वांच्या परिचयाची होती, हंगामी भिंतीने ती बंद केली गेली होती. ते तकलुपी बांधकाम तोडले की, समोरचा जिना सरळ वरच्या शयनगृहात पोचतो. त्या बाजूने घुसायचे. एकदा आघाडीचे लोक पोचले की, ललकारा द्यायचा. दिसेल त्याला कापून काढायचे. इतका गोंधळ झाला पाहिजे की, आजूबाजूच्या आपल्या साऱ्या तुकड्यांना हल्ला करण्याचा तोच संकेत. लाल महाल हादरला पाहिजे.

प्रत्येकाने आपापले मत सांगितले. त्यावर विचारांची देवाण-घेवाण झाली. काही खाचाखोचा समोर आल्या. राजांनी त्यांचा सल्ला गंभीरतेने ऐकला. योजनेत काही बदल केले. शेवटी योजना पक्की झाली.

५ एप्रिल १६६३चा दिवस धाडीसाठी मुकर्रर झाला. रमजानचे दिवस असल्याने दिवसभराच्या उपवासानंतर संध्याकाळी जेवण केल्यावर सर्वजण मध्यरात्रीपर्यंत गाढ झोपेत असतील. सूर्योदयापूर्वी जेवणासाठी ते पहाटे चार ते पाचच्या दरम्यान उठत असत. ५ एप्रिलला चंद्र पहिल्या कलेत होता म्हणजे रात्री साडेअकरा वाजता तो मावळणार होता. त्याचा अर्थ शिवाजीराजांची माणसे चंद्रप्रकाशात लाल महालाच्या जवळ येऊ शकणार होती, परंतु ते जसजसे जवळ येतील, तसतसा दाट अंधार पसरणार होता आणि तसतसे खानाचे जेवणाने सुस्त झालेले लोक त्यांना धूसर प्रकाशात ओळखू शकणार नव्हते. काम झाल्यावर तर अंधार त्यांना पळून जाण्यासाठी फायदेशीर ठरणार होता. ५ एप्रिलचा दिवस निवडायचे आणखी एक कारण होते. हा दिवस बादशहाच्या राज्यारोहणाच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला जात असे. त्यादिवशी प्रत्येक प्रहरी म्हणजे सकाळी सहा वाजता आणि नंतर प्रत्येक तीन तासांनंतर जोराजोराने नौबती वाजवण्याचा प्रघात होता.१३ त्या आवाजाचा फायदा घेऊन लाल महालातील भिंत फोडली, तर कोणापर्यंत विशेष आवाज पोचणार नव्हता.

सगळ्यांच्यात कामाची विभागणी झाली. वेळेची मिनिटागणिक आखणी करण्यात आली. मग राजांनी प्रत्येकाला आपापले लोक निवडायला सांगितले. पुरते भरवशाचे हवे. थोडाही संशय

असता कामा नये. आपापल्या तुकड्यांना आपल्या निवडीच्या जागी एकत्र करायचे, त्यांना योजना समजावून सांगायची आणि त्यानंतर मात्र त्यांना कोठेही जाऊ द्यायचे नाही. पार धाडीच्या दिवसापर्यंत एखाद्या चिटपाखराबरोबरही संपर्क होता कामा नये. जवळपासची जागा निवडून प्रत्येकाने धाडीदरम्यान आपल्या साऱ्या हरकतीची रंगीत तालीम करायची. तुकडी प्रमुखाला पुरता भरवसा येईपावेतो पुन्हा पुन्हा ती गिरवायची. मग ठरलेल्या दिवशी मोहिमेवर बाहेर पडायचे. राजांनी शेवटी सगळ्यांना बजावले, 'लक्षात ठेवा, रात्र ही मूर्खांना झोपण्यासाठी असते, शहाणे तिचा फायदा उठवतात!'

अद्वितीय एल्गार

५ एप्रिल उगवला. पहाटेपासूनच एक्का-दुक्क्यात सर्व तुकड्या आपापल्या प्रवेशमार्गांजवळ पोचल्या. शिवाजीराजांनी दिवस मावळल्यावर सिंहगड सोडला आणि घोड्यांना भांबुर्ड्याच्या दिशेने दामटले. महाराज आंबील ओढ्याजवळ पायउतार झाले. त्यानंतर चिमणाजी आणि बाबाजी यांच्या तुकड्यांत मिसळून ते चालू लागले. त्यात कोयाजी, बांदल, चंदाजी जेधे वगैरे होते. उर्वरित सैन्य दोन तुकड्यांत मोरोपंत आणि नेतोजी यांच्याखाली दिले होते.१४ सगळ्यांनी इतकी तयारी केली होती की, सारी योजना विना अडथळ्यात पार पडली. सारे आपापल्या निर्धारित जागी कोणत्याही विघ्नाविना पोचले. शिवाजीराजे लालमहालाच्या पिछाडीस पोचले, त्यावेळी तीन वाजले असावेत. रमजानचा उपवास सोडून सर्वत्र सामसूम झाली होती. लोकांची मध्यरात्र झाली होती. मुदपाकखान्यात काही नोकर भांडी साफ करत होते. मध्यरात्री तीन वाजल्यावर लागलीच लष्कराच्या नौबती मोठमोठ्याने वाजू लागल्या. त्याच्या आवाजात कुदळीने भिंतीला भोक पाडल्याचा आवाज मिसळून गेला. त्यानंतर भिंत दोन धक्के दिल्यावरच कोसळली.

राजे वर पोचले. आत कापडी पडद्यांनी अनेक खोल्या बनवल्या होत्या. ते पडदे तलवारींनी कापून ते खानाच्या खोलीत शिरले. अजूनही दिवे तेवत होते. परंतु बेगमांनी ते तत्काळ विझवले. बायकांनी आरडाओरड चालू केली. त्याबरोबर खानाचा मुलगा अबुल फत्तेखान तलवार घेऊन धावला. त्याचे डोके उडवले गेले. इतक्यात पुढच्या दरवाज्यावरील पहारेकऱ्यांना ठार मारून दोनशे लोकांची दुसरी टोळी घेऊन बाबाजी बापूजी आत शिरला. शाईस्ताखानावर कोणी वार करून त्याची बोटे तोडली, याच्याबद्दल दोन भिन्न विवरणे सापडतात. पहिले, बाबाजी बापूजीच्या समोर शाईस्ताखान हातात भाला घेऊन उभा राहिला. त्याच्यावर बापूजीच्या तुकडीतील लोक चालून गेले. खानाने एकाला मारले. तुकडीतील दुसऱ्याने त्याच्यावर वार केला, तेव्हा खानाचे बोट तुटून त्याचा भाला खाली पडला. इकडे खान मेला, अशा आरोळ्या ऐकल्यावर लोक बाहेर पडू लागले.१५

दुसऱ्या विवरणानुसार भयभीत खान शिवाजीराजांच्या नजरेला पडला. समोर खाशा शिवाजीराजांना पाहिल्यावर तो आणखीनच भेदरला. खिडकीतून बाहेर पळण्याच्या तो बेतात होता, तेवढ्यात राजांनी जोमाने त्याच्यावर तलवारीचा प्रहार केला. त्यांना वाटले, शाईस्ताखान ठार झाला. अंधारात आणि त्या गोंधळात काहीच दिसत नव्हते. खानावर राजांनी

वार केला, असा उल्लेख सभासद बखरीत सापडतो.१६ दोन्हींत एक मात्र वास्तव होते. खान काही ठार झाला नव्हता, केवळ त्याच्या उजव्या हाताची तीन बोटे तुटली होती.

बाकीच्यांनीही लाल महालातील लोकांचा खरपूस समाचार घेतला. एक-दीड घटकेत सारा खेळ संपला. बाहेरून कुमक येण्याआधी लवकर बाहेर पडणे आवश्य-क होते. शिवाजीराजांनी चिमणाजीला खूण केली. तो ओरडला, 'चला रे. बाहेर पडा.' 'गनीम, गनीम' असे ओरडत सर्व बाहेर पडू लागले. काही क्षणांतच लाल महालात एकही मराठा उरला नाही.

शाईस्ताखान ठार झाला नसूनही तो मारला गेला आहे, असा सर्वांचा का समज झाला, याचे विवरण शिवचरित्रात केले आहे. मराठ्यांनी सर्व दरवाजे आतून बंद केले होते. अमिरुल उमरा शाईस्ताचा एक जमातदार लाल महालाच्या मागेच राहात होता. वाड्यातील गोंगाट ऐकून तो काय झाले, हे पाहण्यास वाड्यात आला. दोराची शिडी लावून तो भिंतीवर चढला आणि त्याने आत उडी टाकली. त्याला पाहताच मराठ्यांनी त्याला पकडले. तो दिसायला शाईस्ताखानासारखा होता, त्यामुळे त्याला शाईस्ताच समजून ठार केले.१७ खान ठार झाला, या समजुतीच्या मागे ही घटना असावी.

शिवाजीराजे आणि त्यांच्याबरोबरील सर्वांनी गटागटाने सिंहगडाचा रस्ता धरला. मागे पाठलाग होतो आहे का, याचा ते कायम मागोसा घेत होते. साधारण चारपाच मैल गेल्यावर कात्रज घाटाकडे संकेत पाठवण्यात आला. तिथे आधीपासूनच काही बैलांचा तांडा तयार होता. त्यांच्या शिंगांना तेलात भिजलेले बोळे बांधून ठेवण्यात आले होते. राजांनी सिंहगडाकडे प्रयाण केल्याची बातमी मिळाल्यावर या बैलांच्या शिंगांवरील टेंभ्यांना पेट देण्यात आला. लाल महालाबाहेर उभे राहून दक्षिणेकडे नजर टाकल्यावर घाटात हलणारे दिवे दिसू लागले. हल्ल्याच्या धक्क्यातून सावरल्यावर तिथल्या सरदाराने स्वारांची एक तुकडी गोळा केली आणि कात्रज घाटाकडे ती राजांना गाठण्यासाठी वेगाने दौडू लागली. काही वेळातच ते तिथे पोचले, तेव्हा पहाटेचे तांबडे फुटले होते. त्यांना बैलांचा तांडा संथपणे चालत जाताना दिसला. मशाली एव्हाना विझून गेल्या होत्या. फसगत झाल्याची त्यांना तत्पर जाणीव झाली आणि हात चोळत ते लाल महालास परतले.

शाईस्ताखानाच्या उजव्या हाताची तीन बोटे तुटली होती आणि त्याला जीवघेण्या वेदना होत होत्या. त्याचा मुलगा, जावई, बारा स्त्रिया मिळून एकूण पंचावन्न लोक मारले गेले होते. जसवंतसिंहाच्या दहा हजारांच्या घोडदळाची छावणी सिंहगडाच्या रस्त्रयावर असून त्याला मराठ्यांची चाहूल कशी लागली नाही, याबद्दल त्याचा संशय घेण्यात आला. किंबहुना शाईस्ताखानाने जसवंतसिंह या कटात शिवाजीराजांना सामील असल्याची औरंगजेबाकडे तक्रारही केल्याचा उल्लेख आहे. कदाचित त्याने जाणूनबुजून त्याकडे दुर्लक्ष केले की मोगल सैन्याच्या नेहमीच्या गाफीलपणाचा हा भाग होता, हे सांगता येणार नाही.

सकाळ झाल्यावर मोगलांच्या फौजा सिंहगडावर चालून गेल्या. जसवंतसिंहाचे घोडदळ त्याच्यात समाविष्ट होते. राजांना हे अपेक्षित होते. सिंहगडावर पोचताच त्यांनी तोफा सज्ज करण्याचे आदेश दिले होते. मोगलांच्या फौजा जवळ येताच त्यांच्यावर गडातून तोफगोळ्यांचा जोरदार मारा होऊ लागला. खान स्वत: आपल्या हत्तीवर स्वार होऊन फौजेचे नेतृत्व करीत

होता. त्याच्यासमोर यक्षप्रश्न उभा ठाकला. जर आपल्या तोफा मागवल्या, तर मराठे आडून त्यांच्यावर हल्ले चढवतील. वेढा घालून बसलो, तर सिंहगड लागलीच पडणे शक्य नव्हते. दोन महिन्यांच्या आतबाहेर पावसाचा मारा सुरू होणार होता. आता तिथे थांबण्यात अर्थ नाही, याची त्याला खातरी पटली. मोगल फौजा पुण्यास परतल्या.१८

परतल्यावर खानाने ताळेबंद घेतला आणि ताबडतोब पुणे सोडून स्वत: औरंगाबादकडे कूच करण्याचा निर्णय घेतला. हा शिवाजी आणखी काय प्रताप करील, या भयगंडाने तो पूर्ण ग्रासला होता. जाण्याआधी सेनापतीला बोलावून त्याने सर्व सैन्याला बुऱ्हाणपूरच्या दिशेने आगेकूच करायला सांगितले. सगळेच इतके हादरून गेले होते की, १०-१२ एप्रिलपर्यंत बहुतांश मोगल पुणे सोडून गेले होते.

शाईस्ताखानावरील छाप्यात महाराजा जसवंतसिंह त्यांना आतून सामील होता, असे तत्कालीन पत्रव्यवहारात सूचित केलेले आढळते. कॉस्म द गार्द्र आणि मनुची या तत्कालीन इतिहासकारांचा त्याचकडे कल दिसतो. जसवंतसिंह मुळात दाराचा समर्थक होता. त्यामुळे आरंभी औरंगजेबाच्या शत्रुपक्षात होता. पुढे त्याला मिर्झा राजांनी औरंगजेबाच्या गोटात आणले. त्यामुळे जसवंतसिंह आतून सामील असल्याच्या इंग्रजी स्वराचे ते कारण असावे. परंतु शाईस्ताखानाने तसे सूचित करूनही स्वत: औरंगजेबानेच जसवंतसिंहाला दोष दिला नाही. त्याअर्थी हा आरोप निराधार असावा.

लाल महालावरील हल्ल्याची बातमी औरंगजेबास काश्मीरमध्ये ८ मे रोजी कळली. त्याने ताबडतोब खानाची बंगालमध्ये बदली केली आणि त्याच्या जागी आपला शहजादा मुअझ्झम याला पाठवल्याचा हुकूम सोडला. ‘मला सूड घेण्याची एक तरी संधी द्या’, अशी शाईस्ताखानाने वारंवार केलेली विनंती ठोकरून लावण्यात आली. ‘तुझ्याने शिवाजीराजांसारख्या कर्तबगार आणि बेरक्या सेनापतीवर मात करणे काही शक्य होणार नाही’, असे औरंगजेबाने त्याला स्पष्टच बजावले. शाईस्ताखान अखेरीस १ डिसेंबर १६६३ रोजी बंगालकडे चालता झाला.

शिवाजीराजांनी या धाडीचा वृत्तांत आपल्या स्वत:च्या हाताने लिहून आपल्या सहकाऱ्यांना पाठवला. रावजी सोमनाथ पंडित याला राजांनी लिहिलेले पत्र त्याने ११ एप्रिलला राजापूरच्या वखारीतील गिफर्ड या इंग्रजी अधिकाऱ्याला दाखवले. ते गिफर्डने सुरतेस लिहून पाठवले. ते अजूनही उपलब्ध आहे.१९

लष्करी विलेषण

तीन वर्षे पुण्यात डेरे टाकून बसलेल्या एक लाखाहून अधिक मोगल सैन्याला तैलबुद्धी डावपेच, वैयक्तिक शौर्य आणि मृत्यूच्या दाढेत नेत्यासह बेदरकारीने उडी टाकणाऱ्या सवंगड्यांच्या आणि दोन-चारशे मावळ्यांच्या साहाय्याने राजांनी एका रात्रीत पळवून लावले. त्या रात्री सर्वांनी आपल्या उत्तुंग क्षात्रवृत्तीने आणि बुलंद मर्दुमकीने जागतिक लष्करी इतिहासातील एक अजोड पान सुवर्णाक्षरांत कोरले. या कारवाईचे दूरगामी परिणाम झाले. एका स्वतंत्र राज्याचा अधिपती अशी राजांची ख्याती भारतभर पसरली.

जगाच्या लष्करी इतिहासात अनेक चित्तथरारक आणि रोमांचकारी कमांडो हल्ले घडलेले

आहेत. स्वत:च्या प्राणांची बाजी लावून सिंहाच्या जबड्यात हात घालण्यास न कचरणाऱ्या अकुतोभय आणि साहसी तरुणांनी शत्रूच्या गोटातील गाभ्यात जाऊन एकतर सर्वोच्च शत्रुसेनापतींना स्वत:च्या हातांनी यमसदनास पाठवले आहे किंवा शत्रूच्या कड्या बंदिवासात असलेल्या आपल्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना त्याच्या तावडीतून सोडवून आणले आहे. ॲलिस्टर मॅक्लीन या अमेरिकी लेखकाने लिहिलेल्या 'व्हेअर ईगल्स डेअर' या एका सत्य घटनेवर आधारित कादंबरीप्रमाणे युद्धप्रसंगाच्या अनेक सत्य घटना लेखकांनी शब्दांकित केल्या आहेत. पण त्या सर्वांना अधिकाधिक वाचनीय बनवण्यासाठी नेहमीच फुगवून आणि तिखटमीठ लावून सांगण्यात येते. शिवाजीराजांचा लाल महालावरील हल्ला ही सत्य घटना त्या सर्वांपेक्षा अनेक पटींनी चित्तवेधक आणि मोहमयी आहे.

ही योजना प्रामुख्याने 'विस्मय व शाठ्य' या युद्धतत्त्वावर आधारित होती. अशा योजनेचा गाभा असतो, त्याची मध्यवर्ती कल्पना. बलवत्तर शाईस्ताखानाच्या शयनगृहात अपरात्री जाऊन त्याला ठार करण्याचा मनोदयच मुळात अभूतपूर्व आणि अफलातून आहे. आपले संरक्षणकवच भेदून रात्री शिवाजीराजे आपल्या समोर उभे ठाकतील, याची कल्पना शाईस्ताखानाच्याच नव्हे, तर इतर कोणत्याही मोगल सरदाराच्या स्वप्नातही येणे अशक्य होते. त्यामुळे त्यामागची सर्जनशीलता हीच अर्ध्या यशाला कारणीभूत झाली, असे म्हणावे लागेल. या कल्पनेचे संपूर्ण श्रेय शिवाजीराजांच्याच खात्यात गेले पाहिजे.

सुन्त्झूच्या मते, 'लढाईत विजय मिळवणे आणि सर्वसामान्यपणे तज्ज्ञ म्हणून ओळखले जाणे हा काही युद्धकौशल्याचा कळस नव्हे. तसेच शंभर लढायांमध्ये शंभर विजय मिळवणे हेसुद्धा खरे कौशल्य नव्हे, तर शत्रूला लढण्याविनाच हरवणे हा खरा अभिजात युद्धकौशल्याचा कळस आहे. शत्रूच्या रणनीतीवर आघात करणे हे सर्वांत महत्त्वाचे असते. विजयशाली सैन्य युद्धाला तोंड लागण्यापूर्वीच युद्ध जिंकते.' शिवाजीराजांच्या लाल महालावरील प्रहाराच्या योजनेमागील हे मर्म होते.

उद्दिष्ट नेहमी आपल्यापाशी उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या चौकटीत बसणारे असले पाहिजे. त्यासाठी उद्दिष्टाचे तर्कनिष्ठ विलेषण करणे आणि आपल्या क्षमतेची आणि मर्यादांची पुरेपूर जाणीव असणे आवश्यसक आहे. शाईस्ताखानाच्या प्रचंड सैन्याशी आपण कधीही बरोबरी करू शकणार नाही, याची राजांना पुरेपूर जाणीव होती. आपल्या क्षमतेची आणि मर्यादांची जाणीव ते कधीही विसरले नाहीत. त्यामुळे खानाच्या शक्तीला निष्प्रभ करण्याचा एकच मार्ग होता, तो म्हणजे युक्ती. ती सुचल्यावर त्यांनी तिचा पद्धतशीरपणे मागोवा घेतला.

अशा कारवाईचे गुप्तता, कारवाईमधील नावीन्यपूर्णता, फसवेगिरी, बेदरकारी आणि शीघ्रता हे प्रमुख घटक असतात. नावीन्य हे तर या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य होते. खानाला थोडीसुद्धा कल्पना न देता अचानक त्याच्यावरच प्रहार करायचा, हे यातील नावीन्य. इतक्या प्रचंड सुरक्षाकवचाला भेदून पार त्याच्या अंत:पुरात कसे पोहोचू आणि काम संपल्यावर आपण परत कसे येऊ, याची पर्वा नसणे, ही त्यातील अतुल्य बेदरकारी. पावलापावलागणिक शत्रूची फसवणूक करीत पुढे जात राहायचे, ते अगदी परत येताना कात्रज घाटात बैलांच्या शिंगांवर मशाली पेटवून राजे साताऱ्याच्या दिशेला गेले, असा भास निर्माण करीपर्यंत फसवेगिरीच

फसवेगिरी!

गुप्तता हा अग्रगण्य घटक. खानाच्या शयनगृहापाशी पोचेपर्यंत आपल्या हल्ल्याची कोणाला तसूभरही कल्पना न येऊ देण्यासाठी राजांनी घेतलेल्या दक्षतेचे पैलू होते : कमीत कमी लोकांचा सहभाग, लाल महालावर हल्ला करण्यासाठी दोनच तुकड्यांचे गठन, उर्वरित शिबंदी मोरोपंत आणि नेतोजीबरोबर पुण्याच्या सीमेबाहेर सज्ज, दोन तुकड्यांचेही छोट्या छोट्या गटांत विभाजन, पुण्याच्या सीमेवर पोचल्यानंतर राजांसकट सर्वांनी पायउतार होऊन वेगवेगळ्या दिशांनी त्यांचे प्रयाण, खानाच्या सेनेतील विविधत्वाचा सुरक्षा वलयामधून सटकण्यासाठी पुरेपूर फायदा, योजना सर्व सहभाग्यांना समजावून सांगितल्यानंतर त्यांचा त्यानंतर कोणाशीही संपर्क येऊन योजना फुटू नये म्हणून त्यांचे अलिप्तीकरण, अंधाराचा जास्तीत जास्त फायदा घेता यावा म्हणून ५ एप्रिल या दिवसाची निवड, त्या विशेष दिवशी मोगल लष्कराच्या दर तीन तासांनी वाजणाऱ्या नौबतीच्या आवाजाच्या वेळी भिंत तोडण्याचे आदेश... या सर्व उपायांचा योजनेत पद्धतशीरपणे समावेश करण्यात आला होता.

शाईस्ताखानाच्या निवासस्थानावरील प्रहार ही 'भूतो न भविष्यति' अशी एक अलौकिक लष्करी कारवाई होती. 'न लढताच (लढाई) जिंकणे' या सुन्त्झूच्या तत्त्वज्ञानाचा तो शिवाजीराजांनी सादर केलेला आणखी एक आविष्कार होता. गेली तीन वर्षे पुण्याच्या पंचक्रोशीचे ओसाड भूमीत रूपांतर करणाऱ्या सैन्यासह खानाने त्यानंतर काही दिवसांतच महाराष्ट्रातून उत्तरेकडे प्रयाण केले. ही त्याच्या धवल यशाची प्रचीती.

कॉस्म द गादर्र या तत्कालीन पोर्तुगीज इतिहासकाराचे या कारवाईच्या संदर्भात केलेले पुढील भाष्य मार्मिक आहे : 'स्वत:ऐवजी ते दुसऱ्यास पाठवीत की काही जादू करीत की कोणी भूतपिशाच्च त्यांच्याऐवजी त्या जागी जाई, हे एक मोठे गूढ आहे. हिंदुस्तानात हा चर्चेचा विषय झाला असून अनेकांची अनेक मते आहेत.' [२०]

सुरतेवर घाला

प्रतिशोधाची ऊर्मी

शिवाजीराजांना गेली तीन वर्षे एकाच वेळी मोगल आणि आदिलशाहीच्या आव्हानांचा सामना करावा लागला होता. ते पन्हाळ्यावरून निसटण्यात यशस्वी झाल्यानंतर बेइज्जत झालेला सिद्दी जोहर कुर्नूलला परतला होता. आता लाल महालावरील हल्ल्यानंतर शाईस्ताखानाची पाठ पाहिल्यावर शिवाजीराजांवरील दडपण बऱ्याच अंशी नाहीसे झाले. शाईस्ताखानाच्या गेल्या तीन वर्षांच्या पुण्यावरील सत्तेदरम्यान त्याने साऱ्या परिसराची अक्षरश: धूळधाण केली होती. मोगलांनी केलेल्या अन्यायाचे प्रायश्चित्त त्यांच्याकडूनच वसूल करणे रास्त होते. त्याचबरोबर गेली चार वर्षे कोणतीही हालचाल न करता आल्याने खजिन्यात खडखडाट झाला होता. मोठ्या प्रमाणात अर्थार्जन करण्यासाठी एखादी मोहीम हाती घेणे अत्यंत गरजेचे होते. या सर्वांचा सारासार विचार करता राजांची नजर सुरतेकडे वळली. त्यांच्या मोहिमेमागे धनप्राप्ती आणि औरंगजेबाचा सूड ही दोन उद्दिष्टे होती. [२१]

धनसंपन्न सुरत

सुरत हे हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावरील मोगलांचे एक धनसंपन्न व सुप्रसिद्ध शहर होते. त्याचे मूळचे नाव सूर्यपूर. त्या आधीच्या काही वर्षांत सुरतेच्या बाजारपेठेची झपाट्याने भरभराट झाली होती. त्या काळात हिंदुस्तानातील सर्वांत मोठे व्यापारी शहर अशी सुरतेची ख्याती होती. तिथले व्यापारी चंदन, कस्तुरी, केशर, अत्तरे, हस्तिदंत, जर, मसाल्याचे पदार्थ, आले, सोने, चांदी आणि उंची कपडा वगैरे मौल्यवान वस्तूंचा धंदा करत. त्यावेळी अहमदाबाद नशीदाकाम केलेले उंची रेशमी कापड, वेल्वेट व टफेटासारख्या उंची वस्त्रांसाठी प्रसिद्ध होते. हा माल सुरतेच्या बाजारात विकला जाई. वस्तूंच्या जोडीने गुलामांचा व्यापारही तिथून चालत असे. युरोप, चीन आणि आफ्रिकेतील व्यापारी तिथे येऊन मालाची घाऊक खरेदी-विक्री करीत. हिंदुस्तानात येणारे कोणतेही व्यापारी जहाज सुरतेला भेट दिल्याशिवाय पुढे जात नसे. यामुळे सुरत हा मोगलांसाठी वसुलीचा आद्य स्रोत होता.

जकातीच्या स्वरूपात औरंगजेबाला सुरतेहून वर्षाला बारा लाख रुपये मिळत असत. 'मुघल बादशहांची दाढी' असे सुरतेला म्हणत असत. मक्केला जाणारे यात्रेकरू सुरतेहून जात. त्यामुळे तिला 'मक्केचे द्वार' असेही म्हणत. सुरतेची वस्ती दोन लाख होती आणि घरांची संख्या ७००० होती. त्यावेळी सुरतेचे क्षेत्रफळ जेमतेम चार चौरस मैल होते आणि त्यात दोन लाख वस्ती दाटीने वसली होती. सुरत शहर होते. मक्का-मदिनेस जाणाऱ्या मुस्लीम भाविकांच्या ने-आणीसाठी ते बंदर होते. थोडक्यात मोगल बादशहाची पश्चिमेतील राजधानी असेच सुरतेला म्हणत असत.

सुरत शहराभोवती तटबंदी होती, परंतु सर्वसाधारण वस्ती तटबंदीबाहेरच होती. तापीच्या पश्चिम अंगास एक मजबूत किल्ला होता. हा किल्ला गुजरातचा सुलतान महमूदशहा याने १५४०मध्ये बांधला होता. त्याची तटबंदी ४५ फूट रुंद आणि ६० फूट उंच होती. या किल्ल्याच्या तटबंदीच्या आत मोगलांची छावणी होती. छावणीत काही तोफाही होत्या. इनायतखान हा सुरतेतील मोगल सुभेदार होता. त्याला ५००० स्वारांचा तनखा मिळत असे. परंतु त्याने प्रत्यक्षात १००० सैनिक नोकरीला ठेवले होते. तो तनख्याचा उर्वरित पैसा हडप करीत असे. तो भ्रष्टाचारी आणि जुलमी सुभेदार म्हणून ओळखला जाई.२२

सुरतेतील काही व्यापारी गलेलठ्ठ श्रीमंत होते. हाजी सय्यद बेग आणि बहर्जी बोरा हे दोन व्यापारी पृथ्वीवरील सर्वांत समृद्ध धनिक म्हणून नावारूपाला आले होते.२३ एका हिंदू व्यापाऱ्याजवळ आठ कोटींची संपत्ती होती. मुल्ला अब्दुल जाफर नावाच्या व्यापाऱ्याच्या मालकीची मालाने भरलेली १९ गलबते सुरत बंदरात उभी होती. सुरतेचे व्यापारी मोगलांच्या वृपाछत्राखाली वावरत होते. पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच आणि डच लोकांच्या वखारी ताप्ती नदीच्या किनाऱ्यावर होत्या. त्यांनी आपापल्या वखारीभोवती संरक्षणासाठी तटबंदी उभी केली होती. त्यांच्याकडे फारसे धन नव्हते. वखारीचे अधिकारी निर्भय आणि शूर होते. पैसा गोळा करणे हे एकच उद्दिष्ट पुढे ठेवून राजांनी सुरतेवर हल्ला करण्याचे ठरवले असल्यामुळे त्यांच्याशी राजांचे फारसे देणे-घेणे नव्हते.

शहरावर हल्ला

राजांनी आपल्या हेर खात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक याला जाण्या-येण्याच्या उपलब्ध पर्यायी मार्गांबाबत आणि सुरतेतील धनिकांच्या ठावठिकाण्यांबाबत समग्र माहिती गोळा करण्यासाठी ऑक्टोबर १६६३मध्ये सुरतेकडे रवाना केले. काही दिवसांतच बहिर्जीने राजांना खडान्खडा माहिती सादर केली.२४ त्यात सुरतेची इत्थंभूत माहिती, व्यापाऱ्यांची नावे, संपत्तीची मोजदाद, ती कोठे लपवली आहे याचा तपशील होता. सुभेदारापाशी असलेले सैन्य आणि शाही बंदोबस्ताचा गलथानपणा त्याने अचूक टिपला होता. 'सुरत मारिलियाने अगणित द्रव्य सापडेल', असे त्याने राजांना सांगितले.२५

राजे स्वत: फकिराच्या वेषात सुरतेला गेले होते, असे मॉन्सियॉर डे थेव्हेनो या फ्रेंच प्रवाशाने लिहून ठेवले आहे.२६ महाराष्ट्रातील लोकप्रिय लोककथांमध्ये आजही राजे स्वत: वेशभूषा बदलून सुरतेला गेल्याचा हाच उल्लेख केला जातो. वास्तविक थेव्हेनो १६६६मध्ये म्हणजे सुरत लुटीच्या दोन वर्षांनंतर तिथे गेला होता. त्याचे हे विधान ऐकीव माहितीवर आधारित होते आणि त्यामुळे फारसे विश्वसनीय नाही, असाही दावा केला जातो. परंतु सुरतेवरील धाड ही राजांची महाराष्ट्राच्या बाहेरील पहिली मोहीम असल्याने आणि ती कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होण्याची आवश्यकता असल्याने टेहळणीसाठी स्वत: बहिर्जीबरोबर जाण्याचा निर्णय राजांनी घेतलेलाही असू शकतो. त्यामुळे थेव्हेनोच्या विधानात तथ्य असू शकते, हे नाकारता येणार नाही.

राजांनी मग ४००० स्वारांची निवड केली. बरोबर सरनोबत नेतोजी पालकर, नरो बापूजी व चिमणाजी बापूजी मुद्गल देशपांडे, परसोजी महाडिक, संताजी बोबडे वगैरे लोकांना त्यांनी घेतले. सुरतेतून लुटलेली संपत्ती वाहून आणण्यासाठी त्यांनी बरोबर मोकळे घोडे, बैलगाड्या आणि काही मजूर घेतले. सुरत राजगडापासून १५० कोसांवर म्हणजे ३०० मैलांवर होते. वाटेत भीमेच्या पुढे मोगल प्रदेश लागत असे. शिवाजीराजे राजगडहून ६ डिसेंबर १६६३ला ८००० स्वारांसह नाशिकच्या दिशेने रवाना झाले. आपल्या नेहमीच्या शिरस्त्र्यानुसार आपल्या पुढील मोहिमेबाबत मोगलांची दिशाभूल करण्यासाठी काही कामासाठी आपण तातडीने जातो आहे, असे दाखवण्यासाठी ते आपल्या सैन्यासह नाशिकला पोचले. केवळ सहा मैलांच्या अंतरावर सिंहगडाला वेढा घालून बसलेल्या जसवंतसिंहाच्या फौजेला चाहूल लागू नये म्हणून राजगड ते त्र्यंबकेश्वरचा प्रवास त्यांनी रात्री केला. तिथे पोचल्यावर त्यांनी वार्ता पसरवली की, ते औरंगाबादला जाणार आहेत.

३१ डिसेंबरला राजांनी आपला मोर्चा सुरतेकडे वळवला. आपण अहमदाबादला जाणारा एक मोगल सरदार असल्याचा समज वाटेत त्यांनी भासवला. पाच दिवसांत डांग जंगलामार्गे १३५ मैलांचे अंतर कापून ते ५ जानेवारीला सुरतेजवळ पाच मैलांवर असलेल्या घणदेवीला पोचले. कोणीतरी मोगल सरदारच जातो आहे, अशा समजुतीने तिथला सुभेदार इनायतखान गाफील राहिला. चारी बाजूंना मोगल साम्राज्य पसरले असल्याने आपल्यावर कोणीही चालून येण्याचे धाडस करणार नाही, अशी त्याची त्याला खातरी होती. राजांच्या आगमनाची बातमी लगेचच सुरतेला पोचली आणि इनायतखान खडबडून जागा झाला. सुरत लुटण्याशिवाय त्यांच्या

मोहिमेचे आणखी दुसरे उद्दिष्ट असूच शकत नाही, ही त्याची लागलीच खातरी झाली.

मराठा सैन्याच्या आगमनाची बातमी ऐकून साऱ्या शहरात एकच घबराट पसरली. शहराबाहेर राहणारे लोक आपल्या बायका-मुलांसह आसपासच्या खेड्यांकडे गडबडीने पळून गेले. वास्तविक त्यांना राजांकडून काहीच भय नव्हते. त्यांचे मुख्य लक्ष्य होते धनदांडगे आणि मोगल सुभेदार. काही धनाढ्य व्यापाऱ्यांनी किल्लेदारास पैसे चारून तटबंदीच्या आत आश्रय मिळवला.

सुरतेच्या सीमेवर उधना या गावी मराठी सैन्याचा मुक्काम पडल्यावर राजांनी आपली माणसे पाठवून शहरात दवंडी पिटवली: 'इंग्रज व एतद्देशीय व्यापारी किंवा इतर लोक यांस कोणत्याही प्रकारे इजा पोचवण्याची आमची इच्छा नाही. फक्त बादशहाने आमच्या मुलखावर हल्ला करून लोक मारले आणि आमचे पुण्याचे वास्तव्य बंद पाडले, त्याचा वचपा घ्यावा, एवढाच आमचा हेतू आहे.'२७ राजांनी आपले दोन दूत आधीच धाडून त्यांच्याबरोबर मोगल सुभेदार आणि तीन व्यापारी हाजी सय्यद बेग, बहर्जी बोहरा, हाजी कासम यांना पत्रे पाठवून समक्ष भेटून दंड ठरवण्याचे आणि ती रक्कम भरण्याचे आवाहन केले होते. याची तबदिली न केल्यास आपल्याला जाळपोळ करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरणार नसल्याची आणि त्याची जबाबदारी पत्रांच्या धारकांवर राहील, अशी तंबी भरली होती.

राजांनी ६ जानेवारीला सकाळी ११ वाजता सुरतेच्या उत्तरेकडील बुऱ्हाणपूर दरवाज्याच्या बाहेर बागेत मुक्काम ठोकला. मराठा सैन्य सुरतेत पाच दिवस होते. त्या दरम्यान ते उघड्यावर राहिले. राजांनासुद्धा राहण्यासाठी एखादा तंबूही लावला गेला नव्हता. दुर्दैवाने त्यांना भेटायला कोणीही आले नाही. मग मात्र शिवाजीराजांनी शक्तीचा उपयोग करण्याचे ठरवले. त्यांच्या पत्राला प्रतिसाद मिळाला असता, तर पुढे सुरतकरांना भोगायला लागलेली शिक्षा टळली असती.

इनायतखान स्वत: राजांना भेटण्यास तर आला नाहीच, परंतु त्याने त्याऐवजी आपला वकील पाठवला. ते ठीक होते; परंतु त्याच्याबरोबर 'आपणास दंड काय पाहिजे', असा कुत्सित निरोप त्याने पाठवला. हे ऐकून मात्र राजे साहजिकच खवळले. त्यांनी वकिलाला बंदिस्त करण्याचे आदेश दिले. हे इनायतखानाला कळल्यानंतर आपली कोणाशी गाठ आहे, याची त्याला जाणीव झाली आणि बाकी नागरिकांची पर्वा न करता त्याने शहर सोडून किल्ल्याच्या आत आश्रय घेतला. मराठ्यांच्या वास्तव्यादरम्यान तटबंदीच्या आतील मोगल सैन्य बाहेर आले नाही. त्यांनी आतून तोफांचा मारा काही वेळ केला, परंतु मराठा सैन्याला काहीच इजा पोचली नाही. नागरिकांना मात्र त्याचा त्रास झाला.

डच किंवा इंग्रजांच्या वखारींना कोणतीही इजा पोचवण्याचा राजांचा उद्देश नव्हता. कारण स्पष्ट होते. ते केवळ मोगलांना त्यांच्या पुण्याच्या परिसराची तीन वर्षे नासधूस करण्याच्या जुलमांसाठी धडा शिकवण्याच्या उद्देशाने आले होते. डच वा इंग्रज यांनी त्यांचे काहीही वाकडे केले नव्हते. जॉर्ज ऑक्झिंडनने मात्र कोणतीही जोखीम न पत्करण्याच्या उद्देशाने आपल्या हाताखालील दोन-अडीचशे लोक गोळा केले. सहा लहान तोफा आणून डागल्या आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी तो जय्यत तयार राहिला. ६ जानेवारीला इंग्रजांनी

नागरिकांना धीर देण्यासाठी जॉर्ज ऑक्झिंडनच्या नेतृत्वाखाली ड्रम-ट्रंपेटच्या आवाजात शहरभर पथसंचलन केले. त्यांच्याकडे फारशी रोकड किंवा जडजवाहीर असण्याची शक्यता नव्हती, याची राजांना पुरेपूर कल्पना होती. या कारणासाठी शिवाजीराजे त्यांच्या वाटेस जाणार नव्हते.

शाईस्ताखानाच्या कुकर्मांची पावती चुकती करणे हा एकमेव हेतू बाळगून राजे सुरतेला आले होते. ते शहर लुटून शिवाजीराजे मोगलशाहीला संकेत पोचवणार होते. इनायतखानाकडून काहीच प्रतिसाद न आल्यावर राजांनी आपल्या लोकांना आधी ठरल्याप्रमाणे सुरत लुटण्याचा आदेश दिला. बुधवार ६ जानेवारीपासून पुढील चार दिवस मराठ्यांनी सुरत शहर यथेच्छ लुटले आणि मोठी घरे जाळली. डच वखारीजवळचा बहर्जी बोहरा याचा वाडा लुटण्यात आला. त्याच्याकडे ८० लक्ष रुपयांची संपत्ती होती. त्याच्याकडून सोने, रूपे, हिरेमाणकांनी भरलेली सहा पिंपे मिळाली. हाजी सय्यद बेग याची वाडी इंग्रजांच्या वखारीजवळ होती. तीही लुटली गेली. हाजी त्याआधीच किल्ल्यात पळून गेला होता. नदीपार करताना दोन व्यापाऱ्यांना पकडण्यात आले. त्यांच्याकडे तीन पिंपे भरून सोने मिळाले.

ॲबिसीनियाचा वकील खाजा मुराद बादशहाला भेटण्यासाठी सुरतेत पोचला होता. बादशहासाठी नजराणा म्हणून त्याने आणलेला सोन्याचा पलंग त्याच्याकडून जप्त करण्यात आला.

हाजी बेगचे घर लुटत असताना इंग्रजांनी मराठ्यांना विरोध केला. त्याचा प्रतिकार म्हणून राजांनी इंग्रजांकडे तीन लाख रुपयांची मागणी केली. ऑक्झिंडनने त्याकडे दुर्लक्ष केले. त्याच्या मागे लागून ते वसूल करण्याचा राजांचा उद्देश नव्हता. सुरतेमध्ये पुरेसे अर्थार्जन झाल्यामुळे इंग्रज वा डचांकडून पैशाची त्यांना अपेक्षा नव्हती. औरंगजेबाने मात्र ऑक्झिंडनची पाठ थोपटून युरोपियन व्यापाऱ्यांना एक वर्षासाठी जकात माफ केली.२८

इनायतखानाने राजांचा खून करण्याचा बेत ठरवला. त्यासाठी त्याने एका माणसाला तहाची बोलणी करण्याच्या निमित्ताने राजांची भेट घेण्यासाठी पाठवले. शिवाजीराजांनी त्याला दरडावले, 'तुझा धनी बाईसारखा घरात लपून बसला आहे, पण त्याच्या अशा गोष्टी मान्य करायला मलाही तो बाई समजतो काय?' यावर तो शिवाजीराजांशी काहीतरी खासगीत बोलायचे आहे, असे दाखवून त्यांच्या निकट आला आणि कट्यार काढून त्याने ती राजांच्या छातीत जोरात खुपसली. राजांना जखम झाली. जवळच्या अंगरक्षकाने ताबडतोब तलवारीने त्याचा हात धडावेगळा केला. सुरक्षा सैनिकांनी बऱ्याच लोकांची धरपकड केली. त्यातल्या चौघांना ठार मारून बाकीच्या चोवीस जणांचे हात तोडण्यात आले.२९

सुरतेकडे अहमदाबादवरून मोगल सैन्य पाठवण्यात आले. ही बादशाही कुमक १७ जानेवारी रोजी सुरतेत येऊन पोचली. परंतु ते पोचेपर्यंत राजांनी सुरत सोडून एक आठवडा होऊन गेला होता. औरंगजेबाला काश्मीररहून परत येताना सुरतेवरील राजांच्या हल्ल्याची बातमी कळली. त्याने ताबडतोब इनायतखानाला काढून टाकले आणि गयासदीनखान याची त्याच्या जागी नेमणूक केली. त्याबरोबरच औरंगजेबाने तटबंदी अधिक बळकट करण्याचे आदेश दिले.

शिवाजीराजांनी सुरत १० जानेवारी १६६४ला सोडले आणि ते राजगडला ६ फेब्रुवारीला

पोचले. परतीसाठी त्यांना अर्थातच अधिक वेळ लागला. त्यांच्या बरोबर सोने-नाणे आणि जडजवाहीर घोड्यांवर लादले होते. राजगडास पोचण्याआधी राजांचा तळ लोहगडास पडला होता. तिथून त्यांचे सैन्य पुढे जात असताना वडगावात मोगल सरदार मुकुंदसिंग राजपूत याने मराठ्यांना गाठले. नेतोजी, चिमणाजी, परसोजी वगैरे लूट घेऊन पुढे सटकले. मुकुंदसिंगाला नरो बापूजीने रोखून ठेवले. लूट पुढे सुखरूप गेली; परंतु नरो बापूजी मात्र झटापटीत मारला गेला.

लष्करी विलेषण

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे मोहीम काढण्यामागे राजांचे दोन हेतू असत; पहिला, रणनीती आणि दुसरा, अर्थनीती. रणनीतीचे उद्दिष्ट शत्रूचे बळ खच्ची करणे, तर अर्थनीतीचे उद्दिष्ट, पैसा गोळा करणे. प्रतापगडाची लढाई किंवा शाईस्ताखानावरील हल्ला हे रणनीतीचे भाग होते, शत्रूचा उच्छेद करणे एवढेच त्यांच्यामागील उद्दिष्ट. त्या दरम्यान काही अर्थार्जन झाले, तर ते केवळ प्रासंगिक. परंतु सुरतेवरील दोन हल्ले हे मात्र केवळ अर्थार्जनासाठी करण्यात आले होते. त्या दरम्यान शत्रूच्या सैन्याबरोबर कोणताही सामना शक्यतो टाळायचा, हे राजांचे धोरण होते. त्यांनी बरोबर ४००० स्वार घेतले होते, ते मुख्यत्वेकरून सुरतेमधून मिळणाऱ्या लुटीच्या रक्षणासाठी. परंतु मोहिमेचा सर्व आराखडा एखाद्या लष्करी कारवाईप्रमाणे राजांच्या नेहमीच्या सखोलतेने आखला गेला होता.

राजांच्या उद्दिष्टाचे दोन पैलू होते; पहिला, अधिकाधिक अर्थार्जन आणि दुसरा, शाईस्ताखानाच्या जुलमाचा प्रतिशोध. त्यासाठी निवडलेले लक्ष्य उद्दिष्टांच्या दृष्टीने अत्यंत अनुरूप होते. सुरत हे मोगल साम्राज्यातील दक्षिणेमधील जवळजवळ सर्वांत श्रीमंत शहर होते. त्यातून मिळणारी लूट गेल्या तीन वर्षांची तूट बऱ्याच अंशांनी भरून काढणार होती. पश्चिम सागरतीरावर काहीशा अलिप्त जागी असल्यामुळे त्याच्यावर केलेल्या हल्ल्याला प्रतिसाद देण्यासाठी कुमक येण्यासाठी निदान आठवडा लागणार होता. त्या कालावधीत हल्ला संपवून नाहीसे होणे शक्य होते. सुरतेतील सुभेदार त्याच्यावर कोणीही हल्ला करणार नाही, याबद्दल निर्धास्त असल्याने तो गाफील असणे साहजिक होते. त्याचबरोबर तेथील सुभेदाराने ५००० संख्येच्या सैन्याऐवजी केवळ १०००ची शिबंदीच तैनात केली आहे, याची माहिती त्यांना मिळाली होती. इनायतखान हा नालायक आणि कर्तव्यहीन अंमलदार असल्याने काहीही प्रतिकार करू शकणार नाही; सुरत उद्ध्वस्त केले, तर त्याकरवी औरंगजेबापर्यंत आपल्या चित्तक्षोभाचा संकेत पोचेल, याची राजांना खातरी होती.

मोहिमेदरम्यान या दोन उद्दिष्टांचा त्यांनी कसून मागोवा घेतला. कोणताही संकल्प हाती घेण्याआधी उद्दिष्टांचे ते तर्कगम्य आणि सुसंगत विलेषण करीत. वाटेत येऊ शकणाऱ्या अडथळ्यांचे ते अचूक अनुमान करून त्याच्यावर मात करण्याचे उपाय आधीच आखत असत. सुरत हल्ल्यादरम्यान या दोन उद्दिष्टांना त्यांनी किंचितही डोळ्यांआड होऊ दिले नाही. सुरतेतील प्रत्येक धनिकाची संपत्ती त्यांनी पद्धतशीररीत्या लुटली. बहर्जी बोहरा या व्यापाऱ्याने आपली संपत्ती दडवून ठेवली होती, त्यासाठी त्यांनी त्याचा संपूर्ण वाडा खणून

काढला. अ‍ॅबिसीनियाच्या राजदूताकडून सोन्याचा पलंग जप्त केला. त्यांनी जवळजवळ दीड कोटीची मालमत्ता हस्तगत केली; परंतु आम नागरिकाला त्यांनी थोडीही तोशीस होऊन दिली नाही. उलट मौल्यवान जिन्नस सोडून बाकी सर्व लूट त्यांनी गोरगरिबांना वाटून टाकली.

पुणे आसमंताची तीन-चार वर्षे शाईस्ताने राख-रांगोळी केल्याचा सूड घेण्यासाठी सुरतेच्या विध्वंसात राजांनी कसर सोडली नाही. मोठमोठ्या वाड्यांना त्यांनी आग लावली. सुरत पुढील काही दिवस जळत होती. सुरतेच्या लुटीनंतर शिवाजीराजांबाबत सर्वत्र दहशत निर्माण झाली. त्याची वार्ता पार इंग्लंडपर्यंत पोचली. मग औरंगजेबाला त्याकरवी धडा न मिळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यानंतर इंग्रजांकडून लिहिल्या गेलेल्या कित्येक वृत्तांतांत अधोरेखित केले गेले आहे की, ‘शिवाजीराजांचे नाव काढताच सुरत चळाचळा कापू लागते’. अशा प्रकारे दुसरे उद्दिष्टसुद्धा पूर्णपणे साध्य झाले होते.

सुरतेस पोचेपावेतो आपल्या उद्देशाची आणि हालचालींची राजांनी कोणालाही चाहूल लागू दिली नाही. राजगडाजवळील सिंहगडाला मोगल सरदार जसवंतसिंह दहा हजार शिपायांसह वेढा घालून बसला होता. राजांची चार हजार स्वारांची फौज त्याच्या सान्निध्यातून गुजरली; परंतु त्याला थोडाही मागमूस लागला नाही. त्यानंतर त्र्यंबकेश्वरात आपण औरंगाबादेस जात असल्याचा त्यांनी देखावा केला. सुरतेजवळ पोचल्यावर आपण कोणी मुगल सरदार आहोत आणि अहमदाबादला जात आहोत, अशी हूल उठवली. अंतत: सुरतेस पोचेपर्यंत इनायतखानाला त्यांचा मागमूसही लागला नव्हता. हे काही ऐनवेळी घेतलेले पवित्रे नव्हते. सुरतेस मोगलांची कुमक पोचण्यासाठी निदान आठवडा-दहा दिवस लागतील, आपल्या कामाला पाच-सहा दिवस आणि तिथून नाहीसे होण्यास दोन-तीन दिवस लागतील, याचा राजांनी मेळ घातला, तेव्हा आपण सुरतेला पोचेपावेतो कोणालाही त्याची बातमी लागता कामा नये, याची राजांना जाणीव झाली. त्यासाठी शत्रूला अंधारात ठेवण्याची त्यांनी एक उत्तम योजना बनवली आणि ती शिताफीने अमलात आणली. विस्मय आणि शाठ्य या युद्धतत्त्वाचा हा सुंदर आविष्कार.

कोणतीही कारवाई हाती घेण्याच्या आधी जाण्या-येण्याच्या मार्गाची आणि लक्ष्याची सखोल टेहळणी करणे आवश्यणक असते. शिवाजीराजांचा या लष्करी खाक्यावर गाढ विश्वास होता. त्यामुळे प्रतापगड असो, पन्हाळा असो, ते बहिर्जी नाईकला नेहमी आधी धाडून सर्व काटेकोर माहिती मिळवत असत. यावेळीही त्यांनी बहिर्जीला पाठवले असल्याचा बखरीत उल्लेख आहे. परंतु सुरतेवरील हल्ला इतरांपेक्षा वेगळा होता. पैसे कोठे कोठे दडले आहेत, याचा अचूक ठावठिकाणा लावणे फार बिनीचे होते. ‘स्वत:ची एक पाहणी ही हजार अहवालांपेक्षा अधिक उपयोगी पडते’, असा लष्करशास्त्रातील एक रिवाज आहे. त्यानुसार बहिर्जीबरोबर टेहळणीसाठी जाण्याचे अनेक फायदे होते. त्यामुळे बहुतांश इतिहासकारांनी

मॉन्सियॉर डे थेव्हेनो या फ्रेंच प्रवाशाचे विधान कितीही अविश्वसनीय ठरवले असले, तरी राजांचा लष्करी बाणा लक्षात घेता त्या विधानावर लष्करी दृष्टिकोनातून विश्वास ठेवावासा वाटतो.

आपल्या संसाधनांचा व उद्दिष्टांचा मेळ घालणे आणि उद्दिष्टांवरील लक्ष कधीही ढळू न देणे हे

सेनापतीचे गमक असते. अर्थार्जन आणि प्रतिशोध या दोन्हींवरून आपले लक्ष राजांनी किंचितही ढळू दिले नाही. इनायतखानाचा राजांना येऊन भेटण्यास नकारातील उद्धटपणा किंवा मारेकरी पाठवून त्यांच्या खुनाचा प्रयत्न करण्यातील वाह्यातपणा या दोन्हींमुळे भडकून जाऊन राजांनी त्याच्या छावणीवर हल्ला चढवला नाही. त्यांच्याकडे चार हजार स्वार होते. इनायतखानाच्या हजार शिबंदीला मराठे सहज नमवू शकले असते; परंतु इनायतखानाचा पराभव करून त्यांना काहीच मिळणार नव्हते. त्यांचे मुख्य अर्जित होते अर्थार्जन, शस्त्रप्रहार नव्हे. त्याचप्रमाणे इंग्रज वा डचांना त्यांच्या उर्मटपणासाठी धडा शिकवणे हेसुद्धा त्यांच्या कार्यभागात नव्हते. राजांच्या सेनापतित्वाची ही परिपक्वता वाखाणण्याजोगी आहे.

शिवाजीराजांच्या सुरतेवरील धाडीचा परकीय इतिहासकारांनी विपर्यास केला आहे. त्या धाडीमागील कारण आणि तिचे उद्दिष्ट लक्षात घेणे आवश्यनक आहे. १६६०पासून पुढील चार वर्षे शाईस्ताखानाने पुण्यावर अगणित अत्याचार आणि अन्याय केला होता. त्याचे लाखावर संख्येचे सैन्य आणि पाऊण लाख जनावरे पुण्याच्या आसमंताची वाताहत करीत होती. त्यांच्या या अत्याचाराची दखल मात्र हे इतिहासकार घेत नाहीत. शाईस्ताखानाचे जुलमी वास्तव्य तीन वर्षे टिकले म्हणून त्याची तीव्रता त्यांना भासत नसावी; उलट शिवाजीराजे त्याचा बदला घेण्यासाठी फक्त पाच-सहा दिवस सुरतेत राहिले. त्यांच्याबरोबर केवळ चार हजार स्वारांचे सैन्य होते. त्यांनी कोणत्याही तोफा वा अमाप दारूगोळा बरोबर नेला नव्हता. त्यांनी सुरतेत शिरण्याच्या आधी सर्वांना सावधान केले होते. जर सुभेदार इनायतखान आणि तिथल्या धनदांडग्यांनी त्यांच्याशी येऊन चर्चा केली असती, तर नंतरची जाळपोळ टळली असती; किंबहुना राजांचा रोख काही धनदांडग्यांवरच होता. आम जनतेला ते कधीही त्रास देत नसत. 'सुरतेची बेसुरत केली', असे मुस्लीम दस्तऐवजांमध्ये सापडणारे वर्णन अतिशयोक्तीपूर्ण म्हटले पाहिजे.

सुरतेतील कोणत्याही धर्मस्थानाला इजा पोचली नाही. ख्रिस्ती फादर अँब्रास राजांना भेटला. त्याला त्यांनी अभयदान दिले. मराठ्यांनी फक्त चांदी, सोने, मोती आणि जडजवाहीरच लुटले. बाकी मालाला हात लावला नाही. शिवाजीराजे एका पत्रात म्हणतात, 'आपला इंग्रज किंवा इतर व्यापाऱ्यांचे व्यक्तिश: नुकसान करण्याचा इरादा नसून फक्त औरंगजेबाने आपल्या मुलखावर स्वाऱ्या करून आपले संबंधी लोकांना मारले. याकरिता औरंगजेबाचा सूड उगविण्याचा आहे. इंग्रजांनी काही द्रव्य दिले, तर आपण त्यांच्या वखारींना त्रास देणार नाही.'३०

शिवाजीराजे इंग्रजांना घाबरले असल्यामुळे त्यांनी इंग्रजांवर हल्ला चढवला नाही किंवा त्यांच्या भीतीने ते पाच दिवसांतच सुरत सोडून गेले, हे गृहीतसुद्धा अवास्तव आहे. राजांना या पहिल्या हल्ल्यादरम्यान इंग्रज वा डच यांच्याकडून पैसा किंवा हत्यारे अपेक्षित नव्हती. ऑक्झिंडनने हाजी बेगचे घर लुटले जात असताना अडता घातला नसता, तर कदाचित या मोहिमेच्या तपशीलात इंग्रजांचा नामनिर्देशही आला नसता. इंग्रजांना ते घाबरत नसत, हे पन्हाळ्याच्या वेळी सिद्दी जोहरला तोफ पुरवणाऱ्या राजापूर वखारीतील रेविंग्टनच्या

उदाहरणावरून सिद्ध होते.

कोस्म द गार्द्र लिहितो की, 'सुरत लुटीच्या वेळी राजांची आपल्या सैनिकांना सक्त ताकीद होती की, कुणी प्रतिकार करणार नसेल, तर त्याला ठार मारू नये. प्रजेपैकी कुणीच प्रतिकार न केल्यामुळे कुणालाच ठार मारण्याचा प्रश्न उद्भवला नाही.' राजांनी सुरतेतील मोठ्यांची घरे जाळली, पण त्याची धग गोरगरिबांना पोचली नाही. फ्रान्सिस व्हॅलेंटाइन लिहितो, 'कमी मौल्यवान वस्तू राजांनी गरिबांना वाटून दिल्या.'३१

वैभवसंपन्नता आणि शाही इतमाम यामुळे सुरतेला तत्कालीन मुस्लीम बादशहाच्या दाढीची उपमा देत असत.३२ इव्हर्सन या इंग्रज माणसाने राजांनी सुरत सोडताना काढलेले उद्गार लिहून ठेवलेले आहेत. ते म्हणाले होते, 'औरंगजेबाची दाढी ओढण्याची माझी अनेक दिवसांची इच्छा पूर्ण झाली.' आजही हे शब्दश: खरे वाटते!

शहाजीराजांचे अपघाती निधन

शिवाजीराजे सुरतेहून राजगडास परतत असताना कर्नाटकात एक शोकांतिका घडत होती. शहाजी राजांचा मुक्काम शिमोगा जिल्ह्यातील होदिगरे येथील कौलारू वाड्यात होता. २३ जानेवारी १६६४ रोजी आसपासच्या दाट जंगलात ते शिकारीसाठी गेले होते. श्वापदाचा पाठलाग करताना घोड्याचा पाय खळग्यात अडखळला आणि शहाजीराजे खाली फेकले गेले. त्यांच्या डोक्याला जबर जखम झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. ते सत्तर वर्षांचे होते. त्यावेळी राजे सुरतेहून पुण्याच्या मार्गावर होते, तर धाकटे एकोजी ऊर्फ व्यंकोजीराजे जवळ नव्हते, परंतु ते लगबगीने तिथे पोचले. अत्यसंस्कार त्यांच्या हस्ते झाले.

शहाजीराजे शिवाजीराजांचे केवळ पिताच नव्हे, तर त्यांच्या स्वराज्यप्रेरणेचे शिल्पकार होते. आपल्या पुत्राने सुलतानांच्या गुलामीच्या बेड्या फेकून देऊन स्वतंत्र हिंदू स्वराज्य निर्माण करावे, अशी त्यांची मनीषा होती आणि ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी शिशुवयापासूनच शिवाजीराजांना त्या ध्येयाकडे वाटचाल करण्यास प्रवृत्त केले आणि मूकपणे त्यांचे साहाय्य केले. आपल्या सौभाग्यवती जिजाबाईसाहेब यांच्या कर्तृत्वावर त्यांचा खंबीर विश्वास होता. आपल्या अनुपस्थितीतही त्या शिवरायांना समर्थ मार्गदर्शन करतील, याची त्यांना खातरी होती. शिवरायांना साहाय्य करण्यासाठी त्यांनी आपले कारभारी दादोजी कोंडदेव आणि सोनोपंत डबीर आदी मुत्सद्दी शिवाजीराजांबरोबर धाडले होते. आपण स्वत: जर त्यांच्या सान्निध्यात राहिलो, तर त्यांच्या मार्गात बाधा येऊ शकते, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यादृष्टीने हा शहाजीराजांचा मराठा स्वराज्यासाठी सर्वोच्च स्वार्थत्याग होता, याची दखल घेणे आवश्यक आहे.

(संभाजीमहाराज यांनी आपल्या दानपत्रात शहाजीराजांना 'निशायुद्धप्रवीण' आणि 'हैंवधर्मजीर्णोद्धार करणधृतमति' या शब्दांत गौरवले आहे.) शहाजीराजांबद्दल दक्षिणेत जनमानसात किती प्रचंड आदर होता, याचे मार्मिक वर्णन जयराम पिंड्ये या तत्कालीन कवीने केले आहे :

जगदीश विरंचिकु पुछत है कहो शिष्टी राची राखे कौन कहां ।

कर जेरि कही जयराम विरंच्ये तिरि लोक जहां के तहां ॥
ससि वो रवि पूरब पश्चिम लो तुम सोय रहो सिरसिंधु महा ।
अरु उत्तर दछन रछनको इत साहजु है उत साहिजहां ॥

(परमेश्वर ब्रह्मदेवाला विचारतो की, तू सृष्टी रचलीस, तीत रक्षक कोणकोण ठेवलेस, ते सांग. तेव्हा ब्रह्मदेव उत्तर देतो, पूर्वेचा रक्षक सूर्य, तर पश्चिमेचा चंद्र कला आहे. उत्तर दिशेचा लोकपाल म्हणून शहाजहान बादशहा, तर दक्षिणेचा रक्षक शहाजीराजा केला आहे.)३३

शिवाजीराजांना ही बातमी राजगडाला पोचताच कळली. त्याच्या आधीच नारो बापूजीच्या हौतात्म्याबद्दल ऐकून ते दु:खी होते. परंतु आपल्या पित्याच्या निधनाची बातमी ऐकून तर त्यांच्या दु;खाला पारावारच राहिला नाही. स्वत:च्या वेदना बाजूला ठेवून त्यांनी आपल्या मातोश्रींचे सांत्वन केले. त्या दोघांच्याही आयुष्यातले एक पर्व संपले होते.

मोगलांच्या शैथिल्याचा फायदा

जसवंतसिंह सिंहगडाला अजूनही वेढा घालून बसलेलाच होता. परंतु त्याचा सिंहगडावर काहीच परिणाम नव्हता. १४ एप्रिल १६६४ला त्याने किल्ल्यावर सर्व सेनाबळ एकत्र करून चढाई करण्याचा प्रयत्न केला, परंतु किल्ल्यातील मराठा शिबंदीने तो हाणून पडला. काही दिवसांनी त्याच्या दारूगोळ्याच्या भांडारात एक प्रचंड स्फोट झाला. एक तर तो अपघात होता किंवा कोणीतरी त्याला मुद्दाम आग लावली होती. त्याने आपला मेव्हणा भावसिंग हाडा याला त्याबद्दल दोष दिला. दोघांच्यात मोठे भांडण झाले. त्यानंतर २० मेला जसवंतसिंहाने वेढा उठवला आणि तो २८ मे रोजी पुण्याला परतला. लागलीच महाराज ३० मेला सिंहगडावर गेले. त्यांनी किल्लेदाराची आणि आतल्या गडकऱ्यांची पाठ थोपटली. ते सिंहगडावर आठवडाभर राहिले. त्यानंतर ते राजगडास परतले. पावसाळा तोंडावर आला होता.

मोगलांचा सुभेदार शहजादा मुअझ्झम औरंगाबादमध्ये ऐशआराम आणि मौजमजेत कालक्रमण करत होता. मराठ्यांशी लढण्यापेक्षा शिकारीत त्याला अधिक स्वारस्य असे. या ढिलाईचा फायदा घेऊन शिवाजीराजांनी स्वराज्यविस्ताराचे काम अधिक जोराने हाती घेतले. जून-जुलैमध्ये त्यांनी अहमदनगरवर हल्ला केला आणि मोगल छावणीतून बराच पैसा गोळा केला. नेतोजी पालकर मोगल प्रदेशात धुमाकूळ घालतच होता. स्वराज्याच्या शत्रूंना शिवाजीराजांची पुढील हालचाल काय असेल, हे कळत नसे. कोणावर ते हल्ला करतील, याबद्दल सर्वजण साशंक असत. ते विजेच्या वेगाने फिरू शकतात आणि ते एकाच वेळी अनेक ठिकाणी असतात, अशी अफवा पसरली होती. 'शिवाजीराजांना पंख आहेत, त्यांना अदृष्यतेचा वर मिळाला आहे. पाहिजे तेव्हा पाहिजे तिथे त्यांना बिनहरकत फिरता येते, त्यांच्यापुढे कोणाचा निभाव लागत नाही', असे काही इंग्रजी व्यापाऱ्यांनी आणि लेखकांनी लिहून ठेवले होते.३४ त्यांना नाहक विरोध करण्याऐवजी त्यांचे प्रभुत्व पत्करणे हे जास्त सुकर आहे, असे ते एकमेकांना बजावत. प्रतापगडची लढाई, शाईस्ताखानावरील हल्ला आणि सुरतेवरील धाड या यशस्वी कारवायांनंतर शिवाजीराजांचा दबदबा सर्वत्र किती वाढला होता, हे यावरून कळते.

राजांचा आपल्या सहकाऱ्यांबद्दल आणि स्वत:वरील आत्मविश्वास किती बळावला होता, याचे त्यांनी १६६४च्या अखेरीस वा १६६५च्या आरंभी दक्षिणेतील मोगल अधिकाऱ्याला फारसीमधून लिहिलेल्या व मुन्शी नील प्रभूच्या हस्ते पाठवलेल्या पुढील पत्रात पारदर्शक प्रतिबिंब सापडते :

'आज तीन वर्षे बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत. बादशहा हुकूम फर्मावितात. 'शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा.' तुम्ही जबाब पाठवता, 'आम्ही लवकरच काबीज करतो.' आमच्या या कठीण प्रदेशात तर नुसता कल्पनेचा घोडा नाचवणेही कठीण आहे, मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला! भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठवण्यास तुम्हांला लाज कशी वाटत नाही? कल्याणी व बेदरचे किल्ले केवळ उघड्या मैदानात होते, ते तुम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड आणि डोंगराळ आहे. त्यातून नदीनाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूद असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत, पैकी काही समुद्रकिनाऱ्यावर आहेत. बिचारा अफझलखान बेसावधपणे जावळीवर फौज घेऊन आला आणि नाहक मृत्युमुखी पडला. इकडचा सर्व प्रकार तुम्ही बादशहास का कळवीत नाही? अमीर-उल्-उमराव शाईस्ताखान आमच्या या गगनचुंबित डोंगरांत व पाताळास पोचणाऱ्या कप्प्यांत तीन वर्षे सारखा खपत होता. मी 'शिवाजीचा पाडाव करून लौकरच त्याचा प्रदेश काबीज करतो,' असे बादशहाकडे लिहून तो थकला. या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. आपल्या भूमीचे संरक्षण करणे माझे कर्तव्य आहे आणि तुम्ही बादशहाकडे कितीही खोट्या बातम्या लिहून पाठविल्या, तरी मी आपले कर्तव्य बजावण्यास कधी चुकणार नाही.'[३५]

जयसिंहाची स्वारी

जयसिंहाची नियुक्ती

औरंगजेब काश्मीकरमध्ये जात असता शिवाजीराजांनी शाईस्ताखानाला पुण्यातून पळवून लावल्याची बातमी त्याला मिळाली. तिथून तो परत येत असताना सुरतेवर हल्ला करून ती त्यांनी भस्मसात केल्याचे त्याला कळले. त्याचा विश्वासू सरदार जसवंतसिंह प्रदीर्घ वेढा टाकूनही सिंहगड जिंकू शकला नाही. शाईस्ताखानाच्या जागी पाठवलेला शहजादा मुअज्झमही दक्षिणेतील परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यास असमर्थ ठरला. शिवाजीराजांनी अहमदाबादच्या छावणीवर हल्ला चढवून ती लुटली. मराठ्यांचा सरनौबत नेतोजी पालकर मोगल प्रदेशात सर्वत्र धुमाकूळ घालत असल्याच्या वार्तादेखील त्याच्यापर्यंत पोचत होत्या. सर्वच गोष्टी औरंगजेबाच्या विरुद्ध जात होत्या. हे असेच चालू राहिले, तर स्वराज्याचे आव्हान हाताबाहेर जाईल, याची औरंगजेबाला प्रकर्षाने जाणीव होऊ लागली. आपल्या एखाद्या वरिष्ठ आणि कर्तबगार सरदाराला मोठ्या सैन्यानिशी दक्षिणेत पाठवून शिवाजीराजांना नामोहरम करण्याचा त्याने निर्धार केला.

सारासार विचार करून शिवाजीराजांना पकडून आणण्याची कामगिरी पार पाडण्यासाठी मिर्झा

राजा जयसिंहास दक्षिणेकडे रवाना करण्याचे आणि जसवंतसिंहाला परत बोलवायचे औरंगजेबाने ठरवले. मिर्झा त्याच्या आतल्या गोटातला विश्वासू सरदार होता. आमेरच्या (अंबर) राजे घराण्याच्या राजा मानसिंहापासून सर्व राजांना दिलेली 'मिर्झा राजे' ही पदवी होती. हे सूर्यवंशी कच्छवाह राजघराणे आपल्याला प्रभू रामचंद्रांचे पुत्र कुश यांचे वंशज समजत असत. ढुंढाड किंवा आमेरची गादी वंशपरंपरेने जयसिंहाकडे आली होती. त्याला आपल्या आयुष्यात अपयशाचा सामना कधीच करावा लागला नव्हता.

१६१७मध्ये वयाच्या आठव्या वर्षी तो जहांगीरच्या सैन्यात दाखल झाला. त्या तरुण वयामध्ये त्याने मध्य आशियातील बाल्खपासून विजापूरपर्यंत आणि पश्चिमेस कंदाहारपासून मोंगीरपर्यंत संचार करून अनेक विजय संपादन केले होते. शहाजहानच्या कारकीर्दीत दर वर्षी कोणत्या ना कोणत्या विजयासाठी त्याचा सन्मान होत असे. मोगल लष्करात त्याचा दर्जा शहजाद्याबरोबरीचा होता. मिर्झा राजे जेवढा पराक्रमी होता, तेवढाच धोरणी व मुत्सद्दी होता. तो सहनशील

आणि शांत डोक्याने काम करे. औरंगजेब त्याला स्वतंत्र सेनापती म्हणून वागवत असे. क्लिष्ट मुत्सद्दी मामले सोडवण्यात त्याची नेहमीच मदत घेतली जाई. आपल्या उच्च वर्तनाने आणि अदबीच्या भाषेने तो दुसऱ्यांवर छाप पडत असे. तो विद्वान होता आणि तुर्की, फारशी, हिंदी व उर्दू या भाषांत पारंगत होता. कोणत्याही प्रश्नाकडे गंभीरपणे पाहून आणि सर्व पैलूंचा सारासार विचार

करून तो निर्णय घेत असे.

जयसिंहाच्या उच्च व्यवसायमूल्यांची आणि स्वामिनिष्ठेची पुरेपूर जाणीव असूनही हे दोन हिंदू राजे संगनमत करून आपल्याविरुद्ध उलटू नयेत म्हणून औरंगजेबाने जयसिंहाच्या हाताखाली त्याचा आणखी एक विश्वासू पठाण सरदार दिलेरखान याला धाडले. जयसिंहावर पाळत ठेवणे हे दिलेरखानाचे एक मुख्य काम होते. तसा दिलेरखान हाही एक कर्तबगार व अनुभवी सरदार होता. वास्तविक मिर्झा आणि दिलेर हे दोघेही औरंगजेबाच्या दिल्लीचे तख्त हडप करण्याच्या उद्योगाविरुद्ध सुरुवातीस शहाजहानच्या आज्ञेने दारा शिकोहच्या पक्षात सामील झाले होते, परंतु नंतर ते औरंगजेबाला येऊन मिळाले होते. त्यामुळे त्या दोघांबद्दल जरी त्याला किंचित शंका वाटत असे, तरीही दक्षिणेत ते काही गडबड करणार नाहीत, याची त्याला खातरी होती.

३० सप्टेंबर १६६४ या आपल्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर औरंगजेबाने मिर्झाला 'सीवाला दफे करण्याचा' आदेश दिला. मिर्झाच्या हाताखाली दिलेरखान, दाऊदखान कुरेशी, राजा रायसिंह सिसोदिया, राजा सुजनसिंह बुंदेला, जयसिंहाचा पुत्र कीरतसिंह कच्छवाह, राजा नरसिंह गौड, पुराणमल बुंदेला वगैरे रथी-महारथी सरदार होते. सर्वांची मिळून प्रारंभी १४,०००ची शिबंदी आणि मोगलांचा बुलंद तोफखाना त्यांच्याबरोबर होता. मिर्झाने निकोलो मनूची या इटालियनाची निवड तोफखान्याचा प्रमुख म्हणून केली होती. थोडक्यात, बादशहा आता मराठ्यांशी अंतिम टक्कर देण्यास सज्ज झाला होता. मिर्झाने कुतुबुद्दिन खान, उदयराज मुन्शी, उग्रसेन कच्छवाह, जानी बेग, गाझीबेग हे विश्वासातील लोकही बरोबर घेतले.

जयसिंहाने ९ जानेवारी १६६५ला नर्मदा ओलांडली, १९ जानेवारी ते ३० जानेवारीदरम्यान

बुऱ्हाणपूरला मुक्काम करून १० फेब्रुवारीला तो औरंगाबादला पोचला. तिथे दोन-तीन दिवस थांबून आणि मुअइझमशी चर्चा करून तो ३ मार्चला पुण्यास पोचला. सर्व कामाचा हवाला त्याच्यापाशी देऊन जसवंतसिंह ७ मार्चला पुण्याहून दिल्लीला परतला. त्यानंतर जयसिंहाने लागलीच स्वराज्याभोवती मुसक्या आवळण्यास आरंभ केला. शिवाजीराजांच्या प्रदेशाला कोणत्याही दिशेने रसद मिळू नये, हा त्याच्या मागचा हेतू होता. उत्तर, दक्षिण आणि पूर्व दिशेचे मार्ग तो गोठवू शकत होता. पश्चिमेच्या बाजूला कोकणाकडे जाणाऱ्या सर्व खिंडी शिवाजीराजांच्या हातांत असल्याने त्या बाजूस तो सध्यातरी फार काही विशेष कारवाई करू शकत नव्हता.

मिर्झा जयसिंहाची रणनीती

मराठ्यांच्या प्रदेशावर काबू कसा करावा, याच्या रणनीतीबाबतीत मिर्झा आणि दिलेरखानाच्या दरम्यान काही मतभेद होते. सर्व प्रदेशात जागोजागी सैन्य तैनात करून मराठ्यांच्या किल्ल्यांना जाणारी रसद तोडावी आणि सर्व प्रदेशाची कोंडी करावी, जेणेकरून सैन्याला कमीत कमी इजा व्हावी, असे मिर्झा राजे जयसिंह याचे मत होते. दिलेरसिंगाला मात्र वाटत होते की, एकामागून एक मराठ्यांचे किल्ले सर करावेत. जयसिंह हा कसलेला आणि अनुभवी सेनापती होता. त्याची रणनीती खचितच सरस होती. परंतु दिलेरखानाबरोबरील बेबनाव तो शक्यतो टाळत असे. औरंगजेबाशी त्याच्या संधानाची जयसिंहाला पुरेपूर जाणीव होती. शेवटी जयसिंहाने सुवर्णमध्य शोधला. एका बाजूस वेगवेगळ्या संपर्ककेंद्रांवर घोडदळ तैनात करून सर्व प्रदेशाची नाकेबंदी करावी आणि दुसऱ्या बाजूस पुरंदरगडावर हल्ला चढवून गड जिंकण्याचा आरंभ करावा, असे ठरले.

शिवाजीराजांना विजापूरपासून विभक्त ठेवण्यासाठी जयसिंहाने दोहोंच्या मधोमध आपला तळ ठोकण्याचे ठरवले. वास्तविक तळकोकणात जाऊन मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ले चढवावेत, अशी औरंगजेबाने सूचना दिली होती; परंतु आपण तळकोकणात आरंभीच शिरलो, तर विजापूर आणि मराठे एकत्र होऊन आपल्याला थांबवतील, असे मत जयसिंहाने औरंगजेबापाशी व्यक्त केले होते. त्यामुळे कोकणात जाण्याची चूक न करता जयसिंहाने लोहगड, पुरंदर आणि रायगड या तीन किल्ल्यांच्या भोवताली असलेल्या स्वराज्याच्या बिनीच्या प्रदेशावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले. त्याबरोबर आदिलशहाशी संधान बांधून आणि त्याच्याशी आरंभी सौजन्याने वागून त्याने शिवाजीराजे आणि अली आदिलशहा यांच्यातील समेटाची शक्यता मुळापासून खुडून टाकली.

बाजी चंद्रराव आणि अंबाजी गोविंदराव मोरे वगैरे शिवाजीच्या विरुद्ध असलेल्या सरदारांनाही जयसिंहाने सामील होण्यासाठी पत्रे धाडली. त्याबरोबर बिदनूरचा शिवाप्पा नाईक आणि अफझलखानाचा मुलगा फाझलखान हे त्याला येऊन मिळाले. शिवाजीराजांच्या सरदारांना आमिषे दाखवून त्यांच्या फौजेत फूट पाडण्याचे प्रयत्न त्याने सुरू केले. सुप्याचे दोन जमीनदार त्याच्या बाजूला आले. त्याशिवाय त्याने आपले वकील जंजिऱ्याचा सिद्दी व पोर्तुगीजांकडे पाठवले आणि त्यांना मराठ्यांविरुद्ध बंड उभारण्यास सांगितले. फ्रांसिस माईल

आणि डिक माईल या दोन युरोपीयांस स्वलिखित पत्रे देऊन त्याने गोवा, सुरत व मुंबईमधील वखारीतील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि शिवाजीराजांविरुद्ध आरमाराची मदत मागितली. त्याने बादशहालाही पत्र पाठवले, 'आपली फौज पुणे परिसरात असल्याने कोकण किनाऱ्यावर शिवाजी निर्धास्त आहे. यावेळी जर गुजरातेकडून एखादे आरमार पश्चिम किनाऱ्यावर येईल, तर शिवाजीच्या प्रदेशातून आपणास पुष्कळ लूट मिळेल.'३६ शिवाजीराजांना एकटे पाडण्याच्या दिशेने हे सर्व प्रयत्न होते.

रणनीतीनुसार मिर्झा जयसिंहाने उत्तरेत जुन्नरमध्ये कुतुबुद्दिनखानाखाली ७००० स्वार आणि पुण्यात इहतशमखानाबरोबर ४००० स्वार ठेवले. त्याने शार्झाखानाला सुपे येथे आणि आणखी एका विश्वासू सरदाराला दक्षिणेत शिरवळमध्ये वाजवी सैन्यासह मोर्चेबंदी करायचे आदेश दिले. कुतुबुद्दिनखानाला त्याने लोहगडाच्या पायथ्याशी ३००० चे सैन्य ठेवून उंब्रेमार्गे कोकणात जाणारे मार्ग गोठवण्यास सांगितले. त्याचबरोबर इहतशम खानाला त्याने पश्चिमेकडील नद्यांच्या खोऱ्यात गस्त घालून त्या संपूर्ण टापूत नियंत्रण प्रस्थापित करायचा आदेश दिला. सर्फराजखानाची शिबंदी सिंहगडाच्या परिसरात आणि दाऊदखानाचे सैन्य राजगडाच्या पायथ्याशी ठेवण्यात आले. त्याशिवाय खोपोलीच्या पश्चिमेला ५०००ची आणखी एक शिबंदी पाठवण्यात आली. अशा प्रकारे जुन्नर-लोहगड-पुणे-सिंहगड-पुरंदर-रोहिडा-राजगड या अक्षावर मोर्चेबंदी करून स्वराज्याची परिणामकारक नाकेबंदी करण्यात मिर्झा यशस्वी झाला. (नकाशा क्र. १९ पाहा.)

त्याबरोबर शिवाजीराजांना मुत्सद्दी मार्गाने वश करण्यासाठी त्याने राजांना पत्र पाठवले, 'तुम्ही बादशहास शरण याल, तर तुमचे सर्व प्रकारे कल्याण होऊन वैभव वाढेल. आमच्या मध्यस्थीने तुमची बादशहाशी इतमामाने भेट होईल. आपण दोघेही हिंदू एकधर्मी आहोत. ह्यात कोणताही कपटभाव एकमेकांनी मनात ठेवू नये. मी म्हणतो यास परमेश्वर साक्ष आहे.'

त्याच्या योजनेनुसार सर्व मार्गांची कोंडी पुरी झाल्यानंतर सर्वप्रथम पुरंदर किल्ला काबीज करण्याचे जयसिंह आणि दिलेरखानांनी ठरवले. त्यासाठी पुरंदर किल्ल्याच्या दिशेने जयसिंहाने १४ मार्च रोजी पुण्यापासून सासवडकडे पुणे, लोणी, राजेवाडी मार्गाने वाटचाल सुरू केली. वाटेत लोणी गावी मिर्झाला राम आणि हणमंत निंबाळकर येऊन मिळाले. लोणीची गढी ठीकठाक करून त्यांना जयसिंहाने तिथे ठाणेदार म्हणून नेमले. शिरवळ हे मध्यवर्ती ठाणे होते. त्या ठिकाणी सय्यद अब्दुल अजीज शुजातखान याला तीन हजार स्वारांनिशी पाठवून शिरवळला मोर्चेबंदी करण्याचे आदेश मिर्झाने दिले.आता पुरंदरच्या आधी इतर ठाणी हातात आली होती.


जयसिंह ३१ मार्चला सासवडच्या सान्निध्यात पोचला. दाऊदखान त्याच्या पिछाडीला होता. दिलेरखान तोफखान्याबरोबर त्यांच्या पुढे होता. दिलेरखान सासवडला पोचल्यावर तळासाठी जागा शोधू लागला. सासवड पुरंदरच्या नैर्ऋत्येस सहा मैल आहे. इतक्यात पुरंदरावरून मराठ्यांची एक तुकडी वेगाने खाली आली आणि दिलेरखानाच्या आघाडीच्या दस्त्यावर तिने हल्ला चढवला. काही काळ धामधूम माजली. परंतु तिथे थांबण्याचा मराठ्यांचा विचार नव्हता. काही काळातच मराठे गडावर चढून आत नाहीसे झाले. हा विजेच्या वेगाने केलेला प्रहार

पुरंदर गडावरील किल्लेदार मुरारबाजी देशपांडेने चढवला होता.

नकाशा क्र. १९

स्वराज्याची कोंडी


मार्च ते जून १६६५



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

बातमी मिर्झापर्यंत पोचवण्यात आली. त्याने सासवड आणि पुरंदरच्या दरम्यान छावणी ठोकावी आणि दिलेरखानाने ताबडतोब पुरंदरला वेढा टाकावा, असा आदेश सोडला. सर्व सैन्य सासवडच्या पुढे एकत्र झाले. पुरंदरच्या पायथ्याशी पोचल्यावर लागलीच किल्ल्याला वेढा टाकण्यात आला. (नकाशा क्र. २० पाहा.)

नकाशा क्र २०
पुरंदरचा वेढा
१ एप्रिल - १३ जून १६६५



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

किल्ले पुरंदर

'पुरान् (दुर्गान्) दारयति इति पुरंदर:', शत्रूची नगरे (किल्ले) जो उद्ध्वस्त करतो तो पुरंदर. इंद्राचे पुरंदर हे एक नाव आहे.३७ सिंहगडाच्या जवळ सह्याद्रीला एक फाटा फुटतो. त्याला भुलेश्वर रांग असे नाव आहे. या रांगेतच कात्रज, दिवे, बाबदेव व बोट हे घाट आहेत. बाबदेव घाटाजवळ दक्षिणेला आणखी एक डोंगरसरी लागते. यावर पुरंदर किल्ला आहे. पश्चिम-पूर्व दिशेत पसरलेल्या या डोंगरसरीच्या उत्तरेला कऱ्हा नदी आहे, तर दक्षिणेला नीरा नदी वाहते. पुरंदरची डोंगरसरी पूर्वेला उतरत जाते. तिच्या पूर्वेला एक उपदुर्ग बनला आहे, त्याचे नाव वज्रगड. गडाच्या पायथ्याला उत्तरेला नारायणपूर हे एक प्राचीन गाव आहे.

पुरंदर हा महाराष्ट्रातील किल्ल्यांमध्ये सर्वांत उंच किल्ला आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून ४५६४ फूट आहे. सभोवतालीच्या जमिनीपेक्षा तो २५०० फूट उंच आहे, तर पुरंदरचे पठार (माची) २१०० फूट उंच आहे. पुरंदर आणि वज्रगड हे दोन्ही किल्ले साधारण पूर्व-पश्चिम दिशेत पसरलेल्या एकाच लांब पठारावर आहेत. (नकाशा क्र. २० पाहा.) पुरंदरच्या किल्ल्याचे दोन भाग आहेत, बालेकिल्ला आणि माची. माची पुरंदरच्या बालेकिल्ल्याच्या ४०० फूट खाली आहे. बालेकिल्ल्याच्या ईशान्येला पाच टेकड्या आहेत. त्यांच्यापैकी एकावर वज्रगड हा उपकिल्ला बांधला आहे. त्याची उंची ४४३२ फूट असून पुरंदर आणि त्याच्यात ३५० गजांचे अंतर आहे. दोन्ही किल्ल्यांचा परीघ सुमारे ४ मैल आहे. माचीला चोहोबाजूंनी तटबंदी आहे. तिला पाच दरवाजे आहेत, त्यांपैकी मुख्य दरवाजा - सरदरवाजा - उत्तरेस आहे.

पुरंदरच्या बालेकिल्ल्याचे तीन उंचवटे स्पष्ट दिसतात. पूर्वेच्या उंचवट्याला खंदकडा किंवा कांदकडा, मधल्याला राजगादी आणि पश्चिमेच्या टेकडीला केदारेश्वर अशी नावे आहेत. वज्रगड आणि पुरंदर यांच्यामध्ये भैरवखिंड नावाची एक चिंचोळी खिंड आहे. माचीच्या उत्तर अंगाला सपाट जमीन आहे.३८ त्यावेळी गडावर बऱ्यापैकी वस्ती होती. राजांनी पूर्व अंगाला पाणी साठवण्यासाठी मोठा पद्मावती तलाव बांधून घेतला होता. त्यामुळे तिथे मुबलक पाणी होते. शिवाजीराजांच्या इतर सर्व गडांप्रमाणेच अन्न व इतर खाद्यपुरवठा आणि दारूगोळा साठवण्यात आला होता. किल्ल्यावर २०००ची शिबंदी तैनात होती. त्यातील ३०० वज्रगडावर होते.३९ पुरंदर किल्ल्याचा किल्लेदार मुरारबाजी देशपांडे याला जावळीवरील हल्ल्यादरम्यान त्याचा अचाट पराक्रम पाहून राजांनी तहात चंद्ररावाकडून मागून घेतले होते.

पुरंदर जिंकण्यासाठी वज्रगड आधी घेणे महत्त्वाचे होते. पूर्वेकडून वज्रगडावर येणारा हल्ल्याचा मार्ग टप्प्याटप्प्याने चढणाऱ्या कड्यावर होता. एकदा का वज्रगड घेतला की, तिथे तोफा आणून पुरंदरच्या तटबंदीवर मारा करणे हे सुलभ होईल, हा अचूक अंदाज जयसिंहाने केला. थोडक्यात, पुरंदर काबीज करण्याची ती एक यशोकिल्ली होती. पुरंदरला चोहोबाजूंनी मोगलांचा वेढा पडला. वज्रगडाच्या बंदोबस्तासाठी बाबाजी बोवाजी व यशवंतराव बोवाजी हे दोन प्रभू बंधू तैनात होते.४०

उत्तरेचा चढ तीव्र होता. दक्षिणेला उभा कडा होता. तटबंदी फोडण्यासाठी तोफांचा सरळ

दिशेत मारा करणे आवश्यहक होते. पायथ्यापाशी ठेवलेल्या तोफेच्या गोळ्याचा तटबंदीवर जोराने प्रहार साधणे हे कठीण काम होते. त्यामुळे पुरंदर सर करण्याचा सर्वांत किफायतशीर पर्याय वज्रगडाच्या मार्गे होता. वज्रगडाची माची पुरंदराच्या माचीइतकीच उंच होती. एकदा का वज्रगड घेतला की, पुरंदरावरून कोणताही माऱ्याचा अडथळा न येता तोफा वज्रगडावर आपल्या वेळात आणता येणे शक्य होते. त्यामुळे पूर्वेकडील तटबंदी उद्ध्वस्त करणे शक्य होणार होते. वज्रगडावरील मराठ्यांची शिबंदी फार नव्हती. तिच्यावर मात करणे कठीण नव्हते. वज्रगडावर हल्ला चाललेला असताना पुरंदर बालेकिल्ल्यावरून येणारा गोळीबार किंवा तोफगोळ्यांचा मारा ईशान्य दिशेहून चढणाऱ्या मोगल सैन्यावर फारसा परिणाम करू शकणार नव्हता.

वज्रगडावर हल्ला

दिलेरखानाने वज्रगडावर तोफांचा मारा सुरू केला. त्याचबरोबर वज्रगडाला जाणाऱ्या सुलभ चढण असलेल्या डोंगरसारीवरून आपल्या महाकाय तोफा चढवणे सुरू केले. हे काम अत्यंत कष्टाचे आणि वेळखाऊ होते. त्या तोफा सुमारे ८० बैलांना दोरखंडांना एकत्र बांधून चढवाव्या लागत. मनुचीच्या हाताखाली ही कारवाई सुरू झाली. पहिली तोफ 'अब्दुल्लाखान' चढवायला तीन दिवस लागले.४१ अब्दुल्लाखानाच्या मागोमाग 'फतेहलष्कर' चढवण्यात आली. त्यानंतर तिसरी तोफ 'हवेली' चढवली गेली.

सलग १४ दिवस वज्रगडावर मोगलांचा मारा चालू राहिला. दुसऱ्या बाजूने गडावरील मराठे या तोफांना निशाणा करत होते. ते शर्थीने मोगलांच्या तयारीत बाधा आणत राहिले. परंतु अखेरीस त्या महाकाय तोफांच्या जबर माऱ्याने वज्रगडाचा एक बुरुज १२ एप्रिल १६६५ रोजी कोसळला. ते पाहून दिलेरखानाच्या आनंदाला पारावर उरला नाही. त्याने ताबडतोब किल्ल्यावर चालून जाण्यासाठी सैन्य पाठवले. त्यांचा चढण्याचा मार्ग चिंचोळा होता, परंतु ते सैन्य गेले तीन आठवडे याच संधीची ते वाट पाहत होते. वज्रगडावरील मराठ्यांनी खंबीर प्रतिकार केला, परंतु त्यांची संख्या मोगलांच्या तुलनेत क्षुल्लक होती. तरीही दोन दिवस त्यांनी मोगलांना तटवून धरले. शेवटी १४ एप्रिलला मोगलांनी वज्रगडाचा ताबा घेतला. दिलेरखानाचे ८० सैनिक ठार झाले आणि ११० जखमी झाले. मराठ्यांना शरण जावे लागले, परंतु मिर्झा राजांनी त्यांची शस्त्रे काढून घेऊन त्यांची सुटका केली. किंबहुना हे केवळ जयसिंहाच्या उदार स्वभावामुळे नव्हते, त्याच्यामागे एक मुत्सद्दी चाल होती. त्याकरवी मराठे पुरंदरावरून सुरक्षितपणे जाण्याचे अभयदान मागून पुरंदर सोडून जाण्यास प्रवृत्त होतील का, हा खडा जयसिंहाला टाकून पाहावयाचा होता.४२

तोपर्यंत इतर ठिकाणी मोगलांची स्वराज्याच्या प्रदेशावरील पकड हळूहळू अधिकाधिक घट्ट होऊ लागली होती, तरीही पुरंदर लढ्याविना मोगलांना द्यायला राजे तयार नव्हते. मोगल स्वराज्याचा प्रदेश बेचिराख करत होते. दिवसेंदिवस त्यांच्यावरील दडपण वाढतच चालले होते. शाईस्ताखानाच्या पुण्यातील वास्तव्यादरम्यानसुद्धा अशी वेळ राजांवर आली होती. परंतु दोन्हींत फरक होता. शाईस्ताखान इकडे तिकडे फारसे न हलता पुण्यातच मुक्काम ठोकून

बसला होता, उलट एकामागून एक अग्रगण्य किल्ले काबीज करण्याचा जयसिंहाचा भक्कम इरादा स्पष्ट दिसत होता. पुरंदरचा वेढा सैल होण्यासाठी मराठ्यांच्या छोट्या तुकड्या स्वराज्यभर मोगलांच्या छावण्यांवर धावते हल्ले चढवत होते. किल्ल्याभोवती पडलेल्या वेढ्याला हुलकावणी देऊन राजे पुरंदरावर केदार दरवाजामार्गे दारूगोळा घेऊन एक तुकडी पाठवण्यात यशस्वी झाले.

पुरंदर पडण्याची काही चिन्हे दिसत नव्हती. केदार दरवाजातून मराठे शिरल्याचा दोष दिलेरखानाने दाऊदखानाच्या माथी मारला. त्या दरवाजाचा जिम्मा दाऊदखानावर होता. दिलेरखान आणि दाऊदखानामध्ये भांडण जुंपले. तसा दाऊदखानही अलीकडे 'पुरंदर घेणे अवघड आहे', अशी शंका वारंवार जाहीरपणे व्यक्त करत होता. बाकींच्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होता. मग जयसिंहाने एका दगडात दोन पक्षी मारायचे ठरवले. एक म्हणजे मराठी मुलखावरील दबाव आणखीन तीव्र करण्याच्या उद्देशाने आजूबाजूच्या मुलखात जाळपोळ सत्र काढण्यासाठी एक तुकडी पाठवायची आणि ते काम दाऊदखानाला देऊन त्याला पुरंदरपासून काही दिवस दूर ठेवायचे. त्याने ती योजना लागलीच अमलात आणली.

दाऊदखानाच्या हाताखाली ७०००ची शिबंदी देऊन त्याला ठिकठिकाणी हल्ले चढवण्यासाठी रवाना करण्यात आले. जयसिंहाने त्याच्याबरोबर राजा रायसिंह, शर्झाखान, अमरसिंह चंद्रावत, मुहम्मद सालीह तर्खान आणि अचलसिंह कछवाह वगैरे सरदार पाठवले. २५ एप्रिल १६६५ रोजी दाऊदखानाने पुरंदर सोडले. त्याने रोहिडा आणि रायगडमधील ४०-५० खेडी भस्मसात केली. ३० एप्रिलला तो राजगडाच्या पायथ्याशी पोचला. राजांचे वास्तव्य राजगडावर असावे. राजगडावरून तोफा, गोळीबार आणि बाणांचा त्याच्यावर मारा झाला. तो शिवापूरला आला आणि त्यानंतर मुलखाची नासधूस करत कोंडाण्याकडे गेला. त्यानंतर लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना या किल्ल्यांच्या आसपासची खेडी त्याने जाळली. लोहगडाजवळ त्याची मराठ्यांच्या तुकडीशी झटापट झाली. त्यानंतर १० मेला तो पुरंदरास परतला.

पुरंदरसाठी बुद्धिबळाचा खेळ

शिवाजीराजांची चिंता दिवसेंदिवस वाढत चालली होती. मोगलांनी स्वराज्यात मोक्याच्या ठिकाणी वेगवेगळ्या जागांवर मोर्चेबंदी केली होती. ते खेडीपाडी बेचिराख करत चालले होते. त्यांचा विशेष जोर किल्ल्यांच्या भोवती केंद्रित होता. एप्रिलचा महिना जवळजवळ संपत आला होता. आणखी पाच-सहा आठवड्यांनी पाऊस सुरू होणार होता. एकदा का पावसाळा लागला की, जयसिंहाला वेढा उठवून जायला भाग पडणार होते. त्याबरोबरच आदिलशहाबरोबर संधान साधून मोगलांच्या विरुद्ध सामायिक फळी उभारण्यासाठी प्रयत्न करणेही शक्य होते. परंतु वज्रगड शत्रूच्या हातात पडला होता. पावसाळा येईपर्यंत पुरंदर तग धरून राहील का, हा यक्षप्रश्न राजांना सतावत होता. त्यांना आता तरी ते अवघडच दिसत होते.

वज्रगडावरून नैर्ऋत्येचा दिशेला पुरंदरच्या माचीवर तोफांचा तुफान मारा चालू होता.

त्याबाजूला माचीचे चार-पाच बुरुज होते. त्यांपैकी सफेद बुरुज आणि काळा बुरुज अधिक भक्कम होते. वीस दिवस झाले, तरी बुरुज आणि तटबंदीला गौण धक्का पोचण्यापलीकडे तोफमाऱ्याचा फारसा परिणाम झाला नव्हता. मग जयसिंहाने या बुरुजांपर्यंत सुरुंग खोदण्याचा हुकूम सोडला. त्याकाळात जेव्हा तोफांचा मारा तटबंदीत भगदाड पाडायला असमर्थ ठरे, तेव्हा जमिनीखाली खोदलेल्या सुरुंगाद्वारे तटबंदीच्या खाली पोचून स्फोटकांच्या साहाय्याने तटबंदी उडवण्याचे तंत्र अवलंबिले जाई. दिलेरखानाने सफेद बुरुजाच्या खाली पोचण्यासाठी सुरुंग खणण्याचे काम सुरू केले. मराठ्यांनी सफेद आणि काळ्या बुरुजांमधील जागेत दारूगोळा आणून ठेवला होता.

मोगलांनी सुरुंग खणायला चालूच केले होते, तेव्हा अचानक मराठ्यांनी तिथे ठेवलेल्या दारुगोळ्याने पेट घेतला आणि सफेद बुरुजाला एक भगदाड पडले. दैवाने अखेर मोगलांवर खैरियत केली होती. आता मोगल सफेद बुरुज पार करून आत आले आणि त्यांनी काळ्या बुरुजावर मारा सुरू केला. मराठ्यांनी अपार शिकस्त करूनसुद्धा पाचही बुरुज मोगलांच्या हातांत पडले. लागलीच २ जून १६६५ला बुरजांसह पुरंदरांची माची मोगलांच्या हातांत पडली होती. मराठ्यांनी बालेकिल्ल्याकडे माघार घेतली. बालेकिल्ला अजूनही त्यांच्याच हातांत होता. मोगलांची संख्या अनेक पटींनी अधिक असूनही पावलापावलागणिक मराठ्यांनी त्यांच्याकडून जबर किंमत वसूल केली होती.

मिर्झाशी वाटाघाटीचा निर्णय

मिर्झाराजे बुऱ्हाणपूरला पोचल्यापासून राजांनी वाटाघाटीचा मार्ग मोकळा ठेवला होता. प्रथम शाईस्ताखान व त्यानंतर सिद्दी जोहर या दोघांचे हल्ले नाकाम केल्यावर आता मिर्झा मोठ्या सैन्यानिशी पोचल्याचे कळताच त्याच्याशी आपण फार दीर्घ सामना देऊ शकणार नाही, याची कल्पना राजांना आली होती. त्यामुळे एका बाजूला आपले आव्हान धगधगते ठेवून दुसऱ्या बाजूला मिर्झाशी तहाचे प्रयत्न करण्याचे धोरण अवलंबिण्याचा राजांनी निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी मिर्झाकडे वकील पाठवून प्रथम पाबळ मुक्कामी आणि नंतर पुण्यात असताना त्याला पत्रे पाठवली होती. परंतु मिर्झा मुत्सद्दी होता. वर्चस्वाच्या अधिष्ठानातूनच तो राजांशी बोलणी करू इच्छीत होता. त्यामुळे त्याने त्यांच्या आर्जवांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले.

मग राजांनी मिर्झाला आणखी एक सविस्तर पत्र आपला वकील कर्माजीच्या हस्ते पाठवले. त्यात त्यांनी लिहिले होते, 'मी बादशहाचा बंदा नोकर आहे. मी लहान असलो, तरी बादशहाचा पुष्कळ फायदा करू शकेन. कोकणाच्या ह्या डोंगराळ प्रदेशात लढण्याचा त्रास करण्यापेक्षा विजापूरचा मुलूख आपल्याला सहज जिंकता येईल.' यावर मिर्झाने उत्तर पाठवले, 'बादशाही फौज आकाशातील ताऱ्यांप्रमाणे असंख्य आहे. तुमचा पाडाव करण्यासाठी ती आली आहे. तुमचा डोंगराळ आणि खडकाळ प्रदेश तिला दुर्गम आहे, असे नाही. आमच्या अश्वांच्या पायांखाली कसल्याही अवघड प्रदेशाची धूळधाण होईल. तुम्हांला जर जीव वाचवावयाचा असेल, तर बादशहाची गुलामगिरी धारण करून शरण या. अशी गुलामगिरी करणे हे आमच्यासारख्या सरदारांनाही भूषण वाटते. आता तुम्ही आपल्या किल्ल्यांची व डोंगरांची आशा

सोडा. असे न कराल, तर आपल्या हाताने तुम्ही आपली खराबी करून घ्याल.'४३

यानंतरही राजांनी मिर्झाशी संपर्क चालू ठेवला. त्यांनी बादशहास एक-दोन किल्ले स्वाधीन करून खंडणी देण्याची तयारी दाखवली. परंतु मिर्झा त्यांना टोलवतच राहिला. त्यानंतर मिर्झाने दोन्ही बाजूंनी मराठ्यांवर दडपण आणले. एका बाजूस त्यांनी संपूर्ण स्वराज्याच्या प्रदेशाची कोंडी करून मुलूख बेचिराख करण्याचे तंत्र अवलंबिले आणि दुसऱ्या बाजूस पुरंदरवर हल्ला चढवला. वज्रगड त्याच्या ताब्यात गेला, पुरंदर किल्ल्याची माची त्याच्या हातात गेली आणि बालेकिल्ला काबीज करण्याची तयारी दिलेरखानाने सुरू केली. राजांसमोर दोनच पर्याय उरले. पहिला, बादशहास शरण जाऊन आपल्या जीविताचे व वित्ताचे रक्षण करणे आणि दुसरा, तळकोकणाचा विजापुरी प्रदेश आदिलशहास परत देऊन त्याच्या साहाय्याने मोगलांशी सामना करणे.

मिर्झाराजे आपल्याशी लपंडाव खेळतो आहे, हे जाणून शिवाजीराजांनी दुसरा विकल्प अवलंबिण्याचे ठरवले. या संदर्भात औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रात मिर्झाने लिहिले, 'इकडे गुप्त हेरांकडून मला अशी खातरीलायक बातमी कळली की, आदिलशहा बाह्यत: आमच्याशी गोडी दाखवून, आतून संगनमत करून, त्याच्या मदतीस कोकणात फौज पाठवीत आहे. आता शिवाजी आणि आदिलशहा या दोघांशी सामना करणे जरी बादशाही फौजेस अशक्य नाही, तरी युक्तीने कार्य साधल्यास विलंब का करावा, असे मनात आणून शिवाजीला विजापूरकडे जाऊ देणे मला बरे वाटले नाही.'४४ मिर्झाने आपला जासूद पत्र देऊन राजांकडे पाठवला. त्यात त्याने लिहिले होते, 'तुम्ही शिसोदे राजपूत. आम्ही तुम्ही एकच आहोत. तुम्ही भेटीस येणे. तुमचे सर्व प्रकारे बरे करू.'४५

शिवाजीराजांनी रघुनाथपंतांना मिर्झाकडे आपण शरण येण्यास तयार असल्याचा निरोप घेऊन पाठवले. पंत मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मिर्झाच्या छावणीत पोचले. त्यांनी जयसिंहाची भेट घेऊन राजांचा निरोप त्याला कळवला. मिर्झा एक कसलेला मुत्सद्दी होता. तो म्हणाला, 'बादशहाने मला सिवाशी बोलणी करण्यासाठी परवानगी दिलेली नाही. त्यामुळे माझ्या जबाबदारीवर मी काहीच बोलणी करू शकत नाही. मात्र सिवा नि:शस्त्र होऊन अपराधी म्हणून क्षमायाचना करण्यासाठी आला, तर परमेश्वराचे छायास्वरूप असलेल्या रहमदिल बादशहाच्या कृपासागराचा ओघ सिवाकडे वळू शकेल.'४६ त्यावर राजांनी प्रथम आपल्याऐवजी शंभूराजांना पाठवण्याची तयारी दाखवली, परंतु त्यालाही मिर्झाने नकार दिला.

शेवटी सर्वच पर्याय संपल्यावर राजांनी स्वत: भेटीसाठी येण्याची तयारी दाखवली. ९ जून १६६५ रोजी सुरक्षिततेची हमी मागण्यासाठी जयसिंहाच्या डेऱ्यात रघुनाथपंत पोचले. ते आल्यावर वस्त्रालंकारांची देवाणघेवाण झाली. जयसिंहाने वचन दिले, 'माझ्या छावणीत आल्यावर सिवा बादशाही हुकमाचे पालन करण्यास तयार असेल, तर त्याचे अपराध माफ केले जातील व त्याचेवर वृपा केली जाईल. जर हे त्याला मान्य झाले नाही, तर इथून सुखरूपपणे तो परत आपल्या घरी जाऊ शकेल. दिल्लीचा पातशहा बहुत जोरावर. यासी शत्रुत्व लावलियाने शेवट लागणार नाही. राजियांनी आपल्या भेटीस यावे. जैसा रामसिंग, तैसे तुम्ही आपले आहा. आपण तुमचे वाईट करणार नाही.'४७

दिलेरखानाला मात्र जयसिंहाची राजांशी चाललेली समेटाची बोलणी मुळीच पसंत नव्हती. पुरंदर जिंकण्याची संधी आपल्या हातातून त्याला घालवायची नव्हती. त्याने राजांना एक खवचट पत्र पाठवले, ‘महालदाराबरोबर तुमचे पत्र आले ते पावले. मजकूर कळला. तह करण्याची तुमची इच्छाही कळून आली. लढण्याच्या पूर्वीच तुम्ही तहाचे बोलणे करता, हे आश्चर्य आहे. अशा बोलण्याकडे लक्ष देणे हे आमच्यासारख्या बादशाही अधिकाऱ्यास शोभत नाही. तुमच्या या डोंगराळ प्रदेशात शिकार व नाच करण्यासाठी आम्ही हिंदुस्तानातून इतके दूर आलो नाही. आमची एव्हढीच इच्छा आहे की, तुम्ही एकदा येऊन आमच्याशी सामना करावा. आम्ही पाहुणे तुमच्या मुलखात आलो असता पुढे येऊन आमचा समाचार घेण्याऐवजी तुम्ही दूर राहता, हे योग्य नाही. तुमचे ते मजबूद किल्ले, गगनचुंबित पर्वत आणि पाताळास पोचविणारी खोरी प्रत्यक्ष पाहण्याची आमची इच्छा असता, तुम्ही तर कोठे दिसत नाही आणि वर तहाचे बोलणे करिता! हा विचार तुम्ही प्रथमच केला असता, तर बरे झाले असते. आता तरी विचार सुचला हे चांगले झाले.’४८

दिलेरखानासारख्या य:कश्चित मोगल सरदाराने राजांचा असा उपमर्द करावा, ही संतापदायक बाब होती. अफझलखान आणि शाईस्ताखान यांच्यासारख्या बलदंड सेनापतींना प्रत्यक्ष सामोरे जाऊन त्याचा नायनाट करण्याचे बाहुबळ आणि जिद्द असलेल्या या नरोत्तमाला दिलेरखानासारख्या बादशहाच्या तुकड्यांवर जगणाऱ्या सरदाराने हिणवावे, हा केवळ दैवदुर्विलासच, आणखी काय?

मुरारबाजीचे हौतात्म्य

दुसऱ्याच दिवशी शिवाजीराजांनी निरोप पाठवला की, ते ११ जूनला जयसिंहाला भेटायला येत आहेत. पुरंदरावर त्यानंतर कोणाचाही जीव गमावू नये, अशी त्यांची इच्छा असावी. अखेरीस हा जिद्दी योद्धा शरण येत आहे म्हणून मिळालेला प्रचंड दिलासा आणि त्याला जवळून पाहण्यासाठी सर्वांचीच शिगेस पोचलेली आतुरता या दोहोंची जयसिंहाच्या छावणीत एकच लाट पसरली.

परंतु जयसिंहासारखा मुरब्बी सेनापती काहीही ग्राह्य धरावयास राजी नव्हता. राजे आपल्या छावणीत आल्यावर त्यांच्या मनोबलावर कोणता शेवटचा घाव घालावा की ज्यामुळे शरण येण्याचा त्यांचा निर्णय अपरिहार्य व्हावा, याचा विचार करताना त्याला मार्ग सुचला. पुरंदरावर शेवटचा आणि अटीतटीचा हल्ला चढवण्यासाठी हीच सुवर्णवेळ असल्याची त्याला प्रकर्षाने जाणीव झाली. आपल्या तंबूतून ती हमरातुमरीची लढाई सिवाने पाहिली, तर तातडीने निर्णय घेणे त्याला भाग पडेल, असे मिर्झाचे अनुमान होते. त्याने विचार पक्का केला आणि दुपारीच दिलेरखानाकडे माचीवर निरोप पाठवला, ‘उद्या सूर्योदय होताच तुम्ही आपले मोर्चे पुढे सरकवा व इशारा मिळताच बालेकिल्ल्यावर निर्वाणीचा हल्ला चढवा.’४९

लागलीच माचीवर दिलेरखानाच्या सैन्याची जमवाजमव आणि हालचाल चालू झाली. मुरारबाजीला याची चाहूल लागली. कड्याच्या टोकाला त्याने येऊन पाहिल्यावर त्याची खातरी झाली की, दिलेरखान बालेकिल्ल्यावर हल्ल्याची तयारी करतो आहे. त्याने आपल्या सैन्याला

गोळा केले. पहाऱ्याचे मोर्चे सोडून बाकी सर्वांनी सकाळी मोगलांवर चालून जाण्याचे आदेश त्याने दिले. माचीवर मोगलांची पाच-सहा हजार पठाणांची शिबंदी होती. मुरारबाजीने फक्त पाच-सहाशे मराठ्यांनिशी त्यांच्यावर हल्ला चढवण्याचा निर्णय घेतला. दिलेरखान सकाळी कोणतीही हालचाल करायच्या आधीच त्याच्यावर तो करारी घाला घालणार होता. रात्रभर बालेकिल्ल्यावर जाग होती. हल्ल्याचे शेवटचे आदेश दिले जात होते. शिवाजीराजे दुसऱ्या दिवशी मिर्झाच्या छावणीत जाणार आहेत, याची बातमी मुरारबाजीला होती का नाही, याबद्दल बखरींमध्ये निश्चित नोंद सापडत नाही.

११ जूनचा सूर्योदयापूर्वी मुरारबाजीने आपल्या तुकड्या पुढे हलवायला आरंभ केला. दिलेरखान मिर्झाकडून बालेकिल्ल्यावर धावा बोलण्यासाठी अंतिम आदेशाची वाट पाहत होता. तोफांचा मारा करण्याचा आरंभ करण्याच्या तो तयारीतच होता. अचानक दिल्ली दरवाजा उघडला आणि त्यातून पाच-सहाशे मराठ्यांचा लोंढा वेगाने धावत येऊन दिलेरखानाच्या सैन्यावर विजेसारखा कोसळला. दिलेरखानाने याची स्वप्नातही कल्पना केली नव्हती. मराठे मोगलांवर तुटून पडले होते आणि त्वेषाने लढत होते. त्यांनी तीन-चारशे पठाणांना काही क्षणांतच कापले. सर्व मोगल सैन्य आपल्यावर ही धाड एकाएकी कोठून पडली, याने हतबुद्ध झाले होते. दिलेरखानाने काही अंतरावर एका योद्ध्याला जोरजोराने बाकीच्या मावळ्यांना हुकूम देताना आणि त्यांच्यात त्वेष निर्माण करण्यासाठी हाकारे देताना पहिले. हाच मुरारबाजी असावा, याची त्याला तत्काळ खातरी पटली. त्याचा अभिनिवेश आणि चैतन्य पाहून तो थक्क झाला.

त्याच्याबरोबर तीस-चाळीस मावळ्यांची तुकडी होती. तिला चार-पाचशे पठाणांनी घेरले होते. इतक्यात मुरारबाजीची ढाल कोणीतरी उडवली. मुरारबाजीने आपला शेला हाताला गुंडाळला. त्याच्यावरही घाव पडत होते. एव्हाना तो दिलेरखानापाशी येऊन पोचला होता. त्याच्याशी तलवारीने दोन हात करणे म्हणजे मृत्यूलाच निमंत्रण देण्यासारखे आहे, हे दिलेरखानाने लागलीच जाणले असावे. त्याने मुरारबाजीवर बाणांचा वर्षाव चालू केला. काही क्षणांतच मुरारबाजी धारातीर्थी पडला. मराठ्यांनी आपला सरदार पडला आहे, हे पाहून त्याचे शव उचलले आणि बालेकिल्ल्यात जाऊन तिथून आपला संग्राम जारी ठेवला. दिलेरखान मुरारबाजीचा पराक्रम पाहून दिङ्मूढ झाला होता. 'कैसा सिपाही खुदा ने पैदा किया', तो मनाशी म्हणाला असावा.

दिलेरखानाची फौज पुन्हा सरदरवाजावर तुटून पडली. मराठे जिवाच्या कराराने तो लढवत होते. परंतु थोड्याच वेळात तोही शत्रूच्या हातात पडला. आता त्यांनी बिनीच्या दरवाज्यावर शत्रूला थांबवून धरले. दिलेरखानाला शिवाजीराजे जयसिंहाच्या तंबूत पोचण्याआधी पुरंदर सर करावयाचा होता, परंतु मराठ्यांनी मोगलांना तटवून धरले होते.

शिवाजीराजांचे आगमन

सुमारे दहाच्या सुमारास रघुनाथपंत मिर्झाच्या छावणीत दाखल झाले. राजे आपल्या शर्तीनुसार आपल्याला भेटायला आल्याचा निरोप त्यांनी मिर्झाला पाठवला. त्यांच्याबरोबर फक्त सहा

ब्राह्मण मुत्सद्दी आणि पालखीचे भोई असल्याचे त्याने सांगितले. पालखी मिर्झाच्या डेऱ्यापासून काही अंतरावरच उभी होती. मिर्झा राजांची आतुरतेने वाट पाहत होता. रघुनाथपंतांचा निरोप मिळाल्याबरोबर लागलीच उदयराज मुन्शी आणि अग्रसेन कच्छवाह राजांना सामोरे गेले. त्यावेळीसुद्धा मिर्झाचा निरोप उदयराजने राजांना दिला, 'जर सर्व किल्ले आमच्या ताब्यात देण्याची तयारी असेल, तरच त्यांनी पुढे यावे. अन्यथा ते तेथूनच परत जाऊ शकतात.'५० राजांनी किल्ले देण्याची तयारी दर्शवली.

मिर्झाने अफझलखानाच्या प्रसंगाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व काळजी घेतली होती. त्यांनी आपला लष्कराचा बक्षी (प्रमुख) जनी बेग याला राजांना आत आणण्यासाठी पाठवले. पालखीतून उतरून राजे मिर्झाच्या डेऱ्यात दाखल झाले. जयसिंह उठून उभारला, दोघांनी रिवाजानुसार एकमेकांना आलिंगन दिले. मिर्झाराजांनी त्यांना आपल्याजवळ बसवले. दोघांचेही तोंड पुरंदराकडे होते. मिर्झाने हे हेतुपूर्वक साधले होते. त्याच वेळी दिलेरखान बिनीच्या दरवाज्यावर तोफखान्याचा तुफान मारा करत होता. मिर्झाने राजांचे लक्ष ते आल्याबरोबर तिकडे वेधले. एकच रणकंदन माजल्याचे ते पाहत होते. राजे कधी नव्हे ते भारावून गेले.

त्यांनी मिर्झाला गडावरची लढाई ताबडतोब थांबवण्याची विनंती केली. पुरंदर मिर्झाच्या हवाली लागलीच करण्याची त्यांनी तयारी दाखवली. मिर्झा याचीच अपेक्षा करीत होता. तो राजांना म्हणाला, 'पुरंदर तर आमच्या जिगरबाज सैनिकांनी जिंकलाच आहे. थोड्याच वेळात उरलेले मराठा सैनिक ते कापून काढतील. तुम्हांला बादशाहाला नजराणा द्यायचा असेल, तर त्यासाठी तुमच्याकडे अनेक किल्ले आहेत.'५१ शिवाजीराजांनी त्यातला मथितार्थ जाणला. त्याबद्दल त्याआधीच आपली संमती दर्शवल्याची मिर्झाला आठवण करून देऊन पुरंदरावरील लढाई ताबडतोब थांबवण्याची राजांनी पुन्हा विनंती केली. त्यावर मात्र मिर्झाने राजांना होकार भरला आणि दिलेरखानाला लढाई थांबवण्यास सांगण्यासाठी गाझी बेगला धाडले.

गाझी बेगबरोबर राजांनी आपलाही माणूस धाडला आणि गडकऱ्याला किल्ला मोगलांच्या हातांत सुपूर्द करून उरलेल्या लोकांसहित किल्ल्याखाली यावयाचा आदेश पाठवला. त्यानुसार गडकऱ्याने सय्यीद मुहम्मद जवाद याला गड हवाली केला आणि सर्व मराठे जड मनाने किल्ला उतरून खाली आले. पुरंदर काबीज करण्याचा आसुरी आनंद मात्र दिलेरखानाला लाभला नाही. त्याने शिवाजीराजांना लिहिलेल्या पत्रात ती वल्गना केली होती. त्याला पुरंदरावर बालेकिल्ल्यात जिद्दीने लढणाऱ्या मराठ्यांची 'सुलतान ढवा'करवी कत्तल करायची होती आणि राजांसमोर ती शेखी मिरवायची होती. ती संधी त्याच्याकडून हिरावून घेतली गेल्यामुळे तो जयसिंहावरही कमालीचा नाराज झाला.

मुराराबाजीचे हौतात्म्य आणि पुरंदरचा किल्ल्याच्या पाडावाच्या तारखेबद्दल थोडी अस्पष्टता आहे. सुप्रसिद्ध इतिहासकार गो. स. सरदेसाई यांच्यानुसार दिलेरखान ३० मार्चला पुरंदरच्या पायथ्याशी येऊन पोचल्यावर लागलीच एप्रिलमध्ये मुरारबाजीने गडावरून अचानक खाली येऊन आपणहून धाडसी हल्ला चढवला आणि त्यात त्याला हौतात्म्य प्राप्त झाले. त्यानंतर वज्रगड १४ एप्रिलला पडला. मुरारबाजीचे मरण आणि त्याच्याबरोबर तीनशे मावळे पडल्याचे वृत्त हा राजांच्या जयसिंहाशी तह करण्याच्या निर्णयातील एक घटक होता; परंतु सर जदुनाथ

सरकार यांच्या 'हाऊस ऑफ शिवाजी' या ग्रंथात दिलेल्या अनेक संदर्भांनुसार महाराज ११ जूनला मिर्झाच्या डेऱ्यात पोचण्याच्या काही तासच आधी मुरारबाजी ठार झाला. सरकारांचे मत अधिक तर्कनिष्ठ वाटते.

पुरंदरचा तह

राजांची राहण्याची व्यवस्था आपल्या डेऱ्यात करण्याचे आदेश मिर्झाने दिले होते आणि आपल्या तंबूला लागूनच त्यांना स्वतंत्र तंबू दिला होता. त्यावरून दोघांच्यात किती आत्मीयता आणि विश्वास निर्माण झाला होता, याची कल्पना येते. शिवाजीराजांचे रुबाबदार व धीरगंभीर व्यक्तिमत्त्व आणि अदबशीर वागणूक याची सगळ्यांवर लागलीच छाप पडत असे आणि राजांबद्दल आदर उत्पन्न होई. मिर्झा त्याला अपवाद नव्हता.

भोजनोत्तर वाटाघाटी चालू झाल्या. मिर्झाच्या वतीने सूरतसिंह कछवाह आणि उदयराज मुन्शी चर्चा करत होते. राजांनीही चर्चेसाठी सहा मुत्सद्दी बरोबर आणले होते. आरंभी जयसिंहाला राजांचे सर्व गड पाहिजे होते. परंतु दोन्ही बाजूंनी तडजोड करून ठरवले की, चार लक्ष होन महसुलाचे २३ किल्ले राजांनी मोगलांना सुपूर्द करावेत आणि एक लक्ष होन महसुलाचे १२ किल्ले आपल्याकडे ठेवावेत. राजांनी त्यांच्याकडे असलेल्या विजापूर तळकोकणातील चार लक्ष होन वसुलीच्या मुलखाशिवाय नऊ लक्ष होन वसुलाचे आणखी बालाघाटी महाल त्यांना मिळावेत, अशी मागणी केली. विजापूरवर जेव्हा शाही आक्रमण होईल, तेव्हा ते आपल्याला दिले जातील, असे फर्मान तरी करावे, असे त्यांनी सुचवले. जर हे स्वीकारण्यात आले, तर बादशहाला दरवर्षी तीन लक्ष होन असे ४० लक्ष होन देण्याची त्यांनी तयारी दाखवली. यालाही संमती मिळाली.

दुसऱ्या दिवशी १२ जूनला जयसिंहाने मागणी केल्यामुळे राजांनी रोहिडा, लोहगड, विसापूरगड, तुंग आणि तिकोना या किल्ल्यांचा ताबा देण्यासाठी माणसे रवाना केली. पुढील दोन दिवसांच्या वास्तव्यादरम्यान राजांची इटालियन तरुण प्रवासी मनुची याच्याशी भेट झाली. त्याला जयसिंहाने आपल्याबरोबर मोहिमेसाठी आणले होते. मनुचीला फारसी आणि हिंदुस्तानी भाषा चांगल्या अवगत होत्या. राजेही त्या दोन्ही भाषांत पारंगत असल्यामुळे दोघांची वेगवेगळ्या विषयांवर स्वारस्यपूर्ण चर्चा झाली. दोघेही एकमेकांच्या ज्ञानामुळे प्रभावित झाले.

राजांनी दिलेरखानास पुरंदरच्या माचीवर जाऊन भेटावे, असे मिर्झाने सुचवले. राजांनी त्याला आनंदाने मान्यता दिली. राजांबद्दल दिलेरच्या मनातील राग मिर्झाला दूर करायचा होता. तो जर राजांना भेटला, तर त्यांच्याबद्दलच्या खानाच्या चुकीच्या कल्पना दूर होतील आणि मराठ्यांशी तहाला त्याचा विरोध मावळेल, याबद्दल मिर्झाला खातरी होती. अगदी तसेच झाले. सुरुवातीला खान जरी साशंकपणे वागला, तरी मोकळी बातचीत झाल्यावर त्याचा राग निवळला. त्याने राजांना दोन घोडे, समशेर वगैरे भेट दिले. त्यांतील एक घोडा सोन्याचा साज चढवलेला होता. त्यानंतर दिलेरखान म्हणाला, 'तुम्ही मिळोन मिर्झा राजियांजवळ जाणे. ते वडील आहेत, ते करतील त्यात आपण आहो.'५२

दिलेरखानाचा विरोध नाहीसा झाल्यावर त्याच दिवशी, मंगळवार १३ जून रोजी तहाच्या खालील पाच कलमी मसुद्याला दोघांनी संमती दिली. ती कलमे होती

राजांकडे लहान-मोठे १२ किल्ले, त्याच्या एक लाख होन वसुलासह शाही कृपेचे प्रतीक म्हणून ठेवण्यात ठेवण्यात येतील. यापुढे राजांनी औरंगजेबाविरुद्ध बंडखोरी करू नये वा मोगली मुलूख लुटू नये.

दख्खनच्या सुभ्यात कुठलीही शाही कामगिरी राजांवर सोपवल्यास ती त्यांनी पूर्ण करावी.

शिवाजीपुत्र संभाजीला मोगलांची पंचहजारी मनसबदारी बहाल करण्यात येईल. त्यांच्या वतीने नेतोजी पालकरास सदैव दख्खनच्या सुभेदाराच्या तैनातीत राहावे लागेल.

विजापुरी तळकोकणातील चार लक्ष होनांचा मुलूख व पाच लक्ष होनांचा विजापुरी बालाघाटी मुलूख राजांना बहाल करून तसे फर्मान मोगल बादशहाने द्यावे. असे फर्मान मिळाल्यास राजांनी मोबदल्यात ४० लक्ष होन खंडणी, सालिना तीन लक्ष होनांच्या हप्त्याने बादशाहाला द्यावी.

तळ कोकण व बालाघाटीतील निजामशाहीचे २३ किल्ले व त्याखालील चार लक्ष होन वसुलीचा मुलूख शिवाजीराजांकडून घेऊन मोगल साम्राज्याला जोडण्यात यावा. ५३

या तहाला अद्यापि बादशहाकडून मान्यता मिळायची होती, परंतु जयसिंह त्याची अंमलबजावणी थांबवू इच्छीत नव्हता. औरंगजेब त्याविरुद्ध जाणार नाही, याची त्याला खातरी होती. १४ जूनला निघून राजे कोंडाण्याला पोचले. त्यांनी तो गड कीरतसिंहाच्या हवाली केला. नवा गडकरी शहीदखानाने किल्ल्याचा ताबा घेतला. सर्व कुटुंबीयांसह राजे १५ जूनला राजगडला पोचले. १७ जूनला शंभूराजे उग्रसेनाबरोबर निघून १८ जूनला मिर्झाच्या छावणीत पोचले. त्यावेळी ते आठ वर्षांचे होते. काही दिवसांतच तहानुसार सर्व किल्ले हातांत आल्यावर मिर्झाने शंभूराजांना राजगडला इतमामाने परत पाठवले. औरंगजेबाने या विजयाबद्दल मिर्झाला सप्तहजारी व दिलेरखानास पंचहजारी दिली आणि इतर सरदारांचाही यथोचित सत्कार केला.

राजांनी मोगलांना दिलेले २३ गड होते : पुरंदर, तुंग, रोहिडा, तिकोना, विसापूर, लोहगड, नळदुर्ग, रुद्रमाळ, खईगड, मार्गगड, माहुली, भंडारदुर्ग, तुळशीखोल, कोहाज, वसंतगड, राजमाची, नंगगड, कर्नाळा, खेडदुर्ग, सोनगड, माणगड, सिंहगड आणि खंदकडा. तहानुसार राजांकडे १२ गड राहिले होते :

राजगड, तोरणा, रायगड, लिंगाणा, महाडगड, पाळी, घोसाळा, अशेरी, पालगड, भोरप, कुंवारीगड, उदयदुर्ग. (नकाशा क्र. २१ पाहा.)

राजांनी दिलेल्या किल्ल्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पुरेशी फौज जयसिंहाकडे नव्हती. त्यामुळे सिंहगड, पुरंदर व लोहगड या प्रमुख किल्ल्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याने आवश्याक पावले उचलली. उरलेल्यांपैकी काहींवर मोजके लोक ठेवले, तर काही अंशत: उद्ध्वस्त वा जाण्यासाठी दुर्लभ करून टाकले.

मोगलांशी झालेल्या राजांच्या तहाची कुणकुण आदिलशहाला लागली. त्याने पावसाळ्यात तळकोकणावर हल्ला करायचे ठरवले. वझीर खवासखानाचा भाऊ इखलासखान तळकोकणावर चालून गेला. राजांना हे कळताच राजगडावरून शिबंदीसह ते तळकोकणात पोचले. परंतु इखलासखानाने त्यांच्या सैन्याला मागे रेटत राजापूर, वेंगुर्ले, दाभोळ, कुडाळ हा भाग जिंकून घेतला. काही काळाने त्यांनी राजापूर परत घेतले, परंतु त्यांना तेवढ्यावरच

समाधान मानावे लागले.

विजापूरवर मोहीम


निघतानाच मिर्झा जयसिंहाला औरंगजेबाने दोन जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या; पहिली, शिवाजीराजांच्या वाढत्या बळाला आटोक्यात आणायचे आणि दुसरे, विजापूरला नेस्तनाबूत करायचे. पहिले उद्दिष्ट जयसिंहाने यशस्वीरीत्या साध्य केले होते. आता मोगल साम्राज्यात आदिलशाही समाविष्ट करून घेण्याचे दुसरे उद्दिष्ट पुरे करण्यासाठी त्याने आपला होरा विजापुराकडे वळवायचे ठरवले. पुरंदर तहावर शिक्कामोर्तब होईपावेतो पावसाळा उंबरठ्यापर्यंत येऊन ठेपला होता. पुढील दोन महिने त्याने मोहिमेच्या आखणीत आणि तयारीत घालवले. सप्टेंबरमध्ये दिल्लीहून तह मंजूर होऊन आला. त्याने राजांना पुरंदरावर बोलावले. बादशहाकडून आलेल्या फरमानाचे स्वागत करण्यासाठी ३० सप्टेंबर १६६५रोजी कीरतसिंह आणि शिवाजीराजे सहा मैल पायी गेले आणि शाही शिक्का व पंजाचे फरमान असलेल्या त्या दस्तऐवजाला त्यांनी वंदन केले.५४ स्वाभिमानी शिवाजीराजांसाठी केवढा हा दैवदुर्विलास? आणि औरंगजेबी फरमानाचे स्वागत कसे करायचे, हे राजांना मिर्झाकडून शिकावे लागले!

विजापूरवर स्वारी करण्यासाठी काहीतरी निमित्त पुढे करणे आवश्याक होते. ‘ऑगस्ट १६५७च्या तहानुसार आदिलशहाने बादशहाला एक कोट रुपयांची खंडणी, परिंडा किल्ला आणि निजामशाही कोकण देण्याचे कबूल केले होते, ते त्याने पुरे केले नाही.’ हे आणि इतर काही असेच मामले मोहिमेचे कारण बनले. २० नोव्हेंबरला मोहिमेचा आरंभ होणार होता. १९ नोव्हेंबरला शंभूराजांच्या वतीने १५०० घोडदळ आणि सरनोबत नेतोजी पालकरच्या हाताखाली ७०००चे पायदळ घेऊन खासे राजे मिर्झाच्या छावणीत दाखल झाले. शिवाजीराजे स्वत: आल्याने जयसिंहाला विशेष आनंद झाला. तहाची अंमलबजावणी ते गांभीर्याने करू इच्छितात, हे मिर्झा बादशहाला दाखवू शकणार होता. किंबहुना मिर्झाच्या विजयाचे ते प्रतीक ठरणार होते. त्या दोघांमधील ही वाढती मैत्री दिलेरखानाच्या पथ्यावर पडणारी नव्हती. तो राजांच्या उद्देशाबद्दल सदैव साशंक होता.

नकाशा क्र. २१

पुरंदरचा तह

१३ जून १६६५



मिर्झाबरोबर सुमारे ४०,०००चे सैन्य होते. दाऊदखान आणि राजा रायसिंह सिसोदिया त्याचबरोबर होते. दिलेरखान आपल्या ७५०० कडव्या पठाणांबरोबर आघाडी सांभाळत होता. फलटणजवळ आल्यावर मिर्झाने शिवाजीराजांना त्यापुढील काही लक्ष्ये काबीज करण्याचा आदेश दिला. त्यानुसार ७ डिसेंबर १६६५ला नेतोजीने फलटण घेतले आणि दुसऱ्याच दिवशी ताथवड्याचा किल्ला काबीज केला. १६ डिसेंबरला त्याने खटाव घेतले आणि दोन दिवसांतच मंगळवेढ्याचा किल्ला सर केला. त्यावेळी विजापूरचे सेनापती सर्जाखान आणि खवासखान त्यांच्यावर चालून आले. त्यांच्याबरोबर मुधोळकर मालोजी घोरपडे आणि राजांचे धाकटे बंधू एकोजी भोसले आपापली पथके घेऊन सामील झाले होते. या लढाईत शिवाजीराजे आणि एकोजीराजे एकमेकांसमोर उभे ठाकले. दिलेरखान आणि नेतोजी पालकर यांनी चालून आलेल्या विजापूर फौजांवर करारी हल्ला चढवला आणि त्यांना पळवून लावले.

जयसिंहाने लागलीच औरंगजेबाला एक पत्र लिहून शिवाजीराजांचे या पराक्रमाबद्दल अभिनंदन करावे, अशी शिफारस केली. हा निरोप बादशहापर्यंत पोचताच त्याने १५ डिसेंबरलाच शिवाजीराजांना पत्र पाठवले, ते त्यांना महिनाअखेरीस मिळाले. औरंगजेबाने त्यात लिहिले होते, ‘तुम्ही फौजेसुद्धा बादशाही लष्करात आहात आणि ताथवडा, फलटण हे किल्ले विजापुरांकडील होते, ते घेऊन त्यांची फौज तळ कोकण प्रांती होती तिथे रात्री पोहोचवली, म्हणोन राजे जैसिंह यांनी लिहिल्यावरून तुमचे शाबासकीस कारण झाले. सबब तुम्हांकरिता उत्तम पोशाख व जडावाची कट्यार पाठविली आहे. या लाभाचा संतोष मानून इत:पर या स्वारीत जितके कोशीस कराल, तितके पहिल्यापेक्षा अधिक लोभास कारण होईल.’५५

डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात मोगल आणि आदिलशाही फौजा विजापूरच्या बाहेर एकमेकांसमोर आल्या. आदिलशहाने तटबंदीवर आपल्या सर्वपरिचित अजस्र तोफा - मुल्कमैदान, दुराठी, लांडाकसब, गंज खाना, कडक बिजली वगैरे - तयारीत ठेवल्या होत्या. त्याने मुहम्मद इखलासखान, अब्दुल मुहम्मद, शर्झाखान, व्यंकोजी भोसले, घाटगे, बांदल वगैरे सरदारही आपापल्या सैन्यांसह तैनात केले होते. आदिलशहाचे सैन्य आपल्या समोर येणार नाही आणि आपली फौज पाहिल्यावर माघार घेईल, असा जयसिंहाचा अजमास होता, परंतु तो चुकीचा ठरला. २९ डिसेंबर १६६५ ला मोगल सैन्य विजापूरपासून दहा मैलांवर येऊन पोचले. त्यांनी हल्ल्याची तयारी केली आणि ५ जानेवारी १६६६ला मिर्झाने विजापूरवर अंतिम हल्ल्याचा आदेश दिला. आतापर्यंत यशस्वी होत आलेले राजांचे सैन्य सर्वांत आघाडीला होते.

विजापूरचा सेनापती शर्झाखानाने राजांना कडी टक्कर दिली. तो मागे हटला नाही. त्यांचा पहिला रेटा मंदावल्यावर शर्झाखानने मराठा सैन्यावर प्रतिहल्ला हढवला. हातघाईची लढाई झाली. मराठ्यांना मोगलांकडून काहीच साहाय्य मिळाले नाही. आदिलशाही फौजेच्या वाढत्या जोरापुढे मराठे टिकू शकले नाहीत. त्यांची आघाडीची फळी भंग झाली. शत्रूने घेरल्यानंतर माघारीशिवाय राजांना कोणताच पर्याय उरला नाही. सैन्यात एकच भगदड माजली. मोगलांच्या इतर दस्त्र्यांचीही तीच स्थिती झाली. मिर्झाच्या प्रचंड फौजेचा दारुण पराभव झाला. दिलेरखान आणि शर्झाखान दोघेही पठाण. दिलेरने त्याच्या शत्रुसेनापतीला मदत केली का, हे

सांगता येत नाही, परंतु मिर्झाच्या राजांशी गेल्या काही दिवसांच्या सलगीचे त्याला अखेरीस उचित फळ मिळाल्याच्या कल्पनेने तो स्वत:शीच खूष झाला. एवढ्यावरच तो थांबला नाही, तर शिवाजीराजांना ठार मारावे, असे मिर्झाला सुचवण्यापर्यंत त्याची मजल गेली.५६ मिर्झाने तसा विचार करण्यासही साफ नकार दिला आणि दिलेरखानाची त्याबद्दल कडक कानउघाडणी केली.

आपले सैन्य पुन्हा एकत्रित करून राजे मिर्झाकडे आले. दिलेरखान आपल्या जिवावर उठला आहे, याची कल्पना राजांना आली. त्याच्यापासून दूर जाण्यासाठी आणि आपली गेलेली अब्रू काही अंशी परत मिळवण्यासाठी त्यांनी मिर्झाला सुचवले, 'पन्हाळ्याची मला बित्तंबातमी आहे. मला तिकडे पाठविल्यास शिबंदी गैरसावध असताना पन्हाळ्यावर हल्ला करून मी तो मोगलांना मिळवून देईन.'५७ मिर्झाला तो प्रस्ताव सोयीचा वाटला. त्यामुळे निदान दिलेरखानाच्या कचाट्यातून राजांना लागलीच सोडवणे शक्य होणार होते. त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी मिर्झावर होती.

११ जानेवारी १६६६ला राजे आणि नेतोजी या दोघांनी मिर्झाची शाही छावणी सोडली. वाटेत नेतोजीला आदिलशाही मुलूख लुटण्याची कामगिरी पार पाडायची होती. १६ जानेवारीला राजे पन्हाळ्यास येऊन थडकले. नेतोजीचा पत्ता नव्हता. पहाटे तीन वाजता तिथे पोचताच राजांनी पन्हाळ्यावर हल्ला चढवला. परंतु त्यांचे अनुमान चुकीचे ठरले. शत्रू पूर्णपणे सावध होता. त्यांनी राजांचा हल्ला सफाईने परतवला आणि त्यांना माघार घ्यावी लागली. ते तडक विशाळगडावर पोचले. राजांच्या लष्करी कारकिर्दीतील एका अत्यंत कटू पर्वाचा अंत झाला होता. पण त्याचा कडवटपणा आणखी एका अविश्वसनीय बातमीमुळे आणखीनच वाढला. सरनौबत नेतोजी पालकर राजांपासून वेगळा होऊन आदिलशहाला मिळाला होता. विजापूरकरांनी त्याला चार लाख होनांची लालूच दाखवून आपल्या नोकरीत सामील केले होते. त्याने लागलीच मोगलांच्या फौजेला गनिमी काव्याचा प्रसाद देण्यास आरंभ केला.

औरंगजेबाच्या सान्निध्यात राहून अशा मामल्यात तरबेज झालेल्या जयसिंहाला यावर इलाज ठाऊक होता. त्याने नेतोजीशी तत्परतेने संपर्क साधला आणि मोगल सैन्यात सामील होण्याचे आमंत्रण धाडले. नेतोजीची नियती रसातळाला पोचली होती. त्याने संमती दर्शवली. मग जयसिंहाने बादशहाकडून फर्मान आणवून नेतोजीला ३८ हजार होन बक्षीस, पंचहजारी मनसब आणि खर्चासाठी जहागीर दिली. नेतोजी आता मोगल सरदार झाला होता. त्याने मुस्लीम धर्म स्वीकारणेच बाकी होते. तेही अध:पतन काही काळातच घडले. त्याच्यामागील कारणाबाबतीत वेगवेगळे खुलासे सापडतात; 'पन्हाळ्यावर वेळीच न पोचल्यामुळे राजांनी त्याची निर्भर्त्सना करून त्याची सरनोबती काढून घेतली', यापासून 'राजांनी मिर्झाची छावणी सोडल्यावर त्यांच्या मागे न जाता नेतोजी तडक आदिलशाहीला जाऊन मिळाला,' इथपर्यंत. याची चिरफाड करण्याचे कारण नाही. राजे आणि नेतोजी ही खरोखर राम-लक्ष्मणाची जोडी होती. नेतोजीला प्रतिशिवाजी असे म्हणत. त्या दोघांची ताटातूट हा स्वराज्यासाठी जबर आघात होता. जयसिंहाच्या आगमनानंतर स्वराज्यावर आलेले सावट आणखीनच दाट झाले होते!

लष्करी विलेषण

१६६४चे वर्ष राजांच्या लष्करी कारकिर्दीतील सुवर्णवर्ष म्हणावे लागेल. राजांना त्याआधी मोगलांचा शाईस्ताखान आणि आदिलशाहीचा सिद्दी जोहर या दोन कसलेल्या सेनापतींच्या आव्हानांना एकाच वेळी सामोरे जावे लागले होते. या दोघांच्या प्रचंड सेनाबलाशी सामना देण्याइतके लष्करी बळ राजांकडे नव्हते. प्रदीर्घ कालावधीसाठी राजांनी त्यांना झुलवत ठेवून त्यांना दमवले. सिद्दी जोहर परत गेल्यावर शाईस्ताखानाला त्यांनी गनिमी काव्याच्या अप्रतिम वापराने पुण्याहून पळवून लावले. त्यानंतर त्यांनी सुरतेवर साहसी धाड घालून प्रचंड संपत्ती गोळा केली. त्याबरोबर जसवंतसिंहाच्या सिंहगडाच्या वेढ्यालाही केवळ सरस डावपेचांकरवी त्यांनी निष्फळ बनवले. औरंगजेबाला शाईस्ताखानानंतर जसवंतसिंहालाही परत बोलवावे लागले. त्यानंतर त्याने आपला शहजादा मुअझ्झम याला दक्षिणेचा सुभेदार म्हणून पाठवले. परंतु तोही निरुपयोगी ठरला. राजांनी अहमदनगर आणि इतर ठिकाणी बिनादिक्कत हल्ले चढवले. त्यांनी १६६४ अखेरी बादशहाला पाठवलेल्या पत्रात आव्हान दिले होते. त्यात त्यांचा ओसंडत चाललेला आत्मविश्वास प्रकट होतो. राजांनी स्वराज्यावरचे सावट निर्धाराने हटवले होते.

मग १६६५मध्ये असे काय झाले की, राजांच्या कर्तृत्वाला असे अचानक ग्रहण लागावे? मोडेन, पण वाकणार नाही; असा बाणा असलेल्या दुर्दम्य निग्रही सेनानायकाला शत्रूच्या एकतर्फी अटी स्वीकारून लज्जास्पद तह स्वीकारावा का लागावा? जिवापाड कष्टाने बांधलेले पुरंदर, रोहिडा, लोहगड, सिंहगड यांच्यासारखे बलदंड किल्ले न लढता शत्रूच्या हवाली करण्याची पाळी का यावी? कधीही न हरलेल्या अजेयाला विजापुराबरोबर झालेल्या लढाईदरम्यान पराभव झाल्याने मैदानावरून माघार घ्यायला भाग का पडावे? किल्ल्याचा चप्पा न् चप्पा ठाऊक असल्याने तो गड मी सहज जिंकेन, अशा आत्मविश्वासाने गेलेल्या शिवबांना पन्हाळा हस्तगत करण्यात अपयश का यावे? पालकरसारख्या एका साध्या बारगिरातील गुण ओळखून आणि भावासम जिव्हाळा देऊन सरनोबताच्या सर्वोच्च पदापर्यंत पोचवूनही त्याने कोणतीही पूर्वसूचना न देता साथ सोडून शत्रूला जाऊन का मिळावे? १६६५च्या दुर्दैवी वर्षात राजांवर सर्व बाजूंनी आकाशाची कुऱ्हाड कोसळली होती.

याची दोन कारणे सांगता येतील. पहिले, मिर्झा जयसिंहाची अनन्यसाधारण कर्तृत्वशक्ती व रणनीती; आणि दुसरे, काही काळासाठीच का होईना, नशिबाने राजांची सोडलेली साथ. अफझलखान, शाईस्ताखान आणि सिद्दी जोहर यांच्यासारख्या रथी-महारथींना राजांनी नमवले. वास्तविक शाईस्ताखान मिर्झापेक्षा संख्येने मोठे सैन्य घेऊन आला होता. परंतु चाकणचा किल्ला घेतल्यानंतर तो पुण्यात ठाण मांडून बसला. मिर्झाची रणनीती त्याच्यापेक्षा अधिक चैतन्यशील होती. त्याचा रणांगणावरील अनुभव भरभक्कम होताच, परंतु त्याशिवाय तो एक कसलेला मुरब्बी रणनीतिज्ञ होता. तो आपले काम अत्यंत गांभीर्याने आणि सर्व शक्तीनिशी पार पडत असे. 'सिवाला दफे करण्याच्या' त्याच्या कामगिरीचे त्याने योजनाबद्ध आणि सुनिग्रहित विलेषण केले होते. ९ जानेवारी १६६५ला त्याने नर्मदा ओलांडली आणि ३ मार्चला पुण्यात पोचलाही. वाटेत त्याने कोठेही वेळ दवडला नाही. सैन्यावरील त्याच्या नियंत्रणाची

यावरून कल्पना येते.

मराठ्यांच्या मुलखाची सर्व बाजूंनी कोंडी करून शिवाजीराजांना शरण येण्यास भाग पाडायचे, हा मिर्झाच्या रणनीतीचा गाभा होता. त्यानुसार कुतुबुद्दिनकरवी त्याने जुन्नरपासून तळकोकणच्या घाटापर्यंत आणि लोहगडनजिक मोर्चेबंदी केली आणि राजांच्या वावराला मज्जाव करण्याचा आदेश दिला. इहतशामखान ४००० स्वारांसह पुणे परिसरात, सर्फराजखान सिंहगड टापूत आणि दाऊदखान रोहिडा-राजगड परिसरात तीच कामगिरी बजावत होते. अशा प्रकारे जुन्नर, विसापूर, पुणे, सिंहगड, पुरंदर, रोहिडा, राजगड या गावांना जोडणाऱ्या रेषेवर त्याने पूर्ण नाकेबंदी साधली. स्वत: पुण्यात न बसता त्याने सासवडमध्ये छावणी ठोकली; कारण ते अधिक मध्यवर्ती होते. स्वराज्याच्या परिणामकारक नाकेबंदीची मिर्झाची ही रणनीती त्याच्या बहुतांश यशाला कारणीभूत ठरली. यामुळे मोहिमेचे बरेचसे यश मिर्झाला देणे योग्य ठरेल.

दिलेरखानास औरंगजेबाने मिर्झाबरोबर धाडले होते, त्याची वेगवेगळी कारणे होती. दिलेरखानाचे मत होते की, आपण प्रथम महत्त्वाच्या किल्ल्यांना वेढा घालून ते काबीज करावेत. जर मिर्झा या सल्ल्याला बळी पडला असता, तर पावसाळ्याआधी कोणताच किल्ला सर झाला नसता. परंतु दिलेरखानाकडे तो संपूर्ण दुर्लक्ष करू शकत नव्हता. त्यामुळे दिलेरखानाचा सल्ला मानून त्याने प्रथम फक्त पुरंदर काबीज करण्याचे ठरवले. ही चाल हुकमी ठरली. किंबहुना पुरंदर पडल्याने शिवाजीराजांना तहाचा निर्णय तत्परतेने घेणे भाग पडले. शिवाजीराजांनासुद्धा दिलेरखानाची धाकधूक होती. 'दिलेरखान पादशहाच्या मेहेरबानीचा अंतर्गत आहे. तो काही भला नाही. तोच काय करील न कळे. तो बराबरी नसता तर आमचा मनोरथ पूर्ण होता,' अशी चिंता राजांनी व्यक्त केल्याचे सभासदाने नोंदवले आहे.५८ अशा प्रकारे मोहिमेच्या यशातील दिलेरखानाचे योगदान नाकारता येणार नाही.

पराभव स्वीकारून मिर्झाशी तह करण्याचा शिवाजीराजांचा निर्णय अत्यंत सुज्ञ आणि मुत्सद्देगिरीपूर्ण होता. कौटिल्याने राजनीतीचे सहा प्रकार सांगितले आहेत: अटी घालून केलेला सलोखा म्हणजे तह, शत्रूवर चढाई म्हणजे युद्ध, उदासीन वृत्ती म्हणजे तटस्थपणा, युद्धाची तयारी म्हणजे लष्करी हालचाल, दुसऱ्याचा आश्रय घेणे म्हणजे मैत्री, एकाशी मैत्री आणि दुसऱ्याशी लढाई म्हणजे दुटप्पी धोरण अथवा द्वैधभाव.५९ या सहांपैकी त्या परिस्थितीत तहाची राजनीती निवडण्याचा राजांचा पर्याय योग्य होता. कौटिल्य तहाबाबतीत म्हणतो, 'शत्रूचा व स्वत:चा सारखाच अपकर्ष व अधोगती चाललेली असून उभयतांनाही इष्ट फलाची प्राप्ती व्हायला सारखाच वेळ लागण्याचा संभव आहे, असे वाटत असेल तेव्हा तह करावा. तहाच्या अटींचा फायदा घेऊन मी माझ्या राज्यात मोठी फळे देणारी कामे काढीन, शत्रूच्या कामाचा विध्वंस करीन अथवा स्वत:च्या राज्यातील संस्थांची फळे मीच उपभोगीन अथवा तहावर विसंबून गुप्तहेरांच्या साहाय्याने व गुप्त खलबताने शत्रूचा नायनाट करीन अथवा मी आपल्या प्रजाजनांकडे विशेष लक्ष पुरवीन असे शक्य असले, तर तो करणे गैर नाही.' ६०

नेपोलियननेही इंग्लंड-प्रशिया-ऑस्ट्रिया यांच्या आघाडीशी अशाच परिस्थितीत एप्रिल

१८१४मध्ये फॉन्टेनब्लूचा तह केला होता आणि नंतर परिस्थिती बदलल्यावर त्या सर्वांचा पराभव करून तो पुन्हा फ्रान्सचा अधिपती झाला होता.

जोपर्यंत शिवाजीराजांकडे बलदंड किल्ले होते, तोपर्यंत ते जयसिंहाला देऊन राजे तह करू शकत होते. जर त्यांनी मिर्झाबरोबर युद्ध चालू ठेवले असते आणि ते किल्ले त्यांच्या हातातून गेले असते, तर तहादरम्यान किल्ले देण्याची मुभाच त्यांच्याकडे उपलब्ध नसती. त्यांच्या सल्लागारांनी सांगितले की, पुरंदर आणि सिंहगडासारखे बळकट किल्ले आपल्या हातातून गेले, तर छोटे किल्ले तग धरू शकणार नाहीत. यात बरेच तथ्य होते. कौटिल्य म्हणतो, 'दोन राजांच्यात तह घडून येण्यासाठी राजापाशी प्राबल्य आणि मातब्बरी पाहिजे. जर त्यांच्यापैकी एकाकडे ती शक्ती नसेल आणि जर शत्रूने त्याचा पराभव केला, तर त्याने सर्वनाश होण्यापेक्षा मानखंडना पत्करावी.' त्यामुळे त्यावेळी तरी आपल्याजवळ असलेल्या किल्ल्यांचा उपयोग युद्ध थांबवण्यासाठी करणे आवश्य.क होते.

जयसिंह काही कायम राहणार नव्हता. केव्हातरी तो आपल्याबरोबर आणलेल्या सैन्यासह परत जाणार होता. जे सैन्य मागे ठेवू शकेल, ते याचा काही अंशच असणार होते. शिवाजीराजे मग कौटिल्याच्या सूत्रानुसार जे किल्ले त्यांनी गमावले, ते परत घेऊ शकले असते. पावसाळ्याच्या आरंभानंतर मोगल सैन्य संपूर्णपणे दुर्बळ होऊन जाणार होते. त्यावेळी त्यांचा पराभव करणे शक्य होते. त्यासाठी आदिलशहाची मदतही मिळू शकत होती. मोगल बळकट होऊ नयेत, हे आदिलशहाच्याही हिताचे होते. राजांच्या पूर्वजांनीही मोगलांच्या विस्ताराला बांध घालण्यासाठी दक्षिणेतील इतर राजांची मदत केली होती. त्याशिवाय पोर्तुगीजांनाही राजांबद्दल जिव्हाळा होता. त्यांनी तर राजांना आश्रयही देऊ केला होता. तसा जयसिंह खरोखरच इतका बलवान होता का, हेही वादास्पद होते. नंतर घडलेल्या घटनांनी त्याचे पितळ बरेच उघडे पडले होते.

या सर्व बाबींचा सारासार विचार करता शिवाजीराजांच्या तहाच्या निर्णयामधील परिपक्वता आणि अगतिकता स्पष्ट सिद्ध होते. दुर्दैवाने औरंगजेबासारख्या कट्टर शत्रूसमोर काही काळ का होईना, त्यांना नमते घेणे भाग पडले. विशेषत: त्यांना मिर्झाच्या सूचनेनुसार त्याचा सचिव उदयराज मुन्शी याने राजांच्या वतीने औरंगजेबाला लिहिलेले पुढील पत्र औरंगजेबाकडे धाडण्यास मान्यता द्यावी लागली, याची खंत वाटते: 'मी आपला गुन्हेगार व अपराधी आहे. ...इत:पर आपली नोकरी इमानाने बजावण्यात सदैव तत्पर राहीन... बंडाळी करून आपल्या सर्वस्वाचा घात करून घेणार नाही... बादशाही पंजा आणि शिक्का यांनी अलंवृत आपले वृपापूर्ण फर्मान येऊन दाखल झाले, ही आनंदाची बातमी मिर्झाराजे जयसिंह यांनी मला कळवली... फर्मान आल्याप्रमाणे मी आपला हुकूम पाळण्यास सदैव तत्पर राहीन.'६१

पुढे जाऊन आग्रा भेटीदरम्यान बादशहाला त्याच्या दरबारात कुर्निसात करण्यास नकार देण्याचे मनोधैर्य दाखवणाऱ्या शिवाजी राजांची ही जातकुळी खचितच नव्हती. परंतु सर बेसिल लिडेल हार्टने म्हटल्यानुसार 'तुमचे उद्दिष्ट तुमच्यापाशी असणाऱ्या संसाधनांच्या चौकटीत बसणारे पाहिजे. त्यासाठी उद्दिष्टाचे तर्कनिष्ठ विलेषण करणे आणि आपल्या क्षमतेची व मर्यादांची पुरेपूर जाणीव असणे आवश्यषक आहे. आपल्या आवाक्याबाहेर असलेल्या

उद्दिष्टामागे धावणे चुकीचे आहे. बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी लवचीकता आवश्यिक आहे.’ अत्यंत तर्कनिष्ठ विलेषणानंतर तहाचा हा पर्याय राजांनी निवडला आणि काही वर्षांतच सर्व किल्ले परत मिळवून आपल्या अनन्यसाधारण लष्करी सुज्ञतेचा प्रत्यय करून दिला, यात संशय नाही. ‘पराजयाचे विजयश्रीत रूपांतर’ (डिफीट इंटु व्हिक्टरी) यालाच म्हणतात!

संदर्भसूची

१. विजय देशमुख; शककर्ते शिवराय, खंड १; छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन; पान ३६०; उद्धृत शिवभारत खंड २५, पान ३६.

२. पुर्वोक्त, पान ३६०; उद्धृत शिवभारत खंड २५, पान ६१-६२.

३. पुर्वोक्त; पान ३६७; उद्धृत शिवचरित्र संशोधन वृत्त- ग.ह.खरे राज्य. शके २७९ (शि. च. सं. वृ.) ३/६७.

४. पुर्वोक्त; आलमगीरनामा , शि. च. सं. वृ. ३/२५.

५. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान १८५.

६. पुर्वोक्त; पान १८५.

७. पुर्वोक्त; पान २०५.

८. पळसोकर आर. डी.; शिवाजी द ग्रेट गुरीला; स्वयंप्रकाशित; पान ११६.

९. विजय देशमुख; शककर्ते ....,पान ३९७; उद्धृत परमानंदवृत शिवभारत, संपादक, स. म. दिवेकर, शके १८४९ (शिवभारत); २८/ ७०-७१.

१०. पुर्वोक्त; पान ३९७; उद्धृत शिवभारत २९/८.

११. पुर्वोक्त; पान ४२१; पत्रसार संग्रह (प. सा. सं.) ९२३/२७.

१२. पुर्वोक्त; पान ४२४.

१३. पुर्वोक्त, पान ४२३; उद्धृत असे होते मोगल, मनुचीवृत ग्रंथ अनुवाद, संपादक ज. स. चौबळ.

१४. पुर्वोक्त; पान ४२३; उद्धृत सभासद बखर पान ३४.

१५. गो.स. सरदेसाई; मराठी ...., पान २१२; उद्धृत सभासद ३१-३३; शिवचरित्रप्रदीप जेधे करीना पान ४६; जेधे शकावली पान २२.

१६. विजय देशमुख; शककर्ते ....; खंड १; पान ४२६, उद्धृत सभासद पान ३४.

१७. पुर्वोक्त; पान ४२६; शि. च. सं. वृ. पान ६९.

१८. गो. स. सरदेसाई; मराठी ......; पान २१२.

१९. पुर्वोक्त; पान २१३.

२०. विजय देशमुख; शककर्ते ....; पान ४३०. उद्धृत फॉरिन बायोग्राफीज ऑफ

शिवाजी; सुरेंद्रनाथ सेन, १९२७. (एफ. बी. एस.) पान १०-११.

२१. पुर्वोक्त; पान ४४७; उद्धृत सभासद पान ६५, शिवकालीन पत्रसार संग्रह; (पसासंम) पान ९७७.

२२. पुर्वोक्त; पान ४४६; उद्धृत पसासंम पान ६७३.

२३. गो. स. सरदेसाई, मराठी ....; पान २१५.

२४. पुर्वोक्त; पण २१६; उद्धृत सभासद पान २४.

२५. निनाद बेडेकर; छत्रपती शिवाजी; कर्नाटक प्रकाशन; पान ५६; उद्धृत सभासद पान ६५.

२६. विजय देशमुख; शककर्ते ....; पान ४४७; उद्धृत एफ. बी. एस. पान ११७.

२७. गो स. सरदेसाई; मराठी ....; पान २१६.

२८. पुर्वोक्त; पान २१८; उद्धृत पसासंम; पान ९८२.

२९. पुर्वोक्त; पान २१८; उद्धृत पसासंम; पान ९६६-७०.

३०. पुर्वोक्त; २१९; उद्धृत पसासंम; पान ९७७.

३१. विजय देशमुख; शककर्ते ....; पान ४५९-६०; उद्धृत एफ. बी. एस. पान १८०.

३२. पुर्वोक्त; पान ४५७; उद्धृत डॉ बाळवृष्ण; शिवाजी द ग्रेट, पान २१६.

३३. पुर्वोक्त; पान ४६६; उद्धृत राधा माधव विलास चंपू, संपादक वि. का. राजवाडे.

३४. गो. स. सरदेसाई; मराठी ......; पान २२०.

३५. पुर्वोक्त; पान २२१; उद्धृत मॉडर्न रिव्ह्यू ; पसासंम, पान ९९६.

३६. पुर्वोक्त; पान २३१.

३७. श्रीनिवास सामंत; वेध महामानवाचा; देशमुख आणि कंपनी; पान १९७.

३८. पुर्वोक्त; पान १९९.

३९. विजय देशमुख; शककर्ते ....; खंड २; पान १२. उद्धृत सभासद पान ४०.

४०. गो. स. सरदेसाई; मराठी ......; पान २३४.

४१. विजय देशमुख; शककर्ते ....; खंड २; पान १४. मो म सं पान ९५.

४२. पुर्वोक्त; पान १५-१६; शि च वृ पान ३०; मो म सं पान ९५.

४३. गो. स. सरदेसाई; मराठी ......; पान २३७; उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १४६.

४४. पुर्वोक्त; पान २३८; उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३२..

४५. विजय देशमुख; शककर्ते........, खंड २; पान २४; उद्धृत सभासद बखर, पान ३९.

४६. पुर्वोक्त; पान २५, उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३२.

४७. पुर्वोक्त; पान २५, उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३२ ३३.

४८. गो. स. सरदेसाई, मराठी .... पान २३४, उद्धृत जदुनाथ सरकार, हाउस ऑफ शिवाजी; पान १४६.

४९. विजय देशमुख; शककर्ते........, खंड २; पान १८, उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३८-३९.

५०. पुर्वोक्त; पान ३०, उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३३.

५१. पुर्वोक्त; पान ३१, उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३३.

५२. विजय देशमुख; शककर्ते ....; पान ३३; उद्धृत शि च वृ सं पान ३६.

५३. पुर्वोक्त; पान ३५; उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १४०-४१.

५४. पुर्वोक्त; पान ५० ; उद्धृत शि च वृ सं पान ७३.

५५. गो. स. सरदेसाई; मराठी ....; पान २४३-४४.

५६. विजय देशमुख; शककर्ते........, खंड २; पान ५५, उद्धृत जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी; पान १३०.

५७. पुर्वोक्त; पान ५६; उद्धृत प सा सं ११०५.

५८. पुर्वोक्त; पान ७; उद्धृत सभासद ३८.

५९. दुर्गा भागवत; कौटिलीय अर्थशास्त्र; सरिता प्रकाशन; पान ३३२.

६०. पुर्वोक्त, पान ३३३.

६१. विजय देशमुख; शककर्ते........; पान ५०; उद्धृत प.सा. सं १०६७.

६.

पराजयाचे विजयश्रीत रूपांतर



आग्र्यातील थरकाप

जयसिंहाची मध्यस्थी

पुरंदर तहाच्या वाटाघाटीदरम्यान शिवाजीराजांनी तीन दिवस जयसिंहाच्या राहुटीत घालवले. त्या दरम्यान दोघांच्यात मित्रभाव व स्नेहच नव्हे, तर एकमेकांबद्दल प्रचंड जिव्हाळा निर्माण झाला. शिवाजीराजांची मिर्झावर गाढ छाप पडली. राजांचे राष्ट्रप्रेम आणि सद्भावना जवळून पाहिल्यावर तो अतिशय प्रभावित झाला. मिर्झाराजा आणि राजांच्या वयांत वीस वर्षांचे अंतर होते. दोघेही अव्वल दर्जाचे पराक्रमी, मुत्सद्दी आणि बुद्धिमंत होते. अर्थातच एकमेकांच्या व्यावसायिक कर्तृत्वाबद्दल दोघांच्या मनात अपार आदर निर्माण झाला. राजे आणि बादशहा यांची भेट व्हावी, बादशहाने राजांचा सत्कार करून त्यांच्याकडून मोगल साम्राज्याची सेवा करून घ्यावी आणि ते मोगल साम्राज्याचे खंबीर स्तंभ व्हावेत, अशी मिर्झाची इच्छा होती. मिर्झाराजाला हळूहळू राजांच्या कर्तबगारीची खातरी पटू लागली. आदिलशाही, कुतुबशाही आणि मराठे एकत्र युती करून दक्षिणेत मोगलांना शह देतील, ही कल्पना जयसिंहाच्या मनाचा अधिकाधिक ठाव घेऊ लागली. त्यावर रामबाण उपाय होता, शिवाजीराजांनाच मोगलांचे मांडलिक बनवायचे. ही कल्पना त्याला भावली होती.

'शिवाजी विजापूरकरांना जाऊन मिळण्याची शक्यता आहे, ते टाळण्यासाठी त्याने आपल्या भेटीस यावे, असे मला वाटते. त्यासाठी आपली संमती मिळावी'; असे मिर्झाने औरंगजेबाला लिहून पाठवले. औरंगजेबाने ते लागलीच मान्य केले. बादशहाची परवानगी मिळाल्यावर मग मिर्झाने हा प्रस्ताव राजांसमोर लागलीच ठेवला. औरंगजेबाचा विश्वासघातकी स्वभाव सर्वपरिचित होता. केवळ मातोश्री, गुरू आणि साधुसंत यांच्याच पुढे लवणारे शिवाजीराजे बादशहापुढे जाऊन मान वाकवण्यास राजी होणे शक्य नव्हते. त्यांनी मिर्झाचा प्रस्ताव साफ धुडकावून लावला. पण मिर्झा हार मानायला तयार नव्हता. 'बादशहाला तुम्हांला भेटण्याची, तुमचा गौरव करण्याची, तुम्हांला दक्षिणेची सुभेदारी देऊन आदिलशाही आणि कुतुबशाही जिंकण्याची फार इच्छा आहे', अशी विविध आमिषे दाखवून त्याने राजांमागे लकडा लावला. राजांना जंजिरा किल्ला हवा होता, तो सिद्दीकडून मिळवून देण्याची लालूच त्याने दाखवली. 'तुमचे जिवास कोणताही अपाय आम्ही होऊ देणार नाही, त्याबद्दल मी आणि माझा पुत्र जामीन आहोत', असे शपथ व करार दोघांनी विधिपूर्वक राजांकडे पाठवून दिले.

राजांनी आपल्या सल्लागारांशी या संबंधात बरेच दिवस सखोल चर्चा केली. सिंहाच्या गुहेत आपणहून शिरणे योग्य नाही, असे काहींचे म्हणणे पडले. अफझलखानाच्या वेळेसारखी औरंगजेबाची भेट घेणे अपरिहार्य असण्याचा काही प्रश्न नव्हता. परंतु बादशहाला भेटण्यात काही फायदेही होते. निदान पुरंदर तहासारखी परिस्थिती पुनःश्च निर्माण होऊ नये, याची तरी शाश्वती करून घेता आली असती. आणखी काही उद्दिष्ट असले, तरी ते राजांनी गुप्त ठेवले. सांगोपांग विचार करून राजांनी आग्र्याला जाण्याचा निर्णय अखेरीस घेतला. १२ मे १६६६ला औरंगजेबाचा पन्नासावा वाढदिवस होता. आग्र्यात एका मोठ्या समारंभाचे आयोजन होणार होते. मिर्झाराजांच्या शिफारशीवरून शिवाजीराजांना हजर राहण्याचा बुलावा आला.

दिल्लीला प्रयाण

रायगडावर खलबतांसाठी राजांनी सल्लागारांना बोलावले. कोणी कोणी जायचे, केव्हा निघायचे, मागची व्यवस्था कोण पाहणार, या सर्वांवर राजांनी निर्णय दिले. राजांच्या मागे मुख्य कारभार जिजाबाई पाहणार होत्या. प्रधान मोरोपंत, मुजुमदार निळो सोनोपंत आणि प्रतापराव गुजर हे तिघे सर्व जागरूक राहून त्यांना मदत करणार होते. राजांच्या बरोबर त्र्यंबक सोनदेव डबीर, निराजी रावजी, हिरोजी फर्जंद, बाजी जेधे, माणकोजी हरी सबनीस, दावलजी घाटगे, दत्ताजी त्रिंबक, कवींद्र परमानंद, नीलकंठराव पारसनवीस, बहिर्जी नाईक, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, राघो मित्र, मुद्गलभट आर्वीकर, नारायण रामचंद्र... शंभर विश्वासू लोक, पाच हजार घोडेस्वार, अडीचशे निवडक पायदळ, उंट, हत्ती, बैलांचा ताफा, शंभर एक वंजारी हा मोठा लवाजमा जाणार होता. मग राजांनी किल्ले व स्वराज्याचा मुलूख स्वत: हिंडून पाहिला. किल्लेदारांना आणि निरनिराळ्या अधिकाऱ्यांना रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.

फाल्गुन शुद्ध नवमीच्या सुमुहूर्तावर ५ मार्च १६६६ला प्रवास सुरू झाला. त्यांच्या वाटखर्चासाठी बादशहाने एक लाख रुपये बादशाही खजिन्यातून दिले होते. तसे राजांनीसुद्धा आपल्या खजिन्यातून पुरेशी रक्कम बरोबर घेतली होती. बादशहाने जयसिंहाबरोबर असलेला गाजीबेग नावाचा आपला अधिकारी त्यांच्या तैनातीस दिला होता. शहाजाद्यांची बरदास्त ठेवण्यात येते, तशी राजांची व्यवस्था रस्त्रयात ठेवावी, असे सरपत्र बादशहाने प्रांतिक अंमलदारास पाठवले होते. प्रवासादरम्यान राजांना बादशहाचे पत्र मिळाले, 'तुम्ही बेकिलाफ आमचे वचनावर विश्वास ठेवून हुजूर तख्त मुकामी यावे. तुमचे मुद्दे असतील ते उलगडून देऊ. कोणेविशी दिक्कत न धरावी, बादशाही वृपा संपादून तुम्हांस स्वदेशी परत पाठवण्यात येईल.'१

बुऱ्हाणपूर, इंदूर, भोपाळ, सिहोर, नरवर, धोलपुर या मार्गे मजल-दरमजल करत ९ मेला राजे लवाजम्यासह आग्र्याला पोचले. राजांचा मुक्काम मुलुकचंदाच्या सराईत पडला. जयसिंहाने आपला सुपुत्र रामसिंह राजांची देखभाल करण्यासाठी तैनात केला होता.

बादशहाशी भेट

१२ मेचा दिवस उगवला. वास्तविक रामसिंह कछवाह आणि मुखलिसखान यांच्यावर राजांना

दरबारात आणण्याची जबाबदारी दिली गेली होती, परंतु कदाचित हेतुपुरस्सर किंवा नित्यनियमानुसार रामसिंहाला त्याच दिवशी सकाळी १० पर्यंत राजवाड्याभोवती गस्तीचे नेतृत्व करण्याचे काम दिले गेले. त्या विशेष दिवसाच्या गडबडीत तो त्यात थोडा अधिक समय गुंतून राहिल्यामुळे त्याला बाहेर पडण्यास वेळ झाला. त्यामुळे दोघे राजांना सराईतून समारंभाच्या स्थानी नेण्यासाठी वेळेवर पोचू शकले नाहीत. त्याची वाट पाहून राजे व शंभूजी रामसिंगाच्या कारुनासह किल्ल्याकडे निघाले. रामसिंहही आपले काम संपवून लगबगीने मुखलिसखानाबरोबर निघाला. वाटेत नूरगंज बागेजवळ त्यांची आणि राजांची गाठ पडली. या सगळ्या गोंधळात बराच वेळ निघून गेला होता.

वास्तविक राजे आणि बादशहाची भेट ‘दिवाण-इ-आम’मध्ये होणार होती. ‘दिवाण-इ-आम’ सजवला होता. सर्व दरबारी आपापल्या जागी उभे होते. पटांगण गजबजून गेले होते. परंतु रामसिंहाबरोबर राजे समारंभस्थानी पोचेपर्यंत ‘दिवाण-ए-आम’ आणि ‘दिवाण-इ-खास’मधील समारंभ संपले होते आणि खासा दरबार घुसलखान्यामध्ये पोचला होता. कुंवर रामसिंहाने राजे आल्याची वर्दी बादशहाकडे पोचवली. औरंगजेबाने बक्षी आसदखानास राजांना घेऊन येण्यासाठी पाठवले. शिवाजीराजे आणि शंभूजी बादशहाच्या सिंहासनासमोर पोचले. प्रघातानुसार तीनवेळा ‘कुर्निश’ म्हणजे जमिनीला कपाळ लावून चुंबन घेणे करण्याऐवजी राजांनी बादशहाला तीन वेळा मुजरा केला. १५०० मोहोरांचा नजराणा व सहा हजार रुपयांचा सत्का सादर केला. औरंगजेबाने एका शब्दाने त्यांची वास्तपुस्त केली नाही. ना उपहार दिला, ना कोणताही किताब प्रदान केला. बादशहाने दुरूनच परत जाण्याची खूण करताच राजांना पाचहजारी मनसबदारांच्या रांगेत उभे करण्यात आले. त्यानंतर मानाची वस्त्रे वाटण्यात आली. त्यातूनही राजांना वगळण्यात आले. आपल्यापुढे जसवंतसिंह उभा असल्याचे त्यांनी पाहिले. हाच काही दिवसापूर्वी सिंहगडाला वेढा घालून बसलेला जसवंत.

राजे आता संतापाने थरथरू लागले. रामसिंहाला त्यांनी हाक मारली. तो आपली रांग सोडून पळत आला. ‘मी येथे प्राण देईन; पण हा अपमान सहन करणार नाही. नको ती तुमची मनसब’, राजे कडाडले. रामसिंहाने त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा संताप अधिकच वाढत गेला. सारा दरबार थिजून गेला. बादशहाच्या दरबारात हे अघटित होते. राजे दरबारातून जाण्यासाठी रांगेमधून बाहेर पडले आणि बादशहाकडे पाठ करून एका बाजूला रामसिंहासाठी थांबले. औरंगजेबाने रामसिंहाला बोलावून काय चालले आहे, याची विचारणा केली. रामसिंहाने झालेला प्रकार बादशहाला सांगितला. तेव्हा औरंगजेबाने मुल्तफितखान, आकीलखान आणि मुखलीसखान यांना फर्मावले, ‘सीवाला दिलासा देऊन सरोप्याची वस्त्रे द्या आणि समजूत घालून त्याला इथे घेऊन या.’ परंतु ते जवळ आल्यावर सरोप्याची वस्त्रे घेण्याचे राजांनी साफ नाकारले आणि ‘असा अपमान मी कधीही सहन करू शकणार नाही,’ हे त्यांना पुन्हा सुनावले. बादशहाच्या दरबारात सरोप्याची वस्त्रे नाकारण्याची जिद्द दाखवण्याचा हा अभूतपूर्व पहिला प्रसंग असावा. बादशहाने मग रामसिंहाला राजांना मुक्कामी घेऊन जाण्यास व त्यांची समजूत घालण्यास सांगितले. रामसिंह लगबगीने त्यांना निवासस्थानी घेऊन गेला.

मुक्कामी पोचल्यावर बादशहाने वचनभंग करून आपल्यास फसवले असल्याचा राजांनी आरोप केला आणि 'असा अपमान करण्यापेक्षा मला मरण सहन होईल,' असे रामसिंहाला सुनावले. त्यांनी दरबारात जाण्यास साफ नकार दिला. दोन दिवसांनी शंभूजी राजांना त्यांनी पाठवले, तेव्हा सरोपा आणि रत्नजडित कट्यार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. राजांच्या या गैरवर्तनाकडे बादशहाने दुर्लक्ष न करता त्यांना शासन करावे, असे राजांचे वेगवेगळे हितशत्रू औरंगजेबाचे कान भरू लागले. राजांना काबूल मोहिमेवर पाठवण्याचा विचार औरंगजेबाच्या मनात घोळू लागला. बादशहाने रामसिंहाला बोलावून राजांवर सक्त नजर ठेवण्याचे व त्यांना तटाबाहेर जयपूर बंगल्यात नेऊन बंदोबस्ताने ठेवण्याचे आदेश दिले. त्यांना दरबारात येण्याची मनाई करण्यात आली. 'ते निघून गेले, तर तुला जबाबदार धरले जाईल', अशी धमकी रामसिंहाला देण्यात आली.

आग्र्याहून सुटका

दिल्लीतून बाहेर कसे पडायचे, याचे विचार चालू झाले. बादशहाच्या दरबारातील वकील रघुनाथपंत कोर्डे याने सुचवल्यानुसार राजांनी बादशहाकडे अर्ज पाठवला की, आपल्याला मी विजापूर आणि गोवळकोंडा घेऊन देतो. त्यावर बादशहाने थोड्या दिवसानंतर त्या विनंतीवर विचार करण्याचे कळवले. राजांनी आपल्याला एक वेळ भेटीची संधी देण्याची बादशहाला विनंती केली. अफझलखानाच्या भेटीची कहाणी औरंगजेबाला परिचित होती. शिवाय शाईस्ताखानाने शिवाजीला यत्किंचितही जवळ येऊ न देण्याचा सल्ला आपल्या भाच्याला दिला असणे शक्य होते. शिवाजीराजांना चेटूककला अवगत आहे, ते शे-पन्नास हात उडी सहज मारू शकतात, त्यांना हवेत तरंगता येते, असे सर्व प्रवाद औरंगजेबाने ऐकले होते. त्यामुळे तो त्यांना भेटू देणे असंभव होते. राजांना मारून टाकावे, असे औरंगजेबाच्या अनेक नातलगांचे आणि सल्लागारांचे म्हणणे होते. औरंगजेबाने त्यांना ठार मारण्याचा निर्णय जवळजवळ घेतलाच होता. त्यावेळी आग्र्यात असलेल्या फ्रेंच प्रवाशाने लिहिल्यानुसार 'राजपूत राजांची त्यास जामीनगिरी असल्याने कदाचित ते बंड करून आपल्याविरुद्ध उठतील, या भीतीने तो बेत त्याने रद्द केला'. बादशहाच्या अविवाहित कन्येचे राजांवर प्रेम बसल्याने 'त्यांचे धर्मांतर करावे', अशी बादशाहाला विनंती करण्यात आली असण्याच्या वावड्याही उडवल्या जात होत्या. साऱ्या आग्र्यात शिवाजीराजांच्या भवितव्याबद्दल उत्सुकता शिगेला पोचली होती. औरंगजेबही मोठ्या धर्मसंकटात सापडला होता.

रामसिंहाचा वाडा असुरक्षित असल्याचा फौजदाराने दावा केल्याने आपल्याला फिदाई हुसेनच्या लहान बंगल्यात १८ ऑगस्ट १६६६ ला हलवले जाण्याची बातमी राजांना कळली. दिवसेंदिवस औरंगजेबाचा वेळकाढूपणा त्यांच्या लक्षात येत होता. कैद जास्तच सक्त होत चालली होती. आग्र्याचा कोतवाल फौलादखान याने राजांच्या बंगल्याला हत्यारबंद शिपायांचा वेढा घालून सभोवार तोफा लावून ठेवल्या होत्या. वाटाघाटी, अर्जदारी, सामोपचार वगैरे सर्व मार्ग राजांनी करून पाहिले होते. आता युक्तिप्रयुक्तीच्या डावपेचांचा अवलंब करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता.

मग राजांना अचानक सुटकेची एक अफलातून शक्कल सुचली. त्यात प्रचंड जोखीम होती आणि त्याची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी दीर्घ प्रयत्न, चिकाटी आणि सोशीकपणाची आवश्यकता होती. त्यांच्या नेहमीच्या रिवाजानुसार सांगोपांग व गहन विचार आणि विलेषणानंतर त्यांनी त्या कल्पनेचे एका योजनेत रूपांतर केले. एक-दोन दिवसांत योजनेच्या सर्व पैलूंना अंतिम स्वरूप देऊन ते प्रत्यक्षात उतरवण्यास आरंभ केला. याची कल्पना त्यांनी बरोबर असलेल्या केवळ मोजक्याच लोकांना दिली.

सर्वांत प्रथम त्यांनी आपली वर्तणूक बदलली. 'बादशहा सांगतील तसे आपण वागण्यास तयार आहोत आणि आपण आता अगदी अगतिक झालो आहोत', असे संकेत त्यांनी हळूहळू देण्यास सुरू केले. भेटेल त्याला ते तसे सांगू लागले. 'शिवाजी आता अगदी मवाळ झाला आहे, त्याच्यातील अहंपणा नाहीसा झाला आहे आणि त्याच्यासमोर जे प्रारब्ध आहे, ते स्वीकारायला तो तयार आहे', असा आविर्भाव राजे चारीकाळ दाखवू लागले. आपल्याबरोबरील आणलेले बहुतांशी लोक परत पाठवण्याची परवानगी त्यांनी मागितली. ती त्यांना ताबडतोब देण्यात आली. या बातम्या जसजशा बादशहाकडे पोचू लागल्या, तसतसा शिवाजीराजांचा नक्षा खरोखरच उतरला आहे, याची त्याला अधिकाधिक खातरी पटू लागली. राजांच्या बरोबर आलेले लोक छोटे छोटे जथे करून आग्रा सोडून जाऊ लागले.

योजनेचा पहिला टप्पा कोणत्याही अडचणीविना पार पडला होता.

पुढे काही दिवसांनी राजांनी आजारी पडल्याचे सोंग वठवायला आरंभ केला. औषधे देण्यासाठी वेगवेगळे हकीम आणि वैद्य भेट देऊ लागले, परंतु कशानेच उतार पडेना. त्यांच्यापैकी बहुतेकांनी हा मानसिक आजार असल्याचे निदान केले. त्यांच्या मनाला शांत वाटून आराम यावा, यासाठी काहींनी ब्राह्मण, बैरागी आणि गोरगरिबांना मिठाई वाटण्याचा सल्ला दिला, किंबहुना त्यांच्याकडून तो डोकेबाजपणे वदवून घेण्यात आला. दररोज मिठाई वाटली जाऊ लागली. त्यातली काही दरबारी लोकांच्याकडेही जाऊ लागली. त्याचबरोबर टोपल्यांऐवजी मोठे पेटारे जाण्यास सुरुवात झाली. मग काही काळाने दोन लोकांनी उचलण्याजोग्या कावडी पाठवणे चालू झाले. हे संक्रमण इतक्या शिताफीने आणि पद्धतशीरपणे घडत होते की, बाहेरच्या दरवानांना सोडाच, परंतु फौलादखानालाही त्याची तसूभरही शंका आली नाही. काही काळाने हा रिवाज नित्याचा झाल्याने पेटाऱ्यात फळे आहेत, मिठाई आहे का इतर काही पदार्थ आहेत, हेही पहारेकऱ्यांनी तपासणे बंद केले. 'रोज मरे त्याला कोण रडे', यापैकीच हा प्रकार झाला.

दुसऱ्या टप्प्याची यशस्वीरीत्या सांगता झाली होती.

आता अंतिम प्रहाराची वेळ येऊन ठेपली होती. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात राजांची झोप उडाली असल्याची बातमी सर्व पहारेकऱ्यांत पसरवण्यात आली. १७ ऑगस्ट १६६६चा दिवस अंतिम पलायनासाठी निवडण्यात आला. राजांच्या नोकराने पहारेकऱ्यांना येऊन सांगितले की, राजांची तब्येत जास्तच बिघडली आहे, त्यांना गेले दोन दिवस झोपच आलेली नाही, त्यामुळे कोणी त्यांना त्रास देऊ नये. राजांजवळ हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर हे दोघेच उरले होते. दररोज दुपारी तीन-चार वाजता पहारेकरी तपासणीसाठी एक चक्कर मारत

असे. हिरोजीने राजांचे सोन्याचे कडे उजव्या हातात घातले आणि राजांच्या बिछान्यावर तो झोपला. राजे आणि शंभूजी बाजूला दडून बसले. आपला उजवा हात बाहेर ठेवून हिरोजीने डोक्यावरून पांघरूण घेतले. त्याच्यापलीकडे उशा आणि लोड घालून असा उंचवटा करण्यात आला होता की, शंभूजी झोपले आहेत, असे वाटावे. पहारेकरी नेहमीच्या वेळी आत डोकावून गेला. तो गेल्यावर राजे आणि शंभूजी मिठाईच्या दोन कावड्यांत बसले. त्यांच्या मागेपुढे आणखीनही मिठाईच्या कावड्या होत्या. संध्याकाळी भोयांचा चमू नेहमीप्रमाणे आला. सूर्यास्ताच्या वेळी सर्व कावड्या बाहेर पडल्या.

भोयांनी त्यांना सांगितल्याप्रमाणे त्या शहराबाहेर आणून ठेवल्या आणि ते निघून गेले. राजे आणि शंभूजी कावडीबाहेर येऊन जवळच सहा मैलांवर असलेल्या गावी चालत पोचले. त्या ठिकाणी निराजी रावजी, दत्ताजी त्रिंबक, रघु मित्र आदी घोडे सज्ज ठेवून तयार होते. लगेच राजांनी मथुरेकडे प्रयाण केले. हिरोजी तसाच निजून राहिला. सकाळी पहारेकऱ्याला हिरोजीचा पांघरुणाबाहेर कडे घातलेला हात दिसला. राजे अजूनही निजलेले आहेत, हे पाहून तो बाहेर गेला. दुपारपर्यंत हिरोजी आणि मदारी आतच होते. त्यांनी तिथे उशा आणि लोडांना दोन माणसे झोपली असल्याचा हुबेहूब आकार दिला. मग ते दोघे बाहेर आले आणि त्यांनी पहारेकऱ्यांना सांगितले की ‘राजे झोपले आहेत, आता काही वेळ त्यांना त्रास देऊ नका. आम्ही दोघे थोड्याच वेळात बाहेर जाऊन येतो.’ ते दोघे बाहेर पडले.

या शाठ्यनाट्याच्या तिसऱ्या आणि शेवटच्या अंकाची यशस्वी सांगता झाली होती.

बराच वेळ आत सर्व सामसूम दिसल्यावर पहारेकरी तपासायला आल्यावर राजे शंभूजींना घेऊन नाहीसे झाल्याचे त्यांना कळले. जेव्हा हे वृत्त फौलादखानाने औरंगजेबाला कळवले, तेव्हा तो रागाने लालबुंद झाला. त्याने दक्षिणेकडे राजांचा पाठलाग करण्यासाठी जासूस पाठवले. परंतु तोपर्यंत बैराग्याच्या वेशात राजे निसटून गेले होते. ते मथुरेला गेले. शंभूजींना मथुरेस वृष्णाजी त्रिमल या मोरोपंत पिंगळे यांच्या मेव्हण्याकडे ठेवले. त्यानंतर मोजक्या लोकांबरोबर गोंडवन, गोवळकोंडा, विजापूरमार्गे २० नोव्हेंबर १६६६ला राजे राजगडला पोचले. गेल्या आठ महिन्यांत राजांना एका दिव्यातून पार पडावे लागले होते. तीन-चार महिन्यांनी शंभूजींना वृष्णाजीने सुखरूप आणून पोचवले. या उपकाराबद्दल राजांनी त्याला विश्वासराव हा किताब बहाल केला.

आपण शिवाजीराजांना ताबडतोब मारले का नाही, याचा औरंगजेबाला वारंवार पश्चात्ताप होत असे. त्याच्या मृत्युपत्रात त्याने केलेल्या पुढील विधानावरून त्याची कल्पना येते: ‘राज्यात काय चालले आहे, याची बातमी ठेवण्यात एका क्षणाची कसूर झाली, तरी त्याबद्दल जन्मभर पस्तावण्याची पाळी येते. त्या दुष्ट शिवाच्या बंदोबस्तात थोडी हयगय झाली, त्यामुळे अखेरपर्यंत मला या युद्धाच्या यातना सारख्या भोगाव्या लागत आहेत.’[२]

शिवाजीराजांच्या या रोमांचकारी सुटकेची बातमी वाऱ्याच्या वेगाने सर्वत्र पोचली. मोगल साम्राज्याला आव्हान देणारा एकमेव अधिपती, अशी त्यांची कीर्ती साऱ्या देशात पसरली. महाराष्ट्रात तर जनतेच्या आनंदाला पारावार उरला नाही. शिवाजीराजे एक अवतारी पुरुष आहेत, अशी सर्वांची दृढ भावना झाली. राजांनी आपल्याबरोबर असलेल्या सर्व सहकाऱ्यांचा

सन्मान केला. गोरगरिबांना अन्नधान्य वाटण्यात आले. ते परतल्यावर पोर्तुगीज आणि इंग्रज व्यापारी त्यांच्याशी पुनश्च सख्य जोडण्यात जुटले. शिवाजीराजांची प्रसिद्धी पार इंग्लंड आणि इराणपर्यंत पोचली. इराणचा बादशहा शाह अब्बास याने औरंगजेबाला पाठवलेल्या पत्रात लिहिले होते, 'तुम्ही कसले आलमगीर, तुम्ही फार तर पिदरगीर (बापाला पकडणारे). तुम्हांला तो डोंगराचा चूहा शिवा, तुमच्या ताब्यात असताना पकडून ठेवणे जमले नाही आणि म्हणवता आलमगीर (जगाचे वाली)!' ३

लष्करी विलेषण

शिवाजीराजांच्या आग्र्याच्या भेटीला त्यांची आणखी एक लष्करी मोहीम असे म्हणणे योग्य होईल का? मोहिमेचे उद्दिष्ट, तिचा आराखडा आणि औरंगजेबाच्या तावडीत आपण अडकलो आहोत, याची जाणीव झाल्यावर त्यातून सहीसलामत सुटण्याची योजना या तिन्हींमागे एका कसलेल्या लष्करी सरसेनापतीची कार्यक्षमता होती, यात वाद नाही. ते केवळ एखाद्या मुरब्बी राज्यकर्त्याचे किंवा एखाद्या निपुण मुत्सद्दयाचे काम नव्हते. त्या मोहिमेचे उद्दिष्ट काहीसे अगम्य आणि दुर्बोध होते. त्याची चिरफाड करण्याआधी मोहिमेचा आराखडा आणि सुटकेचे आयोजन यांच्याकडे दृष्टिक्षेप टाकणे उपयुक्त ठरेल.

राजगडाहून दिल्लीचे अंतर सात-आठशे मैलांच्या दरम्यान होते. त्याला निदान सुमारे दोन महिन्यांचा अवधी लागणार होता. राजांनी आपल्याबरोबर आपल्या निकटच्या सल्लागारांशिवाय पाच हजार घोडेस्वार, अडीचशे निवडक पायदळ, उंट, हत्ती, बैलांचा ताफा, शंभर एक वंजारी हा मोठा लवाजमा घेतला होता. त्याबरोबर औरंगजेबाने त्यांच्या रक्षणासाठी एका वरिष्ठ अंमलदाराच्या हाताखाली एक तुकडी दिली होती. त्याचे प्रयोजन स्पष्ट होते. राजांच्या या प्रवासात त्यांनी वाटेतील मोगल प्रदेशावर कोणतेही संकट निर्माण करू नये, याची खातरजमा करण्यासाठी औरंगजेबाने राजांना हे 'सौजन्य' प्रदान केले असावे. परंतु तरीही राजे आपल्या रक्षणासाठी दुसऱ्या कोणावरही अवलंबून राहिले नाहीत. याच्यामागे निश्चितच एका कसलेल्या लष्करी नेत्याचा अनुभव आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार असण्याची प्रवृत्ती दिसते. त्यांनी त्यांच्याबरोबर जाणाऱ्या प्रत्येक सल्लागाराची आणि उर्वरित तुकडीत समाविष्ट केलेल्या प्रत्येक माणसाच्या आवश्यचकतेची कसून छाननी केली असणार. वाटेतील इतक्या मोठ्या संख्येच्या माणसांना आणि जनावरांना अन्नधान्य रसद, राहण्याची सोय या सर्वांची काटेकोर व्यवस्था केली असणार. केवळ दोन महिन्यांत हे अंतर कापायचे म्हणजे दररोज १५ ते १८ मैल चालून जाणे आवश्य.क होते. पोचायचा दिवस चुकवून चालणार नव्हते. अशा प्रकारे हा प्रवास म्हणजे एका लष्करी मोहिमेचाच भाग होता. त्याची राजांनी सखोल आखणी केली होती.

राजांच्या आग्र्याहून सुटकेच्या योजनेची तर लष्करी इतिहासातील शत्रूच्या तावडीतून सुटकेच्या सर्वश्रेष्ठ प्रसंगांत गणना होईल. राजे विस्मयजनकता आणि शाठ्य या युद्धतत्त्वाचे निष्णात जाणकार होते, हे यापूर्वीच्या कथनातून वारंवार प्रतीत झालेच आहे. गुप्तता, नावीन्य, फसवेगिरी, बेदरकारी, शीघ्रता वगैरे अनेक घटकांनी बनलेले हे एक अफलातून रसायन

असते. परंतु त्याचे सूत्र किंवा साचा कोठेही लिहिलेला सापडत नाही. यात तरबेज असलेले किमयागार प्रत्येक वेळी नवे व्यंजन शोधून काढतात. राजे असेच एक अलौकिक मदारी होते. विस्मय आणि शाठ्याची प्रत्येक योजना अघटित आणि नावीन्यपूर्ण असते. ती अत्यंत काळजीपूर्वक आखावी लागते. ती एकसंध असली पाहिजे. त्याच्यात एकाही छिद्राला वाव नसतो. त्याच्यासाठी बख्खळ सबुरी, सहनशीलता आणि सोशीकपणा लागतो. प्रत्येक पावलागणिक हालचालीचे सखोल परीक्षण लागते. आणि योजना पार पाडण्यासाठी एका उत्तम कलाकाराची प्रतिभा असावी लागते. या सर्व निकषांवर जर आग्र्याच्या सुटकेच्या योजनेचे परीक्षण केले, तर तिला शतप्रतिशत गुण प्राप्त होतील.

औरंगजेब आता आपल्याला या कैदेतून आपला अंत होईपर्यंत सोडणार नाही, याची खातरी झाल्यावर राजांनी आपला पवित्राच बदलला. आपल्याला कशातच स्वारस्य राहिले नसल्याचे दाखवण्यास त्यांनी आरंभ केला. आपल्याबरोबर आलेल्या सर्व शिबंदीला परत पाठवण्याची औरंगजेबाला किंचितही संशय येऊ न देता परवानगी मिळवली, मग त्यांनी दुखण्याचे अप्रतिम नाटक वठवले, मिठाई पाठवण्याची टूम काढली, हळूहळू त्याचे प्रमाण वाढवले, पहारेकरी काळानुसार गाफील होण्यापर्यंत ते सबुरीने मिठाई पाठवत राहिले, त्यांनी कधीही घाई केली नाही, ना त्यांनी आपली सहनशीलता गमावली. मग शेवटच्या दिवशी फर्जंदला आपल्या जागी झोपवून ते शंभूजींबरोबर बाहेर पडले आणि दुसऱ्या दिवशी सफाईने फर्जंदही सुखरूप बाहेर पडला. त्यानंतर आपल्या पुत्राला मथुरेत ठेवण्याची त्यांनी व्यवस्था केली, बैराग्याचा वेष घेतला, वाटेतील खर्चासाठी आपल्या कपड्यांच्या शिवणीत आणि पादत्राणात पैसे लपवले आणि लांब फेरे घालून ते राजगडला पोचले. जाताना पालखीतून गेलेले महाराज तो सात-आठशे मैलांचा प्रवास पायी वा घोड्यावरून करून स्वस्थानी परतले. किंबहुना वाटेत कोणालाही संशय येऊ नये म्हणून ते बैराग्याच्या वेषात पायीच गेले असावेत.

आधी म्हटल्याप्रमाणे शत्रूच्या तुरुंगातून निसटून आलेल्या युद्धकैद्यांच्या अनेक सुरस आणि रोमांचकारी सत्यकथा शब्दबद्ध आहेत, परंतु एखाद्या सरसेनापतीने शत्रूच्या तावडीतून सुटून आपल्या स्वस्थानी सुरक्षितपणे पोचल्याची अशी एकही गाथा आंतरराष्ट्रीय लष्करी इतिहासात मिळणार नाही, हे छाती ठोकून सांगता येईल. औरंगजेबासारखा हिंदुस्तानचा सर्वाधीश सम्राट त्यांचे हे शाठ्य छेदू शकला नाही, ही त्यांची महत्ता. आग्र्याहून सुटका ही अजोड बंधमुक्तीची एक अजरामर सत्यकथा आहे!

आग्र्याला जाण्यात शिवाजीराजांच्या उद्दिष्टाबद्दल वेगवेगळे मतप्रवाह आहेत. सर जदुनाथ सरकार यांच्या मते राजांची आग्र्याला भेट दोन उद्देश साध्य करण्यासाठी होती; पहिला, दक्षिणेची सुभेदारी मिळवणे आणि दुसरा, औरंगजेबाच्या हुकमाने सिद्दीकडून जंजिरा आपल्याकडे हस्तांतरित करवणे.

डॉ. बाळवृष्ण यांच्या मते या दोन उद्देशांबरोबर महाराज प्रभावी व्यक्तिमत्त्वाकरवी उत्तरेतील राजपूत राजांना आपल्या राष्ट्रकार्यात समाविष्ट करू इच्छीत होते.४ हे तिन्ही उद्देश संभाव्य आणि तर्कनिष्ठ वाटतात; परंतु त्यासाठी राजांना आपल्याबरोबर सल्लागार आणि सरदारांचा एवढा मोठा चमू नेण्याचे काय कारण होते? औरंगजेबाने त्यांच्या संरक्षणासाठी अंगरक्षकांची

तुकडी पाठवली होती. त्यांनी त्र्यंबक सोनदेव डबीर, माणकोजी हरी सबनीस, दावलजी घाटगे, दत्ताजी त्रिंबक, कवींद्र परमानंद, नीलकंठराव पारसनवीस यांच्यासारखे वरिष्ठ मुत्सद्दी सल्लागार आणि बहिर्जी नाईक, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, राघो मित्र, मुद्गलभट आर्वीकर, नारायण रामचंद्र, निराजी रावजी, हिरोजी फर्जंद, बाजी जेधे यांच्यासारखे जिवाभावाचे सरदार बरोबर नेले होते. त्यांचे त्यात काय प्रयोजन? त्याशिवाय पाच हजार घोडेस्वार, अडीचशे निवडक पायदळ, उंट, हत्ती, बैलांचा ताफा, शंभर एक वंजारी हा लवाजमा नेण्याचे काय कारण होते? बाळवृष्ण म्हणतात, त्याप्रमाणे रजपूत राजांना आपल्या राष्ट्रकार्यात ते समाविष्ट करू इच्छीत होते. कोणते हे राष्ट्रकार्य? भारतात हिंदू साम्राज्य पुनश्च उभे करण्याचे? त्याचा अर्थ औरंगजेबाला पदच्च्युत करणे हा होऊ शकतो का? मग वरील तीन उद्दिष्टांच्या बरोबर राजांना काही अतर्क्य यशाचा मागोवा घ्यायचा होता का?

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते अफझलखानाच्या भेटीप्रमाणेच औरंगजेबाच्या भेटीदरम्यान बादशहाला ठार करायचे आणि हिंदुपतपादशाहीच्या स्थापनेचा ओनामा करायचा, असा राजांचा उद्देश होता. ते लिहितात: 'शिवाजीच्या मनात औरंगजेबाला उडवण्याची व पातशाही काबीज करण्याची एक अचाट परंतु सर्वथा व्यवहार्य कल्पना आली. औरंगजेब स्वत: जातीने दक्षिणेस फार वर्षे आला नव्हता. औरंगजेबाला उचलायचे म्हणजे तो स्वत: दक्षिणेत आला पाहिजे किंवा शिवाजीने तरी उत्तरेस आग्र्याला गेले पाहिजे. पहिला मार्ग नाही, तर शिवाजीने दुसरा मार्ग पत्करला... प्रथम भेटीच्या समयी कुरनीस करण्याच्या वेळी पातशहाची आणि आपली जी लगट होईल, त्या लगटीत सिंहासनावर उडी मारून पातशहाचा निकाल लावावा आणि दरबारात जमा झालेल्या उमरावांची कत्तल करून तेथल्या तेथे हिंदुपतपादशाहीची स्थापना करावी आणि सरहद्दीवर जय्यत ठेवलेल्या सैन्याच्या जोरावर व धाकावर ती पातशाही स्थिर करावी, असा शिवाजीचा बूट होता.....परंतु औरंगजेबाला दरबारात शिवाजीला आपल्यापासून शंभर हात दूर उभे करण्याची बुद्धी आयत्या वेळी झाली म्हणून निभावले. नाहीपक्षी चकत्यांच्या पातशाहीचा 'राम बोलो' त्याचसमयी होण्याचा प्रसंग बहुतेक ठरल्यासारखाच होता.'५

बाळशास्त्री हरदास याच उद्देशाच्या संभावनेबाबत चर्चा करतात. '...राजांच्या अंत:करणाला चांगलाच निराशेचा धक्का जाणवला असला पाहिजे. त्यावरून वेगळ्या स्वरुपाची मोठी महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात घोळत असली पाहिजे, हे उघड होते. सिडने आवेन म्हणतो, 'स्वाभाविकपणेच असा प्रश्न उत्पन्न होतो की, शिवाजी इतका गंभीरपणे त्रस्त व भयंकर निराश का झाला असेल? आपण आपली भयंकर गुप्त योजना पार पाडण्यासंबंधात पूर्णपणे अवरुद्ध झालो, हे त्याच्या लक्षात आले म्हणून तर तो इतका त्रस्त आणि निराश झाला नसेल ना!' ... तात्पर्य, मोगल साम्राज्यशाहीच्या त्या मध्यकेंद्रावर चिरपरिणामी आघात करण्याचे राजांचे अभिलाषित औरंगजेबाच्या सवाई धूर्ततेने पूर्णपणे धुळीस मिळाले.'६

बाबाराव सावरकर याच्याही एक पाऊल पुढे जातात. जयसिंह आणि त्याचा पुत्र रामसिंह या दोघांचा या योजनेला पाठिंबा होता आणि तो यशस्वी झाला, तर त्याला इतर राजपुतांकडून

मदत मिळाली असती, असा त्यांच्या लिखाणाचा सूर आहे. एवढेच नव्हे, तर दरबारातील अपयशानंतर राजांनी आणखी दोन प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले आहे : 'दरबारात सिंहासनाजवळ स्थान मिळताच औरंगजेबावर झडप घालून मोगल साम्राज्याच्या नरडीचा घोट घेण्याचा राजांचा बेत औरंगजेबाच्या धूर्ततेच्या सावधपणामुळे विफल झाला. त्यानंतर विश्वास दाखवून एकांत भेटीची शिवरायांनी याचना केली. आणि त्या भेटीत औरंगजेबाचा नि:पात करण्याचे ठरवले. पण तीही साध्य झाली नाही. शिवरायांनी सैन्यबलाच्या साह्यावर काही डाव योजून सैन्याची जमवाजमव युक्तीने चालवली, पण ती पूर्ण होण्याआधी औरंगजेबाच्या कानावर जाऊन तोही मार्ग बंद केला गेला.'

या कल्पनेशी शिवाजी चरित्रकार विजय देशमुख मात्र सहमत नाहीत. ते म्हणतात, 'शुद्ध इतिहासदृष्टी बाजूला ठेवून आपल्या कल्पनेनुरूप एखाद्या घटनेचा अर्थ शोधण्याचा हा प्रकार आहे. ...कुर्निस करताना लगट होण्याचा संभवच नव्हता आणि सिंहासनावर उडी मारून पातशहाचा निकाल लावून दरबारात जमा झालेल्या सर्व उमरावांची कत्तल 'इतिहासाचार्यांचा काल्पनिक शिवाजी'च करू शकेल. प्रत्यक्षात इतिहासातील शिवाजीला ते शक्य नव्हते, हे कुणीही समंजस अभ्यासक मान्य करील.'८

स्वत:च्या मामाचा हात तोडणाऱ्या व अफझलखानासारख्या अगडबंब शरीरयष्टीच्या पराक्रमी सरदाराचा द्वंद्वात वध करणाऱ्या निधड्या वीराची भेट घेण्यास औरंगजेब सिद्ध झाला होता. शिवाजीराजांनी औरंगजेबाला जी भुरळ घातली होती, ती पाहून तत्कालीन शहाण्यांनी तोंडात बोटे घातली असतील. आपल्याला दिल्लीला बोलावण्यात त्यावेळी हिंदुस्तानात बादशाहीला असलेले एकमेव आव्हान मुळातच खुडून टाकायचे, हा औरंगजेबाचा कपटी हेतू न ओळखण्याइतके राजे मंदबुद्धी नव्हते. तो डावपेच त्याच्यावरच उलटून टाकायचा आणि अफझलखान प्रसंगाची पुनरावृत्ती करायची, हा त्यांचा मनोदय असण्यात काहीच गैर नव्हते. ही कल्पना कितीही भिंगुरवाळी वाटली, तरी राजांनी त्याआधी अफझलखानाचा वध आणि शाईस्ताखानाच्या निवासस्थानावर केलेला हल्ला हे प्रत्यक्षात आले नसते, तर या कल्पनाही इतिहासाला आणि समंजस अभ्यासकांना तितक्याच भिंगुरवाळ्या वाटल्या असत्या. किंबहुना लष्करी इतिहासात अशा राज्यक्रांतीचे दाखले उपलब्ध आहेत.

शिवाजीराजे औरंगजेबाला स्नेहालिंगन देण्यास कडेकोट बंदोबस्त करून निघाले होते. बरोबर जिवाचे जिवलग आणि छातीचे निधडे असे जातिवंत सरदार त्यांनी घेतले होते. मजल दरमजल दहादहा पाचपाच माणसे ठेवीत ठेवीत आग्र्यातील वाघाच्या गुहेत त्यांनी प्रवेश केला होता. प्रथम भेटीच्या प्रसंगी कुरनीस करण्याच्या वेळी पातशहाची आणि आपली जी लगट होईल, त्या लगटीत सिंहासनावरून उडी मारून पातशहाचा निकाल लावावा, असा त्यांचा मनोदय असण्याची शक्यता पूर्णपणे धुडकावून लावता येणार नाही. ती अतिरंजित असली, तरी शिवाजीराजांसारख्या अद्वितीय नीतिधैर्य, इच्छाशक्ती आणि धारिष्ट्य असलेल्या अलौकिक आणि प्रतिभावंत सेनानायकाच्या प्रगल्भ मनात ही कल्पना रुजू शकते, हे नाकारता येणार नाही. त्यांची सिद्ध कर्तबगारी पाहता हे अशक्य नव्हते. राजांची अद्वितीय प्रतिभा आणि असामान्य शौर्य लक्षात घेता मोगल बादशाहीचे उच्चाटन करण्यासाठी तो एकमेव उपाय होता.

सैन्यात छत्तीस वर्षे हडेलहप्पी केलेल्या आणि जागतिक पातळीवरील युद्धांदरम्यान कमांडो कारवायांचा बऱ्यापैकी अभ्यास असलेल्या या ग्रंथाच्या लेखकाचा राजवाडे, हरदास, सावरकर यांच्याशी सहमत होण्याकडे अधिक कल आहे.

औरंगजेबाने स्वत:हून बोलावलेल्या पाहुण्याचा त्याने केलेला उपमर्द घृणास्पद होता. हिंदच्या 'हजरत सलामत, कीबालाए दीनो दुनिया, अबुल मुझफ्फर मुईउद्दिन मुहम्मद औरंगजेब बहादूर आलमगीर'ला तो न शोभणारा होता. परंतु खरोखरच शिवाजीराजांना मागल्या रांगेत उभे करून त्यांना हिणवण्याचे त्याचे हेच क्षुद्र वृत्य त्याचा जीव वाचवण्यास कारणीभूत ठरले असावे का? आग्र्याला त्यांच्याबरोबर गेलेले त्यांचे चरित्रलेखक कवींद्र परमानंद यांना आपले प्रत्येक गुपित सांगणाऱ्या राजांनी याची कल्पना दिली असावी का? असली, तरी आग्र्याहून वेषांतर करून परत येताना परमानंद मारले गेले आणि हे रहस्य कायमचे काळाच्या पोटातच गाडले गेले. दुर्दैव आपले!

हंगामी स्थिरस्थावर, नंतर एल्गार

औरंगजेबाशी तह

शिवाजीराजांना परतल्यावर त्यांच्या अनुपस्थितीत स्वराज्याच्या कारभाराची व्यवस्था अंमळ सुधारल्याची पाहून हायसे वाटले. त्यांच्या माता जिजाबाईसाहेबांनी राज्यावर भक्कम नियंत्रण ठेवले होते. प्रत्येकाने आपापली कामे जबाबदारीने पार पाडली होती. कोणीही प्रतिकूल परिस्थितीचा गैरफायदा घेऊन कोणत्याही प्रकारचे बंड वा दगाबाजी केली नव्हती. दिल्लीत राहून बादशाहीच्या पोकळपणाचे निकट दर्शन राजांना घडले होते. तिकडे औरंगजेबही आपला मूल्यवान कैदी आपल्या डोळ्यांदेखत आपल्या हातावर तुरी देऊन पसार झाल्याने ओशाळला होता आणि राजांशी पुनश्च संबंध प्रस्थापित करण्यासाठी उत्सुक होता. नेहमीच्या दुटप्पीपणाला अनुसरून त्याने नेतोजी पालकरला कैद करून आग्र्याला धाडण्याचे जयसिंहाला आदेश दिले. तिथे पोचल्यावर 'मुसलमान हो, नाहीतर जन्मभर कैद भोगावी लागेल', अशी धमकी देऊन त्याला १६६७च्या फेब्रुवारीत मुसलमान धर्माची दीक्षा देण्यात आली. सुंता करून त्याचे महंमद कूलीखान असे नाव ठेवले गेले आणि त्याला महाबतखानाच्या हाताखाली अफगाणिस्तानात पाठवण्यात आले. नेतोजीने पुढील सात वर्षांत तिकडे चांगले नाव मिळवले.

स्वराज्याची नीट व्यवस्था लावण्यासाठी काही काळ शांततेची आवश्य कता असल्याची राजांना जाणीव झाली. त्याकरता राजांनी बादशाहाशी नमते धोरण अंगीकारले. मोगलांचे कोणतेही काम करावयाला तयार असल्याचे आणि आपल्या पुत्रास त्याच्या तैनातीत देऊन हुकूम पाळण्यास सज्ज असल्याचे १६६७ एप्रिलमध्ये त्यांनी बादशहाला पत्राद्वारे कळवले. त्याचे उत्तर न आल्याने त्यांनी आपला चिटणीस बाळाजी आवजी याला औरंगाबादला शहजादा मुअझ्झमकडे त्याच आशयाचे पत्र घेऊन पाठवले. योगायोगाने त्याचवेळी इराणचा शहा पंजाबवर चालून येत होता आणि पेशावरला अफगाणांचे बंडही पेटण्याच्या अवस्थेत होते. त्यामुळे राजांशी मिटते घेण्याचा औरंगजेबाने निर्णय घेतला होता. वाटाघाटीत पुरंदरचा तह

कायम करावा, असे ठरले. तो प्रस्ताव मार्च १६६८मध्ये बादशहाकडून मंजूर होऊन आला. त्याचबरोबर बादशहाने शिवरायांना 'राजे' हा किताब दिला. त्याआधी राजांनी गोव्यास वकील पाठवून पोर्तुगीजांशीही तह केला.

औरंगजेबाने शिवाजीराजांना पुरंदर तहानुसार मोगलांना दिलेल्या प्रदेशातून सरदेशमुखी गोळा करण्याची परवानगी दिली. त्यामुळे त्या प्रदेशात मराठ्यांना मुक्तपणे संचार करण्याची मुभा मिळाली. मुअझ्झम आणि त्याचा सरदार जसवंतसिंह या दोघांना राजांबरोबर नवा बखेडा उभा करायचा नव्हता, त्यामुळे त्यांनी याला विरोध केला नाही. ऑक्टोबर १६६७मध्ये संभाजीराजे औरंगाबादला मुअझ्झमबरोबर भेटीसाठी आणि त्याच्याकडून मनसब स्वीकारण्यासाठी गेले. दोघांची ४ नोव्हेंबर १६६७ला भेट झाली आणि शंभूजी रायगडला परत आले. पुढच्या वर्षी ऑगस्ट १६६८मध्ये संभाजीराजांचे सरदार सरनोबत प्रतापराव गुजर, निराजी आणि रावजी ५००० स्वारांसह औरंगाबादला कामावर रुजू झाले. त्यांतील अर्धे औरंगाबादच्या सरहद्दीवर राहिले आणि अर्धे निराजी व रावजीला वसुली गोळा करण्यास मदत करण्यासाठी वऱ्हाडात गेले.

आदिलशाही आणि पोर्तुगीजांशी समेट

शिवाजीराजांच्या अनुपस्थितीत सप्टेंबर १६६६मध्ये त्यांचा एक सुभेदार राहुजी पंडित याने दक्षिण कोकणातील रांगणा किल्ल्याचा ताबा रुस्तुम-इ-झमाकडून घेतला होता. पुढच्या वर्षी एप्रिल १६६७ मध्ये आदिलशहाचे सरदार बहलोलखान आणि राजांचे सावत्र बंधू व्यंकोजी भोसले यांनी या किल्ल्याला वेढा घातला. त्यावर सैन्य घेऊन शिवाजीराजे स्वत: गेले. आदिलशहाला प्रकरण वाढू द्यायचे नव्हते. त्याने ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये शिवाजीराजांशी तह केला आणि त्यांना दरवर्षी १२ लाख रुपये देण्याचे कबूल केले. गोवळकोंड्याच्या कुतुबशहानेही राजांबरोबर तह केला आणि सालाना २० लाख रुपयांची खंडणी देण्याचे मान्य केले.

हिंदुविरोधी धोरण अवलंबणारा गोव्याचा गव्हर्नर कोंडे द सान विन्सेंट हिंदूंवर अत्याचार करत होता. त्याने राजांशी दगाबाजी करणाऱ्या लखम सावंतलाही आश्रय दिला होता आणि स्वराज्याचा प्रदेश लुटण्याची मुभा दिली होती. पोर्तुगीजांनी, जर मोबदला दिला गेला, तर मराठ्यांच्या आरमारावर हल्ला करण्याचे आश्वासनही मोगलांना दिले होते. परंतु राजे परत आल्यावर मात्र तो हबकला आणि त्याने अभिनंदनपर संदेश पाठवला. उत्तर गोव्यातील बार्डेजमधील जे नागरिक ख्रिश्चन नाहीत, त्यांनी आपला धर्म सोडावा किंवा गोव्यातून निघून जावे, असे फर्मानही त्या गव्हर्नरने १६७७ मध्ये जारी केले होते. त्याच्या आदेशावरून चार पाद्री हिंदूंचे धर्मांतर करण्यासाठी खेड्यांमध्ये फिरत होते. शिवाजीराजांनी त्याच्याकडे या सर्व बाबतींत विरोध प्रदर्शित केला; परंतु त्याचा काहीच परिणाम झाला नाही. शेवटी शिवाजीराजे ५०००ची शिबंदी घेऊन गोव्यापाशी पोचले. त्यांनी गोव्यातील कवळे किल्ल्यावर हल्ला चढवला आणि ते चार पाद्री व १३०० लोक पकडले. पोर्तुगीज तीन दिवसांत शरण आले. यापुढे हिंदूंचे सक्तीने धर्मांतर केले जाणार नाही आणि लखम सावंतला आसरा दिला जाणार नाही, याची

हमी गव्हर्नरकडून घेऊनच ते २६ नोव्हेंबरला परतले.

अशा प्रकारे पोर्तुगीजांचा पराभव करणारे शिवराय पहिले भारतीय राजे ठरले. मोगलांचे सुभेदार, जंजिऱ्याचा सिद्दी, आदिलशहा आणि कुतुबशहा या सर्वांकडून राजांना स्वतंत्र राजाचा मान मिळू लागला.

पुनश्च एल्गार

जयसिंहानंतर शहजादा मुअझ्झम दक्षिणेचा कारभार पाहत होता. जसवंतसिंह त्याच्या हाताखाली होता. दिलेरखानालाही बादशहाने दक्षिणेत नेमले होते. दिलेरखान जसवंतसिंहाला पाण्यात पाही. बिकानेरचा राजा रावकर्ण राठोड दिलेरखानाच्या हाताखाली काम करीत असे. राठोडने आपली छावणी लुटल्याची तक्रार दिलेरखानाने बादशहाकडे केली. राठोडला कैद करावे, असा हुकुम बादशहाने पाठवला, परंतु शहजाद्याने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे मुअझ्झम आणि दिलेरखानात वाकडे आले. तसाही खान बादशहाकडे शहजाद्याच्या चहाड्या सांगत असे, ते शहजाद्याला आवडत नसे. औरंगाबादमध्ये राहणारे प्रतापराव गुजर आणि निराजी रावजी यांचे मुअझ्झमशी सूत दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चालले होते. हे खानाच्या पथ्यावर पडणे कदापि शक्य नव्हते. त्याने बादशहाकडे चुगली केली. राजांच्या या सरदारांशी संगनमत करून आपला पुत्र आपल्याला पदच्युत करील का, याची धास्ती बादशाहाला पडली. त्याने दोन्ही मराठा सरदारांना कैद करण्याचा हुकूम सोडला. परंतु तो हुकूम हातात पडण्याआधीच त्याची माहिती मिळाल्याने मुअझ्झमने त्या दोघांना निघून जायला सांगितले.

१६६९मध्ये औरंगजेबाने राजपुतांशी भांडण सुरू केले. ९ एप्रिल १६६९ला त्याने ठिकठिकाणची मंदिरे पाडण्याचा हुकुम दिला. त्यानुसार ऑगस्ट महिन्यात काशी विश्वेश्वराचे मंदिर पाडून तेथे एक भव्य मशीद उभारली. शिवाजीराजांच्या संतापाला पारावार उरला नाही. हळूहळू औरंगजेबाच्या धर्मांधतेला पुनश्च आव्हान देण्याची भावना त्यांच्या मनात घर करू लागली.

१६७०मध्ये दिलेरखान आणि मुअझ्झम यांचे भांडण शिगेस पोचले. कोण खरे सांगतो आणि कोण खोटे बोलतो, याचा अंदाज घेण्यासाठी औरंगजेबाने इफ्तिकारखान नावाचा त्याचा विश्वासू माणूस पाठवला; परंतु त्यामुळे प्रकरण अधिकच बिघडले. दिलेरखान स्वत: जाऊन बादशहाला भेटण्यासाठी सैन्यासह उत्तरेस निघाला, तेव्हा मुअझ्झमने तो बंड उभारून उत्तरेस निघाला आहे, असे बापास कळवले. त्यावर त्याला पकडून कैद करण्याचा हुकूम बादशहाने सोडला. शहजादा आणि जसवंतसिंह दिलेरखानाचा पाठलाग करू लागले. त्यांनी राजांनाही मदतीस बोलावले. सर्वत्र याचा गवगवा झाला. हे सर्व कळल्यावर बादशहाने शहजाद्याला औरंगाबादेस परतायला सांगितले. दिलेरखान माळव्यात निघून गेला आणि प्रकरण तात्पुरते मिटले. बादशहा आपणहून संकटे ओढवून घेत होता.

पुरंदर तहाच्या आधी राजांवर जसे संकटाचे ढग जमा होत होते, तशी आता बादशहाची अवस्था झाली होती. याचा फायदा करून घेण्याचा राजांनी निर्णय घेतला. किंबहुना पुरंदरचा

तह करतानासुद्धा परिस्थिती बदलल्यावर हे सर्व किल्ले आपण परत घेऊ, अशी राजांची खातरी होती. तो समय कदाचित येऊन ठेपला होता.

शिवाजीराजांनी १६७०मध्ये मोगलांविरुद्ध चढाई का सुरू केली असावी, याबद्दल अलीकडेच हैदराबाद राज्य पुराभिलेखागारात मिळालेल्या कागदपत्रांवरून नव्याने माहिती मिळाली आहे. त्यानुसार औरंगजेबाने १६७०च्या सुमारास स्वराज्यावर आक्रमक हल्ले चढवण्याची योजना आखली होती. या योजनेची कुणकुण लागल्यामुळे शिवाजीराजांनी मोगलांच्या आधीच आक्रमणाला सुरुवात केली आणि पुरंदरच्या तहात गमावलेला मुलूख परत घेण्याचा सपाटा सुरू केला.९

राजांनी फौजा चोहोंकडे धाडून मोगलांचा मुलूख लुटण्यास आरंभ केला. वऱ्हाड प्रांतातून २० लाख रक्कम गोळा केली. औसा प्रांत लुटला. औरंगजेबाने त्याबद्दलच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले. उलट त्याने दक्षिणेतील फौज कमी केली. त्या लोकांना राजांनी आपल्या सैन्यात घेतले. राजांना दिल्लीला जाताना दिलेले एक लाख रुपये शंभूराजांच्या जहागिरीतून औरंगजेबाने कापून घेतले. दिलेरखानाला देवगडाहून आणि खानदेशातून दाऊदखानाला परत बोलावण्यात आले. औरंगजेब तह मोडून राजांविरुद्ध पुन्हा आक्रमणाची तयारी करीत होता, हे स्पष्ट झाले. दोन्ही बाजूंनी पुरंदर तहाला मूठमाती देण्याचे ठरवले होते. आक्रमणाच्या एल्गाराने पुनश्च उसळी घेतली! राजांची पहिली नजर सिंहगडावर पडली.

सिंहगडावरील रणयज्ञ

सिंहगड किल्ला आणि परिसराची ठेवण

पुण्याच्या नैर्ऋत्येस बारा मैलांवर असलेला सिंहगड किल्ला परिसरातील डोंगरसऱ्यांत सर्वांत उंच आहे. (नकाशा क्र. २२ पाहा.) त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ४३३० फूट असून सभोवतालच्या प्रदेशापेक्षा तो सुमारे २३०० फूट उंच आहे. उत्तरेकडून आणि दक्षिणेकडून किल्ल्याचा चढ कठीण आहे. त्यांच्या शेवटी ४० फूट उंचीचा खडक आहे. त्यामुळे गडाची संरक्षणक्षमता आणखीनच वाढते. किल्ल्याचा आकार कुऱ्हाडीप्रमाणे असून त्याचा परीघ सुमारे तीन किलोमीटर आहे. किल्ल्यावर पोचण्यासाठी ईशान्य आणि आग्नेय दिशांनी मार्ग आहेत. दोन्ही मार्गांवर किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी भक्कम प्रवेशद्वारे आहेत. ईशान्येकडील प्रवेशद्वाराला पुणे दरवाजा आणि आग्नेय दिशेच्या दरवाज्याला कल्याण दरवाजा अशी नावे आहेत. पश्चिम दिशेचा दर्शनी भाग काहीसा सरळसोट आहे, पण तरीही संरक्षणाच्या दृष्टिकोनातून बाकीच्या बाजूंच्या तुलनेत काहीसा संवेदनशील आहे. खडकावर चढण्यात तरबेज असलेल्या प्रशिक्षित सैनिकांना दोरखंडाच्या साहाय्याने रात्रीच्या वेळी तो चढून जाऊन किल्ल्यात प्रवेश करणे शक्य आहे.


सिंहगडाचा परिसर सह्याद्री पर्वतराजीचा भाग असल्याने डोंगराळी आहे. उत्तरेत सिंहगड, दक्षिणेत राजगड आणि पूर्वेस पुरंदर या किल्ल्यांचा त्रिकोणी आकार बनतो. त्याकाळात त्यांना एकमेकांशी जोडणाऱ्या वाटा उपलब्ध होत्या. राजगड किल्ल्यावरून उत्तरेला खामगावपर्यंत

रस्ता होता. तो विंडसाई खिंडीतून जाई. विंडसाईच्या खिंडीनंतर ईशान्य दिशेने वळल्यावर दोनतीन किलोमीटरच्या अंतरावर सह्याद्रीच्या पश्चिम बाजूचा दोणागिरीचा सरळसोट कडा होता. दोणागिरी कड्यावरून पाणी त्याच्या खाली असलेल्या एका नाल्यामधून पश्चिमेकडे वाहून जाई. कड्याखाली घनदाट जंगल होते. सिंहगडच्या दक्षिणेला कल्याण नावाच्या गावावरून कल्याण दरवाज्यापर्यंत वाट होती. तशीच उत्तरेकडे पुणे दरवाजातून पुण्याकडे जाणारा मार्ग होता. कल्याणपासून पूर्वेकडे कोंडणपूर-खेड शिवापूर वाट होती. तिथून उत्तरेस पुण्यास जाणारा आणखी एक मार्ग होता. दक्षिणोत्तर वाहणारी शिवगंगा आणि पूर्व-पश्चिम वाहणारी गंजौनी या दोन नद्या या परिसरातून वाहत होत्या. राजगड-खामगाव रस्त्रयावर गंजौनी नदीच्या उत्तरेला रस्त्रयाचा एक फाटा पूर्वेस नसरापूरला पोचत होता. तिथून पुरंदरला जाण्यासाठी वाट होती. हा सर्व परिसर डोंगराळ आणि जंगलाने भरलेला होता. त्यात हालचाल करणे हे अत्यंत कष्टप्रद आणि वेळखाऊ काम होते.

नकाशा क्र. २२

सिंहगडची लढाई

मार्च १६७०



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

सिंहगडावर स्वारी

मुअझ्झम आणि सरदार दिलेरसिंग या दोघांच्यात चाललेल्या सुंदोपसुंदीचा फायदा घेऊन स्वराज्याचे स्थान बळकट करण्याची मोहीम राजांनी हाती घेण्याचे ठरवले. त्यासाठी सर्वप्रथम सिंहगड आणि पुरंदर किल्ले काबीज करण्याचे उद्दिष्ट त्यांनी आपल्यापुढे ठेवले. त्याकरवी राजगडाच्या सुरक्षिततेला बळकटी मिळण्याबरोबर राजगडाकडे येणारे उत्तरेकडील व पूर्वेकडील दळणवळण मार्ग मोकळे होण्यास मदत मिळणार होती. त्यामुळे सर्वप्रथम सिंहगडाकडे मोर्चा वळवण्याचे त्यांनी ठरवले.

जर कल्याण दरवाज्याच्या किंवा पुणे दरवाज्याच्या बाजूने हल्ला चढवला, तर शत्रू तो किल्ला यशस्वीपणे अनेक दिवस लढवू शकला असता. केवळ वेढा घालून तो सर होणार नव्हता. मराठ्यांच्या हातांत काही काळापूर्वी तो किल्ला असताना राजांनीच तो जसवंतसिंहाच्या वेढ्याविरुद्ध अनेक दिवस लढवला होता. परंतु तो किल्ला त्यांना पुरंदर तहानुसार मोगलांना द्यावा लागला होता. मोगलांनी किल्ल्यावर उदयभानू या ३८ वर्षे वयाच्या किल्लेदाराच्या हाताखाली १५०० राजपूत आणि मुसलमान सैनिकांची तुकडी ठेवली होती. उदयभानू हा कसलेला सेनापती होता. किल्ल्याच्या सुरक्षिततेची तो अत्यंत कटाक्षाने काळजी घेत असे आणि त्यात कोणतीही कसर ठेवत नसे. तटबंदीच्या परिघावर चोवीस तास पहारा देण्यासाठी ठिकठिकाणी संत्री (पहारेकरी) नेमलेले होते आणि ते जातीने गस्त घालत असत. किल्ल्यावरील संत्री कोणतीही कुचराई करत नाहीत, याची पडताळणी करण्यासाठी उदयभानू स्वत: वारंवार पाहणी करीत असे. किल्ल्यात हत्यारे, दारूगोळा आणि खाद्यपदार्थांचा पुरेसा साठा होता. शत्रूने वेढा घातला, तरी दीर्घ कालावधीपर्यंत तो लढवण्याची त्यांची जय्यत तयारी होती. शिवाजीराजांपाशी इतक्या अभेद्य किल्ल्याला वेढा घालण्यासाठी ना पुरेशी शिबंदी होती, ना इतका वेळ होता. पण त्याहीपेक्षा किल्ल्याला वेढा घालून तो जिंकण्याच्या निर्बुद्ध डावपेचांचे त्यांना वावडे होते. त्यांच्या मते सिंहगड जिंकण्याचा एकच पर्याय म्हणजे शत्रूला थोडीशीही चाहूल लागू न देता त्याच्यावर अचानक हल्ला चढवायचा.

शिवाजीराजांनी आपले विश्वासू आणि कर्तबगार सेनापती एकत्र बोलावले आणि सिंहगडावर हल्ला करण्यासाठी कोण तयार आहे, याची विचारणा केली. अनेक सरदार पुढे झाले. त्यातून तानाजी मालुसरेची राजांनी निवड केली. राजांच्या ईश्वरी युद्धप्रतिभेतून प्रेरणा घेऊन अनेक शूर आणि खंबीर अनुयायी स्वराज्याचे नामांकित सेनापती म्हणून नावारूपाला आले. त्यांतील एक म्हणजे तानाजी मालुसरे. राजांनी सुचवल्यानुसार पश्चिम दिशेचा कडा शत्रूस नकळत पार करून मागील बाजूने हल्ला चढवला, तर थोड्या शिबंदीकरवी किल्ला सर करणे शक्य होईल, असा तानाजीला विश्वास होता. दोणागिरी कड्यामार्गे हल्ल्याची बेडर योजना तानाजीसारख्या सेनापतीला भावणे स्वाभाविक होते. त्याला राजांनी अर्थातच संमती दिली. त्याच्याबरोबर त्याचा भाऊ सूर्याजी आणि ५०० मावळ्यांची तुकडी पाठवण्याचा आदेश राजांनी दिला.

हल्ल्याचा आराखडा

तानाजी मालुसरेला 'मला सिंहगड हवा आहे', असे शिवाजीराजांनी सांगितले आणि पुढच्याच दिवशी रात्री तानाजीने तो जिंकला, या आणि अशा केवळ भाकडकथा आहेत. अशा अवघड कारवाईची सर्वप्रथम सखोल योजना बनवणे आवश्यणक होते. दोणागिरी कड्यापर्यंत जाण्याच्या मार्गाची आणि कडा चढण्याच्या बाजूची अचूक टेहळणी करणे, योग्य शिबंदीची निवड करणे, तुकडीतील प्रत्येक सैनिकाचे कारवाईबद्दल सखोल उद्बोधन (ब्रीफिंग) करणे, दोणागिरीसारखाच आपल्या प्रदेशातील एक कडा निवडून दोरखंड घेऊन चढणाऱ्या मावळ्यांची पुन:पुन्हा तालीम करणे, रात्री वाट चुकू नये म्हणून आधीच वाटाडे जागोजागी पेरून ठेवणे या सर्व कारवाया पूर्ण करण्यासाठी पुरेशा कालावधीची गरज होती. लक्ष्यापर्यंत वाटचालीदरम्यान शत्रूला कोणतीही चाहूल लागू न देणे, तिच्यासाठी पुरेसा अवसर प्राप्त करून देणे, राखीव वेळ हाताशी असणे या सर्वांची तजवीज करणे आवश्यअक होते. त्यानंतरच हल्ला चढवला जाऊ शकत होता. तानाजीसारख्या मुरब्बी सेनापतीने या सर्व प्रक्रिया काळजीपूर्वक पार पाडण्याची दक्षता निश्‍चितच घेतली असणार. त्यासाठी पाच-सहा दिवसांचा अवधी लागला असावा.

कारवाईचे तीन भाग होते. पहिला, रायगडापासून दोणागिरी कड्याच्या तळापर्यंत आगेकूच; दुसरा, कड्यावरून चढून किल्ल्यात प्रवेश आणि तिसरा, शत्रूवर प्रत्यक्ष हल्ला. निघण्याच्या जागेपासून पार तटबंदीपावेतो टेहळणी आधी दोन-तीनदा गुप्तपणे केली जाणे आवश्ययक होते. चढ-उताराचे आणि काट्या-ुट्यांनी भरलेले घनदाट जंगलातील दहा-बारा मैलांचे अंतर पार करण्यासाठी निदान आठ ते नऊ तास लागणे प्राप्त होते. ही हालचाल अत्यंत गुप्तपणे, आवाज न करता आणि वाटेत कुत्रयांना चाहूल न देता पार करणे आवश्ययक होते. त्यानंतर तीन-चार मावळे एकतर कमरेला साधारण दोनशे फुटांचे दोरखंड बांधून किंवा पुढील परिच्छेदात नमूद केलेल्या पद्धतीने घोरपडीचा उपयोग करून दोरखंड कड्यावरून चढवणार होते आणि ते दोरखंड तटबंदीवर झाडांना गच्च बांधणार होते. दोरखंड बांधल्यावर लागलीच जवळपास जर एखादा-दुसरा पहारेकरी गस्त घालत असेल, तर त्यांना आवाज न होऊ देता यमसदनाला पाठवण्याचे काम या मावळ्यांचे होते. दोन-तीन दोरखंड वरपर्यंत पोचल्याची आणि जवळपास शत्रूचे पहारेकरी नसल्याची आधी निश्‍चित केलेल्या संकेतानुसार खातरी झाल्यावर मावळे दोरावर चढून जाण्याची कारवाई सुरू करणार होते. म्हणजे प्रत्येक दोरखंडाद्वारे दीड-पावणेदोनशे मावळे चढणार होते. यासाठी सुमारे अडीच-तीन तास लागणार होते. जोपर्यंत किमान तीन-साडेतीनशे मावळे वर पोचत नाहीत, तोपर्यंत चढाई सुरू करणे शक्य नव्हते. हे सर्व संपल्यावर मगच तानाजी हल्ला करण्याचा आदेश देणार होता.

हल्ला चढवणारी पूर्ण तुकडी घोरपडीच्या साहाय्याने दोणागिरीचा कडा चढून गेली, या सुपरिचित दंतकथेवर विश्वास ठेवणे अवघड आहे. एक तर घोरपड पूर्ण तुकडीचे वजन पेलू शकली नसती, त्याचबरोबर इतकी महत्त्वाची लष्करी कारवाई एखाद्या घोरपडीच्या बळावर पुरी करण्याची अपेक्षा करणे हेच मुळी चूक ठरले असते. प्रत्यक्षात सुरुवातीला एक हलकी दोरी वर नेण्यासाठी घोरपडीचा उपयोग केला जात असे. त्यानंतरची कारवाई पुढीलप्रमाणे

केली जात असे : घोरपडीच्या अंगाला दोरी बांधायची, घोरपड जसजशी वर चढून खोबणीत बसेल, तसतसे त्याच्यावर एका माणसाने चढायचे, टप्प्याटप्प्याने ती दोरी वर न्यायची आणि किल्ल्याच्या तटावर पोचल्यावर त्या माणसाने घोरपडीला सोडून ती दोरी तटावर बांधायची, मग त्या पहिल्या दोरीच्या द्वारे मोठे दोरखंड त्याने खेचून घ्यायचे आणि त्यांची टोके एखाद्या झाडाला किंवा स्तंभाला बांधायची. त्यानंतर त्या दोराच्या साहाय्याने बाकीच्या लोकांनी वर चढून जायचे.

दोरखंड किल्ल्याच्या तटापर्यंत पोचवण्यासाठी तीन पर्याय उपलब्ध होते: पहिला, आधीच्या रात्री माणसे चढवून दोरखंड वर न्यायचे, ते तिथे लपवून ठेवायचे आणि हल्ल्याच्या दिवशी तुकडी किल्ल्यापाशी पोचल्यानंतर ते खाली सोडायचे. यात शत्रूला याचा माग लागण्याची जोखीम होती; परंतु प्रत्यक्ष हल्ल्याच्या रात्री मूल्यवान वेळ दवडावा लागला नसता, हा त्याचा फायदा होता. दुसरा, किल्ल्यावरील वश करून घेतलेल्या एक-दोन माणसांनी ते दोर दिवसा गुप्तपणे न्यायचे आणि ऐनवेळी वरून खाली सोडायचे. अशी माणसे मिळणे अर्थातच अवघड होते. तिसरा पर्याय हल्ला करणाऱ्या तुकडीनेच हे दोर वर नमूद केलेल्या पद्धतीने नेण्याची व्यवस्था करायची. हा सर्वांत सुरक्षित आणि तर्कनिष्ठ पर्याय होता. तोच अमलात आला असावा.

निघण्याच्या जागेपासून किल्ल्याच्या तटबंदीपर्यंत किमान तीन-साडेतीनशे मावळ्यांना पोचण्यासाठी बारा ते तेरा तासांचा अवधी लागणार होता. काळोखाचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी चंद्र चौथ्या कलेत असेल आणि उशिरा उगवेल, अशा दिवसाची निवड करणे आवश्याक होते. त्यामुळे राजगडापासून दोणागिरीच्या पायथ्यापर्यंत वाटचाल आणि नंतर निदान पाऊण तुकडीने तरी कडा चढून करण्याची प्रक्रिरया अंधारात पुरी करता आली असती. किल्ल्यावर पहाटे दोन-अडीचच्या सुमारास पोचण्यासाठी तुकडीने रायगडाहून आदल्या दिवशी दुपारी एक-दीडला निघण्याची आवश्यसकता होती. दिवसाढवळ्या तुकडीची हालचाल कदाचित कोणी पाहिली आणि त्याची बातमी गडावर पोचली, तर सारेच बिघडण्याची शक्यता होती. यासाठी ही वाटचाल चोरपावलाने पार पाडणे आणि पूर्ण तुकडी दोन-दोन व तीन-तीन जणांच्या गटांत विभागण्याची आवश्याकता होती. दहा-बारा मैलांची वाटचाल करून नंतर दोरखंडांच्या साहाय्याने वर चढून जाईस्तोपर्यंत मावळे दमून जाणे स्वाभाविक होते. हे टाळण्यासाठी तुकडीने एक रात्र आधी निघून गडाजवळ दिवसभर लपून राहायचे आणि अंधार पडल्यावर कड्यापाशी पोचून वर चढायला आरंभ करायचा, हा दुसरा पर्याय उपलब्ध होता. एक दिवस आधीच जाऊन बसल्यास मावळे दमले नसते आणि प्रत्यक्ष चढाई व हल्ल्याला पुरेसा वेळ मिळाला असता. परंतु किल्ल्यावरच्या शत्रूला त्याचा माग लागला, तर सगळीच कारवाई धुळीला मिळाली असती.

दोरखंड वर चढवण्यासाठी आणि किल्ल्याच्या पायथ्यापाशी पोचण्यासाठी या वेगवेगळ्या पर्यायांपैकी तानाजीने कोणते पर्याय निवडले असतील, याचा बखरींमध्ये कोठेच उल्लेख सापडत नाही. परंतु या सर्वांचा त्याने सारासार विचार केला असणार, हे मात्र निश्चित...

सिंहगडावर चढाई

हल्ला ४-५ फेब्रुवारी १६७०च्या रात्री करण्याचे ठरले. त्या दिवशी रात्री चंद्र पहाटे दोन वाजता उगवणार होता. संध्याकाळी सात वाजता सूर्य मावळल्यावर चंद्र उगवण्याआधीच्या काळ्युाट्ट काळोखाचा सुमारे सात तासांचा अवधी त्यांना दोणागिरीपर्यंत पोचण्यासाठी आणि कडा चढण्यासाठी मिळणार होता.

४ फेब्रुवारीच्या दुपारी मध्यान्हीच्या सुमारास तानाजी, त्याचे बंधू सूर्याजी आणि सुमारे पाचशे मावळ्यांची तुकडी रायगडाहून रवाना झाली. खामगावजवळ पोचल्यावर गावापाशी न जाता दुरूनच वळसा घालून ते नाल्याजवळ पोचले. गावातली कुत्री भुंकून चाहूल लागू नये म्हणून ही खबरदारी. दोणागिरीच्या पायथ्याशी वाट न चुकता पोचण्यासाठी ते नाल्यात घनदाट झाडी असूनही त्याच्या काठाकाठाने गेले. कड्याच्या खाली पूर्वनियोजित तळावर याला 'फर्म बेस' म्हणतात पोचल्यावर तुकडी आसपास पांगली. मग कड्यावर चढण्यात तरबेज असलेल्या चार मावळ्यांना तानाजीने चढाई सुरू करण्याची आज्ञा दिली. चारपाच दिवसांपूर्वी त्याने ही जागा पाहिली होती आणि अर्धाअधिक कडा चढून त्याचा अंदाज घेतला होता. त्यामुळे आपण हे काम पुरे करू, याचा त्याला आत्मविश्वास होता. सर्वसाधारण इतिहासाच्या पुस्तकात दोन मावळे दोर घेऊन पाठवले होते, असा उल्लेख सापडत असला, तरी निदान पाच-सहा मावळे तरी दोर घेऊन पाठवले असावेत. त्यांपैकी किमान तीन-चार तरी तटबंदीवर पोचावेत, हा उद्देश असणार. कोणत्याही लष्करी योजनेत अशा प्रकारे नेहमी राखीव संसाधनांची व्यवस्था केली जाते.

तटबंदीवर पोचल्यानंतर दोन-तीन दोरखंड खाली सोडण्यात आले. दोन-अडीच तासांत साधारण तीनशे मावळे वर पोचले. त्यांच्यात तानाजी आणि सूर्याजी या दोघांचाही समावेश होता. तेवढ्यात शत्रूच्या एका पहारेकऱ्याला कोणीतरी कड्यावर चढत आहे, अशी शंका आली आणि त्याने आरडाओरड केली. त्याची ताबडतोब खांडोळी झालीच, परंतु सारा गड जागा झाला. मग मात्र आता बाकीच्यांची वाट पाहत न बसण्याचा तानाजींने निर्णय घेतला आणि वर पोचलेल्या मावळ्यांना हल्ला चढवण्याचा आदेश दिला. 'हर हर महादेव'चा गजर करीत सर्वजण त्वेषाने कल्याण दरवाज्याच्या दिशेने धावले.

३०० मावळे आणि शत्रूच्या १५०० शिपायांमध्ये सामना होता. मावळे इतक्या परिश्रमानंतरही नव्या अवसानाने पेटलेले आणि आवेशाने परिपूर्ण होते. शत्रूचे शिपाई मात्र अर्धवट झोपेत आणि अचानक हल्ल्याने स्तिमित झालेल्या अवस्थेत होते. मावळे केवळ आपल्या ढाल-तलवारीसह आले होते. शत्रूकडे मात्र भाले-बरचे, बंदुका, तलवारी वगैरे सर्व अवजारे होती. घनघोर लढाई जुंपली. तानाजी उदयभानूला सामोरा गेला. त्या दोघा उत्तम तलवारबहाद्दरांत कडवे द्वंद्व जुंपले. उदयभानू एक मुरब्बी लढवय्या होता; तरीही काही वेळातच तानाजीने त्याचे धड त्याच्या शरीरापासून वेगळे केले. परंतु त्या दरम्यान तानाजीची ढाल तुटल्यामुळे उदयभानूच्या तलवारीचे वार सपासप त्याच्या अंगा-खांद्यावर बसले. त्यामुळे तानाजीलाही जबर जखमा झाल्या. उदयभानूला गारद केल्यावर तो लढत राहिला, परंतु लवकरच जमिनीवर कोसळला.

तानाजी खाली पडलेला पाहून मावळ्यांच्यात कोलाहल माजला, परंतु सूर्याजीने ओरडून त्यांना दिलासा दिला आणि लढत राहण्याचा आदेश दिला. त्यादरम्यान उरलेले मावळे चढून किल्ल्याच्या तटबंदीवर पोचले होते. तेही लढाईत सामील झाले. आता मात्र मराठ्यांचे पारडे काहीसे जड झाले. काही काळातच शत्रूचे बहुतांश सैनिक मारले गेले आणि उरलेले शरण आले. सिंहगड सूर्याजीच्या हातात पडला होता. परंतु त्यासाठी बऱ्याच मावळ्यांच्या प्राणांची आहुती द्यावी लागली होती. मराठा स्वराज्यासाठी त्यांनी सर्वोच्च त्याग करून हौतात्म्य प्राप्त केले होते. सर्वजण गेल्या सतरा-अठरा तासांच्या परिश्रमाने थकून गेले होते, परंतु त्यांच्यात एक नवीनच ऊर्जा निर्माण झाली होती. 'शिवाजी महाराज की जय', 'नरवीर तानाजीचा विजय असो', या घोषणांनी सर्व परिसर दुमदुमून गेला होता.

सूर्याजीने आठ-दहा मावळ्यांच्या तुकड्या साऱ्या गडाची पाहणी करून उरल्या-सुरल्या शत्रूच्या सैनिकांना पकडून आणण्यासाठी पाठवल्या. गडाचे कल्याण आणि पुणे दरवाजे सताड उघडण्यात आले आणि खामगाव-कोंडणपूर व आसपासच्या गावांतले नागरिक गडावर येऊ लागले. पहाटेचे साडेचार-पाच वाजत होते, पूर्वेस तांबडे फुटण्याच्या मार्गावर होते. सूर्याजीने गवताच्या दोन-तीन गंज्या पेटवल्या. रायगडावर शिवाजीराजे त्या परवलीच्या संकेताची आतुरतेने वाट पाहत होते. ज्वाळा धगधगू लागल्या, त्या रायगडावरून राजांना दिसल्या. त्या पाहून मोहीम फत्ते झाल्याचा संदेश त्यांना मिळाला. जिजामाता आणि राजांच्या हर्षाला पारावर उरला नाही.

गड आला, पण सिंह गेला...

दुपारी मध्यान्हीला सूर्याजी रायगडावर पोचला. कोणत्या शब्दाने आपल्या ज्येष्ठ बंधूच्या हौतात्म्याची बातमी राजांना देऊ, या विवंचनेत तो पडला होता. परंतु राजे त्याला पाहिल्यावरच सर्व काही समजले होते. एक बालेकिल्ला सर झाला होता, परंतु त्यासाठी शूरतेचा मेरुमणी आणि त्यांचा उजवा हात असलेल्या तानाजीची किंमत त्यांना चुकती करावी लागली होती. राजांनी त्यावेळी उस्फूर्तपणे त्याचे 'सिंहगड' नाव ठेवले, असे लोककथांमध्ये सांगितले जाते. परंतु त्या किल्ल्याला सिंहगड आणि कोंडाणा या दोन नावांनी त्याच्या आधीपासून ओळखले जात असे. किंबहुना राजांनी ३ एप्रिल १६६३रोजी लिहिलेल्या पत्रातही कोंडाण्याचा सिंहगड या नावाने उल्लेख सापडतो. सिंहगड परत मिळाला होता; पण स्वराज्याचा सिंह मात्र हरपला होता. भावनातिशयाने सद्‌गदित होऊन राजांनी काढलेले उद्‌गार मग ती कोण्या इतिहासकाराची कविकल्पना का असेना मराठी मनमनात चिरंतन कोरले गेले आहेत 'गड आला, पण सिंह गेला!'

तेव्हापासून पुण्याच्या नैर्ऋत्येस उभा ठाकलेला तो अजस्र गड गेली साडेतीनशे वर्षे साऱ्या महाराष्ट्राला बेडर शौर्याची, पारदर्शक स्वामिनिष्ठेची आणि मातृभूमीसाठी परम त्यागाची शिकवण देत आहे. वास्तविक ५ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासातील 'स्वार्थत्याग दिन' म्हणून साजरा झाला पाहिजे.

लष्करी विलेषण

सिंहगड किल्ल्यावर अत्यंत दुर्गम मार्गाने चढाई करून शत्रूला हरवण्यासाठी तानाजीने घातलेली धाड ही लष्करी इतिहासात एक अजरामर साहसी 'कमांडो रेड' म्हणून ओळखली जाते आणि सैनिकी प्रशाळांत प्रशिक्षणादरम्यान अभ्यासलीही जाते.

सिंहगड काबीज करण्याची योजना ही खरोखरच आधुनिक लष्करी शास्त्रातील एक 'टेक्स्ट बुक' कारवाई आहे. 'तानाजीने राजांची आज्ञा झाल्यावर एका दिवसात सिंहगड काबीज केला' किंवा 'तो घोरपडीच्या साहाय्याने सरसर पश्चिमेचा कडा चढून गेला', अशा काहीशा भावनातिरेकी विधानांना तर्कनिष्ठ लष्करी विलेषणात स्थान नसते. सुबुद्ध आणि काटेकोर योजनेशिवाय अशी कारवाई यशस्वी होणे शक्य नव्हते आणि त्याचे संपूर्ण श्रेय तानाजीच्या खात्यातच गेले पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणे या कारवाईचे तीन टप्पे होते; किल्ल्याच्या पश्चिमेकडील पायथ्यापर्यंत वाटचाल, दोणागिरी कडा सर्व तुकडीने चढून जाण्याची प्रक्रिया आणि आपल्यापेक्षा संख्येने अनेक पटींनी जास्त असलेल्या शत्रूचा पराभव. या तिन्ही टप्प्यांतील यशाचे एकमेव गमक म्हणजे शत्रूला फसवून त्याला स्तिमित करण्याचे कसब.

सिंहगडावरील विजय हा 'विस्मयकारकता आणि शाठ्य' या युद्धतत्त्वाचा खरोखर सर्वांगपूर्ण व अप्रतिम आविष्कार! सर्वप्रथम पुरंदर तहाचे आपण उल्लंघन करणार आहोत, याची तसूभरही कल्पना शिवाजीराजांनी मोगलांना दिली नव्हती. त्यामुळे त्यांना दिलेल्या २३ गडांपैकी सर्वांत अभेद्य अशा सिंहगडाची निवड त्यांनी सर्वप्रथम केली. सर लिडेल हार्ट यांच्या याआधी अनेकदा उल्लेखलेल्या 'स्ट्रॅटेजी ऑफ इंडायरेक्ट ॲप्रोच' या रणनीतीचे सिंहगडचा हल्ला हे अत्यंत समर्पक उदाहरण आहे. शत्रूवर अनपेक्षित दिशेने वार, कारवाईतील नावीन्य, आपली हालचाल त्याला दिसू येणार नाही, याची दक्षता, फसवेगिरी, बेदरकारी, शीघ्रता याच्यामुळे शत्रूला आपल्या कारवाईची तसूभरही कल्पना आली नाही, तर त्याची कैक पटींनी सरस असलेली युद्धशक्ती तो वापरू शकत नाही. यांतील प्रत्येक पैलूची प्रचीती या कारवाईत दिसून येते. राजगडपासून किल्ल्याच्या पश्चिमेस पोचण्यापर्यंत आपल्या हालचालीचा शत्रूला किंचितही माग लागू नये, यासाठी काट्युाट्यातून जाणाऱ्या अवघड मार्गाची निवड, वाटेतील कुत्री भुंकू नयेत म्हणून खेड्याला वळण घेऊन जाण्यातील दक्षता, जास्तीत जास्त अंधाराचा कालावधी मिळावा म्हणून चंद्र पहिल्या कलेत असलेल्या रात्रीची निवड, दोणागिरी कडा चढून ५०० मावळे येऊ शकतील, याची शत्रूला स्वप्नातही कल्पना येणार नाही, या वस्तुस्थितीचा हुशारीने वापर आणि ५०० मावळ्यांना दोरखंडाकरवी चढण्याचे दिलेले प्रशिक्षण आणि त्याची वारंवार करून घेतलेली रंगीत तालीम हे आणि इतरही अनेक लष्करी पैलू या कारवाईच्या मागे असल्याशिवाय ती कधीच यशस्वी होणार नाही.

घोरपडीच्या वापराबाबतही वाचकांचा चुकीचा समज दूर होणे आवश्यकक आहे. तसा घोरपडीचा उपयोग किल्ला सर करण्यासाठी होत असे. किंबहुना 'घोरपडे' हे आडनाव लढाईत घोरपडीचा यशस्वी वापर केल्यामुळे पडले होते, ही एक स्वारस्यपूर्ण बाब आहे. शिवाजीराजांचे पूर्वज सजनसिंह १३५२मध्ये मरण पावले. त्यांचे पाचवे वंशज उग्रसेन यांना दोन पुत्र होते, कर्णसिंह आणि शुभवृष्ण. कर्णसिंह आणि त्यांचे पुत्र भीमसिंह हे बहामनी वजीर महमूद गवान

याच्याबरोबर १४६९मध्ये खेळणा किल्ला जिंकण्यास गेले असता कर्णसिंहांनी घोरपड लावून किल्ला हस्तगत केला. कर्णसिंह त्या लढाईत कामी आले. त्यावरून महंमदशहा बहामनीने भीमसिंह यांना 'राजा घोरपडे बहाद्दर' हा किताब दिला आणि मुधोळजवळ ८४ गावांची जहागीर दिली. तेव्हापासून भीमसिंह यांच्या वंशास घोरपडे असे नाव पडले.१० त्यामुळे घोरपडीचा किल्ला सर करण्यासाठी पूर्वीपासून उपयोग केला जात होता, हे निश्चित. परंतु तो कसा केला जायचा, याचे लष्करी डावपेच जाणून घेणे आम वाचकांपर्यंत पोचणे उपयुक्त ठरेल.

पुरंदर तहाच्या आधी सिंहगड शिवाजीराजांकडे होता. जसवंतसिंहासारखा कसलेला मोगल सरदार मोठ्या फौजेसह कित्येक महिने सिंहगडाला वेढा घालून बसला होता, परंतु त्याला तो सर करता आला नाही. तोच अभेद्य किल्ला संख्येत चौपट सरस असलेल्या मोगलांच्या सैन्याचा पराभव करून तानाजीने काबीज केला, हे लक्षात घेतल्यावर त्याच्या विजयाचे महत्त्व कळून येते. म्हणूनच त्याबद्दल तुलसीदास शाहीर म्हणतो, 'शिवाजीच्या राज्यात ऐसा उमराव पुन्हा होणे नाही!'

आक्रमक चालींची शृंखला

तहात गेलेल्या किल्ल्यांची वापसी

तानाजीला सिंहगड घेण्यासाठी दिलेल्या आदेशांबरोबर राजांनी मोरोपंत पिंगळे, निळोपंत मुजुमदार आणि अनाजीपंत या तिघांनाही वेगवेगळे किल्ले काबीज करण्यासाठी रवाना केले. २४ फेब्रुवारी १६७०रोजी सोयराबाई प्रसूत झाल्या आणि राजांना पुत्रलाभ झाला. त्याचे नाव राजाराम ठेवण्यात आले. नवजात बालकाचा पायगुण म्हणूनच की काय, ८ मार्च १६७०रोजी निळोपंतांनी पुरंदर जिंकून घेतला. तिथला मोगल सरदार शेख राझीउद्दिनला कैद केले. हा किल्लासुद्धा घेण्यास सिंहगडाइतकाच कठीण होता. तो निळोपंतांनी कसा घेतला, याबाबतीत सविस्तर वर्णन कोठेच उपलब्ध नाही. परंतु सिंहगडाप्रमाणेच शत्रूला स्तिमित करून तो त्यांनी घेतला असावा; कारण त्याच्यावर हल्ला चढवून तो घेण्याइतकी शिबंदी निळोपंतांपाशी असणे शक्य नव्हते. दिलेरखान आणि मुरारबाजी या दोघांमधील मोगलांच्या हल्ल्यावेळी झालेल्या जुगलबंदीच्या आठवणी अजूनही ताज्या होत्या. मराठ्यांचा केसो नारायण नऱ्हेकर देशपांडे हा शूर सरदार मात्र पुरंदर घेताना कामी आला. त्याचवेळी दुसरीकडे मराठ्यांनी चांदवड लुटून बादशाही खजिना हस्तगत केला.

पुरंदर जिंकल्यावर राजे माहुलीगडावर चालून गेले. हा किल्लाही पुरंदरसारखाच भव्य होता. किंबहुना पळसगड, भंडारगड आणि माहुली हे तीन किल्ले एकाच डोंगरावर होते. अकस्मात हल्ला करून तो जिंकण्याचा राजांचा मनसुबा होता. परंतु किल्ल्यावर मनोहरदास गौड नावाचा एक कर्तबगार किल्लेदार होता. तो जागृत होता. त्याने मराठ्यांचा हल्ला परतवला. मराठ्यांना जबर किंमत चुकती करावी लागली. त्यांचे किमान १००० मावळे मारले गेले. राजांनी मग कर्नाळा, कल्याण आणि भिवंडी काबीज केले. कल्याणच्या लढाईत ३० मार्चला उझबेगखान ठार झाला. तिकडे माहुलीवर मनोहरदासाने मागितलेली मदत न आल्याने तो निघून गेला.

त्याच्या जागी अलावर्दी बेग नावाचा किल्लेदार आल्याचे कळल्यावर राजांनी पुन्हा माहुलीवर हल्ला केला आणि मोगलांच्या २०० लोकांना ठार मारून १६ जून १६७०ला माहुली किल्ला काबीज केला.

त्याआधी तळकोकणात लोदीखान याने राजांना थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु जखमी होऊन तो पळून गेला आणि तळकोकणाचा प्रदेश राजांच्या हातांत पडला. नांदेडचा फौजदार फतहजंगखान या पराभवाच्या वार्ता ऐकल्यावर पळून गेला. एप्रिलअखेरीपर्यंत अहमदनगर, जुन्नर, परिंद वगैरे पन्नास गावे मराठ्यांनी लुटली. ही बातमी कळल्यावर पुरंदरच्या युद्धात दिलेरखानाबरोबर असलेला दाऊदखान खानदेशातून वेगाने निघून २८ मार्चला अहमदनगरला पोचला. त्याला आलेला पाहताच साल्हेर, जुन्नर भागातील मराठ्यांनी माघार घेतली. मग तो माहुलीला आला आणि तिथेही त्याने अंमल बसवला. या तीन-चार महिन्यांत मराठ्यांना सामोरे जाऊन माघार घेण्यास लावणारा दाऊदखान हा एकमेव मोगल सरदार होता. त्याबद्दल औरंगजेबाने त्याची पाठ थोपटली.

१६७०च्या पावसाळ्यात मोगल आपापल्या ठाण्यांत आराम करत होते, परंतु शिवाजी राजांनी मात्र आपल्या सैन्याला आरामात बसू दिले नाही. माहुली किल्ला त्यांनी पावसाळा चालू झाल्यानंतर जूनमध्ये घेतला. मुंबईचे इंग्रजी कारखानदार सुरतेच्या लोकांना त्यांच्या हालचालींबद्दल माहिती देत होते. जुलैच्या अखेरीस ते रायगडातून बाहेर पडले. मोरोपंत पिंगळे जुन्नरच्या टापूत मोगलांचा पाठलाग करीत होते. कोकणात जंजिऱ्याच्या सिद्दीवर दबाव टाकला जात होता.

सुरतेवर दुसरी स्वारी

१६७० साल उजाडल्यापासूनच शिवाजीराजे सुरतेवर पुन्हा हल्ला चढवणार आहेत, अशी आवई उठू लागली. दर दोन महिन्यांना ही वार्ता पसरू लागे, कारखानदार आपला पहारा वाढवत. परंतु सुरतेमधील हिंदू जनता मनोमन त्यांच्या स्वागताला उत्सुक असे. किंबहुना शिवाजी राजांनी काही खडे सैन्य तिथे कायमचे तैनात केले, तर ते त्यांना पाहिजे होते. मुस्लीम अंमलदाराच्या जाचातून सुटण्याचा त्यांच्यापुढील तो एकमेव मार्ग होता, पण ते शक्य नव्हते.

सुरतेचा सुभेदार मरण पावला होता. तिथली फौज मुअझ्झमने काढून घेतल्यामुळे सुरतेत फक्त हजाराची शिबंदी आहे, असे कळल्यावर १५,०००ची फौज घेऊन सागरतीरामार्गे २ ऑक्टोबर १६७०ला शिवाजीराजे अचानक सुरतेच्या बाहेर पोचले. (नकाशा क्र. २३ पाहा.) इतके दिवस वेगवेगळ्या अफवा उठत आणि थोड्या दिवसांनी काहीच न घडल्यामुळे हवेत विरून जात. त्यामुळे यावेळी शिवाजीराजे गावाबाहेर पोचले आहेत, अशी जेव्हा बातमी पसरली, तेव्हा प्रथम कोणीच फारसे लक्ष दिले नाही. परंतु काही तासांतच ती खरी असल्याचे कळल्यावर मात्र सर्वत्र धावपळ चालू झाली. इंग्रज आणि डचांनी त्या आधीच आपली बायकामुले सुवाळीस हलवली होती; परंतु तरीही त्यांच्या वखारींत काही माल होताच. इंग्रजी वखारप्रमुख स्ट्रेनशाम मास्टर काही लोक घेऊन सुरतेला पोचला. डचांनीही काही लोक


पाठवले. फ्रेंच वखारीला शिवाजीराजांनी आपल्या हस्ताक्षरात एक पत्र पाठवून आपल्या भेटीची माहिती दिली होती, त्याचबरोबर तुम्हांला काही तोशीस होऊ देणार नाही, अशी हमी दिली होती. त्यामुळे ते निर्धास्त होते.

मराठ्यांनी तीन दिवस सावकाशीने शहरातून वेगवेगळ्या मोठ्या व्यापाऱ्यांकडून खंडणी गोळा केली. एकूण ६६ लक्ष रुपयांची मिळकत झाली. फ्रेंच आणि डच वखारवाल्यांनी त्यांना नजराणे दिले. इंग्रजी वखारीचा प्रमुख स्ट्रेनशाम मास्टरने मात्र कडवट विरोध केला. मराठे हल्ला चढवण्यासाठी त्याच्या वखारीबाहेर पोचले होते, परंतु शेवटी प्रकरण तडजोडीने मिटवण्यात आले. दर वर्षी बारा लाख खंडणी ठरवण्यात आली. त्यानंतर राजांनी पेंट-नाशिक-कल्याण-पुणेमार्गे परतायचे ठरवले. साल्हेर-मुल्हेर करीत चांदवडला पोचून कंचनमंचन घाटाने उतरण्याचा त्यांचा बेत होता. घोडे आणि बैलांवर बरेच सामान लादलेले असल्यामुळे शिवाजीराजांचा परतीचा प्रवास संथ वेगाने होणे साहजिक होते. राजांच्या शिबंदीत प्रतापराव गुजर, व्यंकोजी दत्तो व आनंदराव मकाजी हे प्रमुख सरदार होते. १५ ऑक्टोबर १६७०ला ते चांदवडजवळ पोचले. मोगलांचा सरदार वाकेखान त्यांना एकटाच सामोरी गेला, त्याला मराठ्यांनी पळवून लावले. त्याने चांदवड किल्ल्यात आश्रय घेतला. मोगल चांदवडच्या दिशेने आपल्यावर या परिसरात हल्ला करण्यासाठी येत असल्याचे राजांनी ओळखले.

नकाशा क्र. २३

सुरतेवरील दुसरी स्वारी

२-५ ऑक्टोबर १६७०



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

वणी-दिंडोरीची लढाई

मुअझ्झमला सुरतेवरील धाडीची आणि त्यानंतर शिवाजीराजे परतीच्या रस्त्रयावर असल्याची बातमी लागल्याबरोबर त्याने दाऊदखान कुरेशीला मराठे सह्याद्रीच्या परिसरात पोचण्याआधी त्यांना गाठण्याचे आदेश दिले. दाऊदखान हा एकमेव मोगल सरदार मराठ्यांसमोर न झुकता सामना देत होता. तो अहमदनगर व जुन्नरवर मार्च-एप्रिलमध्ये चालून जाऊन नुकताच बुऱ्हाणपुरास परतला होता. १६ ऑक्टोबर १६७०च्या रात्री सुमारे दहा वाजता तो चांदवडला पोचला. चंद्र दुसऱ्या चतुर्थांशात असल्यामुळे चांगले दिसत होते. मध्यरात्रीनंतर त्याला कळले की, मराठा सैन्य कंचनमंचन घाटातून उतरत होते. तो घाट चांदवड पासून पश्चिमेला दहा मैलांवर होता. त्याने लागलीच इखलासखानला मराठ्यांना थांबवण्यासाठी पुढे पाठवले.

शिवाजीराजांनी आपल्या सैन्याचे दोन भाग केले. ५००० स्वारांची तुकडी त्यांनी सामानवाहू घोडे आणि बैलांच्या जथ्याबरोबर लागलीच पुढे रवाना केली. त्यांना कोठेही न थांबता थेट रायगडाच्या दिशेने मार्गक्रमण करत राहण्याचा त्यांनी आदेश दिला. स्वत: १०,००० स्वारांबरोबर त्यांच्यामागे मोगल सैन्याचा बंदोबस्त करण्याच्या हेतूने जाऊ लागले. १७ ऑक्टोबरच्या सकाळी इखलासखानाच्या तुकडीने मराठ्यांना गाठले. याची सूचना आधीच असल्यामुळे मराठे जागरूक होते. दोन्ही सैन्यांमध्ये मुठभेड झाली. इखलासखान गंभीरपणे जखमी झाला. तेव्हा त्याच्या बरोबरील दोन मोगल सरदार सरदार राय मकरंद आणि भवान पुरोहित मराठ्यांशी लढू लागले. तोपर्यंत दाऊदखान आपल्या सैन्यासह लढाईच्या ठिकाणी पोचला.

मोगलांच्या बरोबर त्यांचा तोफखाना होता, परंतु वाटेत त्याची मुख्य सैन्याशी ताटातूट झाली. त्यामुळे दाऊदखानापाशी चांदवडमध्ये तोफखाना पोचला नव्हता. मराठ्यांसाठी हे खरोखरच दैवी वरदान होते. दोन्ही सैन्यांत तब्बल पाच तास लढाई झाली. मराठ्यांच्या आवेशाला आणि आक्रमकतेला गवसणी घालण्यासाठी मोगलांपाशी कोणतेच शस्त्र नव्हते. मराठ्यांचे नेतृत्व शिवाजीराजे स्वत: करीत होते. प्रत्यक्ष राजांना दाऊदखानशी लढताना पाहून त्यांच्या सैन्याच्या उत्साहाला आणखीनच उधाण आले होते. पाच तासांच्या निकराच्या लढ्यानंतर तीन हजार मोगल आणि काही मराठे पडले. शेवटी दाउदखानाला कळले की, त्याला मराठ्यांनी चीतपट लोळवले होते. त्याने चांदवडच्या दिशेने माघार घेतली आणि त्यानंतर तो बुऱ्हाणपूरला निघून गेला. मोगलांचे चार हजार घोडे आणि काही सरदार मराठ्यांच्या हातात पडले, परंतु सगळ्या माणसांना त्यांच्या रिवाजानुसार राजांनी सोडून दिले. वाणी-दिंडोरीची लढाई या नावाने ही मुठभेड प्रसिद्ध आहे.

दाऊदखानावरील विजयाचे सभासदाने पुढील वर्णन केले आहे, '..राजा खासा घोड्यावर बैसून, बख्तर घुगी घालून, हाती पटे चढवून मालमत्ता, घोडी, पाईचे लोक पुढे रवाना करून आपण दहा हजार स्वारांनिशी सडे सडे राऊत उभे राहिले. वणी-दिंडोरी म्हणवून शहर आहे ते जागा उभे राहून सुभ्याचे लोक आले, त्याशी घोरांदर युद्ध केले......राजियांनी आपली फौज पुढे करून पाठीवर आपण खास राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व आनंदराव

वरकड सरदार पुढे होऊन मोठी कत्तल केली.. आणि मोगल मारून मुरदे पडिले. दोन प्रहर युद्ध जाले. मराठे यांणी शर्त केली. तीन हजार मोगल मारिले. तीन हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोगलाई सापडले. असे फत्ते करून आले.'११

हे संकट टळल्यावर राजांनी रायगडाकडे आपली चाल चालू ठेवली. परंतु माहूरपाशी मोगलांतर्फे माहूरची देशमुख रायबाघन सैन्याला आडवी आली. राजांनी काही थोड्या कालावधीत तिचा पराभव केला आणि माघार घ्यायला लावली. सुरतेत मिळालेली प्रचंड लूट हस्तगत करून राजांचा पराभव करण्याचा मोगलांचा प्रयत्न धुळीला मिळाला. त्यानंतर मात्र वाटेत कोणतेही विघ्न न येता राजे सुखरूपपणे नाशिकमार्गे कुंजरगडावर पोचले. तिथून ते रायगडावर पोचले. एकूण हिशेब केल्यावर पाच कोटी होन आणि ५००० घोडे इतका लाभ झाला होता. सुरतेमधील एक कोटी लुटीचा आकडा लक्षात घेता पाच कोटींची रक्कम अतिशयोक्तिपूर्ण वाटते. या कालावधीदरम्यान मोरोपंत पेशवे जुन्नर आणि सभोवतालीच्या प्रदेशात धाडी घालत होते. २५ ऑक्टोबरला त्यांनी त्रिंबकगड किल्ला जिंकला. हा किल्ला हातात आल्यावर स्वराज्याची सीमा पार गोदावरीला जाऊन भिडली होती.

विदर्भावर मोर्चा

यशप्राप्ती कितीही धवल असली, तरीही मुरब्बी सेनानायक त्यावर समाधानी नसतात. 'यशासारखे काहीच यशस्वी होत नाही', अशी म्हण आहे. त्या यशाच्या गर्भात अधिक यशसिद्धी दडली आहे, याची जाणीव त्यांच्या मनात सदैव जागृत असते. यामुळे परिस्थिती आपल्याला लाभदायक असताना यशोमालिकेत ते कधीच खंड पडू देत नाहीत. मोगलांचा हलगर्जीपणा आणि दिलेरखान व मुअझ्झम यांच्यातील भांडण अजूनही मिटले नसल्याचे पाहून शिवाजीराजांनी स्वत: आपल्याबरोबर शिबंदी घेऊन विदर्भावर चाल करून जाण्याचे ठरवले. पुरंदर तहानुसार विदर्भातून त्यांच्या सैन्यासाठी मिळावयाचा खर्च त्यांना दिला जात नव्हता. विदर्भातील मोगल सरदार धनदांडगे असल्याची त्यांना माहिती मिळाली होती. त्यामुळे तो पैसा स्वत: जाऊन वसूल करण्यात त्यांना काही वावडे वाटत नव्हते.

शिवाजीराजे बुऱ्हाणपूरला नोव्हेंबर १६७०मध्ये पोचले. वाटेत रस्त्यावर त्यांनी अहिवंत, रावला, जावळा आणि मार्कंड हे किल्ले काबीज केले. जसवंतसिंहाची छावणी बुऱ्हाणपूरला होती. प्रतापरावाने त्याचे उपनगर बहादूरपुरा लुटले. त्यानंतर राजांनी आपल्या सैन्याची विभागणी दोन तुकड्यांमध्ये केली. मोरोपंतांना बागलाणात धुमाकूळ घालण्यास पाठवले आणि स्वत: प्रतापराव गुजराबरोबर ते आग्नेयेला असलेल्या कारंजा या छोट्या, परंतु गर्भश्रीमंत गावाजवळ पोचले आणि तीन दिवस तेथे मुक्काम ठोकला. त्यांच्यापाशी २०,००० स्वारांची शिबंदी होती. गावातील अपरंपार संपत्ती प्रतापरावांनी खणून काढली. तीन दिवसांत त्यांनी एक कोटी रुपये मूल्याची नगद रक्कम व सोने जमा केले. त्यांनी ही धनसंपत्ती ४,००० बैल आणि खेचरावर लादून पुण्यास नेली.

स्थानिक कारभारी एकत्र बोलावून त्यांच्याकडून दर वर्षाच्या कमाईचा एक चतुर्थांश हिस्सा (चौथाई) आपल्याला सुपूर्द करण्याची हमी घेण्यात आली. विदर्भाचा मोगल सुभेदार रुस्तुम-इ-

झमा त्यावेळी अचलपूर येथे होता. शिवाजीराजे आपल्या सुभ्यात चालून आल्याचे ऐकून तो लागलीच निघाला; परंतु राजांना सामोरे जायचे त्याने टाळले. राजांनी सर्व प्रांतांतून चौथाई वसूल करण्याचा हुकूम जाहीर केला. प्रतापरावाने गावोगावचे पाटील आणि कुळकर्ण्यांकडून वसुलीचा चौथा हिस्सा राजांना देऊ, असे लिहून घेतले आणि लोकांस त्याबद्दल पावत्या देण्याची वहिवाट पाडली.

नाशिकला पोचल्यावर त्यांने खानदेशमध्ये कारवाई करीत असलेल्या मोरोपंत पेशव्यांशी संपर्क साधला. राजांनी मोरोपंतांसह उत्तरेकडे कूच केले आणि साल्हेरमध्ये ते दाखल झाले. साल्हेरचा किल्ला मोगल सरदार फत्तुल्लाखान याच्या हाताखाली होता. प्रथम मराठ्यांच्या २०,००० स्वार आणि पायदळाच्या सैन्याने किल्ल्याला वेढा घातला. त्यानंतर संधी मिळाल्यावर त्यांनी दोरखंडांच्या शिड्या लावून त्याच्यावर ते चढून गेले. जेव्हा फत्तुल्लाखान किल्ल्याबाहेर आला, तेव्हा त्याला ठार करण्यात आले. त्यानंतर फत्तुल्लाखानाच्या मेव्हण्याने राजांशी बोलणी केली आणि किल्ला त्यांच्या हवाली केला.१२ ५ जानेवारी १६७१ला किल्ला मराठ्यांच्या हातांत पडला. या यशस्वी मोहिमेनंतर राजे रायगडला परतले.

लष्करी विलेषण

पुरंदरचा तह ही राजांची एक अलौकिक मुत्सद्दी चाल होती. जेव्हा परिस्थिती प्रतिकूल असेल, तेव्हा बलवत्तर शत्रूशी लढा देऊन आपली ऊर्जा वाया घालवण्याऐवजी त्याच्याशी तह करून आपला अहंभाव बाजूस ठेवत त्याच्या अटी स्वीकाराव्यात, परंतु आपल्याला अनुकूल ढग क्षितिजावर दिसू लागल्यावर सारे स्नायुबळ एकवटून जे गेले ते परत मिळवावे आणि तेवढ्यावरच समाधान न मानता आपला प्रभाव अधिकाधिक वाढवावा, हे कौटिलीय नीतीचे सार. पुरंदर तहाच्या वेळी प्रतिकूल परिस्थितीने वेढले गेल्यावर राजांनी २३ बिनीचे किल्ले मोगलांच्या हवाली केले. १६७० साली अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्यावर आपल्या मनगटाच्या जोरावर सारे काही परत मिळवून सार्वभौमत्वाच्या दिशेने त्यांनी दृढ पावले टाकली. शिवाजीराजांचा हा डाव कौटिलीय नीतीचा उत्तम दृष्टांत आहे.

एकीकडे औरंगजेब अफगाणिस्तानात गुंतलेला आहे व दक्षिण हिंदुस्तानाकडे पाहायला त्याला वेळ नाही आणि दुसरीकडे त्याचा शहजादा व महत्त्वाकांक्षी सरदार हे दोघे वर्चस्वासाठी एकमेकांवर उलटले आहेत, हा सुवर्णसमय राजांच्यापुढे आपणहून चालून आला आणि राजांनी त्याचे सोने केले. त्यांच्यापुढे दोन प्राधान्ये होती. पहिले, पुरंदर तहात गमावलेले किल्ले आणि प्रदेश परत मिळवायचा आणि दुसरे, स्वराज्याच्या खजिन्याचे खचलेले आरोग्य सुधारायचे. त्यांनी या दोन उद्दिष्टांची तर्कनिष्ठ मांडणी केली आणि आपल्या लक्ष्यांचा सुस्पष्ट आराखडा बनवला.

१६७० सालात शिवाजीराजांनी रणनीती आणि अर्थनीती या दोन्हींचा पाठपुरावा केला. त्यामागची दोन उद्दिष्टे होती, शत्रूचे बळ खच्ची करणे आणि अर्थार्जन करणे. सिंहगड, पुरंदर, माहुली, कर्नाळा, कल्याण, भिवंडी, त्रिंबकगड वगैरे पुरंदर तहात दिलेले महत्त्वाचे किल्ले त्यांनी शत्रूकडून पुन्हा काबीज केले. किल्ल्यावर आधारित असलेली राजांची

रणनीती पुनश्च मूळपदावर आली. या किल्ल्यांबरोबर त्याच्या आजूबाजूच्या मोगल प्रदेशावर राजांचे नियंत्रण पुन्हा प्रस्थापित झाले.

१६७० साली राजांच्या स्नायुबळात सर्वांत मूल्यवान बरकत म्हणजे साल्हेरचा ताबा. हा अत्यंत अवघड आणि काहीसा अभेद्य किल्ला राजांनी गनिमी काव्याचे तंत्र वापरून सफाईने काबीज केला. साल्हेरच्या किल्ल्याचा ताबा मिळण्याला मराठ्यांच्या दृष्टीने लक्षणीय सामरिक महत्त्व होते, ते तीन कारणांमुळे. पहिले म्हणजे त्याच्यामुळे शिवाजीराजांना खानदेश आणि गुजरात प्रांतांमध्ये कोणत्याही लष्करी कारवाया हाती घेण्यासाठी एक सुरक्षित तळ लाभला. तो सुरतेपासून फक्त ७५ मैल, बुऱ्हाणपूरपासून १५० मैल व औरंगाबादपासून १०० मैलांवर होता. बुऱ्हाणपूर आणि औरंगाबाद खानदेश व दख्खन प्रांतांच्या राजधान्या होत्या. दुसरे म्हणजे साल्हेर किल्ला हातात आल्यावर मराठ्यांचा लष्करी आवाका उत्तरेच्या बाजूला आणखी वाढला. त्यामुळे सुरत-नाशिक-जुन्नर आणि सुरत-श्रीगोंदा-अहमदनगर या मुख्य मार्गांवर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. तिसरे म्हणजे तिथून मराठ्यांना वेगवेगळ्या मोगल लक्ष्यांवर हल्ले चढवणे शक्य होणार होते, त्यामुळे मोगलांना त्या टापूतील प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी सैन्य तैनात करणे भाग पडणार होते. साल्हेर किल्ला हातात आल्यावर मराठ्यांच्या त्या परिसरातील धावत्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली, यावरूनच या विजयाचे महत्त्व समजून येते. मोगलांसाठी ही क्षती इतकी हानिकारक होती की, इतर सर्व कामे बाजूला ठेवून त्यांना हा किल्ला परत घेण्याच्या खटाटोपामागे धावावे लागले. तो त्यांना साध्य झाला नाही आणि औरंगजेबाचा संताप आणखीनच वाढला, ही गोष्ट अलाहिदा!

अर्थार्जनासाठी राजांनी निवडलेली सुरत आणि कारंजा ही लक्ष्ये धनदांडगी होतीच, परंतु ती शत्रूच्या प्रतिसादाच्या टप्प्याबाहेर असतील, याची त्यांनी काळजी घेतली होती. शत्रूला कळले, तरी तो सैन्य पाठवण्याच्या आधी आपण लुटालुटीचे काम संपवून सुरक्षितपणे निघून जाऊ शकू, याची त्यांनी खबरदारी घेतली होती. किंबहुना राजांच्या यशाचे ते प्रमुख गमक होते. सुरतेमधील संपत्तीची खडान्खडा माहिती पहिल्याप्रमाणेच त्यांनी बहिर्जीला पाठवून मिळवली असणार. त्या परिसराचा सुरतेवरील पहिल्या हल्ल्यादरम्यान परिचय झाला असल्यामुळे या मोहिमेत विशेष अडथळे आले नाहीत. त्याचबरोबर कारंजा हे गर्भश्रीमंत गाव राजांनी निवडले. त्या गावातील धनाच्या साठ्यांच्या बाबतीत सविस्तर माहिती मिळवली असेल, हेही उघड आहे. सुरत आणि कारंजा या दोन गावांतून राजांना किमान दोन-अडीच कोटी रुपयांचा धनलाभ झाला. अशा प्रकारे हे उद्दिष्टही त्यांनी पूर्णत: साध्य केले.

वाणी-दिंडोरीच्या लढाईतील विजय ही राजांच्या अद्वितीय सेनापतित्वाची आणखी एक अभिव्यक्ती होती. अचानक बदलत्या परिस्थितीला धैर्याने आणि रणगंभीरतेने तोंड देण्याचा वकूब हे उत्तम सेनापतीचे लक्षण आहे. दाऊदखान आपल्याला अडवण्यासाठी मोठ्या सैन्यानिशी येत आहे, हे कळल्यावर राजांनी कृव्तंत्राचा उपयोग केला. कृव् म्हणजे लांडगा. कळपाने हालचाल करणाऱ्या या अत्यंत बुद्धिमान प्राण्याचे अचानक समोर आलेल्या बलवान शत्रूशी झुंज देण्याचे हे तंत्र. राजांनी धन-संपत्तीने लदलेल्या जनावरांच्या जथ्याला ५००० स्वारांबरोबर तातडीने रवाना केले. रायगडपर्यंत कोणताही अडथळा न येता ते पोचले

पाहिजेत, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट होते. उरलेल्या तुकडीला भिन्न गटांत वाटून त्यांना वेगवेगळ्या दिशांनी शत्रूवर आघात करण्याचे त्यांनी आदेश दिले. त्यांच्यापैकी एका गटाने आपण मुख्य सेना असल्याचे भासवून त्या गटाचा पाठलाग करण्याचा शत्रूला मोह पाडला. त्यानंतर आपल्याबरोबरील मागे ठेवलेल्या मुख्य तुकडीकरवी शत्रूवर राजांनी हल्ला चढवला.

वऱ्हाडातील प्रदेश त्यांना पुरंदर तहानुसार मोगलांच्या हवाली करावा लागला होता; तरीही त्याच तहानुसार त्या भागातील वसुलीचा एक चतुर्थांश हिस्सा त्यांना मिळत राहणार होता. परंतु हा सारा त्यांच्यापर्यंत पोचत नव्हता. त्यासाठी त्यांना वऱ्हाडात मोहीम काढावी लागली. मराठा सेनेने वाटेत ठिकठिकाणी काही प्रदेश बेचिराख केला, त्याचे कारण होते. या लष्करी कारवाईला 'एरिया डॉमिनेशन' म्हणजे 'प्रदेशावर प्रभुत्वाचे प्रस्थापन' असे नाव आहे. वऱ्हाडातील जनतेला त्या प्रदेशावर राजांची सत्ता आहे, याची समज देण्याचा त्यामागील उद्देश होता. त्याच उद्देशाने अहमदनगर, जुन्नर, परिंदा या टापूतील ५० गावे त्यांनी लुटली. या लुटालुटीमागे प्रजेला त्रास होतो, याची राजांना जाणीव होती; परंतु मोगलांच्या अनभिषिक्त सत्तेची पकड ढिली करण्याचा यामागील लष्करी हेतू होता, हे समजून घेणे आवश्यिक आहे.

१६७१च्या आरंभापासून पुढे दीड वर्षे मोठमोठे मोगल सरदार आणि प्रचंड फौजा शिवाजीराजांवर चालून आल्या असूनही राजांनी शौर्याने त्यांचा सामना केला. मोगलांना हरवून खानदेश, बागलाण, वऱ्हाड इत्यादी समृद्ध प्रांतांत आपली सत्ता प्रस्थापित केली. शिवाजी राजे हे कोणी पुंड नसून नामांकित योद्धे आहेत, अशी बादशहाची आणि सर्व हिंदुस्तानची खातरी झाली. 'आनी घर हद्द किणी रेवा है' म्हणजे 'आग्र्याहून सुटून घरी येऊन राजांनी रेवा नदी आपल्या राज्याची हद्द केली', असे भूषण कवी लिहितो, याच्यामागाचे कारण हे आहे.[१३]

निर्णायक प्रहार

औरंगजेबाचा जहाल प्रतिसाद

सुरतेवरील दुसरा हल्ला आणि साल्हेर किल्ल्यावर मराठ्यांनी ५ जानेवारी १६७१ला केलेला कब्जा या बातम्या ऐकून औरंगजेब अत्यंत खवळला. शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यात यापुढे थोडीही दिरंगाई करता कामा नये, याची त्याला तीव्र जाणीव झाली. आरंभी स्वत:च दख्खनला जाऊन या वाढत्या आव्हानाला मुळापासून खुडून टाकण्याचा त्याचा विचार होता. त्यासाठी १ फेब्रुवारी ते २ मार्च १६७१ या कालावधीदरम्यान दक्षिणेकडे प्रयाण करण्यासाठी शुभ मुहूर्त शोधण्यासाठी त्याने शाही ज्योतिषाला आदेश दिला होता; परंतु अफगाणिस्तानात पेटलेल्या युद्धामुळे तो दिल्लीतून बाहेर जाऊ शकत नव्हता. म्हणून त्याने तो विचार रद्द केला.१४ तरीही दक्षिणेतील अपयशांच्या मालिकेमुळे तो किती अस्वस्थ होता, याची यावरून कल्पना येईल. मग बादशहाने काही बलदंड मोगल सरदारांना मराठ्यांवर चालून जाण्याचे फर्मान काढले.

त्यात दिल्लीहून दिलेरखान, गुजरातमधून बहादूरखान, चांदवडमधून दाऊदखान आणि बुऱ्हाणपुरातून जसवंतसिंह व महाबतखान यांना प्रचंड शिबंदीसह तातडीने साल्हेरकडे रवाना

करण्यात आले. परंतु ते चांदवडला पोचेपर्यंत जसवंतसिंहाला दिल्लीला बोलावण्यात आले. औरंगजेबाने मराठ्यांविरुद्ध मोगलांची मोठी फौज उभी केली होती. शिवाजीराजांनी अलीकडे घेतलेले सर्व किल्ले परत काबीज करणे आणि पुण्यावर चालून जाऊन त्यांना पुनश्च शरणागती पत्करण्यास भाग पाडणे हा बादशहाचा हेतू होता. हे सर्व सरदार आपापल्या सैन्यांची जमवाजमव करून विनाविलंब बाहेर पडले.

दाऊदखान आणि महाबतखानाने जानेवारीअखेरीस अहिवंतगडाला वेढा घातला आणि एका महिन्यात तो काबीज केला. त्यानंतर त्यांनी जावला, मरकंद आणि हतगड हे तिन्ही छोटे किल्ले एका दमात जिंकून घेतले. काही दिवसांनी महाबतखान सुरतेच्या दक्षिणेला असलेल्या पारनेरगडावर चालून गेला. मे १६७१च्या आरंभी दिलेरखान आणि बहादुरखान सुरतेहून निघाले. दिलेरखान पुरंदरवरील हल्ल्याच्या वेळी जयसिंहाबरोबर होता आणि त्याला स्वराज्याच्या प्रदेशाची चांगली माहिती होती. त्यावेळेप्रमाणे आताही शिवाजीराजे सहज शरण येतील, याचा खानाला भरवसा होता.


प्रथम साल्हेर किल्ल्याला सुमारे ५०,००० संख्येच्या फौजेसह वेढा घालायचा, इखलासखान मिआना या सरदाराला तो किल्ला काबीज करण्यासाठी सोडायचे आणि मग दोघांनी त्यानंतर वेगवेगळ्या मार्गांनी आगेकूच करून पुण्यावर घाला घालायचा, असा दिलेरखान आणि महाबतखान यांचा बेत होता. दिलेरखान साल्हेर-कणेरगड-नाशिक-जुन्नरमार्गे जाणार होता. पुण्याच्या वाटेत तो रावळगड व कणेरगड हे किल्ले जिंकणार होता. बहादुरखान पुण्याला चांदवड-अहमदनगर- दौंड-सुपेमार्गे जाणार होता. (नकाशा क्र. २४ पाहा.) पुणे परिसर आपण व्यापला की, शिवाजीराजे तहाची याचना करतील, असा त्यांना विश्वास होता.

साल्हेरचे रणकंदन

५२६३ फूट उंचीचा साल्हेरचा किल्ला स्वराज्यातील सर्वांत उंच आणि बागलाणातील सर्वात मोठा किल्ला आहे. (नकाशा क्र. २४ पाहा.) त्याच्यावरील सर्वांत उंच दोन शिखरे ५२६३ व ५१७५ फूट आहेत. किल्ल्याची सर्वसाधारण उंची ४००० फूट व किल्ल्याचा परीघ चार मैलांपेक्षा अधिक आहे. डोंगरसरीच्या भोवती उंच सरळसोट कडे आहेत. ते चढून जाणे अवघड काम आहे. मराठे ते करू शकले, परंतु मोगल सैन्याच्या ते कुवतीबाहेरचे होते. सह्याद्रीच्या धोलबारी रांगेत तो पडतो. गडावर परशुरामाचे मंदिर आहे. एका आख्यायिकेनुसार परशुरामाने या गडावर उभे राहून पश्चिमेला बाण मारला आणि समुद्र हटवून कोकण प्रांत निर्माण केला. पश्चिमेस तोंड असलेली चौपट आकाराची दोन पावले आणि पश्चिम दिशेला असलेल्या डोंगरात एक आरपार छिद्र याची ग्वाही देते, असे सांगितले जाते. साल्हेरच्या लागलीच पूर्वेस सालोटा किल्ला आहे. त्यांच्या पूर्वेला सहा-सात मैलांवर तीन गडांचे त्रिकूट आहे. त्यातील मधला किल्ला मुल्हेर आणि बाकी दोन हारगड व मोरा. गुजरातेतील डांग जिल्हा आणि नाशिकातील बागलाण प्रांत यांच्या सीमेवर साल्हेर उभा आहे. हा किल्ला मराठ्यांच्या हातांत आल्याने त्यांना प्राप्त झालेले सामरिक प्राबल्य याआधीच विशद केलेले आहे.

नकाशा क्र. २४

साल्हेरवरील रणकंदन



हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.

बहादुरखान आणि दिलेरखान या दोघांनी साल्हेरला जून १६७१मध्ये वेढा घातला. मराठ्यांप्रमाणे किल्ला सर करण्याच्या भानगडीत मोगल पडत नसत, त्याची दोन कारणे; किल्ले सर करण्यासाठी आवश्यक असलेली मराठ्यांतील चपळता आणि कौशल्य या दोन्हींची मोगलांकडे पुरती वाण होती, उलट किल्ल्याला वेढा घालून किल्ल्यातील शत्रू शरण येण्यासाठी लागणारी बक्कळ शिबंदी आणि पुरेसा वेळ या दोन्हींची मात्र त्यांच्यापाशी मुळीच वानवा नव्हती. त्यांनी वेढा जागृत ठेवण्याचे काम इखलासखान आणि राव अमरसिंह चंदावत यांच्याकडे सोपवले. त्यानंतर बहादुरखान आणि दिलेरखान हे दोन्ही आपापल्या पूर्वनिर्धारित मार्गांवर सैन्यासह पुण्याच्या दिशेने आगेकूच करू लागले.

किल्ल्याला खानांनी वेढा घातल्याची बातमी राजांना खेडशिवापूरला गेले असताना कळली. साल्हेर किल्ला बागलाणातील महत्त्वाचा किल्ला होता. काही महिन्यांपूर्वीच मराठ्यांनी विजेच्या वेगाने कारवाई करून तो थोड्या वेळातच शिताफीने काबीज केला होता. त्या किल्ल्यामुळे मराठ्यांना पार उत्तरेकडील प्रदेशावर प्रभुत्व प्राप्त झाले होते. तो हातांतून गेला, तर हा सामरिक लाभ हातांतून जाणार होता. त्याकरता मोगलांचा वेढा तोडण्यासाठी मोठी सेना ताबडतोब पाठवणे आवश्य क होते. साल्हेर किल्ल्याजवळील प्रदेश डोंगराळ आणि काट्युाट्यांनी भरलेला होता. तिथे हातघाईच्या लढाईसाठी पायदळाची अधिक आवश्यगकता होती, परंतु त्याचबरोबर शत्रूवर दबाव टाकण्यासाठी घोडदळही पाठवणे आवश्य क होते. राजांनी मोगल प्रदेशात मुलूखगिरी करीत असलेल्या सरनोबत प्रतापराव गुजरना आपली शिबंदी घेऊन ताबडतोब साल्हेरकडे प्रयाण करण्याचा आदेश पाठवला. त्याबरोबर कोकणात कारवाई करीत असलेल्या मोरोपंत पिंगळ्यांना आपले पायदळ घेऊन उत्तरेस जाण्याचा हुकूम सुटला. साल्हेरला पोचण्यासाठी सर्वांत जवळचा रस्ता दिंडोरी-वणी-कळवणमार्गे होता. वणी आणि साल्हेरच्या मध्ये तीन डोंगरसऱ्या पार करून जावे लागे. सारा आसमंत जंगलाने भरलेला होता आणि त्यातून मार्ग काढणे कष्टप्रद होते.

इखलासखानाजवळ प्रचंड फौज होती. औरंगजेब या किल्ल्याला किती महत्त्व देत होता, हे यावरून कळावे. मोगल फौज ६०,०००च्या घरात, तर घोडदळ व पायदळ मिळून मराठ्यांच्या सैन्याची संख्या सुमारे ४०,००० होती, अशी बखरींमध्ये नोंद सापडते. परंतु हे आकडे फुगवून सांगितले असावेत. मोगलांच्या सैन्याचा काही भाग दोन खानांबरोबर गेला होता, त्याबरोबर मोरोपंतांनी सुमारे १२,०००ची शिबंदी दोन्ही खानांचा पाठलाग करण्यासाठी पाठवली असावी. त्यामुळे मोगल सैन्याची संख्या ३०,००० आणि घोडदळ धरून मराठ्यांची संख्या १५,००० असावी असे गृहीत धरणे योग्य ठरेल.१५

मोगलांची सेना गेले सात महिने किल्ल्याला वेढा घालून बसली होती. इतक्या मोठ्या संख्येने मराठ्यांचे घोडदळ आणि पायदळ वाटेतील मोगलांची जागोजागी मोर्चेबंदी टाळून किल्ल्याच्या पायथ्याशी पोचेल, असे इखलासखानाला वाटले नव्हते. त्यामुळे अचानक त्यांना समोर पाहून तो स्तिमित झाला असलाच पाहिजे. मोगलांची मोर्चेबंदी साधारण भिलपाडा आणि महारदार या किल्ल्यांच्या पायथ्याशी असलेल्या सखल जमिनीवर होती. तेथील जमीन डोंगराळी आणि झाडाझुडपांनी भरलेली होती. त्यामुळे त्यांच्यावर फक्त पायदळच हल्ला चढवू शकत होते.

घोडदळ फक्त खुल्या भागात शत्रूला अडवण्यासाठी वापरले जाऊ शकत होते. शिवाजीराजे शक्यतो ढकलेली लढाई टाळत असत. जेव्हा मराठ्यांनी शत्रूसमोर जाऊन हल्ले चढवले, अशा बोटांवर मोजण्याइतक्या लढायांतील साल्हेरची लढाई ही एक लढाई होती.

लढाई २० जानेवारी ते १८ फेब्रुवारी १६७२च्या दरम्यान झाली. प्रतापराव आणि मोरोपंत आपापल्या सैन्यांबरोबर विरुद्ध बाजूंनी आले आणि शत्रूला सर्व बाजूंनी वेढून मराठ्यांनी त्याचा चेंदामेंदा केला. प्रथमत: प्रतापरावाने घाबरलो, असे भासवून पळ काढला आणि मोगलांची फौज फाकली जाऊन पाठलागावर येताच प्रतापराव उलटला. कृव् नीतीचा हा प्रभावी उपयोग होता. दोन्ही बाजूंच्या माणसांची जबर हानी झाली.

सभासद बखरीत या लढाईचे असे वर्णन आहे : 'मोठे युद्ध जहाले. चार प्रहर दिवस (सुमारे १२ तास) युद्ध जहाले. मोगल, पाठ, रजपूत, रोहिले, तोफची, हत्ती, उंटे, आराब घालून युद्ध जाहले. युद्ध होताच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की, तीन कोस औरस चौरस आपले व परके माणूस दिसत नव्हते. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहले. घोडी, उंट, हत्ती यांची गणना नाही. रक्ताचे पूर वाहिले, रक्ताचे चिखल जाहले. त्यामध्ये रुतो लागले. असा कर्दम जाहला. मारता मारता घोडे जिवंत उरले नाहीत. जे जिवंत सापडले ते सहा हजार घोडे राजियांकडे गणतीस लागले. सव्वाशे हत्ती सापडले. सहा हजार उंटे सापडली. मालमत्ता, खजिना, जड-जवाहीर, कापड, अगणित बिछाईत हाती लागली. बेवीस वजीर नामांकित धरले. खास इखलासखान पाडाव जाला. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार डोंहजर सडेसडे पाळले. ऐसे युद्ध जाले. युद्धात प्रतापराव सरनोबत व आनंदराव व व्यंकोजी दत्तो व रूपजी भोसले व सूर्यराव काकडे व विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ व मुकुंद बल्लाळ, वरकड बाजे वजीर, उमराव ऐसे यांणी शिकस्त केली. तसेच मावळे लोक यांणी व सरदारांनी शिकस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनोबत या उभयतांनी आंगीजणी केली आणि युद्ध करिता सूर्यराव काकडे पंचहजारी, मोठा लष्करी धारकरी, याणे युद्ध थोर केले. ते समयी जंबूरियाचा गोळा लागून पडिला. सूर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारती जैसा कर्ण योद्धा, त्याच प्रतिभेचा असा शूर पडला. वरकड नामांकित शूर पडले. असे युद्ध होऊन मराठ्यांची फत्ते जाहली!'१६ या भीषण रणकंदनात मराठ्यांचा निर्णायक विजय झाला.

इखलासखान, मुहकमसिंह चंद्रावत व द्वारकोजी भोसले जखमी अवस्थेत कैद झाले. राजांनी त्यांना सोडण्याचे आदेश दिले. राव अमरसिंह ठार झाला. मोगलांचे ३० सरदार मराठ्यांच्या हाती सापडले. फक्त दोन हजार मोगल सैनिक सुटले असावेत. वर दिलेल्या आरंभीच्या ३०,००० सैनिकांच्या आकड्याशी याची तुलना केली, तर या विजयाचे धवल स्वरूप प्रकट होते. मोरोपंत आणि प्रतापरावांबरोबर यशाचे श्रेय जाते, ते आनंदराव मकाजी, व्यंकोजी दत्तो, रूपजी भोसले, शिदोजी निंबाळकर, खंडोजी जगताप, गोंदाजी जगताप, संताजी जगताप, मानाजी मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ, मुकुंद बल्लाळ या सरदारांना. यात सर्वांत दुःखाची बाब म्हणजे राजांचे बालपणाचे सवंगडी सूर्यराव काकडे धारातीर्थी पडले. मोरोपंत पेशव्याच्या त्या वेळच्या पराक्रमाबाबत पुढील लोक लोकवाङ्मयात प्रचलित आहे :

पुण्याच्या कप्या गर्जताती शिवाजी, तिथे नांदतो पेशव्या मर्द गाजी ।
जशी कौरवे मर्दिली अर्जुनाने, तशी मारली मोगले पेशव्याने ॥१७

साल्हेरचा विजय न भूतो न भविष्यति असा होता. त्या पराभवामुळे मोगलांचे कंबरडेच मोडले. त्यानंतर मोरोपंतांनी मुल्हेर काबीज केले.

रामजी पांगेराची मर्दानकी

मोरोपंत साल्हेरकडे जात असता दिलेरखान पुण्याच्या दिशेने जात होता. वाटेत कणेरगड नावाचा मराठ्यांचा किल्ला काबीज करण्याचे त्याने ठरवले. तिथे रामजी पांगेरा नावाचा शिवाजीराजांचा 'एक हजारी' सरदार एक हजार मावळ्यांसह किल्ल्याच्या दिमतीस होता. हजार लोकच आहेत, असे कळल्यावर तो आपण सहज हस्तगत करू, अशी दिलेरखानाची भावना झाली. खान चालून येत आहे हे पाहून आपल्या मावळ्यांना रामजीने एकत्र केले आणि विचारले, 'आपले सोबती असतील, ते उभे राहणे'. रामजीने सातशे लोक निवडले आणि दिलेरखानाच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी तो तयार झाला. दिलेरखानाचे प्रचंड घोडदळ खाली उतरले आणि त्यांनी मावळ्यांवर चारी बाजूंनी हल्ला चढवला. रामजीच्या शिपायांनी आपले कुडते आणि शिरस्त्राणे काढली आणि उघड्या अंगाने ते पठाणांशी लढू लागले. प्रत्येकाच्या अंगावर किमान वीस ते तीस तलवारीच्या किंवा बाणांच्या जखमा झाल्या होत्या. त्यांतले कित्येक लढता लढता धारातीर्थी पडले. पण त्यांनी निदान १२०० पठाणांना यमसदनी पाठवले. दिलेरखानाने अक्षरश: तोंडात बोट घातले. त्याला पुरंदरच्या किल्ल्यावरील मुरारबाजी आणि त्याच्या शूर मावळ्यांची निश्चितच आठवण झाली असणार.

सभासद बखरीत याची पुढीलप्रमाणे नोंद आहे : 'निवड करिता सातशे माणूस उभे राहिले. तितकीयांनी निदान करून भांडण दिधले. दिलेरखानाची फौज पायउतारा होऊन लढू लागली. त्याची फौज प्रचंड होती. मोगलांनी सातशे मावळ्यांना चौफेर घेरले. युद्धाची एकच धुमश्चक्री सुरू झाली. एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. पाहता पाहता मावळ्यांनी बाराशे पठाण ठार केले. रामजी आणि त्याचे मावळे आता बेभान झाले होते. ते सर्वच आता उघडे बोडके होऊन झुंजू लागले. एकएकास वीस-वीस तीस-तीस जखमा तीराच्या, बर्चीच्या झाल्या. रामजी पांगेरासह सातशेही मावळे अखेर मारले गेले. पण मावळ्यांच्या पराक्रमाने थक्क झालेला दिलेरखान तोंडात अंगुळी घालून एक घटका आश्चर्य करीत राहिला.'१८

साल्हेरचा मोरोपंतांचा आणि प्रतापरावांचा पराक्रम असामान्य होता. किल्ल्याभोवतीचा वेढा उठवण्यास भाग पाडत मोगलांची मराठा सैन्याने अक्षरश: खांडोळी केली. साल्हेरच्या सामरिक महत्त्वामुळे त्या दोघांच्या कामाचा गौरव झाला, तो योग्यच होता; परंतु रामजी पांगेराच्या सातशे मावळ्यांनी केलेले बलिदान तेवढेच अद्वितीय होते. त्या हौतात्म्याकरवी रामजी पांगेराने मराठा इतिहासात तानाजी किंवा मुरारबाजीच्या फंक्तीत कायमचे स्थान मिळवले!

औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेची सांगता

दिलेरखानाने पुण्याच्या दिशेने आपली आगेकूच पुन्हा सुरू केली. तो वर्षाअखेरीस पुण्याला पोचला. पुण्याच्या परिसरातील गावांच्या जाळपोळीचे आणि जनतेच्या कत्तलीचे सत्र त्याने हाती घेतले. शिवाजीराजे यामुळे घाबरून जाऊन आपल्याला शरण येतील, असा त्याचा कयास होता. परंतु लवकरच त्याचा भ्रमनिरास झाला. १३ जानेवारी १६७२ला मुंबईतील इंग्रजी कारखानदारांनी सुरतकारांना पत्रात लिहिले होते, 'शिवाजीराजे महाडला आले आहेत. त्यांनी कुडाळ, सिंहगड वगैरे दूरदूरच्या ठिकाणांवरून सैन्य गोळा केले आहे. याचे कारण दिलेरखानाने पुण्याचा कब्जा केला आहे आणि बऱ्याच लोकांचे शिरकाण केले आहे.' दिलेरखानाला जेव्हा कळले की, मराठा सैन्य साल्हेर आणि नाशिकमधील बागलाणचा प्रदेश काबीज करीत आहे, तेव्हा त्याने लगबगीने पुणे सोडले. बहादुरखान साल्हेरहून निघाल्यावर त्याच्या पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार भीमा नदीच्या काठाकाठाने अहमदनगरला पोचला. दिलेरखानही तिथेच काही वेळाने पोचला. जून १६७२मध्ये औरंगजेबाने शहजादा मुअझ्झमला आग्र्याला बोलावले आणि त्याच्या जागी बहादुरखानाची नेमणूक केली. अशा प्रकारे औरंगजेबाचा दिलेरखान व बहादुरखान यांना मोठ्या सैन्यासह दक्षिणेत पाठवण्याचा अभिनिवेश पोकळच ठरला होता.

५ जून १६७२ रोजी मोरोपंतांनी इगतपुरीच्या वायव्येला असलेले जव्हार काबीज केले. त्यानंतर दोन आठवड्यांनी त्यांनी रामनगरचाही ताबा घेतला. रामनगरच्या राजाला दमणमधील पोर्तुगीज वसुलीचा एक चतुर्थांश भाग देत असत. तो आता मराठ्यांना मिळू लागला. नाशिकचे ठाणे मोगलांचे नोकर व शिवाजीराजांचे नातलग जाधवराव यांच्याखाली होते. जुलै १६७२मध्ये नाशिकचा ताबा घेतला आणि तिथून ते वणी-दिडोरीला गेले. ते ठाणे सिद्दी हिलाल नावाच्या मोगल कारभाऱ्याच्या हाताखाली होते. मोरोपंतांनी तेही काबीज केले. त्यानंतर जाधवराव आणि सिद्दी हिलाल हे दोघेही शिवाजीराजांच्या नोकरीत स्वखुशीने रुजू झाले.

पन्हाळ्यावर विजय

मोगलांविरुद्ध शिवाजीराजांच्या या यशोमालिकेने शिखर गाठले, ते आदिलशाहीच्या प्रदेशात असलेल्या पन्हाळ्यावरील विजयाने. वास्तविक हा मोगलांशी लढ्याचा भाग नव्हे, परंतु त्याची ऊर्जा मोगलांवरील विजयातून मिळाल्यामुळे त्याचा इथे समावेश.

पन्हाळ्याचा उल्लेख प्रामुख्याने दोनदा आला आहे. पहिला सिद्दी जोहरच्या संदर्भात आणि दुसरा जयसिंहाच्या वेळी. शाईस्ताखान पुण्यावर चालून येत असल्याचे पाहून राजे ५,०००ची शिबंदी बरोबर घेऊन २ मार्च १६६० रोजी पन्हाळ्याला पोचले होते. ते पाहून त्यांना पकडण्यासाठी आदिलशहाने सिद्दी जोहरची खास निवड करून त्याला त्याच महिन्यात पन्हाळ्यावर पाठवले. सिद्दीने किल्ल्याभोवती करकचून टाकलेल्या वेढ्यात राजे तीन-चार महिने अडकून राहिले होते. शेवटी नेहमीच्याच शिताफीने १३ जुलै १६६०ला त्यातून ते निसटून जाण्यात यशस्वी झाले, परंतु दुसरा कोणताच पर्याय न उरल्याने २२ सप्टेंबर १६६०रोजी त्यांनी अखेरीस तो किल्ला सिद्दी जोहरकडे हवाली केला होता. त्यानंतर मोगल प्रदेशावर राजांचे लक्ष केंद्रित राहिल्याने किल्ला पुन्हा घेण्याचा विचार करण्यास त्यांच्याकडे

ना मनुष्यबळ होते, ना वेळ होता. पुढील दहा-अकरा वर्षे पन्हाळा आदिलशाहीच्या ताब्यातच राहिला.

पुरंदर तहानुसार जयसिंहाच्या विजापूरवरील हल्ल्यादरम्यान राजांना त्याची साथ करावी लागली. त्या हल्ल्यातील अपयशानंतर आपली इभ्रत राखण्याच्या उद्देशाने राजांनी पन्हाळा मोगलांसाठी जिंकून देण्याची तयारी दाखवली. जयसिंहाने विनाविलंब त्याला संमती दिल्यानंतर राजांनी १६ जानेवारी १६६६ रोजी भल्या पहाटे पन्हाळ्यावर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. गाफील शत्रूला अचानक स्तिमित करून तो किल्ला जिंकू शकू, असा राजांना विश्वास होता. परंतु शत्रू जागरूक असल्याने तो हल्ला फसला आणि ते राजगडला परतले. पन्हाळ्याला राजांची दक्षिण महाराष्ट्रातील दुसरी राजधानी म्हणत. पुढील चार वर्षे पन्हाळा आदिलशाहीकडेच राहिला. त्यानंतर राजांचे अली आदिलशहाबरोबरचे समीकरणही सुधारले.

अली आदिलशहा २४ नोव्हेंबर १६७२ रोजी मरण पावला. त्यानंतर त्याचा पाच वर्षांचा पुत्र सिकंदर राज्यावर आला. खवासखानाची वझीरपदी नेमणूक झाली. खवासखान हा मोहम्मद खान-इ-खानानचा दुसरा मुलगा. या मोहम्मदखानालाच बडी साहिबांच्या आदेशावरून ११ नोव्हेंबर १६५७ला ठार मारण्यात आले होते. खवासखान कर्तबगार सरदार होता. त्यानेच जयसिंह आणि शिवाजीराजे या दोघांचा विजापुरावरील एकत्र हल्ला दोन वर्षांपूर्वी परतवून लावला होता. आता उत्तर आणि मध्य महाराष्ट्रात बऱ्यापैकी स्थिरस्थावर झाल्यानंतर आणि विशेषकरून तानाजीने सिंहगड घेतल्यानंतर राजांचे लक्ष पुन्हा एकदा पन्हाळ्याकडे वळले. राजांनी डिसेंबर १६७२मध्ये विजापूर दरबारातील आपला वकील परत बोलावला आणि पन्हाळ्यावर रात्री अचानक हल्ला चढवून किल्ला काबीज करण्याचे गुप्त बेत आखण्यास सुरू केले.

त्यासाठी त्यांनी अनाजी पंडित आणि कोंडाजी रवेळकर (फर्जंद) या दोघांना राजापूर येथे थोडी फौज जमवायला सांगितले. तिथून त्यांनी गुप्तपणे पन्हाळ्यापाशी पोचून गड जिंकावा, असा राजांचा बेत होता. कोंडाजीने पुढे जाऊन किल्ल्यातील काही लोक फितवून ठेवले. ते दोघे ६ मार्चच्या आधी सुमारे दोनशे माणसे घेऊन पन्हाळ्याखाली पोचले. ६ मार्च १६७३च्या अंधाऱ्या रात्री कोंडाजी ६० लोक बरोबर घेऊन दोरखंडाच्या साहाय्याने गडाचा कडा चढून गेला. त्यांनी पहारेकऱ्यांना ठार मारले. त्यानंतर त्यांनी कर्णे वाजवून गडावर एकच गोंधळ उडवून दिला. सगळे सैरावैरा धावू लागले. त्याच वेळी कोंडाजीने गडाचा मुख्य दरवाजा सताड उघडला आणि अनाजी पंडितसह उरलेले मावळे आत आले. किल्लेदाराला ठार मारण्यात आले. दुसरा किल्लेदार नागोजी पंडित घाबरून पळून गेला.

पन्हाळा किल्ला काबीज झाला होता. जे काम सिद्दी जोहर ३०,००० फौजेनिशी करू शकला नव्हता, तेच काम कोंडाजीने शंभरपेक्षा कमी मावळ्यांनिशी करून दाखवले होते. रायगडावर ही बातमी पोचल्यानंतर राजांना अत्यंत आनंद झाला. लागलीच ९ मार्चला गुढीपाडव्याच्या शुभ दिनी ते रायगडावरून निघाले आणि १६ मार्च १६७३ला पन्हाळ्याला पोचले. त्यानंतर पन्हाळ्याला राजांचा एक महिनाभर मुक्काम होता. पन्हाळ्यावर त्यांचे किती प्रेम होते, हे यावरून दिसून येईल.

बहलोलखानाचा बीमोड

पन्हाळा हातून गेल्याची बातमी जेव्हा विजापूरला पोचली, तेव्हा खवासखान संतापला. त्याच्या वझीरपदावर तो एक धब्बा होता. त्याने लागलीच मिरज व पन्हाळ्याचा सुभेदार बहलोलखान याला किल्ला परत काबीज करण्याचा आदेश सोडला. बहलोलचे मूळचे नाव अब्दुल करीम. तो १६५५ साली मरण पावलेल्या अब्दुर रहीम बहलोलखानाचा पुत्र. त्याला बहलोल हा किताब पित्याच्या मृत्यूनंतर देण्यात आला होता. तो पठाण होता आणि दरबारातील पठाणांचे नेतृत्व कारण असल्याने दरबारी त्याचे चांगले वजन होते. बहलोलखान लागलीच १२,००० स्वारांची फौज घेऊन पन्हाळ्याकडे रवाना झाला. वाटेत तिकोटा येथे त्याने दोन दिवसांचा मुक्काम केला.

बहलोलखान पन्हाळ्याकडे चालून येत असल्याचे कळल्यावर राजांनी त्याला पन्हाळ्यापर्यंत पोचू न देता वाटेतच त्याच्याशी लढत देण्याचे ठरवले. त्यांनी सरनोबत प्रतापराव गुजर व आनंदराव यांना १५,००० फौजेनिशी बहलोलखानाच्या बंदोबस्तासाठी पाठवले. त्यांच्याबरोबर विठोजी शिंदे, विठ्ठल पिलदेव, वृष्णाजी भास्कर, विसो बल्लाळ, सिद्दी हिलाल वगैरे कसलेले सरदारही त्यांनी पाठवले. कोणत्याही स्थितीत पन्हाळा पुन्हा हातातून गमावू द्यायचा नाही आणि त्याला वेढा पडू द्यायचा नाही, असा राजांनी निर्धार केला असावा आणि तशी ताकीदही त्यांनी सरदारांना दिली होती.

प्रतापरावाने विजापूरपासून पश्चिमेस ३६ मैलांवर असलेल्या उंबराणी येथे बहलोलखानाच्या सैन्याला नदीपाशी गाठले. त्याला वेढा घालून प्रथम प्रतापरावाने खानाच्या सैन्याचे पाणी तोडले. त्यानंतर त्याने बहलोलखानाच्या सैन्यावर १५ एप्रिल १६७३रोजी हल्ला चढवला. हातघाईचे तुंबळ युद्ध झाले. बहलोलखानाच्या सैन्याची प्रचंड जीवहानी झाली. त्यात पाणी न मिळाल्याने त्यांची अवस्था आणखीनच खस्ता झाली. दुसरा कोणताही पर्याय न राहिल्याने बहलोलखानाने शरणागती पत्करली. त्याबरोबर त्याने जीवयाचना करून सुखरूप जाऊ देण्याची प्रतापरावाकडे विनंती केली. प्रतापरावाला त्याची दया आली. त्याने बहलोलखानाला त्याचे सर्व सामान मराठ्यांच्या हवाली करून त्याच्या सैन्याला सडे जाण्याची परवानगी दिली.

बहलोलखानाला सोडून दिल्याची बातमी ऐकून राजांनी प्रतापरावाची अत्यंत कडवट शब्दांत खरडपट्टी केली आणि बहलोलखानाला मारत नाही, तोपर्यंत तोंडही न दाखवण्यास सांगितले. ते शब्द जिव्हारी लागून प्रतापरावाने पुढील सात-आठ महिने हुबळी-कोल्हापूर भागात मोहीम काढली. त्याने हुबळीची श्रीमंत बाजारपेठ लुटली. बहलोलखानाने आपल्या सैन्याची पुन्हा जमवाजमव केली. कोल्हापूरला तळ टाकून सभोवतालच्या शिवाजीराजांच्या अमलाखालील प्रदेशात तो जाळपोळ अन लुटालूट करू लागला. बहलोलखान बेळगावच्या वाटेने येत आहे, असे कळताच प्रतापरावाने २४ फेब्रुवारी १६७४ला गडहिंग्लजजवळ नेसरीच्या खिंडीत त्याला गाठले.

बहलोलखानाच्या समोर जाण्यास प्रतापराव इतका अधीर झाला होता की, कोणत्याही परिस्थितीत बहलोलखान निघून जाऊ नये म्हणून आपल्या इतर शिबंदीसाठी न थांबता केवळ सहा स्वार घेऊन त्याने बहलोलखानावर हल्ला चढवण्याचा धाडसी, परंतु अविचारी प्रयत्न

केला. इतके मोठे सैन्य आसपास असताना त्याच्याजवळ पोचणे प्रतापरावाला शक्यच नव्हते. त्या सातही जणांना जीव गमवावा लागला. प्रतापराव हा सच्चा सैनिक होता. आपल्या निष्ठास्थानाकडून निर्भर्त्सना झाल्यावर त्याची चूक त्याला कळली. राजांना तोंड न दाखवण्याच्या आदेशापेक्षा आणखी मोठी शिक्षा त्याला मिळूच शकत नव्हती. त्याचमुळे त्याने हा परमत्याग केला. स्वामिनिष्ठेच्या परिसीमा इतक्या क्वचितच उंचावल्या असतील. शिवाजीराजांना कमालीचे दु:ख झाले. प्रतापरावाच्या निष्ठेची अंशत: भरपाई का असेना, सहा वर्षांनतर त्यांनी त्याच्या मुलीचा विवाह आपले द्वितीय चिरंजीव राजारामराजे यांच्याशी करून दिला.

प्रतापरावाबरोबर आनंदराव मकाजी हा सरदार होता. तो बहलोलखानाच्या शोधात गेला. यावर मोगल सरदार दिलेरखानाला बहलोलने बोलावले. ते दोन पठाण एकत्र आल्याचे पाहून दक्षिणेतील संपगाव या बहलोलखानाच्या जहागिरीकडे आनंदरावाने आपला मोर्चा वळवला. ते ठिकाण २३ मार्च १६७४ला लुटून दीड लाख होन गोळा केले. परतताना बहलोलखान आणि खिजरखान यांच्याशी त्याची झुंज झाली. त्या घनघोर लढाईत आनंदरावाने बहलोलखानाचा पराभव केला. खान पाठलाग करत असूनही त्याला हुलकावणी देऊन आनंदराव सुखरूपपणे परत आला. प्रतापरावाचे उद्दिष्ट काही अंशी तरी सफल झाले होते.

राजांनी आनंदराव मोहिते या सरदाराला प्रतापरावाच्या जागी सरनोबत नेमले. त्याला 'हंबीरराव' हा किताब देण्यात आला. त्यानंतर राजे चिपळूणपासून कारवारला जाऊन रायगडला परत आले.

मोगलांशी लढ्याचा अंत

त्याच वेळी दिलेरखान त्याच्या बागलाणमधील जहागिरीचा नाशिक आणि साल्हेरदरम्यानचा गेलेला प्रदेश परत मिळवण्याचा प्रयत्न करीत होता. फेब्रुवारी १६७४मध्ये मराठ्यांशी झालेल्या एका लढाईत दिलेरखानाचे हजार एक पठाण मारले गेले. बहादुरखान आपले सैन्य मार्च-एप्रिल १६७४ मध्ये कोकणात घुसवण्याचा प्रयत्न करत होता, परंतु राजांनी सर्व खिंडी रोखून धरल्यामुळे त्याचा प्रयत्न तडीस गेला नाही. तेवढ्यात औरंगजेबाने दिलेरखानाला वायव्येतील अफगाणांच्या बंडाचा बंदोबस्त करण्यासाठी उत्तरेत बोलावले. त्यानंतर दक्षिणेत फक्त बहादुरखानच उरला. त्याच्यात काही विशेष दम नव्हता आणि काही कवड्यांवर त्याला विकत घेणे शक्य होते. थोडक्यात गेले दशकभर मोगलांशी चाललेला लढा संपुष्टात आला होता. राजांनी यशस्वीरीत्या मोगलांच्या शक्तीच्या मुसक्या बांधलेल्या होत्या. तिकडे आदिलशाहीसुद्धा निष्प्रभ झाली होती. राजांच्या राज्याभिषेकासाठी समर्पक वेळ आता येऊन ठेपली होती.

लष्करी विलेषण

१६७१ ते १६७४ हा तीन-साडेतीन वर्षांचा कालावधी मराठी स्वराज्यासाठी एक लष्करी सुवर्णकाळ ठरला. डिसेंबर १६७०मधील राजांनी सुरतेवर केलेल्या दुसऱ्या हल्ल्याची आणि

जानेवारी १६७१मध्ये परत जाता जाता मोरोपंतांनी साल्हेर किल्ला काबीज केल्याची बातमी ऐकून औरंगजेबाची झोप उडाली. त्याचा प्रतिसाद कडवट होता. वास्तविक तो स्वत: दक्षिणेत मोहीम काढण्याच्या विचारात होता, परंतु त्याच्या कार्यबाहुल्यामुळे तो जाऊ शकला नाही. म्हणून त्याने राजांना नामोहरम करण्यासाठी दिलेरखान, बहादुरखान, दाऊदखान, महाबतखान आणि जसवंतसिंह यांच्यासारख्या मोगल साम्राज्याच्या रथी-महारथी सरदारांची तातडीने फेब्रुवारी १६७१मध्ये रवानगी केली. १६७४च्या मध्यापर्यंत राजांनी या सर्वांना पळवून लावले, फक्त बहादुरशहाच काय तो मागे राहिला. या दरम्यान मराठ्यांनी साल्हेरवरचा वेढा फोडला, दिलेरखान आणि बहादुरखानाचे पुणे परिसरावरील हल्ले परतवले. मोरोपंतांनी विविध किल्ले काबीज केले. कोंडाजी फर्जंदने राजांच्या मार्गदर्शनाखाली पन्हाळा काबीज केला, १६७३मध्ये आदिलशहाने पन्हाळा परत घेण्यासाठी पाठवलेल्या बहलोलखान या बलदंड सरदाराचा प्रतापराव गुजराने पराभव करून त्याला परत पाठवले. प्रतापरावाने त्या कारस्थानी खानाच्या खोट्या याचनांना बळी पडून त्याची मुक्तता केली नसती, तर त्याने नंतर माजवलेला गोंधळ झाला नसता. यातील प्रत्येक लष्करी कारवाई व्यावसायिकरीत्या सफाईने पुरी करण्यात आली.

मराठ्यांनी जो साल्हेर किल्ला गनिमी हल्ल्याकरवी काही दिवसांपूर्वी सहज काबीज केला होता, तो हल्ला चढवून परत घेणे हे मोगल सैन्याच्या कुवतीबाहेर होते, याची दखल घेणे आवश्ययक आहे. दोन सैन्यांच्या कर्तृत्वांतील तफावतीचा हा लक्षणीय दर्शक आहे. जवळ प्रचंड सैन्य असूनही हल्ला चढवण्याचा विचारसुद्धा दिलेरखान, बहादुरखान अशा अनुभवी सरदारांच्या मनाला शिवला नाही; उलट किल्ल्याला वेढा घालून शत्रूला दीर्घ काळासाठी कोंडून तो शरण येण्याची वाट पाहायला ते तयार होते. हे दोन सैन्यांतील आक्रमक प्रवृत्तींतील अंतर.

साल्हेरखाली वेढा टाकून बसलेल्या इखलासखानाच्या ३०,००० मोगल सैन्याविरुद्ध हल्ला चढवण्यासाठी पायदळाची आवश्येकता पडेल, हे अचूक जाणून मोरोपंतांच्या बरोबरील पायदळ कोकणमार्गे पोचेपर्यंत राजांनी हल्ला लांबवला. मग प्रतापरावाच्या घोडदळाने ते तिथे पोचायच्या सुमारास त्यांच्याशी संपर्क साधला. मग पायदळ एका बाजूने आणि घोडदळ एका बाजूने अशा कात्रीत इखलासच्या सैन्याला पकडण्यात आले. त्यातही प्रतापरावाने कृत्नीती वापरून आपण माघार घेत असल्याची बतावणी केली. त्याच्या मागे जाण्यासाठी मोर्चे सोडून मोगल सैन्य बाहेर आल्याबरोबर मोरोपंतांनी त्याच्यावर करारी हल्ला चढवला. मग दिशा बदलून प्रतापरावाचे घोडदळही त्यांच्यावर तुटून पडले. दोन्ही बाजूंनी कोंडलेल्या मोगल सैन्याची अक्षरश: चाळण केली. ३०,००० विरुद्ध १५,००० या बलाबलाच्या समीकरणाला न जुमानता मराठ्यांनी तीस हजारांपैकी सुमारे अठ्ठावीस हजारांना कापून काढले. विशेष म्हणजे किल्ल्याभोवतीचा परिसर घोडदळाच्या वापरास साजेसा नव्हता, तरीही त्या काट्युट्याच्या जमिनीवर प्रतापरावाचे घोडदळ सफाईने वावरले. साल्हेरची लढाई आंतरराष्ट्रीय पातळीच्या उत्तम लढायांच्या प्रभावळीत समाविष्ट झाली पाहिजे.

रामजी पांगेराच्या केवळ सातशे मावळ्यांनी दिलेरखानाच्या संख्येत कित्येक पटींनी अधिक

असलेल्या पठाणांना दिलेला लढा हा मराठा सेनेच्या असामान्य मनोधैर्याचा व क्षात्रवृत्तीचा उल्लेखनीय निर्देशांक आहे. सैन्याच्या उच्च मनोबलाचे अनेक घटक आहेत. नेतृत्व त्यात अग्रगण्य. यासाठी रामजी पांगेराचे कौतुक केले पाहिजेच, परंतु त्यातील सिंहाचा वाटा राजांच्या अलौकिक आणि स्फूर्तिदायक नेतृत्वाला दिला पाहिजे. दिलेरखान आणि बहादुरखान यांच्यासारख्या प्रचंड मोगल सेनेसह आलेल्या सरदारांचा पोकळ अभिनिवेश काही दिवसांतच मावळत, असे याचे प्रमुख कारण म्हणजे राजे व त्यांच्या सरदारांचे नेतृत्व आणि स्वराज्य सेनेचे मनोबल. पांगेरा आणि मुरारबाजी या दोघांचे हौतात्म्य तेवढेच अद्वितीय. पांगेराला मात्र इतिहासाने मुरारबाजीइतका न्याय दिला नाही, ही वस्तुस्थिती.

पन्हाळ्यावरील विजय हे राजांच्या 'आश्चर्यजनकता आणि शाठ्य' या युद्धतत्त्वाच्या तल्लख वापराचे आणखी एक उदाहरण. ३०,०००च्या सैन्यासह आलेला सिद्दी जोहर चार महिने थांबूनही पन्हाळा घेऊ शकला नाही. एवढेच नव्हे, तर जयसिंहाला पन्हाळा जिंकण्याची ग्वाही देऊन आलेल्या खुद्द राजांनाही तो किल्ला घेण्यात अपयश आले. युद्धशास्त्राच्या शिकवणुकीनुसार विजयाच्या घटकांमध्ये सैन्यसंख्येपेक्षा डावपेच हा घटक वरचढ ठरतो, याचे हे मार्मिक उदाहरण. केवळ ६० मावळे घेऊन कोंडाजी फर्जंदने पन्हाळ्यासारखा अभेद्य किल्ला सर करण्यामागे योजनेचा बुद्धिमान आराखडा, सर्व जागांची पूर्व टेहळणी, दोरखंडाच्या साहाय्याने चढून जाण्यासाठी शत्रूच्या दृष्टिपथाच्या बाहेर असलेल्या जागेची निवड, कडा चढण्यात तुकडीतील प्रत्येक मावळ्याचे प्रावीण्य, त्या प्रक्रियेची वारंवार रंगीत तालीम, गुप्तता-शिस्त-अवधान-कौशल्य-साक्षेप यांचे सुंदर संमिश्रण, शेवटी गडावरील दरवाजे उघडून बाकीच्या मावळ्यांना आत घेण्याची तजवीज आणि कर्णे व तुताऱ्यांचा ऐनवेळी गजर करून सर्वत्र भगदड माजवण्याची कल्पकता हे सर्व या अफलातून कारवाईचे घटक होते. आश्चर्य व शाठ्यावर आधारलेल्या कारवाया हाती घेणे हे काही कोण्या येरागबाळ्याचे काम नाही. राजांनी ते आणखी एकदा यशस्वी करून दाखवले. किंबहुना लष्करी तुलनेत कोंडाजीचा पन्हाळ्यावरील विजय हा तानाजीच्या सिंहगडावरील विजयापेक्षा तसूभर श्रेष्ठच होता. तानाजीच्या हौताम्यामुळे आणि त्याच्या पूर्वख्यातीमुळे सिंहगडावरील धाड नावाजली; कोंडाजी मात्र अज्ञात राहिला.

प्रतापराव गुजरचा आत्मयाग लोकगीतांनी जीवित ठेवला. परंतु या प्रसंगातील रोमांचकता सोडली, तर एखादा तर्कनिष्ठ लष्करी परीक्षक प्रतापरावासारखा मुरब्बी सरनोबत केवळ भावनेला बळी पडून एकटा (बाकी सहा जण केवळ तो पेटून बहलोलखानाच्या शिबिरावर हल्ला करतो आहे, हे पाहून त्याच्या मागे गेले) खानाच्या सैन्यावर चालून जाईल, हे मान्य करणार नाही. कदाचित याच्यामागे एक फसलेला डाव असावा. नेसरीच्या खिंडीजवळ बहलोलखानाच्या सैन्याची छावणी पडली आहे, हे कळल्यावर प्रतापरावाने गनिमी काव्याने त्याच्या तळावर फक्त सहा जणांसह घाला घालण्याचा आणि बहलोलखानाला ठार मारण्याचा डाव रचला असावा. दुर्दैवाने एकतर त्याची बातमी बहलोलखानाला लागल्यामुळे किंवा दुसऱ्या काही कारणामुळे तो फसला असावा आणि ते सातही शूरवीर मृत्युमुखी पडले असावेत. ही योजना सफल झाली असती, तर प्रतापराव आणि त्याचे सहा दिव्य अनुयायी; विसाजी

बल्लाळ, दिपोजी राऊतराव विठ्ठल, पिराजी अत्रे, वृष्णाजी भास्कर, सिद्दी हलाल व विठोजी यांच्या शौर्याची आणखी एक चित्तथरारक गाथा त्यांच्या रक्ताने लिहिली गेली असती. नक्की काय घडले, हे इतिहासाच्या ढिगाऱ्यात शोधणे स्वारस्यपूर्ण ठरेल.

शिवाजीराजांनी केलेली कानउघाडणी आणि प्रतापरावाची आत्माहुती या दोन्हींचा कार्यकारणभाव लावणे पूर्ण चूक आहे. तो पाताळयंत्री आणि खोटारडा बहालोलखान त्यानंतर पुन्हा चालून आला आणि त्याच्या बंदोबस्तासाठी आनंदरावाला पाठवावे लागले, हीच राजांच्या दूरदृष्टीची प्रचीती.

प्रतापरावाचे हौतात्म्य हा अपार लष्करी स्वामिनिष्ठेचा अद्वितीय अध्याय आहे. स्वामिनिष्ठा हा सैनिकी अस्तित्वाचा गाभा आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी एखाद्या मृतदेहाला खडबडून जागे करतील, अशा शब्दांत त्या सात जणांचे शौर्य शब्दबद्ध केले आहे

खालून आग, वर आग, आग बाजूनी, समशेर उसळली सहस्र क्रूर इमानी;
गर्दीत लोपले सात जीव ते मानी, खग सात जळाले अभिमानी वणव्यात.
दगडावर दिसतिल अजुनी तेथल्या टाचा, ओढ्यात तरंगे अजुनी रक्त रंगाचा;
क्षितिजावर उठतो अजुनी मेघ मातीचा, अद्याप विराणी कुणी वाऱ्यावर गात.
म्यानातुनी उसळे तलवारीची पात, वेडात मराठे वीर दौडले सात!

संदर्भसूची

१. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन; पान २५१; उद्धृत शिवकालीन पत्रसार संग्रह, (प. सा. सं.), पत्र क्र ११२३.

२. पुर्वोक्त; पान २६२.

३. निनाद बेडेकर; छत्रपती शिवाजी; कर्नाटक प्रकाशन संस्था; पान ८६.

४. विजय देशमुख; शककर्ते शिवराय, खंड २; पान ११८, उद्धृत डॉ. बाळवृष्ण; शिवाजी खंड १, भाग २, पान २५३.

५. पुर्वोक्त; पान ११७; उद्धृत वि. का. राजवाडे, माहीमची बखर, पान ९४-९५.

६. बाळशास्त्री हरदास; पुण्यलोक शिवाजी महाराज, भाग ३; लाखे प्रकाशन; पान ९७-९८.

७. बाबाराव सावरकर; गरुडझेप; स्वातंत्र्यवीर सावरकर वाङमय वक्तृत्व समिती, पुणे, १९३९; पान ९१.

८. विजय देशमुख, ...शककर्ते ...., खंड २, पान ११८.

९. गो.स. सरदेसाई; मराठी.........; पान २८८.

१०. पुर्वोक्त; पान ३३.

११. विजय देशमुख, शककर्ते ....;पान १९१-९२; उद्धृत सभासद बखर पान ६६.

१२. गजानन मेहेंदळे; शिवाजी हिज लाइफ अँड टाइम्स; परम मित्र पब्लिकेशन्स; पान

४२९.

१३. गो स. सरदेसाई; मराठी ....; ,पान २७७.

१४. गजानन मेहेंदळे; शिवाजी ....; पान ४३४.

१५. पळसोकर आर. डी.; शिवाजी द ग्रेट गुरीला; स्वयंप्रकाशित; पान १९७.

१६. विजय देशमुख;.......शककर्ते ....खंड २; उद्धृत सभासद बखर, पान ७७.

१७. गो.स. सरदेसाई; मराठी ....; २७८.

१८. विजय देशमुख; ...... शककर्ते......; खंड २; उद्धृत सभासद बखर पान ७६-७७.

७.
कोकण आणि दक्षिणेवर अधिराज्य



कोकण

कोकण किनाऱ्याचा प्रदेश


पश्चिमेस अरबी समुद्राचा मुंबईपासून वेंगुर्ल्यापर्यंत सागरकिनारा आणि पूर्वेस सह्याद्री डोंगरसरीचा पायथा यांच्यामधील प्रदेश कोकण या नावाने ओळखला जातो. आर्यांनी वेदकाळात कोकणात वसाहती स्थापल्या. प्राचीन काळी 'कुणकन' नावाच्या जमातीने या प्रदेशावर दीर्घ काळ राज्य केले. त्यामुळे त्याचे कोकण असे नाव पडले असावे.१

काळाच्या ओघात इजिप्त, इराण, अरबस्थान आणि पूर्व आफ्रिकेतील लोक येथे येऊन स्थायिक झाले. सागरी मार्गांवरील यातायातीवर मुस्लिमांचे वर्चस्व होते. स्थानिक राजांनी त्यांना बंदरांचा ताबा घेण्यात आणि त्या परिसरात स्थायिक होण्यास विरोध केला नाही. युरोपीय व्यापाऱ्यांनी पश्चिम सागरतटावर चंचुप्रवेश करून आपल्या वसाहती बंदरांच्या परिसरातच वसवल्या. त्या काळातील बंदरे सागरतटावर नसत, तर ती अंतर्भागातून समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्यांच्या मुखावर असत. त्यामुळे समुद्रमार्गे येणारे जहाज भरती-ओहोटीनुसार आत येऊन नदीच्या पात्रात असलेल्या बंदरात सामान उतरवत व चढवत असे. त्याबरोबरच नदीच्या दोन्ही बाजूंना टेकाडे असतील, तर त्यामुळे आत येणाऱ्या परदेशी जहाजावर इच्छेनुसार हल्ला चढवणे शक्य होई. बंदरांच्या सान्निध्यातील किल्ल्यात संरक्षणासाठी शिबंदी ठेवणेही सुलभ होत असे.

मुंबईच्या दक्षिणेला असलेल्या रेवस-अलीबागपासून पार दक्षिणेस वेंगुर्ल्यापर्यंतची किनारपट्टी कोकणात मोडते. (नकाशा क्र. २५ पाहा.) कोकणच्या सागरकिनाऱ्याच्या पूर्वेस २५ ते ४० मैल अंतरावर जवळजवळ समांतर अशा सह्याद्री पर्वताच्या रांगा उत्तर-दक्षिण दिशेने पसरल्या आहेत. त्याच्या पूर्वेला दख्खन पठार पसरले आहे. कोकणाच्या संदर्भात या पठाराला देश म्हणून संबोधले जाते.

नकाशा क्र. २५

कोकणची किनारपट्टी



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

सागरतीरालगत उत्तरेकडून दक्षिणेच्या दिशेला जाऊ लागल्यास प्रथम येते ते मुंबईचे बेट, किंबहुना सात छोट्या बेटांचा समूह. १६६२मध्ये पोर्तुगीज राजकन्या कॅथेरिन आणि इंग्लंडचा राजपुत्र चार्ल्स (दुसरा) यांच्या लग्नात पोर्तुगीजांनी मुंबईचे बेट हुंड्यादाखल इंग्रजांना भेटीदाखल दिले होते. त्यावर इंग्रजांनी आरमारी ठाणे उभारले. आपले नौदल स्थापण्याच्या शिवाजीराजांच्या विचाराचा आरंभ सुमारे त्याच दरम्यान झाला होता. रेवस बंदरात अंबा नदी समुद्रास मिळते. त्याच्या नैर्ऋत्येस सुमारे १० मैलांवर समुद्रात खांदेरी आणि उंदेरी ही दोन बेटे आहेत. ती आरमारी दृष्टीने महत्त्वाची होती. त्यांच्या दक्षिणेस कुंडलिका नदी समुद्रास मिळते. तिच्या तीरावर चौल आणि रेवदंडा ही बंदरे आहेत. चौल हे त्या काळातील प्रसिद्ध व्यापारी बंदर होते. त्याच्याजवळ बिरवाडी, तळे, घोसाळे हे किल्ले आहेत.

मुरुड बंदराला लागून दंडराजपुरी नदीच्या मुखाशी बेटावर बांधलेला जंजिरा हा लंबवर्तुळाकार प्रसिद्ध जलदुर्ग आहे. जंजिरा म्हणजे पाण्यातला किल्ला. अरबी शब्द जझीरा, म्हणजे बेट, या शब्दाचा अपभ्रंश. उत्तरेस रोहा नदीपासून दक्षिणेस सावित्री नदीपर्यंतच्या ३५ मैलांच्या परिसरावर तो प्रभुत्व राखू शकत असल्याने या टापूतील आरमारी संरक्षणाच्या दृष्ट्या ते सर्वांत महत्त्वाचे ठिकाण होते, आजही आहे.

कोकणात महाड दासगावावरून सावित्री नदी देवगड आणि बाणकोट दरम्यान समुद्रास मिळते. सावित्रीच्या मुखाजवळ दक्षिण बाजूस बाणकोट आणि उत्तर बाजूस हरेश्वर व श्रीवर्धन ही प्रसिद्ध स्थळे आहेत. बाणकोट हा महत्त्वाचा किल्ला आहे. वसिष्ठी नदी चिपळूण शहराजवळून वाहते. अंजनवेल, गोवळकोट व जयगड हे महत्त्वाचे किल्ले आहेत. वाघोटण नदीच्या मुखाशी विजयदुर्ग (घेरिया) किल्ला आहे. त्याच्या दक्षिणेला सिंधुदुर्ग हा किल्ला शिवाजी राजांनी बांधला. वेंगुर्ल्याच्या दक्षिणेला गोव्याचा प्रदेश सुरू होतो.

कोकण प्रदेशाचे लष्करी मूल्यमापन

समुद्रमार्गे दख्खन पठाराच्या दिशेने येणाऱ्या आक्रमणांना सह्याद्री हा एक परिणामकारक नैसर्गिक प्रतिरोध आहे, परंतु त्याचबरोबर पठारावरून कोकणाकडे येण्याच्या हालचालींनासुद्धा सह्याद्रीच्या तटबंदीमुळे अडथळा निर्माण होतो. त्यामुळे देशातून कोकणाकडे सैन्याची हालचाल हे कठीण आणि वेळखाऊ काम होते. पूर्व-पश्चिम दिशेत वाहणाऱ्या अनेक नद्या कोकणच्या लांबलचक आणि अरुंद पट्टीचे विभाजन करतात. त्यामुळे सैन्याच्या पूर्व-पश्चिम दिशेतील हालचालींना अवरोध निर्माण होतो. दळणवळण मार्गांचा अभाव असलेल्या त्या काळात एका बाजूला सागर, दुसऱ्या बाजूला सह्याद्री आणि मधल्या क्षेत्रात किल्ले व नद्यांचे जाळे असा परिसर प्रामुख्याने संरक्षणात्मक लष्करी कारवायांना अनुकूल होता. घोडदळावर आधारित असलेल्या हालचालप्रधान आक्रमक कारवायांना मात्र तो पूरक नव्हता.

मुंबईपासून विजयदुर्गापर्यंतची समुद्राची किनारपट्टी सामरिक दृष्ट्या अत्यंत संवेदनशील होती. रायगड हे लष्करी दृष्टिकोनातून सर्वांत महत्त्वाचे स्थळ होते. त्या टापूवर लष्करी नियंत्रण ठेवण्यासाठी रायगड हातात असणे आवश्यूक होते. अशा मर्मस्थळाला लष्करी

परिभाषेत 'व्हायटल ग्राउंड' असे संबोधले जाते. त्याचबरोबर त्याला संरक्षक कवच पुरवण्यासाठी आसपासचे इतर किल्ले महत्त्वाचे होते. सह्याद्री डोंगरासरीवरून कोकणात प्रवेश करण्यासाठी काही खिंडींतून जाणारे रस्ते होते. त्या खिंडी हातांत ठेवणे महत्त्वाचे असे. शिवाजीराजांच्या हातांत त्या खिंडी असल्याने ते आपल्या इच्छेनुसार कोकणाची कोंडी करू शकत.

जंजिरा किल्ला हे आरमारी संरक्षणाच्या दृष्टीने रायगडाइतकेच महत्त्वाचे स्थान होते. जंजिरा ज्याच्या ताब्यात असेल, तो मुंबईपासून वेंगुर्ल्यापर्यंत सर्व जलवाहतुकीवर वर्चस्व संपादू शकत होता. उत्तरेत उंदेरी-खांदेरी आणि दक्षिणेतील जयगड-अंजनवेल हे दुर्गद्वय जंजिऱ्याच्या संरक्षणाची डावी आणि उजवी तटबंदी होते. त्याचबरोबर सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग हे महत्त्वाचे जलमोर्चे होते.२

सारांशाने सांगावयाचे झाल्यास रायगड, अवचितगड व गोवळकोट हे किल्ले आणि जंजिरा, उंदेरी-खांदेरी, सिंधुदुर्ग-विजयदुर्ग हे जलदुर्ग सदैव आपल्या हातांत ठेवणे हे या भागावर लष्करी प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी आवश्यचक होते.

कोकण किनाऱ्यावर विविध आरमारांचे प्रभुत्व होते. दक्षिणेला गोवा व उत्तरेला साष्टी-वसईत पोर्तुगीज; मुंबई बेटात इंग्रज; दीव-दमण, त्यानंतर पुन्हा पोर्तुगीज, सुरतेला परकीय कारखानदार व मोगल आणि हबसाणात सिद्दी. कोकण किनाऱ्यावर अधिराज्य प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या शिवाजीराजांची यात मिळवणी होत होती. इतक्या विविध आरमारी सत्ता एवढ्या तोकड्या अंतराच्या किनाऱ्यावर आपापले वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतील, तेव्हा त्यांच्या 'हितसंबंधांमध्ये संघर्ष' घडणे स्वाभाविकच होते.

दक्षिण कोकणात मोहीम

१६६१मध्ये शाईस्ताखानाची पुणे परिसरावरील पकड दिवसेंदिवस घट्ट होत चालली होती. त्याने कोकणाचा ताबा घेण्यासाठी पाठवलेल्या करतलबखानाच्या सैन्यावर राजांनी उंब्रे घाटामध्ये सापळा लावून त्याला परत जाण्यासाठी भाग पाडले होते. त्यामुळे पुण्याच्या बाजूला फारशा कारवाया सध्यातरी हाती घेणे शक्य नव्हते. त्याउलट आपल्याला मारण्यासाठी अफझलखानाला पाठवल्याबद्दल त्यांना आदिलशहाचा वचपा घ्यायचा होता. दाभोळ, राजापूर आणि कारवार या धनाढ्य बंदरांच्या परदेशांशी असलेल्या व्यापारामुळे जंजिऱ्याचा सिद्दी बलाढ्य झाला होता आणि मराठ्यांना विरोध करत होता. त्याच्या वाढत्या प्रभावाला पायबंद घालणे आवश्य क होते. रणदुल्ला ऊर्फ रुस्तुम-इ-जमान याची जहागीर रत्नागिरीपासून कारवारपर्यंत होती. त्यात बेळगाव-कोल्हापूरपर्यंत घाटावरचा प्रदेशही समाविष्ट होता. रुस्तुम-इ-जमान आणि महाराज यांच्यात सौहार्द असल्यामुळे त्या प्रदेशात वावर करण्यास त्यांना अडचण पडणार नव्हती. त्याबरोबर पन्हाळ्यावर तोफमारा करण्यासाठी आदिलशहाला मदत करणाऱ्या राजापूरमधील वखारीतल्या रेव्हिंग्टन आणि इतर इंग्रजांचा त्यांना समाचार घ्यायचा होता. हे सर्व उद्देश मनाशी धरून शिवाजीराजांनी दक्षिण कोकणात १६६१च्या पूर्वार्धात म्हणजेच फेब्रुवारी ते मे १६६१ दरम्यान मोहीम हाती घेतली. (नकाशा क्र. २६ पाहा.)

नेतोजी पालकरला उंब्रे येथे ठेवून राजे प्रथम दाभोळला गेले. तिथे २०००ची शिबंदी ठेवून दापोलीच्या उत्तरेस असलेल्या पालवणवर ते चालून गेले. पालवणचा राजा यशवंतरावाने प्रतापगडाच्या लढाईत अफझलखानाला साथ दिली होती. त्याच्यावर राजांनी हल्ला केला आणि पालवण काबीज केले. यशवंतराव पळून शृंगारपुराच्या सुर्व्यांच्या आश्रयास गेला. त्यानंतर त्यांनी दळवीकडून दाभोळ हस्तगत केले. तिथून चिपळूणमार्गे ते संगमेश्वरास गेले. तिथला मुस्लीम कारभारी पळून गेल्याने ते त्यांच्या हातात पडले. तिथे त्यांनी तानाजी मालुसरे आणि पिलाजी निळकंठराव यांना ठेवले आणि ते देवरूखला गेले.


तिथून राजे राजापूरला १५ मार्च १६६१ला पोचले. इंग्रजांची तिथली वखार लुटून त्यांनी इंग्रजांना कैद केले. राजापूरच्या बाहेर त्यांनी मुक्काम केला आणि तिथून केळवली, कशेळी, खारेपाटण, नेवरे, पावस वगैरे आसपासच्या गावांत टेहळणीसाठी तुकड्या पाठवून आपली सत्ता बसवली आणि आपले कारभारी नेमले. इतक्यात संगमेश्वरमध्ये सूर्यराव सुर्वे तानाजीवर चालून आल्याचे त्यांना कळले. जावळीच्या मोरेला मदत केल्याने सूर्यरावाशी त्यांचे वाकडे आले होते आणि त्यावेळी समजुतीने त्यांनी प्रकरण मिटवले होते. आता राजे सुर्व्यावर चालून जाता तो शृंगारपूरला पळाला. राजे खारेपाटणवरून २९ एप्रिल १६६१ला शृंगारपूरला आले आणि त्यांनी ते काबीज केले. तिथे त्यांनी त्रिंबक भास्कर याला आपला कारभारी म्हणून नेमले. मग त्यांनी पाली हस्तगत केले.

शिवाजीराजांनी दक्षिण कोकणातील खारेपाटणपर्यंतचा प्रदेश आपल्या अमलाखाली आणला. त्यांनी शृंगारपूरजवळील किल्ल्याचे नाव प्रचीतगड असे ठेवले. पालीजवळच्या किल्ल्याला त्यांनी मंडणगड असे नाव दिले. त्यादरम्यान मोगलांनी कल्याण व भिवंडी घेतल्याची बातमी आली. राजांनी त्या बाजूस जाऊन पेणजवळच्या डेहरी येथील किल्ला घेतला. त्यानंतर ते कल्याणवरही चालून गेले, परंतु पावसाळा तोंडाशी आल्यामुळे ते रायगडला परत आले.

नकाशा क्र. २६

दक्षिण कोकण मोहीम

फेब्रुवारी ते मे १६६१



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

इंग्रजांचा भ्रमनिरास

सिद्दी जोहरने पन्हाळ्याला वेढा दिला, तेव्हा त्याने पन्हाळ्याच्या भक्कम तटबंदीला उद्ध्वस्त करण्यासाठी राजापूरमधील फ्रेंच व इंग्रजांकडे मोठ्या तोफांची मागणी केली होती. अशा वेळी फ्रेंच वखारवाले शिवाजीराजे नाराज होतील म्हणून काहीतरी कारण सांगून आपली सुटका करून घेत असत. परंतु इंग्रजांनी मात्र सिद्दीच्या मागणीला प्रतिसाद दिला. वास्तविक मोगल आणि मराठ्यांच्या भांडणात पडण्याचे त्यांना काही कारण नव्हते. रेव्हिंग्टन एक महाकाय तोफ आणि ५० गोळे घेऊन स्वत: गेला होता. गिफर्ड वगैरे त्याचे सहकारी त्याच्या बरोबर होते. कोल्हापूरजवळ त्याने तोफ डागली आणि आपला राष्ट्रध्वज तिथे फडकावून पन्हाळ्यावर मारा सुरू केला. या वृत्याबद्दल योग्य संधी मिळाल्यावर त्यांना शिक्षा करण्याचा राजांनी त्यावेळीच निर्धार केला होता. आता कोकणावरील स्वारीत हे कामही तडीस नेण्याचे राजांनी ठरवले.

या स्वारीच्या आधीच राजांनी एक हजार स्वार आणि तीन हजार पायदळ पाठवून राजापूरचा कब्जा घेतला. राजांनी तिथे पोचल्यावर शहरातील प्रमुख लोकांना भेटीस बोलावले. रेव्हिंग्टन आणि इतर सहा इंग्रजांना तसे बोलावणे नसताही ते तिथे पोचले. राजांनी ताबडतोब त्यांना अटक केली. त्यांच्यातील काहींना सोनगडावर आणि काहींना वासोटा किल्ल्यात बंद करण्यात आले. त्यांची व्यवस्था चोख ठेवण्यात आली होती. त्यांतील दोघे महिन्यातच दगावले. रेव्हिंग्टनने त्यांचा प्रमुख ऑक्झिंग्डेन याला लांबलचक पत्र लिहून त्यांची सुटका करण्यासाठी दबाव आणण्याची विनंती केली.

त्याला ऑक्झिंग्डेन याने दिलेले उत्तर मार्मिक आहे. त्याने लिहिले होते, 'कंपनीच्या मालाचे संरक्षण केल्यामुळे तुम्हांस ही कैद प्राप्त झाली, असे तुम्ही म्हणता, ते साफ खोटे आहे. पन्हाळ्याच्या वेढ्यात इंग्रजांचे निशाण फडकावून तुम्ही गोळे उडवले, त्याचे हे प्रायश्चित्त आहे. तुम्ही अशी आगळीक दुसऱ्या कोणाची केली असती, तरी तो अशीच शिक्षा करता. व्यापारी म्हणविणारांनी दारूगोळा विकायचा नसतो की शत्रुसैन्यावर उडवायचा नसतो. परदेशात असे उपद्व्याप केल्यावर असेच फळ भोगावे लागते. शिवाजीला वठणीवर आणण्याइतकी आज आमची ताकद नाही. सबब तुम्ही आपले क्लेश असेच निमूटपणे सहन केले पाहिजेत.'३ १७ ऑक्टोबर १६६१ला रेव्हिंग्टनची सुटका झाली आणि बाकीचे त्यानंतर दोन वर्षांनी सुटले. त्यांच्यापैकी एकाने लिहिले होते, 'राजापूरच्या प्रकरणात चोवीस हजार होन लूट, दोन इसमांचा मृत्यू व आमची दोन वर्षे कैद इतके नुकसान झाले.'४ इंग्रजांना त्यांच्या कर्मासाठी योग्य धडा मिळाला होता!

कुडाळवर हल्ला

पन्हाळ्याला सिद्दी जोहरने वेढा दिला, त्यावेळी आदिलशहाने दक्षिण कोकणात काजी अब्दुल्लाला फेब्रुवारी १६६०मध्ये रवाना केले होते. त्याबरोबर दगाबाज लखम सावंतही त्याला येऊन मिळाला. हे ऐकून मराठ्यांनी कुडाळ काबीज केले. परंतु लखम सावंताने ते १८

मार्च १६६०ला पुन्हा काबीज केले. वास्तविक दक्षिण कोकणावर १६६१मध्ये चालून यावयाच्या वेळीच राजांना कुडाळ घेऊन लखम सावंतला धडा शिकवायचा होता. परंतु पावसाळा जवळ असल्यामुळे त्यांनी तो विचार पुढे ढकलला.

शाईस्ताखानाच्या प्रयाणानंतर राजांनी कुडाळकडे नजर वळवली. मे १६६३मध्ये त्यांनी सहजरीत्या कुडाळ हस्तगत केले.५ लखम सावंतने डच आणि पोर्तुगीजांची मदत मागितली; परंतु ती त्याला मिळाली नाही. आदिलशहाला कुडाळ कोणत्याही स्थितीत परत घ्यायचे होते. त्याने सिद्दी जोहरचा मुलगा सिद्दी अजीज आणि जावई सिद्दी मसूद यांना फौज घेऊन रवाना केले; परंतु त्यांचे मराठ्यांपुढे काही चालले नाही. मग अली आदिलशहाने महंमद इखलासखानाला सावंतचे साहाय्य करण्यासाठी पाठवले. त्यानंतर वझीर खवासखान आणि मुधोळच्या बाजी घोरपडेलाही आणखी फौजा देऊन कुडाळकडे रवाना केले.

शिवाजीराजांना खवासखान मुधोळकडे येत असल्याचे कळले. तो विजापूरहून आग्नेयेच्या दिशेने मुधोळला येऊन तिथून हुकेरी, अंबोली घाटामार्गे कुडाळला जाईल, याची त्यांना कल्पना होती. बाजी घोरपडे त्याला मुधोळमध्ये भेटून मग ते दोघे कुडाळला जाणार होते. याच बाजी घोरपडेने मुस्तफाखानाच्या आदेशावरून शहाजी राजांना ते रात्री झोपले असता दगाबाजीने पकडले होते आणि त्यानंतर त्यांची अफझलखानाने हातांत बेड्या घालून विजापूरच्या रस्त्र्यावरून धिंड काढली होती. पित्याच्या त्या मानखंडनेच्या आठवणी राजांच्या मनात अजूनही ताज्या होत्या. त्याची शिक्षा अफझलखानाला प्रतापगडाच्या पायथ्याशी राजांनी अदा केली होती. आता बाजी घोरपडेची बारी होती. मुधोळ विजापूरपासून ४९ मैलांवर होते. सातारा, पन्हाळा आणि फोंडा हे तिन्ही किल्ले विजापूर सरदारांच्या हातात होते. त्यामुळे बाजी घोरपडेच्या दृष्टीने मुधोळ अत्यंत सुरक्षित होते. शिवाजीराजे त्याच्यावर हल्ला करण्याचे धाडस करतील, असे त्याच्या कधी स्वप्नातही आले नव्हते. त्याशिवाय खवासखानही प्रचंड फौजेनिशी त्याच दिशेने येत होता, तेव्हा शिवाजीराजे कुडाळ सोडून कोठेही बाहेर जाणार नाहीत, याची बाजी घोरपडेला खातरी होती.

राजांनी रायगडाहून १ ऑक्टोबर १६६४ ला प्रयाण केले. घोरपडे आणि खवासखानाची भेटच होऊ द्यायची नाही, असे त्यांनी ठरवले. ते सरळ दक्षिणेच्या दिशेने सातारामार्गे येऊ शकत नव्हते. त्यामुळे महाड, चिपळूणमार्गे राजापूरला आले आणि नंतर पूर्वेकडे वळून कोल्हापूर आणि हुकेरी टाळत सरळ मुधोळवर चालून आले. मुधोळमध्ये त्यांनी बाजी घोरपडेच्या सैन्याचा धुव्वा उडवून त्याला ठार केले. त्यानंतर ते खवासखानाच्या मागे जात राहिले. खवासखानाने कुडाळजवळ छावणी ठोकताच त्याला त्यांनी सर्व बाजूंनी वेढले. खवासखानाबरोबर आपले बंधू व्यंकोजी आहेत, असे राजांना कळले. त्यांच्याशी ते लढू इच्छीत नव्हते, म्हणून त्यांनी खानाकडे वकील पाठवून त्याला सुरक्षितपणे परत जाण्याची मुभा देऊ केली. परंतु खवासखानाने ती ठोकरली. मग मात्र नाइलाजाने राजांनी त्याच्या सैन्यावर हल्ला केला आणि त्याला विजापुराकडे माघार घ्यायला लावली.

लखम सावंतने राजांकडे आता दुसऱ्यांदा माफी मागितली. सावंत आणि भोसले एकाच कुळीचे असल्याने त्यांनी लखमला माफ केले. त्यानंतर त्यांनी उत्तरेकडे कूच केले आणि विजापूरचा

सरदार महाबतखान याच्याकडून फोंडा किल्ला जिंकला. त्याचबरोबर कुडाळवरून त्यांनी आपला वकील गोव्याच्या व्हाइसरॉयकडे पाठवून त्याच्याशी मित्रत्वाचा करार केला.

या घटनेबद्दल शिवाजीराजांनी स्वत: लिहिलेल्या पत्रातील वृत्तांत फार स्वारस्यपूर्ण आणि नि:संदिग्ध आहे : 'घोरपड्यांचा प्रांत लुटून तळपट करून ठाणे जेरदस्तीत आणिले. बाजी घोरपडे सर्व जमतेनिशी लढाईस आले. युद्ध तरफेचे जाले. बाजी घोरपडे व कित्येक खासे लोक पडले. मुधोळ फस्त केले. मत्ता बहुत हाती लागली. मुधोळ पंचमहाल आपलासा करून घोरपड्यांची स्थापना केली. त्यानंतर खवासखान पुढे आला. त्यावर चाल केली. मारीत लुटीत गर्दी केली. खटा होऊन पळून विजापुरास गेले. त्यानंतर सावंतचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतात शिरलो. मुलूख तळपट करीत चाललो. ठाणी किल्ले तमाम घेतले. सावंत दमून गेले. गोमंतकाराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडू लागला. सुरुंग लावून बुरुज बळाने उडवून घेतला. त्यानंतर फिरंगी याजवर शह देऊन प्रांत मारीत चाललो. त्यांनी तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यांस गोमंतकात दम न निघे. टोपीकर यांस धीर न पडे. त्याजवरून पीतांबर शेणवई कारभारी वकील पाठवले. आपण सावंत भोसले कुळींचे, आपले पुत्र आहो. प्रांताचा ठराव निंमे ऐवज फौजेनिशी चाकरी करितो. ऐसा ठराव करून घेतला.'६

बखरींमधील उल्लेखात ही कारवाई औरंगजेब आणि आदिलशहाने एकत्र हाती घेतली होती, असे लिहिले आहे. फक्त याच्या शेवटाबद्दल मात्र मराठे पळून गेले, असे वेगळे वर्णन आहे : 'विजापूरच्या आदिलशहाकडे वकील पाठवून शिवाजीशी युद्ध करवून दोघांनी मिळून एकदम लढण्याची तयारी औरंगजेबाने केली. ...आदिलशहाने ही गोष्ट कबूल केली आणि खवासखानास शिवाजीवर पाठवले. शिवाजीने खवासखानाच्या सर्व वाटा बंद केल्या. तरी तो गाफीलपणे शिवाजीच्या मुलखात शिरला... त्याने येऊन खवासखानाला कोंडले... विजापूरच्या फौजेची गाळण उडाली... लढाई मोठ्या निकराची झाली. सीदी सर्वर, शह हजरत, शेख मिरान इत्यादी विजापूरचे सरदार रणांगणी पडले. तेव्हा खवासखान तलवार घेऊन धावला. त्याबरोबर सर्व मुसलमान मराठी फौजेवर तुटून पडले. तेव्हा मराठे पराभव पावून पळून गेले. या प्रसंगात शिवाजीचा सावत्र बंधू एकोजी आपल्या पथकासह विजापूरचे साहाय्यास आलेला असून त्याच्या बहादुरीबद्दल त्यास आदिलशहाने दोन गाव इनाम दिले.'७ यातील मराठ्यांच्या पराभवाबद्दल विधान चूक असावे, हे शिवाजीराजांच्या वर उद्धृत केलेल्या पत्रावरून दिसतेच, शिवाय त्याला इतर दस्तऐवजांवरूनही दुजोरा मिळतो.

१६६४मध्ये राजांनी मालवण किनाऱ्याजवळ एका मैलाच्या अंतरावर असलेल्या कुरटे नावाच्या बेटाला स्थानिक कोळ्यांबरोबर भेट दिली. बेटावर जाण्यासाठी रस्ता नागमोडी आणि अरुंद होता. त्याच्यावर पिण्याच्या पाण्याचा स्रोत होता. सिधुदुर्ग किल्ला बांधण्यासाठी ही जागा त्यांनी निवडली. शिवाजीराजांनी या जागेचे वर्णन करताना म्हटले होते की 'चौऱ्यांशी बंदर ऐसा जागा नाही'. इतिहासकार स. शं. देसाई लिहितात, 'देवांना १४ रत्ने प्राप्त झाली, तर शिवाजींनी १५वे रत्न त्यास जोडले.'८ राजांनी २५ नोव्हेंबर १६६४ला सिंधुदुर्ग बांधण्यास सुरुवात केली.

किल्ल्याच्या कामासाठी ५०० पाथरहाट, २०० लोहार, पोर्तुगीज कारागीर व तीन हजार

मजूर कामावर लावण्यात आले आणि एक कोटी होनांची तरतूद करण्यात आली. सुरक्षेसाठी ५००० मावळ्यांची शिबंदी देण्यात आली. किल्ल्याचा परीघ सुमारे दोन मैल असून क्षेत्रफळ ४८ एकर आहे, किल्ल्याचे तट ३० फूट उंच असून १२ फूट रुंद आहेत. किल्ल्याला २ बुरुज असून

त्यांचे आकार असमान आहेत. किल्ल्याचा मुख्य दरवाजा ईशान्य कोपऱ्यात

असून तटाच्या वळणाच्या आकारामुळे बाहेरून लगेच दिसत नाही. किल्ल्याचा मार्ग नागमोडी व कठीण आहे. 'जैसे मंदिराचे मांडण श्री तुलसी वृंदावन, तैसा राजांच्या राज्याचा भूषण पद अलंकार', असे त्याचे वर्णन बखरकार चित्रगुप्ताने केले आहे.९

सिंधुदुर्ग ही राजांची पश्चिम किनाऱ्याच्या बळकटीसाठी खास भेट होती. जंजिऱ्याच्या उत्तरेस खांदेरी आणि दक्षिणेस सिंधुदुर्ग या दोन जलदुर्गांद्वारे सिद्दीच्या प्रभावाला शह देणे हे त्यामागचे उद्दिष्ट होते.

लष्करी विलेषण

राजांनी फेब्रुवारी-मे १६६१ आणि १६६३-६४ या दरम्यान काढलेल्या कोकणातील मोहिमांद्वारे दक्षिण कोकणावरील आपली पकड घट्ट केली. पहिल्या मोहिमेत सोनगडपासून चिपळूण-शृंगारपूर-संगमेश्वर-देवरुख-राजापूर-खारेपाटण-पर्यंत सर्व प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला आणि ठिकठिकाणी कारभाऱ्यांच्या नेमणुका केल्या. त्याबरोबर वाई प्रांतही त्यांनी आपल्या अमलाखाली आणला. अशा प्रकारे 'तळकोकण महाराजांस अर्जनी झाले' आणि या प्रदेशातील कारभाराची वगैरे व्यवस्था लावून आणि देवस्थानांचा योग्य बंदोबस्त ठरवून राजांनी प्रजाजनात निश्चिंती उत्पन्न केली.१०

राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांनी मराठ्यांच्या विरुद्ध आदिलशहाला केलेल्या मदतीबद्दल त्यांना राजांनी अस्सल धडा शिकवला. वखारवाले प्रामुख्याने व्यापाराकरता आले आहेत आणि त्यांनी कोणालाही लष्करी मदत देऊ केली, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, हे त्यांच्या गळी राजांनी परिणामकारकरीत्या उतरवले. याचा पुढे त्यांना उपयोग झाला. पोर्तुगीजांनी इंग्रजांची मदत मागितली असताना राजांच्या भयाने इंग्रजांनी ती नाकारली, याचा उल्लेख पुढे येईल.

१६६३मध्ये लखम सावंतकडून कुडाळ घेतल्यानंतर पुन्हा ते त्याच्या हातात गेले होते. औरंगजेब आणि आदिलशाह हे दोघे मिळून आपल्याविरुद्ध आघाडी उघडणार आहेत आणि त्यासाठी जयसिंह मोठ्या सैन्याबरोबर दक्षिणेकडे चालून येत आहे, हे राजांना समजले. त्याला दक्षिणेत पोचायला वेळ लागणार होता. खवासखान, बाजी घोरपडे आणि लखम सावंत या तिघांचा आपल्यावर एकत्र होऊन प्रहार करण्याचा बेत पाहून त्यांना एकत्र होऊ न देता दरम्यानच्या कालावधीत त्यांच्याशी आपण वेगवेगळे लढलो, तर प्रत्येकाला हरवू शकू, ही त्यांची रणनीती अत्यंत चाणाक्ष होती. ती त्यांनी काटेकोरपणे अमलात आणली. प्रत्येकाचा त्यांनी निर्णायक पराभव केला. बाजी घोरपडेला आपल्या दगाबाजीसाठी प्राण गमवावे लागले आणि राजांनी आपल्या पित्याच्या मानखंडनेचा वचपाही काढला. अशा प्रकारे १६६४च्या

ऑक्टोबरमध्ये राजांनी लखम सावंत, बाजी घोरपडे आणि आदिलशहा या तिघांच्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला केला.

मराठा नौदलाची प्रतिष्ठापना

सागरी परंपरा

अथांग सागराच्या गडद निळ्या पाण्याचा मोह भारतीयांना पुरातनकाळापासून मंत्रमुग्ध करत आला आहे. भारताची सागरी परंपरा प्राचीन आहे, पाश्चिमात्य संस्वृतीच्या कित्येक शतके अगोदर! कोलंबसने अटलांटिक आणि मागेलनने प्रशांत महासागर पार करण्याच्या अनेक वर्षे आधीपासून साहसी भारतीय दर्यासारंग सांस्वृतिक देवाणघेवाण व आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी हिंद महासागराच्या महामार्गाचा अवलंब करीत आले आहेत.

जगातील पहिले बंदर सध्याच्या गुजरात किनाऱ्यावरील मंगरोलजवळ लोथल इथे इ.स.पूर्वी २३०० मध्ये बांधले गेले होते. ऋग्वेदात वरुणाला समुद्रमार्गांबद्दल सखोल ज्ञान असल्याचे संदर्भ सापडतात. ‘शं नो वरुण:’ म्हणजे ‘वरुणराज आमचे मंगल करो’, असे ऋग्वेदात म्हटले आहे. अथर्ववेदात सुबक आणि प्रशस्त होड्यांचा उल्लेख आहे. चंद्रगुप्त मौर्य या बलशाली सम्राटाने आपले स्वत:चे नौदल उभारण्याचा प्रयत्न केला. पाचव्या आणि दहाव्या शतकांदरम्यानच्या कालावधीत विजयनगर आणि कलिंग सम्राटांनी मलाया, जावा आणि सुमात्रावरील आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. या पूर्वेकडील देशांकडून इ.स. ८४४ ते ८४८मध्ये सोन्यापासून मोठ्या प्रमाणात मिळकत होत असे. इ.स. ९८४ ते १०४२च्या काळात चोल साम्राज्याच्या राजांनी ब्रह्मदेश, मलाया, सुमात्रा या देशांत मोहिमा काढून त्यातील बंदरांवर कब्जा केला होता. चौदाव्या अन पंधराव्या शतकांत गुजरात सागर किनाऱ्यावर जहाजबांधणीच्या तंत्रज्ञानात लक्षणीय प्रगती झाली होती.

चोल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर चार-साडेचार शतके सागरी शक्तीकडे दुर्लक्ष झाले. हिंद महासागरात त्याची पुनश्च मुहूर्तमेढ रोवली गेली, ती १४९८मध्ये कालिकत बंदरात येऊन थडकलेल्या वास्को-द-गामा याच्या आगमनामुळे. १५२९मध्ये पोर्तुगीजांनी मुंबई बंदरावर सागरमार्गे आक्रमण केले. कोचीनच्या झामोरिन राजाने त्यांच्या चाचेगिरीला आव्हान दिले, परंतु ते फारसे टिकले नाही. १५०९च्या दीव बेटाच्या परिसरातील दुसऱ्या चकमकीनंतर पोर्तुगीजांचा विजय ही परकीयांच्या अनभिषिक्त वर्चस्वाची नांदी ठरली. १५३४पर्यंत सर्व पश्चिम सागरतट पोर्तुगीजांच्या ताब्यात आला. त्यानंतर फ्रेंच, डच, सिद्दी आणि शेवटी इंग्रज आले.११

जलं यस्य बलं तस्य!

मराठ्यांचा लष्करी वारसा दांडगा, परंतु फक्त धरतीमातेशीच त्याचा अनुबंध. सागराशी त्याचे विशेष देणे-घेणे नव्हते. अलीकडच्या काळात कोणत्याही भूपतींनी सागरशक्ती संपादन करण्यात स्वारस्य दाखवले नव्हते. यादवांचे साम्राज्य सागरतटाला जाऊन तटले. परंतु समुद्राकडे त्यांनी लक्ष दिले नाही. बलदंड मोगल तर ‘समुद्रांधळे’ होते असे म्हणणे चुकीचे

होणार नाही, त्यांनी ते काम आपला मांडलिक सिद्दीवर सोडले होते. सागरशक्तीच्या महत्तेचा त्यांना गंध नव्हता. शिवाजीराजे हे अलीकडच्या भारतातील पहिले राजे, ज्यांच्या अलौकिक प्रतिभेला आणि दूरदृष्टीला सागरशक्तीच्या गरिमेचा साक्षात्कार झाला. 'जलं यस्य, बलं तस्य।' या ऋग्वेदातील महामंत्राची अनुभूती त्यांना झाली. शिवाजीराजांना त्यामुळे 'मराठा नौदलाचे पिता' ही उपाधी देणे योग्य होईल. इंग्रज वखारवाले त्यांना 'पायरेट' (चाचा) ' किंवा 'तस्कर' म्हणत असत;१२ कारण प्रत्यक्षात राजांच्यात पश्चिम सागरतटावर एक नवी स्वकीय सागरशक्ती निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा धगधगत होती, हे लक्षात येण्याइतके सामरिक सौजन्य त्यांच्याकडे नव्हते.

कोकणच्या सागरकिनाऱ्यावर अनेक खाड्या होत्या. त्यांच्यामुळे जहाजांसाठी सुरक्षित निवारा उपलब्ध होत असे. त्यांच्याजवळील दगडांची बेटे नौसेनेची मोर्चेबंदी करण्यासाठी अनुरूप होती. राजांपुढे सिद्दी आणि इतर परदेशी शक्तींची उदाहरणे होती. कोकणावर ताबा मिळवल्यावर बळकट आरमाराचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले आणि आपल्या स्वत:च्या आरमाराची गरज त्यांना भासू लागली. बंदरांचा विकास स्वराज्याच्या भरभराटीसाठी किती आवश्याक आहे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. दंडा राजपुरीच्या हबशाने समुद्रातील सुरक्षित बेटावर बांधलेल्या जंजिरा जलदुर्गाच्या आसमंतात राहणाऱ्या स्वराज्याच्या नागरिकांविरुद्ध दहशत व अत्याचारांचे एक सत्र आरंभले होते. गावे आणि खेडी जाळली जात होती, त्यांच्यात लुटालूट चालू होती, बायका-मुलांचे अपहरण केले जात होते आणि त्यांची गुलाम म्हणून विक्री चालली होती. परंतु राजांच्या अंमलदारांना असाहाय्यतेने ते सर्व पाहण्याशिवाय दुसरे गत्यंतरच नसे. हे थांबवण्यासाठी सागरी स्नायुबळ आवश्यसक होते.

कोकण किनाऱ्यावरील बंदरांच्या मार्गे प्रचंड व्यापार चाले. त्यावेळी कोकणच्या सागरतटावरील सर्व हालचालींवर पोर्तुगीजांचे सार्वभौमत्व होते. सामानाने लदलेले आपले जहाज कोणताही व्यापारी पोर्तुगीजांच्या परवान्याशिवाय नेऊ शकत नसे. विजापूर किंवा गोवळकोंडासारख्या सार्वभौम सरकारांनासुद्धा हा नियम लागू होता. दिल्लीचा बादशहासुद्धा मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी अव्वाच्या सव्वा पैसे देऊन पोर्तुगीजांकडून 'कार्ताझ' (परवाना) घेत असे. परंतु इंग्रज, डच आणि फ्रेंच या परकीय शक्ती मात्र पोर्तुगीजांच्या या तथाकथित सार्वभौमत्वाकडे दुर्लक्ष करीत असत.

आपल्याकडे जर शक्तिशाली आरमार असेल, तर आपणही पोर्तुगीजांचे हे जोखड फेकून देऊ शकू, असा राजांचा विचार होता. बंदरांचा कब्जा मिळाल्यावर किनाऱ्याच्या सान्निध्यात समुद्रात होणाऱ्या जहाजांवर हालचालींसाठी मराठ्यांकडून परवाना घेण्याची अट लादून त्याद्वारे प्रचंड अर्थप्राप्ती होऊ शकली असती.

आरमार उभे करायला लागणारे आर्थिक पाठबळ उभे करणे फारसे अशक्य नव्हते. एकदा का आरमाराचे स्नायुबळ आपल्याला प्राप्त झाले की, आपल्या ताब्यात असलेल्या बंदरांतून ये-जा करण्यासाठी आपले परवाने आपणही जारी करू शकू आणि परवान्यांतून मिळणाऱ्या अर्थार्जनातून आरमाराचा सांभाळ करणे सहज शक्य होईलच, पण त्याशिवाय आरमार उभारण्यासाठी आणि त्याचा सांभाळ करण्यासाठी लागणारा पैसा खर्च करून उरलेली रक्कम

इतर कारणांसाठी आपण वापरू शकू, याची राजांना खातरी होती. मागे एकदा बहादुरखानाने स्वराज्याच्या केलेल्या नाकेबंदीच्या वेळी दक्षिण किंवा उत्तरेकडून अन्न-धान्य येणे बंद झाले होते. अशी आणीबाणी परत निर्माण झाली, तर त्यावेळी आवश्यक असलेले सामान दक्षिणेकडून समुद्रमार्गे आणून ते आपल्या राज्यास पुरवण्याचा पर्यायही राजांना उपलब्ध झाला असता.

अशा प्रकारे आपल्या प्रजेचे रक्षण करण्यासाठी, आपल्या शत्रूंना आव्हान देण्यासाठी, बंदरांच्या भरभराटीसाठी आणि सागरी मार्गांकरवी व्यापार करण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी आपले स्वत:चे आरमार उभारण्याचा राजांनी निर्धार केला. त्यांना हे आरमार जग जिंकण्यासाठी नव्हे, तर पश्चिम सागरकिनाऱ्यावरील आपल्या शेजारी सागरशक्तींचा सामना करण्यासाठी पाहिजे होते.

सारांशाने, मराठ्यांचे नौदल उभारण्यामागे शिवाजीराजांची खालील उद्दिष्टे होती :

- सिद्दी आणि परकीय शक्तींपासून कोकण किनाऱ्याचे रक्षण.
- सिद्दी, पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज या आरमारी शक्तींना राजकीय हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध.
- सिद्दी आणि पोर्तुगीजांच्या कोकणातील प्रजेवरील अत्याचारांना व अपहरणास अटकाव.
- बंदरातील व्यापारातून अर्थार्जन.
- व्यापारी जहाजांची सुरक्षितता.
- दक्षिणेतून सामानाचे समुद्रमार्गे परिवहन.१३

मराठा आरमार

मराठा नौदलाची स्थापना केव्हा झाली, याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही; परंतु विविध नोंदींवरून ती १६५९मध्ये झाली असावी. मराठा नौदलात दोन प्रकारची जहाजे असत; व्यापारी आणि लढाऊ. व्यापारी जहाजांत मचवा, शिबाड, पडाव, तरांडी आणि पगार ही जहाजे असत. पाच प्रकारची लढाऊ जहाजे होती. गुरब आणि गलबत या प्रमुख युद्धनौका त्यात अग्रगण्य होत्या. त्याबरोबर पाल, शिबाड, तरांडी व मंझूवा यांचाही समवेश होता.१४

शिवाजीराजांच्या आरमारातील जहाजांच्या संख्येबाबतही वेगवेगळ्या नोंदी आहेत. मल्हार रामराव चिटणीस याच्यानुसार राजांनी ४०० ते ५०० जहाजे बांधून घेतली होती आणि त्यासाठी पाच ते दहा लाखांचा खर्च आला असावा. या उलट कॉस्म द गार्दनुसार राजांच्या आरमारात फक्त २५ जहाजे होती. मराठा नौदलाची जहाजे राजापूर, जयतापूर, मालवण आणि सुवर्णदुर्ग या चार बंदरांत विभागून तैनात असत.१५ एका इंग्रज वखारवाल्यांच्या एका नोंदीनुसार शिवाजीराजांच्या आरमारात ५००० लोक, ३० ते १५० टन आकाराची ८५ लढाऊ जहाजे होती. चित्रगुप्ताच्या बखरीत नमूद केले आहे: 'पाणीयातील तरांडी जहाजे सुमारे ३० थोर गुरब, १०० गलबते, १५० महागिरी, ५० लहान गुरब, १० होड्या, १५० लहान होड्या, ६० तरावे, २५ पळ, १५ जूग, व ५० माचवे होते.१६ या विविध अंदाजांमधील फारकत डोळ्यांत भरण्याजोगी आहे.

कृष्णाजी अनंत सभासद या समकालीन इतिहासकारानुसार राजांचे आरमार वेगवेगळ्या प्रकारच्या २०० जहाजांच्या दोन सुभ्यांमध्ये वाटण्यात आले होते. प्रत्येक सुभ्यात ५ गुरब आणि १५ गलबते असावीत. मचवा ३० ते ४० फूट लांब आणि १० ते १५ फूट रुंद असे. त्याला एक वा दोन त्रिकोणी शिडे असत. शिबाड ११० फूट लांब व २६ फूट रुंद असे आणि त्याला ६५ फूट आणि ४२ फूट उंचीच्या दोन डोलकाठ्या आणि एक फोगाचे शीड (जिब सेल) असे. तरांडी, पगार व होडी या लहान जहाजांचा उपयोग किनारा ते मोठ्या जहाजापर्यंत सामान आणि लोकांच्या ने-आणीसाठी केला जाई.

गुरब हे ३०० टन क्षमतेचे, चौकोनी आकाराच्या शिडाचे व तीन डोलकाठ्यांचे लढाऊ जहाज होते. त्यावर समोर ९ ते १२ पौंडांच्या व बाजूला ६ ते ९ पौंडांच्या प्रत्येकी दोन तोफा असत. गलबत हे गुरबापेक्षा हलक्या वजनाचे, वळवता येण्याजोगे व दोन त्रिकोणी आकाराच्या शिडांचे लढाऊ जहाज होते. त्यावर २ ते ४ पौंडी तोफा असत व त्यावरील ४० ते ५० खलाशी ते ३-४ मैलांच्या वेगाने वल्हवत नेऊ शकत असत. पाल हे तीन चौकोनी आणि एक त्रिकोणी शिडाचे सर्वांत मोठे लढाऊ जहाज होते. त्याच्यावर अनेक तोफा असत.१७

शिवाजीराजांच्या आरमाराचे नेतृत्व १६७०च्या मोहिमेदरम्यान माई नाईक या भंडारी आणि १६७९मधील खंडेरी मोहिमेत दर्यासारंग या मुसलमानाने केले. बखरीत इब्राहीम खान व दौलत खान यांच्याही नावांचा उल्लेख सापडतो. सिद्दी संबळ आणि सिद्दी मिस्री हेही मराठा आरमारात होते. खलाशी सर्वसाधारणपणे कोळी आणि भंडारी समाजांतील काटक मासेमार असत. पावसाळ्याच्या दिवसांत मावळे जसे किल्ल्याच्या आश्रयास राहत, तसे खलाशी बंदरावर जहाजे मागे घेऊन आणि भक्कमपणे बांधून आराम करीत.

मराठा आरमाराच्या कारवाया

एक-दोन गौण चकमकी वगळता इतर आरमारी शक्तींशी समुद्रात, ज्याला आरमारी लढाई म्हणता येईल असे, निर्णायक युद्ध राजांच्या नौदलाने केले नव्हते. वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या आरमारी शक्तीच्या द्वारे हल्ले चढवून कोकण पट्टीवर वर्चस्व प्रस्थापित करणे हे प्रामुख्याने मराठा आरमाराच्या कारवायांचे स्वरूप होते. मराठा नौदल युरोपीय नाविक शक्तींच्या आरमाराच्या वाटेला गेल्याचे उल्लेख सापडत नाहीत. सिद्दीबरोबर मात्र मराठा आरमाराच्या चकमकी घडल्या; त्यांत त्यांनी सिद्दीच्या आरमाराला जबर क्षती पोचवली, परंतु सर्वसाधारणपणे सिद्दीच्या आरमाराचा बऱ्याचदा विजय झालेला आढळतो. याचे मुख्य कारण सिद्दीच्या आरमाराचा अनुभव आणि वर्चस्व.

१६६४मध्ये मराठ्यांनी आदिलशहाची काही जहाजे पकडली. १६६५मध्ये कुडाळवर केलेल्या स्वारीचे वर्णन याआधी आले आहे. त्यावेळी माई नाईक भंडारी आणि दौलत खान यांच्याबरोबर नव्वद लढाऊ जहाजे पाठवल्याचा उल्लेख डच वखारीच्या एका पत्रात सापडतो. ३ नोव्हेंबर १६६४मध्ये मराठ्यांच्या

६५ युद्धनौकांच्या ताफ्याने आदिलशाहीची दोन जहाजे चार तासांच्या लढाईनंतर ताब्यात घेऊन ती खारेपाटणला नेली आणि त्यांतील लूट विजयदुर्ग किल्ल्यावर ठेवण्यात आली. २०

नोव्हेंबरला मराठ्यांनी १४ तोफा, दोन इंग्रज गोलंदाज आणि काही पोर्तुगीज नागरिक असलेल्या मोठ्या जहाजाचा वेंगुर्ला बंदरापर्यंत पाठलाग केला आणि ते जहाज काबीज केले. २६ नोव्हेंबर १६६४ रोजी सुरत वखारीच्या पत्रात 'शिवाजी विजयी व अनिर्बंध असून त्याचे सामर्थ्य रोज वाढत चालल्याने भोवतालच्या राजांना त्याची दहशत वाटत असल्याचा' उल्लेख आहे. थोडक्यात कोकण किनाऱ्यावर वर्चस्व गाजवून लोकांवर होणाऱ्या

अवास्तव अन्यायाला पायबंद घालण्याचा राजांचा उद्देश सफल होत होता, हे दिसून येते.

नोव्हेंबर १६७०मध्ये राजांनी १६० जहाजांचा ताफा गोळा केला आणि ते कुलाबा परगण्यात अलिबागपासून तीन मैलांच्या अंतरावर असलेल्या नागावच्या दिशेने उत्तरेकडे निघाले. सैनिक आणि खलाशांजवळ ४० दिवसांचा पुरवठा होता.

१६६७मध्ये आदिलशहा आणि शिवाजीराजे यांच्यात तह झाला. डिसेंबर १६६७ मध्ये पोर्तुगीज आणि राजांच्या दरम्यानही तह झाला. या दोन्ही तहांचे महत्त्व म्हणजे या दोन्ही सागरी शक्तींनी मराठा आरमाराची अधिवृतरीत्या दखल घेतली. 'एका परकी राजवटीने शिवाजीराजांशी समान पातळीवर तह केल्याने त्यांच्या राज्यास कायदेशीर मान्यता प्राप्त झाली. तोपर्यंत ते बंडखोर म्हणूनच ओळखले जात होते.'१८ या तहानुसार मराठा आरमाराला पोर्तुगीजांचे परवाने घेण्याची जरुरी नाही, असे ठरवले गेले असावे; परंतु ते फक्त लहान आकाराच्या जहाजांनाच लागू होते. त्यानंतर मराठा आरमारानेही आपले परवाने (दस्तक) देण्यास आरंभ केला.

पोर्तुगीज मराठा आरमाराला वचकून वागत व शक्यतो राजांना उघड उघड आव्हान देत नसत. एका इंग्रजी पत्रात पोर्तुगीजांनी मराठ्यांविषयी घेतलेल्या या धास्तीबद्दल पुढील उल्लेख आहे, 'त्याची त्यांनी एवढी दहशत घेतली आहे की, आपल्या प्रदेशातून ते त्याला खुशाल वाट देतात. त्याला नकार देण्याचे धाडस त्यांना होत नाही.'१९ नोव्हेंबर १६६९मध्ये गव्हर्नर बाईश द सांद याने पोर्तुगालच्या राजाला लिहिलेल्या पत्रात राजांची तुलना हूणांचा सुप्रसिद्ध सेनापती ॲटिला याच्याशी केली आहे. शिवाजीराजे चढाई आणि बचावाचे युद्ध कुशलतेने खेळू शकतात, याची त्याने ग्वाही दिली आहे.२०

ऑक्टोबर १६७३मध्ये सिद्दी संबुलने २० जहाजांच्या ताफ्यानिशी पेण व नागोठण्याच्या नदीतून जाताना मराठी गावांवर हल्ला चढवला. मराठा आरमार त्याचा बदला घेण्याची संधी पाहत होते. १६७४मध्ये त्याच संबुलने मुचकुंदी खाडीत दौलतखानाच्या नेतृत्वाखालील मराठी आरमारावर हल्ला चढवला. यात सिद्दीचा पराभव झाला आणि त्याची १०० माणसे ठार झाली.

शिवाजीराजांच्या कार्यकाळातील तीन मोहिमांचा प्रामुख्याने आढावा घेणे आवश्य१क आहे.


बसरूरची मोहीम

१६६५च्या फेब्रुवारीमध्ये राजांनी स्वत: बसरूरच्या मोहिमेचे नेतृत्व केले.

(नकाशा क्र. २७ पाहा.) ८५ लढाऊ जहाजे आणि तीन मोठी जहाजे घेऊन बसरूरच्या दिशेने समुद्रात ते मार्गस्थ झाले. त्यावेळी बहुधा त्यांचे आणि पोर्तुगीजांचे संबंध मित्रत्वाचे असावेत. त्यांनी दक्षिणेच्या बाजूस जाण्यासाठी गोवा ओलांडले, तेव्हा व्हाइसरॉयने त्यांच्या

वाटेत कोणतीही आडकाठी घातली नाही.

नकाशा क्र. २७
बसरूरची मोहीम
फेब्रुवारी १६६५



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

परंतु कॉस्म द गार्दाच्या मते पोर्तुगीज आणि मराठा आरमारांमध्ये एक चकमक झाली होती व त्यात मराठ्यांचा पराभव झाला. जरी त्याने दिलेल्या तारखेनुसार ती चकमक या मोहिमेदरम्यान झाल्याचे दिसते, तरी त्याला अन्यत्र दुजोरा मिळत नाही. त्यामुळे कदाचित ही चकमक राजांची बसरूर मोहीम संपल्यावर झाली असावी.२१

या मोहिमेचा आराखडा पद्धतशीरपणे आखण्यात आला होता. त्याची बातमी मिळाल्यावर सुरत आणि मुंबईमध्ये बरीच खळबळ माजली. राजांचे सैनिक बसरूरला उतरले आणि त्यांनी गावात मोठ्या प्रमाणावर लुटालूट केली. परत जाताना मिरजान व अंकोलामधील गोकर्ण येथील देवळाला त्यांनी भेट दिली. नंतर ४०००चे पायदळ घेऊन ते अंकोल्यास गेले. तेथे त्यांच्या लोकांना परत येण्यासाठी १२ लढाऊ जहाजे मागे ठेवून बाकी सर्व ताफा त्यांच्यावर सामान लादून परत पाठवण्यात आला. त्यानंतर ते कारवारला आले. ते येत आहेत, हे कळल्यावर इंग्रजांनी आपला सर्व माल आणि पैसा मस्कतच्या एका व्यापाऱ्याच्या शंभर टन जहाजावर लादला आणि वाचवला. पुढच्या दिवशी राजांच्या लढाऊ जहाजांनी प्रयाण केले.२२

बसरूरची मोहीम ही मराठी आरमाराची पहिली मोठी कारवाई होती. तिचे दूरगामी परिणाम झाले. त्यामुळे मराठा आरमाराच्या अस्तित्वाची ओळख इतर सागरी शक्तींना पटली. पहिल्यांदाच एक मराठा सागरशक्तीचा प्रमुख आपली सर्व शक्ती एकवटून सागरी मोहीम हाती घेत होता. शक्तिप्रदर्शन हा या मोहिमेमागील प्रमुख हेतू होता, तो पूर्णत: साध्य झाला. बसरूरची केलेली लूट हा केवळ त्यातील गौण हेतू होता.

जंजिरा किल्ल्यावर चढाया

दंडा राजपुरीच्या पश्चिमेला समुद्रात राजपुरा खाडीच्या मुखाशी भक्कम कातळाच्या पायावर उभा असलेला जलदुर्ग म्हणजे जंजिरा. खाडीचे पात्र चार मैल रुंद आहे. किल्ल्याचा तट ४५ फूट उंच आहे. तटाला १९ बुरुज आहेत. त्याच्या भिंती १८ ते २० फूट रुंद आहेत. वेगवेगळ्या व्यासाच्या ५७२ तोफा त्यावेळी किल्ल्यावर तैनात होत्या. पूर्वेला महाद्वार आणि पश्चिमेला छोटा दर्यादरवाजा आहे. आत सुमारे २३० फूट उंच बालेकिल्ला आहे.

१५व्या शतकाच्या उत्तरार्धात यावर कोळी वस्ती होती. त्यावर मोगलांचा अंमल होता. १४९०मध्ये सागरप्रवास करणाऱ्या ॲबिसीनियाच्या दोन दगलबाज तोतया व्यापाऱ्यांनी जंजिऱ्यात विश्रांतीसाठी मुक्काम करण्याची परवानगी कोळी राजाकडे मागितली. ती मिळाल्यावर त्यांनी आपले मोठमोठे पेटारे किल्ल्यात उतरवले. परंतु त्यात सामानाऐवजी सशस्त्र हबशी सैनिक लपलेले होते. रात्री कोळी राजा आणि त्याचे सुरक्षक दारू पिऊन धुंद असताना ते सैनिक पेटाऱ्याबाहेर आले आणि त्यांनी किल्ला व्यापला. सुन्नी मुसलमान असल्यामुळे त्यांना मोगलांची सहानुभूती लाभली. ॲबिसिनी गुलामांची संख्या वाढत गेली. त्या जमातीला सिद्दी किंवा श्यीमल या नावाने ओळखले जाऊ लागले.

त्यानंतर जंजिरा किल्ल्यावर प्रथम निजामशाही व १६३६मध्ये मोगल-आदिलशहा तहानंतर आदिलशाहीचा अंमल आला. सिद्दयांनी किल्ल्याच्या ४०-५० मैलांच्या परिसरातील किल्ले व बंदरे बळकावून आपला 'हबसाण' नावाचा प्रदेश निर्माण केला. उत्तरेला कुंडलिका नदीची

रोह्याची खाडी, दक्षिणेला सावित्री नदीची बाणकोटची खाडी, पूर्वेला रोहा, माणगाव, महाडचा भाग, अवचितगड, तळेगड, घोसाळगड, सरसगड व जंजिरा यांना सामावणारा चाळीस मैलांचा सागरतीर हा सिद्दीचा प्रदेश. त्याला 'हबसाण' या नावाने ओळखले जाई. (नकाशा क्र २८ पाहा.) १६५१मध्ये जंजिऱ्याचा सिद्दी फतेखान आदिलशहाला जुमानेसा झाला. आदिलशहाने जंजिऱ्यावर स्वारी केली, परंतु सिद्दीने मोगलांशी संधान बांधले. १६६७ साली हबसाणची सत्ता सिद्दी खैरातखानाच्या हातात आली.

जंजिरा कोणत्याही अवस्थेत काबीज करायचे स्वप्न राजांनी मनाशी बाळगले होते. एकदा का जंजिरा हातात आला की, आपण सिद्दी आणि परकीय शक्तींना अधिक परिणामकारकपणे आव्हान देऊ शकू, याबद्दल राजांना खातरी होती. पोर्तुगीज, इंग्रज, डच व फ्रेंच यांचे हित हा किल्ला सिद्दीकडेच राहण्यानेच साधणार होते. जर तो मराठ्यांच्या हातांत पडला, तर राजांच्या वर्चस्वाला आपण अटकाव घालू शकणार नाही, हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळे मराठ्यांच्या जंजिरा घेण्याच्या प्रयत्नात ते जास्तीत जास्त अडसर घालतील, हे स्वाभाविक होते.


राजांनी तळे-घोसाळे किल्ले घेतले, बीरवाडीला नवा किल्ला बांधला, १६५६ साली जावळी व रायरी घेतले, नागोठण्यापासून कल्याण-भिवंडीपर्यंत उत्तर कोकण ताब्यात आणले, तेव्हा त्यांच्या सीमा हबसाणला भिडल्या. त्यानंतर सिद्दयांशी संघर्ष चालू झाला. राजांनी त्यांचा मुलूख जिंकावा आणि त्यांचे तोंड वळल्यावर सिद्दयांनी तो परत मारावा, हे सत्र सुरू झाले.

१६५७ साली राजांनी शामराजपंत पेशवे व बाजी घोलप यांना जंजिरा घेण्यासाठी पाठवले. त्यांनी जंजिऱ्यासभोवतालचा प्रदेश घेऊन जंजिऱ्याला वेढा दिला. त्यावेळचा सुभेदार सिद्दी फतेखानाने शरण आल्याचे दाखवून शामराजपंतांना किल्ल्यावर बोलावले. पेशव्यांनी कदाचित राजांच्या हाताखाली धडे नीट गिरवले नव्हते. फतेखानाच्या बोलावण्याला भुलून पेशवे आत गेल्यावर सिद्दयाने बोलण्याचा देखावा केला आणि शेवटी त्यांच्या मागण्या फेटाळून दोघांनाही अटकेत टाकले. सापळ्यात सापडल्यावर कोणताही पर्याय न उरल्यामुळे मराठी सैन्य परत नेऊ , हबसाणचा जिंकलेला मुलूख परत देऊ आणि पुन्हा आक्रमण करणार नाही वगैरे लज्जास्पद अटी कबूल करून शामराजपंत परत आले. राजे पेशव्यांवर नाराज झाली आणि त्यांच्या जागी प्रथम नरहरी आनंदराव आणि नंतर मोरोपंत पिंगळे यांची त्यांनी नेमणूक केली.[२३]

नकाशा क्र. २८

जंजिऱ्याची मोहीम

डिसेंबर १६७५ - जून १६७६



१६५८ साली निळोपंत मुजुमदारांच्या साथीला दर्यासारंग दौलतखान आणि मायाजी भाटकर यांना आरमारासहित देऊन राजांनी पुन्हा जंजिरा काबीज करण्यासाठी पाठवले. जंजिऱ्याला पुन्हा वेढा पडला. खैरतखान व कासीम या सिद्दी सरदारांनी तो कणखरपणे लढवला. त्यानंतर अफझलखानाच्या स्वारीला तोंड देण्यासाठी राजांना वेढा उठवणे भाग पडले.

१६६३मध्ये रघुनाथ बल्लाळ अत्रेच्या खाली फौज पाठवून जंजिऱ्याला पुन्हा वेढा देण्यात आला. हा वेढा बरेच महिने चालू राहिला. शेवटी राजे आणि सिद्दी यांच्यात तह झाला. त्यानुसार 'शिवाजीराजांनी घेतलेला प्रांत व किल्ले त्यांच्याकडेच राहू द्यावेत, सिद्दीने उपद्रव देऊ नये, उरलेला प्रांत सिद्दीकडे राहावा. त्याला मराठ्यांनी उपद्रव करू नये'; असे ठरले. परंतु जंजिऱ्याबद्दल मात्र सिद्दी बोलायलाच तयार नव्हता. मिर्झा राजांची स्वारी येऊ घातली होती, त्यामुळे राजांनी प्रकरण ताणले नाही. जंजिरा सिद्दीकडेच राहिला.२४

मे १६६९मध्ये स्वत: राजांनी जंजिऱ्यावर स्वारी केली. सिद्दीकडून सात किल्ले परत घेण्यात आले. दंडा राजपुरीत त्यावेळी निवास असलेल्या सुभेदार सिद्दी फत्तेखानाने जंजिऱ्याचा आश्रय घेतला. जंजिऱ्याला मराठा आरमाराने वेढले. त्याची रसद तोडली. वेढ्याला सात महिने लोटून गेले. फत्तेखानाने इंग्रजांची मदत मागितली. इंग्रजांना यापूर्वी राजांनी धडा शिकवला होता. त्यांनी नकार दिला. मग सिद्दीने मोगलांकडे मदतीची याचना केली. मोगलांनी राजांकडे वेढा उठवण्याची मागणी केली, परंतु राजांनी त्यांना दाद दिली नाही. मग फत्तेखानाने मोगलांना किल्ल्याचा ताबा देण्याचे ठरवले. ते ऐकून त्याच्या हाताखालील संबुल, कासीम व खैरात यांनी फत्तेखानाला कैद करून सत्तेचा ताबा घेतला. औरंगजेबाने सिद्दयांना आपल्या पंखांखाली घेऊन सिद्दीला मोगली आरमाराचा सुभेदार बनवून 'याकूतखान' हा किताब दिला. त्यानंतर पुणे परिसरात मोगलांशी संघर्ष सुरू झाल्याने राजांनी जंजिऱ्याहून पुनश्च माघार घेतली.

फेब्रुवारी १६७१मध्ये मराठ्यांच्या हातांत असलेल्या दंडा राजपुरी किल्ल्यावरील मराठा शिबंदी होळीचा सण साजरा करण्यात दंग असलेली पाहून सिद्दयांनी त्या किल्ल्यावर हल्ला केला. त्यांनी दारू कोठाराला आग लावली आणि प्रचंड स्फोट झाला, तो रायगडावर राजांनाही ऐकू आला. दंडा राजपुरी किल्ला मराठ्यांच्या हातांतून गेला. राजांनी इंग्रजांकडून जंजिरा किल्ल्यावर गोळाबारी करण्यासाठी तोफा मागितल्या, परंतु काहीतरी कारण देऊन इंग्रजांनी ती विनंती नाकारली.

जंजिरा राजांच्या मनातून कधीही गेला नाही. १६७४मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला, परंतु त्या गडबडीतही त्यांची नजर जंजिऱ्यावरून हटली नाही. आरमारात वाढ केली जात होती. कल्याण, भिवंडी, नागोठण्याची खाडी, विजयदुर्ग, राजापूर येथे काम चालू होते. जंजिऱ्याला शह द्यायचा असेल, तर त्याच्या सान्निध्यात समुद्राच्या आत आपल्याकडे एक मोर्चा असणे आवश्ययक आहे, हे लक्षात घेऊन महाराजांनी जंजिऱ्याच्या उत्तरेस असलेल्या कासे बेटावर किल्ला बांधण्याचे काम हाती घेतले. लवकरच जंजिऱ्यासमोर पद्मदुर्ग उभा झाला.२५

सप्टेंबर १६७५मध्ये महाराजांनी जंजिरा मोहीम हातात घेतली. त्यावेळी मराठा आरमारात ७५ लढाऊ जहाजे होती. त्यांपैकी १५ गुरब जातीची होती. मराठ्यांनी जंजिऱ्याला वेढा घातला.

सागरतीरावर मोर्चेबंदी करण्यात आली. तराफे बांधून त्यावर तोफा चढवण्यात आल्या. सिद्दी वेढा उठवण्यासाठी कोकणात इतरत्र हल्ले चढवत होता, परंतु त्याला यश आले नाही. नोव्हेंबरमध्ये त्याने वेंगुर्ल्यावर हल्ला चढवला. विजयदुर्गमधील मराठी आरमाराने त्याचा पाठलाग केला, परंतु तो जंजिऱ्यास पोचण्यात यशस्वी झाला. पुढच्या वर्षी मोरोपंत पेशव्याच्या हाताखाली १०,०००चे पायदळ ऐन पावसाळ्यात पाठवण्यात आले. मोरोपंत दंडा राजपुरीस दाखल झाले. आसपासची झाडे तोडून मोर्चे बांधले गेले. जंजिऱ्याच्या तटावर तोफांचा मारा करण्यासाठी मोठ्या मचव्यांवर तोफा बसवण्यात आल्या. सिद्दी कासीम सुरतेला होता, तो तातडीने आपले आरमार घेऊन जंजिऱ्याकडे रवाना झाला. जंजिऱ्यावर मारा सुरू झाला. परंतु काही यश येईना.

मोरोपंतांनी पद्मदुर्गावरील हवालदार सुभानजी मोहिते आणि सरनोबत सुभानजी खराडे व कोळ्यांचा प्रमुख लाय पाटील यांना बोलावले. पंतांनी त्यांना जंजिऱ्यावर चढायची आपली योजना सांगितली. रात्रीच्या सुमारास लाय पाटलांच्या माणसांनी ठरल्या जागी जंजिऱ्याच्या तटाला शिड्या लावायच्या, पंतांच्या निवडक धारकऱ्यांनी छोट्या छोट्या मचव्यांतून तिथे मागोमाग पोचायचे, सैन्याने शिड्यांवर चढून तटावर चढायचे आणि आत उड्या मारायच्या, पहारेकरी मारून गडाचे दरवाजे उघडायचे, किल्ल्यात गोंधळ उडवायचा, तोफा निकामी करावयाच्या आणि किनाऱ्यावरील सैन्याने किल्ल्यात घुसायचे, अशी योजना होती. ती कोंडाजी फर्जंदच्या पन्हाळा हल्ल्याची नक्कल होती, फक्त यावेळी मावळ्यांनी समुद्रातून पोचायचे होते. मचव्यांवर शिड्या नेऊन त्या किल्ल्याला लावणे हे सर्वांत कठीण भगीरथी काम होते.

सर्व काही तयारी झाली. लाय पाटलांच्या लोकांनी शिड्या वेळेत लावल्या. परंतु बरीच वाट पाहिली, तरी धारकरी पोचले नाहीत. मग तांबडे फुटायच्या आधी त्यांनी शिड्या उतरवल्या आणि ते पद्मदुर्गाला परत आले. तिथून ते राजपुरीस गेल्यावर पंतांनी शरमेसह कबूल केले, 'पाटील, आम्हांपासून कोताई झाली, धारकरी याही माघार घेतली. आम्हापासोन अंतर पडले खरे!'२६

हा वृत्तांत ऐकून महाराजांची निराशा झाली. मोरोपंतांबरोबर त्यांनी आखलेला आराखडा केवळ त्यांच्याच धारकऱ्यांमुळे फसला होता. त्यांचा अखेरचा प्रयत्नही अयशस्वी झाला होता. महाराजांनी पद्मदुर्गावरील कारभाऱ्यांबरोबर लाय पाटलालाही छत्री, वस्त्रे आणि निशाण दिले. पाटलाला 'सरपाटीलकी'ही देण्यात आली.

सिद्दी कासीम सुरतेहून जंजिऱ्याला पोचला आणि त्याने तराफे जाळले. तो मराठ्यांची फळी तोडण्यात यशस्वी झाला. त्यामुळे वेढा उठवण्यात आला.

१६७६मध्ये औरंगजेबाच्या आदेशावरून सिद्दी संबुलचे सरखेलपद काढून घेऊन सिद्दी कासीमला देण्यात आले आणि कासीम मोगल आरमाराचा प्रमुख झाला. संबुल रागावून मराठ्यांना येऊन मिळाला. त्याच्याबरोबर त्याचा शूर पुतण्या सिद्दी मिस्रीही होता. कासीमने नोव्हेंबर १६७७ पासून मार्च १६७८पर्यंत कोकणावर हल्ले चालूच ठेवले. महाराजांनी दौलतखानास कासीमचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले, परंतु कासीमने त्याचा पराभव केला.

अशा प्रकारे जंजिरा जिंकण्याचे राजांचे स्वप्न अधूरे राहिले.

खांदेरीसाठी संघर्ष

जंजिरा जरी हातांत आला नाही, तरी सिद्दीवर सागरतीरालगत अरबी समुद्रात अंकुश ठेवण्यासाठी दुसरा किल्ला आपल्याजवळ असला पाहिजे, या जाणिवेने महाराजांचे लक्ष उंदेरी आणि खांदेरी या दोन छोट्या जुळ्या बेटांवरील किल्ल्यांकडे वळले. अद्यापि त्यांचा कोणीच ताबा घेतला नव्हता. मुंबईच्या गोदीवर या दोन बेटांचा चांगला प्रभाव होता आणि ती बेटे हातांत असल्यावर जंजिऱ्यावर समुद्रमार्गे अचानक चालून जाऊन सिद्दीला स्तिमित करणे अधिक सुलभ होणार होते. महाराजांनी माई नाईक आणि दौलत खान यांना खांदेरी बेटाचा ताबा घेण्यासाठी रवाना केले.

इंग्रजांना महाराजांच्या या योजनेची कुणकुण लागली होती. ४ सप्टेंबर १६७९ला सुरत कार्यालयातील मंडळाने मुंबईमधील अधिकाऱ्यांना आदेश दिले की, खांदेरीवरील सर्वांत उंच ठिकाणी इंग्रजांचा झेंडा फडकवावा, तिथे काही सैनिक तैनात करावेत, 'हंटर' जहाजाला तिथे समुद्रात गस्त घालण्यास सांगावे आणि जर मराठ्यांचे लोक तिथे काही कारणासाठी आले, तर त्यांना हे बेट ब्रिटनच्या राणीच्या मालकीचे असल्याची कल्पना देण्यात यावी. शक्यतो शस्त्रांचा वापर टाळण्याचा त्यांना सल्ला देण्यात आला होता.२७

हे आदेश मुंबईच्या कार्यालयात पोचण्यास काही वेळ लागला. त्या दरम्यान माई नाईकने महाराजांच्या हुकमाची तातडीने ताबिली केली होती. इंग्रज त्याच्या जवळपास येण्याच्या आधीच १५० माणसांची शिबंदी घेऊन तो बेटावर पोचला होता आणि दगडमातीची मामुली मोर्चेबंदी उभारून त्याने त्याच्यामागे तोफा लावल्या होत्या. जेव्हा इंग्रज तिथे पोचले आणि त्यांनी त्याला ते बेट सोडून निघून जाण्यास सांगितले, तेव्हा त्याने 'आपण शिवाजी महाराजांच्या आज्ञेने तिथे आलो आहोत आणि त्यांच्याकडून आदेश मिळेपर्यंत तिथून जाणार नाही', असे स्पष्टपणे इंग्रजांना सुनावले. सुरत मंडळाने 'मराठ्यांना शत्रू समजून त्यांना शस्त्रबळ वापरून बाहेर फेकावे', असा ठराव १५ सप्टेंबर १६७९ला पारित केला. त्यानंतर केलेल्या हल्ल्यादरम्यान थोर्प नावाचा इंग्रज अधिकारी ठार झाला आणि त्याचे जहाज जप्त झाले.

यानंतर इंग्रज नौदल आणि दौलतखानाच्या नेतृत्वाखालील मराठा नौदल यांच्या ताफ्यांमध्ये लढाई झाली. मराठ्यांनी हल्ला करताच इंग्रज पार घाबरून गेले. इंग्रजांचे 'डोव्ह' नावाचे लढाऊ जहाज बिनलढताच शरण आले. परंतु 'रिव्हेंज' या इंग्रजी फ्रिगेटमधील केगविन व मिंचीन हे दोघे मात्र शांतपणे मराठे जवळ येईपावेतो थांबले. त्यांच्या युद्धनौकेची आधुनिकता आणि तोफांमुळे त्यांनी दौलतखानाच्या ताफ्याला पळवून लावले. परंतु तरीही मराठे खांदेरी बेटावर मात्र तटून राहिले. सिद्दीचे आरमार काही दिवसांत तिथे आले आणि त्यांनीही खांदेरीच्या तटबंदीवर तोफामारा करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. मग सिद्दीने पलीकडच्या उंदेरी बेटाचा ताबा घेतला.

इंग्रजांना झगड्यात अडकायचे नव्हते. पोर्तुगीज किंवा सिद्दी यांच्यावर शस्त्रवापराची

जबाबदारी त्यांनी सोडली. परंतु सिद्दीच्या हल्ल्याला दाद न देता मराठे तिथे तटून राहिले आणि खांदेरी त्यांनी सोडले नाही. १६८०च्या आरंभी मराठे आणि इंग्रजांच्यात करार झाला.२८

लष्करी विलेषण

प्रामुख्याने जमिनीवरील लढाऊ शक्ती असलेल्या मराठ्यांपैकी एका राजाने चाकोरीबाहेर जाऊन सागरी शक्ती संपादन करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी आणि दोन दशकांपेक्षाही कमी अवधीत शून्यापासून आरंभ करून हिंदुस्तानच्या पश्चिम सागरातीरावरील आरमारी शक्ती म्हणून ओळखले जाण्यापर्यंत मजल मारावी, ही अद्वितीय उपलब्धी आहे. एकोणिसाव्या शतकातील प्रसिद्ध तत्त्ववेत्ता

ॲडमिरल अल्फ्रेड महान यांच्या मते आरमारी शक्तीचे (नेव्हल पॉवर) सहा प्रमुख घटक आहेत : भौगोलिक स्थान, लोकसंख्या, नौकानयनाचे ज्ञान, अर्थव्यवस्था, सैन्यसामर्थ्य आणि राजकीय निर्णयशक्ती. ब्रिटनसारख्या छोट्या देशाने साऱ्या जगावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले, ते केवळ या सागरशक्तीच्या जोरावर. महान यांचे वरील कस भारताला लावले, तर तो त्यांच्यावर पुरेपूर उतरेल.२९

या सहाही निर्देशकांची सुबत्ता असूनही भारत एक आरमारी शक्ती म्हणून उदयास येण्यासाठी एकविसावे शतक उजाडावे लागले. याचे कारण या शक्तीच्या प्रगल्भतेची अनुभूती असलेल्या या एकमेव भारतीय नरेशाला सतराव्या शतकाच्या मध्यावर झालेला 'जलं यस्य, बलं तस्य' या सूत्राचा साक्षात्कार त्याच्या तार्किक निष्कर्षापर्यंत पुढील एक-दीड शतकात पोचला नाही. मराठी आरमाराची शिवाजी महाराजांनी १६५९च्या सुमारास मुहूर्तमेढ रोवली आणि पुढील दोन दशकांत मराठा आरमार नावारूपाला आले, याचे पूर्ण श्रेय त्यांच्या अलौकिक दूरदृष्टीला आणि असामान्य सामरिक परिपक्वतेला मिळाले पाहिजे; परंतु त्याचे एका आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आरमारात रूपांतर होऊ शकले नाही, हे हिंदुस्तानचे दुर्दैव आहे.

कोकण किनाऱ्याचे परकीय शक्तींपासून रक्षण, सागरी व्यापारातून अर्थार्जन आणि कोकणातील आपल्या प्रजेची पोर्तुगीज व सिद्दी यांच्या जुलमातून मुक्तता या तीन प्रमुख उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी शिवाजी महाराजांनी मराठा आरमाराची प्रतिष्ठापना केली. ही तिन्ही उद्दिष्टे समाधानकारक प्रमाणात साध्य झाली, हे कबूल केले पाहिजे. ८५ लढाऊ नौका, ३०० ते ४०० इतर जहाजे, ४ ते ५ हजार खलाशी व त्यांच्यावरील अधिकारी गण आणि राजापूर, जयतापूर, मालवण व सुवर्णदुर्ग ही चार बंदरे; हा आरमारी संभार त्यांनी शून्यापासून आरंभ करून केवळ एका दशकाच्या कालावधीत उभा केला, ही त्यांच्या लष्करी कर्तृत्वाची ग्वाही आहे.

जंजिरा जलदुर्ग हे महाराजांचे अग्रगण्य आरमारी स्वप्न. तो घेण्यासाठी त्यांनी निदान पाच प्रयत्न केले. १६५७मधील पहिल्याच प्रयत्नात यश अगदी हातांत येऊनही शामराजपंत पेशव्यांच्या मुत्सद्देहीनतेमुळे ते निसटले. १६५८ आणि १६६३चे प्रयत्न अफझलखान आणि मिर्झाराजाच्या स्वाऱ्यांमुळे मागे घ्यावे लागले. १६६९मध्ये मोगलांच्या हस्तक्षेपानंतर केवळ तहावर समाधान मानावे लागले आणि शेवटी १६७६मधील मोहिमेतील किल्ल्यावर रात्री

शिड्या लावून चढण्याची योजना धारकरी वेळात समुद्र पार करण्यात कमी पडल्याने अयशस्वी झाली. शेवटी जंजिरा सिद्दीकडेच राहिला. याचे श्रेय सिद्दीच्या आरमारी शक्ती आणि अनुभवाबरोबरच त्या जलदुर्गाच्या अभेद्यतेला दिले पाहिजे. पुढे चाळीस वर्षांनी वारंवार प्रयत्न करूनसुद्धा पहिला बाजीराव पेशवाही जंजिरा घेऊ शकला नाही.

मराठा आरमार खांदेरीवरील हल्ल्यात खांदेरीचा ताबा आणि 'डोव्ह' या जहाजाची जप्ती ही दोनच कामे साधू शकले होते. अनेकदा प्रयत्न करूनही जंजिऱ्यावर सिद्दीचा ताबा कायम राहिला. पोर्तुगीजांवर अनेक यशस्वी हल्ले चढवूनही त्यांना आपल्या जहाजांसाठी पोर्तुगीजाकडून समुद्रात हालचालींसाठी खुला परवाना मिळाला नाही. १६७०मधील तहाद्वारे त्यांना आपली छोटी जहाजे परवानाविन्या पाठवण्याची मुभा मिळाली एवढेच; परंतु गलबते आणि इतर मोठ्या जहाजांना ही सूट नव्हती. वास्तविक मराठ्यांचे आरमार परकीय नौदलांपेक्षा या भागात संख्येने अधिक सरस होते. परंतु तोफा आणि दिशादर्शनाची आधुनिक सामग्री या दोन्हींत ते कमी दर्जाचे होते. यासाठी महाराजांना दोष देता येणार नाही. केवळ वीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी मिळवलेले यश लक्षणीय होते. त्यांनी मराठा नौदलाचे बीज समर्थपणे रोवले होते. त्याचा विकास करण्याचे उत्तरदायित्व त्यांच्या वारसांकडे होते.

एक लहान परंतु सक्षम आरमार उभे करण्याचे दिव्य महाराजांनी करून दाखवले. त्यांची युद्धनीती, आरमाराचे व्यवस्थापन आणि आपल्या लक्ष्याचा वेध घेण्याचा हव्यास उल्लेखनीय होते. त्यात त्यांना मराठ्यांच्या र्राभक्तीची जोड मिळाली. त्यातूनच कान्होजी आंग्रेसारखा अद्वितीय सरखेल निर्माण झाला.

राज्याभिषेक

प्रेरणा

वयाच्या चौदाव्या वर्षी शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची पायाभरणी केली, त्याला तीन दशके उलटून गेली होती. शून्यापासून आरंभ करून त्यांनी मराठा साम्राज्य उभे करण्याचे त्यांचे स्वप्न साकार केले होते. केवळ 'गोब्राह्मण प्रतिपालन' इतका त्यामागील मर्यादित उद्देश खास नव्हता. मुळात राजे धर्मा-धर्मामध्ये फारकत करीत नसत. परंतु तरीही मुस्लीम सत्ताधीशांच्या जुलमाखाली पिचून गेलेल्या हिंदू जनतेचे उत्थापन करून तिच्यात अस्मितेचे पुनश्च बीजारोपण करणे हे त्यांचे अग्रतम जीवनध्येय होते, हे नाकारता येणार नाही. महाराष्ट्रातील बहामनी राज्य आणि त्यांच्यापासून उत्पन्न झालेल्या पाच शाह्या, त्यांचे काही सुलतान मुळात हिंदू असूनही, उत्तरेतील मोगलशाहीपेक्षा अधिक कट्टर धर्मवादी होत्या. त्यांच्या सत्ताधीशांची प्रजाकल्याणाच्या कल्पनेची धाव काफरांचे धर्मांतर किंवा त्यांचा संहार या दोन पर्यायांच्या कुंपणापर्यंतच मर्यादित होती. हे बदलून हिंदूंना मुसलमानांइतकेच सन्मानाने जगता येईल, असे स्वराज्य निर्माण करणे ही शिवाजीमहाराजांची अभिलाषा होती.

गेली तीन दशके ते मोगल, आदिलशाही, सिद्दी आणि इंग्रज-पोर्तुगीज-फ्रेंच-डच या परकीय सत्तांशी एकट्याने लढा देत होते. त्यांच्या यशात चढ व उतार आले होते. पुरंदर तहात हार

मानून त्यांना आपले अर्ध्याहून अधिक ऐश्वर्य मोगलांच्या हाती सुपूर्द करावे लागले होते, पुण्यात ठाम मारून बसलेल्या शाईस्ताखानाच्या सैन्याला त्यांनी पळवून लावले होते, मराठा राज्य गिळंवृत करावयास आलेल्या अफझलखानाला यमसदनी पाठवले होते, त्यांना पन्हाळ्यावर बंदिस्त करणाऱ्या सिद्दी जोहरच्या तावडीतून शिताफीने सुटून त्यांनी हात चोळत त्याला परत पाठवले होते आणि औरंगजेबाच्या कुटिल कारस्थानाचा धुव्वा उडवून ते त्याच्या तावडीतून सुटून आले होते. मोगल, आदिलशहा, पोर्तुगीज आणि इंग्रज आता त्यांना समकक्ष मानू लागले होते. 'राजे' हा त्यांचा किताब औरंगजेब बादशहासकट सर्वांना मान्य होता. परंतु मराठा साम्राज्याचे सम्राट छत्रपती हा सन्मान समारंभपूर्वक ग्रहण करणे केवळ प्रतिस्पर्ध्यांसाठीच नव्हे, तर त्यांच्यावर भक्तिभावाने जिवापाड प्रेम करणाऱ्या जनतेसाठीही आवश्यसक होते.

सभासद, चित्रगुप्त, शेडगावकर-भोसले या बखरी ही मूळ प्रेरणा गागाभट्टांची असल्याचे नमूद करतात. खुद्द गागाभट्टांच्या घराण्याचा इतिहास 'भट्टवंशकाव्यं'मध्ये ही प्रेरणा रामदास समर्थांनी दिली असल्याचा उल्लेख आहे; तर 'शिवदिग्विजय'कारांच्या मते राज्याभिषेकाची मूळ प्रेरणा बाळाजी आवजी चिटणीसांची आहे. परंतु मल्हार रामाराव चिटणीस सांगतात की, '...आपण हे राज्य दक्षिण प्रांताचे प्रतापे सोडविले. श्री महाराणा सजणसिंह यांचे वंशज आपण. छात्रसिंहासन प्रथम करून राज्याभिषेकयुक्त (होत्साते) पूर्वयुगी राजे धर्मे व नीति करून राज्य करीत आले तसे (आपण) करावे म्हणून राजांनी दृढसंकल्प केला.'३० म्हणजे राज्याभिषेकाची प्रेरणा स्वत: राजांचीच होती.

प्रत्यक्ष समारंभ

५ जून १६७४चा शुभ दिवस राज्याभिषेकासाठी निवडण्यात आला. या कामासाठी योग्य विद्वान व सर्वमान्य पंडित महाराष्ट्रात नसल्यामुळे मूळचे पैठणचे असलेल्या भट्ट घराण्यातील विद्वान गागाभट्ट यांना पाचारण करण्यात आले आणि त्यांनी राज्याभिषेक सिद्धीस नेला. महानद्यांची फुण्योदके, सुलक्षणी गजाश्व, व्याघ्रचर्मे, छत्रचामरादि राजचिन्हे, सुवर्णकलश, सिंहासन असे सर्व साहित्य आणण्यात आले. आप्तजन, विद्वान, पंडित, लहानमोठे सरदार आणि सेवक या सर्वांना रायगडावर येण्यासाठी निमंत्रणे पाठवण्यात आली. मोठमोठे मंडप घालण्यात आले. राजधानीसाठी निवडलेल्या रायगडावर वाडे, पागा, मंदिरे, सभागृहे, गंगासागर तलाव, दिल्ली दरवाजा, दरबार मंडप वगैरे बांधकामे हाती घेण्यात आली.

१६७४च्या मे महिन्यात चिपळूणला जाऊन राजांनी लष्कराची पाहणी केली. परशुरामाच्या मंदिरात पूजा करून ११ मेला ते रायगडला पोचले. तिथे हंबीरराव मोहिते यांना सरनोबती देण्यात आली. 'शके १५९६ आनंद संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १२ शुक्रवार ५ जून १६७४ रोजी तीन घटका उरली तेव्हा राजे सिंहासनी बसले', असा जेधे शकावलीत उल्लेख आहे.३१ महाराजांची सुवर्णतुला करण्यात आली. (एका नोंदीनुसार त्यांचे वजन १३५ इंग्रजी पाउंड म्हणजे ६१ किलोग्राम भरले) सभासदानुसार समारंभाचा खर्च ५ कोटी रुपये झाला, परंतु सर जदुनाथ सरकार यांचा खर्चाचा अंदाज ५० लाख रुपयांच्या घरात आहे. समारंभ अत्यंत भव्य

होता आणि धर्मशास्त्रानुसार तो यथासांग पार पडला. सगळ्यांच्या उत्साहाला व आनंदाला उधाण आले होते.

नवीन रिवाज

महाराजांनी सिंहासनाबरोबर नवी राज्यचिन्हे निर्माण केली. पूर्वी युद्धाच्या वेळी नेल्या जाणाऱ्या भगव्या झेंड्याचे 'जरीपटका' या राजचिन्हात रूपांतर करण्यात आले. हा समारंभापुरताच बाहेर काढण्यात येत असे. राज्याच्या सुव्यवस्थेचा आराखडा त्यांनी तयार केला. 'राज्याभिषेक शक' ही नवी कालगणना सुरू करण्यात आली. (हा पुढे १०४ वर्षे चालला. १७७७साली दुसरे शाहूमहाराज गादीवर आल्यानंतर तो बंद झाला) 'क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर महाराज छत्रपती' ही उपपदे त्यांनी स्वीकारली. फारशी वा उर्दूऐवजी भारतीय ग्रंथांतील रिवाज व भाषा प्रचारात आणण्याचा हुकूम महाराजांनी काढला. दरबारी कामाची पद्धत अमलात आणण्यासाठी कानू-जाबते व लेखनपद्धती त्यांनी ठरवून दिली. त्यात पाळावयाचे नियम, मायने आणि व्यवहार अंतर्भूत होते.

या प्रसंगी अष्टप्रधान पद्धती अधिवृतपणे स्वीकारण्यात आली. अष्टप्रधानांच्या नेमणुका पुढीलप्रमाणे होत्या : मोरोपंत पिंगळे, पेशवा - मुख्य प्रधान; रामचंद्र नीलकंठ, मुजुमदार - अमात्य; अण्णाजी दत्तो, सुरनीस - सचिव; दत्ताजी त्रिंबक, वाकनीस - मंत्री; हंबीरराव मोहिते, सरनोबत - सेनापती; रामचंद्र त्रिंबक, डबीर - सुमंत; रावजी निराजी, न्यायाधीश (नवीन पद); रघुनाथ पंडितराव (नवीन पद).

समारंभानंतर १२ दिवसांनीच, १७ मार्चला, महाराजांच्या मातोश्री जिजाबाई यांचे निधन झाले. त्या राजांच्या केवळ माताच नव्हत्या, तर त्यांना स्वराज्याची स्फूर्ती देणाऱ्या त्यांच्या आजन्म मार्गदर्शक होत्या. या हिमालयाच्या सावलीतच राजांनी बाल शिवाजीराजे ते क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजीमहाराज ही दुर्गम्य वाटचाल पुरी केली होती. राजांच्या दु:खाला पारावर उरला नाही.

राज्याभिषेकाच्या समारंभात काही धार्मिक त्रुटी राहिल्या आहेत, असे महाराजांच्या नजरेला आणून देण्यात आले. त्याच्या आधीच काही दिवस १९ मार्च १६७४ला त्यांच्या एका पत्नीचे निधनही झाले होते. दोन आठवड्यांत मातेचेही निधन

झाले. या सर्व घटनांनी राज्याभिषेकावर अशुभतेचे सावट आणले. त्यासाठी चार महिन्यांनी २४ सप्टेंबर १६७४च्या मुहूर्तावर राजांना दुसरा राज्याभिषेक करण्यात आला.

पुनश्च हरि: ॐ

महाराजांच्या राज्याभिषेकात सुदैवाने मोगल, आदिलशाही व सिद्दींनी कोणतेही विघ्न आणले नाही. परंतु त्या सर्वांचा निश्चितच जळफळाट झाला. आपल्या नवीन वैभवात मश्गूल राहून प्रतिस्पर्ध्यांना आपल्यावर हल्ला चढवण्यासाठी पुढाकार घेण्याची संधी देणारे महाराज नव्हते. पहिले पाऊल टाकण्याची क्षमता नेहमी आपल्या हातांत ठेवण्याकडे त्यांचा कल असे. पावसाळा सुरू होण्याआधी सर्वांनाच जागरूक करून देण्यासाठी त्यांनी पाऊल उचलले. दख्खनचा

सुभेदार बहादुरखान याची छावणी पुण्यापासून ५० मैलांवर भीमेच्या तीरावर पेडगावला होती. राजे गाफील आहेत, हे पाहून स्वराज्याच्या मुलखावर कोठेतरी हल्ला चढवण्याचा विचार त्यावेळी त्याच्या मनात घोळतच होता.

जुलै १६७४मध्ये महाराजांनी ९००० ची फौज त्याच्यावर पाठवली. ती दोन भागांत वाटण्यात आली. त्यांपैकी दोन हजार मराठ्यांनी प्रथम बहादुरखानाच्या छावणीवर चालून जाण्याचा आविर्भाव केला. इतकी छोटी तुकडी आपल्यावर येत आहे, हे ऐकून खुद्द बहादुरखानच फौज घेऊन त्यांना पळवून लावण्यासाठी बाहेर पडला. मराठ्यांच्या तुकडीने त्यांना तीस-चाळीस मैल आपल्यामागे झुलवत नेले. एवढ्यात उर्वरित शिबंदी खानाच्या छावणीवर तुटून पडली. त्यांनी तेथील तंबू जाळले, एक कोटीचा खजिना लुटला आणि बादशहाकडे पाठवण्यासाठी ठेवलेले २०० जातिवंत घोडे बरोबर नेले.

सप्टेंबरमध्ये महाराजांनी वसईच्या पोर्तुगीजांकडून आणि सुरतेमधील मोगलांकडून खंडणीची मागणी केली. ऑक्टोबरमध्ये ते स्वत: बाहेर पडले आणि खानदेशात त्यांनी खंडणी गोळा केली. एरंडोलच्या उत्तरेस असलेली इंग्रजांची वखार त्यांनी लुटली. कुतुबुद्दिन खान खेश्गी नावाचा मोगल सरदार त्यांना आडवा आला. दोघांच्या चकमकीत खानाचा पराभव झाला. महाराजांना कोकणात कारवारपर्यंत मोहीम काढायची होती. त्यासाठी आपल्याला पुरेसा वेळ मिळावा आणि त्यादरम्यान बहादुरखानाने पुणे परिसरावर हल्ला चढवू नये, यासाठी ते एक चाणाक्ष डाव खेळले. त्यांनी बहादुरखानाकडे एक वकील पाठवला. '१७ किल्ले आम्ही मोगलांस देऊ आणि त्याबदल्यात संभाजीराजांना ६०००ची मनसब मिळावी', असा तहाचा प्रस्ताव त्यांनी मोगलांपुढे ठेवला. हा प्रस्ताव औरंगजेबाकडून मान्य होऊन येईपर्यंत तीन-चार महिने लोटतील आणि त्या दरम्यान आपल्याला कोकणातील काम पुरे करण्यासाठी अवसर मिळेल, हे त्यांना चांगले ठाऊक होते. अगदी तसेच घडले.

शिवाजी महाराज मार्च १६७५मध्ये राजापूरकडे सैन्यासह रवाना झाले. तिथून त्यांनी ४० जहाजे वेंगुर्ल्याकडे पाठवली आणि स्वत: १५००० स्वार, १४००० पायदळ आणि १०००० मजूर घेऊन ते कुडाळच्या दिशेने गेले. त्यांच्या सैन्याने कोल्हापूर काबीज केले आणि मे १६७५च्या पहिल्या आठवड्यात फोंडा घेतला. पोर्तुगीज या किल्ल्याला पुरवठा पाठवत असत. मराठ्यांनी पोर्तुगीजांची तिकडे जाणारी जहाजे पकडली. फोंडा पडल्याचे ऐकून बहलोलखान विजापूरहून निघाला, परंतु स्वत: शिवाजीराजे सैन्याचे नेतृत्व करीत आहेत, हे ऐकून मिरजेच्या पुढे तो गेला नाही. १८ मे १६७५पर्यंत महाराजांनी कारवार, अंकोला आणि शिवेश्वर जिंकले. त्यापश्चात सिद्दीकडील काही भाग सोडून संपूर्ण पश्चिम सागरतटावर महाराजांचा कब्जा झाला.

महाराज जूनच्या मध्यापर्यंत रायगडला परतले. तोपर्यंत त्यांनी पाठवलेल्या प्रस्तावाला औरंगजेबाची मान्यता मिळाली होती. परंतु आपले काम झाल्यावर त्या तहाची पूर्ती करण्याचा शिवाजीराजांचा विचार नव्हता. बहादुरखानाला याची जाणीव झाली. औरंगजेबाकडे ही बातमी पोचल्यावर तो खवळला. बादशहाने आदिलशहाबरोबर संगनमत करून मराठ्यांवर हल्ले चढवण्याचे ठरवले आणि त्यासाठी त्याने आदिलशहाला वार्षिक खंडणीतून सूट देण्याची लालूच

दाखवली. बहादुरखानाने उत्तरेच्या दिशेने आणि बहलोलखानाने दक्षिणेच्या दिशेने हल्ले चढवावेत, असे ठरले. परंतु विजापूरमध्ये खानांच्या दरम्यान यादवी उफाळल्यामुळे हे हल्ले चढवले गेलेच नाहीत. वझीर खवासखानाच्या जागी बहलोलखानाची नेमणूक झाली आणि पुढच्या महिन्यात बहलोलखानाने खवासखानाचा खून घडवून आणला.

नोव्हेंबर १६७५मध्ये महाराज उत्तर स्वराज्याची धुरा मोरोपंतांवर टाकून पन्हाळ्याला आले. तिथे ते अत्यंत गंभीर आजारी पडले. इतके की, त्यांचा मृत्यू झाला असल्याच्या अफवा पसरल्या. परंतु एकदोन महिन्यांत त्यांची तब्येत सुधारल्यावर मराठ्यांच्या हालचाली पूर्ववत सुरू झाल्या.

विजापुरात अल्पवयीन सिकंदरशहा हा गादीवर होता, परंतु सर्व अधिकार दख्खनी मुसलमानांचा म्होरक्या खवासखान याच्या हातांत होते. आदिलशाही जिंकण्याची ही सुवर्णसंधी पाहून औरंगजेबाने बहादुरखानाला विजापूरवर चालून जाण्यास सांगितले. १९ ऑक्टोबर १६७५ला खवासखानाने भीमेच्या काठी बहादुरखानाची भेट घेतली. हे कळताच पठाण सरदारांचा म्होरक्या बहलोलखान याने खवासखानाला १९ नोव्हेंबरला भोजनास बोलावून त्याला कैद केले आणि तो वझीर झाला. २१ मार्च १६७६ रोजी बहादुरखान विजापूरवर चालून आला, पण त्याचा पराभव झाला. तो पुन्हा चालून आला. हलगी येथे १ जून १६७६ रोजी झालेल्या लढाईत त्याला मराठे आणि आदिलशहाच्या एकवटलेल्या शक्तीशी सामना करावा लागला. त्यापुढे तो टिकणे असंभव होते. त्याने लागलीच अहमदनगरकडे माघार घेतली. त्यानंतर शिवाजी महाराज आणि आदिलशाहीमध्ये तह झाला. आदिलशहाने स्वराज्य आणि आदिलशाहीच्या राज्यांदरम्यान वृष्णा नदी ही सीमा मान्य केली. ही मोठी घटना होती.

बहादुरखान अयशस्वी ठरल्याने बादशहाने दिलेरखानाला पुन्हा दख्खनची सुभेदारी दिली. त्याच्याबरोबर नेतोजी पालकरालाही धाडले. दक्षिणेत येताच नेतोजी जून १६७६मध्ये एक दिवशी मुस्लीम छावणीमधून बाहेर पडून तडक रायगडला पोचला. शिवाजी महाराजांच्या पायांवर त्याने लोटांगण घातले आणि आपल्याला पुन्हा हिंदू धर्मात परत घेण्याची त्यांना विनंती केली. सर्व विरोध धुडकावून लावून महाराजांनी त्याला परत हिंदू धर्माची दीक्षा देण्याची व्यवस्था केली. १९ जून १६७६ला नेतोजी हिंदू झाला. महाराजांना प्रचंड दिलासा देणारी ही घटना होती.

लष्करी विलेषण

मध्ययुगीन काळात राजांचा प्रभाव हा प्रामुख्याने त्यांच्या लष्करी शक्तीवर अवलंबून असे. महाराजही त्याला अपवाद नव्हते. तीस वर्षांच्या कालावधीत मराठा स्वराज्याचे लष्करी बाहुबळ आणि वर्चस्व वेगाने वाढले होते. मोगल साम्राज्य सोडता त्यांच्या लष्करी प्राबल्याला आव्हान देणारी दुसरी कोणतीही सत्ता अस्तित्वात नव्हती. मोगल साम्राज्याचे लष्करी प्रभुत्व प्रामुख्याने उत्तर भारतातच केंद्रित असल्यामुळे दक्षिणेतील त्याचा प्रभाव मराठ्यांना टक्कर देण्याइतका नव्हता. शिवाजी महाराजांचा राज्यारोहणाचा निर्णय या लष्करी शक्तीशी निगडित होता, किंबहुना ते त्याचे प्रकटीकरण होते, हे विसरता कामा नये. राज्याभिषेकाच्या

समारोहात या प्रतिस्पर्ध्यांनी कोणतेही विघ्न आणले नाही, याचे श्रेय महाराजांच्या लष्करी वरचष्म्याला जाते. राज्यारोहणाचा निर्णय, राज्याभिषेकाच्या आधी महाराजांनी चिपळूणला जाऊन आपल्या सैन्याची केलेली पाहणी, युद्धाच्या वेळी नेल्या जाणाऱ्या भगव्या ध्वजाचे जरीपटक्याच्या राजचिन्हात रूपांतर हा सर्व महाराजांच्या लष्करी प्रवृत्तीचा अविष्कार होता.

प्रतिस्पर्ध्यांवरील दबावात क्षती होऊ न देणे हे लष्करी रणनीतीचे महत्त्वाचे सूत्र आहे. राज्यारोहणाचा समारंभ झाल्यावर लागलीच महाराजांचे लक्ष कोकण किनाऱ्यावर गेले. परंतु त्याबाजूला आपण गेलो, तर बहादुरखान हस्तक्षेप करण्याचा विचार करील, ही शक्यता ध्यानात ठेवून महाराजांनी त्याच्यावर फौज पाठवली. बहादुरखानाच्या मर्यादांची महाराजांना पूर्ण जाण होती. प्रथम त्याच्यावर हल्ला चढवायचा, त्यानंतर तहाची याचना करायची, त्याची संमती दिल्लीहून बादशहाकडून येण्यासाठी लागणाऱ्या कालावधीत कोकणातील आपला कार्यभाग उरकायचा आणि शेवटी त्याला वाटाण्याच्या अक्षता लावायच्या; हा महाराजांचा आराखडा. त्यांचा कयास तंतोतंत खरा ठरला आणि आपली योजना महाराजांनी शिताफीने अमलात आणली. बहादुरखानाच्या छावणीवरील हल्ला यशस्वी 'कृव् नीतीचे' एक उत्तम उदाहरण आहे. बहादुरखानाच्या प्रचंड सैन्याला आपल्या छोट्या तुकडीचा पाठलाग करण्यासाठी भाग पाडायचे आणि नंतर उरलेल्या शिबंदीकरवी त्याच्या छावणीवर हल्ला चढवायचा, या बुद्धिमंत योजनेला दाद दिली पाहिजे. परंतु त्यामागे बहादुरखानाच्या लष्करी कर्तबगारीचे महाराजांचे अचूक अनुमान होते. प्रत्येक मोगल सरदार याला बळी पडला नसता, हे त्यांनाही पुरेपूर ठाऊक होते.

एवढेच नव्हे, तर बहादुरखान विजापूरवर चालून गेल्यानंतर बहलोलखानाने मदत मागितल्यावर महाराजांना एक विरळ संधी दिसली. बहादुरखानसारख्या लेच्यापेच्या शत्रूला हरवण्यात कोणतीही अडचण येणार नाही, हे त्यांनी तत्काळ जाणले आणि कोणताही वेळ न घालवता आदिलशाहीला मदत करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांना दुहेरी फायदा झाला; एका बाजूस मोगलांचा पराभव झाला आणि दुसऱ्या बाजूस आदिलशहाशी तह होऊन कृष्णा नदीच्या उत्तरेचा प्रदेश स्वराज्याचा असल्याचे त्यांनी मान्य केले. सज्जड लष्करी नीतीचे यापेक्षा सरस उदाहरण शोधून सापडणार नाही.

परंतु त्याचबरोबर जंजिरा घेण्याच्या आपल्या अधूऱ्या इच्छेची परिपूर्ती करण्याचा राज्याभिषेकानंतर हाती घेतलेला राजांचा प्रकल्प मात्र फळाला गेला नाही. कोंडाजी फर्जंदने जसा पन्हाळा काबीज केला, तोच डावपेच वापरून जंजिरा किल्ल्याच्या आत उतरायचा त्यांचा बेत होता. दुर्दैवाने धारकरी समुद्रातून प्रवास करून मासेमारांनी लावलेल्या शिड्यांपर्यंत पोचू शकले नाहीत, हे मोरोपंतांचे दुर्दैव. याला लष्करी संकेतात 'युद्धाचे अभ्र (फॉग ऑफ वॉर)' अशी संज्ञा आहे. त्याच्यामुळे मोठमोठ्या सैन्यांच्या अयशस्वी ठरलेल्या योजनांची अनेक उदाहरणे देता येतील; किंबहुना महाराजांच्या एकंदर लष्करी कारकिर्दीत अयशस्वी ठरलेली ही एकमेव 'कमांडो रेड' होती, एवढेच नव्हे, तर त्यांना हा विचार कायमचा सोडून द्यावा लागला.

जंजिऱ्याचा किनाऱ्यावरील थोडा भाग सोडला, तर संपूर्ण पश्चिम किनारा महाराजांच्या हातांत आला होता, मोगलांचा तात्पुरता नि:पात झाला होता, पोर्तुगीज व इंग्रज शांत होते, खांदेरीवर

कब्जा झाला होता आणि आदिलशहाबरोबर करार झाला होता. सामरिक चित्र सुखावह होते. आता महाराजांनी दक्षिणेकडे आपली नजर वळवली.

दक्षिणेचा दिग्विजय

नवे क्षितिज

कोणत्याही राज्याचे दोन प्रमुख स्तंभ असतात; सैन्यबळ आणि अर्थबळ. करवसुली आणि खंडणी हे राजांच्या अर्थार्जनाचे प्रमुख स्रोत. सैन्यासाठी पैसा आणि पैशासाठी सैन्य या दुष्टचक्रात सर्व नरेश कायमचे अडकलेले असतात. या सत्यापासून कुणालाच सुटका नसते. शिवाजी महाराजांनी करवसुलीसाठी खानदेश, वऱ्हाड, बागलाण, सुरत आणि उत्तर कोकणातील जव्हार, रामनगर हा सर्व प्रदेश पालथा घातला होता. त्याच्या उत्तरेला मोगलांची सत्ता असल्याने नर्मदा पार करून करवसुलीच्या शोधात जाण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. स्वराज्याचा विस्तार करण्यासाठी एकच पर्याय होता, तो म्हणजे दक्षिण. त्याकरता आता दक्षिणेकडे आपला अंमल वाढवण्याचा त्यांनी विचार केला.

विजापूर राज्याचा पश्चिमेकडील बराच प्रदेश महाराजांनी घेतला होता. पूर्व किनाऱ्यावरील गोवळकोंड्याचा प्रदेश आणि पश्चिम किनाऱ्यावरील जिंजी, तंजावर व मदुराईपर्यंतचा शहाजीराजांच्या जहागिरीचा प्रदेश हे दोन्ही सधन प्रांत होते. त्यांच्यात मोहीम काढली, तर अर्थार्जनाचे नवनवीन स्रोत आपण निर्माण करू शकू, अशी त्यांना खातरी होती. विजयनगर साम्राज्याच्या अस्तानंतर दक्षिणेत हिंदूंचा कैवारी आणि पुरस्कर्ता म्हणावा असा राजा निर्माण झाला नव्हता. ही पोकळी भरून काढण्याची जबाबदारी आता छत्रपती शिवाजी महाराजांवर येऊन पडली होती. ही दोन्ही उद्दिष्टे दक्षिणेतील मोहिमेकरवी साधणार होती.

हा विचार मनात येण्याचे आणखी एक कारण असू शकत होते. महाराजांनी राज्यारोहण केले होते; परंतु त्यांच्या राज्याचा विस्तार अत्यंत मर्यादित होता. याबद्दल काही विरोधक स्पष्ट बोलत होते. ‘जंजिऱ्याचा सिद्दी तर प्रत्यक्ष तुमच्या दाराशी शस्त्र रोखून उभा आहे. कर्नाटकात वडिलांनी मिळवलेले राज्यसुद्धा तुमचे ताब्यात नाही. अर्थात दिग्विजय केल्याशिवाय नुसते सिंहासन स्थापून काय उपयोग!’ या हिणवणीस जबाब म्हणून शिवाजी महाराजांनी दक्षिण-दिग्विजयाचे काम हाती घेतले असावे.३२

या दक्षिण दिग्विजयासाठी महाराजांना विशेषकरून प्रेरणा आणि साहाय्य मिळाले, ते दक्षिणस्थित दोन गृहस्थांचे : कुतुबशाहीतील मादण्णापंत आणि तंजावरचा रघुनाथ नारायण हणमंत्ये.

१६७२मध्ये आदिलशाही आणि कुतुबशाही या दोन्हींत सत्ताबदल घडून आला. २१ एप्रिल १६७२ला अब्दुल्ला कुतुबशाह मरण पावला. मदनपंडित ऊर्फ मादण्णा हा कुतुबशहाचा विश्वासू कारभारी होता. तो फारसी, संस्वृत व देशी भाषांमध्ये प्रवीण आणि राजकारण जाणणारा अत्यंत हुशार मुत्सद्दी होता. अब्दुल्लाच्या देहांतानंतर पूर्वी वजीर असलेला त्याचा जावई सय्यद अहंमद याने सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला; परंतु सय्यद मुझफ्फर नावाच्या फौजेतील अधिकाऱ्याने अब्दुल्लाचा पुत्र आणि तख्ताचा वारसदार अबुल हसन याला तख्तावर बसवले

आणि मुझफ्फर स्वत: वझीर बनला. मुझफ्फर हाताबाहेर जाऊ लागल्यावर अबुल हसनने त्याला पदावरून दूर केले आणि त्याच्या जागी मादण्णाला 'सूर्य प्रकाशराव' हा किताब देऊन वझिरी दिली. १६७६मध्ये शिवाजी महाराज आणि मादण्णापंताची चांगली ओळख झाली. मादण्णाने आपला भाऊ आकण्णा आणि तीन पुतणे लिंगण्णा, गोपण्णा व यंगण्णा या तिघांना कुतुबशाहीत ठिकठिकाणी नेमून हिंदूंसाठी सन्मानाचे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला होता.

रघुनाथपंत हणमंत्ये हा शहाजीराजांच्याकडे कारभार करून नंतर तंजावरमध्ये राजांचे सावत्र बंधू व्यंकोजी यांचा कारभारी म्हणून काम करीत होता. तोही राजकारणाच्या विषयात तरबेज होता आणि पिता-पुत्रांचा जम बसवण्यात त्याने चांगली कर्तबगारी दाखवली होती. व्यंकोजीराजे वडलांची बंगळूरची जहागिरी सांभाळत असताना आदिलशहाने त्यांना नायक राजांची सत्ता असलेल्या तंजावरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाठवले होते. तिथे सुव्यवस्था स्थापन केल्यावर सर्वांच्या शिफारशीवरून आणि आदिलशहाच्या संमतीने व्यंकोजींनी नायक राजांच्या प्राचीन सिंहासनावर आरोहण केले. त्यांना तंजावरची जहागीर बहाल करण्यात आली. हे सर्व सिद्धीला नेण्यात आणि व्यंकोजीराजांचे बस्तान बसवून देण्यात रघुनाथपंताचा सिंहाचा वाटा होता.

रघुनाथपंताचा पुढाकार

आपले ज्येष्ठ बंधू शिवाजी महाराज यांच्याशी रघुनाथपंताचे सख्य जुळले आहे आणि तो आपल्या हिताविरुद्ध खेळ खेळतो आहे, असा संशय येऊन व्यंकोजींनी रघुनाथपंतास कामावरून दूर केले. रघुनाथपंत हा कर्तबगार पुरुष होता. कुतुबशाहीत मादण्णाचे वर्चस्व आहे आणि इकडे आदिलशाहीचा डोलाराही डगमगतो आहे, याचा सारासार विचार करून मादण्णाच्या साहाय्याने शिवाजी महाराजांना दक्षिणेत बोलवावे आणि मराठ्यांचे सर्वछत्री राज्य दक्षिणेत निर्माण करावे, अशी महत्त्वाकांक्षी कल्पना त्याच्या मनात महाराजांच्या राज्याभिषेकापासूनच घोळत होती.

रघुनाथपंत प्रथम कुतुबशाहीची राजधानी भागानगरला जाऊन मादण्णाला भेटला. पंताच्या मुत्सद्देगिरीने मादण्णाला मंत्रमुग्ध करून टाकले. ते दोघे मग कुतुबशहाकडे गेले. रघुनाथपंताने कुतुबशहाला आदिलशाहीचा ताबा घेण्याची योजना इतकी उत्तमपणे फारशीमध्ये समजावून सांगितली की, त्यात सहभागी होण्यास संमती तानाशहाने दिली आणि शिवाजी महाराजांना आपल्या भेटीसाठी आणण्याची सूचना केली. रघुनाथपंत मग पन्हाळ्यास जाऊन महाराजांना भेटला. ते नुकतेच एका गंभीर आजारातून बरे होत होते. परंतु त्यांनी रघुनाथपंताच्या योजनेस तत्काळ होकार भरला. महाराजांच्या दक्षिणेकडील मोहिमेमागील उद्देशाचा आदिलशहाला संशय येऊ नये, यासाठी 'मी माझ्या भावाकडे माझा वाटा मागायला निघालो आहे', अशी बतावणी करायचे ठरले.

वृष्णा व तुंगभद्रा यांच्यामधील विजापुरी प्रदेश मसूदखान वझीराने शिवाजी महाराजांना दिला होता. तो कब्जात घ्यायचे काम आता वाटेत करता येईल, असा महाराजांचा विचार होता.

त्याचबरोबर वाटेत असलेल्या कोप्पळ येथील अब्दुल रहीमखान मियाना आणि त्याचा भाऊ हुसेन मियाना यांच्या गैरवर्तनाबद्दल आणि ते हिंदूंना देत असलेल्या त्रासाबद्दल महाराजांकडे वारंवार तक्रारी येत होत्या. त्यांचाही समाचार घेण्याचे महाराजांनी ठरवले.

गोवळकोंड्याकडे आगेकूच


शिवाजी महाराजांनी आपली शिबंदी दोन भागांत वाटली. सरनोबत हंबीरराव मोहित्यांबरोबर त्यांनी बहुतांश भाग पाठवला. हंबीरराव कोल्हापूरहून निघून बेळगाव, हुबळी, कोप्पळमार्गे वळण घेऊन गोवळकोंड्याला जाणार होता. (नकाशा क्र. २९ पाहा.) महाराज काही दिवसांनी मोजक्या अंगरक्षकांसह रायगडावरून सरळ मायणी, सांगोला, गुलबर्गामार्गे गोवळकोंड्यास पोचणार होते.

कोप्पळपाशी पोचेपर्यंत हंबीररावाला फारसा विरोध झाला नाही. कोप्पळ ही हुसेनखान मियानाची जागा होती. तो हंबीररावाला थांबवण्यासाठी मोठी फौज घेऊन सामोरा गेला. हंबीररावाची शिबंदी त्याच्या तुलनेत फार कमी होती. दोन सैन्यांची गदगजवळ येलबुर्गा येथे जानेवारी १६७७मध्ये गाठ पडली. बारा तासांसाठी घमासान युद्ध झाले. मराठ्यांनी हुसेनखानाच्या सैन्याचा अक्षरश: धुव्वा उडवला. त्यांना काही हत्ती, २००० घोडे आणि बरेच सामान मिळाले. या लढाईचे काव्यमय वर्णन बखरीत केले आहे : 'मियाना शरीरेकरून जबर, कजाखही विशेष, हंबीररावाजवळ सरंजाम थोडा, मायण्याची जमियत मोठी, असे असता हंबीररावाने वीज चकाकता अंधकार दूर होऊन शुद्ध उदकधारा नजरेस येते, तद्वत सैन्यात हलकल्लोळ होऊन खानाचे लोकांनी रस्ता देऊन, जसे वेणीचे केस दुभांग करून स्त्री वेणी घालते, तशा रीतीने हंबीररावाने हत्यार चालविताच, फळी फुटोन दुभांग केले. शेकडो मनुष्य जाता येता मारिले, खान नामोहरम होऊन पळू लागले......हंबीररावाकडील फक्त पाच-पन्नास लोक जखमी झाले. हे वर्तमान विजापुरास गेल्यावर मियानास सोडविण्यास आणखी फौज चालून आली. हे वर्तमान ऐकून धनाजी जाधव हंबीररावाचे मदतीस धावून आला. मग चहूकडून लांडगेतोड करून बेजार केले. ...पुन्हा मराठ्यांशी गाठ ईश्वरा घालू नकोस, असे अंत:करणात म्हणावे ...अब्दुल रहीमखानास ठार मारिले तेव्हा हुसेनखानाने स्वत: कोप्पलास जाऊन किल्ला मराठ्यांचे ताब्यात दिला...'[३३]

नकाशा क्र. २९

गोवळकोंड्याकडे आगेकूच

५ फेब्रुवारी-१० मार्च १६७७



(हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.)

कुतुबशहाशी भेट

आपली दक्षिणेची भेट लांबणार आहे, याची महाराजांना कल्पना होती. महाराजांनी उत्तरेच्या बाजूच्या राज्यकारभाराची जबाबदारी मोरोपंत पिंगळे आणि दक्षिणेच्या बाजूची जबाबदारी अण्णाजी दत्तो या दोघांच्यावर सोडली. बरोबर २५,००० स्वार आणि काही पायदळ घेतले. नेतोजी पालकर, आनंदराव मकाजी, मानाजी मोरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सोनाजी नाईक वगैरे सरदार आणि हणमंते बंधू, दत्ताजी वाकनीस, केसो निळो, गंगाधरपंत पिंगळे, पारसनीस नील प्रभू, बाळाजी आवजी, श्यारमजी नाईक ही मुत्सद्दी मंडळी महाराजांच्या बरोबर होती. हंबीरराव मोहिते पुढे गेल्यावर राजे काही दिवसांनी गोवळकोंड्याकडे रवाना झाले. कुतुबशाहीतील नागरिकांवर आपल्या सैनिकांचे सुष्ट आणि उचित प्रतिबिंब पडावे, यासाठी आपल्या सैनिकांकडून नागरिकांना कोणताही त्रास पोचणार नाही, याची खबरदारी घेण्याचे त्यांनी सक्त आदेश दिले होते. सर्व सैनिकांना त्यांनी नवे आणि देखणे गणवेश दिले होते. त्यामुळे महाराजांनी समारंभाने शहरात प्रवेश करताच हा दिमाख आणि तडफ पाहून सर्व मंत्रमुग्ध झाले. महाराजांनी अर्धी लढाई तर इथेच जिंकली होती.

अबुल हसन कुतुबशहा ऊर्फ तानाशहा हा एक सुखलोलुप बादशहा होता. तो शिया पंथाचा असल्याने आदिलशाही सुलतानांसारखा किंवा मोगल बादशहांसारखा कट्टरधर्मीय नव्हता. मादण्णाने त्याला सर्व गोष्टी आधीच नीट समजावून सांगितल्यामुळे महाराजांच्या उद्दिष्टाबद्दल त्याला कोणताही संशय नव्हता. महाराज समारंभाने वाड्यात आले, त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. प्रमुख मंडळींच्या तानाशहाशी ओळखी करून देण्यात आल्या. गेली दोन-अडीच दशके आदिलशाही आणि मोगलांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या राजांबद्दल त्याला आदर होताच, परंतु इतर सरदारांच्या पराक्रमाचेही त्याला कौतुक होते. नजराण्यांची देवाण-घेवाण झाली. दोघांची भेट व चर्चा तीन तास चालली. परत जाताना गरिबांना द्रव्य उधळीत महाराज आपल्या निवासस्थानी परत गेले.

दोन दिवसांच्या चर्चेनंतर दोघांच्यात झालेल्या गुप्त कराराची कलमे पुढीलप्रमाणे होती :

१. तानाशहाने राजांना फौजेच्या खर्चासाठी दररोज ३००० होन द्यावेत.

२. कुतुबशाहीचा सेनापती मिर्झा महंमद अमीन याच्याबरोबर पाच हजारांची फौज आणि तोफखाना महाराजांच्या मदतीला द्यावा.

३. शिवाजी महाराजांनी कर्नाटकाचा प्रांत जिंकावा. त्यापैकी पूर्वी शहाजीराजांच्या ताब्यातील असलेला प्रदेश स्वत:कडे ठेवावा आणि उरलेला कुतुबशहाला द्यावा.

४. उभयतांनी मिळून मोगल हल्ल्यांचे निवारण करावे, त्यासाठी महाराजांचा एक वकील कायमस्वरूपी भागानगरात राहावा.

५. शहाने दरसाल खंडणीदाखल एक लाख होन महाराजांना द्यावे.३४

दक्षिणेत मोहीम

तहावर सह्या झाल्यावर महाराजांनी बाजी घोरपडेचा पुत्र मालोजी याला पत्र लिहून जुने वैर


सोडून मैत्रीसंबंध प्रस्थापित करण्यासाठी पत्र धाडले. त्याला मालोजीने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि तो फौजेसह महाराजांना येऊन मिळाला. हैदराबादेत पाऊण महिना राहून महाराज दोन्ही फौजांसह दक्षिणेकडे १० मार्च १६७७ला निघाले. (नकाशा क्र. ३० पाहा.) त्यांच्याबरोबर मिर्झा महंमद अमीनच्या हाताखालील गोवळकोंड्याच्या सैन्यासह एकूण १६,००० स्वार आणि ३२,००० पायदळ होते; त्याशिवाय त्यांनी जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था ठेवण्यासाठी मोठ्या संख्येत मुलकी अधिकारी बरोबर घेतले होते. मार्टिन नावाच्या एक तत्कालीन फ्रेंच प्रवाशानुसार त्यांची संख्या २,००,००० च्या घरात होती३५; परंतु ती अतिशयोक्ती वाटते. ती सोडली, तरीही राजांचा दक्षिणेवर अंमल स्थापन करण्याचा निर्धार त्यामागे स्पष्ट दिसत होता. बहलोलखानाने दक्षिणेतील सत्ताधीशांच्या मदतीसाठी कुमक पाठवण्यास प्रतिबंध करण्यासाठी मादण्णा आणि गोवळकोंडा सैन्याचा सरदार इब्राहिम खान हे दोघे मोठ्या सैन्यासह विजापूरच्या दिशेला चालून गेले.

प्रथम गोवळकोंड्यापासून १२० मैलांच्या अंतरावर असलेल्या कुर्नूलला पोचल्यावर त्या शहरातून सैन्याने पाच लाख होनांची खंडणी वसूल केली. तिथून महाराज आत्मकुरला गेले आणि नंतर कृष्णा-तुंगभद्रेच्या संगमावर असलेल्या श्रीसैलम या रम्य धर्मस्थानी जाऊन १० दिवस राहिले व आत्मकुरला परतले. तोपर्यंत त्यांच्या बरोबरील सैन्यही दोन्ही नद्या पार करून आत्मकुरला पोचले होते. तिथून एप्रिलच्या आठवड्यात निघून ते नंदियाल व कडप्पामार्गे तिरुपतीला पोचले. तिथे देवाची पूजा करून महाराज मद्रासला मे १६७७मध्ये पोचले.

नकाशा क्र. ३०

दक्षिणेतील मोहीम

मार्च १६७७



हा नकाशा प्रमाणबद्ध नाही.

जिंजीचा किल्ला नासिर महंमदच्या हातात होता. हा नासिर महंमद विजापूरचा आधीचा वझीर खवासखान याचा भाऊ होता. बहलोलखानाने त्याचा वध करवला होता. त्यामुळे नासिर महंमदला बहलोलखानाच्या वझिरीच्या काळात आपल्या भविष्याची काहीच खातरी नव्हती. आपणही पठाणांकडून एक दिवस मारले जाण्याचे भय त्याला नेहमी वाटत असे. म्हणून शिवाजी महाराजांनी तिथे येऊन आपल्याला योग्य अशी भरपाई दिली आणि भविष्यात आपल्या सुरक्षिततेची हमी दिली, तर तो जिंजीचा किल्ला त्यांच्या हवाली करायला तयार होता. त्याची ही मागणी कळल्यावर शिवाजी महाराजांनी तिथे आपला वकील पाठवून त्याला ५०,००० होन रोख आणि एक लाख रुपयाची जहागीर देण्याची तयारी दाखवली. त्याला हा सौदा मान्य होता. त्याने १३ मेला किल्ला मराठ्यांच्या हवाली केला. महाराजांनी तिथे रायाजी नलगे याची किल्लेदार म्हणून नेमणूक केली.३६

त्या भागातील दुसरा किल्ला होता वेल्लोर येथील. तिथे अब्दुल्लाखान नावाचा हबशी किल्लेदार होता, परंतु तो सहजासहजी किल्ला सोडायला तयार नव्हता. शिवाजी महाराजांनी त्याला २३ मे रोजी वेढा घातला आणि गोवळकोंड्याच्या तोफखान्यातील तोफांचा मारा किल्ल्याच्या तटबंदीवर सुरू केला. त्या किल्ल्याभोवती एक खंदक खोदलेला होता आणि तो पाण्याने भरलेला होता. त्या पाण्यात मगरी सोडण्यात आल्या होत्या. त्यामुळे हल्ला चढवून तो किल्ला घेणे शक्य नव्हते. अभेद्य वेढा घालून आतील शत्रू उपासमारीमुळे शरण येण्याची वाट पाहण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता आणि हे वेळखाऊ काम होते. किल्ल्याजवळ दोन टेकड्या होत्या. त्यांच्यावरून गोळाफेक चालू राहिली. महाराजांनी तिथे नरहरी रुद्र या सरदाराच्या हाताखाली २,००० स्वार आणि ५,००० पायदळाचे सैनिक सोडले आणि वेढा कायम ठेवण्याचे आदेश देऊन ते पुढे गेले. वेल्लोरचा किल्ला दोन महिन्यांनी २२ जुलैला पडला.

वेलीगंदपुरमचा प्रमुख शेरखान लोदी हा महाराजांना आडवा येणारा तिसरा सरदार होता. परंतु तो मूळचा मुलकी अधिकारी होता. शिवाजी महाराज वेल्लोरला होते, तेव्हा शेरखान कुडालुरच्या १३ मैल पश्चिमेला असलेल्या तिरुवडीला होता. शिवाजी महाराज तिथे २६ जूनला ६,००० स्वारांबरोबर पोचले. शेरखान त्यांना ९,००० स्वार आणि ३,०००च्या पायदळानिशी सामोरा आला. महाराजांना वाटले की, त्या संख्याधिक्यामुळे शेरखान हल्ला चढवेल. पण घडले उलटेच. मराठा सैन्याला पाहून त्याने पळ काढला आणि किल्ल्यात जाऊन आश्रय घेतला. तो रात्री बाहेर पडला आणि तिथून २२ मैल असलेल्या भुवनगिरी किल्ल्याला पोचला. मराठ्यांनी ५०० घोडे, दोन हत्ती आणि बरेच सामान जप्त केले. महाराजांनी निकटचे किल्ले जिंकून घेतले. ५ जुलैला शेरखान शरण आला. महाराजांनी २०,००० होनांची खंडणी त्याच्याकडून घेतली.

महाराज पुढे तंजावरच्या उत्तरेला १० मैल कोलेरून नदीच्या तीरावरील तिरुमलवदाला गेले. तिथे छावणीत त्यांना त्यांचे बंधू व्यंकोजी येऊन भेटले. दोघे बंधू प्रथमच भेटत होते. महाराज मोठ्या भावाच्या प्रेमाने त्यांच्याशी बोलले. मालमत्तेच्या वाटणीबाबत दोघांच्यात चर्चा झाली, परंतु त्यातून काही निष्पन्न झाले नाही. एके दिवशी काही न सांगताच व्यंकोजी अचानक तिथून निघून गेले.

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची डागडुजी करण्यासाठी मद्रासमध्ये इंग्रजांकडून स्फोटके वापरण्यात तरबेज असलेल्या काही कारागिरांची मागणी केली, परंतु आपल्याकडे असले लोक उपलब्ध नसल्याचे सांगून इंग्रजांनी टाळले. मग महाराजांनी स्वत: जिंजी किल्ला बळकट करण्यासाठी सूचना देऊन किल्ल्यात सुधारणा केली. त्यानंतर जिंजी किल्ला दक्षिणेतील सर्वांत अभेद्य आणि बळकट किल्ला झाला. (खूप पुढे त्यांचे पुत्र राजाराम मोगलांच्या ससेमिऱ्यापासून वाचण्यासाठी तिथे येऊन राहिले होते.) महाराजांना किल्लेबांधणीबद्दल विशेष ज्ञान होते. त्यांनी दक्षिणेतील अनेक किल्ल्यांना बळकटी आणण्याचे प्रकल्प सुरू केले आणि पार पाडले.

त्यानंतर महाराजांनी त्यांचे लोक चिदंबरम, वृंदाचलम व कावेरीपट्टणम वगैरे जागी नेमले. नंतर ते बंगरूळला पोचले. त्यांनी ऑक्टोबर १६७७मध्ये होसूर, कोलार आणि अर्णीचा किल्ला घेतला. बंगलोरला त्यांनी रघुनाथपंत हणमंत्ये यांची सुभेदार म्हणून नेमणूक केली.

१६७७च्या ऑगस्टपर्यंत शिवाजी महाराजांनी कावेरी नदीच्या उत्तरेकडील १०,००० चौरस मैल प्रदेश काबीज केला होता. त्यातून २० लाख होन वसुली दरवर्षी मिळणार होती. त्यांचे बंधू व्यंकोजी यांनी नोव्हेंबर १६७७मध्ये अंबोरियाजवळ महाराजांच्या शिबंदीवर हल्ला चढवला. त्याला संताजीने कडवा प्रतिसाद दिला आणि त्यांचे १०,००० घोडे पकडले. महाराजांनी व्यंकोजींना पत्र लिहून समजावले. पठाण व तुर्कांची बाजू सोडण्याचा महाराजांनी त्यांना सल्ला दिला. वडलांच्या जहागिरीत अर्धा हिश्याक च्या बदल्यात व्यंकोजीना तीन लाखांची जहागीर देण्याचा शिवाजी महाराजांनी प्रस्ताव दिला. त्यांनी व्यंकोजींना जिंजीजवळ ७ लाख होन वार्षिक वसुलीची जमीन दिली. आपल्या वहिनींनाही महाराजांनी बंगरूळ, होस्कोट आणि सिरा भेटीदाखल दिले.३७

रघुनाथपंत हणमंत्ये हा एक कुशल आणि अनुभवी कारभारी होता, त्याने नऊ-दहा वर्षे व्यंकोजींचे राज्य अत्यंत समर्थपणे चालवले होते. महाराजांनी त्याला मराठ्यांनी जिंकलेल्या दक्षिणेतील प्रदेशाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी दिली. त्याला लष्करी साहाय्य देण्यासाठी त्याच्याबरोबर आपला सरनोबत मागे सोडण्याचे महाराजांनी ठरवले. हे दोघे कर्तबगार व कसलेले सरदार दक्षिणेतील राज्याची व्यवस्था चांगली ठेवतील, याची महाराजांना खातरी होती. त्यानंतर राजे १६७८च्या आरंभी प्रथम पन्हाळ्याला आले आणि नंतर जून १६७८मध्ये रायगडावर परतले.

आदिलशाहीत उलथापालथ

बहलोलखान हा वझीर झाल्यावर स्वत: व बहलोल हे दोघेही पठाण असल्याचा फायदा घेऊन दिलेरखानाने आदिलशाहीत मोगलांचा घोडा पुढे दामटायचे योजले. ही युती आदिलशाहीतील दख्खनी मुसलमानांच्या पथ्यावर पडणे कदापि शक्य नव्हते. दिलेरखानाने गुलबर्गा किल्ल्यावर हल्ला चढवला आणि जुलै १६७७मध्ये तो काबीज केला. त्याने ही खुशखबर औरंगजेबाला कळवल्यावर बादशहाने त्याची पाठ थोपटण्याऐवजी शिवाजी महाराजांना आपल्या प्रांतातून दक्षिणेस जाण्याची मुभा दिल्याबद्दल तानाशहाकडून एक करोड रुपये व १०,००० घोड्यांची

मागणी करण्याचा दिलेरखानाला आदेश दिला. तानाशहाने औरंगजेबाच्या आदेशाची तामिली करणे अर्थातच शक्य नव्हते. त्याच्याकडून नकार आल्यावर दिलेरखानाने गोवळकोंड्यावर चाल केली.

दिलेरखानाशी झुंज घेण्यासाठी गोवळकोंडा आणि आदिलशाहीतील दख्खनी सरदार एकजूट झाले. पुढे झालेल्या लढाईत दिलेरखानाचा पराभव झाला आणि त्याने तिथून १६० मैलांवर असलेल्या नळदुर्ग किल्ल्यात आश्रय घेतला. बहलोलखान १६७७च्या डिसेंबरमध्ये मरण पावला. जमशेदखान हंगामी वझीर झाला, परंतु त्याला त्या पदात स्वारस्य नव्हते. कोणीही त्याला भरपूर पैसा दिला, तर ते पद त्याला सुपूर्द करायची त्याची तयारी होती. त्यावेळी सरनोबत हंबीरराव मोहिते कर्नाटकात होते, परंतु त्यांच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. ही सुवर्णसंधी हुकली. नाहीतर त्याच वेळी आदिलशाही महाराजांच्या ताब्यात आली असती, याची शक्यता नाकारता येणार नाही. मसूदखान नावाच्या एका दख्खनी सरदाराने तानाशहाच्या मदतीने ६ लाख होन जमा केले आणि २१ फेब्रुवारी १६७८ला तो विजापूरचा वझीर झाला.३८

अखेरचा प्रहार

संभाजीराजांशी गृहकलह

दक्षिणेत जाताना महाराजांनी आपले ज्येष्ठ पुत्र संभाजीराजांना राजधानीपासून शक्यतो दूर ठेवण्यासाठी कोकणातील शृंगारपूर येथे ठेवले होते. संभाजीराजांना सप्टेंबर १६७७मध्ये कन्यारत्नाचा लाभ झाला. तरीही त्यांच्या वर्तनाबाबत तक्रारी महाराजांपर्यंत पोचतच राहिल्या. म्हणून महाराजांनी त्यांना सज्जनगडावर राहण्यास पाठवले. दुर्दैवाने पिता-पुत्रांमधील गैरसमज वाढतच गेले. संभाजीराजांना वाटे की, त्यांचे बंधू राजारामराजे यांना आपल्याऐवजी सिंहासनावर बसवण्याचा महाराजांचा विचार आहे. संभाजीराजांना दक्षिणेतील राज्य देण्याचे संकेत महाराजांनी दिले होते; परंतु त्यांना संपूर्ण राज्य पाहिजे होते.

या असुरक्षिततेच्या भावनेमुळे संभाजीराजांनी मोगलांचा सुभेदार दिलेरखान याच्याशी संपर्क प्रस्थापित केला. दिलेरखान या संधीची वाटच पाहत होता. १६७८च्या डिसेंबर महिन्यात संभाजीराजे पत्नी आणि पुत्रीसह सज्जनगडावरून निघून मोगलांच्या छावणीमध्ये पोचले. दिलेरखानाने त्यांना ७,०००ची मनसबदारी दिली. ही बातमी ऐकून महाराज सुन्न झाले.

एप्रिल १६७९मध्ये संभाजीराजांसह विजापूरवर चढाई करण्यासाठी जात असता वाटेत साताऱ्याजवळील भूपाळगडावर दिलेरखान चालून गेला. तिथे मराठ्यांची पुष्कळ संपत्ती व अनेक घरंदाज मराठ्यांचे कबिले चांगल्या बंदोबस्तात ठेवले होते. मोगलांच्या तुकडीचे नेतृत्व संभाजीराजे करीत होते. गडावरील किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने खुद्द संभाजीराजेच चालून येताना पाहिल्यावर आरंभी शत्रूवर गोळाफेक केली नाही. तुंबळ लढाईनंतर २ एप्रिल १६७९ला भूपाळगड मोगलांच्या हातात पडला. त्यानंतर १८ ऑगस्ट १६७९ रोजी धूळखेड येथे भीमा उतरून दिलेरखान संभाजीराजांना बरोबर घेऊन विजापूरवर चालून गेला.

अखेरचा प्रहार

आदिलशाहीचा वझीर मसूदखान दख्खनी मुसलमानांचा प्रतिनिधी असल्याने त्याला बाकी मोगलधार्जिण्या सरदारांकडून बराच विरोध व हेवादाव्यांचा सामना करावा लागत होता. शिवाजी महाराजांना याबद्दल जाण होती. आदिलशाही दरबारात दख्खनी मुसलमानांचे वर्चस्व असणे हे स्वराज्याच्या दृष्टीने हिताचे होते. महाराजांनी २६

ऑगस्ट १६७९ला तहाचा एक प्रस्ताव घेऊन वकील पाठवला. मराठ्यांनी काबीज केलेला दक्षिणेतील प्रदेश त्यांच्याकडे राहू देण्याला मान्यता दिली, तर विजापूरला कोणतीही मदत देण्याची त्यांनी हमी दिली होती. त्याच सुमारास दिलेरखानाने मंगळवेढे काबीज केले, तो विजापूरला पोचला आणि किल्ल्याला वेढा घातला. मसूद खान घाबरला. दख्खनी सरदारांनी शिवाजी महाराजांची मदत मागितली. महाराजांनी त्यांना आश्वासन दिले, 'तुम्ही बिल्कुल धास्त बाळगू नका, मी खानाचा पुरता समाचार घेतो.'३९

महाराजांपुढे दोन पर्याय होते. एक, दिलेरखानावर विजापूरला चालून जायचे व त्याचा वेढा तोडायचा आणि दुसरा, मोगल प्रदेशाच्या संवेदनशील अंतर्भागात हल्ले चढवून दिलेरखानाला बेजार करायचे आणि विजापूरवरील वेढा उठवून आपल्यामागे धावायला भाग पडायचे. महाराजांनी दुसरा पर्याय अवलंबण्याचा निर्णय घेतला. राजे विजापूरजवळ ३१ ऑक्टोबरला पोचले. प्रथम मसूदखानाला भेटण्याचा त्यांचा विचार होता. परंतु दगाफटका होण्याच्या सहकाऱ्यांच्या सूचनेला मान देऊन तो विचार सोडून ते ४ नोव्हेंबरला तिथून निघाले.

दिलेरखानाने जिथे भीमा ओलांडली होती, त्याच्या थोडे अलीकडेच महाराजांनी आपल्या सैन्यासह ती नदी ओलांडली आणि जालन्याच्या दिशेने वाटेत मोगल प्रदेश उद्ध्वस्त करत आगेकूच सुरू केली. जालना औरंगाबादपासून ३८ मैलांवर आहे. ते तिथे १६ नोव्हेंबरला पोचले. शहरात प्रचंड लुटालूट केली. त्यावेळी शहजादा मुअझ्झम औरंगाबादेत होता. महाराज जालन्यात चार दिवस राहिले. त्यानंतर ते नाशिकच्या २० मैल दक्षिणेला असलेल्या पट्टागड येथे गेले. तिथे त्यांनी मोगलांचा हल्ला परतवून लावला. त्यानंतर ते रायगडला गेले. दिलेरखानाला हल्ल्यांनी त्रस्त करण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या तुकड्या पाठवल्या होत्याच. तिकडे उत्तरेत मोरोपंत मोगल प्रदेशावर हल्ले चढवतच होते.

औरंगजेबाकडे या बातम्या पोचल्यावर त्याने संतापून दिलेरखानाला निरोप धाडला. आता आपण अधिक वेळ इथेच अडून राहिलो, तर मराठे आपला अधिकाधिक प्रदेश गिळंकृत करतील, या भीतीने दिलेरखानाने विजापूरचा वेढा उठवला आणि तो पन्हाळ्याच्या दिशेला रवाना झाला. अशा प्रकारे स्वराज्यस्थापनेच्या आरंभी आदिलशाहीने त्यांच्यावर नकळत केलेल्या उपकाराची जणू काय परतफेड करून महाराज परतले. त्यांची ही शेवटची मोहीम ठरली.

दिलेरखान संभाजीराजांसह विजापुराहून तिकोट्याला आला. तिथे त्याने अत्याचाराचे सत्र चालू केले. त्यानंतर अथणीवर धाड आली. अनेक हिंदुमुसलमान स्त्रियांनी आपली अब्रू वाचवण्यासाठी विहिरींत उड्या घेतल्या. हे सर्व पाहून संभाजीराजांना शिसारी आली आणि आपली चूक पटू लागली. त्यातच औरंगजेबाने आपल्याला कैद करून दिल्लीला पाठवण्याचा

हुकूम दिलेरखानाला दिल्याचे संभाजीराजांना कळले. ३० नोव्हेंबर १६७९च्या रात्री शिवाजी महाराजांनी गुप्तपणे धाडलेल्या हेरांबरोबर निघून संभाजीराजे ४ डिसेंबरला पन्हाळ्याला पोचले. आपले हातचे सावज सुटून गेल्यामुळे औरंगजेबाने दिलेरखानाला परत बोलावले. महाराजांनी दिलेरखानाच्या पुरंदर किल्ल्यावरील हल्ल्याचा पुरेपूर बदला घेतला होता, हे निश्चित!

लष्करी विलेषण

केवळ एका वर्षभराच्या अवधीत तुंगभद्रा आणि कावेरी या दोन नद्यांमधील दक्षिण भारताचा संपूर्ण प्रदेश काबीज करण्याच्या शिवाजी महाराजांच्या या मोहिमेला दक्षिणेचा दिग्विजय हे खरोखरच सार्थ नाव आहे. 'वेनी, विदी, विकी' ही

लॅटिनमधील उक्ती ज्युलिअस सीझर याच्या नावाशी जोडली गेली आहे. ख्रिस्तपूर्व ४७मध्ये पोंटसच्या फर्नासेस (दुसरा) याच्यावर झेलाच्या लढाईत त्याने जो वेगाने विजय मिळवला, त्याबद्दल रोमन सिनेटला पत्राने कळवताना त्याने या शब्दप्रचाराचा वापर केला होता. त्याचा अर्थ आहे, 'मी आलो, मी पाहिले आणि मी जिंकलो'. शिवाजी महाराजांच्या दक्षिण मोहिमेचेही ते समर्पक वर्णन ठरेल.

१६४४मध्ये आरंभ केलेला स्वराज्याचा प्रकल्प तीस वर्षांनंतर जवळजवळ पूर्ण झाला होता. मोगलशाहीशी दिलेला कट्टर लढा यशस्वी झाला होता, आदिलशाहीशी केलेला संघर्ष पूर्णतेला पोचला होता. वयाच्या चाळिशीतच त्यांनी राज्याभिषेक करून एका सम्राटाचे स्वरूप धारण केले होते. त्या राज्याचा विस्तार करून छत्रपती या बिरुदावलीचा मथितार्थ हिदुस्थानातील सर्व नरेशांपर्यंत पोचवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर राज्याचा विस्तार साधण्याची आवश्यरकता होती. त्यासाठी गोवळकोंडा आणि जिंजी-तंजावरचा सधन प्रांत अनुरूप होता. १६७२मध्ये कुतुबशाही आणि आदिलशाही या दोन्हींतही झालेल्या सत्ताबदलाने यासाठी उचित पार्श्वभूमी पुरवली होती. ते महत्कार्य महाराजांनी कुतुबशाहीतील मादण्णा आणि आदिलशाहीतील रघुनाथपंत हणमंत्ये या दोन विद्वान, कर्तबगार आणि अद्वितीय मुत्सद्दी कारभाऱ्यांच्या साहाय्याने लीलया साधले. किंबहुना महाराजांच्या सामरिक सामर्थ्याइतकेच या दोघांच्या मुत्सद्देगिरीलाही हा प्रकल्प तडीस नेण्यासाठी श्रेय दिले पाहिजे. महाराजांना हे दोघे अगदी उचित वेळी भेटले, हा कपिलाषष्ठीचा योगच म्हणावा लागेल.

दक्षिणेतील मोहिमेची वेगवेगळी उद्दिष्टे होती. पहिले, कुतुबशाहीचा सुलतान तानाशहाशी भेट घेऊन आदिलशाही आणि त्याच्या दक्षिणेचा मोगलांचा प्रदेश काबीज करण्यासाठी त्याची संमती आणि आर्थिक व लष्करी साहाय्य मिळवणे; दुसरे, शहाजीराजांनी जिंकलेला आदिलशाही आणि मोगल प्रदेशाचा पुनश्च ताबा मिळवणे आणि उरलेला भाग त्याला देण्याची लालूच दाखवून त्याचे साहाय्य मिळवणे; तिसरे, जिंकलेल्या प्रदेशातून प्रचंड खंडणी मिळवण्याबरोबरच कायमच्या वार्षिक करवसुलीचे नवीन स्रोत निर्माण करणे; चवथे, आपले बंधू व्यंकोजी यांची भेट घेऊन आपल्या पित्याच्या जहागिरीतील कायदेशीर हिस्सा त्याच्याकडे मागणे; पाचवे, नव्याने जिंकलेल्या प्रदेशाचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यपद्धती निर्माण

करणे; आणि सहावे, वृष्णा व गोदावरीदरम्यान मसूदखानाने दिलेल्या प्रदेशाचा ताबा घेणे आणि बदवर्तनी मियाना बंधूंना ताळ्यावर आणणे.

ही सहा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महाराजांनी अत्यंत बांधेसूद आणि सखोल आराखडा बनवला होता. तानाशहाच्या भेटीदरम्यान आपल्या सैन्याचे सकारात्मक प्रतिबिंब प्रक्षेपित करण्यासाठी त्यांनी सैनिकांचा गणवेश आणि शिस्तीबाबत विशेष परिश्रम घेतले होते. तानाशहाच्या भेटीत महाराजांच्या लष्करी कर्तृत्वाबद्दल त्याची खातरी झाली असावी; त्यामुळेच महाराजांसाठी हितकारक अशा सर्व अटी त्याने मान्य केल्या. मोहिमेच्या मार्गाची आखणी कौतुकास्पद होती. कर्नूल, कडप्पा, तिरुपती, मद्रास, अर्काट, जिंजी, तिरुवडी, तंजावर, वलगंदपुरम, होसुर, होस्कोट, बंगरूळ, सिरा या सर्व महत्त्वाच्या ठिकाणांतून तो मार्ग जात होता. ही शहरे आणि किल्ले घेतल्यावर संपूर्ण परिसरावर राजांचे प्रभुत्व प्रस्थापित होणार होते.

वाटेतील तीन किल्ले महाराजांनी वेगवेगळ्या मार्गांनी काबीज केले. जिंजीचा किल्ला बिनलढवता नासिर महंमद या किल्लेदाराने खंडणी घेऊन सुपूर्द केला, वेल्लोर दोन महिने वेढा घालून घ्यावा लागला, तर वेलीगंदपुरमचा किल्ला शेरखान या किल्लेदाराने त्याच्याकडे सरस संख्येची फौज असूनही महाराजांच्या बलिष्ठ सैन्याच्या भयाने देऊन टाकला. यात महाराजांच्या निर्णयशक्तीची लवचीकता तर दिसतेच, परंतु मराठा सैन्याच्या व्यावसायिकतेची महत्तासुद्धा पटते. याशिवाय होसूर, कोलार, आर्णी वगैरे आणखी काही किल्ले त्यांनी घेतले. किल्ले हे महाराजांच्या संरक्षणनीतीचे मर्मस्थान असल्याने त्या सर्व किल्ल्यांच्या डागडुजीसाठी आणि बळकटीसाठी त्यांनी विशेष व्यवस्था केली. या सर्व प्रदेशावर अंमल बसवण्यासाठी त्यांनी आपल्याबरोबर पुरेसे कारभारी नेले होते. त्यामुळे ते तिथून गेल्यावरही त्याच्यावर नियंत्रण राखले जाईल, याची त्यांनी खातरजमा केली होती. मियाना बंधूंवर हंबीरराव मोहित्यांनी मिळवलेला विजय हा मराठ्यांच्या नेहमीच्या पठडीतील होता. त्यासाठी महाराजांनी सरनोबतांना वेगळ्या मार्गाने आधीच रवाना केले होते.

विजापूरवर चालून जाणाऱ्या दिलेरखानाला धडा शिकवण्यासाठी महाराजांनी नेहमीप्रमाणेच ढकललेली लढाई टाळली. त्याच्यावर चालून जाण्यातील जीवहानी टाळण्यासाठी त्यांनी 'अप्रत्यक्ष रणनीती'चा (स्ट्रॅटेजी ऑफ इनडायरेक्ट ॲप्रोच) उपयोग केला. जिथे झालेली जखम असह्य ठरावी, अशा मोगल प्रदेशातील संवेदनशील जालना आणि अथणी भागावर हल्ले चढवून महाराजांनी दिलेरखानाला परत फिरणे भाग पाडले. आपल्या प्रदेशावर हल्ला करणाऱ्या शत्रूवर प्रतिहल्ला चढवण्याऐवजी त्याच्या संवेदनशील प्रदेशावर आपणच हल्ला चढवून नवीन आघाडी उघडायची आणि त्याला आपल्या प्रदेशावर हल्ला करण्यास परावृत्त करून आपल्यामागे यावयास लावायचे, या रणनीतीला लष्करी परिभाषेत 'रीकॉइल टेक्निक' असे म्हणतात. आधुनिक काळात वापरल्या जाणाऱ्या या रणनीतीचा राजांनी साडेतीन शतकांपूर्वी सफाईने प्रयोग करावा, हे कौतुकास्पद आहे.

ज्यात राजांची सर्व लष्करी व आर्थिक उद्दिष्टे सफल झाली आणि कोणत्याही ठिकाणी त्यांना अपयशाचा सामना करावा लागला नाही, अशी ही दक्षिणेवरील स्वारी.

अकाली झालेला सूर्यास्त

'आम्ही रायगडास जातो, राजारामांचे लग्न करून येतो. मग राज्यभाराचा विचार कर्तव्य तो करू. तुम्ही वडील पुत्र, सर्व प्रकारे भरवसा तुमचा', असे बोलून महाराज सज्जनगडावर समर्थांच्या भेटीस गेले. 'तीन दिवस समाधी लागोन राजेश्री बसले होते.' ७ मार्च १६८०ला राजारामराजांची मुंज झाली. त्यानंतर आठ दिवसांनी प्रतापराव गुजरांच्या मुलीशी रामराजांचे लग्न झाले. नंतर आठ दिवसांनी २३ मार्च रोजी 'राजांस ज्वराची व्यथा जाहली. आयुष्याची मर्यादा झाली हे कळून चुकले. मातब्बर लोक जवळ बोलावून आणिले. शरीर क्षीण देखून पन्हाळ्यावरी संभाजीराजांस सांगून पाठवले..... शके १६०२ रौद्र संवत्सरी शनिवार चैत्रशुद्ध पूर्णिमा (४ एप्रिल १६८०) दोन प्रहरी रायगडी काळ जाहला'.४०

स्वराज्याच्या वैभवाच्या ऐन मध्यान्हीच त्यावर सदैव तळपणारा सूर्य अकाली अस्ताला गेला. सर्वत्र अंध:कार झाला. सारे स्वराज्य अचानक पोरके झाले. हा अलौकिक निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू, अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंत योगी कायमचा अस्तंगत झाला. असा यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवंत वरदवंत, नीतिवंत, पुण्यवंत, जाणता राजा पुन्हा होणे नाही!

संदर्भसूची

१. आर डी पळसोकर; शिवाजी द ग्रेट गुरीला, स्वयंप्रकाशित; पान ३.

२. शशिकांत पित्रे, या सम हा, राजहंस प्रकाशन; पान १८४.

३. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत, खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान २१२; उद्धृत शिवकालीन पत्रसार संग्रह (शि.प.सा.सं.) खंड१, पत्र ८७४.

४. गो.स. सरदेसाई; मराठी........., पान २१०.

५. पुर्वोक्त; पान २२२; उद्धृत शि.प.सा.सं. पत्र ९५९; सभासद बखर पान ६५-६६.

६. पुर्वोक्त; पान २२३; उद्धृत शि.प.सा.सं. पत्र १०४१.

७. पुर्वोक्त; पान २२५.

८. सचिन पेंडसे; मराठा आरमार; मर्वेन टेक्नोलॉजीज, पान ४१; उद्धृत स. शं. देसाई, पोर्तुगीज-मराठा संबंध पान २८५.

९. पुर्वोक्त; पान ४०; उद्धृत द. ब. पारसनीस, मराठ्यांचे आरमार, १९०४.

१०. गो.स. सरदेसाई; मराठी ......; पान २०८; उधृक्त शि.प.सा.सं. पत्र ८५७,८७१.

११. शशिकांत पित्रे; ॲडमिरल सोमण; राजहंस प्रकाशन; पान १-२.

१२. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी सिस्टिम ऑफ मराठाज; के. पी. बागची अँड कंपनी; पान १५२; उद्धृत सुरत वखारीतील नोंदी, खंड ८९; पान ६९-७०.

१३. सचिन पेंडसे; मराठा ....; पान ३२.

१४. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी ....; पान १५६-५८.

१५. पुर्वोक्त; पान १५७.

१६. सचिन पेंडसे,........ पान ३९; उद्धृत द. ब. पारसनीस, मराठ्यांचे आरमार, पान २१.

१७. पुर्वोक्त; पान ३९.

१८. पुर्वोक्त; पान ५२; उद्धृत स. शं. देसाई, पोर्तुगीज मराठा संबंध पान ५५.

१९. पुर्वोक्त; पान ५५; उद्धृत एफ आर फोर्ट सेंट जॉर्ज खंड २८; पान ७-३८.

२०. पुर्वोक्त; पान ५५; उद्धृत स. शं. देसाई, पोर्तुगीज मराठा संबंध पान ६७.

२१. सुरेंद्रनाथ सेन; द मिलिटरी ....; पान १६२.

२२. सचिन पेंडसे; ....; पान ५१; उद्धृत ग. भा. मेहेंदळे, शिवछत्रपतींचे आरमार पान ५३-५४.

२३. श्रीनिवास सामंत, वेध महामानवाचा; देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स; पान ३२५.

२४. पुर्वोक्त; पान ३२६.

२५. पुर्वोक्त; पान ३३५.

२६. पुर्वोक्त; पान ३३९.

२७. सुरेंद्रनाथ सेन, द मिलिटरी ....; पान १६७; उद्धृत सुरत वखारीतील नोंदी, खंड ४, भाग २ ; पान ६३-६४.

२८. पुर्वोक्त; पान १६३; उद्धृत सुरत वखारीतील नोंदी, खंड १०८, पान ४४-४८.

२९. शशिकांत पित्रे, ॲडमिरल सोमण; ......; पान २.

३०. विजय देशमुख; शककर्ते शिवाजी; खंड २; छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन; पान २४३; उद्धृत शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीसवृत); पान २१४.

३१. गो.स. सरदेसाई, मराठी .....,..; पान २९४.

३२. पुर्वोक्त; पान ३१३. उद्धृत मार्टिनची पत्रे.

३३. पुर्वोक्त; पान ३१५-१६; उद्धृत ब्रिटिश म्युझिअम रिव्ह्यू १६४१नंबरच्या फारशी पत्रावरून.

३४. पुर्वोक्त; पान ३१७.

३५. आर डी पळसोकर; शिवाजी ....; पान २२१.

३६. पुर्वोक्त; पान २२२.

३७. पुर्वोक्त; पान २२५.

३८. पुर्वोक्त; पान २२६.

३९. गो. स. सरदेसाई; मराठी..........; पान ३३७.

४०. पुर्वोक्त; पान ३४३.

८.

जयतु शिवाजी, जयतु शिवाजी!



नेतृत्व

सेनापतीची नेतृत्वक्षमता

नेतृत्व ही एक उत्तुंग आणि प्रगल्भ कल्पना आहे. अश्ममयुगापासून आजपावेतो मानवाच्या प्रगतीचे श्रेय सर्वांत अधिक एखाद्या घटकाला द्यायचे असेल, तर तो घटक आहे माणसाची नेतृत्व प्रवृत्ती. कोणत्याही प्राण्यांच्या कळपात एक नायक स्पष्ट उठून दिसतो; पण त्याचे ते स्थान तो केवळ बाहुबलाने प्राप्त करतो. मानवी नेतृत्व मात्र अनेक गुणांचे एक प्रभावी रसायन आहे. क्षमता आणि प्रतिभा यांचा तो सुरेख संगम आहे. प्रत्येक संघटनेचा तो स्थायिभाव आहे, ऊर्जेचा मूलस्रोत आहे. नेतृत्व हे शास्त्रही आहे आणि कलाही आहे. आव्हान ही नेतृत्वाची जननी आहे आणि आव्हानाची चरम सीमा म्हणजे रणांगण. म्हणूनच सेनापतीची रणांगणातील नेतृत्वशक्ती हा नेतृत्वप्रवृत्तीचा मुकुटमणी म्हटला पाहिजे. लढाई जिंकण्यात त्याचा सिंहाचा वाटा असतो.

लष्करी नेतृत्व म्हणजे यशस्वी होतील, अशा डावपेचांची आखणी करण्याची क्षमता आणि कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत आपल्या सहकाऱ्यांचा आणि सैनिकांचा स्वखुशीने सहभाग साधून आपले उद्दिष्ट प्राप्त करण्याची निसर्गदत्त प्रतिभा! सेनापतीमध्ये दोन क्षमता असण्याची आवश्य कता आहे. पहिली म्हणजे सर्वंकष विलेषणानंतर यशस्वी होण्याची बहुतांशी शक्यता असलेली योजना बनवण्याची क्षमता. शत्रूची संख्या, त्याच्या सामर्थ्याचे आणि उणिवांचे तर्कनिष्ठ विलेषण, भूभागाची रचना, ऋतुसमय आणि इतर नैसर्गिक घटकांचा लढ्यावर होऊ शकणारा परिणाम, आपल्या सेनेचे शस्त्रबळ आणि संख्याबळ, लढाईची सद्यस्थिती, काळवेळ आणि शत्रूला चीतपट करण्यासाठी आपल्याजवळ उपलब्ध असलेला कालावधी, शत्रूला विस्मयचकित करून गाफील अवस्थेत पकडण्यासाठी आपण वापरू शकू अशा नवनव्या क्लृप्त्या या विविध घटकांचा सारासार विचार करून आपले उद्दिष्ट साधण्यासाठी आपल्या कुवतीत असलेली सहज आणि सोपी योजना बनवण्याची क्षमता सेनापतीमध्ये असली पाहिजे. याचबरोबर यशासाठी तितकीच महत्त्वाची दुसरी क्षमता म्हणजे ती योजना आपल्या सरदारांच्या आणि सैनिकांच्या साहाय्याने तडीस नेण्याचे कर्तृत्व सेनापतीमध्ये असले पाहिजे. त्यासाठी त्याच्या सरदारांचा आणि सैनिकांचा त्याच्यावर दृढ विश्वास असणे आणि कोणत्याही परिस्थितीत तो यशस्वी होईल, अशी भावना त्यांच्या मनात

ठाम रुळलेली असणे आवश्ययक आहे.

नि:स्वार्थीपणा, निर्णयशक्ती आणि ज्ञान हे सेनापतीच्या नेतृत्वशक्तीचे तीन प्रमुख घटक असतात.

नि:स्वार्थीपणा हा सक्षम आणि परिणामकारक नेतृत्वाचा आत्मा आहे. सेनापतीला त्याच्या सैनिकांच्या आवश्य्कता आपल्या आधी पुऱ्या करण्याची जाणीव असणे आणि त्याच्या अभिलाषांना सदसद्विवेकबुद्धीची झालर असणे आवश्याक आहे.

निर्णयशक्ती हा सेनापतीच्या नेतृत्वाचा दुसरा घटक. त्याचे तीन पैलू असतात. निर्णय घेण्याचे नीतिधैर्य, तो तडीस नेण्याची इच्छाशक्ती व चिकाटी आणि पुढाकार घेण्याची आत्मप्रवृत्ती. निर्णय चुकीचा ठरेल, या भीतीने अनेक लोक निर्णय घेणे टाळतात किंवा तो पुढे ढकलतात. थोडाफार चुकीचा का असेना, पण तो निर्णय वेळीच घेणे आवश्यतक असते. लढाईदरम्यान अस्थिर परिस्थितीत तत्काळ व सुज्ञ निर्णय घेणे ही सेनापतीची खरी कसोटी. एकदा निर्णय घेतल्यावर त्याची सातत्याने अंमलबजावणी करणे हा त्याचा दुसरा भाग. कोणत्याही हालचालीत आघाडीवर राहणे, आपणहून जबाबदारीची धुरा उचलणे, नवनव्या कल्पना आणि उपाय शोधून काढणे आणि ते कार्यान्वित करण्याचे धाडस दाखवणे ही धमक म्हणजे पुढाकार वृत्ती.

सेनापतीच्या ज्ञानाचे तीन पैलू; त्याचे व्यावसायिक नैपुण्य, आपल्या सहकाऱ्यांच्या व सैनिकांच्या क्षमतेचे सखोल आकलन आणि स्वत:च्या क्षमता व वैगुण्यांची पूर्ण जाणीव. स्वत:ची फसवणूक करणारा सेनापती युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगी हमखास अपयशी ठरतो. सैनिकाइतकीच शारीरिक क्षमता, कणखरता आणि बेडरपणा त्याच्यात असणे आवश्याक असते.

उत्तम सेनापतीच्या स्वभावगुणांची सर्वसमावेशक जंत्री करायची म्हटली तर अशी असेल: राजबिंडे स्वरूप, हिंमत, निर्णयशक्ती, विश्वासार्हता, चिकाटी, उत्साह, पुढाकारवृत्ती, जोश, ज्ञान, न्यायबुद्धी, सदसद्विवेकबुद्धी, व्यवहारचातुर्य आणि नि:स्वार्थबुद्धी!१

आठवावे रूप

आपले अधिकारी आणि सैनिक यांना मंत्रमुग्ध करणारे व्यक्तिमत्त्व ही अलौकिक लष्करी नेतृत्वाची खासियत आहे. सैनिकांना मंत्रमुग्ध करणारे आकर्षण करिष्मा ही शिवाजीराजांना देवदत्त देणगी होती. त्यांचे राजबिंडे आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व, गौर वर्ण, मध्यम बांधा, प्रमाणबद्ध अवयव, तीक्ष्ण व घेरून टाकणारी नजर, अंगयष्टीची चपळाई, चेहऱ्यावर मृदू हास्य या सर्वांची सैनिकांवर गहिरी छाप पडे. सुमारे ६०-६५ किलोग्राम (१३५ पाउंड) वजनाच्या त्यांच्या देहावर इतर राजांप्रमाणे अनावश्यनक स्थूलतेचा थोडाही अंश नव्हता. त्यांच्या निरामय व निकोप आरोग्याची आणि कमावलेल्या शरिराची पाहता क्षणी कल्पना येत असे. दुसऱ्यावर छाप बसावी, असे तेज त्यांच्या चेहऱ्यावर सदैव विलसत असे. त्यांची तीव्र बुद्धी आणि बोलण्यातील कुशलतेची लागलीच प्रचीती येत असे.

त्यावेळच्या वेगवेगळ्या चित्रकारांनी केलेली त्यांची काही चित्रे उपलब्ध आहेत. त्यांत शिवाजीराजांच्या विशाल भालप्रदेशावरून त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेची प्रचीती येते. गरुडाच्या

चोचीसारखे नाक त्यांचा दृढ विश्वास, निश्चय आणि निग्रह प्रकट करते. त्यांच्या तीक्ष्ण डोळ्यांतून मनाचा निर्मळपणा, चिंतनशीलता आणि स्फूर्ती दृष्टोत्पत्तीस येते. त्यांची दाढी, त्यांनी परिधान केलेला पायघोळ अंगरखा आणि ऐटबाज पगडी त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वाची साक्ष पटवते. त्यांना पाहून खऱ्याखुऱ्या राजाच्या राजसी व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येतो.२

ज्या वेगवेगळ्या परदेशी व्यक्तींनी त्यांना प्रत्यक्ष पाहून त्यांचे वर्णन केले आहे, त्यावरूनही राजांच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा निर्वाळा मिळतो. १६६४ मध्ये राजांनी सुरतेवर हल्ला केला होता, त्यावेळी त्यांना पाहून अँथोनी स्मिथ याने लिहिले आहे : 'राजे मध्यम उंचीचे, रेखीव बांध्याचे व चपळ आहेत. ज्यावेळी ते बोलतात, त्यावेळी ते स्मितहास्य करीत असल्यासारखे दिसतात. त्यांचे नेत्र विशाल, तेजस्वी असून दृष्टी तीक्ष्ण आहे. इतर मराठ्यांपेक्षा वर्ण गौर आहे'.३ हेन्री ऑक्झेंडन हा इंग्रज कारखानदार त्यांना राज्याभिषेकाच्या समारंभात ६ जून १६७४ रोजी भेटला. त्याने लिहिले आहे : 'चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानाने गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब, बाकदार व जरा खाली आलेले, दाढी कापून हनुवटीचे खाली टोकदार केलेली, मिशी बारीक असून, मुद्रेत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात.'४ कॉस्म द

गार्द्र या प्रसिद्ध फ्रेंच इतिहासकाराने १६९५ मध्ये, म्हणजे ऐकिवातून, लिहिले आहे, 'राजांचा चेहरा मोहक होता. निसर्गाने त्यांना दिलेली असावी, अशी चेहरपट्टी होती. विशेषत: त्यांचे काळेभोर व विशाल नेत्र एवढे तेजस्वी होते की, जणू त्यातून अग्निस्फुल्लंग बाहेर पडत आहेत, असे वाटावे.'५

राजे आपल्या साध्या राहणीकरवी इतरांनाही तसे राहण्यास भाग पडत असत. खऱ्याखोट्याची त्यांना उत्तम पारख होती. ते कोणाकडूनही फसले जात नसत. संकटात उडी घेण्यात ते कधीच कचरत नसत. जे नियम घालून देत, ते स्वत: पाळण्यात चुकत नसत. ते अंत:करणाचे क्रूर नव्हते, परंतु चुकीबद्दल कडक शासन करण्यास ते कधीही कचरत नसत. त्यांनी आपल्या आईच्या आज्ञेबाहेर कधीही पाऊल टाकले नाही. भूक-तहान सोसण्यात ते कमालीचे चिवट होते. या कामी अगदी शिपायांनाही त्यांची बरोबरी करता येत नसे. सौजन्याने, दक्षतेने व ममतेने सर्व लोकांची मने ते आकर्षून घेत. नीतीने ते खंबीर होते आणि त्यांना कोणतेही व्यसन नव्हते. धर्मावर त्यांची श्रद्धा परिपूर्ण होती. धर्मोन्नतीवर राष्ट्रोन्नती अवलंबून आहे, अशी समजूत त्यांच्या पत्रांत व अनेक प्रसंगांत व्यक्त झालेली दिसते.६

रामदासांनी राजांचे वर्णन करताना व्यक्तिविशेषांची अक्षरश: उधळण केली आहे. त्यात केवळ शाब्दिक अनुप्रास न शोधता त्या प्रत्येक शब्दात किती गहन अर्थ आणि वास्तव भरले आहे, याची अनुभूती करून घेणे आवश्यशक आहे. रामदास त्यांना 'निश्चयाचा महामेरू, बहुजनांस आधारू, अखंड स्थितीचा निर्धारू, नरपति, हयपति, गजपति, गडपति, यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत, जयवंत, आचारशील, विचारशील, दानशील, धर्मशील, सर्वज्ञपणे सुशील, धूर्त, तार्किक, सभानायक' म्हणतात. प्रत्येक विशेषण त्यांच्या बाबतीत तंतोतंत खरे आहे.

शिवाजीराजे सैनिकांच्या तोडीने घोडदौड करत, दीर्घ रपेटीनंतर त्यांच्यात भाकरतुकडा खात, रात्री आकाशाच्या छताखाली गाढ झोपी जात आणि शत्रूची चाहूल लागल्यावर सर्वांच्या आघाडीवर राहून त्याच्यावर तुटून पडत. आपला राजा आपल्याबरोबर जिवाची बाजी लावताना पाहून त्यांची छाती फुगून जाई आणि त्यांचा देशाभिमान आकाशाला पोचे. त्यांच्यावर आपल्या जिवाची कुरवंडी ओवाळून टाकण्यास ते सदैव तयार असत. शिवाजीराजे खरोखरच 'बारगीरांचे आणि मावळ्यांचे सेनापती' होते. 'सोल्जर्स जनरल' या लष्करी परिभाषेची परिसीमा यापेक्षा क्वचितच अधिक उंचावली असेल!

शिवाजीराजांचे युद्धनेतृत्व

शिवाजीराजे म्हणजे विजिगीषू लष्करी राजसगुणांचे एक अलौकिक रसायन आहे. जगभरातील सेनापतींच्या पिढ्यान्पिढ्यासाठी परिपूर्ण युद्धनेतृत्वाचा तो एक अद्वितीय दृष्टांत आहे. त्यांची यशस्वी डावपेचांची आखणी करण्याची क्षमता आणि मावळ्यांच्या सहकार्याने उद्दिष्ट प्राप्त करण्याची प्रतिभा यांच्यामुळे ते सातत्याने हाती घेतलेल्या प्रत्येक संग्रामात यशस्वी झाले. त्याला केवळ तीनच अपवाद : पहिला, जानेवारी १६६६मध्ये मिर्झा जयसिंहाबरोबर विजापूरवर केलेल्या हल्ल्यातील पराभव; दुसरा, त्यानंतर लागलीच पहाटे पन्हाळा घेण्याचा फसलेला प्रयत्न आणि तिसरा, जंजिरा जलदुर्ग काबीज करण्यात त्यांना आलेले अपयश.

नोव्हेंबर १६५९मधील अफझलखानाच्या सैन्याचा पराभव, जानेवारी १६६१मध्ये उंबरे घाटातील करतलबखानाच्या फौजेवरील सापळा, जानेवारी १६६४मधील सुरतेवरील धाड, फेब्रुवारी १६७०मधील सिंहगडावरील हल्ला व मार्च १६७३मधील पन्हाळ्यावर कब्जा वगैरे लढाया कुशल डावपेचांची आखणी करण्याच्या आणि ते तडीस नेण्याच्या त्यांच्या क्षमतेचे दाखले आहेत. त्यांच्यातील वैविध्य लष्करी अधिकाऱ्यांना आजही अक्षरश: मंत्रमुग्ध करते.

शिवाजीराजांचा स्वभाव धाडसी होता. चौदा-पंधरा वर्षांच्या पोराने जवळ काही नसताना भारतातील सर्व बलाढ्य पादशाह्यांशी टक्कर घेण्याचा मनसुबा बोलून दाखवावा आणि एका अननुभवी मुलाने देशात नवे युग आरंभ करण्याचे स्वप्न रचावे, हीच एक धाडसाची गोष्ट होती. या मोठ्या धाडसाच्या मानाने उरलेली धाडसे गौण मानावी लागतील, पण नियोजनपूर्वक साहस ही शिवाजीराजांची नित्य प्रवृती होती. त्यांच्यात सैनिकाचे शौर्य आणि सेनापतीचे शौर्य या दोहोंचाही संगम झाला होता.७

युद्धनेतृत्वाचे तीन प्रमुख घटक : नि:स्वार्थ, निर्णयशक्ती आणि ज्ञान. नि:स्वार्थीपणा हा राजांचा स्थायिभाव. त्यांचे ध्येय इतके प्रखर आणि उच्च होते की, त्यात स्वार्थाला वावच नव्हता. निर्णयशक्तीचे तीन पैलू : निर्णय घेण्याचे नीतिधैर्य, तो तडीस नेण्याची इच्छाशक्ती आणि पुढाकार घेण्याची आत्मप्रवृत्ती. राजांच्यात निर्णय घेण्याचे नीतिधैर्य उल्लेखनीय होते. कमालीचे दुर्बोध निर्णय घेण्यात ते कधीच कचरले नाहीत, मग तो अफझलखानाला वा शाईस्ताखानाला सामोरे जाऊन त्यांचा स्वत: वध करण्याचा निर्णय असो, तानाशहाशी तह करून दक्षिण जिंकण्याचा निर्धार असो, जयसिंहाला २३ किल्ले प्रदान करून त्याच्याशी तह

करण्याची तयारी असो वा औरंगजेबाच्या अटकेतून पोबारा करण्याचा कट असो... एकदा निर्णय घेतला की, ते कधीही मागे वळले नाहीत, कारण त्यांच्या योजनाच इतक्या बुद्धिमंत व परिपूर्ण असत की, त्या अपयशी होतील, असा विचारही त्यांच्या मनाला शिवत नसे.

निर्णयशक्तीचा तिसरा पैलू म्हणजे पुढाकार घेण्याची प्रवृत्ती. असे ठामपणे सांगता येईल की, उद्दिष्टाचा निर्णायक भाग तडीस नेण्याची जबाबदारी स्वत:वर घेणारा राजांसारखा दुसरा सेनापती सापडणे कठीण. अफझलखानाचा वध केल्याशिवाय स्वराज्यावरील संकट टळणार नाही किंवा स्वत: शाईस्ताखानाच्या निवासस्थानावर धडक मारल्याशिवाय गेली तीन-चार वर्षे महाराष्ट्रात वाढणारे हे बांडगूळ हटणार नाही याची खातरी झाल्याने पुढाकाराने ही कामे त्यांनी आपल्या शिरावर घेतली आणि यशस्वीरीत्या पार पाडली. अफझलखानाचा वध हे त्या लढाईतील विजयाचे प्रमुख कारण ठरले.

ज्ञान हा तिसरा घटक आणि त्याचे तीन पैलू; सेनापतीचे व्यावसायिक नैपुण्य, आपल्या सहकाऱ्यांच्या क्षमतेच्या अचूक मूल्यमापनाची क्षमता आणि स्वत:च्या गुण-दोषांची वास्तववादी जाणीव. शिवाजीराजांचे व्यावसायिक ज्ञान अनुभवाने अधिकाधिक प्रखर होत गेले. वयाच्या चौदाव्या वर्षी आपल्या समवयस्कांना घेऊन, त्यांना जुजबी लष्करी शिक्षण देऊन जो किशोर किल्ले काबीज करतो आणि फत्तेखानासारख्या मुरब्बी आदिलशाही सरदारांचा पराभव करू शकतो, त्याच्या व्यावसायिक नैपुण्याच्या दर्जाबद्दल संदेहच नाही. राजांना आपल्या सरदारांच्या क्षमतेचा अचूक अंदाज होता. त्यामुळे ते कोणत्याही कामासाठी योग्य माणसाची निवड करत असत. त्याबाबतीत तानाजीची सिंहगडावरील हल्ल्यासाठी, कोंडाजी फर्जंदची पन्हाळ्यावरील धाडीसाठी निवड वा मोरोपंतांची साल्हेरसाठी निवड अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यांचा स्वत:च्या क्षमतेवर पूर्ण विश्वास होता. म्हणूनच कोणतेही अशक्यप्राय उद्दिष्ट ते नेहमी स्वत:कडे घेत असत आणि साध्य करून दाखवत असत. त्यामुळेच त्यांच्या सरदारांना आणि मावळ्यांना कोणतेही काम कठीण वाटत नसे.

आपल्या सहवासात सामान्य माणसे घेऊन त्यांच्यात दडलेले सुप्त सामर्थ्य विकसित करणे, त्यांच्यातून असामान्य युद्धनेते, असामान्य प्रशासक निर्माण करणे आणि ध्येयवादाने भरलेली शेकडो कर्तृत्ववान आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची फळी उभी करणे हे खरे युद्धनेतृत्व आहे. शिवाजीराजांसारखा युगप्रवर्तक नेता ज्या युद्धाचा नेता असतो, ते युद्ध जनतेचे स्वातंत्र्ययुद्ध असते.८ बारा मावळांतून राजांना निष्ठावंत आणि स्वराज्यासाठी प्राण अर्पण करण्याच्या प्रेरणेने पेटलेले अनेक अनुयायी मिळाले. त्यांच्यातील काही राजांचे समवयस्क, तर काही त्यांच्यापेक्षा वयाने मोठेही होते. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी पासलकर, हिरोजी फर्जंद वगैरे अत्यंत सामान्य तरुणांच्यात प्रेरणेचे रोपण करून त्यांना राजांनी उत्तम सरदार बनवले. मोरोपंत पिंगळ्यांसारखा सामान्य ब्राह्मण, अण्णाजी दत्तोसारखा मराठवाड्यातला कुलकर्ण्याचा पोर यांचाही समावेश झाला. राजांच्यात माणसाची योग्य पारख करण्याची लक्षणीय क्षमता होती. जावळीच्या चंद्रराव मोरेबरोबरील लढाईदरम्यान त्यांनी त्याच्या सैन्यात लढणारा मुरारबाजी देशपांडे पाहिला आणि चंद्ररावाकडे त्याची मागणी केली. याच मुरारबाजीने पुढे पुरंदरच्या युद्धात अप्रतिम कामगिरी केली. बाजीप्रभू देशपांडेलाही त्यांनी

असाच आपल्या सैन्यात आणला.

राजे राज्यकारभारात कामे निरनिराळ्या लोकांना वाटून देत. प्रत्येकावर विश्वास व जबाबदारी टाकत आणि प्रत्येकाच्या मसलतीस योग्य मान देत असत. ते स्वभावाने कडक होते व गुन्हेगारांस जबरदस्त शिक्षा देत असत. अंमलदार लोक त्यांना चळाचळा कापत असत. दिलेली कामगिरी बजावताना सर्वांना खातरी असे की, शिवाजीराजे आपल्या मुलाबाळांस कधी कमी पडून देणार नाहीत, म्हणूनच लोक आपल्या जिवाकडे पाहत नसत. राजे सर्वांशी प्रसन्नतेने वागत असत. प्रत्येकास वाटावे की, राजांचे मन आपणावर आहे व आपणाशीच ते मन मोकळे करून बोलतात. बहुजन समाजाची प्रचलित भावना साफ बदलून, त्यास कार्यप्रवण करणारा व एकंदर राष्ट्रास स्वातंत्र्याची ओळख पटवून देणारा शिवाजीराजांच्या नंतर दुसरा पुरुष झाला नाही.९

धाडसी बेताच्या अंमलबजावणीसाठी काहींना हसतमुख बळी जावे लागले. शिवा न्हाव्यासारखा सामान्य माणूस मरणाला सामोरा जातो. बाजीप्रभू खिंड अडवतो, मरेपर्यंत लढतो. हे नित्याचे. इतरत्र न दिसणारी बलिदानाची प्रेरणा या ठिकाणी आहे. त्यांना प्रेरणा नेमकी कोठून मिळाली? ती प्रेरणा ध्येयवादातून आली. या ध्येयवादाला चारित्र्यवान नेत्याची जोड असली म्हणजे अशा नेत्याच्या शब्दाखातर माणसे हसत मरतात.१०

सिद्धहस्त भाष्यकार नरहर कुरुंदकर राजांच्या युद्धनेतृत्वाबद्दल एक मार्मिक निरूपण करतात : ‘हे जनतेचे नेतृत्व मध्ययुगात साकार झालेले असल्यामुळे युद्धाला त्यात जास्त महत्त्व आलेले आहे; कारण त्या काळात पापनाशही तलवारीने करावा लागे. पुण्याची स्थापना आणि संरक्षण हेही काम तलवारीचे होते. शिवाजीने उभारलेल्या सर्व उद्योगांतील यशाची किमान अट होती की, तो रणमैदानावर यशस्वी ठरला पाहिजे. जर यशस्वी रीतीने तो युद्धात टिकू शकला नसता, तर मग त्या मध्ययुगात उदात्त, मंगळ तत्त्वज्ञानांना व्यवहार म्हणून कोणताच अर्थ नव्हता. मी शिवाजीच्या युद्धनेतृत्वाकडे त्याच्या ध्येयवादाचे एक आवश्य क अंग म्हणून पाहतो. राष्ट्रनेत्यांना स्वप्ने साकार करण्याची कुवत असावी लागते. शिवाजीचे युद्धनेतृत्व हा ही स्वप्ने साकार करण्याचा कुशल कार्यक्रम होता. ती केवळ रणनीतीची हौस नव्हती. या संदर्भात या युद्धांकडे पहिले पाहिजे. असे पाहताना सैनिकाचे शौर्य व सेनापतीचे शौर्य यात असणारे मूलभूत अंतर लक्षात ठेवले पाहिजे.’११

सैनिकाचे शौर्य बलिदान करण्यात असते; सेनापतीचे शौर्य नियोजनपूर्वक यश साकार करण्यात असते. सेनापतीला उठाव करावा लागतो. चिवटपणे लढाई द्यावी लागते. प्रसंगी माघार घ्यावी लागते, गप्प बसावे लागते. तडजोड करावी लागते. पुष्कळदा पळावे लागते. शिपायाचे शौर्य लढाई जिंकण्यात अगर मरण पत्करण्यात असते, सेनापतीचे शौर्य युद्ध जिंकून साकार झालेला विजय आपल्या ध्येयवादासाठी राबवण्यात असते. शौर्य या कल्पनेचे हे वेगवेगळ्या पातळ्यांवरील आविष्कार आहेत. युद्धनेतृत्व ही त्याच्या युगप्रवर्तनाला आवश्यगक असणारी किमान अट आहे.१२

आठवावा साक्षेप

राजांच्या राज्यात मुसलमान प्रजा पुष्कळ होती. त्यांच्या स्वाऱ्यांदरम्यान ते मुसलमानी राज्यांवर चालून जात असत; परंतु तरीही मुसलमान प्रजा शिवाजीराजांच्या विरुद्ध कधीही उठली नाही. इतकेच नव्हे, तर शिवाजीराजांच्या राज्यात त्या मुसलमानांमध्ये स्वत्वाची भावना रुजली होती. शत्रूच्या फौजेतील अनेक मुसलमान आपल्या धन्यास सोडून शिवाजीराजांच्या नोकरीत आले होते. त्यांना महाराज मोठ्या सन्मानाने वागवत असत. शत्रू हातांत सापडला असता त्याचे पारिपत्य करण्याऐवजी त्याला सन्मानाने व इतमामाने वागवून त्याच्यापासून आपला फायदा करून घ्यावा, असा शिवाजीराजांचा प्रघात होता.१३

शिवाजीराजांनी स्वत: अगर आपल्या सैन्याकडून स्त्रियांची विटंबना होऊ दिली नाही. कधीही विरोधकांच्या धर्मग्रंथाचा व पूजास्थानाचा अवमान त्यांनी केला नाही. 'सूड' ही शिवाजीराजांची प्रेरणा कधीच नव्हती. वैयक्तिक जीवनातील भोगलालसा त्यांना नव्हतीच. ते संयमी, आदर्श गृहस्थजीवन जगले. त्यांच्या प्रेरणा आध्यात्मिक होत्या. एखादी आध्यात्मिक धर्मसाधना चालावी, तशी त्यांची राज्यसाधना चालू होती. ते जनतेच्या स्वातंत्र्याचे नेते होते. ते राज्याचे उपभोगशून्य स्वामी होते. म्हणूनच रामदास त्यांना 'श्रीमंत योगी' म्हणतात. साधुसंतांनी त्यांना स्वत:चा शेजारी आपला म्हणून स्वीकारले. जनता त्यांना ईश्वरी अवतार मानीत असली, तर ती श्रद्धाळू मनांनी आपल्या चारित्र्यवान स्वातंत्र्ययोद्ध्याला दिलेली स्वाभाविक मानवंदना म्हटली पाहिजे.१४

मध्ययुगीन काळात जनतेने कधी राज्याच्या रक्षणात भाग घेतला नाही; कारण ती राज्ये राजांची होती. ती जनतेची राज्ये नव्हती. कुणी नेता असो अगर नसो, हे माझे राज्य आहे, ते मला टिकवलेच पाहिजे, या जिद्दीने जनता मध्ययुगीन भारताच्या इतिहासात फक्त एकदाच लढली - ती शिवाजीराजांच्या राज्यासाठी. जनतेला आपले स्वत:चे वाटणारे हे राज्य ही कुणालाच दुर्लक्षित करता येणारी गोष्ट नव्हती. औरंगजेबालाही तिकडे दुर्लक्ष करणे शक्य नव्हते. म्हणूनच औरंगजेब यशाची आशा नसताना आपली सर्व शक्ती पणाला लावून लढला; कारण शिवाजी राजांचे राज्य हे जनतेचे राज्य होते. शिवाजीराजांच्या नेतृत्वाचा अभ्यास म्हणजे असा आत्मविश्वास जनतेत निर्माण करणाऱ्या एका चारित्र्यवान युगप्रवर्तक नेत्याचा अभ्यास असतो.[१५]

अवाजवी अभिमानापायी शिवाजीराजांना संकुचित चौकटीत कोंडण्याचा प्रयत्न वारंवार होताना दिसतो. हे लक्षात ठेवले पाहिजे की, शिवाजीराजे जसे हिंदू धर्माचे धार्मिक नेते नव्हते, तसे महाराष्ट्राचे अगर मराठ्यांचेही नेते नव्हते. शिवाजीराजांच्या मोठेपणाला महाराष्ट्राच्या चौकटीत घालून आपण त्यांच्यावर फार मोठा अन्याय करत आहोत, हे सहजासहजी लक्षात येत नाही. त्यांची भूमिका महाराष्ट्राच्या चौकटीत मावणारी नव्हती. ती भूमिका हिंदवी स्वराज्याची म्हणजे एतद्देशीयांच्या राज्याची होती. 'एतद्देशीयांचे राज्य येथे स्थापन व्हावे, ही श्रींची इच्छा आहे', या भूमिकेला अनुसरून त्यांची वर्तणूक असल्याचे आपल्याला दिसते.१६

शिवाजीराजांच्या पाश्चात्य इतिहासकार नेहमी करत असलेल्या कुचाळखोर टीकेच्या संबंधात नरहर कुरुंदकर एक टिप्पणी करतात : 'शिवाजीराजे आदिलशाही दौलतीचे सेवक होते. पुरंदर तहानंतर ते मोगल साम्राज्याचे सेवक झाले. रूढ पद्धतीने पाहावयाचे झाले, तर त्यांनी या

दोन्हींचा स्वामिद्रोह केला होता. आपल्या आयुष्यात त्यांनी अनेक शहरे लुटली. सुरत, नगर, जुन्नर, कल्याण, भिवंडी, जालना, कारंजा. म्हणजे रूढ अर्थाने ते लुटारू व आक्रमकही होते. एकीकडे स्वामिद्रोही, लुटारू, आक्रमक, हिंसक असल्या प्रकारची बिरुदावली आहे. दुसरीकडे पाहिले, तर त्यांनी राज्य निर्माण केले. ते स्वत: राजे झाले, राज्याभिषेक करवून घेतला; हा सर्व सरंजामशाही परिवेश आहे. यातून नानाविध आरोप आणि कुत्सितपणा यांचा जन्म होत असतो. त्या साऱ्यांचे उत्तर या ठिकाणी आहे. भारतात कधीही कोणत्याही राजवटीने जनतेत एवढा विश्वास व आत्मीयता निर्माण केली नव्हती. इतिहासकाळात जनतेने कोणालाही ईश्वरी अवतार मानले नव्हते'.१७

त्र्यं. शं. शेजवलकर यांनी याबाबतीत एक मार्मिक भाष्य केले आहे: 'पाचशे वर्षांच्या अनुभवाने येथील मुसलमान राज्यकर्त्यांकडून हा प्रश्न सुटत नाही, असे झाले, तेव्हा एका हिंदू राजाला स्वत:च्या मतीने सोडवण्याची बुद्धी झाली. हा पुरुष शककर्ता शिवाजी होय. शिवाजी म्हणजे पाचशे वर्षांच्या हिंदू-मुसलमान लढ्याचा अन्वयार्थ समजलेला एकमेव कर्ता पुरुष; मुसलमानी संस्वृतीतील सर्व अंगे आत्मसात केलेला एक पराक्रमी वीर, हिंदुत्वाचा नितांत अभिमान उचललेला एक धर्मनिष्ठ माणूस. बापाच्या पंधरावीस वर्षांच्या धडपडी पाहून चार राज्यांच्या बंदीत राहून शहाणपण शिकलेला मुत्सद्दी पुरुष!'१८

औरंगजेबाने राजांबद्दल काढलेले प्रशंसापर उद्गार लक्षणीय आहेत : 'शिवाजी मोठा लढवय्या होता. हिंदुस्तानातील प्राचीन राज्ये बुडवण्याचा उद्योग मी सतत चालवला असता, नवीन राज्य स्थापन करण्याचे महत्कार्य शिवाजीशिवाय दुसऱ्या कोणाकडूनही झालेले नाही. सारखी एकोणीस वर्षे माझी फौज त्याच्याबरोबर झगडते आहे, तरी त्याच्या राज्याची दिवसेंदिवस भरभराटच आहे.'१९

क्रॉमवेल, वॉशिंग्टन, बोनापार्ट आणि शिवाजीराजे

क्रॉमवेल, शिवाजीराजे, वॉशिंग्टन व बोनापार्ट हे चार अलौकिक युद्धनेतृत्वाचे द्योतक आहेत. यांतील पहिले दोन सतराव्या शतकात, तर शेवटचे दोन अठराव्या शतकात जन्माला आले. या चार लोकोत्तर पुरुषांच्या बाबतीत काही घटकांचा तारतम्याने विचार करणे उपयुक्त ठरेल.२०

मातृसहवास. या चारही जणांना पित्यापेक्षा मातृसहवास जास्त लाभला.

क्रॉमवेल, शिवराय आणि वॉशिंग्टन या तिघांच्या माता संसारदक्ष, प्रेमळ, उदार, करारी व धर्मभीरू होत्या. त्यांच्या मुलांना या गुणांचे वळण आपसूक लागले. ते तिघेही मातृभक्त होते. नेपोलियनची आई मात्र खटपटी, काटकसरी आणि मतलबी स्त्री होती. सदाचार, धर्मबुद्धी आणि मनाचा मोकळेपणा या सद्गुणांचे क्रॉमवेल, वॉशिंग्टन आणि शिवरायांच्या मातांनी आपल्या मुलांच्या मनोभूमिकेत साक्षेपाने बीजारोपण केले होते. बोनापार्टची आई याला अपवाद होती.

लष्करी शिक्षण. शस्त्रास्त्रांबद्दल कसब, शरीराची हडेलहप्पी आणि डावपेचांचे प्राथमिक ज्ञान हे लष्करी शाळेत वा गुरूपासून मेहनतीने शिकायचे असते; परंतु सेनापतीचे कौशल्य, नेतृत्वाची प्रतिभा, रणनीतीचे धोरण व चाणाक्षपणा हे गुण लष्करात लढाईच्या अनुभवावरून

प्रत्येकाने कमवायचे असतात. शिवरायांच्या बाबतीत याचा आराखडा मनात बनवून तो दादोजी कोंडदेव आणि इतरांच्या मदतीने प्रत्यक्षात आणण्याचे श्रेय जिजाबाईंना दिले पाहिजे. वॉशिंग्टनचा भाऊ लष्करात होता. भावाच्या पश्चात आपल्या टापूतील लष्करी अंमलदाराचे काम ओघानेच त्याच्या अंगावर पडले. वीसपंचवीस वर्षांच्या अनुभवानंतर वरिष्ठ सेनानायकत्व त्याच्या वाट्याला आले. बोनापार्टला त्याच्या पित्याने लहानपणीच लष्करी शाळेत दाखल केले होते. क्रॉमवेल मात्र जमीनदार होता. वयाची चाळिशी उलटल्यावर त्याने देशातील लढाईत उडी घेतली आणि दोन-तीन वर्षांतच तो अद्वितीय योद्धा व सेनानी म्हणून प्रसिद्धीस आला.

जयापजय. लढाईचा निर्णय प्रामुख्याने सेनापतीच्या सामरिक नैपुण्यावर, योजनेच्या व्यावसायिकतेवर, सैन्याच्या पराक्रमावर आणि इतर अनेक घटकांवर अवलंबून असतो. त्याशिवाय ज्याला 'युद्धाचे अभ्र' (फॉग ऑफ वॉर) म्हणतात, तोसुद्धा एक घटक असतो. परंतु या चौघांपैकी ज्याला अपयशाचा सामना कधीही करावा लागला नाही, असा क्रॉमवेल हा एकच सेनापती होता. शिवाजी राजे व

वॉशिंग्टन यांच्यावर अपयशाचे प्रसंग आले, परंतु त्यांनी पुढे जाऊन ते अपयश पूर्ण धुवून काढले. बोनापार्टने आरंभी धवल यश संपादन केले, परंतु त्याला अखेरचे दिवस एका बेटावर बंदिवासात काढावे लागले. या चार जणांमध्ये शिवाजीराजे सर्वांत उठून दिसतात. त्यांनी आपले अपयश भरून काढले; एवढेच नव्हे, तर ते एका स्वतंत्र स्वराज्याचे छत्रपती झाले.

सैनिकांचे युद्धनेतृत्व. हे चारही सेनापती 'अचाट पराक्रमी, विलक्षण बुद्धिवान, पक्के धोरणी. दीर्घोद्योगी, कर्तव्यनिष्ठ, प्रसंगावधानी व समयज्ञ होते. आपल्या कर्तृत्वाची सर्व मदार आपल्या सैनिकांवर आहे, याबद्दल त्यांना किंचितही संदेह नव्हता. सैन्यनेतृत्वातील नैपुण्याच्या बाबतीत ते सर्व दीपस्तंभ होते. प्रत्येकाची आचारपद्धती आणि तंत्रप्रणाली वैशिष्ट्यपूर्ण होती. किंबहुना नेतृत्व हा प्रामुख्याने वैयक्तिक घटक आहे आणि त्याची तुलना करणे अयोग्य आहे.

सामरिक संकल्पना. या प्रत्येकाने आपल्या परिस्थितीस साजेल अशी युद्धपद्धती अवलंबिली आणि ती पूर्णतेला नेऊन लष्करी इतिहासावर कायमचा ठसा उमटवला. क्रॉमवेलची युद्धनीती अत्यंत आक्रमक होती. त्याचे कार्यक्षेत्र स्वदेशात व मर्यादित क्षेत्रात असल्याने प्रतिपक्षाची इत्थंभूत माहिती त्याला असे. त्यामुळे प्रतिपक्षावर हल्ला चढवायचा आणि तो भेदरून पळू लागला की, त्याची लांडगेतोड करायची, ही त्याची रणनीती. त्याउलट बोनापार्टचे रणक्षेत्र परदेशात आणि विस्तृत होते. त्यामुळे वेगाने भरारी मारून गाफील शत्रूपुढे तो उभा राहायचा. नेपोलियनने लढाईच्या योजनेला गणिताचे स्वरूप दिले होते. युद्धाची जागा काळजीपूर्वक निवडून तो आपले सैन्य आधीच वेगवेगळ्या दिशांत विस्तारून ठेवत असे. अचानक आपले सैन्य त्या केंद्रस्थानी आणून तो शत्रूला चारी बाजूंनी घेरत असे आणि त्याचा प्रभाव पाडीत असे. युरोपमधील ऑस्ट्रिया, प्रशिया, रशिया वगैरे राष्ट्रांना त्याने पराभूत केले. जॉर्ज वॉशिंग्टनचे युद्धधोरण बचावात्मक असे. इंग्लंड व अमेरिकेमधील अंतर आणि इंग्लंडची हलाखीची आर्थिक परिस्थिती या दोन कारणांमुळे बचावात्मक नीतीने तो इंग्लंडचा पराभव साधू शकला.

शिवाजीराजांची स्थिती मात्र या तिघांपेक्षा वेगळी होती. तिघांच्या मागे स्वतंत्र आणि अभिमानी राष्ट्राचा पाठिंबा होता. महाराष्ट्र गुलामगिरीत जखडला होता. नाणावलेली क्षत्रिय घराणी मुसलमान पातशहांचे सेवक होण्यातच आनंद आणि प्रतिष्ठा शोधत होती. या राष्ट्राच्या रोमरोमात राष्ट्रीय चैतन्याची ज्योत पेटवून नवे राष्ट्र उभे करण्याचे अचाट कार्य शिवाजीराजांपुढे होते. त्यांचे घरबुडवे देशबंधू, दोन बलाढ्य बादशहा यांच्या समवेत अनेक शत्रू होते. शिवाजीराजांचे कार्यक्षेत्र तुलनेने विस्तृत होते उत्तरेस रेवापासून दक्षिणेस कावेरीपर्यंत, पश्चिमेस सागरतटापासून पूर्वेस वऱ्हाडापर्यंत. त्यांचे लष्करी सामर्थ्य दुर्बल असल्याने गनिमी काव्यासारखे बचावाचे धोरण त्यांनी शोधून काढले. शिवाजीराजांवर जे प्रसंग गुजरले, त्यांचा इतर कोणालाही सामना करावा लागला नाही. राजांनी विस्मय आणि शाठ्याचा अत्यंत चातुर्याने वारंवार उपयोग करून शत्रूच्या संख्याबळाला शह दिला. अफझलखानाचा पराभव, शाईस्ताखानाचा भ्रमनिरास, पन्हाळ्यावरून पलायन, आग्र्याहून सुटका या योजनांमागील युक्त्या पहिल्या, तर बुद्धी, धोरण, रणचातुर्य याबाबतीतील त्यांचा अष्टपैलूपणा बाकी तिघांच्यापेक्षा सरस होता, असे दिसून येते. क्रॉमवेल व बोनापार्ट यांना शत्रूच्या निष्कारण प्राणहानीमुळे आसुरी आनंद मिळे. वॉशिंग्टन व शिवाजीराजे मात्र शत्रूची निष्कारण कत्तल होऊ नये, याची पराकाष्ठा करीत.

शिस्त व शासन. चारही सेनापती आपल्या सैनिकांशी प्रेमाने व औदार्याने वागत, त्यांच्या कल्याणाची काळजी वाहात. परंतु सर्वांची शिस्त मात्र कडक असे आणि गुन्हेगाराला ते जबर शिक्षा देत असत. कोणतेही गैरवर्तन वा कुचराई ते माफ करीत नसत. क्रॉमवेल, वॉशिंग्टन व शिवाजीराजे हे खरे धर्मनिष्ठ, पापभीरू व भाविक होते. ईश्वराच्या प्रेरणेने आणि राष्ट्राच्या कल्याणास्तव झटण्यासाठी जणू काही ईश्वराने आज्ञा केली आहे, अशा भावनेने ते कार्यरत असत. बोनापार्ट मात्र धर्माला फारशी किंमत देत नसे. त्याचा भर अकलेवर व हिंमतीवर असे.

ध्येय. क्रॉमवेलने प्रजा आणि राजा यांच्या लढ्यात प्रजेच्या बाजूने शस्त्र उचलले; परंतु शेवटी रोमन कॅथॉलिकांविरुद्ध फळी उभारली. जॉर्ज वॉशिंग्टनने वसाहतींच्या समान हक्कांचा पुरस्कार केला. ज्या लोकशाहीसाठी आपण झटलो, तिला मारक ठरेल असे कोणतेही वृत्य त्याच्या हातून घडले नाही. बोनापार्टच्या पुढे काही मोठे वा उदात्त ध्येय होते, असे म्हणता येणार नाही.

शिवाजीराजांना परकीयांच्या अत्याचारी सत्तेखाली दबून आणि दडपून गेलेल्या बांधवांना जागृत करून त्यांचे राष्ट्र बनवायचे होते. त्यांना स्वतंत्र स्वराज्य देऊन देशकार्य आणि धर्मकार्य साधायचे होते. राजाने गुरुजन, महाजन, नागरिक, पंच इत्यादी मंडळे व निवडक अधिकारी यांच्या अनुमतीने प्रजेच्या कल्याणाकरता राज्य करावे आणि प्रजेने राजनिष्ठ व कर्तव्यदक्ष असावे, हे ध्येय त्यांच्यापुढे होते. त्यांना आपल्या कार्यात यश आले व त्याचमुळे त्यांच्यामागे ते सुमारे दीडशे वर्षे टिकले, हाच त्यांच्या ध्येयपूर्तीचा निर्वाळा!

एका गोष्टीचा मात्र आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. शिवाजीराजांसारखे वैयक्तिक धैर्य, बेदरकारी आणि स्वत:चा जीव धोक्यात घालून शत्रूच्या सेनापतीवर हल्ला करण्याची हिंमत

इतर कोणीच दाखवली नाही.

कर्तृत्व

संक्षिप्त विहंगमावलोकन

शिवरायांची 'हिंदवी स्वराज्या'ची संकल्पना आणि रूपरेखा आरंभापासून निर्धारित होती. याचा निर्वाळा त्यांनी लिहिलेल्या एका पत्रावरून मिळतो. शिवाजीराजांना विजापूरहून आल्यावर मावळातील जे लोक मिळाले, त्यात रोहिड खोऱ्यातला देशपांडे दादजी प्रभू व त्याचा वृद्ध पिता नरसप्रभू हे होते. काही दिवसांनी दरबाराने नरसप्रभूस हुकुमयादी लिहून तंबी दिली. ही गोष्ट दादजीने रायांना कळवल्यावर त्यांनी १६४५मध्ये दादजीला पत्र लिहिले,

'तुम्हास मेहेरबान वजिराचा विजापूरहून हुकुम आला, तो ठाणे शिरावलीहून अमिनांनी तुम्हाकडे पाठवला. त्यावरून तुमचे बाप नरसीबाबा फार हवालदील झाले. त्यास शहाशी बेमानागिरी तुम्ही व आम्ही करीत नाही; श्रीरोहिरेश्वर तुमचे खोऱ्यातील आदि कुलदेव, डोंगरमाथा पठारावर सह्याद्रीलगत तुमचा स्वयंभू आहे, त्यांनी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरवणार आहे. त्यास बावास हवाल होऊ देऊ नये.... हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे.'

या पत्रावरून आपण हे सर्व देवाकरता व देशाकरता ईश्वरी प्रेरणेनेच करीत आहोत, अशी शिवरायांची निर्मळ श्रद्धा होती, हे स्पष्टपणे प्रतीत होते.२१

शिवाजीराजांचा पन्नास वर्षाचा आयुष्यकाळ खरोखरच अद्भुत आहे. शून्यातून त्यांनी 'सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य' निर्माण केले, 'तयासी तुळणा कैंची' यापेक्षा आणखी काय म्हणणार?

सर्वसाधारणपणे राजांच्या कार्यकालाचे तीन भाग करता येतील; पहिला, १६४४ ते १६५९ मधील ऊर्जितकाळ; दुसरा, १६६० ते १६६९मधील आव्हानात्मक कालावधी आणि तिसरा, १६६९ ते १६८०मधील पुनश्च अभ्युदय. शिवाजीराजांच्या रोमहर्षक कर्तृत्वाचा एक धावता आढावा.

ऊर्जित काळ

१६३३मध्ये मोगलांनी निजामशहाला पदच्युत केल्यावर शहाजीराजांनी काही काळ निजामशाही जिवंत ठेवली, परंतु शेवटी १६३६मध्ये त्यांना आदिलशाही आणि मोगलांच्या संपातापुढे हार मानावी लागली. त्यांनी कर्नाटकात आदिलशाहीची नोकरी पतकरण्याचे मान्य केले. शिवाजीराजांना जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांच्या हवाली पुण्यात ठेवण्यामागे एकच सुप्त उद्देश होता, आपल्या पोटी आलेला हा शिवावतार एक दिवस स्वतंत्र मराठा राज्य स्थापन करील. मुस्लीम सत्ताधीशांच्या जुलूमशाहीने विद्ध झालेले केवळ पंधरा वर्षांचे शिवराय आणि त्यांच्या सवंगड्यांनी ते परवशतेचे जोखड फेकून देण्याची शपथ घेतली. त्या निर्धाराचा प्रथम आविष्कार होता, त्यांनी घेतलेला सिंहगडचा ताबा.

इतके अचाट धैर्य हे चिमुरडे पोर केवळ पित्याच्या जोरावरच दाखवते आहे, असे समजून आदिलशहाने शहाजीराजांना अटक केली आणि फत्तेखानाला शिवरायांना पकडून आणण्यासाठी पाठवले. शिवरायांनी पुरंदर किल्ल्याचा ताबा घेतला आणि फत्तेखानाचा दारुण पराभव केला. शिवरायांनी मग मोगलांशी संपर्क साधून शहाजीराजांची सुटका करवली, परंतु त्यासाठी त्यांना सिंहगड परत द्यावा लागला. जानेवारी १६५६मध्ये राजांनी चंद्रराव मोरेचा पराभव करून जावळी घेतली. त्यानंतर तीन महिन्यांनंतर त्यांनी त्याच्याकडूनच रायगड काबीज केला आणि सप्टेंबरमध्ये सुपे घेतले.

मोहम्मद आदिलशहाच्या नोव्हेंबर १६५६मधील मृत्यूनंतर अली आदिलशहा गादीवर आला, परंतु सर्व अधिकार आदिलशहाची बेगम बडी साहिबाच्या हातात आले. स्वराज्याच्या विस्तारासाठी ही उत्तम संधी पाहून शिवाजीराजांनी दाभोळ घेतले आणि ते आपल्यापाशी ठेवण्यासाठी औरंगजेबाची परवानगी मिळवली. त्यानंतर त्यांनी लागलीच जुन्नर आणि अहमदनगरवर धाड घातल्यामुळे बादशहा खवळला. त्याला दाद न देता कल्याण आणि भिवंडी काबीज केली. त्यानंतर माहुली आणि चाळीस इतर किल्ले घेतले. मार्च १६५८मध्ये त्यांनी उत्तर आणि मध्य कोकणावर कब्जा केला.

१६५९मध्ये बडी साहिबाने आदिलशाहीतील सर्वांत शक्तिशाली सरदार अफझलखान याला प्रचंड सैन्यानिशी शिवाजीराजांना पकडून आणण्यासाठी पाठवले. ते दोघे १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी भेटले. आपल्याला कपटाने मारण्याचा खानाचा डाव त्याच्यावरच उलटवून राजांनी गळाभेटीदरम्यान खानाला यमसदनाला पाठवले. त्यानंतर जावळीच्या खोऱ्यात चातुर्याने लावलेल्या सापळ्यात खानाच्या प्रचंड सैन्याला पकडून राजांच्या तुटपुंज्या सैन्याने खानाच्या सैन्याचा अक्षरश: धुव्वा उडवला. अफझलखानाचा पराभव ही भारतातील सर्व अन्यायपीडित जनतेला आपला मुक्तिदाता उदयाला आला आहे, असा दिलासा देणारी घटना होती. दुसऱ्या दिवशी राजे आणि नेतोजी पालकर यांनी ती लढाई विजापूरच्या काळजापर्यंत नेऊन लुटालूट केली. २८ नोव्हेंबर १६५९ला राजांनी पन्हाळगड काबीज केला. अफझलखानाच्या दारुण पराभवानंतर आदिलशहाने पाठवलेल्या रुस्तुम-इ-जमाच्या सैन्याला राजांनी हरवले.

आव्हानात्मक कालावधी

त्यानंतर मात्र फासे उलटे पडू लागले. औरंगजेबाने शाईस्ताखानाबरोबर एक लाखाहून अधिक सैन्य पाठवले. हे आव्हान हाताबाहेर होते. त्यामुळे राजे काही काळ पन्हाळ्याला राहायला गेले. ही संधी पाहून आदिलशहाने सिद्दी जोहरला मोठ्या सेनेनिशी शिवाजी राजांना पकडून आणण्यासाठी पाठवले. सिद्दीने पन्हाळगडाला मार्च १६६०मध्ये करकचून वेढा घातला. चार महिन्यांनी राजे गडावरून निसटले आणि विशाळगडावर गेले. त्यांचा पाठलाग करणाऱ्या मोगलांना महाराज गडावर सुखरूप पोचस्तेपर्यंत बाजीप्रभू देशपांडेने पावनखिंडीत अडवून धरले.

शाईस्ताखानाने कोकण काबीज करण्यासाठी पाठवलेल्या करतलबखानाच्या हाताखालील

मोठ्या संख्येच्या शिबंदीला मळवलीजवळ उंब्रे खिंडीच्या परिसरात लावलेल्या सापळ्यात पकडून जानेवारी १६६१मध्ये राजांनी गुडघे टेकायला लावले आणि त्यांची सर्व शस्त्रास्त्रे व साहित्य जप्त करून परत पाठवले.

५ एप्रिलच्या रात्री शिवाजीराजांनी स्वत: मोजक्या शिबंदीबरोबर खानाचे निवासस्थान लाल महालावर शिताफीने हल्ला चढवला. त्यात खानाच्या मुलासह इतर ५५ जणांना जीव गमवावा लागला. भेदरलेला शाईस्ताखान गेली तीन-चार वर्षे पुण्यात तळ टाकून बसलेल्या लाखाहून अधिक सैन्याला घेऊन औरंगाबादेकडे चालता झाला.

१६६३मध्ये राजांनी कोकणावरील पकड पक्की केली. १६६४च्या जानेवारीमध्ये राजांनी सुरतेवर धाड घातली आणि प्रचंड मालमत्ता गोळा केली. शिवाजीराजांच्या आक्रमक चालींची दखल घेऊन औरंगजेबाने मिर्झा जयसिंह या मुरब्बी आणि अनुभवी सरदाराच्या हाताखाली मोठी फौज देऊन दिलेरखानासह दक्षिणेत रवाना केले. त्याचवेळी आदिलशहाने राजांविरुद्ध खवासखान आणि बाजी घोरपडे या दोन सरदारांना पाठवले. राजांनी प्रथम ऑक्टोबर १६६४मध्ये मुधोळमधील बाजी घोरपडेवर हल्ला चढवून त्याला ठार केले आणि मग खवासखानाचा पराभव केला. त्यानंतर त्यांनी नोव्हेंबरमध्ये सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधणीला आरंभ केला. राजांनी स्वत: बसरूरला मराठा आरमाराच्या मोहिमेचे नेतृत्व केले.

जयसिंहाने मार्च १६६५मध्ये पुण्यास पोचल्यावर हळूहळू स्वराज्याची कोंडी करण्यास आरंभ केला. दिलेरखानाने एप्रिलमध्ये पुरंदर किल्ल्याला वेढा घातला. कोंडीचे परिणाम असह्य झाल्यावर तात्पुरता अवसर मिळवण्यासाठी राजांनी मिर्झाबरोबर तह केला. त्यानुसार त्यांनी २३ किल्ले मिर्झाच्या हवाली करण्याचे आणि त्याला विजापूर मोहिमेदरम्यान साहाय्य करण्याचे कबूल केले. दोघांचा विजापूरवरील हल्ला यशस्वी झाला नाही. शिवाजीराजांनी त्यानंतर १६ जानेवारी १६६६ला पन्हाळ्यावर केलेला हल्लाही फसला. त्याचवेळी नेतोजी पालकर राजांना सोडून प्रथम आदिलशाही आणि नंतर मोगलांना जाऊन मिळाला. राजांच्या कारकिर्दीचा हा नीचांक होता.

जयसिंहाच्या सल्ल्यावरून राजांना औरंगजेबाच्या पन्नासाव्या जन्मदिवसाच्या समारंभासाठी बोलावले गेले. त्यासाठी मार्च १६६६मध्ये संभाजी राजांसह दिल्लीकडे रवाना झाले. ११ मे च्या दिल्लीतील समारंभात राजांचा जाणून-बुजून अपमान केला गेला. त्यावर क्रूद्ध होऊन ते दरबारातून चालते झाले. बादशहाच्या या उपमर्दाबद्दल राजांना त्यांच्या निवासस्थानी जेरबंद करण्यात आले. त्यातून १७ ऑगस्ट १६६६ला चातुर्याने निसटून राजे रायगडावर परत पोचले. त्यानंतर दोन-अडीच वर्षे राजांनी हेतुपुरस्सर विशेष लष्करी हालचाली केल्या नाहीत.

अभ्युदय

औरंगजेबाने एप्रिल १६६९मध्ये हिंदूंची धर्मस्थाने उद्ध्वस्त करण्याचे फर्मान काढले. त्याच्याविरुद्ध राजांनी हत्यार उचलण्याचे ठरवले. १६६९च्या अखेरीस त्यांनी पुनश्च आक्रमक पवित्रा धारण करण्याचा निर्धार केला. ४ फेब्रुवारी १६७०ला तानाजी मालुसरेने रात्री सिंहगडावर साहसी धाड घालून गड काबीज केला. लागलीच निळोपंत मुजुमदाराने ८

मार्चला पुरंदर किल्ला जिंकला. यानंतर राजांनी कल्याण, भिवंडी आणि माहुली वगैरे स्थळे परत घेतली. ऑक्टोबरमध्ये त्यांनी सुरतेवर दुसरा यशस्वी हल्ला चढवला. नोव्हेंबरमध्ये त्यांनी विदर्भामध्ये जाऊन महसूल गोळा केला. त्यांचे सर्वत्र स्वागत झाले.

सुरतेच्या पहिल्या हल्ल्यानंतर परत येताना मोरोपंतांनी विदर्भातील साल्हेर किल्ला जिंकला होता. जून १६७१मध्ये मोगलांनी त्याला वेढा घातला. राजांनी सरनौबत प्रतापराव गुजरच्या हातांखाली घोडदळ आणि मोरोपंतांच्या हातांखाली पायदळ पाठवले. त्या दोघांनी वेढा घालणाऱ्या इखलासखानाचा पराभव केला आणि वेढा तोडला. त्यानंतर दोघांनी जव्हार, रामनगर, नाशिक आणि दिंडोरी जिंकून घेतले. मार्च १६७३मध्ये कोंडाजी फर्जंदने केवळ ६० मावळ्यांसह रात्री धाड घालून पन्हाळा घेतला. एप्रिलमध्ये प्रतापराव गुर्जरने आदिलशाहीच्या बहलोलखानाचा पराभव केला.

मार्चमध्ये त्यांनी सैन्यासह कारवार किनाऱ्यापर्यंत कोकण काबीज केले. ६ जून १६७४ रोजी शिवाजीराजांचा राज्याभिषेक झाला. जून १६७६मध्ये त्यांनी मोगल सरदार बहादुरखानाला नमवण्यासाठी आदिलशाहीची मदत केली. फेब्रुवारी १६७७मध्ये त्यांनी कुतुबशाहीच्या सुलतान तानाशहाबरोबर तह केला. दोन्ही सैन्यांनी मार्च १६७७मध्ये गोवळकोंडा सोडले आणि कुर्नूल, कडाप्पा, तिरुपती, मद्रास. अर्काट. जिंजी, तिरुवादी, वलीगंदपुरम, तंजावरमार्गे आगेकूच करत वाटेतील किल्ले जिंकले आणि त्यानंतर होसूर, होस्कोट, सिरामार्गे ते हुबळीला परतले. ऑगस्ट १६७७पर्यंत राजांनी कावेरी नदीच्या उत्तरेचा प्रदेश जिंकून घेतला होता. तिथून फेब्रुवारी १६७८मध्ये ते पन्हाळ्यास पोचले.

दिलेरखानाने ऑगस्ट १६७९मध्ये विजापूरवर हल्ला केल्यावर वझीर मसूदखानाने राजांची मदत मागितली. राजांनी नोव्हेंबर १६७९मध्ये मोगलांच्या जालन्यावर हल्ला चढवून दिलेरखानाला मागे फिरण्यास भाग पडले. त्याचवेळी खांदेरीवर मालकीचा दावा करणाऱ्या इंग्रजांना मराठा आरमाराने दाद दिली नाही. जंजिरा जिंकण्याचे राजांनी वारंवार केलेले प्रयत्न मात्र फळास गेले नाहीत. ३ एप्रिल १६८०रोजी राजांनी रायगडावर शेवटचा श्वास घेतला.

शिवाजीराजांच्या कर्तृत्वाचे मार्मिक वर्णन रामचंद्र नीलकंठ अमात्य यांच्या 'राजनीती' या ग्रंथात केले आहे : 'दक्षिण प्रांती आदिलशाही, कुतुबशाही व निजामशाही ही महान संस्थाने, तसेच मोगल एक एक सुभा लक्ष लक्ष स्वारांचा, याविरहित श्यायमल, फिरंगी, इंग्रज, वलंदेज रामनगरकर, पाळेगार, सोंधे बिदनूर म्हैसूरवाले, त्रिचनापल्ली आदिकरून संस्थानिक, तसेज जागजागां पुंड - चंद्रराव, शिर्के, सावंत, दळवी, वरघाटे निंबाळकर, घाटगे आदिकरून देशमुख सकलही पराक्रमी सज्ज असतांही, बुद्धिवैभव पराक्रमे, कोणाची गणना न करिता, कोणावर चालून जाऊन, तुंबळ युद्ध करून रणांशी आणिले, कोणावर छापे घातले, कोणास परस्परे कलह लावून दिले. कोणाचे मित्रभेद केले, कोणाच्या डेऱ्यांत शिरोन मारामार केली, कोणाशी एकांगी करून पराभविले, कोणाशी स्नेह केले, कोणाच्या दर्शनास आपणहून गेले, कोणास दर्शनास आणिले, कोणास परस्परे दगे करविले, कोणी इतर प्रयत्ने नकळत त्यांच्या देशात जबरदस्तीने स्थळे बांधून अनुक्रमे आकळिले. जलदुर्गसहित होते त्यांस नूतनच

जलदुर्ग निर्माण करून पराभविले. दुर्घट स्थळे नौकामार्गे प्रवेशिली. असे ज्या ज्या उपाये जो जो शत्रु आकळावा, त्या त्या उपाये तो तो शत्रु पादाक्रांत करून सालेरी अहिवंतापासून चान्जी कावेरीतीरापर्यंत निष्कटंक राज्य, शतावधी किल्ले तसेच जलदुर्ग, किती एक विशाळ स्थळे, चाळीस हजार पागा, साथ-सत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोट्यवधी खजीना, तसेच उत्तम जवाहीर, सकाळ वस्तुजात संपादिले. सिंहासनारूढ होऊन छत्र धरून छत्रपती म्हणविले. तस्करादि अन्यायी यांचे नाव राज्यात नाहीसे केले. देश दुर्गादि सैन्यादि बंड नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविले. केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली. औरंगजेबासारखा महान शत्रु परीतापसागरी निमग्न करून दिगंत विख्यात कीर्ति संपादिली, ते हे राज्य!'[२२]

कर्तृत्वाचे औचित्य

शिवाजीराजांनी शाह्यांशी टक्कर घेण्याआधी बारा मावळांतील पुंड-पाळेकरांचा बंदोबस्त करण्याच्या कामाला प्राधान्य दिले. शिवाजीराजांचा वतनदारांशी हा विग्रह आयुष्यभर चालला. किशोरवयातील शिवरायांच्या मनात मावळातील गरीब जनतेला जर्जर करणाऱ्या या अरेरावी शिरजोरांविरुद्ध प्रामुख्याने तीन कारणांमुळे तिटकारा निर्माण झाला. पहिले, हे देशमुख, देशपांडे, वतनदार, मोकासेदार मन मानेल तशी वसुली करीत व जनतेला लुबाडीत होते; दुसरे, त्यांच्या मजबूत किल्लेकोटात ते आपापली शस्त्रबंद शिबंदी राखत असत. आणि तिसरे, त्यांच्या कारभारात स्त्रिया सुरक्षित नसत. आपली लालसा भागवण्यासाठी ते कोणत्याही थराला जावयास थांबत नसत. शिवराय या स्वार्थी समाजकंटकांच्या अक्षरश: हात धुवून पाठीशी लागले आणि त्याबद्दल मावळच्या जनतेने त्यांना अनंत आशीर्वाद दिले. या व अशा अनेक सद्कृत्यांमुळे त्यांनी जनतेचा अतूट विश्वास संपादन केला. जनता त्यांच्याविरुद्ध कधीही बंड करून उठली नाही, ना त्यांच्या स्वराज्य सेनेत कधी बंडाळी झाली. शिवाजीराजे नेहमी सांगत, 'आमच्या इमानावर मान ठेवून या'.

शिवाजीराजांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या कर्तबगारीमुळे त्यांच्या कर्तृत्वाला अधिकच झळाळी प्राप्त होते. याबाबतीत नरहर कुरुंदकर लिहितात, 'अफझलखान, सिद्दी जोहर, मिर्झा राजे जयसिंह, आलमगीर औरंगजेब ही सामान्य माणसे नव्हती. जर ती सामान्य माणसे असती, तर त्यांच्यावर जय मिळवणे हेही सामान्य कर्तृत्व ठरले असते. असामान्य कर्तृत्वाचे रहस्यच यात असते की, ते असामान्य प्रतिकूल परिस्थितीच्या विरोधात उभे असते. शिवाजी हा युगप्रवर्तक नायक आहे. त्याच्या युगप्रवर्तक कर्तृत्वाला तेवढ्याच मोठ्या प्रतिकूल सामर्थ्यामुळे अर्थ येतो. या सैनिकी बळाच्या विरुद्ध सेनाबळ पुरेच पडले नसते. त्यांच्यावर विजय प्रबळ स्वातंत्र्याकांक्षेतून साकार होत असतो.'[२३]

शिवाजीराजांच्या कर्तृत्वाच्या तीन वैशिष्ट्यांची दखल घेणे आवश्येक आहे; पहिले, त्यांनी निर्माण केलेले गुप्तहेरांचे जाळे; दुसरे, त्यांची भूभागाच्या महत्त्वाची समज आणि तिसरे, पोकळ आश्वासनांकरवी शत्रूची दिशाभूल करून आपले उद्दिष्ट साधण्याची त्यांची गोम. बहिर्जी नाईक हा त्यांचा इमानदार आणि कर्तबगार पंचमस्तंभी. कोणतीही कामगिरी हाती घेण्याआधी

ते बहिर्जीला काटेकोर माहिती गोळा करण्यासाठी पिटाळायाचे आणि त्याने आणलेल्या माहितीवरच आपला सर्व आराखडा आखायचे. लक्ष्याची आणि त्याच्या दिशेने जाणाऱ्या सर्व मार्गांची पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय ते कधीही हलत नसत. शिवाजीराजांना कोणत्याही जमिनीचा भाग आपल्या फायद्यासाठी कसा वापरावा, याचे अचूक निदान होते. जावळीचे खोरे त्यांनी काबीज केले, ते अफझलखानाला सापळ्यात पकडण्यासाठी. करतलबखानाच्या प्रचंड सेनेचा धुव्वा त्यांनी उडवला, तो केवळ त्यांच्या भूगोलाच्या कसबामुळे.

शत्रूची दिशाभूल करून आपल्याला आवश्यतक अवसर प्राप्त करून घेण्यातही त्यांचा हातखंडा होता. १६५६मध्ये त्यांनी दाभोळ घेतले, ते आपल्याकडे ठेवण्याची परवानगी औरंगजेबाकडून मिळवली आणि लागलीच त्याच्या जुन्नर आणि अहमदनगरवर हल्ले चढवले. तशीच बहादुरखानाच्या छावणीवर हल्ला चढवल्यानंतर त्याची माफी मागून मोगलांबरोबर तह करण्यासाठी प्रस्ताव पाठवला. तो दिल्लीहून संमत होऊन येण्यासाठी तीनचार महिने जातील, हे त्यांना ठाऊक होते. त्यादरम्यान त्यांनी उत्तर कोकणावर हल्ला चढवला. जेव्हा तो प्रस्ताव बादशहाकडून संमत होऊन आला, तोपर्यंत राजांनी कारवारपर्यंत प्रदेश अमलाखाली आणला होता. मग त्यांनी बहादुरखानाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

राज्याभिषेकानंतरच्या अल्प जीवनकाळात त्यांनी कर्नाटकाच्या दिग्विजयाची मोहीम हाती घेतली. त्यात त्यांची दूरदृष्टी दिसते. यापुढे औरंगजेबाविरुद्ध जर लढायचे असेल, तर कुतुबशाही, आदिलशाही आणि मराठ्यांनी एकत्रितपणे मोगलांविरुद्ध उभे राहणे आवश्याक आहे, ही सुज्ञ जाणीव त्यामागे होती. अत्यंत मर्यादित समयात त्यांनी दक्षिणेत भरारी मारून पादाक्रांत केलेले प्रचंड क्षेत्र हे लष्करी आश्चर्य आहे.

शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचे मर्म त्यांनी प्रस्थापित केलेले राज्य त्यांच्या मृत्यूनंतर तीन दशकांच्या टोकाच्या प्रतिकूल परिस्थितीनंतरही तग धरून राहिले याच्यात आहे. त्या काळात संभाजी महाराजांची निर्घृण हत्या करून त्यांच्या कुटुंबीयांना बंदिवासात टाकण्यात आले; राजाराम महाराजांना जीव वाचवण्यासाठी जिंजीस जावे लागले आणि तिथूनच त्यांनी राज्याचे संचालन केले; त्यांच्या मृत्यूनंतर भाऊबंदकीने डोके वर काढले, शेवटी १७०७ मध्ये शाहूमहाराजांच्या परतीनंतरच स्वराज्याचे पुनरुज्जीवन झाले. ही सत्तावीस वर्षे त्या स्वराज्याची ज्योत टिकून राहिल्याचे श्रेय महाराजांच्या कर्तृत्वाला जाते. पुढे १७१९मधील मोगलांबरोबरील दिल्ली करारात त्यांचे नातू शाहूमहाराजांनी मोगल साम्राज्याचे स्वामित्व पत्करले, ही गोष्ट अलाहिदा!

शिवाजी महाराज म्हणजे आधुनिक भारताशी अनुबंध असणारा, समुद्राचा गंभीरपणे विचार करणारा पहिला भारतीय राजा.२४ आरमार हे राज्याचे एक स्वतंत्र अंग आहे, या जाणिवेने स्वत:चे नाविकदल महाराजांनी उभारले. सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांचा संपूर्ण पाडाव करणे मराठा आरमाराला कधी जमले नाही. परंतु महाराजांनी यशस्वीरीत्या तिघांची नाकेबंदी केली. मराठ्यांनी जर या आरमाराचा पद्धतशीरपणे विकास केला असता आणि इंग्रजांच्या आरमारी शक्तीला परिणामकारक शह दिला असता, तर भारतावर राज्य स्थापन करणे इंग्रजांना शक्य झाले नसते. शिवाजी महाराजांसारख्या दूरदृष्टी सिद्ध पुरुषालाच हा साक्षात्कार होऊ शकला.

मराठा आरमाराची स्थापना हा शिवाजी महाराजांच्या अद्वितीय कर्तृत्वाचा आविष्कार आहे.

शिवाजी महाराजांनी आपला घोडा आणि शस्त्र देऊन स्वराज्याची बारगीरांची शाही फौज उभी केली व त्यायोगे शिलेदारांचे प्रस्थ मोडले. वतनदारांच्या फौजा काढून घेतल्या. त्यांचे बळकट वाडे तोडले. अधिक महत्त्वाची ठिकाणे आपल्या ताब्यात घेतली. त्यांची उत्पन्ने ठरवून दिली. करवसुलीचे व न्यायनिवाड्याचे हक्क काढून घेतले. मध्ययुगात स्त्री ही स्वाभिमानाची, कुटुंबाच्या अब्रूची खूण असे. आपल्या राज्यात स्त्रीची अब्रू बिनधोक करून शिवाजी महाराजांनी प्रजेला पोटभर अन्न दिले. स्वाभिमानाला संरक्षण दिले. शिवाजी महाराजांनी वतनदारांचा पैसा, राज्यकारभाराचा पैसा, फौजांचा खर्च या बाबी आपल्याला मिळणाऱ्या दोन पंचमांशामधून भागवला.२५

शिवाजी महाराजांनी सामान्यांचे सेनापती केले. त्यांनी त्या काळात तलवारीच्या जोरावर राज्यरक्षण केले, पण 'साहिबी कारुनाची' अशी घोषणा केली. गड कोटांना काय हवे ते कारून देतील. जनतेकडून कर घ्यायचे ते कारून घेतील. फौजांना जाताना गावाला काही मागण्याचा हक्क नाही. फुकट घेऊ नये. आपल्या प्रजेची लूटमार हा दंडनीय गुन्हा ठरवला. त्यांच्या फौजांकडून एका जत्रेतील लोकांना उपसर्ग झाल्याचे कळताच त्यांनी जातीने चौकशी करून तीनशे लोकांचे हात तोडले; कारण तलवारी हातात घेणारे बलशाली हात यांच्यापेक्षा त्या शासनामागे उभा असणारा जनतेचा बलशाली आशीर्वाद हा त्यांना महत्त्वाचा वाटत होता. जनतेच्या राज्यात लष्कराने लढावे, पराक्रम करावेत, जनतेने त्यांचे आधिपत्य स्वीकारावे; पण कारभार ठीक करायचा असेल, तर मुलकी सत्ता ही लष्करी सत्तेहून श्रेष्ठ असली पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. 'साहेबी कारुनाची' याचा अर्थ हा आहे. मध्ययुगात मुलकी सत्तेचे श्रेष्ठत्व सांगणारा हा माणूस भारताच्या इतिहासात तर एकटाच आहे. जगाच्या इतिहासातही तो निराळा आहे. नेपोलियनने सिव्हिल कोड दिले म्हणून त्याचे मोठेपण सांगणाऱ्यांनी याचा कधी विचार केला नाही. शिवाजीराजांची ही राज्यनिष्ठा पाहिल्यानंतर रामदास त्यांना 'शिवकल्याण राजा' का म्हणतात, हे कळते.२६

शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाबद्दल कंपनी सरकारचा एक अधिकारी १६ जानेवारी १६७८ रोजी त्याने आपल्या वरिष्ठाला लिहिलेल्या पत्रात त्यांची महती अशी गातो : 'अलेक्झांडर द ग्रेटइतकाच त्याचा हातखंडा आहे. कारण पूर्वी जयसिंहाला दिलेले २३ दुर्गम किल्ले त्याने आपल्या पक्ष्यांप्रमाणे चपळ स्वारांच्या साहाय्याने मोगलांपासून आठ महिन्यांच्या आत परत घेतले. विजापूर घेतल्यावर मग थेट दिल्लीवर चाल करून जाऊन औरंगजेबाला तेथे कोंडून टाकीपर्यंत तलवार म्यानात न घालण्याची त्याने देवीजवळ प्रतिज्ञा केली आहे, असे म्हणतात'.२७

गोव्याच्या व्हॉइसरॉयने पोर्तुगालच्या राजाला पाठवलेले २७ जानेवारी १६६७चे पत्र असाच काही निर्वाळा देते : 'धूर्तपणा, चातुर्य, पराक्रम, चापल्य आणि लष्करी बुद्धी, याबाबतीत तुलना करायची झाल्यास ती सीझर आणि शिकंदरशी करावी लागेल. तो नाही अशी एकही जागा नाही. तो सबंध आशियाशी युद्ध करीत आहे. मोगल बादशहापाशी लक्षावधी सैन्य आहे. पण त्या सैन्याला न जुमानता त्याने सुरत शहर लुटले. मोगल बादशहाप्रमाणेच आदिलशहाचे सैन्य

दुसऱ्या बाजूला होते. परंतु या दोन्ही बलाढ्य शत्रूंमधून तो सुरतेहून सुरक्षितपणे मागे परतला. जमिनीप्रमाणे समुद्रावरही त्याचा दरारा आहे. आम्हांला त्याच्या आरमाराची भीती वाटते, कारण समुद्रकिनाऱ्यावर त्याचे किल्ले आहेत. त्याच्यापाशी असलेल्या नौका सगळ्याच मोठ्या नसल्या, तरी बऱ्याच लहान लढाऊ नौका त्याच्यापाशी आहेत.'[२८]

उपसंहार

शिवाजी महाराजांनी काही नवीन बांधलेल्या तर काही जुन्या, काही अभेद्य तर काही तकलादू, किल्ल्यांवर मोर्चेबंदी करून सभोवतालच्या प्रदेशावर प्रभुत्व प्रस्थापित केले आणि स्वराज्य उभारले. गनिमी कावा हा त्यांच्या अद्वितीय आणि ईश्वरी लष्करी प्रतिभेचा अविष्कार. अशा प्रकारे किल्ले आणि गनिमी कावा हे दोन प्रमुख स्तंभ त्यांच्या अपरिमित सर्जनशीलतेचे द्योतक आहेत. वैयक्तिक शौर्य, अदम्य साहस, अव्वल कूटनीतीज्ञता आणि अलौकिक युद्धनेतृत्व या गुणांनी संपन्न असे ते एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे सेनानायक होतेच, परंतु ऐतिहासिक दायित्वाची जाणीव, धार्मिक सहिष्णुता, सांस्कृतिक जागृती आणि प्रजेचा जिव्हाळा यांनी भारलेले ते एक लोकोत्तर स्वयंभू राज्यकर्तेही होते.

केवळ साडेतीन दशकांच्या अल्पावधीत त्यांनी शून्यापासून आरंभ करून तापीपासून कावेरीपर्यंत स्वराज्य उभारले. त्यांच्या यशाची कारणे सुन्त्झू (सुनवू वा सुन्झी) या प्राचीन चिनी तत्त्ववेत्त्याच्या निरूपणात सापडतात.२९ सुन्त्झूच्या मते अशा धवल यशासाठी पाच घटक आणि सात संकेतांची (अटींची) परिपूर्ती होण्याची आवश्य कता असते.

पाच घटक आहेत : तर्कनिष्ठ व नावीन्यपूर्ण युद्धसंकल्पना, कर्तृत्वशील सेनानायक, जमिनीचा फायदेशीर वापर करण्याचे कसब, वातावरणाचा परिणाम आणि नैतिक अधिष्ठान. शिवाजीराजांची गनिमी काव्याची संकल्पना त्यांच्या शत्रूंच्या नेहमीच्या प्रचारातील युद्धपद्धतीपेक्षा सर्वथा सरस होती. कर्तृत्वशील सेनापतीच्या पाच प्रमुख पैलूंचा सुन्त्झू उल्लेख करतो : सुज्ञपणा, नैतिक मूल्ये, सैनिकांची अनुकंपा, सैनिकांसमोर उदाहरण उभे करणारे धैर्य आणि कडक शिस्त. याबद्दल याआधी जागोजागी सविस्तर चर्चा झाली आहे. शिवाजीराजांची जमिनीची पारख अजोड होती. त्याचे समर्पक उदाहरण म्हणजे त्यांनी अफझलखानाच्या प्रचंड सैन्याला कोंडण्यासाठी निवडलेले जावळीचे खोरे. कारवाईसाठी प्रतिकूल वातावरणाची निवड हा राजांचा हुकुमी एक्का होता. 'रात्र मूर्खांना झोपण्यासाठी असते आणि शूराला त्या मूर्खावर हल्ला करण्यासाठी तोच उचित समय असतो', हा राजांचा नियम (थंब रूल). नैतिक अधिष्ठान म्हणजे राजाचा प्रजेवरील प्रभाव आणि त्याच्या आकांक्षांत प्रजेचा स्वखुशीने सहभाग. प्रजेचे संपूर्ण अनुमोदन आणि सहकार्य असलेले शिवाजीराजांच्या स्वराज्यापेक्षा दुसरे राज्य सापडणे कठीण आहे.

यशासाठी ज्या सात अटींची पूर्तता होणे आवश्यहक असते, त्या आहेत: पहिली, दोन्हींपैकी कोणता राजा राजकीयदृष्ट्या अधिक सुजाण आहे? दुसरी, दोन्हींपैकी कोणता सेनापती अधिक कार्यक्षम आहे? तिसरी, दोन्हींपैकी कोणत्या बाजूसाठी जमीन आणि वेळ अधिक अनुरूप आहे? चवथी, दोन्हींपैकी कोठे आदेशांची काटेकोर तामिली होते? पाचवी, कोणती

बाजू शस्त्रास्त्रांत अधिक सरस आहे? सहावी, दोन्हींपैकी कोणत्या सैन्याचे प्रशिक्षण वरचढ आहे? आणि सातवी, कोणता सेनापती आपल्या सैनिकांची नि:पक्षपातीपणे पाठ थोपटण्यात आणि त्यांना शिक्षा देण्यात अधिक दक्ष आहे?

शिवाजीराजांची अत्यंत नि:पक्षपातीपणे सर्व प्रतिस्पर्ध्यांशी तुलना केली, तर फक्त एकच बाब सोडून ते इतर सर्व बाबतींत निश्चितच वरचढ ठरतात. त्यांतील एकच अपवाद म्हणजे पाचवा मुद्दा. मराठा सैन्य शस्त्रांच्या बाबतीत मोगल किंवा आदिलशाही सैन्यांपेक्षा निर्विवाद कनिष्ठ होते. परंतु ही कमतरता ते आपल्या इतर क्षेत्रांतील नैपुण्यामुळे भरून काढत असत.

शिवाजीराजांच्या यशामागील हे रहस्य आहे.

शिवाजीराजांनंतर तीन दशकांनीच जन्मलेले शीख समाजाचे आठवे गुरु गोविंदसिंग यांचा त्यांच्या सैनिकांना दिलेला हा संदेश या ग्रंथाचा समारोप करण्यासाठी अत्यंत समर्पक वाटतो :

दे शिवा वर मो ये है, शुभ कर्मन ते कबहुँ न डरूँ
न डरूँ अरि सों जब जाय लरूँ, निश्चय कर अपनी जीत करूँ
अर सिख हूँ अपने मन को, ए लालच हो गुन त्यों उचरूँ
जब आव की औध निधान बनें, अत ही रण में तब जूझ मरूँ

'हे ईश्वरा, मला एक वर दे की मी माझ्या सत्यकर्मात केव्हाही कचरणार नाही. लढाईत जेव्हा शत्रू सामोरा येईल, तेव्हा मला त्याचे तसूभर भय वाटणार नाही आणि मला माझ्या यशाची खातरी वाटेल. माझ्या मनात सदैव सात्त्विकता भरलेली राहो आणि जेव्हा माझा शेवटचा क्षण यावयाचा असेल, तेव्हा घनघोर लढाईत माझे प्राणार्पण होवो!'

अशा काही थोर व्यक्ती राष्ट्रात कधी काळी उदय पावतात की, त्या आपल्या कर्तबगारीने सबंध राष्ट्राचा स्वभाव साफ बदलून टाकतात. अशा व्यक्तींपैकी शिवाजी महाराज ही एक अलौकिक विभूती निर्माण झाली. 'राजा कालस्य कारणं' याच संदर्भात म्हटले जाते. शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या लष्करी इतिहासातील एक देदीप्यमान दीपस्तंभ आहेत. त्यांची स्मृती महाराष्ट्राला अशीच प्रेरणा देत राहो.

जयतु शिवाजी, जयतु शिवाजी!

संदर्भ सूची

१. शशिकांत पित्रे; ॲडमिरल भास्कर सोमण, नौसेनेचे सरखेल; राजहंस प्रकाशन; पान ६-१०.

२. गो. रा. कुलकर्णी; युगद्रष्टे छत्रपती शिवाजी; वालावलकर ट्रस्ट प्रकाशन; पान १७८.

३. विजय देशमुख; शककर्ते शिवराय खंड २; छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन; पान ४५३; उद्धृत षष्ठ संमेलन वृत्त १८४०, पान ५९.

४. पुर्वोक्त; पान ४५४.

५. पुर्वोक्त; पान ४५४; उद्धृत फॉरिन बायोग्राफीज ऑफ शिवाजी; सुरेंद्रनाथ सेन, १९२७; पान २-३.

६. गो. स. सरदेसाई; मराठी रियासत खंड १; पॉप्युलर प्रकाशन; पान ३४९.

७. नरहर कुरुंदकर; छत्रपती शिवाजी महाराज जीवन रहस्य; देशमुख आणि कंपनी; पान ४९.

८. पुर्वोक्त; पान ५३.

९. गो. स. सरदेसाई; मराठी ....; पान ३५१.

१०. नरहर कुरुंदकर; छत्रपती..........; पान ४३.

११. पुर्वोक्त; पान २४.

१२. पुर्वोक्त; पान २५.

१३. गो. स. सरदेसाई; मराठी ....; पान ३६२.

१४. नरहर कुरुंदकर, छत्रपती...... ; पान ६२-६३.

१५. पुर्वोक्त, पान २१.

१६. पुर्वोक्त; पान १६.

१७. पुर्वोक्त; पान २३-२४.

१८. त्रयं. शं. शेजवलकर; शेजवलकारांचे लेख, पुस्तक २रे; 'शिवाजीचा मार्ग'; ह. वि. मोटे प्रकाशन; पान ८६.

१९. गो.स. सरदेसाई; मराठी ......; पान ३५२; उद्धृत बुक ऑफ बॉम्बे, भाग १, पान ३४६.

२०. बा. अ. भिडे; चार वीर व मुत्सद्दी; केशव भिकाजी ढवळे; १९२८; पान २१५-३०.

२१. पुर्वोक्त; पान ६९.

२२. गो. स. सरदेसाई; मराठी ....; पान ३५४; उद्धृत, अमात्याची राजनीती, पान ३.

२३. नरहर कुरुंदकर; छत्रपती ....; पान ४६.

२४. पुर्वोक्त; पान ५४.

२५. पुर्वोक्त; पान ६.

२६. पुर्वोक्त; पान ६२.

२७. गो. स. सरदेसाई; मराठी ....; पान ४०६; इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी, व्हॉल्यूम २, पान १४९-१५०, पत्रक्रम २७२, शिव पत्रसार संग्रह पत्रक्रम २००७.

२८. गो.स. सरदेसाई; पान ४०५; उद्धृत पोर्तुगीज दप्तर खंड ३; पान ९-१०.

२९. वँग सुआनमिंग; सुन्त्झूज आर्ट ऑफ वॉर; एशियाटिक पब्लिकेशन्स; पान २७-३३.


प्रतिपच्चं
द्रलेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

संदर्भ ग्रंथसूची

१. गो. स. सरदेसाई; 'मराठी रियासत खंड १', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, जानेवारी २०११/१९३२.

२. बाळशास्त्री हरदास; 'पुण्यलोक शिवाजी महाराज' 'भाग १ ते ४' बाळशास्त्री हरदास, लाखे प्रकाशन, नागपूर.

३. विजयराव देशमुख; 'शककर्ते शिवराय खंड १ व २'; छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर.

४. ब. मो. पुरंदरे; 'राजा शिव छत्रपती, पूर्वार्ध व उत्तरार्ध'; पुरंदरे प्रकाशन, पुणे.

५. निनाद बेडेकर; 'छत्रपती शिवाजी'; कर्नाटक प्रकाशन संस्था, पुणे.

६. दुर्गा भागवत; 'कौटिलीय अर्थशास्त्र'; वरदा बुक्स, पुणे.

७. डॉ. श्रीनिवास सामंत; 'वेध महामानवाचा'; देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स), पुणे.

८. नरहर कुरुंदकर; 'छत्रपती शिवाजी महाराज जीवन-रहस्य'; देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स), पुणे.

९. डॉ. सचिन पेंडसे; 'मराठा आरमार, एक अनोखे पर्व'; मर्वेन टेक्नोलॉजीज; पुणे.

१०. गोविंद पानसरे; 'शिवाजी कोण होता'; लोकवाङ्मय गृह, मुंबई.

११. बा. अ. भिडे; 'चार वीर व मुत्सद्दी'; केशव भिकाजी ढवळे, मुंबई,१९२८.

१२. क्रांतिवीर बाबाराव सावरकर; 'गरुडझेप'; स्वातंत्र्यवीर वाङ्मय वक्तृत्व समिती, पुणे. (१९३९)

१३. त्र्यं. शं. शेजवलकर; 'शेजवलकरांचे लेख पुस्तक २रे'; ह. वि. मोटे प्रकाशन.

१४. दि. वि. गोखले; 'युद्धमीमांसा'; मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.

१५. शशिकांत पित्रे; ॲडमिरल भास्कर सोमण, 'नौसेनेचे सरखेल'; राजहंस प्रकाशन, पुणे.

१६. शशिकांत पित्रे, 'या सम हा'; राजहंस प्रकाशन, पुणे.

१७. गो. रा. कुलकर्णी; 'युगद्रष्टे छत्रपती शिवाजी'; श्री संत सीतारामबुवा वालावलकर चारिटेबल ट्रस्ट, श्री क्षेत्र डेरवण.

१८. रा. वि. ओतुरकर; 'हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास'; १९३९.

१९. वि. शं. ठकार; 'मराठी-मराठी-इंग्रजी पर्याय शब्दकोश'; मेहता पब्लिशिंग हाउस.

२०. Colonel R. D. Palsokar, MC; 'Shivaji the Great Gurrilla'; Self published.


२१. G.B. Mehendale; 'Shivaji - His Life and Times'. Paramamitra

Publications.
२२. James Grant Duff; 'History of the Marathas'; Karan Publications, Delhi, 2000.
२३. Surendra Nath Sen; 'The Military System of Marathas'; K P Bagchi Company, 1928/1979.
२४. Alain Danielou; 'Brief History of India'; Inner Traditions India Vermount USA/ India Book Distributors (Bombay) Ltd, Mumbai 21.
२५. B.G. Kunte; 'Maharashtra State Gazetteers. History - Part II - Medieval Period; Directorate of Government Printing, Bombay, 1972.
२६. Sir Basil Lidell Hart, 'Strategy of Indirect Approach'; Faber and Faber Ltd London.
२७. Thomas Cleary; 'The Art of War- Sun Tzu'; Shambhala South India (Dragon) Editions;; 1999.
२८. Satya Joshi, Editor; 'Shivaji and Facets of Maratha Culture'; Mara Publications.
२९. Wang Xuanming; 'Sunzi's Art of War'; Asiapac Books Pvt Ltd, Singapore.
३०. L F Rushbrook Williams, Editor; 'Great Men of India'; The Home Library Club, The Times of India- The Statesman Associated Newspapers of Ceylon Ltd.
३१. Bevin Alexander; 'How Wars Are Won'; Crown Publishers, New York .
३२. TCA Raghavan; 'History Men'; HarperCollins Publishers.
३३. Mahadeo Govind Ranade; 'Rise of Maratha Power'; Publications Division Ministry of Information and Broadcasting, India.

दुय्यम (उद्धृत) संदर्भ ग्रंथ

३४. शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड १ ते ३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
३५. जेधे शकावली शिवचरित्र प्रदीप पृ १४ ते ३९- द. वि. आपटे, स. म. दिवेकर, शके १८४७.

३६. शिवचरित्र प्रदीप. संपादक - द. वि. आपटे, स.म. दिवेकर, शके १८४७.
३७. शिव चरित्र साहित्य खंड १ ते १३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
३८. The English Factories in India. Edited By Sir Charles Fawcett.
३९. English Records on Sivaji- Shiv Charitra Karyalay, Poona 1931.
४०. House of Shivaji - Sir Jadunath Sarkar (Third Edition 1955)
४१. जेधे यांचा करीना शिवचरित्र प्रदीप.
४२. श्री शिवदिग्विजय बखर. संपादक - पां. रा. नंदुरबार, ल. का. दांडेकर (शके १८१७)
४३. श्री शिवप्रताप- पुरातानेतिहास प्रकाशक मंडळी, बडोदे, १८९५.
४४. कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती श्रीशिवप्रभूंचे चरित्र, संपादक - वि. स. वाकसकर.
४५. असे होते मोगल (मनुचीकृत ग्रंथाचा अनुवाद) संपादक- ज. स. चौबळ.
४६. Foreign Biographies of Shivaji- Surendra Nath Sen, 1927.



मेजर जनरल शशिकांत गिरिधर पित्रे (निवृत्त)

मेजर जनरल शशिकांत पित्रे यांचे शिक्षण कोल्हापूर, सातारा आणि पुणे येथे झाले. ते संरक्षण विषयातील एम.एस्सी आणि मास्टर ऑफ इंजिनीअर आहेत. डिसेंबर १९६२मध्ये डेहराडूनच्या सैनिकी अकादमीतून प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सैन्याच्या अभियंतादलात त्यांची अधिकारपदावर नेमणूक झाली.

सेकंड लेफ्टनंट ते जनरल या त्यांच्या ३६ वर्षांच्या सैन्यसेवेदरम्यान त्यांना भारताच्या सर्व सीमांवर काम करण्याची संधी लाभली. १९६५ आणि १९७१च्या युद्धांत त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. १९८७-८९च्या श्रीलंकेमधील भारतीय शांतिदलाच्या मुख्यालयात ते वरिष्ठ योजना अधिकारी (कर्नल ऑपरेशन्स) होते.

इंजिनिअर कोअरचे अधिकारी असूनही १९९०मध्ये पायदळाच्या तुकड्यांचे नेतृत्व करण्यासाठी त्यांची निवड झाली. सिक्कीम सीमेवर आणि मणिपूरच्या अशांतिपूर्ण भागात त्यांनी इन्फंट्री ब्रिगेडचे नेतृत्व केले. त्यानंतर भारताच्या

पश्चिम सीमेवर त्यांनी इन्फंट्री डिव्हिजनची धुरा यशस्वीरीत्या सांभाळली. १९९८मध्ये सैन्यामधून निवृत्त होण्यापूर्वी ते सिमल्यामधील आर्मी ट्रेनिंग कमांडचे उपप्रमुख होते.

निवृत्तीनंतर जनरल पित्रे यांनी विविध संरक्षण विषयांवर चौफेर लेखन केले. कारगिल युद्धादरम्यान सकाळमधील त्यांचे ‘व्यूह आणि वेध’ हे सदर कमालीचे गाजले. त्याचप्रमाणे अफगाणिस्तान आणि इराक युद्धे चालू असताना त्यांनी ‘लोकसत्ता’मध्ये लिहिलेली प्रदीर्घ सदरे वाचकांना आवडली. ‘लोकमत’मधील ‘संस्मरणीय रणसंग्राम’ हे सदरसुद्धा लोकप्रिय ठरले. विविध मराठी आणि

इंग्रजी चित्रवाहिन्यांवरील चर्चेत संरक्षण विषयातील विलेषणासाठी त्यांना बोलावण्यात येते.

काश्मीर प्रश्नावरील त्यांच्या ‘डोमेल ते कारगिल’ या ग्रंथाला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या २००१च्या सर्वोत्तम ग्रंथ या पारितोषिकाने गौरवण्यात आले. त्यांनी मराठी आणि इंग्रजीमध्ये लिहिलेल्या ॲडमिरल सोमण व जनरल एस. पी. पी. थोरात यांच्या चरित्रांना आणि ‘श्रीलंकेची संघर्षगाथा’ या पुस्तकांनाही वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. १९६२च्या भारत-चीन युद्धावरील त्यांनी लिहिलेल्या

‘न सांगण्याजोगी गोष्ट - ६२च्या पराभवाची शोकांतिका’ या पुस्तकाला अद्यापपर्यंत केसरी

मराठा संस्थान, महाराष्ट्र साहित्य परिषद, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पार्ले टिळक मंदिर आणि उत्कर्ष मंडळ पार्ले यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित साहित्यिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

जनरल पित्रे यांची महाराष्ट्र शासनाने मराठी विश्वकोश समितीच्या सदस्यपदी नेमणूक केली आहे. सुधारित विश्वकोशाच्या 'सामरिक शास्त्र आणि राष्ट्रीय सुरक्षा' या खंडाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्याचबरोबर सैन्यात अधिकारी हुद्दयावर प्रवेश करू इच्छिणाऱ्या तरुणांना एन. डी. ए.च्या पूर्वतयारीचे प्रशिक्षण देण्यासाठी औरंगाबाद येथे महाराष्ट्र शासनातर्फे स्थापन केलेल्या 'सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट' या संस्थेचे ते विश्वस्त आहेत.

जनरल पित्रे यांनी इतर निवृत्त सैनिकी अधिकाऱ्यांच्या साहाय्याने भूतपूर्व सैनिकांची 'होरायझन' ही धर्मादाय संस्था २००१ मध्ये स्थापन केली. ही 'सैनिकांची आणि सैनिकांसाठी' संघटना परदेशात संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने भूसुरुंग निकामी करण्याच्या कामाला वाहिलेली आहे. अद्यापपर्यंत श्रीलंका, जॉर्डन, कुवैत वगैरे देशांत त्यांनी सुमारे दीड लाख भूसुरुंग निकामी करून उल्लेखनीय मानवीय काम केले आहे. त्याबद्दल या संस्थेलाही विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

३९ लढायांत अजेय राहिलेल्या पहिले बाजीराव पेशवे यांच्या अद्वितीय युद्धनीती आणि लष्करी नेतृत्वावर जनरल पित्रे यांनी लिहिलेल्या 'या सम हा' या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय सेनाप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या शुभहस्ते १ फेब्रुवारी २०२०ला झाले.

परिशिष्ट

शिवाजि-उत्सव

रवीन्द्रनाथ टागोर

(ज्या कवितेत रवीन्द्रनाथांनी शिवरायांचा मुक्तकंठाने जयजयकार केला. ती ही १४४ ओळींची, १८ कडव्यांची कविता. गेल्या शतकाच्या प्रारंभी कलकत्त्यात शिवजयंती-उत्सव साजरा होऊ लागला. काही वर्षे त्या फत्सवात सुरुवातीलाच स्वत: रवीन्द्रनाथ ही कविता गात असत.)

कोन् दूर शताब्देर कोन्-एक अख्यात दिवसे
नाहि जानि आजि
माराठार कोन् शैले अरण्येर अन्धकारे ब'से
हे राजा शिवाजि,
तब भाल उद्भासिया ए भावना तडित् प्रभावत्
एसेछिल नामि
'एकधर्मराज्य-पाशे खण्ड छिन्न विक्षिप्त भारत
बेंधे दिब आमि ।' १.
सेदिन ए बंगदेश उच्चकित जागेनि स्वपने
पायनि संवाद
बाहिरे आसेनि छुटे, उठे नाइ ताहार प्रांगणे
शुभ शंखनाद ।
शान्तमुखे बिछाइया आपनार कोमल निर्मल
श्यातमल उत्तरी
तंद्रातुर सन्ध्याकाले शत पल्लीसन्तानेर दल
छिल बक्षे करि ॥ २.
तार परे एकदिन माराठार प्रान्तर हइते
तव वज्रशिखा
आँकि दिल दिग्दि गन्ते युगान्तेर विद्युत्वह्निते
महामंत्रलिखा ।
मोगल-उष्णीषशीर्ष प्रस्फुरिल प्रलयप्रदोषे
पक्वपत्र यथा
सेदिनओ शोनेनि बंग माराठार से वज्रनिर्घोषे
की छिल बारता ॥ ३.
तार परे शून्य हल झंझाक्षुब्ध निबिड निशीथे
दिल्लिराजशाला

एवे एवे कक्षे कक्षे अन्धकारे लागिल मिशिते
दीपालोकमाला ।
शवलुब्ध गृध्रदेर ऊर्ध्वस्वर बीभत्स चीत्कारे
मोगलमहिमा
रचिल श्माशानशय्या मुष्टिमेय भस्मरेखाकारे
हल तार सीमा ॥ ४.
सेदिन ए बंग प्रांते पण्यविपणीर एकधारे
निःशब्दचरण
आनिल वणिक्लक्ष्मी सुरंगपथेर अन्धकारे
राजसिंहासन ।
बंग तारे आपनार गंगोदवे अभिषिक्त करि
निल चुपे चुपे;
वणिवेर मानदंड देखा दिल पोहाले शर्वरी
राजदंडरूपे ॥ ५.
सेदिन कोथाय तुमि हे भावुक, हे वीर माराठि,
कोथा तव नाम !
गैरिक पताका तव कोथाय धुलाय हल माटि
तुच्छ परिणाम !
विदेशीर इतिवृत्त दस्यु बलि करे परिहास
अट्टहास्यरवे
तव पुण्यचेष्टा जत तस्करेर निष्फल प्रयास,
एइ जाने सबे ॥ ६.
अयि इतिवृत्तकथा, क्षान्त करो मुखर भाषण ।
ओगो मिथ्यामयी,
तोमार लिखन ' परे विधातार अव्यर्थ लिखन
हबे आजि जयी ।
जाहा मरिबार नहे ताहारे वेमने चापा दिबे,
तव व्यंगवाणी?
जे तपस्या सत्य तारे वेह बाधा दिबे ना त्रिदिबे,
निचय से जानि ॥ ७.
हे राजतपस्वी वीर, तोमार से उदार भावना
विधिर भांडारे
संचित हइया गेछे काल कभु तार एक कणा
पारे हरिबारे?
तोमार से प्राणोत्सर्ग, स्वदेशलक्ष्मीर पूजाघरे
से सत्यसाधन,

वे जानित हये गेछे चिरयुगयुगान्तर-तरे
भारतेर धन? ८.
अख्यात अज्ञात रहि दीर्घकाल हे राजबैरागी,
गिरिदरीतले
वर्षार निर्झर यथा शैल विदारिया उठे जागि
परिपूर्ण बले,
सेइमतो बाहिरिले; विवलोक भाबिल विस्मये,
जाहार पताका
अंबर आच्छन्न करे एतकाल एत क्षुद्र हये
कोथा छिल ढाका ॥ ९.
सेइमतो भाबितेछि आमि कवि ए पूर्व-भारते,
की अपूर्व हेरि,
बंगेर अंगनद्वारे वेमने ध्वनिल कोथा हते
तव जयभेरि ।
तिन शत वत्सरेर गाढतम तमिस्र विदारि
प्रताप तोमार
ए प्राचीदिगन्ते आजि नवतर की रश्मि प्रसारि
उदिल आबार ॥ १०.
मरे ना, मरे ना कभु सत्य जाहा शत शताब्दीर
विस्मृतिर तले
नाहि मरे उपेक्षाय, अपमाने ना हय अस्थिर,
आघाते ना टले ।
जारे भेबेछिल सबे कोन्काले हयेछे नि:शेष
कर्मपरपारे,
एल सेइ सत्य तव पूज्य अतिथिर धरि वेश
भारतेर द्वारे ॥ ११.
आजो तार सेइ मंत्र सेइ तार उदार नयान
भविष्येर पाने
एकदृष्टे चेये आछे सेथाय से की दृश्ये महान्
हेरिछे वे जाने ।
अशरीर हे तापस, शुधु तव तपोमूर्ति लये
आसियाछ आज
तबु तव पुरातन सेइ शक्ति आनियाछ बये,
सेइ तव काज ॥ १२.
आजि तव नाहि ध्वजा, नाइ सैन्य, रण-अश्व दल,
अस्त्र खरतर

आजि आर नाहि बाजे आकाशेरे करिया पागल
'हर हर हर' ।
शुधु तव नाम आजि पितृलोक हते एल नामि,
करिल आह्वान
मुहूर्ते हृदयासने तोमारेइ वरिल हे स्वामी,
बाङालिर प्राण ॥ १३.
ए कथा भाबे नि केह ए तिन शताब्दकाल धरि
जाने नि स्वपने
तोमार महत् नाम बङ्ग-माराठारे एक करि
दिबे विना रणे,
तोमार तपस्यातेज दीर्घकाल करि अन्तर्धान
आजि अकस्मात्
मृत्युहीन वाणी-रूपे आनि दिबे नूतन परान
नूतन प्रभात ॥ १४.
माराठार प्रान्त हते एकदिन तुमि धर्मराज,
डेवेछिले जबे
राजा ब'ले जानि नाइ, मानि नाइ, पाइ नाइ लाज
से भैरव रवे ।
तोमार वृपाणदीप्ति एकदिन जबे चमकिला
बङ्गेर आकाशे
से घोर दुर्योगदिने ना बुझिनु रुद्र सेइ लीला
लुकानु तरासे ॥ १५.
मृत्युसिंहासने आजि बसियाछ अमरमुरति
समुन्नत भाले
जे राजकिरीट शोभे लुकाबे ना तार दिव्यज्योति
कभु कोनोकाले ।
तोमारे चिनेछि आजि चिनेछि चिनेछि हे राजन्,
तुमि महाराज ।
तव राजकर लये आट कोटि बङ्गेर नन्दन
दाँड़ाइबे आज ॥ १६.
सेदिन शुनि नि कथा आज मोरा तोमार आदेश
शिर पाति लब ।
कण्ठे कण्ठे वक्षे वक्षे भारते मिलिबे सर्वदेश
ध्यानमंत्रे तव ॥
ध्वजा करि उड़ाइब बैरागीर उत्तरीवसन
दरिद्रेर बल ।

‘एकधर्मराज्य हबे ए भारते’ ए महावचन
करिब सम्बल ॥ १७.
माराठिर साथे आजि हे बाङालि, एक कण्ठे बलो
‘जयतु शिवाजी’ ।
माराठिर साथे आजि हे बाङालि, एक संगे चलो
महोत्सवे साजि ।
आजि एक सभातले भारतेर पश्चिेम-पुरब
दक्षिणे ओ बामे
एकत्रे करुक भोग एकसाथे एकटि गौरव
एक पुण्य नामे ॥ १८.

भावार्थ :

हे राजा शिवाजी, कोण जाणे कोणत्या दूरवरच्या शतकाच्या, कोणत्या तरी एका अज्ञात दिवशी महाराष्ट्राच्या कोणत्या खडकावर, अरण्याच्या अंध:कारात बसून ‘छिन्नविच्छिन्न झालेल्या, विस्कटलेल्या भारताला मी एका धर्म-राज्याच्या बंधनात बांधून टाकीन’, ही भावना तुझे भाल प्रकाशित करून विद्युत्प्रभेप्रमाणे अवतरली होती!

त्या दिवशी हा वंगदेश चमकून निद्रेतून जागा झाला नाही. त्याला तो संदेश मिळाला नाही. तो धावून बाहेर आला नाही. त्याच्या प्रांगणामध्ये तो शुभ शंखनाद घुमला नाही. शेकडो ग्रामवासीयांची दले शांत मुखाने आपले कोमल, निर्मल, श्याेमल उत्तरीय पसरून पेंगुळलेल्या संध्येला छातीशी धरून तशीच राहिली.

त्यानंतर महाराष्ट्राच्या माळरानातून तुझ्या बज्रशिखेने साऱ्या क्षितिजांवर युगांताच्या विद्युत्लोळाने महामंत्राचा लेख कोरून काढला. त्या प्रलयाच्या संध्यासमयीं मोगलांच्या पगडीचा तुरा पिकलेल्या पानाप्रमाणे थरारला. त्या दिवशीही वंगदेशाने महाराष्ट्राच्या त्या वज्रनिर्घोषामध्ये कोणता संदेश होता, ते नीट ऐकले नाही.

त्यानंतर वादळाने क्षुब्ध झालेल्या निबिड रात्री दिल्ली-राजशाला शून्य झाली. एवेका दालनातील दीप-प्रकाशमाला अंधारात विलीन होऊ लागली. लोभी नजरेने मृतदेह धुंडणाऱ्या गिधाडांच्या र्कश्श् बीभत्स चीत्कारांनी मोगलांच्या महिम्याची चिता रचली, त्याची मूठभर राख तेवढी उरली.

त्या दिवशी या बंगाल प्रांतात बाजारपेठेच्या आडून वणिक्लक्ष्मीने भुयारी मार्गाच्या अंधारातून चोरपावलांनी राजसिंहासन आणले. बंगालने आपल्या गंगोदकाने त्याला गुपचुप अभिषेक करून घेतला. रात्र संपून पहाट होताच वैश्यागचा मानदंड राजदंडाच्या रूपाने प्रगट झाला.

हे विचारवंता, हे वीर मराठ्या, त्या दिवशी तू कोठे होतास? कोठे होते तुझे नाव? तुझा तो भगवा झेंडा कोठे धुळीत मिसळला होता? काय हा तुच्छ परिणाम! विदेशी लोकांनी लिहिलेला इतिहास तुला दरवडेखोर संबोधून खदखदा हसत तुझा उपहास करतो. तुझे सारे पुण्य प्रयत्न म्हणजे निष्फळ धडपड होती, असेच सर्वांना माहीत आहे.

हे इतिहासकथे, बंद कर ती बडबड! अगे खोडरडे, तुझ्या लिखाणावर आज विधात्याचे अमोघ लिखाण विजयी होणार आहे. ज्याला मरण नाही, त्याला तुझी उपहासवाणी कशी दडपू शवेल? जी तपस्या सत्य असते, तिला स्वर्गात प्रवेश करण्यास कोणी अडवू शकत नाही, याची मला खातरी आहे.

हे राजतपस्वी वीरा, तुझी ती उदार भावना विधात्याच्या भांडारात जमा होऊन राहिली आहे. तिचा एक कण तरी काळाला कधी हरण करता येईल काय? तुझा तो प्राणयज्ञ, स्वदेशलक्ष्मीच्या पूजामंदिरातील ती सत्यसाधना युगानुयुगांसाठी भारताचे चिरंतन धन बनली आहे! हे कोणाला माहीत होते?

हे राजसंन्याशा, दीर्घकालपर्यंत कडेकपाऱ्यांत, सुप्तावस्थेत राहून वर्षेचा निर्झर आपल्या संपूर्ण बलाने डोंगर फोडून जागा होतो, तसाच तू बाहेर आलास. साऱ्या जगाने विस्मयाने विचार वेला, ज्याची पताका आकाशाला आच्छादून टाकते आहे, तो हा इतका वेळ इतका लहान होऊन कोठे बरे अदृश्य् राहिला होता?

त्याचप्रमाणे मी या पूर्व भारतातील एक कवी मनात असा विचार करतो, मी हे काय अपूर्व पाहात आहे! बंगालच्या अंगणाच्या दारात तुझी जयभेरी कोठून कशी दुमदुमली? तीन शतकांचे गाढतम अंधारवस्त्र फाडून तुझा प्रताप या पूर्वक्षितिजावर आज पुन्हा कोणता नवीन किरण पसरवून उदयाला आला आहे?

शतकानुशतवे विस्मृतीच्या तळाशी दडपले गेले, तरी सत्य हे कधी मरत नसते, कधीच मरत नसते. उपेक्षेने ते मरत नाही. अपमान झाल्यामुळे अस्थिर होत नाही, आघाताने ते विचलित होत नाही. सर्वांना वाटले होते की, तुझ्या कर्मजीवनाच्या पैलतीरावर ते सत्य वेव्हाच नि:शेष झाले आहे. पण तेच तुझे सत्य पूज्य अतिथीचा वेश धारण करून समस्त भारताच्या दारी आले आहे.

आजही त्या सत्याचा तोच मंत्र विद्यमान आहे. त्याचे ते विशाल नेत्र भविष्याकडे टक लावून पाहात आहेत. त्या ठिकाणी ते (सत्य) कोणते महान् दृश्या पाहात आहे, कोण जाणे! हे अशरीरी तापसा, आज तू वेवळ आपली तपोमूर्ती घेऊन आला आहेस. तरीही तू आपली ती पुरातन शक्ती वाहून आणली आहेस. ते आपले कार्य तू बरोबर घेऊन आला आहेस.

आज तुझी ध्वजा नाही, सैन्य नाही, रणअश्वदल नाही, प्रखर अस्त्रे नाहीत, आकाशाला बेभान करून सोडणारा 'हर हर हर' हा जयघोष आज पुन्हा दुमदुमत नाही. आज वेवळ तुझे नाव पितृलोकातून खाली उतरून आले आहे व त्याने आवाहन वेले आहे. हे स्वामी, बंगाली जनतेच्या प्राणांनी एका क्षणांत तुलाच आपल्या हृदय-सिंहासनावर अधिष्ठित वेले आहे.

गेल्या तीन शतकांपासून कोणाच्या मनात असा विचारही आला नाही, स्वप्नातही कोणाला हे कळले नाही की, तुझे महान् नाव बंगाल-महाराष्ट्राला युद्धाशिवाय एकत्र करील आणि तुझ्या तपस्येचे तेज दीर्घकालपर्यंत अंतर्धान पावल्यानंतरही आज अचानक अमर वाणीच्या रूपाने नूतन प्राण, नूतन प्रभात निर्माण करील!

हे धर्मराजा, महाराष्ट्राच्या सरहद्दीवरून एवे दिवशी जेव्हा तू हाक दिलीस, त्या वेळी आम्ही तुला 'राजा' म्हणून ओळखले नाही, मानले नाही. तुझ्या भैरवगर्जनेने आम्ही प्रभावित झालो

नाही. तुझ्या तलवारीचा लखलखाट एवे दिवशी बंगालच्या आकाशात तळपला, तेव्हा त्या भयंकर वादळाच्या दिवशी ती रुद्रलीला आम्हांला कळली नाही. आम्ही भीतीने लपून राहिलों.

हे अमरमूर्ती, आज तू मृत्यूच्या सिंहासनावर बसला आहेस. तुझ्या उन्नत भाळावर जो राजकिरीट शोभतो आहे, त्याची दिव्य ज्योती कधीही लपणार नाही. हे राजन्, आज मात्र आम्ही तुला ओळखले, निश्चितच ओळखले. तू तर महाराज आहेस. तुझा राजकर घेऊन आठ कोटी वंगपुत्र आज उभे राहतील.

त्या दिवशी आम्ही तुझे सांगणे ऐकले नाही. आता मात्र आम्ही तुझा आदेश शिरोधार्य मानू. तुझ्या ध्यानमंत्राने भारतातील सारे प्रदेश एकमेकांना स्नेहालिंगन देतील. बैराग्याच्या उत्तरीयाची ध्वजा बनवून आम्ही ती फडकवू. तेच आम्हा गरिबांचे सामर्थ्य, 'या भारतात एक धर्मराज्य होईल'! या महावचनाला आम्ही आमचे धन बनवू.

हे बंगालवासीयांनो, आज मराठ्यांच्या बरोबर : एका स्वरात म्हणा, 'शिवाजीचा जयजयकार असो.' हे बंगाल्यांनो, आज तुम्ही मराठ्यांसह सजून महोत्सवाला एकत्र चला. आज एकाच सभास्थानी, भारताचे पश्चिम आणि पूर्व भाग हे उजवीकडे व डावीकडे एका पवित्र नावामध्ये एकत्रपणे एका विशेष गौरवाचा अनुभव घेवोत.

('महाराष्ट्र गीत गाथा' या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण काव्यसंकलनावरून साभार. संपादक-संकलक-प्रकाशक : दि. मा. प्रभुदेसाई. प्रस्तावना : बाळासाहेब ठाकरे. मुखपृष्ठ : रवी परांजपे.)

विशेषणांची उधळण केली; तरीही ज्यांचे वर्णन पुरे होऊ शकणार नाही,
अशा शिवाजी महाराजांचा सर्वाधिक लक्षणीय गुणविशेष म्हणजे त्यांचे युध्दनेतृत्व!
राजांनी असंख्य लहानमोठे विजय मिळवले.
त्यांना काही बोचरे पराभवही पत्करावे लागले.
पण त्या पराभवांचे विजयात रूपांतर करण्याची किमया त्यांनी करून दाखवली.
तो पराक्रम घडवतानाच त्यांनी जे डावपेच लढवले,
ज्या युक्त्या-प्रयुक्त्या योजल्या, ज्या व्यूहरचना आखल्या,
त्यांचे लष्करी विश्लेषण करून दाखवणारा हा ग्रंथ.
प्राचीन - अर्वाचीन युध्दशास्त्राच्या लष्करी सूत्रांच्या प्रकाशात
महाराजांच्या अलौकिकत्वाचे झळाळते दर्शन घडवणारा आणि
जागतिक सेनानींच्या नामावळीत त्यांचे अग्रहक्काचे स्थान अधोरेखित करणारा
हा ग्रंथ प्रत्येक शिवप्रेमी देशभक्ताच्या संग्रही हवाच!

जयतु शिवाजी जयतु शिवाजी

राजहंस प्रकाशन